इंग्लीश

# ख्रिस्ती मंडळीची भजनपद्धति

THE BOOK OF COMMON PRAYER

OF THE

**CHURCH OF ENGLAND.**

*Translated into Mara'thi'*

BY THE REV. J. DIXON.

BOMBAY:

PUBLISHED FOR THE CHURCH MISSIONARY SOCIETY.

PRINTED AT THE AMERICAN MISSION PRESS.

1835.

## प्रस्तावना.

ईश्वरानें आपले गुण व गौरव प्रशस्त करायासाठीं सृष्टि उत्पन्न केली आणि त्या सृष्टींतलीं कृत्यें मनुष्यानीं पाहून त्यांजवरून ईश्वराची अनंत शक्ति बुद्धि ज्ञान इत्यादि गुण समजून त्याचें योग्य स्तवन भजन करावें म्हणून ईश्वरानें त्यांला जन्मास घातलें याकरितां मनुष्यांला सर्व इतर कर्मां पेक्षां ईश्वराचें पवित्र भजन करणें श्रेष्ठ उत्तम व हितकारक आहे इहलोकीं ईश्वराची सेवा करून त्याचे आज्ञां प्रमाणें वर्त्तून उत्तरोत्तर पवित्र व्हावें आणि मरणोत्तर परलोकीं जाऊन ईश्वराजवळ सनातनतः सुख भोगावें हेंच मनुष्याचे जन्माचें सार्थक व तात्पर्य्य आहे ह्मणून जे ईश्वराचें योग्य पवित्र भजन करीत नाहींत ते आपले जन्माचें सार्थक साधीत नाहींत आपले अस्तित्वाचे तात्पर्य्य पावत नाहींत

परंतु मनुष्यें ईश्वरापासून भ्रष्ट झालीं असतां ईश्वराचे गुण स्वभाव धर्म यांविषयीं अज्ञानी असतात ह्मणून ईश्वराचे भजनाची शुद्ध रीति तीं समजत नसतात तर तो रीति त्यांला दाखवावी व शिकवावी लागत्ये यासाठीं ईश्वरानें आपलें सत्य पवित्र शास्त्र आपले सदात्म्याचे योगानें पवित्र मनुष्यांकडून लिहवून दिलें आहे त्या शास्त्रांत ईश्वराचे सत्य

गुण व विशिष्ट कार्यें वर्णिलीं आहेत आणि त्याजवळ जो प्रार्थना व स्तुति करावी लागत्ये तिचेहि प्रकार दाखविले आहेत त्यांतले कित्येक प्रकार शास्त्रांतून काढून आणि त्यासारिखे दुसरे प्रकार करून या पुस्तकांत छापिले आहेत आणि प्रतिदिवशीं लोकानीं ईश्वराचे गोष्टींतलें कांहींसें वाचावें व तिचें ध्यान करावें म्हणून शास्त्रांतले विविध भाग निवडून काढून या पुस्तकांत घातले आहेत आणि प्रति वर्षीं लोकानी सारें शास्त्र पाहावें अथवा ऐकावें म्हणून त्यांतले सर्व अध्याय अनुक्रमानें वाचायासाठीं पंचांगांत अंक घालून नेमिले आहेत पावणे तीनशें वर्षांमागें जेव्हां विलायतेंतले बहुत लोकानीं रोमी धर्मांतलीं विविध अशुद्ध मतें व व्यर्थ अयोग्य अनुष्ठानें पाळून तो धर्म सोडिला तेव्हां इंग्लीश ख्रिस्ती मंडळींतले पुण्यवान विद्वान आचार्य्यांनीं हें पुस्तक केलें अशासाठीं कीं गृहस्थानीं आपले कुटूंबांसहित घरांत आणि विशेषेंकरून आचार्य्यांनीं लोकांसहित सभामंदिरांत हें वाचून ईश्वराचें भजन करावें जेव्हां लोक एकत्र मिळून ईश्वराची प्रार्थना व स्तुति करितात तेव्हां त्यांची सम्मति असावी आणि सम्मति होण्यासाठीं त्यांची वाक्यें सारखींच असलीं पाहिजेत मंडळींत अथवा सभेंत जर आचार्य्य आपण मात्र ईश्वराची प्रार्थना व स्तुति उच्चारील तर लोक जरी आपल्या मनेंकरून त्याला अनुसरले तरी त्यांच्यानें आपले वाणीकडून त्याला अनुसरवणार नाहीं म्हणून मंडळीला नियमित प्रकार पाहिजेत हें स्पष्ट दिसतें



तथापि लोकानीं एकत्र मिळून संमतीनें ईश्वराची प्रार्थना व स्तुति करावी अशासाठीं जरीं या पुस्तकांतले प्रकार नेमिले आहेत तरीं सर्वदा हे प्रकार मात्र ईश्वराजवळ बोलावे असें कोणी समजूं नये जेव्हां एकांतीं कोणी एकादा ईश्वराची प्रार्थना करितो तेव्हां जर तो आपलेच मनांतल्या इच्छा व अर्थना बोलून विनंती करील तर बरें कोणी भिकारी जर धनवानाजवळ भाकरीचा तुकडा मागायला जातो आहे तर त्याला विनंतीचा लिहिलेला प्रकार नलगे तो निकड लावून आपले मनापासून फार उत्कंठेनें भाकर मागतो कां तर त्याला भूक लागली आहे तसाच जो कोणी पापाचा वीट मानून भय धरून पश्चात्ताप करील आणि तारणाची चिंता व पवित्रतेची इच्छा बाळगून ईश्वराजवळ प्रार्थना करूं लागेल त्याला योग्य शब्द व वाक्यें सहजच सुचतील प्रार्थना करण्याचा शुद्ध स्वभाव व शील ईश्वराचे मनांत मुख्य आहे खरें ह्मणून प्रत्येकानें नम्र अनुतापी शोकार्त्त व प्रीतियुक्त अंतःकरणपूर्वक प्रार्थना करायला झटावें तथापि ज्याची बुद्धि मंद व कल्पना थोडक्या आहेत ह्मणून योग्य शब्द व वाक्यें लौकर सुचत नाहींत त्याला एकांतींहि या पुस्तकांतले प्रकार फार उपयोगी पडतील

यां प्रार्थनाप्रकरांतले कित्येक शास्त्रांतून व कित्येक पुरातन ख्रिस्ती मंडळीचे पद्धतींतून काढिलेले आहेत आणि ज्यां आचार्य्यांनीं हें पुस्तक रचिलें त्यानीं कित्येक सिद्ध केले आहेत मनुष्यानीं जें कांहीं आपणांसाठीं व आपले

भाऊबंध इष्टमित्र यांसाठीं व सर्व मनुष्यजातीसाठीं मुख्यत्वें करून मागायाचें जें कांहीं या नश्वर आयुष्यांतलें सुख व परलोकांतलें सुख साधायाला पाहिजे तें यां प्रार्थनाप्रकारांत विहित केलें आहे ह्मणून जो कोणी ईश्वराचे गुण समजून त्याची सद्गीति धरून त्याजवर भाव ठेवून नम्र दीन अनुतापी मनापासून यां प्रकारांप्रमाणें प्रार्थना करील त्यानें ती ईश्वराचे विध्यनुसार केली अशी होईल

ख्रिस्ती धर्मांत जीं कर्मे संस्कार व अनुष्टानें करावीं लागतात आणि जीं मतें विशेषेंकरून विश्वासलीं पाहिजेत तीं या पुस्तकांत दाखविलीं आहेत याकरितां जो कोणी मन घालून चित्त लावून विचारपूर्वक हें पुस्तक वाचील त्याला या धर्माच्या मुख्य गोष्टी समजतील या पुस्तकांतल्या गोष्टी गुरु व पवित्र आहेत याजकरितां कोणी लगुमतीनें अथवा निंदण्याचे संकेतानें हें पुस्तक हातीं घेऊं नये पाहूं नये जे असें करितील ते केवळ आपलें अज्ञान व अधर्म दाखवितील आणि अपराधी होतील या देशांतले लोक अजून हा धर्म समजत नाहींत याच्या गोष्टी जाणत नाहींत याकरितां त्यानीं अंतःकरणपूर्वक या धर्माचा विचारव मनन करावें निंदा करूं नये

जे भक्तिवान ख्रिस्ती या देशांतले लोकांचा धर्म व आचरण पाहतात ते निंदा न करितां फार खिन्न व शोकाक्रांत होतात आणि ईश्वरानें आपला पवित्र सत्य धर्म यांला कळवावा शिकवावा समजवावा ह्मणून इच्छितात तर



हें ईश्वराचे आशीनें व साह्याय्यानें करावें ह्मणून इंग्लीश ख्रिस्ती मंडळींतले कित्येक भक्तिवान जनानीं हें पुस्तक छापिलें आहें आणि लोकांला यांतले अर्थ स्पष्ट करून समजावायाला उपदेश करायाला आणि धर्माचे संस्कार व अनुष्ठानें साधायाला त्यानीं उपदेशक नेमून या देशांत पाठविले आहेत ते उपदेशक नाशिकास असतात जो कोणी या पुस्तकांतले अर्थ समजावे अथवा हें घ्यावें असें इच्छून त्यां उपदेशकांकडे जाईल त्याला या पुस्तकाची प्रत ते देतील आणि याचे अर्थ आनंदानें सांगतील

# विशेष अध्याय

## जे सकाळचे व संध्याकाळाचे प्रार्थनेचे वेळेस आदित्यवारांत व इतर पवित्र दिवसांत वाचायाचें आहेत तें

### आदित्यवारांसाठी विशेष अध्याय

| आगमाचे आदित्यवार | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| १ | यशाया —— १ | यशाया —— २ |
| २ | —— ५ | —— २४ |
| ३ | —— २५ | —— २६ |
| ४ | —— ३० | —— ३२ |
| ख्रिस्ताचे जन्मदिवसानंतर जे आदित्यवार ते | | |
| १ | —— ३७ | —— ३८ |
| २ | —— ४१ | —— ४३ |
| प्रादुर्भावानंतर जे आदित्यवार तें | | |
| १ | —— ४४ | —— ४६ |
| २ | —— ५१ | —— ५३ |
| ३ | —— ५५ | —— ५६ |
| ४ | —— ५७ | —— ५८ |
| ५ | —— ५९ | —— ६४ |
| ६ | —— ६५ | —— ६६ |
| उपोष. पूर्व. तिसरा आ. | उत्पत्ति —— १ | उत्पत्ति —— २ |
| उपोष. पूर्व. दुसरा आ. | —— ३ | —— ६ |
| उपोष. पूर्व. पहिला आ. | —— ९ ओ. २० | —— १२ |

| | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| उपोषणसमय पहिला आदित्यवार | उत्पत्ति —१९ओ २० | उत्पत्ति— २२ |
| २ | — २७ | — ३४ |
| ३ | — ३९ | — ४२ |
| ४ | — ४३ | — ४५ |
| ५ | प्रस्थान — ३ | प्रस्थान— ५ |
| ६ | | |
| १ अध्याय | — ९ | — १० |
| २ अध्याय | मात्थी — २६ | इब्री ५ ओ ११ |
| पुनरुत्थान दिवस | | |
| १ अध्याय | प्रस्थान— १२ | प्रस्थान — १४ |
| २ अध्याय | रोम — ६ | प्रेषित २ ओ २२ |
| पुनरुत्थानानंतर जे आदित्यवार ते | | |
| १ | संख्या — १६ | संख्या — २२ |
| २ | —२३,२४ | — २५ |
| ३ | द्युत— ४ | द्युत — ५ |
| ४ | — ६ | — ७ |
| ५ | — ८ | — ९ |
| आरोहण दिवसानंतर जो आदित्यवार तो | — १२ | — १३ |
| पवित्रात्मावतरण | | |
| १ अध्याय | — १६ ओ १८ | यशाया — ११ |
| २ अध्याय | प्रेषित१०ओ३४ | प्रेषित१९ओ३४ |

| त्रिकाचा आदित्यवार | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| १ अध्याय | उत्पत्ति— १ | उत्पत्ति — १८ |
| २ अध्याय | मात्थी — ३ | १ योहान - ५ |
| त्रिकानंतर जे आदित्य वार ते | | |
| १ | येहोशूआह १० | येहोशूआह २३ |
| २ | न्यायाधीश ४ | न्यायाधीश ५ |
| ३ | १ शमूएल २ | १ शमूएल ३ |
| ४ | — १२ | — १३ |
| ५ | — १५ | — १७ |
| ६ | २ शमूएल १२ | २ शमूएल १९ |
| ७ | — २१ | — २४ |
| ८ | १ राजे— १३ | १ राजे — १७ |
| ९ | — १८ | — १९ |
| १० | — २१ | — २२ |
| ११ | २ राजे— ५ | — ९ |
| १२ | — १० | — १८ |
| १३ | — १९ | — २३ |
| १४ | इर्मिया — ५ | इर्मिया — २२ |
| १५ | — ३५ | — ३६ |
| १६ | येहेज्केल - २ | येहेज्केल- १३ |
| १७ | — १४ | — १८ |
| १८ | — २० | — २४ |
| १९ | दानीएल- ३ | दानीएल- ६ |
| २० | योएल — २ | मीखा— ६ |
| २१ | हबक्कूक— २ | दृष्टांत — १ |
| २२ | दृष्टांत — २ | — ३ |

| | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| २३ | दृष्टांत — ११ | दृष्टांत — १२ |
| २४ | — १३ | — १४ |
| २५ | — १५ | — १६ |
| २६ | — १७ | — १८ |

## पवित्र दिवसांसाठीं विशेष अध्याय

| | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| आंद्रिआस साधु | दृष्टांत — २० | दृष्टांत — २१ |
| थोमास साधु प्रेषित | — २३ | — २४ |
| **ख्रिस्ताचें जन्म** | | |
| १ अध्याय | यशाया ९ ओ — ८ | यशाया ७ ओ १० १७ |
| २ अध्याय | लूक २ ओ १-१५ | तीतस ३ ओ ४ ९ |
| **स्तेफानस साधु** | | |
| १ अध्याय | दृष्टांत — २८ | एक्लेश — ४ |
| २ अध्याय | प्रेषित ६ ओ ७ आणि अध्या ७ ओ — ३० | प्रेषित ७ ओ २०—३५ |
| **योहान्न साधु सुवार्त्तिक** | | |
| १ अध्याय | एक्लेश — ५ | एक्लेश — ६ |
| २ अध्याय | प्रकट — १ | प्रकट — २२ |

## पवित्र दिवसांसाठीं विशेष अध्याय

| | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| निर्दोषांचा दिवस | इर्मिया ३१ ओ [१८ | ज्ञान — १ |
| ख्रिस्ताची सुंता | | |
| १ अध्याय | उत्पत्ति — १७ | श्रुत १० ओ १२ |
| २ अध्याय | रोम — २ | कोलोस — २ |
| प्रादुर्भाव | | |
| १ अध्याय | यशाया — ६० | यशाया — ४९ |
| २ अध्याय | लूक ३ ओ २२ | योहान्न२ओ१२ |
| पाऊलस साधूची सन्मनः प्राप्ति | | |
| १ अध्याय | ज्ञान — ५ | ज्ञान — ६ |
| २ अध्याय | प्रेषित २२ ओ [२२ | प्रेषित — २६ |
| मार्याकुमारीचें शुद्धकरण | ज्ञान — ९ | ज्ञान — १२ |
| मात्थीआस साधु | — १९ | एक्लस — १ |
| मार्येचें अभिवंदन | एक्लस — २ | एक्लस — ३ |
| पुनरुत्थानापूर्वीचा बुधवार | | |
| १ अध्याय | होशीआह १३ | होशीआह — १४ |
| २ अध्याय | योहान्न ११ ओ [४५ | |
| पुनरुत्थानापूर्वीचा बृहस्पतिवार | | |
| १ अध्याय | दानीएल — ९ | इर्मिया — ३१ |
| २ अध्याय | योहान्न — १३ | |

| सुभद्रशुक्रवार | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| १ अध्याय ——— | उत्पत्ति २२ ओ [२० | यशाया —— ५३ |
| २ अध्याय ——— | योहान्न —— १८ | पेत्रस —— २ |
| पुनरुत्थानापूर्वीचा संध्याकाळ | | |
| १ अध्याय ——— | जेखार —— ९ | प्रस्थान —— १३ |
| २ अध्याय ——— | लूक २३ ओ ५० | इब्री —— ४ |
| पुनरुत्थानानंतर जो सोमवार | | |
| १ अध्याय ——— | प्रस्थान —— १६ | प्रस्थान —— १७ |
| २ अध्याय ——— | मात्थी —— २८ | प्रेषित —— ३ |
| पुनरुत्थानानंतर जो मंगळवार | | |
| १ अध्याय ——— | प्रस्थान —— २० | प्रस्थान —— ३२ |
| २ अध्याय ——— | लूक २४ ओ १३ | १ कोरिंथ —— १५ |
| मार्कस साधु | एक्लस —— ४ | एक्लस —— ५ |
| फिलिप्पस व याकोब साधु | | |
| १ अध्याय ——— | एक्लस —— ७ | एक्लस —— ९ |
| २ अध्याय ——— | योहान्न १ ओ ४३ | |
| आरोहण दिवस | | |
| १ अध्याय ——— | द्युत —— १० | २ राजे —— २ |
| २ अध्याय ——— | लूक २४ ओ ४४ [१० | एफेस ४ ओ १७ [१६–३० |
| आरोहण दिवसानंतर जो सोमवार | | |
| १ अध्याय ——— | उत्पत्ति ११ ओ | संख्या ११ ओ |

| | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| २ अध्याय ——— | १ कोर —— १२ [ओ १८ | १ कोर १४ ओ [२६ |
| आरोहण दिवसानंतर जो मंगळवार | | |
| १ अध्याय ——— | १ शमूएल १९ | द्युत —— ३० |
| २ अध्याय ——— | १ थेस ५ ओ [१२–२४ | १ योहान्न ४ ओ [१४ |
| बारनाबास साधु | | |
| १ अध्याय ——— | एक्लस —— १० | एक्लस —— १२ |
| २ अध्याय ——— | प्रेषित —— १४ | प्रेषित १५ ओ [२६ |
| योहान्न साधु बाप्तिस्मा करणारा | | |
| १ अध्याय ——— | मलाखी —— ३ | मलाखी —— ४ |
| २ अध्याय ——— | मात्थी —— ३ | मात्थी १४ ओ [१३ |
| पेत्रस सादु | | |
| १ अध्याय ——— | एक्लस —— १५ | एक्लस —— १९ |
| २ अध्याय ——— | प्रेषित —— ३ | प्रेषित —— ४ |
| याकोब साधु | एक्लस —— २१ | एक्लस —— २२ |
| बारथालमी साधु | एक्लस —— २४ | एक्लस —— २९ |
| मात्थी साधु | एक्लस —— ३५ | एक्लस —— ३८ |
| मीकाएल साधु | | |
| १ अध्याय ——— | उत्पत्ति —— ३२ | दान १० ओ ५ |
| २ अध्याय ——— | प्रेषित १२ ओ [२० | यूद ओ ६ ओ १६ |
| लूक साधु | एक्लस —— ५१ | योब —— १ |
| शिमोन व युद साधु | योब २४, २५ | योब —— ४२ |
| सर्व साधु | | |
| १ अध्याय ——— | ज्ञान ३ ओ १० | ज्ञान ५ ओ १७ |

| | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| २ अध्याय——— | दुन्नी ११ औ २ २ [व १२ औ ७ | प्रकट १९ औ [१७ |

## कित्येकां दिवसांसाठीं विशेष गीतें

| | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|
| ख्रिस्ताचा जन्म दिवस | गीत ——— १९ | गीत ——— ८९ |
| | ——— ४५ | ——— ११० |
| | ——— ८५ | ——— १३२ |
| उपोषणाचा पहिला दिवस | गीत ——— ६ | गीत ——— १०२ |
| | ——— ३२ | ——— १३० |
| | ——— ३८ | ——— १४३ |
| सुभद्र शुक्रवार | गीत ——— २२ | गीत ——— ६९ |
| | ——— ४० | ——— ८८ |
| | ——— ५४ | |
| पुनरुत्थान दिवस | गीत ——— २ | गीत ——— ११३ |
| | ——— ५७ | ——— ११४ |
| | ——— १११ | ——— ११८ |
| आरोहण दिवस | गीत ——— ८ | गीत ——— २४ |
| | ——— १५ | ——— ४७ |
| | ——— २१ | ——— १०८ |
| पवित्रात्मावतरणदिवस | गीत ——— ४८ | गीत ——— १०४ |
| | ——— ६८ | ——— १४५ |

## पंचांग.

### अध्यायपत्रसहित.

जानुवारीचे ३१ दिवस आहेत.

| | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|
| | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ ख्रिस्ताची सुंता.——— | उत्पत्ति ——— १ | मात्थी ——— १ | उत्पत्ति ——— २ | रोम. ——— १ |
| २ ——— ——— | ——— ३ | ——— २ | ——— ४ | ——— २ |
| ३ ——— ——— | ——— ५ | ——— ३ | ——— ६ | ——— ३ |
| ४ ——— ——— | ——— ७ | ——— ४ | ——— ८ | ——— ४ |
| ५ ——— ——— | | | | |
| ६ प्रादुर्भाव ——— | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | —— | —— | उत्पत्ति —— ९ | मार्थी —— ५ | उत्पत्ति —— १२ | रोम —— ५ |
| ८ | —— | —— | —— १३ | —— ६ | —— १४ | —— ६ |
| ९ | —— | —— | —— १५ | —— ७ | —— १६ | —— ७ |
| १० | —— | —— | —— १७ | —— ८ | —— १८ | —— ८ |
| ११ | —— | —— | —— १९ | —— ९ | —— २० | —— ९ |
| १२ | —— | —— | —— २१ | —— १० | —— २२ | —— १० |
| १३ | —— | —— | —— २३ | —— ११ | —— २४ | —— ११ |
| १४ | —— | —— | —— २५ | —— १२ | —— २६ | —— १२ |
| १५ | —— | —— | —— २७ | —— १३ | —— २८ | —— १३ |
| १६ | —— | —— | —— २९ | —— १४ | —— ३० | —— १४ |
| १७ | —— | —— | —— ३१ | —— १५ | —— ३२ | —— १५ |
| १८ | —— | —— | —— ३३ | —— १६ | —— ३४ | —— १६ |
| १९ | —— | —— | —— ३५ | —— १७ | —— ३७ | १ कोर. —— १ |
| २० | —— | —— | —— ३८ | —— १८ | —— ३९ | —— २ |
| २१ | —— | —— | —— ४० | —— १९ | —— ४१ | —— ३ |
| २२ | —— | —— | —— ४२ | —— २० | —— ४३ | —— ४ |
| २३ | —— | —— | —— ४४ | —— २१ | —— ४५ | —— ५ |
| २४ | —— | —— | —— ४६ | —— २२ | —— ४७ | —— ६ |
| २५ | पाजलसाची सन्मनःप्राप्ति—— | —— | | | | |
| २६ | —— | —— | —— ४८ | —— २३ | —— ४९ | —— ७ |
| २७ | —— | —— | —— ५० | —— २४ | प्रस्थान —— १ | —— ८ |
| २८ | —— | —— | प्रस्थान —— २ | —— २५ | —— ३ | —— ९ |
| २९ | —— | —— | —— ४ | —— २६ | —— ५ | —— १० |
| ३० | —— | —— | —— ६ | —— २७ | —— ७ | —— ११ |
| ३१ | —— | —— | —— ८ | —— २८ | —— ९ | —— १२ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहिंत.

फेब्रुवारीचे २८ दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | —— | —— | प्रस्थान—— १० | मार्कस —— १ | प्रस्थान —— ११ | १ कोर. —— १३ |
| २ | मार्था कुमारीचें शुद्धकरण—— | —— | | —— २ | | —— १४ |
| ३ | —— | —— | —— १२ | —— ३ | —— १३ | —— १५ |
| ४ | —— | —— | —— १४ | —— ४ | —— १५ | —— १६ |
| ५ | —— | —— | —— १६ | —— ५ | —— १७ | २ कोर. —— १ |
| ६ | —— | —— | —— १८ | —— ६ | —— १९ | —— २ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | —— | —— | प्रस्थान —— २० | मार्कस —— ७ | प्रस्थान —— २१ | २ कोर. —— ३ |
| ८ | —— | —— | —— २२ | —— ८ | —— २३ | —— ४ |
| ९ | —— | —— | —— २४ | —— ९ | —— ३२ | —— ५ |
| १० | —— | —— | —— ३३ | —— १० | —— ३४ | —— ६ |
| ११ | —— | —— | लेवितिकस —— १८ | —— ११ | लेवितिकस —— १९ | —— ७ |
| १२ | —— | —— | —— २० | —— १२ | —— २६ | —— ८ |
| १३ | —— | —— | संख्या —— ११ | —— १३ | संख्या —— १२ | —— ९ |
| १४ | —— | —— | —— १३ | —— १४ | —— १४ | —— १० |
| १५ | —— | —— | —— १६ | —— १५ | —— १७ | —— ११ |
| १६ | —— | —— | —— २० | —— १६ | —— २१ | —— १२ |
| १७ | —— | —— | —— २२ | लूक १ ओ. ३९ | —— २३ | —— १३ |
| १८ | —— | —— | —— २४ | —— १ ओ. ३९ | —— २५ | गालात. —— १ |
| १९ | —— | —— | —— २७ | —— २ | —— ३० | —— २ |
| २० | —— | —— | —— ३१ | —— ३ | —— ३२ | —— ३ |
| २१ | —— | —— | —— ३५ | —— ४ | —— ३६ | —— ४ |
| २२ | —— | —— | यु तरोन. —— १ | —— ५ | यु तरोन. —— २ | —— ५ |
| २३ | —— | —— | —— ३ | —— ६ | —— ४ | —— ६ |
| २४ | मात्थीआस साधु प्रेषित | —— | | —— ७ | | एफेस. —— १ |
| २५ | —— | —— | —— ५ | —— ८ | —— ६ | —— २ |
| २६ | —— | —— | —— ७ | —— ९ | —— ८ | —— ३ |
| २७ | —— | —— | —— ९ | —— १० | —— १० | —— ४ |
| २८ | —— | —— | —— ११ | —— ११ | —— १२ | —— ५ |
| २९ | —— | —— | —— १३ | मात्थी —— ७ | —— १४ | रोम. —— १२ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित.

मार्चाचे ३१ दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | —— | —— | यु तर. —— १५ | लूक —— १२ | यु तर. —— १६ | एफेस. —— ६ |
| २ | —— | —— | —— १७ | —— १३ | —— १८ | फिलिप्प. —— १ |
| ३ | —— | —— | —— १९ | —— १४ | —— २० | —— २ |
| ४ | —— | —— | —— २१ | —— १५ | —— २२ | —— ३ |
| ५ | —— | —— | —— २४ | —— १६ | —— २५ | —— ४ |
| ६ | —— | —— | —— २६ | —— १७ | —— २७ | कोलोस. —— १ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | —— | —— | युतर. —— २८ | लूक —— १८ | युतर. —— २९ | कोलोस. —— २ |
| ८ | —— | —— | —— ३० | —— १९ | —— ३१ | —— ३ |
| ९ | —— | —— | —— ३२ | —— २० | —— ३३ | —— ४ |
| १० | —— | —— | —— ३४ | —— २१ | यहोशूआह १ | १ थेस्सल. —— १ |
| ११ | —— | —— | यहोशूआह २ | —— २२ | —— ३ | —— २ |
| १२ | —— | —— | —— ४ | —— २३ | —— ५ | —— ३ |
| १३ | —— | —— | —— ६ | —— २४ | —— ७ | —— ४ |
| १४ | —— | —— | —— ८ | योहान्न —— १ | —— ९ | —— ५ |
| १५ | —— | —— | —— १० | —— २ | —— १३ | २ थेस्सल.. —— १ |
| १६ | —— | —— | —— २४ | —— ३ | न्यायाधीश —— १ | —— २ |
| १७ | —— | —— | न्यायाधीश —— २ | —— ४ | —— ३ | —— ३ |
| १८ | —— | —— | —— ४ | —— ५ | —— ५ | १ तिम. —— १ |
| १९ | —— | —— | —— ६ | —— ६ | —— ७ | —— २,३ |
| २० | —— | —— | —— ८ | —— ७ | —— ९ | —— ४ |
| २१ | —— | —— | —— १० | —— ८ | —— ११ | —— ५ |
| २२ | —— | —— | —— १२ | —— ९ | —— ३ | —— ६ |
| २३ | —— | —— | —— १४ | —— १० | —— १५ | २ तिम. —— १ |
| २४ | —— | —— | —— १६ | —— ११ | —— १७ | —— २ |
| २५ | मार्थाकुमारीचें अभिवंदन —— | | | —— १२ | | —— ३ |
| २६ | —— | —— | —— १८ | —— १३ | —— १९ | —— ४ |
| २७ | —— | —— | —— २० | —— १४ | —— २१ | तीतस. —— १ |
| २८ | —— | —— | रूथ —— १ | —— १५ | रूथ —— २ | |
| २९ | —— | —— | —— ३ | —— १६ | —— ४ | फिलेपीन —— |
| ३० | —— | —— | १ शमूएल —— १ | —— १७ | १ शमूएल —— २ | ह्रब्री —— १ |
| ३१ | —— | —— | —— ३ | —— १८ | —— ४ | —— २ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित

अप्रीलाचे ३० दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | —— | —— | १ शमूएल —— ५ | योहान्न —— १९ | १ शमूएल —— ६ | ह्रब्री —— ३ |
| २ | —— | —— | —— ७ | —— २० | —— ८ | —— ४ |
| ३ | —— | —— | —— ९ | —— २१ | —— १० | —— ५ |
| ४ | —— | —— | —— ११ | प्रेषित —— १ | —— १२ | —— ६ |
| ५ | —— | —— | —— १३ | —— २ | —— १४ | —— ७ |
| ६ | —— | —— | —— १५ | —— ३ | —— १६ | —— ८ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित

मायाचे ३१ दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | फिलिप्पस व याकोबसाधु — | — | — | — | — | यूद — |
| २ | — | — | १ राजे — ८ | प्रेषित — २८ | १ राजे — ९ | रोम — १ |
| ३ | — | — | — १० | मार्थी — १ | — ११ | — २ |
| ४ | — | — | — १२ | — २ | — १३ | — ३ |
| ५ | — | — | — १४ | — ३ | — १५ | — ४ |
| ६ | — | — | — १६ | — ४ | — १७ | — ५ |
| ७ | — | — | १ शमूएल — १७ | प्रेषित — ४ | १ शमूएल — १८ | दूत्री — ९ |
| ८ | — | — | — १९ | — ५ | — २० | — १० |
| ९ | — | — | — २१ | — ६ | — २२ | — ११ |
| १० | — | — | — २३ | — ७ | — २४ | — १२ |
| ११ | — | — | — २५ | — ८ | — २६ | — १३ |
| १२ | — | — | — २७ | — ९ | — २८ | याकोब — १ |
| १३ | — | — | — २९ | — १० | — ३० | — २ |
| १४ | — | — | — ३१ | — ११ | २ शमूएल — १ | — ३ |
| १५ | — | — | २ शमूएल — २ | — १२ | — ३ | — ४ |
| १६ | — | — | — ४ | — १३ | — ५ | — ५ |
| १७ | — | — | — ६ | — १४ | — ७ | १ पेत्रस — १ |
| १८ | — | — | — ८ | — १५ | — ९ | — २ |
| १९ | — | — | — १० | — १६ | — ११ | — ३ |
| २० | — | — | — १२ | — १७ | — १२ | — ४ |
| २१ | — | — | — १४ | — १८ | — १३ | — ५ |
| २२ | — | — | — १६ | — १९ | — १७ | २ पेत्रस — १ |
| २३ | — | — | — १८ | — २० | — १९ | — २ |
| २४ | — | — | — २० | — २१ | — २१ | — ३ |
| २५ | मार्कस साधु सुवार्त्तिक | — | — | — २२ | — | १ योहान्न — १ |
| २६ | — | — | — २२ | — २३ | — २३ | — २ |
| २७ | — | — | — २४ | — २४ | ?राजे — १ | — ३ |
| २८ | — | — | १ राजे — २ | — २५ | — ३ | — ४ |
| २९ | — | — | — ४ | — २६ | — ५ | — ५ |
| ३० | — | — | — ६ | — २७ | — ७ | २,३ योहान्न |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | — | — | १ राजे — १८ | मात्थी — ५ | १ राजे — १९ | रोम — ६ |
| ८ | — | — | — २० | — ६ | — २१ | — ७ |
| ९ | — | — | — २२ | — ७ | २ राजे — १ | — ८ |
| १० | — | — | २ राजे — २ | — ८ | — ३ | — ९ |
| ११ | — | — | — ४ | — ९ | — ५ | — १० |
| १२ | — | — | — ६ | — १० | — ७ | — ११ |
| १३ | — | — | — ८ | — ११ | — ९ | — १२ |
| १४ | — | — | — १० | — १२ | — ११ | — १३ |
| १५ | — | — | — १२ | — १३ | — १३ | — १४ |
| १६ | — | — | — १४ | — १४ | — १५ | — १५ |
| १७ | — | — | — १६ | — १५ | — १७ | — १६ |
| १८ | — | — | — १८ | — १६ | — १९ | १ कोर — १ |
| १९ | — | — | — २० | — १७ | — २१ | — २ |
| २० | — | — | — २२ | — १८ | — २३ | — ३ |
| २१ | — | — | — २४ | — १९ | — २५ | — ४ |
| २२ | — | — | एज्रा — १ | — २० | एज्रा — ३ | — ५ |
| २३ | — | — | — ४ | — २१ | — ५ | — ६ |
| २४ | — | — | — ६ | — २२ | — ७ | — ७ |
| २५ | — | — | — ९ | — २३ | नेहेम्या — १ | — ८ |
| २६ | — | — | नेहेम्या — २ | — २४ | — ४ | — ९ |
| २७ | — | — | — ५ | — २५ | — ६ | — १० |
| २८ | — | — | — ८ | — २६ | — ९ | — ११ |
| २९ | — | — | — १० | — २७ | — १३ | — १२ |
| ३० | — | — | एस्तेर — १ | — २८ | एस्तेर — २ | — १३ |
| ३१ | — | — | — ३ | मार्कस — १ | — ४ | — १४ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित.

जूनाचे ३० दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | — | — | एस्तेर. — ५ | मार्कस — २ | एस्तेर. — ६ | १ कोर. — १५ |
| २ | — | — | — ७ | — ३ | — ८ | — १६ |
| ३ | — | — | — ९ | — ४ | योब — १ | २ कोर. — १ |
| ४ | — | — | योब — २ | — ५ | — ३ | — २ |
| ५ | — | — | — ४ | — ६ | — ५ | — ३ |
| ६ | — | — | — ६ | — ७ | — ७ | — ४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | — | — | योब — ८ | मार्कस — ८ | योब — ९ | १ कोर. — ५ |
| ८ | — | — | — १० | — ९ | — ११ | — ६ |
| ९ | — | — | — १२ | — १० | — १३ | — ७ |
| १० | — | — | — १४ | — ११ | — १५ | — ८ |
| ११ | बार्नाबास साधु प्रेषित | — | | | | |
| १२ | — | — | — १६ | — १२ | — १७,१८ | — ९ |
| १३ | — | — | — १९ | — १३ | — २० | — १० |
| १४ | — | — | — २१ | — १४ | — २२ | — ११ |
| १५ | — | — | — २३ | — १५ | — २४.२५ | — १२ |
| १६ | — | — | — २६.२७ | — १६ | — २८ | — १३ |
| १७ | — | — | — २९ | लूक — १ | — ३० | गालात. — १ |
| १८ | — | — | — ३१ | — २ | — ३२ | — २ |
| १९ | — | — | — ३३ | — ३ | — ३४ | — ३ |
| २० | — | — | — ३५ | — ४ | — ३६ | — ४ |
| २१ | — | — | — ३७ | — ५ | — ३८ | — ५ |
| २२ | — | — | — ३९ | — ६ | — ४० | — ६ |
| २३ | — | — | — ४१ | — ७ | — ४२ | एफेस. — १ |
| २४ | योहान्नसाधु बाप्ति.कर. | — | | | | |
| २५ | — | — | दृष्टांत — १ | — ८ | दृष्टांत — २ | — २ |
| २६ | — | — | — ३ | — ९ | — ४ | — ३ |
| २७ | — | — | — ५ | — १० | — ६ | — ४ |
| २८ | — | — | — ७ | — ११ | — ८ | — ५ |
| २९ | पेत्रससाधु प्रेषित | — | | | | |
| ३० | — | — | — ९ | — १२ | — १० | — ६ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित

जुलीचे ३१ दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | — | — | दृष्टांत — ११ | लूक — १३ | दृष्टांत — १२ | फिलिप्प — १ |
| २ | — | — | — १३ | — १४ | — १४ | — २ |
| ३ | — | — | — १५ | — १५ | — १६ | — ३ |
| ४ | — | — | — १७ | — १६ | — १८ | — ४ |
| ५ | — | — | — १९ | — १७ | — २० | कोलोस — १ |
| ६ | — | — | — २१ | — १८ | — २२ | — २ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | — | — | दृष्टांत — २३ | लूक — १९ | दृष्टांत — २४ | कोलोस — ३ |
| ८ | — | — | — २५ | — २० | — २६ | — ४ |
| ९ | — | — | — २७ | — २१ | — २८ | १ थेस्सल. — १ |
| १० | — | — | — २९ | — २२ | — ३१ | — २ |
| ११ | — | — | एक्लेस — १ | — २३ | एक्लेस — २ | — ३ |
| १२ | — | — | — ३ | — २४ | — ४ | — ४ |
| १३ | — | — | — ५ | योहान — १ | — ६ | — ५ |
| १४ | — | — | — ७ | — २ | — ८ | २ थेस्सल. — १ |
| १५ | — | — | — ९ | — ३ | — १० | — २ |
| १६ | — | — | — ११ | — ४ | — १२ | — ३ |
| १७ | — | — | दर्मिया — १ | — ५ | दर्मिया — २ | १ तिम. — १ |
| १८ | — | — | — ३ | — ६ | — ४ | — २,३ |
| १९ | — | — | — ५ | — ७ | — ६ | — ४ |
| २० | — | — | — ७ | — ८ | — ८ | — ५ |
| २१ | — | — | — ९ | — ९ | — १० | — ६ |
| २२ | — | — | — ११ | — १० | — १२ | २ तिम. — १ |
| २३ | — | — | — १३ | — ११ | — १४ | — २ |
| २४ | — | — | — १५ | — १२ | — १६ | — ३ |
| २५ | याकोबसाधु प्रेषित | — | | — १३ | | — ४ |
| २६ | — | — | — १७ | — १४ | — १८ | तीतस — १ |
| २७ | — | — | — १९ | — १५ | — २० | — २,३ |
| २८ | — | — | — २१ | — १६ | — २२ | फिलेमोन — |
| २९ | — | — | — २३ | — १७ | — २४ | इब्री — १ |
| ३० | — | — | — २५ | — १८ | — २६ | — २ |
| ३१ | — | — | — २७ | — १९ | — २८ | — ३ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित.

आगस्ताचे ३१ दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | — | — | दर्मिया — २९ | योहान — २० | दर्मिया — ३० | इब्री — ४ |
| २ | — | — | — ३१ | — २१ | — ३२ | — ५ |
| ३ | — | — | — ३३ | प्रेषित — १ | — ३४ | — ६ |
| ४ | — | — | — ३५ | — २ | — ३६ | — ७ |
| ५ | — | — | — ३७ | — ३ | — ३८ | — ८ |
| ६ | — | — | — ३९ | — ४ | — ४० | — ९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | इर्मिया — ४१ | प्रेषित — ५ | इर्मिया — ४२ | इब्री — १० |
| ८ | | | — ४३ | — ६ | — ४४ | — ११ |
| ९ | | | — ४५,४६ | — ७ | — ४७ | — १२ |
| १० | | | — ४८ | — ८ | — ४९ | — १३ |
| ११ | | | — ५० | — ९ | — ५१ | याकोब — १ |
| १२ | | | — ५२ | — १० | आक्रंदनें — १ | — २ |
| १३ | | | आक्रंदनें — २ | — ११ | — ३ | — ३ |
| १४ | | | — ४ | — १२ | — ५ | — ४ |
| १५ | | | येहेज्केल — २ | — १३ | येहेज्केल — ३ | — ५ |
| १६ | | | — ६ | — १४ | — ७ | १ पेत्रस — १ |
| १७ | | | — १३ | — १५ | — १४ | — २ |
| १८ | | | — १८ | — १६ | — २३ | — ३ |
| १९ | | | — २४ | — १७ | दानीएल — १ | — ४ |
| २० | | | दानीएल — २ | — १८ | — ३ | — ५ |
| २१ | | | — ४ | — १९ | — ५ | २ पेत्रस — १ |
| २२ | | | दानीएल — ६ | — २० | — ७ | — २ |
| २३ | | | — ८ | — २१ | — ९ | — ३ |
| २४ | बार्थलमी साधु | | | — २२ | | १ योहान्न — १ |
| २५ | | | — १० | — २३ | — ११ | — २ |
| २६ | | | — १२ | — २४ | होशीआह — १ | — ३ |
| २७ | | | होशीआह — २,३ | — २५ | — ४ | — ४ |
| २८ | | | — ५,६ | — २६ | — ७ | — ५ |
| २९ | | | — ८ | — २७ | — ९ | २,३ योहान्न |
| ३० | | | — १० | — २८ | — ११ | यूदा — |
| ३१ | | | — १२ | मात्थी — १ | — १३ | रोम — १ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित

सप्तेंबराचे ३० दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | | | होशीआह — १४ | मात्थी — २ | योएल — १ | रोम — २ |
| २ | | | योएल — २ | — ३ | — ३ | — ३ |
| ३ | | | आमोस — १ | — ४ | आमोस — २ | — ४ |
| ४ | | | — ३ | — ५ | — ४ | — ५ |
| ५ | | | — ५ | — ६ | — ६ | — ६ |
| ६ | | | — ७ | — ७ | — ८ | — ७ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | आमोस | ९ | माथी | ८ | ओबद्याह | | रोम. | ८ |
| ८ | | | योहान | १ | | ९ | योनाह २, | ३ | | ९ |
| ९ | | | | ४ | | १० | मीखा | १ | | १० |
| १० | | | मीखा | २ | | ११ | | ३ | | ११ |
| ११ | | | | ४ | | १२ | | ५ | | १२ |
| १२ | | | | ६ | | १३ | | ७ | | १३ |
| १३ | | | नाहूम | १ | | १४ | नाहूम | २ | | १४ |
| १४ | | | | ३ | | १५ | हाबक्कूक | १ | | १५ |
| १५ | | | हाबक्कूक | २ | | १६ | | ३ | | १६ |
| १६ | | | जेफन्याह | १ | | १७ | जेफन्याह | २ | १ कोर. | १ |
| १७ | | | | ३ | | १८ | हग्गै | १ | | २ |
| १८ | | | हग्गै | २ | | १९ | जेखार्याह | १ | | ३ |
| १९ | | | जेखार्याह २ | ३ | | २० | | ४,५ | | ४ |
| २० | | | | ६ | | २१ | | ७ | | ५ |
| २१ | माथ्यीसाधु प्रेषित | | | | | २२ | | | | ६ |
| २२ | | | | ८ | | २३ | | ९ | | ७ |
| २३ | | | | १० | | २४ | | ११ | | ८ |
| २४ | | | | १२ | | २५ | | १३ | | ९ |
| २५ | | | | १४ | | २६ | मालाखी | १ | | १० |
| २६ | | | मलाखी | २ | | २७ | | ३ | | ११ |
| २७ | | | | ४ | | २८ | लोबीत | १ | | १२ |
| २८ | | | लोबीत | २ | मार्कस | १ | | ३ | | १३ |
| २९ | मीखाएलसाधु | | | | | २ | | | | १४ |
| ३० | | | | ४ | | ३ | | ६ | | १५ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित.

अक्तोबराचे ३१ दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | | | संध्याकाळची प्रार्थना. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | | २ अध्याय. | | १ अध्याय. | | २ अध्याय. | |
| १ | | | तोबीत | ७ | मार्कस | ४ | तोबीत | ८ | १ कोर. | १६ |
| २ | | | | ९ | | ५ | | १० | | १ |
| ३ | | | | ११ | | ६ | | १२ | | २ |
| ४ | | | | १३ | | ७ | | १४ | | ३ |
| ५ | | | यूदीथ | १ | | ८ | यूदीथ | २ | | ४ |
| ६ | | | | ३ | | ९ | | ४ | | ५ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | यूदीथ | ५ | मार्कस | १० | यूदीथ | ६ | कोर. | ६ |
| ८ | | | | ७ | | ११ | | ८ | | ७ |
| ९ | | | | ९ | | १२ | | १० | | ८ |
| १० | | | | ११ | | १३ | | १२ | | ९ |
| ११ | | | | १३ | | १४ | | १४ | | १० |
| १२ | | | | १५ | | १५ | | १६ | | ११ |
| १३ | | | ज्ञान | १ | | १६ | ज्ञान | २ | | १२ |
| १४ | | | | ३ | लूक १ ओ. ३९ | | | ४ | | १३ |
| १५ | | | | ५ | १ ओ. ३९ | | | ६ | गालात | १ |
| १६ | | | | ७ | | २ | | ८ | | २ |
| १७ | | | | ९ | | ३ | | १० | | ३ |
| १८ | लूकसाधु सुवार्त्तिक | | | | | ४ | | | | ४ |
| १९ | | | | ११ | | ५ | | १२ | | ५ |
| २० | | | | १३ | | ६ | | १४ | | ६ |
| २१ | | | | १५ | | ७ | | १६ | एफेस | १ |
| २२ | | | | १७ | | ८ | | १८ | | २ |
| २३ | | | | १९ | | ९ | एक्लस | १ | | ३ |
| २४ | | | एक्लस | २ | | १० | | ३ | | ४ |
| २५ | | | | ४ | | ११ | | ५ | | ५ |
| २६ | | | | ६ | | १२ | | ७ | | ६ |
| २७ | | | | ८ | | १३ | | ९ | फिलिप्प | १ |
| २८ | शिमोन व यहूदसाधु | | | | | १४ | | | | २ |
| २९ | | | | १० | | १५ | | ११ | | ३ |
| ३० | | | | १२ | | १६ | | १३ | | ४ |
| ३१ | | | | १४ | | १७ | | १५ | कोलोस | १ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित

नोवेंबराचे ३० दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | | | संध्याकाळची प्रार्थना. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | | २ अध्याय. | | १ अध्याय. | | २ अध्याय. | |
| १ | सर्वसाधुचा दिवस | | | | | | | | | |
| २ | | | एक्लस | १६ | लूक | १८ | एक्लस | १७ | कोलोस | २ |
| ३ | | | | १८ | | १९ | | १९ | | ३ |
| ४ | | | | २० | | २० | | २१ | | ४ |
| ५ | पापिस्तांचें बंड | | | २२ | | २१ | | २३ | १ थेस्सल. | १ |
| ६ | | | | २४ | | २२ | | २५ | | २ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | — | — | एक्लस | २७ | लूक | २३ | एक्लस २८ | १ थेस्सल. ३ |
| ८ | — | — | | २९ | | २४ | ३० | ४ |
| ९ | — | — | | ३१ | योहान्न | १ | ३२ | ५ |
| १० | — | — | | ३३ | | २ | ३४ | २ थेस्सल. १ |
| ११ | — | — | | ३५ | | ३ | ३६ | २ |
| १२ | — | — | | ३७ | | ४ | ३८ | ३ |
| १३ | — | — | | ३९ | | ५ | ४० | १ तिम. १ |
| १४ | — | — | | ४१ | | ६ | ४२ | २,३ |
| १५ | — | — | | ४३ | | ७ | ४४ | ४ |
| १६ | — | — | | ४५ | | ८ | ४६ | ५ |
| १७ | — | — | | ४७ | | ९ | ४८ | ६ |
| १८ | — | — | | ४९ | | १० | ५० | २ तिम. १ |
| १९ | — | — | | ५१ | | ११ | बारूक १ | २ |
| २० | — | — | बारूक | २ | | १२ | ३ | ३ |
| २१ | — | — | | ४ | | १३ | ५ | ४ |
| २२ | — | — | | ६ | | १४ | सुसान्नाची कथा | तीतस १ |
| २३ | — | — | बेल व ड्राकोन | | | १५ | यशाया १ | २,३ |
| २४ | — | — | यशाया | २ | | १६ | ३ | फिलेमोन |
| २५ | — | — | | ४ | | १७ | ५ | इब्री १ |
| २६ | — | — | | ६ | | १८ | ७ | २ |
| २७ | — | — | | ८ | | १९ | ९ | ३ |
| २८ | — | — | | १० | | २० | ११ | ४ |
| २९ | — | — | | १२ | | २१ | १३ | ५ |
| ३० | आंद्रिआससाधु प्रेषित | — | | | प्रेषित | १ | | ६ |

# पंचांग.

## अध्यायपत्रसहित.

देसेंबराचे ३१ दिवस आहेत.

| | | | सकाळची प्रार्थना. | | संध्याकाळची प्रार्थना. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ अध्याय. | २ अध्याय. | १ अध्याय. | २ अध्याय. |
| १ | — | — | यशाया १४ | प्रेषित २ | यशाया १५ | इब्री ७ |
| २ | — | — | १६ | ३ | १७ | ८ |
| ३ | — | — | १८ | ४ | १९ | ९ |
| ४ | — | — | २०,२१ | ५ | २२ | १० |
| ५ | — | — | २३ | ६ | २४ | ११ |
| ६ | — | — | २५ | ७ ओ. ३० | २६ | १२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | — | — | यशाया — २७ | प्रेषित ७ ओ. ३० | यशाया — २८ | इब्री — १२ |
| ८ | — | — | — २९ | — ८ | — ३० | याकोब — १ |
| ९ | — | — | — ३१ | — ९ | — ३२ | — २ |
| १० | — | — | — ३३ | — १० | — ३४ | — ३ |
| ११ | — | — | — ३५ | — ११ | — ३६ | — ४ |
| १२ | — | — | — ३७ | — १२ | — ३८ | — ५ |
| १३ | — | — | — ३९ | — १३ | — ४० | १ पेत्रस — १ |
| १४ | — | — | — ४१ | — १४ | — ४२ | — २ |
| १५ | — | — | — ४३ | — १५ | — ४४ | — ३ |
| १६ | — | — | — ४५ | — १६ | — ४६ | — ४ |
| १७ | — | — | — ४७ | — १७ | — ४८ | — ५ |
| १८ | — | — | — ४९ | — १८ | — ५० | २ पेत्रस — १ |
| १९ | — | — | — ५१ | — १९ | — ५२ | — २ |
| २० | — | — | — ५३ | — २० | — ५४ | — ३ |
| २१ | थोमाससाधुप्रेषित | — | — | — २१ | — | १ योहान्न — १ |
| २२ | — | — | — ५५ | — २२ | — ५६ | — २ |
| २३ | — | — | — ५७ | — २३ | — ५८ | — ३ |
| २४ | — | — | — ५९ | — २४ | — ६० | — ४ |
| २५ | ख्रीस्ताचा जन्मदिवस | — | — | — | — | — |
| २६ | स्तेफानससाधु साक्षी | — | — | — | — | — |
| २७ | योहान्नसाधु प्रेषित सुवार्त्तिक | | — | — | — | — |
| २८ | निर्दोषांचा दिवस | — | — | — २५ | — | — ५ |
| २९ | — | — | — ६१ | — २६ | — ६२ | २ योहान्न — |
| ३० | — | — | — ६३ | — २७ | — ६४ | ३ योहान्न — |
| ३१ | — | — | — ६५ | — २८ | — ६६ | यूद — |

# सकाळची प्रार्थनापद्धति

प्रार्थनेंपूर्वीं आचार्यानें खालचे वाक्यांतलें एक अथवा अधिक सोयानें वाचावें

जेव्हां पापी मनुष्य आपलें पाप सोडून जें न्यायी व यथार्थ तें करील तेव्हां तो आपला जीव वांचवून घेईल ⁕ येहेज्के एल १८. २७.

मी आपले अपराध अंगीकारितों माझें पापहि मज समोर सर्वदा आहे ⁕ गीत ५१. ३.

माझे पापापासून तूं आपलें मुख आवरून घे आणि माझे सर्व अन्याय पुसून टाक ⁕ गीत ५१. ९.

देवाचे बलि शोकार्त्त मनच आहेत हे देवा शोकार्त्त व नम्र झालेलें हृदय तूं तुच्छ मानणार नाहींस ⁕ गीत ५१. १७.

तुम्ही आपलीं वस्त्रें फाडितांना नव्हे पण आपलीं हृदयें फाडितांना ईश्वर जो तुमचा देव त्याजकडे फिरा कांकीं तो कृपालु व दयालु मंदक्रोध व बहुप्रसाद असून दंडाविषयीं अनुतापी आहे ⁕ योएल २. १३.

ईश्वर जो आमचा देव त्याला दया व क्षमा आहेत जरीं त्यानें ज्या आज्ञा आह्मापुढें नेमून ठेविल्या आहेत त्यांप्रमाणें आह्मी त्याचा अपमान करून चाललों नाहीं तरीं ⁕ दानी एल ९. ९. १०.

हे ईश्वरा मला शिक्षा करिशील तर न्याय करावी सकोप केली असली तर माझा सत्यनाश होईल ॥ इर्मिया १०. २४ गीत ६. १.

पश्चात्ताप करा कांकीं आकाशाचें राज्य जवळ आलें आहे ॥ मात्थी ३. २.

मी उठून आपले बापाजवळ जाईन आणि त्याला सांगेन हे बापा आकाशप्रतिकूल व तुजसमक्ष म्यां पाप केलें आहे आणि यापुढें मी तुझा पुत्र म्हटला जायास योग्य नाहीं ॥ लूक १५. १८. १९.

हे ईश्वरा तूं आपले सेवकांशीं न्यायविवाद करूं नको कांतर तुजपुढें कोणी जीवंत मनुष्य न्यायी निघणार नाहीं ॥ गीत १४३. २.

जर आह्मी ह्मणूं कीं आम्हास पाप नाहीं तर आम्ही आपणातें फसवितों आणि आमचे ठायीं सत्य नाहीं पण आम्ही आपलीं पापें जर अंगीकारूं तर तो आमचे पापांची क्षमा करायास व आह्मास सर्व अन्यायापासून शुद्ध करायास विश्वासु व न्यायी आहे ॥ १ योहान्न १. ८. ९.

बहुप्रिय भाव्वानों देवाची लिहिलेली गोष्ट कित्येकां ठिकाणांत आम्हास बोध करित्ये कीं आम्ही आपले बहुविध पापांचा अंगीकार करावा तीं आम्ही ढोंग धरून आमचा आकाशांतील बाप जो सर्वसमर्थ देव त्याजपासून लपवूं नयेत पण नम्र दीन अनुतापी मान्य हृदयेंकरून तीं आम्हीं पदरीं घ्यावीं अशासाठीं कीं देव अत्यंत कृपालु व दयालु असतांना त्यापासून



त्यांची क्षमा पावूं पापांचा अंगीकार जरीं आम्हास देवापाशीं नम्रतेनें नित्य केला पाहिजे तरीं जेव्हां देवाचे फार उपकार मानायला त्याची परम योग्य स्तुति करायला त्याची परम पवित्र गोष्ट ऐकायला आणि देह व जीवात्मा यांला जें जें पाहिजे तें तें मागायला आम्ही एकत्र जमतों तेव्हां विशेषेंकरून करावा यास्तव जे तुह्मी एथें विद्यमान आहां त्यां तुम्हास मी विनवितों कीं मसंगतीं पुण्यहृदय व दीनवाणी यांकडून तुम्हीं देवाची प्रार्थना करावी माझे मागें बोलतांना

ह्या सामान्य अंगीकार सर्व सभेनें गुडघे टेकून आचार्यामागें करावा

हे सर्वसमर्थ व परम कृपालो बापा आम्ही हरपलेले मेंढरांसारिखे तुझा मार्ग चुकून बहकलों आहों आम्ही आपले मनाच्या पापी कल्पना व इच्छा यांस फार अनुसरलों आहों तुझे पवित्र आज्ञांचें अतिक्रमण आम्हीं केलें आहे जीं कामें आम्हास करायास योग्य होतीं तीं आह्मीं केलीं नाहींत आणि जीं कामें आह्मास करायास योग्य नव्हतीं तीं आह्मीं केलीं आहेत व आमचे ठायीं शुद्धता राहिली नाहीं पण हे ईश्वरा आह्मा दीन अपराध्यांवर दया कर हे देवा जे आपले अपराध पदरीं घेतात त्यांस वांचूं दे जे अनुतापी आहेत त्यांस प्रसन्न होऊन परत घे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याकडून जीं वचनें त्वां मनुष्यांस दिलीं आहेत त्यांप्रमाणें आणि हे परम दयालो बापा ख्रिस्ताकरितां आह्मास भक्तियुक्त सात्विक आणि विनीत आचरण करायाची शक्ति दे तुझे नामाचें गौरव व्हावें ह्मणून आमेन

लोक गुडघे टेंकीत असतां आचार्यानें उभें राहून ही पापक्षमेची सूचना सांगावी

आमचा प्रभु येशू ख्रिस्त याचा बाप जो सर्वसमर्थ देव तो पापी मनुष्यांचा नाश इच्छित नाहीं पण त्यानें पाप सोडून वांचावें ह्मणून इच्छितो त्यानें आपले आचार्यांस अधिकार व आज्ञा दिली आहे कीं जे लोक अनुतापी आहेत त्यांला पापांची क्षमा व मुक्ति सांगावी जे खरा पश्चात्ताप करून त्याचे सुवार्तेचा सत्य विश्वास धरितात त्यांची तो क्षमा करितो यास्तव आह्मीं त्याची प्रार्थना करावी कीं त्यानें आमचे मनांत खरा पश्चात्ताप उत्पन्न करून आपला पवित्र आत्मा आह्मास द्यावा अशासाठीं कीं जें जें आह्मी आतां करितों तें तें त्याला मान्य व्हावें आणि यापुढें आमचें आचरण पुण्य आणि पवित्र असावें मग अंतकाळीं त्याचा सनातन आनंद आह्मी पावूं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें

मग आचार्य गुडघे टेंकून प्रभूची प्रार्थना बोलो लोकहि गुडघे टेंकून त्याचे मागें बोलोत

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हास दे जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास क्षमा कर आणि आम्हास परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्मास तार कांकीं राज्य सामर्थ्य आणि गौरव हीं सनातनतः तुझींच आहेत आमेन



आचार्य॥ हे ईश्वरा आमचे ओंठ तूं उघड

उत्तर॥ मग आमचें तोंड तुझी स्तुति करील

आचार्य॥ हे देवा त्वरेंकरून आम्हाला तार

उत्तर॥ हे ईश्वरा लौकर आमचें साहाय्य कर

येथें सर्व उभे राहून आचार्य बोलो

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

उत्तर॥ जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

आचार्य॥ ईश्वराची स्तुति तुम्ही करा

उत्तर॥ ईश्वराचे नामाची प्रशंसा करावी

मग पुनरुत्थानाचा दिवस सोडून प्रतिदिवशीं हें पुढलें गीत बोलावें आणि प्रत्येक महिन्याचे एकुणिसावे दिवशीं येथें नको पण गीतांचे अनुक्रमांत वाचावें. गीत ९५.

अहो या आपण ईश्वराला गाऊं आपले बलवान तारणाऱ्याला हर्षाचा शब्द करूं

त्यासमोर उपकारस्तुति करीत येऊं त्याला गीत गाऊन हर्षाचा शब्द करूं

कांकीं ईश्वर थोर देव आहे सर्व देवांपेक्षां मोठा राजा तो

ज्या त्याचे हातांत पृथ्वीचीं खोल स्थानें आहेत आणि पर्वतांचे उंच कडे त्याचे आहेत

समुद्र त्याचा आहे त्यानेंच तो निर्माण केला भूमिहि त्याचे हातानीं घडली

अहो या ईश्वर जो आपला उत्पन्न करणारा त्यासमोर आपण भजन करूं पायां पडूं व गुडघे टेकूं

कां तो आपला देवच आहे आणि आपण त्याचे पाळणाचे लोक व त्याचे हातचा कळप आहों

आजच जर तुम्ही त्याचें ऐकाल तर तुम्ही आपलीं हृदयें कठिन करूं नका जसें विवादांत व जसें परीक्षेचे दिवशीं रानांत झालें तसें

जेव्हां तुमचे वडलानीं माझी परीक्षा केली माझा अनुभव घेतला आणि माझें कार्य पाहिलें तेव्हां

चाळीस वर्षें मी त्या पिढीमुळें संताप पावलों तेव्हां म्यां म्हटलें हे लोक मनांत चुकतात यानीं माझे मार्ग जाणिले नाहींत

ज्यां त्यांविषयीं म्यां क्षोभून शपथ केला कीं ते मजकडला विसांवा पावणार नाहींत

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

येथें पुरातन पवित्र लेखांतील नेमिलेला पहिला अध्याय वाचावा आणि त्यानंतर हें पुरातन मंडळीचें गीत बोलावें अथवा गावें

हे देवा तुझी स्तुति आम्ही करितों तूं ईश्वर असाच तुला आम्ही मानितों

हे सनातन बापा तुला अवघें जग पूजितें



सर्व आकाशांतील दूत आकाश व त्याचीं सर्व सैन्यें तुला मोठ्यानें म्हणतात

करूबीम व सराफीम तुला सर्वदा मोठ्यानें म्हणतात

पवित्र पवित्र पवित्र तूं आहेस हे ईश्वरा सैन्यांचे देवा

तुझे गौरवाचे तेजानें आकाश व पृथ्वी भरलेलीं आहेत

प्रेषितांची थोर मंडळी तुझी स्तुति करिते

भविष्यवाद्यांचा मान्य समुदाय तुझी स्तुति करितो

जे तुजकरितां मरण पावले त्यांची प्रतापी सेना तुझी स्तुति करिते

सर्व पृथ्वीवर तुझी पवित्र मंडळी तुला मानिते

जो तूं अनंत महापिता आहेस

तुझे आदरणीय सत्य एकुलते पुत्राला ती मानिते

पवित्र आत्मा जो शांतिदायक त्यालाहि ती मानिते

तूं गौरवाचा राजा आहेस हे ख्रिस्ता

तूं बापाचा सनातन पुत्र आहेस

मनुष्यें तारायाचें जेव्हां त्वां पत्करिलें तेव्हां कुमारीचे पोटांत जन्म घ्यायास तुला अनिष्ट वाटलें नाहीं

जेव्हां तूं मृत्यु जिंकिलास तेव्हां तूं आपले सर्व भक्तांकरितां आकाशद्वार उघडिलेंस

देव जो बाप त्याचे गौरवांत त्याचे उजवे हाताकडे बसलास

तूं आमची न्यायाधीशी करायाला येणार आहेस असा आम्ही विश्वास धरितों

म्हणून आम्ही तुला प्रार्थितों कीं ज्यां आपले सेवकांस

त्वां आपलें अमोल रक्त खंडणीस देऊन उद्धरिलें आहे त्यांचें साहाय्य कर

त्यांला आपले भक्तांमध्यें सनातन गौरवांत जागा दे

हे ईश्वरा तूं आपले लोकांला तार आणि आपले विभागाला आशी दे

त्यांचें राज्य तूं कर आणि त्यांस सर्वकाळ संरक्षित कर

नित्य आम्ही तुला थोर म्हणतों

तुझे नामाची प्रशंसा आम्ही सनातनत: करूं

हे ईश्वरा यादिवसीं आह्मास पापापासून रक्षायास मान्य अस

हे ईश्वरा आम्हावर दया कर आम्हावर दया कर

हे ईश्वरा आमचा भाव तुजवरच आहे म्हणून तुझी कृपा आम्हावर यावी

हे ईश्वरा तुजवर म्यां विश्वास ठेविला आहे मला नाश पावूं देऊं नये

अथवा हें गीत वाचावें

अहो ईश्वराचे सर्व उत्पन्न पदार्थांनीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो ईश्वराचे दूतहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो आकाशानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो आभाळावरले पाण्यानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा



अहो ईश्वराचे सैन्यानीं तुह्मी सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर ह्मणा

अहो सूर्य आणि चंद्रहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो आकाशांतले ताऱ्यानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर ह्मणा

अहो वृष्टि आणि दहिंवरहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर ह्मणा

अहो वादळानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो अग्नि आणि ताप हो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो हिंवाळा आणि उन्हाळ्यानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो दहिंवर आणि खारहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर ह्मणा

अहो हिम आणि थंडीहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो थिजलेलें पाणी आणि बर्फहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो रात्र दिवसानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो उजेड आणि काळोखहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो वीज आणि मेघहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अगे पृथ्वी तूं सर्वदा ईश्वराचें सुवंदन कर त्याची स्तुति कर आणि त्याला थोर म्हण

अहो पर्वत आणि डोंगरहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो पृथ्वीवरील सर्व हिरव्यानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो विहिरीनीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो समुद्र आणि नद्यानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो मकर आणि इतर मत्स्यानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो आकाशांतले पांखरानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो पशु आणि गुरानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो मनुष्यानीं तुह्मी सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा



अहो इस्राएलहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो ईश्वराचे आचार्य हो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो ईश्वराचे सेवकानीं तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर ह्मणा

अहो पुण्यवान मनुष्यांचे आत्मे आणि जीवहो तुम्ही सर्वदा ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर म्हणा

अहो ज्यां तुमचें मन पवित्र आणि नम्र आहे ते तुम्ही ईश्वराचें सुवंदन करा त्याची स्तुति करा आणि त्याला थोर ह्मणा

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

मग नवे पवित्र लेखांतील दुसरा नेमिलेला अध्याय वाचावा आणि त्यानंतर पुढलें स्तोत्र वाचावें

### लूक १· ६८

ईश्वर जो इस्राएलाचा देव तो सुवंदित असो कांकीं त्यानें आपले लोक पाहून त्यांचें तारण केलें आहे

आणि दावीद जो आपला सेवक त्याचे कुलांत त्यानें आम्हासाठीं बलवान तारणारा उत्पन्न केला आहे

जसा पहिल्यापासून तो आपले भविष्यवाद्यांकडून सांगत असे तसा

आमचे वैऱ्यांपासून व आमचे द्वेषकांचे हातापासून आह्मास तारायाला

ज्या कृपेविषयीं आमचे वडलांस वचन दिलें होतें ती करायाला आणि त्याची पवित्र संधा स्मरायाला

आमचा वडील जो आब्राहाम त्याशीं जो त्यानें शपथ केला त्याप्रमाणें आह्मास द्यायाला

कीं आह्मी आपले वैऱ्यांचे हातापासून तारिलेले असतां त्याची सेवा निर्भयपणें करावी

पवित्रता व न्याय यांकडून त्यासमोर आमचे आयुष्याचे सर्व दिवसांत

तूंच हे बालका परात्पराचा भविष्यवादी ह्मटला जाशील कारण प्रभूचे मार्ग सिद्ध करायास तूं त्यापुढें चालशील

पापांचे क्षमेंकरून जो तारणाचा अनुभव होतो तो त्याचे लोकांस आणून द्यावा ह्मणून

आमचे देवाचे ज्या परमकृपेनें पहांटेचा उजेड आह्माला पोंहचला आहे तिजकडून

जे अंधारांत व मृत्युप्राय छायत बसले आहेत त्यांस उजेड द्यावा आणि आमचे पाय कुशलाचे मार्गांत नीट चालवावे ह्मणून

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन



अथवा हें गीत वाचावें

गीत १००

अहो सर्व पृथ्वींतले लोकानों ईश्वराला हर्षाचा शब्द करा हर्षानें ईश्वराची सेवा करा त्यासमोर उत्साह करीत या

तुह्मी जाणा कीं ईश्वरच देव आहे त्यानेंच आह्मास उत्पन्न केलें आह्मी त्याचेच आहों त्याचे लोक व त्याचे पाळणाचा कळप

तुह्मी उपकार मानीत व त्याची स्तुति करीत त्याचे द्वारानीं त्याचे वाड्यांत जा त्याला उपकारस्तुति करा त्याचे नामाचें सुवंदन करा

कां ईश्वर उत्तम आहे त्याची दया सनातन व त्याचें सत्य युगोयुगच आहे

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

मग आचार्यानें व लोकानीं उभें राहून प्रेषितांचा मतांगीकार बोलावा

देव जो सर्वसमर्थ बाप आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा त्याविषयीं मी विश्वास धरितों

आणि त्याचा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याविषयीं मी विश्वास धरितों जो तो पवित्र आत्म्याचे योगेंकरून गर्भरूप झाला मार्या जी कुमारी तिजकडून जन्मला पोंत्यस पिलातसाचे अधिकाराखालों त्यानें दुःखसहन केलें तो क्रूसावर

बसविला गेला मरण पावला व पुरला गेला तो मृत्युलोकांत गेला तिसरे दिवशीं पुन्हां जीवंत होऊन मेलेल्यांमधून उठला आकाशांत चढला आणि सर्वसमर्थ देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला तेथून जीवंत व मेलेले यांची न्यायाधीशी करायाला तो येणार आहे

पवित्र आत्मा जी एकच पवित्र मंडळी पवित्र मनुष्यांचें सहायत्व पापांची क्षमा देहाचें पुनरुत्थान आणि सनातन जीवन यांविषयीं मी विश्वास धरितों आमेन

आचार्य ॥ ईश्वर तुह्माशीं असो

उत्तर ॥ तुझे आत्म्याशीं तो असो

आचार्य ॥ आह्मी प्रार्थना करूं

हे ईश्वरा आह्मावर दया कर

उत्तर ॥ हे ख्रिस्ता आह्मावर दया कर

आचार्य ॥ हे ईश्वरा आह्मावर दया कर

मग आचार्यानें व लोकानीं प्रभूची प्रार्थना बोलावी

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे जशी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आह्मास क्षमा कर आणि आह्मास परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्मास तार आमेन

आचार्य ॥ हे ईश्वरा तूं आपली दया आह्मावर प्रकट कर



उत्तर ॥ आणि तुझें तारण आह्मास दे

आचार्य ॥ हे ईश्वरा राजाचें रक्षण कर

उत्तर ॥ आणि आमची प्रार्थना कृपा करून ऐक

आचार्य ॥ तूं आपले आचार्यांस पुण्यसंपन्न कर

उत्तर ॥ आणि तुझे निवडलेले लोकांस आनंदित कर

आचार्य ॥ हे ईश्वरा तूं आपले लोकांस तार

उत्तर ॥ आणि तुझे विभागाला आशी दे

आचार्य ॥ हे ईश्वरा आमचे वेळीं कुशल होऊं दे

उत्तर ॥ कां तर हे देवा तुजशिवाय दुसरा कोणी युद्ध करून आह्मास संरक्षित करणार नाहीं

आचार्य ॥ हे देवा आमचीं हृदयें स्वच्छ कर

उत्तर ॥ तूं आपला पवित्र आत्मा आह्मापासून काढूं नको

स्वास्थ्याविषयींचा प्रार्थनासारांश

हे देवा जो तूं सांत्वनकारक आहेस तुला ऐकमत्य आवडतें तुझे ओळखीकडून आमचे निरंतर जीवन होतें तुझी सेवा स्वतंत्रपणच आहे तूं आह्मास आपले सेवकांस आमचे शत्रूंचे सर्व घाल्यांपासून संरक्षित कर अशासाठीं कीं आह्मीं तुझे संरक्षणावर विश्वास ठेवून कोणी शत्रूंचे बलास भिऊं नये येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे सामर्थ्याकडून आमेन

सत्वगुणाविषयींचा प्रार्थनासारांश

हे ईश्वरा आमचे आकाशांतील बापा हे सर्वसमर्थ व सनातन देवा ज्या त्वां या दिवसापर्यंत आह्मास सलामत निभाविलें आहे

तूं आपले परमसामर्थ्यानें या दिवसीं आह्मास राख आणि कोणत्याहि प्रकारचे पापांत अथवा अरिष्टांत आह्मास पडूं देऊं नको पण आमचें आचरण तुझे दृष्टींत सर्वदा यथायोग्य व्हावें ह्मणून आमचीं सर्व कामें तुझे नीतीनें चालवावीं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

राजाविषयींची प्रार्थना

हे ईश्वरा आमचे आकाशांतील बापा थोरा व समर्था राजांचे राजा धन्यांचे धन्या अधिपांचे एकाच शास्त्या जो तूं आपले सिंहासनावरून पृथ्वींतले सर्व लोक पाहतोस तुला आह्मी मनापासून विनवितों कीं आमचा कृपावंत राजा जो आहे त्याजवर तुझा प्रसाद असावा आणि तुझे मनोदयाप्रमाणें त्यानें सर्वदा करावें व तुझे मार्गांत चालावें ह्मणून तूं आपले पवित्र आत्म्याकडून त्याला पूर्ण सत्वगुण दे त्याला बहुसद्गुणसंपन्न कर दीर्घ आयुष्यापर्यंत त्याला कुशलकल्याणयुक्त राहूं दे त्यानें आपले शत्रु जिंकावे व दान्त करावे ह्मणून त्याला बलयुक्त कर आणि अंतकाळीं मरणानंतर त्याला सनातन सुखानंद प्राप्त व्हावा येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

राजकुटुंबाविषयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा जो तूं सुखसागर आहेस तुला आह्मी नम्रपणें विनवितों कीं आमचे सर्व राजकुटुंबाचें हित करावें त्यांतले सर्वांला तूं आपला पवित्र आत्मा दे त्यांला तूं आपले



दिव्य सत्वगुणभरित कर संपूर्ण कुशलेंकरून त्यांला धन्य कर आणि अंतकाळीं तूं आपले सनातन राज्यांत त्यांला जागा दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

आचार्य व लोक यांविषयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ व सनातन देवा जो तूं मात्र आश्चर्यकर्में करितोस आमचे एपिस्कोपस व आचार्य व त्यांचे हाताखालीं ज्या मंडळ्या असतात त्यां सर्वांस तूं आपला उद्धारक आत्मा पाठवून दे आणि तुझे मनोदयाप्रमाणें त्यानीं वर्तावें म्हणून त्यांजवर तूं आपले आशीचें दहिंवर नित्य पडूं दे हे ईश्वरा ही आमची प्रार्थना येशू ख्रिस्त जो आमचा प्रतिनिधि व मध्यस्थ त्याकडून ऐकावी आमेन

ख्रुसोस्तोम साधूनें केलेली प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां कृपा करून आम्हास यासमयीं आपली प्रार्थना ऐकमत्येंकडून करूं दिली आहे आणि असें वचन दिलें आहे कीं जेव्हां दोघे तिघे जण माझे नामानें एकत्र मिळतील तेव्हां त्यांचे मागीतल्याप्रमाणें करीन आतां हे ईश्वरा तूं आपले सेवकांच्या विनंत्या व प्रार्थना ऐकून जसें त्यांचें हित होईल तसें त्यांला कर या लोकीं तुझे सत्याचें परिज्ञान आणि परलोकीं सनातन जीवन आह्मास देतांना आमेन

आमचे प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा आणि देवाची प्रीति आणि पवित्र आत्म्याचें सहायत्व आम्हासर्वांजवळ सर्वदा असावें आमेन

सकाळची प्रार्थनापद्धति समाप्त

# संध्याकाळची प्रार्थनापद्धति

---

प्रार्थनेंपूर्वीं आचार्यानें खालचे वाक्यांतलें एक अथवा अधिक स्रोत्यानें वाचावें

जेव्हां पापी मनुष्य आपलें पाप सोडून जें न्यायी व यथार्थ तें करील तेव्हां तो आपला जीव वांचवून घेईल * येहेज्केएल १८· २७·

मी आपले अपराध अंगीकारितों माझें पापहि माझे समोर सर्वदा आहे * गीत ५१· ३·

माझे पापापासून तूं आपलें मुख आवरून घे आणि माझे सर्व अन्याय पुसून टाक * गीत ५१· ९·

देवाचे बलि शोकार्त्तमनच आहेत हे देवा शोकार्त्त व नम्र झालेलें हृदय तूं तुच्छ मानणार नाहींस * गीत ५१· १७·

तुम्ही आपलीं वस्त्रें फाडितांना नव्हे पण आपलीं हृदयें फाडितांना ईश्वर जो तुमचा देव त्याजकडे फिरा कांकीं तो कृपालु व दयालु मंदक्रोध व बहुप्रसाद असून दंडाविषयीं अनुतापी आहे * योएल २· १३·

ईश्वर जो आमचा देव त्याला दया व क्षमा आहेत जरीं त्यानें ज्या आज्ञा आम्हापुढें नेमून ठेविल्या आहेत त्यांप्रमाणें आम्ही त्याचा अपमान करून चाललों नाहीं तरीं * दानीएल ९· ९· १०

हे ईश्वरा मला शिक्षा करिशील तर सन्याय करावी सकोप केली असली तर माझा सत्यनाश होईल * इर्मिया १०·२४ गीत ६·१

पश्चात्ताप करा कांकीं आकाशाचें राज्य जवळ आलें आहे * मात्थी ३· २·

मी उठून आपले बापाजवळ जाईन आणि त्याला सांगेन हे बापा आकाशप्रतिकूल व तुजसमक्ष म्यां पाप केलें आहे आणि यापुढें मी तुझा पुत्र म्हटला जायास योग्य नाहीं * लूक १५· १८. १९·

हे ईश्वरा तूं आपले सेवकाशीं न्यायविवाद करूं नको कां तर तुझे पुढें कोणी जीवंत मनुष्य न्यायी निघणार नाहीं * गीत १४३· २·

जर आम्ही म्हणूं कीं आम्हास पाप नाहीं तर आम्ही आपणातें फसवितों आणि आम्हांमध्यें सत्य नाहीं पण आम्ही आपलीं पापें जर अंगीकारूं तर तो आमचे पापांची क्षमा करायास व आम्हास सर्व अन्यायापासून शुद्ध करायास विश्वासु व न्यायी आहे * १· योहान्न १· ८· ९·

बहुप्रिय भाव्वानों देवाची लिहिलेली गोष्ट कित्येकां ठिकाणांत आह्मास बोध करित्ये कीं आह्मीं आपले बहुविध पापांचा अंगीकार करावा तीं आम्हीं ढोंग धरून आमचा आकाशांतील बाप जो सर्वसमर्थ देव त्याजपासून लपवूं नयेत पण नम्र दीन अनुतापी मान्य हृदयेंकरून तीं आम्हीं पदरीं घ्यावीं अशासाठीं कीं देव अत्यंत कृपालु व दयालु असतांना त्यापासून त्यांची



क्षमा पावूं पापांचा अंगीकार जरीं आम्हास देवापाशीं नम्रतेनें नित्य केला पाहिजे तरीं जेव्हां देवाचे फार उपकार मानायला त्याची परमयोग्य स्तुति करायला त्याची परमपवित्र गोष्ट ऐकायला आणि देह व जीवात्मा यांला जें जें पाहिजे तें तें मागायला आम्ही एकत्र जमतों तेव्हां विशेषेंकरून करावा यास्तव जे तुम्ही एथें विद्यमान आहां त्यां तुम्हास मी विनवितों कीं मसंगतीं पुण्यहृदय आणि दीन वाणी यांकडून तुम्हीं देवाची प्रार्थना करावी आझे मागें याप्रमाणें बोलतांना

हा सामान्य अंगीकार सर्व सभेनें गुडघे टेकून आचार्यामागें करावा

हे सर्वसमर्थ व परमकृपाळो बापा आम्ही हरपलेले मेंढरां सारिखे तुझा मार्ग चुकून बहकलों आहों आह्मी आपले मनाच्या पापी कल्पना व इच्छा यांस फार अनुसरलों आहों तुझे पवित्र आज्ञांचें अतिक्रमण आम्हीं केलें आहे जीं कामें आम्हाला करायास योग्य होतीं तीं आह्मीं केलीं नाहींत आणि जीं कामें आम्हाला करायास योग्य नव्हतीं तीं आम्हीं केलीं आहेत आणि आमचे ठायीं शुद्धता राहिली नाहीं पण हे ईश्वरा आम्हां दीन अपराध्यांवर दया कर जे आपले अपराध पदरीं घेतात त्यांस हे देवा वांचूं दे जे अनुतापी आहेत त्यांस प्रसन्न होऊन परत घे जीं वचनें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याकडून त्वां दिलीं आहेत त्यांप्रमाणें आणि हे परमदयाळो बापा ख्रिस्ताकरितां आह्मास भक्तियुक्त सात्विक आणि विनीत

आचरण करायाची शक्ति दे तुझे नामाचें गौरव व्हावें ह्मणून आमेन

लोक गुडघे टेंकीत असतां आचार्यानें उभें राहून ही पापक्षमेची सूचना सांगावी

आमचा प्रभु येशू ख्रिस्त याचा बाप जो सर्वसमर्थ देव तो पापीमनुष्याचा नाश इच्छित नाहीं पण त्यानें पाप सोडून वांचावें म्हणून इच्छितो त्यानें आपले आचार्यांस अधिकार व आज्ञा दिली आहे कीं जे लोक अनुतापी आहेत त्यांला पापांची क्षमा व मुक्ति सांगावी जे खरा पश्चात्ताप करून त्याचे सुवार्त्तेचा सत्य विश्वास धरितात त्यांची क्षमा तो करितो यास्तव आह्मीं त्याची प्रार्थना करावी कीं त्यानें आमचे मनांत खरा पश्चात्ताप उत्पन्न करून आपला पवित्र आत्मा आह्मास द्यावा अशा साठीं कीं जें जें आम्ही आतां करितों तें तें त्याला मान्य व्हावें आणि यापुढें आमचें आचरण पुण्य व पवित्र असावें मग अंतकाळीं त्याचा सनातन आनंद आह्मी पावूं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें

मग आचार्य गुडघे टेंकून प्रभूची प्रार्थना बोलो लोकहि गुडघे टेंकून त्याचे मागें बोलोत

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हास दे जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास



क्षमा कर आणि आम्हास परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आम्हाला तार कां कीं राज्य सामर्थ्य आणि गौरव हीं सनातनतः तुझींच आहेत आमेन

आचार्य॥ हे ईश्वरा आमचे ओंठ तूं उघड

उत्तर॥ मग आमचें तोंड तुझी स्तुति करील

आचार्य॥ हे देवा त्वरेंकरून आम्हाला तार

उत्तर॥ हे ईश्वरा लौकर आमचें साहाय्य कर

एथें सव उभे राहून आचार्य बोलो

बाप व पुत्र व पवित्रआत्मा यांस गौरव असावें

उत्तर॥ जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

आचार्य॥ ईश्वराची स्तुति तुह्मी करा

उत्तर॥ ईश्वराचे नामाची प्रशंसा करावी

एथें पुरातन पवित्र लेखांतील नेमिलेला अध्याय वाचावा आणि त्यानंतर मार्या जी कुमारी तिचें हें गीत बोलावें अथवा गावें

लूक १

माझा जीव ईश्वराला थोर ह्मणतो देव जो माझा तारणारा त्याविषयीं माझा आत्मा हर्ष करितो

कां त्यानें आपले सेवकीची नम्र दशा कृपेंकडून पाहिली आहे

यास्तव पाहा पुढें सर्व पिढ्या मला धन्य ह्मणतील

कां जो समर्थ त्यानें मसाठीं महाकुकर्में केलीं आहेत आणि त्याचें नाम पवित्र आहे

जे त्याचें भय धरितात त्यांजवर त्याची कृपा पिढ्यानपिढीं आहे

त्यानें आपले भुजानें पराक्रम दाखविला आहे जे आपले मनाचे कल्पनांत गर्विष्ठ त्यांस त्यानें उडवून दिलें आहे

त्यानें बलवंतांस त्यांचे सिंहासनावरून पाडिलें आहे आणि दीनांस त्यानें उंचाविलें आहे

भुकेल्यांस त्यानें उत्तम पदार्थांनीं तृप्त केलें आहे आणि धनवंतांस रिकामें टाकून दिलें आहे

त्यानें दया स्मरून आपले सेवक इस्राएलाचें साहाय्य केलें आहे जसें त्यानें आमचे वडील जे आब्राहाम व त्याची संतति त्यांस सर्वकालाविषयीं सांगितलें होतें तसें

बाप व पुत्र व पवित्रआत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

अथवा हें गीत वाचावें

गीत ९८

ईश्वराला तुह्मी नवें गीत गा कां त्यानें आश्चर्यकर्में केलीं आहेत तो आपले उजवे हातानें व पवित्र भुजानें जय पावला आहे

ईश्वरानें आपलें तारण दाखविलें आहे आणि आपला न्याय सर्व लोकांस प्रकट केला आहे



त्यानें इस्राएलाचे वंशाकडील आपलें कृपासत्य स्मरलें आहे आमचे देवानें केलेलें जें तारण तें पृथ्वीचे सर्व सीमानीं पाहिलें आहे

अहो पृथ्वींतले सर्व लोकानों ईश्वराला हर्षाचा शब्द करा ओरडत सुटा उत्साह करा गायन करा

चंग वाजवून ईश्वराला गा चंग व मंजुल स्वरेंकरून गा

ईश्वर जो राजा त्यासमोर कर्णा व शिंग वाजवून उत्साहाचा शब्द करा

समुद्र व त्याची पूर्त्ति गर्जना करोत भूमि व तिजमध्यें जे राहतात ते

ईश्वरासमोर नद्या टाळ्या वाजवोत डोंगर मिळून उत्साह करोत कां तो पृथ्वीची न्यायाधीशी करायला येतो

यथायोग्य तो भुईची न्यायाधीशी करील आणि नीतीनें लोकांची

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

मग नवे पवित्र लेखांतील दुसरा नेमिलेला अध्याय वाचावा आणि त्यानंतर सुमेओनाचें गीत वाचावें

लूक २. २९

आतां हे ईश्वरा तूं आपले वचनाप्रमाणें आपले सेवकास कुशलयुक्त जाऊं देतोस

कां माझे डोळ्यानीं तुझें तारण पाहिलें आहे

जें त्वां सर्व लोकांदेखतां सिद्ध केलें आहे तें

विधर्मी लोकांस प्रकाश देण्याचा उजेड आणि तुझे इस्राएल लोकांचें गौरव तें होईल

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनत: होईल आमेन

अथवा हें गीत वाचावें

गीत ६७

देवानें आह्मावर दया करावी व आशी द्यावी त्यानें आपला प्रसाद आम्हावर खुलवावा

अशासाठीं कीं तुझा मार्ग पृथ्वीवर कळवावा आणि सर्व लोकांस तुझें तारण जाणवावें

हे देवा लोक तुझी स्तुति करोत सर्व लोक तुझी स्तुति करोत

लोक हर्ष व उत्साह करोत कां लोकांची न्यायाधीशी तूं यथायोग्य करिशील आणि पृथ्वीवरील लोकांचें राज्य करिशील

हे देवा लोक तुझी स्तुति करोत सर्व लोक तुझी स्तुति करोत

पृथ्वी आपलीं फळें देईल आणि देव आमचा देव आमचें हित करील

देव आमचें हित करील आणि पृथ्वीच्या सर्व सीमा त्याचें भय धरितील

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें



जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनत: होईल आमेन

मग आचार्यानें व लोकानीं उभें राहून प्रेषितांचा मतांगीकार बोलावा

देव जो सर्वसमर्थ बाप आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा त्याविषयीं मी विश्वास धरितों

आणि त्याचा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याविषयीं मी विश्वास धरितों जो तो पवित्र आत्म्याचे योगानें गर्भरूप झाला मार्या जी कुमारी तिजकडून जन्मला पोंत्यस पिलातसाचे अधिकाराखालीं त्यानें दु:ख सहन केलें तो क्रूसावर बसविला गेला मरण पावला व पुरला गेला तो मृत्युलोकांत गेला तिसरे दिवशीं पुन्हां जीवंत होऊन मेलेल्यांमधून उठला आकाशांत चढला आणि सर्वसमर्थ देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला तेथून जीवंत व मेलेले यांची न्यायाधीशी करायला तो येणार आहे

पवित्र आत्मा जी एकच पवित्र मंडळी पवित्र मनुष्यांचें सहायत्व पापाची क्षमा देहाचें पुनरुत्थान व सनातन जीवन यांविषयीं मी विश्वास धरितों आमेन

आचार्य ॥ ईश्वर तुह्माशीं असो

उत्तर ॥ तुझे आत्म्याशीं तो असो

आचार्य ॥ आह्मी प्रार्थना करूं

हे ईश्वरा आह्मावर दया कर

उत्तर ॥ हे ख्रिस्ता आम्हावर दया कर

आचार्य ॥ हे ईश्वरा आम्हावर दया कर

मग आचार्यानें व लोकानीं प्रभूची प्रार्थना बोलावी

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हास दे जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास क्षमा कर आणि आम्हास परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आम्हाला तार आमेन

आचार्य ॥ हे ईश्वरा तूं आपली दया आम्हावर प्रकट कर
उत्तर ॥ आणि तुझें तारण आम्हास दे
आचार्य ॥ हे ईश्वरा राजाचें रक्षण कर
उत्तर ॥ आणि आमची प्रार्थना कृपा करून ऐक
आचार्य ॥ तूं आपले आचार्यांस पुण्यसंपन्न कर
उत्तर ॥ आणि तुझे निवडलेले लोकांस आनंदित कर
आचार्य ॥ हे ईश्वरा तूं आपले लोकांस तार
उत्तर ॥ आणि तुझे विभागाला आशी दे
आचार्य ॥ हे ईश्वरा आमचे वेळीं कुशल होऊं दे
उत्तर ॥ कां तर हे देवा तुजशिवाय दुसरा कोणी युद्ध करून आम्हास संरक्षित करणार नाहीं
आचार्य ॥ हे देवा आमचीं हृदयें स्वच्छ कर
उत्तर ॥ आम्हापासून तूं आपला पवित्र आत्मा काढूं नको

संध्याकाळचा दुसरा प्रार्थनासारांश

हे देवा जो तूं सर्व पवित्र इच्छा सर्व उत्तम संकल्प व सर्व



सत्यकर्मे यांचा उत्पादक आहेस जें समाधान प्रपंचाच्यानें देवत नाहीं तें तूं आपले सेवकांला दे अशासाठीं कीं तुझ्या आज्ञा पाळायास आमचीं हृदयें स्थिर असावीं आणि आमचे शत्रूंचे भयापासून त्वां आम्हाला रक्षिलेलें असतां आमचा वेळ समाधान व स्वास्थ्य यांत क्रमून जावा येशू ख्रिस्त आमचा तारणारा याचे पुण्याकरितां आमेन

जोखमें न व्हावीं याविषयींचा प्रार्थनासारांश

हे ईश्वरा आम्ही तुला विनवितों कीं त्वां आमचा अंधार दवडून आम्हावर उजेड पाडावा आणि या रात्रीं तूं आपले परम कृपेंकरून सर्वप्रकारचे जोखमांपासून आह्मास संरक्षित कर तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा तारणारा याचे प्रीतीकरितां आमेन

राजाविषयींची प्रार्थना

हे ईश्वरा आमचे आकाशांतील बापा थोरा व समर्था राजांचे राजा धन्यांचे धन्या अधिपांचे एकाच शास्त्या जो तूं आपले सिंहासनावरून पृथ्वींतले सर्व लोक पाहतोस आम्ही तुला मनापासून विनवितों कीं आमचा कृपावंत राजा जो आहे त्याजवर तुझा प्रसाद असावा आणि तुझे मनोदयाप्रमाणें त्यानें सर्वदा करावें व तुझे मार्गांत चालावें, म्हणून तूं आपले पवित्र आत्म्याकडून त्याला पूर्ण सत्वगुण दे त्याला बहुसद्गुणसंपन्न कर दीर्घ आयुष्यापावेतों त्याला कुशलकल्याणयुक्त राहूं दे त्यानें आपले शत्रु जिंकावे व दान्त

करावें म्हणून त्याला बलयुक्त कर आणि अंतकाळीं मरणानंतर त्याला सनातन सुखानंद प्राप्त व्हावा येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### राजकुटुंबाविषयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा जो तूं सुखसागर आहेस तुला आम्ही नम्रपणें विनवितों कीं आमचे सर्व राजकुटुंबाचें हित करावें त्यांतले सर्वांला तूं आपला पवित्र आत्मा दे त्यांला तूं आपले दिव्य सत्गुणभरित कर संपूर्ण कुशलानें त्यांला धन्य कर आणि अंतकाळीं तूं आपले सनातन राज्यांत त्याला जागा दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### आचार्य व लोक यांविषयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा जो तूं मात्र आश्चर्यकर्मे करितोस आमचे एपिस्कोपस व आचार्य व त्यांचे हाताखालीं ज्या मंडळ्या असतात त्यां सर्वांस तूं आपला उद्धारक आत्मा पाठवून दे आणि तुझे मनोदयाप्रमाणें त्यानीं वर्तावें म्हणून त्यांजवर तूं आपले आशीचें दहिंवर नित्य पडूं दे हे ईश्वरा ही आमची प्रार्थना येशू ख्रिस्त जो आमचा प्रतिनिधि व मध्यस्थ याकडून ऐकावी आमेन

### ख्रुसोस्तोम साधूनें केलेली प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां कृपा करून आम्हास यासमयीं आपली प्रार्थना ऐकमत्येंकडून करूं दिली आहे आणि असें



वचन दिलें आहे कीं जेव्हां दोघे तिघे जण माझे नामानें एकत्र मिळतील तेव्हां त्यांचे मागीतल्याप्रमाणें करीन आतां हे ईश्वरा तूं आपले सेवकांच्या विनंत्या व प्रार्थना ऐकून जसें त्यांचें हित होईल तसें त्यांला कर या लोकीं तुझे सत्याचें परिज्ञान आणि परलोकीं सनातन जीवन आम्हास देतांना आमेन

आमचे प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा आणि देवाची प्रीति आणि पवित्र आत्म्याचें सहायत्व आह्मा सर्वांजवळ सर्वदा असावें आमेन

संध्याकाळची प्रार्थनापद्धति समाप्त

---

## अथानास्यस साधूचा मतांगीकार

ख्रिस्ताचे जन्मदिवसीं पुनरुत्थानाचे दिवसीं आरोहणदिवसीं पवित्रआत्मावतारदिवसीं आणि त्रिकाचे दिवसीं सकाळचे प्रार्थनासमयीं प्रेषितांचे मतांगीकाराचे स्थानीं आचार्यानें व लोकानीं उभें राहून हा मतांगीकार बोलावा

जो कोणी तरूं इच्छितो त्याला प्रथमत: सामान्य धर्ममत धरावें लागतें तें मत जर कोणी अखंडित राखीत नाहीं तर निश्चयें त्याला सनातन नाश प्राप्त होईल

तर तें सामान्य धर्ममत असेंच आहे कीं जो देव एक असून त्रिक आहे आणि त्रिक असून एकच आहे त्यास आम्हीं भजावें

त्या व्यक्ति मिश्रित अथवा तें सत्व भिन्न असें समजूं नये

कारण बापाची व्यक्ति एक पुत्राची व्यक्ति दुसरी आणि पवित्र आत्म्याची व्यक्ति दुसरी आहे

परंतु बापाचें पुत्राचें आणि पवित्र आत्म्याचें देवपण एकच आहे त्यांचें गौरव तुल्य व त्यांचा महिमा सनातन आहे

जसा बाप आहे तसाच पुत्र आहे आणि तसाच पवित्र आत्मा आहे

बाप अनुत्पन्न पुत्र अनुत्पन्न आणि पवित्र आत्मा अनुत्पन्न

बाप अप्रमेय पुत्र अप्रमेय आणि पवित्र आत्मा अप्रमेय

बाप सनातन पुत्र सनातन आणि पवित्र आत्मा सनातन

तथापि तिघे सनातन असे नव्हत पण एकच सनातन

अणखीं तिघे अप्रमेय अथवा तिघे अनुत्पन्न असे नव्हत पण एकच अनुत्पन्न आणि एकच अप्रमेय

तसाच बाप सर्वसमर्थ आहे पुत्र सर्वसमर्थ आणि पवित्र आत्मा सर्वसमर्थ तथापि तिघे सर्वसमर्थ असे नव्हत पण एकच सर्वसमर्थ

तसाच बाप देव आहे पुत्र देव आहे आणि पवित्र आत्मा देव आहे तथापि तिघे देव असे नव्हत पण एकच देव

तसाच बाप ईश्वर आहे पुत्र ईश्वर आणि पवित्र आत्मा ईश्वर तथापि तिघे ईश्वर असे नव्हत पण एकच ईश्वर

तर प्रत्येक व्यक्ति स्वतः देव व ईश्वर आहे असें अंगीकारणें ख्रिस्ती सत्याकडून जसें आम्हास प्राप्त आहे

तसें तिघे देव अथवा तिघे ईश्वर आहेत असें ह्मणायला सामान्य धर्मानें आम्हास निषेध केला आहे

बाप कोणेकाकडून झाला नाहीं उत्पन्न नाहीं जनित नाहीं



पुत्र बापापासूनच आहे निर्मित नाहीं उत्पन्न नाहीं पण जनित आहे

बाप व पुत्र यांपासून पवित्र आत्मा आहे निर्मित नाहीं उत्पन्न नाहीं जनित नाहीं पण यांचे सत्ताचा आहे

तर एकच बाप आहे तिघे बाप नाहींत एकच पुत्र आहे तिघे पुत्र नाहींत एकच पवित्र आत्मा आहे तिघे पवित्र आत्मे नाहींत

आणि या त्रिकांतला एकापूर्वीं एक अथवा एकामागें एक नव्हे एकापेक्षां श्रेष्ठ कनिष्ठ एक नव्हे

पण सर्व तिघे जण सनातन व सतुल्य आहेत

तर जसें पूर्वीं सांगीतलें होतें तसें जो देव एक असून त्रिक आहे आणि त्रिक असून एकच आहे त्याचेंच भजन सर्वतः केलें पाहिजे

यास्तव जो कोणी तरूं इच्छितो त्याचें मत त्रिकाविषयीं असेंच असावें लागतें

अणखीं त्याला सनातन तारण प्राप्त ह्वावें ह्मणून आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे अवताराचा सत्य विश्वास धरावा लागतो

तर शुद्ध विश्वास हाच आहे कीं आह्मीं मानावें व अंगीकारावें कीं आमचा प्रभु येशू ख्रिस्त जो देवाचा पुत्र तो देव व मनुष्य मिळूनच आहे

देव बापाचे सत्ताचा जगापूर्वीं जनित आणि मनुष्य त्याचे आईचे सत्ताचा जगांत जन्मलेला

पूर्ण देव आणि पूर्ण मनुष्य बुद्धिसंपन्नजीवात्म्याचा आणि मानवी देहाचा असतांना

त्याचे देवपणाविषयीं बापाशीं तुल्य आणि त्याचे मनुष्यपणाविषयीं बापापेक्षां उणा

तो जरीं देव आणि मनुष्य मिळून आहे तरीं तो दोघे ख्रिस्त असा नव्हे पण एकच ख्रिस्त आहे

एकच आहे मनुष्यपणांत देवपण पालटल्यानें असें नव्हे पण देवपणांत मनुष्यपण घेतल्यानें

एकच आहे सत्वाचे मिश्रणेंकरून असें नव्हे पण पुरुषाचे एकत्वेंकडून

कारण जसें बुद्धिसंपन्नजीवात्मा आणि देह मिळून एक मनुष्य आहे तसा देव आणि मनुष्य मिळून एकच ख्रिस्त आहे

तो आम्हास तारायासाठीं दुःखमरण पावला मृत्युलोकांत गेला तिसरे दिवशीं पुन्हां जीवंत होऊन मेलेल्यांतून उठला

तो आकाशांत चढला सर्वसमर्थ देवाचे म्हणजे बापाचे उजवे हाताकडे बसला आहे तेथून जीवंतांची व मेलेल्यांची न्यायाधीशी करायास तो येणार आहे

तो येईल तेव्हां सर्व मनुष्यें देहसंयुक्त होऊन उठतील आणि आपले कामांचा हिसाब त्याला तेव्हां द्यावा लागेल

ज्यानीं उत्तम कामें केलीं आहेत ते सनातनजीवनांत जातील आणि दुष्ट कामें ज्यानीं केलीं आहेत ते सनातन अग्नींत जातील



हेंच सामान्य धर्ममत आहे याचा सत्य विश्वास धरिल्या वांचून कोणाच्यानें तरवत नाहीं

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

समाप्त

## विनंती अथवा सामान्यप्रार्थना

हे देवा जो आकाशाचा बाप तो तूं आम्हां दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो आकाशाचा बाप तो तूं आम्हां दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पुत्र जगाचा तारणारा तो तूं आम्हां दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पुत्र जगाचा तारणारा तो तूं आम्हां दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पवित्र आत्मा जो बाप व पुत्र यांचा अखंडित सत्वाचा तो तूं आम्हां दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पवित्र आत्मा जो बाप व पुत्र यांचा अखंडित सत्वाचा तो तूं आम्हां दीन पाप्यांवर दया कर

हे पवित्र सुवंदित आणि गौरवी त्रिका जें तिघे जण पण एकच देव तें तूं आम्हां दीन पाप्यांवर दया कर

हे पवित्र सुवंदित आणि गौरवी त्रिका जें तिघे जण पण एकच देव तें तूं आह्मां दीन पाप्यांवर दया कर

हे ईश्वरा आमचे अपराध अथवा आमचे वडिलांचे अपराध स्मरूं नको आमचे पापांचा सूड घेऊं नको हे उत्तम ईश्वरा आह्मास वांचूं दे जे तुझे लोक त्यां आपलें अमोल रक्त खंडणीस देऊन परत घेतले आहेत त्यांस वांचूं दे आणि आह्मावर तुझा क्रोध सर्वकाळ नसावा

हे उत्तम ईश्वरा आम्हास वांचूं दे

सर्व अरिष्टें व उपद्रव पातक शैतानाच्या युक्ति व त्याचे घाले तुझा राग व सनातन नाश यांपासून

हे उत्तम ईश्वरा आम्हाला राख

व्यभिचार व सर्व प्रकारचें नाशक पाप प्रपंच इंद्रियें व शैतान यांचे सर्व भुलविण्यांपासून

हे उत्तम ईश्वरा आह्माला राख

वीज व वादळ उपद्रव मरी व दुकाळ लढाई घात व आकस्मिक मरण यांपासून

हे उत्तम ईश्वरा आह्माला राख

सर्व धुंदाई गुप्त बंड व फितूर सर्व असत्य मत पाखंड व भेद हृदयाचें कठिनपण आणि तुझी गोष्ट व आज्ञा अवमानणें यांपासून

हे उत्तम ईश्वरा आम्हाला राख

तुझें पवित्र देहधारणाचें रहस्य तुझा पवित्र जन्म व सुंता तुझा बाप्तिस्मा उपोषण व परीक्षा यांकडून

हे उत्तम ईश्वरा आम्हाला तार



तुझा क्लेश व रक्तस्वेद तुझा क्रूस व संताप तुझें अमोलिक मरण व थड्यांत ठेवणें तुझें गौरवी पुनरुत्थान व आकाशांत चढणें आणि पवित्र आत्म्याचें अवतरण यांकडून

हे उत्तम ईश्वरा आह्माला तार

आमचे कष्टांचे सर्व समयीं आणि आमचे कल्याणाचे सर्व समयीं मरणाचे वेळीं व न्यायाधीशीचे दिवशीं

हे उत्तम ईश्वरा आम्हाला तार

हे ईश्वरा देवा आमचें ऐकावें म्हणून आम्ही पापी मनुष्यें तुला विनवितों आणि त्वां आपलें सर्व पवित्र मंडळीस अनुशासून सत्य मार्गांत चालवायास मान्य असावें

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

तुझा सेवक जो आमचा कृपावंत राजा त्यानें तुझे सत्य भजनांत आणि न्यायी व पवित्र आचरणांत वर्त्तावें म्हणून त्याचें रक्षण व पुष्टीकरण करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

त्याचें मन तुझे भक्तींत भयांत व प्रीतींत स्थिर करायास त्वां मान्य असावें आणि त्यानें तुजवर सर्वदा विश्वास धरावा आणि तुझा आदर व गौरव करायास त्याची इच्छा सर्वदा असावी

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

त्याचें रक्षण व पाळण करायास आणि त्याचे सर्व शत्रूंवर त्याचा विजय करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

राजकीय सर्व कुटुंबाचें हित व रक्षण करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

तुझे गोष्टीचे सत्यज्ञानानें व बोधेंकरून सर्व एपिस्कोपस प्रेसबुतरस व द्याकोन प्रकाशित करायास त्वां मान्य असावें आणि त्यानीं ती गोष्ट आपले उपदेशानें व आचरणेंकडून प्रकट आणि प्रव्यक्त करावी

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

राजमंत्री व थोर पदवीचे सर्व लोक यांस पवित्र ज्ञानी व बुद्धिवंत करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

आपले सर्व लोकांचें हित व पाळण करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आह्मी तुला विनवितों

निरनिराळे देशांतले लोकांस एकमेकांशीं एकत्व स्वास्थ्य व संमति राखूं द्यायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

आम्हीं तुजवर प्रीति ठेवावी तुझी भीड धरावी आणि तुझे आज्ञांप्रमाणें झटून वर्त्तावें असा आम्हास सत्गुण द्यायास त्वां मान्य असावें

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

तुझे सर्व लोकानीं तुझी गोष्ट नम्रतेनें ऐकावी ती गोष्ट पवित्र आवडीनें ध्यानांत आणावी आणि पवित्र आत्मोत्पन्न



फळें द्यावीं असा त्यांचा सत्गुण वाढवायास त्वां मान्य असावें

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आह्मी तुला विनवितों

सर्व जे बहकलेले व फसलेले आहेत त्यांस सत्यमार्गीत आणायास त्वां मान्य असावें

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

जे स्थिर आहेत त्यांचें बळ वाढवायास जे मनाचे अशक्त आहेत त्यांस समाधान व साहाय्य करायास जे पडलेले त्यांस उभारायास आणि सैतान आमचे पायांखालीं तुडवायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

जोखमांत संकटांत अथवा अरिष्टांत जे आहेत त्यां सर्वांचें साहाय्य पुष्टीकरण आणि समाधान करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आह्मी तुला विनवितों

जे पायवाटेनें अथवा जळमार्गानें जातात ते व ज्या बायका प्रसूतिवेधनेंत आहेत त्या व रोगी मनुष्यें व लाहान बाळकें हीं सर्व रक्षायास आणि जे बंदीवान शत्रूनीं हाकून नेले आहेत त्यां सर्वांवर दया करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

बापपोरकीं पोरें व विधवा व सर्व जे अनाथ व पीडिलेले यांचें रक्षण व पोषण करायास त्वां मान्य असावें

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आह्मी तुला विनवितों

सर्व मनुष्यांवर दया करायास त्वां मान्य असावें

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

आमचे जे वैरी आहेत व जे आमचे पाठीस लागतात आणि जे आमची चहाडी करितात त्यांस क्षमा करायास व त्यांचें मन शुद्ध करायास तां मान्य असावें

ह्मणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

पृथ्वीचीं उपयोगी फळें आह्मीं सुसमयीं भोगावीं म्हणून तीं आम्हास द्यायास व आमचे उपयोगी राखायास तां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आह्मी तुला विनवितों

आमचे मनांत खरा पश्चात्ताप उत्पन्न करायास आमचे पातकी व अविचारयुक्त व अज्ञानयुक्त कर्मांची क्षमा करायास व आमचें आचरण तुझे पवित्र गोष्टीप्रमाणें शुद्ध व्हावें म्हणून आम्हास तुझे पवित्र आत्मोत्पन्न सत्गुण द्यायास तां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों

हे देवाचे पुत्रा आमचें ऐकावें म्हणून आम्ही तुला विनवितों

हे देवाचे पुत्रा आमचें ऐकावें म्हणून आम्ही तुला विनवितों

हे देवाचे बलि जो तूं जगाचें पापहरण करितोस तो तुझी शांति आम्हास दे

हे देवाचे बलि जो तूं जगाचें पापहरण करितोस तो आम्हावर दया कर

हे खिस्ता आमचें ऐक

हे खिस्ता आमचें ऐक



हे ईश्वरा आम्हावर दया कर

हे ईश्वरा आम्हावर दया कर

हे खिस्ता आम्हावर दया कर

हे खिस्ता आम्हावर दया कर

हे ईश्वरा आम्हावर दया कर

हे ईश्वरा आह्मावर दया कर

मग आचार्यानें व लोकांनीं मिळून प्रभूची प्रार्थना बोलावी

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास क्षमा कर आणि आम्हास परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आम्हाला तार आमेन

आचार्य ॥ हे ईश्वरा आमचे पापांप्रमाणें आह्मास करूं नको

उत्तर ॥ आमचे अन्यायांप्रमाणें आम्हास फल देऊं नको

## आम्ही प्रार्थना करूं

हे देवा दयालु बापा जो तूं अनुतापी हृदयाचा उच्छ्वास व शोकार्त्तांची इच्छा अव्हेरीत नाहींस तो तूं जेव्हां आम्ही संकटांत अथवा विपत्तींत पडून तुझी प्रार्थना करितों तेव्हां आमचें साहाय्य कर आणि सैतानाचे अथवा दुष्ट मनु

त्यांचे कपटानें जीं अरिष्टें आह्मासाठीं योजिलीं असतील तीं तुझे कृपाविशिष्ट शासनेंकडून नाहींशीं व्हावीं म्हणून कृपा करून आमचें ऐक अशासाठीं कीं आम्हास तुझे सेवकांस पाठलागाचा कांहीं उपद्रव न होऊन तुझे पवित्र मंडळींत आम्ही सर्वदा तुझी उपकारस्तुति करीत जावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे ईश्वरा तूं आपले नामाकरितां उठून आमचें साहाय्य व तारण कर

हे देवा आम्हीं आपले कानानीं ऐकिलें आणि जीं विख्यात कर्मे त्यांचे दिवसांत व त्यांचे पूर्वींचे काळांत त्वां केलीं तीं आमचे वडिलानीं आह्मास सांगीतलीं

हे ईश्वरा तूं आपले प्रतिष्ठेकरितां उठून आमचें साहाय्य व तारण कर

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

हे ख्रिस्ता आमचे वैऱ्यांपासून आम्हाला राख

तूं आमचे कष्ट कृपेनें पहा

आमचे मनांतील शोक दया करून पहा

तूं आपले लोकांचे पापांची दयाकरून क्षमा कर

आमच्या प्रार्थना प्रसादेंकरून व कृपेनें ऐक

हे दावीदाचे संताना आम्हावर दया कर

आतां व सर्वदा हे ख्रिस्ता आमचें ऐकायास मान्य ऐस



हे ख्रिस्ता कृपेनें आमचें ऐक हे प्रभो ख्रिस्ता कृपेनें आमचें ऐक

आचार्य॥ हे ईश्वरा तुझी दया आम्हावर प्रकट व्हावी

उत्तर॥ आम्ही तुजवर विश्वास ठेवितों म्हणून

आम्ही प्रार्थना करूं

हे बापा आह्मी तुला विनवितों कीं त्वां कृपेंकरून आमचे दोषोत्पादक गुण पहावे आणि जीं अरिष्टें आह्मास फार योग्य आहेत त्यांचें निवारण तूं आपले नामाचे गौरवासाठीं कर आणि आम्हीं आपले सर्व संकटांत तुझे कृपेवर विश्वास व भाव पूर्ण ठेवावे आणि पवित्र आचरणेंकडून सर्वदा तुझी सेवा करावी म्हणून आम्हास सत्गुण दे तुझें गौरव व्हावें ह्मणून आमचा एकच मध्यस्थ व प्रतिनिधि जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

ख्रुसोस्तोम साधूनें केलेली प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां कृपा करून आह्मास यासमयीं आपली प्रार्थना ऐकमत्येंकडून करूं दिली आहे आणि असें वचन दिलें आहे कीं जेव्हां दोघे तिघे जण माझे नामानें एकत्र मिळतील तेव्हां त्यांचे मागीतल्याप्रमाणें करीन आतां हे ईश्वरा तूं आपले सेवकांच्या विनंत्या व प्रार्थना ऐकून जसें त्यांचें हित होईल तसें त्यांला कर यालोकीं तुझे सत्याचें परिज्ञान आणि परलोकीं सनातन जीवन आह्मास देतांना आमेन

आमचे प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा व देवाची प्रीति व पवित्र आत्म्याचें सहायत्व आम्हा सर्वांजवळ सर्वदा असावें आमेन

विनंती समाप्त

---

## विविधप्रसंगांविषयींच्या प्रार्थना

पर्जन्याविषयींची प्रार्थना

हे देवा आकाशांतले बापा तुझें राज्य व त्याची पवित्रता पावायास जे झटतात त्यां सर्वांस शरीरपोषणासाठीं जें पाहिजे त्याचें वचन त्वां आपले पुत्र येशू ख्रिस्ताकडून दिलें आहे आह्मी तुला विनवितों कीं या आमचे संकटांत जेणेंकडून पृथ्वीवर फळें पिकून आम्हास मिळतील एवढा पाऊस पाठवून द्यावा आमचें समाधान व तुझें गौरव व्हावें म्हणून येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

उघाडीविषयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ ईश्वरा देवा ज्या त्वां मनुष्यांचे पापामुळें एकदां आठ जणांवांचून हें सर्व जग बुडविलें आणि त्यानंतर परम कृपेंकरून वचन दिलें कीं मी पुनः पाण्यानें जगाचा नाश करणार नाहीं जरीं आम्ही आपले पापामुळें पाण्यापावसाचा उपद्रव सोसायास योग्य आहों तरीं आम्ही खरा पश्चात्ताप केल्यावर जीणेंकडून पृथ्वीवर फळें पिकून सुसमयीं आम्हास मिळतील अशी उघाडीची हवा



द्यावी म्हणून आम्ही तुला विनवितों आणि तुझे दंडाकडून आम्हीं आपलें आचरण शुद्ध करायास शिकावें आणि क्षमेविषयीं तुझें स्तवन आणि गौरव करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

महागाईचे व दुकाळाचे समयींची प्रार्थना

हे देवा आकाशांतले बापा तुझे उदारत्वेंकरून पाऊस पडतो पृथ्वी फळें देत्ये पशु व गुरें वाढतात आणि मत्स्य बहुत उत्पन्न होतात त्वां कृपेंकडून आपले लोकांचे कष्ट पहावे म्हणून आम्ही तुला विनवितों आणि ज्या दुकाळानें व महागाईनें आम्ही आपले पापामुळें न्यायतः पीडिलों आहों ती दूर करून सुकाळ स्वस्थाई कृपेंकडून करावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याचे प्रीतीकरितां ज्या त्याला आणि तुला आणि पवित्र आत्म्याला पूर्ण आदर व गौरव आतां व सर्वदा असावें आमेन

अथवा ही प्रार्थना

हे देवा दयालु बापा एलीशा भविष्यवाद्याचे वेळीं समार्या देशांत जेव्हां फार दुकाळ महागाई होती तेव्हां ती दूर करून एकाएकीं त्वां सुकाळ स्वस्थाई केली जे आम्ही आपले पापामुळें तसेच आपदेंकडून पीडिलों आहों त्यां आम्हास सुसमयीं उपाय प्राप्त व्हावा म्हणून आम्हावर दया कर तूं आपले दिव्य आशीकडून पृथ्वीवर फळें वाढीव आणि आम्हीं तुझे उदार उपकार पावून जसें तुझें गौरव करी

यांचें साहाय्य आणि आमचें समाधान होईल तसा त्यांचा उपयोग करावा येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### लढाईचे व धुंदाईचे समयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा राजांचे राजा आणि जगाचे शास्त्या तुझे बळापुढें कोणाच्यानें उभें राहवत नाहीं पापी मनुष्यांला दंड लावणें आणि अनुतापी जनांवर कृपा करणें हा तुझाच अधिकार आहे तुला आम्ही नम्रपणें विनवितों कीं आम्हाला आमचे शत्रूंचे हातापासून मुक्त कर त्यांचा गर्व उतर त्यांचा द्रोह शांत कर त्यांच्या युक्ति मोडून व्यर्थ कर अशासाठीं कीं आह्मी तुझे वारणेंकडून सज्ज असून जो तूं मात्र विजयदाता आहेस त्या तुझें गौरव करायासाठीं आम्ही सर्व अरिष्टांपासून सर्वदा रक्षिले जावें तुझा एकुलता पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे पुण्याकरितां आमेन

### मरी व लोकांतील रोग यांचे समयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां रानामध्यें क्रोधेंकरून आपले लोकांत मरी पाठविली त्यानीं मोशे व अहरोनावर बंड केलें म्हणून आणि दावीद राजाचे वेळीं सत्तर हजार लोक मरीकडून मारविले पण दया स्मरून वरकडांस वांचविलें जे आम्ही आतां मरीरोगानें पीडिलों आहों त्यां आह्मां दीन पाप्यांवर दया कर आणि तेव्हां



त्वां प्रायश्चित्त मान्य करून मारक दूतानें पुढें दंड लावूं नये म्हणून जशी आज्ञा दिली तसा आतां हा उपद्रव व मरी आम्हापासून दूर करायास मान्य हो येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### आचार्यकर्मासाठीं जे दीक्षित होणार आहेत त्यांविषयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा आमचे आकाशांतील बापा ज्या त्वां आपल्यासाठीं आपले प्रिय पुत्राचे अमोल रक्तेंकडून सर्व मंडळी घेतली आहे तिजवर कृपादृष्टि कर आणि तुझे सेवक जे तुझे कळपाचे एपिस्कोपस व पाळक त्यांस यासमयीं एवढा विशेष बोध कर कीं त्यानीं विचार केल्यावांचून कोणाला दीक्षित करूं नये पण तुझे मंडळीचे पवित्र आचार्यकर्मांत सेवा करायासाठीं त्यानीं विश्वासूपणें व विवेकें करून योग्य जन निवडून घ्यावे आणि कोणत्याहि पवित्र कर्मासाठीं जे दीक्षित केले जातील त्यांस तूं आपला सत्व गुण व दिव्य आशी दे अशासाठीं कीं त्यानीं आपले आचरणानें व उपदेशेंकडून तुझें गौरव प्रकट करावें आणि सर्व मनुष्यांचें तारण होई असें साधावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### अथवा ही प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा सर्वसद्गुणदात्या ज्या त्वां आपले दिव्य विधानेंकरून आपले मंडळींत विविध पदव्या नेमिलेल्या आहेत त्या मंडळींतलें कोणतेंहि कर्म अथवा सेवा

करायास जे नेमिले जाणार आहेत त्यांस तूं आपला सत्व गुण दे म्हणून आह्मी तुला विनवितों आणि तूं आपले सत्य विद्येनें त्यांस असे पूर्ण कर व पवित्रतेनें असे संपन्न कर कीं जेणेंकरून तुझे थोर नामाचें गौरव व तुझे पवित्र मंडळीचें हित होईल अशे विश्वासूपणें तुझे देखतां त्यानीं सेवा करावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पुढले प्रार्थनांतील कोणते एके प्रार्थनेनंतर ही प्रार्थना केली तर बरें

हे देवा क्षमा आणि कृपा करणें हा सर्वदा तुझा स्वभाव व धर्मच आहे तर आमच्या नम्र प्रार्थना मान्य करून घे आणि आह्मी आपले पापांचे सांखळीनें जरीं बांधलों असलों तरीं तूं आपले परम कृपेचे कळवळ्यानें आह्मांस मोकळें करावें येशू ख्रिस्त आमचा मध्यस्थ व प्रतिनिधि याचे सन्मानाकरितां आमेन

राज्याधिकारी मंडळीविषयींची प्रार्थना

हे परमकृपाळो देवा या सर्व राज्याविषयीं आह्मी तुला विनंती करीत असतां जी राज्याधिकाऱ्यांची सभा आमचे परमधार्मिक कृपावंत राजाचे हाताखालीं जमली आहे तिज विषयीं विशेषेंकरून विनंती करितों त्यांचे विचार इतके सुनीत आणि सुहित होऊं दे कीं तुझें गौरव वाढावें तुझे मंडळीचें हित व्हावें व आमचे राजाचें व त्याचे राष्ट्राचें संरक्षण प्रतिष्ठा व कल्याण व्हावें आणि सर्व अर्थ त्यानीं



उत्तम व स्थिर आधारांवर असे निटावावे व ठरवावे कीं स्वास्थ्य व सुख सत्य व न्याय धर्म व भक्ति सर्व पिढ्यांपर्यंत आम्हामध्यें स्थापिलीं जावीं हे आणि जितके दुसरे अर्थ त्यांस आम्हास व तुझे सर्व मंडळीस प्राप्त व्हावे लागतात तितके आम्ही नम्रपणें मागतों येशू ख्रिस्त आमचा परम सुवंदित प्रभु व तारणारा याचे नामानें व मध्यस्थीकडून आमेन

सर्व विविध अवस्थांतील मनुष्यांविषयींची प्रार्थना

हे देवा सर्व मनुष्यांचे उत्पादका आणि पालका सर्व जातींचे व सर्व अवस्थांतले मनुष्यांविषयीं तुला आम्ही नम्रतेनें विनवितों कीं सर्व देशांतले लोकांस तुझा मार्ग व तुझें तारण कळवायास त्वां मान्य असावें विशेषेंकरून तुझे सार्वभौमिकमंडळीसाठीं आम्ही प्रार्थना करितों तुझे सदात्म्याकडून तिचें संबोधन आणि शासन असें करावें कीं जे ख्रिस्तीधर्म अंगीकारितात त्यां सर्वानीं सत्य मार्गांत वर्त्तून ऐकमत्य संमति व पवित्र आचरण राखून तुझे गोष्टीचा विश्वास धरावा जे कोणत्या एका प्रकारें मनांत देहांत अथवा स्थितींत दुःखी अथवा कष्टी आहेत त्यांजवर तुझी दया करुणा असावी ह्मणून आह्मी विनंती करितों त्यांजला दुःखांत सोसकपण आणि कष्टांत निभाव करून त्यांचे विविध अगत्यांप्रमाणें त्यांचें समाधान व साहाय्य करायास त्वां मान्य असावें हेंच येशू ख्रिस्ताकडून आम्ही मागतों आमेन

# उपकारस्तुति

## सामान्य उपकारस्तुति

हे सर्वसमर्थ देवा कृपालु बापा आम्हावर व सर्व मनुष्यांवर जी त्वां कृपा करुणा केली आहे तिजविषयीं आम्ही तुझे अयोग्य सेवक फार नम्रतेनें मनापासून तुझी उपकारस्तुति करितों त्वां आह्मास उत्पन्न केलें त्वां आम्हास रक्षिलें व पाळिलें आहे आणि या आयुष्याचे सर्व उत्तम अर्थ त्वां आह्मास दिले आहेत ह्मणून आम्ही तुझी स्तुति करितों पण विशेषेंकरून आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून जें जगाचें तारण झालें त्यांत जी तुझी अप्रमेय प्रीति प्रकट केली आहे तिजविषयीं आणि पवित्रतेचीं साधनें व गौरवाची आशा यांविषयीं आम्ही तुझी स्तुति करितों आणि तुला विनवितों कीं तुझे सर्व उपकारांचें स्मरण आह्मीं असें करावें कीं आमचे हृदयांत खरी कृतज्ञता सर्वदा असून आम्ही केवळ आपले ओंठानीं नव्हे पण आपले आचारानेंहि तुझी स्तुति करावी आयुष्य संपेपर्यंत तुझे सेवेंत असतांना व तुझे देखतां पवित्रतेनें व न्यायानें वर्त्ततांना येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें ज्या त्याला व तुला व पवित्र आत्म्याला सर्व आदर व गौरव सर्वदा असावें आमेन

## पर्जन्याविषयींची उपकारस्तुति

हे देवा आमचे आकाशांतले बापा मनुष्यांचे पोषणासाठीं पृथ्वीनें फळें द्यावीं ह्मणून तूं आपले कृपाविशिष्ट विधानें करून तिजवर पहिला आणि शेवटला पाऊस पाडितोस आम्ही नम्रपणें तुझी उपकारस्तुति अशामुळें करितों कीं जेव्हां तुझें क्षेत्र जळगलें गेलें तेव्हां आमचे मोठे संकटांत त्वां हर्षकारक पाऊस पाडून तें नवसरलें आहे आमचें तुझे अयोग्य सेवकांचें समाधान व तुझे पवित्र नामाचें गौरव व्हावें म्हणून आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून जी तुझी कृपा तिचे योगानें आमेन



## उघाडीविषयींची उपकारस्तुति

हे ईश्वरा देवा ज्या त्वां नुक्ते अतिवृष्टीचे उपद्रवेंकडून आह्मास दबावून सुसमयीं कृपा करून या उत्तम उघाडीकडून आमचें शांतिसमाधान केलें आहे या तुझे उपकारामुळें आह्मी आतां तुझी स्तुति व गौरव करितों आणि पुढें सर्व पिढ्यांपर्यंत नित्य तुझी कृपा वर्णीत जाऊं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

## स्वस्ताईविषयींची उपकारस्तुति

हे परम कृपाळो बापा ज्या त्वां प्रसन्नता कृपा करून आपले मंडळीच्या भक्तियुक्त प्रार्थना ऐकून आमचा दुकाळ महागाई दूर करून सुकाळ स्वस्ताई केली आहे या तुझे विशेष उपकारामुळें आम्ही नम्रपणें तुझी स्तुति करितों आणि तुला विनवितों कीं तुझी कृपा सर्वदा आम्हावर असावी अशासाठीं कीं तुझें गौरव आणि आमचें समाधान व्हावें आणि आमचे

भूमीनें आपलीं फळें आम्हास देत जावीं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

स्वास्थ्य व शत्रूंचें निवारण यांविषयींची उपकारस्तुति

हे सर्वसमर्थ देवा आपले सेवक शत्रूंपासून रक्षायासाठीं तूं त्यांला दुर्गरूप आहेस जीं मोठीं व स्पष्ट अरिष्टें आम्हाला लागणार होतीं त्यांपासून आह्मी मुक्त झालों आहों म्हणून तुझी स्तुति करून उपकार मानितों वैऱ्यांचे हातीं आम्ही आहार रूप सांपडलों नाहीं हें सर्व तुझे कृपेनेंच झालें असें आम्ही मान्य करितों आणि तुला विनवितों कीं सर्वदा आम्हावर तुझी अशी कृपा रहावी कीं तूं आमचा तारणारा व बलवान रक्षिणारा आहेस असें सर्व जगानें जाणावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

आपले देशांत स्वास्थ्य फिरून झालें याविषयींची उपकारस्तुति

हे सनातन देवा आमचे आकाशांतील बापा जो तूंच मनुष्यें एकचित्त एका घरांत राहात असें करितोस आणि उन्मत्त व स्वतंत्र लोकांची धुंदाई शांतवितोस जीं बंडें आम्हामध्यें नुकीं उत्पन्न होतीं तीं त्वां कृपा करून मोडिलीं आहेत म्हणून आम्ही तुझे पवित्र नामाचें सुवंदन करितों आणि तुला विनवितों कीं यापुढें तुझे पवित्र आज्ञांप्रमाणें आम्हीं मान्यतेंकडून वर्त्तावें म्हणून सर्वांला आम्हाला सत्वगुण दे आणि भक्तियुक्ततेंकडून शांत व लीन आचरण करून जे उपकार त्वां आम्हा



वर केले आहेत त्यांजमुळें आम्हीं तुला नित्य स्तुतीचें बलिदान अर्पावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

मरी अथवा लोकांतील रोग गेल्याविषयींची उपकारस्तुति

हे ईश्वरा देवा जो तूं नुक्ते भारी व भयंकर आपदेंकडून आमचे पापांमुळें आह्मास पीडीत व आमचे अपराधांमुळें नाशीत होतास पण आतां दंडाचे वेळेस त्वां दया स्मरून आमचे जीव मृत्यूचे मुखांतून मुक्त केले आहेत जीं आमचीं जीवात्मशरीरें त्वां तारिलीं आहेत तीं जीवंत बलिदानें व्हावयासाठीं आह्मी तुला अर्पितों आणि तुझे मंडळींत तुझे उपकारांचें स्तवन व वर्णन सर्वदा आम्ही करीत जाऊं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

अथवा ही उपकारस्तुति

हे परम कृपाळो बापा तुजसमोर आम्ही नम्रतेनें मान्य आहों कीं सर्व जे दंड तुझे नेमांत सांगीतले आहेत ते जर आम्हावर पडले असते तर न्याय झाला असता कांकीं आमचे अपराध बहुत व आमचे हृदयांचें कठीणपण फार झालें तथापि आमचा केवळ मंद आणि अयोग्य अनुताप केल्यावर नुक्ते ज्या मरीनें आम्ही पीडिलों होतों ती दूर करून आमचे वस्तींत आनंद व कुशल परत द्यायास तूं मान्य झाला आहेस म्हणून आम्ही उपकारस्तुतीचें बलिदान तुला अर्पितों आणि जें त्वां आमचें रक्षण व पाळण केलें आहे त्याविषयीं तुझे

गौरवी नामाचें स्तवन व वर्णन आह्मी करीत जाऊं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

समाप्त

# प्रार्थनासारांश पत्रें आणि सुवार्त्ता

जीं वर्षपर्यंत वाचायांचीं आहेत तीं

## आगमाचा पहिला आदित्यवार

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा आम्हीं अज्ञानाचीं कामें सोडून टाकावीं आणि ज्ञानाचें चिलखत अंगीं ल्यावें एतद्विषयीं आह्माला सत्व गुण दे तो आतांच या नश्वर आयुष्यामध्यें ज्या आयुर्मानातें आश्रयून तुझा पुत्र जो येशू ख्रिस्त परम नम्रतेनें आह्मामध्यें अवतरला अशासाठीं कीं तो जेव्हां शेवटले दिवसीं ईश्वरीप्र भावयुक्त होऊन जीवंत व मेलेले जे सर्व यांची न्यायाधीशी करायाला पुन: येईल तेव्हां आम्हीं जीवंत होऊन अमर असें उठावें जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आतां आणि सर्वदा आहे व राज्य करितो त्याचे योगानें आमेन

पत्र रोम. १३.८.

एकमेकांवर प्रीति करणें यावांचून तुम्हास कांहीं भरून द्यावें लागत नाहीं कां कीं जो दुसऱ्यावर प्रीति करितो त्यानें नेम पूर्ण केला आहे तर जारकर्म करूं नको हिंसा करूं नको चोरी करूं नको खोटी साक्ष देऊं नको लोभ धरूं नको अणखीं जर कांहीं दुसरी आज्ञा असेल तर तिचा सारांश हाच आहे कीं जशी तूं

आपल्यावर प्रीति करितोस तशी शेजाऱ्यावर कर प्रीति शेजाऱ्याचें कांहीं अनिष्ट करीत नाहीं तर प्रीति नेमाचें पूर्णकरणें आहे तर समय जाणून असेंच करीत जा कांकीं आह्माला जागें होण्याचा समय आतांच प्राप्त आहे कां तर पहिल्यानें आह्मीं विश्वास धरिला तेव्हांपेक्षां आतां आमचें तारण फारच जवळ आहे रात्रि थोडी उरली आणि दिवस जवळ आला आहे यास्तव आह्मीं अंधाराचीं कामें सोडून द्यावीं आणि उजेडाचें चिलखत अंगीं ल्यावें जसें दिवसास तसें आम्हीं सर्वदा उचिताप्रमाणें वर्त्तावें अतिभोजन मद्यपान व्यभिचार उन्मत्तता कलह हेवा यांत वर्त्तूं नये आणि प्रभु येशू ख्रिस्ताचा स्वभाव धरा केवळ इंद्रियें तर्पिण्याची चिंता वाहूं नका

सुवार्त्ता मात्थी २१. १.

जेव्हां येरूशालिमाजवळ आले आणि बेथफागे गांव जें जाइतांचे डोंगराकडेस आहे त्यास पोंहचले तेव्हां येशूनें दोघां शिष्यांस पाठवितांना सांगीतलें कीं तुम्ही समोरचे गावांत जातांच तेथें एक डांभलेली गाढवी आणि तिजसहवर्त्तमान शिंगरूं अशीं तुह्माला सांपडतील त्यांस सोडून मजपाशीं आणा जर तुह्माला कोणी कांहीं ह्मणालें तर त्यांची गरज प्रभूला आहे असें सांगा म्हणजे लागलाच तो त्यांस पाठवून देईल हें सर्व यासाठीं झालें कीं भविष्यवाद्यानें जें सांगितलें होतें त्याची प्रतीति यावी म्हणून जोयोनाचे कन्येला सांगा कीं पहा तुझा राजा तुजकडे येतो आहे तो लीन आणि गाढवावर ह्मणजे



ओझेल पशूचे शिंगरावर बसला आहे मग शिष्य गेले आणि जशी त्यांला येशूनें आज्ञा दिली होती तसें करून ती गाढवी व शिंगरूं दोन्हीं आणिलीं आणि त्यांजवर आपलीं चिरगुटें घालून त्यावर त्याला बसविलें नंतर बहुत लोकानीं आपलीं वस्त्रें मार्गांवर आंथरलीं कितिएकानीं झाडांच्या डाहळ्या तोडून वाटेवर पसरिल्या आणि जे समुदाय पुढें चालिले आणि जे मागें अनुसरले ते ओरडून बोलिले कीं दावीदाचे संतानाचा विजय असो जो ईश्वराचे नामानें येतो तो सुवंदित असो त्याचा परात्पर विजय असो मग तो येरूशालेमांत आल्यावर सारें नगर खळबळून बोलिलें कीं हा कोण आहे मग समुदा यानीं सांगीतलें कीं येशू भविष्यवादी जो गालीलांतले नाजरे थापासून आला तोच हा आहे नंतर येशूनें देवळांत जाऊन अवघे जे देवळांत विकायाला बसले होते व विकत घेत होते त्यांस घालवून दिलें आणि सराफांचीं मेजें व कबुतरें विकणा ऱ्यांचीं आसनें उलंडून टाकिलीं अणखीं त्यांला सांगीतलें कीं हें माझें घर प्रार्थनेचें घर ह्मटलें जाईल असें लिहिलें आहे पण तुह्मीं तेंच लुटाऱ्यांची गुहा केली आहे

## आगमाचा दुसरा आदित्यवार

### प्रार्थनासारांश

हे सुवंदित ईश्वरा आमचे हितोपदेशासाठीं जे त्वां सर्व पवित्र लेख लिहविलेले आहेत त्यां लेखांस आह्मीं असें ऐकावें वाचावें लक्षावें शिकावें व विचार करावा कीं सहिष्णुता आणि

तुझे पवित्र गोष्टींचा संबोध यांजकडून आह्मीं अनंत जीवनाची जी सदाशा आमचा तारणारा येशू ख्रिस्त याजकडून त्वां आह्मास देवविली आहे ती घ्यावी व सर्वदा धरावी आमेन

पत्र रोम १५.४.

जितक्या गोष्टी पूर्वीं लिहून ठेविल्या होत्या त्या आमचे हितोपदेशाकरितां लिहून ठेविल्या होत्या अशासाठीं कीं सहिष्णुता आणि लेखांचा संबोध यांजकडून आम्हीं आशा धरावी सहिष्णुता व संबोध यांचे देवानें असें तुह्माला द्यावें कीं येशू ख्रिस्ताप्रमाणें तुह्मी एकमेकांशीं एकचित्त असावें अशाकरितां कीं ऐकमत्यानें तुम्ही एकामुखेंकडून देवाचें म्हणजे आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे बापाचें गौरव करावें यास्तव तुम्ही एकमेकांस आपल्यांत घ्या जसें देवाचे गौरवाविषयीं ख्रिस्तानें आम्हाला आपल्यापाशीं घेतलें तसें अणखीं मी म्हणतों कीं येशू ख्रिस्त देवाचे सत्यतेसाठीं सुंतेखालीं झाला कीं जीं वचनें वडिलांस दिलीं होतीं तीं स्थिर करावीं आणि परदेशस्थ लोकानीं पावलेल्या कृपेविषयीं देवाचें गौरव करावें जसें लिहिलें आहे कीं यास्तव परदेशस्थ लोकामध्यें तुला अंगीकारीन आणि तुझें नाम गाईन अणखीं म्हणतो कीं अहो परदेशस्थ लोकानों त्याचे लोकांसहवर्त्तमान हर्ष करा अणखीं अहो सर्व परदेशस्थ लोकानों ईश्वराची स्तुति करा तुम्ही सर्व त्याची प्रशंसा करा अणखीं यशाया म्हणतो कीं इशा याचें मूळ होईल म्हणजे जो परदेशस्थ लोकांचें राज्य करायास उठून त्याजवर ते लोक



आशा ठेवितील तो तर आशेचा देव तुह्मी विश्वास धरितांना तुम्हाला सर्व आनंदानें आणि समाधानानें भरो यासाठीं कीं पवित्र आत्म्याचे शक्तीनें तुमची आशा परिपूर्ण असावी

सुवार्त्ता लूक. २१. २५.

तेव्हां सूर्य चंद्र आणि तारे यांत उत्पात होतील पृथ्वीवरहि विकल्पयुक्त लोकांचें संकट समुद्र लाटा गाजतांना जीं अरिष्टें पृथ्वीवर येताहेत त्यांची वाट पाहून मनुष्यें भयानें अचेतन होत्सातां कांकीं आकाशाचे अधिकार अस्थिर केले जातील तेव्हां मनुष्याचे पुत्राला आभाळांत महापराक्रमानें व गौरवानें युक्त असें येतां पाहातील या गोष्टी होऊं लागतांना तुह्मी अंग उभारून आपलीं डोचकीं उंचावा कां तर तुमचें तारण जवळ आलें आहे मग त्यानें एक दाखला सांगीतला कीं अंजीर आणि दुसरीं सर्व झाडें पहा जेव्हां त्यांस फुटवा फुटला आहे असें पाहतां तेव्हां आपले आपण तुह्मी समजतां कीं आतां उन्हाळा जवळ आहे याप्रमाणें जेव्हां त्या गोष्टी होतांना पाहाल तेव्हां जाणा कीं देवाचें राज्य जवळ आहे तुम्हाला मी खचीत सांगतों कीं त्या सगळ्या गोष्टी घडतपर्यंत ही पिढीच टळून जाणार नाहीं आकाश आणि पृथ्वी टळून जातील पण माझीं वचनें टळून जाणारच नाहींत

## आगमाचा तिसरा आदित्यवार

प्रार्थनासारांश

हे प्रभो येशू ख्रिस्ता ज्या त्वां आपले पहिले येण्या

समयीं आपला दूत तुझी वाट नीट सिद्ध करायास पाठविला त्याप्रमाणेंच तुझे रहस्याचे आचार्य व कारभारी यानीं अनाचारी लोकांचीं हृदयें न्यायी लोकांचे बुद्धींत आणून तुझी वाट अशी नीट आणि सिद्ध करावी कीं तूं जगाची न्यायाधीशी करावी म्हणून पुनः येशील तेव्हां तुझे दृष्टींत आह्मी योग्य आणि मान्य असावें जो तूं बाप आणि पवित्र आत्मा यांचे सहवर्त्तमान आहेस आणि राज्य करितोस तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

पत्र १ कोर. ४. १.

मनुष्यानें आम्हाला ख्रिस्ताचे सेवक आणि देवाचे रहस्याचे कारभारी असें मानावें अणखीं कारभाऱ्यांला असें लागतें कीं प्रत्येक विश्वासु असावा पण माझा न्याय तुम्हीं अथवा मनुष्यानीं केला असला तरीं ती गोष्ट मला हलकी आहे तथापि आपला न्याय मी करीत नाहीं कांकीं माझे ध्यानांत कांहीं कारण नाहीं माझा जो न्याय करितो तो ईश्वरच आहे तर प्रभु येई तोंपर्यंत उतावळीनें कांहीं ठरवूं नका तो अंधारांतल्या लपलेल्या गोष्टी उजेडांत काढून दाखवील आणि मनाचे संकल्प प्रकट करील तेव्हांच प्रत्येक देवापासून प्रशंसा पावेल

सुवार्त्ता मात्थी. ११. २.

तेव्हां योहान्नानें बंदीशाळेंत ख्रिस्ताचीं कामें ऐकून आपले शिष्यांतून दोघे पाठवून त्यास म्हटलें कीं जो यावयाचा आहे तो तूंच आहेस किंवा दुसरा त्याची वाट पाहूं येशू त्यांला उत्तर देतां बोलिला कीं जें जें पाहातां व ऐकतां तें तें तुह्मी जाऊन योहान्नाला बोलून दाखवा कीं आंधळे पाहातात लंगडे चालतात कोढी स्वच्छ केले जातात बहिरे ऐकतात मेलेले जीवंत केले जातात आणि गरीबांस सुवर्त्तमान सांगीतलें जातें तर मजविषयीं जो कोणी अडखळत नाहीं तो धन्य आहे ते शिष्य गेले असतां योहान्नाविषयीं येशू समुदायांस ह्मणूं लागला कीं तुम्ही काय पहायला रानांत निघून गेलां वाऱ्यानें हालिवलेले बोरू काय पण तुम्ही काय पहायासाठीं निघालेत मऊ चिरगुटें पांघरलेले माणसाला काय पहा जे मृदु वस्त्रें धारण करितात ते राजांचे घरांत असतात पण काय पहायला निघालेत भविष्यवाद्याला काय हां मी तुम्हाला सांगतों भविष्यवाद्यापेक्षां थोराला कांकीं हा तोच आहे ज्याविषयीं लिहिलें आहे कीं पहा मी आपला दूत तुझेपुढें पाठवितों जो तुझेसमोर तुझी वाट सिद्ध करील



## आगमाचा चौथा आदित्यवार

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा आम्ही तुला प्रार्थितों कीं तूं आपले शक्तीचें उत्तेजन करून आम्हामध्यें येऊन आमचें साहाय्य करावें अशासाठीं कीं आपली नेमलेली धांव धांवत असतां जेव्हां आमचीं पातकें आणि दुष्टपण यांकडून आम्ही फार अटकलेले आणि अडलेले आहों तेव्हां तुझे उदार कृपेनें

आणि दयेनें आमचें साहाय्य आणि तारण करावें जो तुझा पुत्र आमचा प्रभु त्याचे प्रायश्चित्तेंकरून ज्या त्याला तुझे आणि पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आदर आणि गौरव सर्वदा असावें आमेन

पत्र फिल ४. ४.

ईश्वराविषयीं सर्वदा आनंदित असा अणखीं म्हणतों आनंदित असा तुमची सुनीति सर्व मनुष्यांला कळो प्रभु जवळच आहे कोणत्याहि गोष्टीची अति चिंता करूं नका पण प्रत्येक दशेंत उपकारस्तुतीचे सहवर्त्तमान प्रार्थना व विनंती यांकडून तुम्ही आपल्या इच्छा देवाला जाणवाव्या मग जें देवाचें समाधान नुस्ते बुद्धीनें समजायाचें नाहीं ते तुमचीं हृदयें व तुमच्या मनोवृत्ति ख्रिस्त येशूकडे अखंडित राखील

सुवार्त्ता योहान्न १. २९.

ही योहान्नाची साक्ष आहे जेव्हां यहूद्यानीं येरूशाले माहून आचार्य आणि लेवी पाठवून त्याला विचारिलें कीं तूं कोण आहेस तेव्हां त्यानें अंगीकारिलें नाकारिलें नाहीं पण अंगीकारिलें कीं मी ख्रिस्त नाहीं मग त्यानीं त्याला विचारिलें तर तूं काय एलीया आहेस तो बोलिला मी नव्हें तो भविष्यवादी तूं आहेस त्यानें उत्तर केलें कीं नाहीं नंतर ते त्याला म्हणाले आम्हास ज्यानीं धाडलें यांला आम्हीं उत्तर द्यावें म्हणून तूं कोण आहेस तूं आपणाविषयीं काय म्हणतोस त्यानें ह्मटलें ज्याविषयीं यशाय



भविष्यवाद्यानें सांगीतलें कीं गाजून बोलणाऱ्याची वाणी रानांत कीं प्रभूची वाट नीट करा तोच मी आहें जे पाठविले होते ते फारीशी होते नंतर त्यानीं त्याला विचारून म्हटलें जर तूं ख्रिस्त किंवा एलीया किंवा तो भविष्यवादी नाहींस तर बाप्तिस्मा कां करितोस योहान्न त्यांला उत्तर करून बोलिला मी पाण्यानें बाप्तिस्मा करितों खरें पण ज्याला तुह्मी जाणत नाहीं असा तुह्मामध्यें एक उभा आहे तोच आहे जो माझे मागून आला तो तर माझे पूर्वीं होता ज्याचे वाहणाचे खोटवाद सोडायाला मी योग्य नाहीं यार्देनाचे पलीकडचे बेथाबाऱ्यांत जेथें योहान्न बाप्तिस्मा करीत होता तेथें ह्या गोष्टी झाल्या

## आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आम्हाला आपला एकुलता पुत्र मनुष्यावतार घ्यावयास आणि या समयानुसार पवित्र कुमारीपासून जन्मावयास दिला आहे याकडून आम्ही नवा स्वभाव पावून व आदत्तपुत्रत्व आणि कृपा यांकडून तुझीं लेंकरें होऊन तुझे पवित्र आत्म्याकडून नित्य उत्तरोत्तर पुण्यवान केले जावे त्याच आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून जो तुझे व त्याच पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

पत्र इब्री १. १.

जो देव विविध भागें व नाना प्रकारें भविष्यवाद्यांकडून पूर्वीं वडिलांस बोलत असे तो यां शेवटल्यांदिवसांत आह्मास पुत्राकडून बोलिला आहे जो विश्वाचा विभागी असा त्यानें नेमिलेला आहे ज्याकडूनहि त्यानें जग उत्पन्न केलें जो त्याचे गौरवाचा प्रकाश आणि त्याचे सत्वांचें प्रतिबिंब असतां विश्वहि आपले शक्तीनें वागवीत असतां आपल्याकडून आमचें पाप हरण करून वरतीं महिम्याचे उजवेकडेस बसला आहे दूतांचे नामापेक्षां जेवढें अधिक श्रेष्ठ नाम त्यानें विभागें घेतलें आहे तेवढा तो त्यांजपेक्षां अधिक श्रेष्ठ आहे कां तर दूतांतले कोणत्याला कधींहि त्यानें म्हटलें कीं तूं माझा पुत्र आहेस आज तुला म्यां जन्म दिला आहे अणखीं मी त्याचा बाप होईन आणि माझा तो पुत्र होईल पुन: त्यानें आपला प्रथम जात पृथ्वींत आणून ह्मटलें कीं देवाचें सर्व दूत त्याला भजोत दूतांविषयींहि सांगतो कीं तो आपले दूत आत्मे करितो आणि अग्निज्वाला आपले सेवक करितो पण पुत्राला म्हणतो कीं हे देवा तुझें सिंहासन सनातन आहे तुझा राजदंड न्यायदंडच आहे तूं न्यायाची आवड करीस आणि अन्यायाचा द्वेष धरीस यास्तव देव तुझा देव यानें तुझे सहायांपेक्षां हर्षाच्या अभ्यंजनेंकरून तुजला अभिषिक्त केलें आहे अणखीं हे ईश्वरा त्वां पहिल्यानें पृथिवीचा पाया घातला आकाश मंडलें हीं तुझे हातचीं कृत्यें आहेत तीं नाहींशीं होतील तूं तर नित्य आहेस तीं सर्व वस्त्रावाणीं जुनीं होतील व तूं तीं पांघरुणासारिखीं गुंडाळिशील आणि तीं बदललीं जातील पण तूं आहेस तोच आहेस आणि तुझा वेळ संपणार नाहीं



सुवार्त्ता योहान्न १. १.

प्रारंभीं तो शब्द होता आणि तो शब्द देवापाशीं होता आणि तो शब्द देवच होता तो प्रारंभीं देवापाशीं होता विश्व त्यानें उत्पन्न केलें आणि जें कांहीं उत्पन्न केलें आहे तें त्यावांचून कोणी उत्पन्न केलें नव्हतें त्यांतच जीवन असे तें जीवनहि मनुष्यांचा उजेड असे तो उजेड अंधारांत प्रकाशत असे पण अंधार त्याला अंगीकारीना देवानें एक मनुष्य पाठविला होता त्याचें नाम योहान्न तो साक्षीसाठीं आला कीं उजेडाविषयीं साक्ष देऊन सर्वांनीं त्याकडून विश्वास धरावा तोच तो उजेड नव्हता पण त्या उजेडाविषयीं साक्ष द्यावयास आला तो खरा उजेडच तो असे जो प्रत्येक जगांत आलेल्या मनुष्याला प्रकाशित असतो तो जगांत होता जगहि त्यानें उत्पन्न केलें तरीं जगानें त्याला जाणिलें नाहीं तो आपल्यांत आला पण आपल्यानीं त्याला मान्य केलें नाहीं पण जितक्यानीं त्याला घेतलें म्हणजे ज्यानीं त्याचे नावावर विश्वास ठेविला त्यांस त्यानें देवाचीं लेंकरें होण्याचा अधिकार दिला जे रक्तापासून किंवा देहेच्छेपासून किंवा मनुष्येच्छेपासून नाहींत पण देवापासून जन्मविले होते तो शब्द तर देहयुक्त झाला आणि आम्हामध्यें

त्यानें वस्ती केली तो कृपेनें व सत्यानें पूर्ण असतां आम्हीं त्याचें गौरव जसें बापाचे एकूलत्याचें गौरव तसें पाहिलें असे

## स्तेफानस साधु याचा दिवस

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा तुझे सत्याविषयीं साक्ष द्यावयासाठीं जे कष्ट आह्माला सोसावे लागते त्यांमध्यें आम्हीं वरतीं आकाशाकडे पाहून स्थैर्यें विश्वासानें प्रकट व्हावयाचें गौरव पहावें मग पवित्र आत्म्यानें आम्ही भरलों असतां आपले शत्रूंची प्रीति व त्यांविषयींची प्रार्थना करायला शिकावें तुझा जो प्रथम साक्षी स्तेफानस साधु त्यावाणीं ज्यानें आपले हत्याकरणारां विषयीं तुझी हे सुवंदित येशू प्रार्थना केली जो तूं जे सगळे तुझेमुळें कष्ट सोशितात त्यांचें साहाय्य करायला देवाचे उजवे हातास आमचा मध्यस्थ व प्रतिनिधि उभा राहतोस आमेन

पत्राचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत ७. ५५.

मग स्तेफानस पवित्र आत्म्यानें भरला असतां त्यानें आकाशाकडे दृष्टि लावून देवाचे गौरवाला आणि येशूला देवाचे उजवेकडेस उभें राहतां पाहिलें आणि म्हटलें कीं पहा मी आकाशाला उघडतां व मनुष्याचे पुत्राला देवाचे उजवेकडे उभें राहातां पाहातों तेव्हां ते मोठ्यानें ओरडून आपले कान बंद करून एक चित्तेंकरून त्याजवर धांवत सुटले आणि त्यानीं त्याला नगराबाहेर घालवून दगडमार केला आणि साक्ष्यानीं आपलीं वस्त्रें एक तरुण शाऊल नामा याचे



पायांपाशीं ठेविलीं मग स्तेफानस प्रार्थना करितां आणि बोलतां कीं हे प्रभो येशू माझा जीवात्मा घे तेव्हां त्यानीं त्याला दगडमार केला आणि तो गुडघे टेंकून मोठ्यानें ओरडून बोलिला कीं हे ईश्वरा हें पातक त्यांजकडे मांडून ठेवूं नको असें बोलून झोपेंत पडला

सुवार्त्ता मात्थी. २३. ३४.

पहा तुह्माकरितां भविष्यवादी व ज्ञानी व लेखक यांस पाठवितों आणि तुम्ही त्यांतले कित्येकांस जिवें माराल आणि क्रूसावर बसवाल व त्यांतले कित्येकांस तुम्हीं आपल्या सभांत फटके माराल व नगरी नगर त्यांचा पाठलाग कराल अशासाठीं कीं न्यायी हाबेलाचे रक्तापासून बाराख्याचा पुत्र जो जाखार्या याचे रक्तापर्यंत ज्याची हत्या वेदी आणि देऊळ यांमध्यें तुम्हीं केली सगळें जें न्यायी जनाचें रक्त पृथ्वीवर सांडलें गेलें आहे तें तुम्हावर यावें मी तुम्हाला खचित सांगतों कीं तें सगळें यापिढीवर येईल हे येरूशालेमा येरूशालेमा जें तूं भविष्यवाद्यांस जिवें मारितोस व तुला जे पाठविलेले त्यांला दगडमार करितोस जशीं कोंबडी आपले पांखांखालीं आपलीं पिलें जमवून घेत असत्ये तशीं तुझीं लेंकरें जमवून घ्यायास कितीदां म्यां इच्छिलें आहे पण तुह्मीं इच्छिलें नाहीं पहा तुमचें घर तुम्हाला ओसाड सोडिलें आहे कारण कीं मी तुम्हाला सांगतों जो ईश्वराचे नामानें येतो तो सुवंदित असो म्हणून बोलाल तोंपर्यंत आजपासून मला तुम्ही पाहणार नाहीं

## योहान्न साधु जो सुवार्त्ता लेखक त्याचा दिवस

प्रार्थनासारांश

हे कृपालु ईश्वरा तुझे प्रकाशाचे तेजस्वी किरण तुझे मंडळीवर पाडावे म्हणून आम्ही तुला विनवितों अशासाठीं कीं ती तुझा सुवार्त्तिक व पवित्र प्रेषित जो योहान्न साधु याचे हितोपदेशानें प्रकाशित झाली असतां अशी तुझे सत्याचे उजेडांत वर्त्तावी कीं शेवटीं अनंत जीवनाचा उजेड पावेल येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र पहिलें योहान्न १. १.

जें पहिल्यापासून असें जें आम्हीं ऐकिलें व आम्हीं आपले डोळ्यानीं ज्याला पाहिलें व निरेखिलें ज्याला आमचे हातानीं चांपिलें आहे त्या जीवनाचे शब्दाविषयीं (तर तें जीवन प्रकट केलें होतें आणि आम्हीं पाहिलें आहे व साक्ष देतों व जें सनातन जीवन बापापाशीं असे आणि आम्हास प्रकट केलें होतें तें आम्ही तुम्हाला सांगून दाखवितों) जें आम्हीं पाहिलें व ऐकिलें तेंच तुम्हाला आम्ही सांगून दाखवितों अशासाठीं कीं तुम्हीं आमचें सहायत्व पावावें कां तर आमचें सहायत्व बाप आणि त्याचा पुत्र येशू ख्रिस्त यांपाशीं आहे तर तुमचा आनंद पूर्ण व्हावा म्हणून या गोष्टी तुम्हाला आह्मी लिहितों आणि जो प्रवाद त्यापासून आम्हीं ऐकिला आहे तो तुम्हाला सांगतों तो हाच आहे कीं देव उजेडच आहे आणि त्यांत कांहींच अंधार नाहीं आम्ही अंधारांत वर्त्तत असून



जर बोलतों कीं आमचें त्याचें सहायत्व आहे तर खोटें बोलतों आणि सत्य करीत नाहीं पण जसा तो उजेडांत आहे तसे आम्ही जर उजेडांत वर्त्ततां तर आमचें परस्परांचें सहायत्व आहे व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याचें रक्त आम्हास सर्व पापापासून शुद्ध करितें जर आह्मी म्हणतों कीं आह्माला पाप नाहीं तर आम्ही आपणास फसवितों आणि आम्हामध्यें सत्य नाहीं जर आम्ही आपलीं पापें अंगीकारूं तर तो आमचे पापांची क्षमा करायास आणि सर्व अन्यायापासून आम्हास शुद्ध करायास विश्वासु व न्यायी आहे जर आम्ही ह्मणूं कीं आम्हीं पाप केलें नाहीं तर आम्ही त्याला लटकासा करितों आणि त्याची गोष्ट आमचे ठायीं नाहीं

सुवार्त्ता योहान्न २१. १९.

येशूनें पेत्रसाला म्हटलें कीं माझे मागें ये तेव्हां पेत्रस मागें वळून जो शिष्य येशूला आवडत असे त्याला येतां पाहतो म्हणजे तो जो रात्रौ भोजनास येशूचे उराशीं टेंकून त्यास ह्मणाला कीं हे प्रभो तुझा सूचक कोण आहे त्याजला पाहून पेत्रस येशूला ह्मणतो कीं हाहि काय होईल येशू त्यास ह्मणतो कीं मी येई तोंपर्यंत तो रहावा असा माझा मनोदय असला तर तुला काय तूं ये माझे मागें यावरून ही गोष्ट भाव्वांमध्यें निघाली कीं तो शिष्य मरणार नाहीं तथापि येशूनें त्यास सांगीतलें नव्हतें कीं तो मरणार नाहीं पण मी येई तोंपर्यंत तो रहावा असा माझा मनोदय असला तर तुला काय इतकें ह्मटलें होतें या गोष्टींविषयीं जो शिष्य साक्ष

देतो ज्यानेंहि यागोष्टी लिहिल्या आहेत तोच हा आहे आणि आम्ही जाणतों कीं त्याची साक्ष खरी आहे अणखीं दुसरीं बहुत कामें येशूनें केलीं होतीं तीं सर्व जर लिहून ठेविलीं असतीं तर मला वाटतें कीं या जगांतहि लिहिलेलीं पुस्तकें मावणार नाहींत

## निर्दोषी यांचा दिवस

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां बाळकें आणि तान्हीं बाळकें यांचे तोंडून सामर्थ्य ठरविलें आहे व बाळकांकरवें त्यांचे मरणाकडून तुझें गौरव करविलें आहे आमचे अंगीं जे सर्व दोष आहेत ते तूं मारून टाक आणि तूं आपले सत्वगुणानें आह्माला एवढें समर्थ कर कीं आमचें निर्दोष आचरण आणि आमचा स्थिर विश्वास यांहींकडून मरेपर्यंत आम्हीं तुझे पवित्र नामाचें गौरव करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याचे योगानें आमेन

पत्र प्रकटविणें १४. १.

तेव्हां मी पाहिलें आणि पहा जीयोन डोंगरावर एक कोंकरूं उभें होतें आणि त्यापाशीं एकलक्ष चौवेताळीस हजार ज्यां त्यांचे कपाळावर त्याचे बापाचें नाम लिहिलें होतें मग आकाशांतील शब्द जसा मोठे पाण्याचा शब्द आणि मोठे मेघगर्जनेचा शब्द मी ऐकिला आणि वाजंत्री आपलीं वाजंत्रें वाजवितांना त्यांचा शब्द मी ऐकिला आणि



सिंहासनासमोर व ते चार जीव आणि ते चार वडील यांसमोर नवें गीत गातात पण ते एकलक्ष चौवेताळीस हजार जे पृथ्वीवरून तारिले गेले होते त्यांवांचून कोणा च्यानें तें गीत शिकवत नाहीं जे बायकांशीं न बाटतां कुमार राहिले ते हेच आहेत जे तें कोंकरूं जेथें कोठें जाई तिकडे अनुसरत ते हेच आहेत हेच मनुष्यांमधून तारिले गेले असतां देवाला व त्या कोंकराला प्रथमफलार्पण आहेत आणि त्यांचे वाणींत कांहीं कपट सांपडेना कां ते देवाचे सिंहासनासमोर निर्दोष आहेत

सुवार्त्ता मात्थी २. १३.

ईश्वराचा दूत योसेफाला स्वप्नांत दृष्टीस पडून ह्मणाला तूं उठून बाळक आणि त्याची आई यांस घेऊन मिसर देशांत पळून जा आणि तुला मी सांगेन तोंपर्यंत तिथें रहा कांकीं त्या बाळकाचा नाश करायासाठीं हेरोद त्याला शोधणार आहे मग तो उठून रात्रीं बाळक आणि त्याची आई यांस घेऊन मिसर देशांत निघून गेला आणि हेरोद मरे तोंपर्यंत तिथें होता अशासाठीं कीं ईश्वरानें जें भविष्यवाद्याकडून सांगीतलें होतें तें प्रत्ययास यावें कीं मी आपले पुत्राला मिसरांतून बोलाविलें आहे नंतर त्यां ज्ञानी मनुष्यानीं माझा उपहास केला आहे असें हेरोदाला वाटून तो फार रागें भरला नंतर शिपाई पाठवून जी वेळ त्यानें ज्ञान्यांपासून नीट समजून घेतली होती तदनुसार बेथले

हेमांत व त्याचे आसपास जे दोनवर्षांचे बाळक व त्यांहून धाकटे होते त्यांस मारून टाकिलें तेव्हां इर्मिया भविष्यवा द्यानें जें सांगीतलें होतें तें प्रत्ययास आलें कीं रामेंत गोंगाट ऐकिला आहे म्हणजे शोक आणि रडणें व मोठा आकांत राहेल आपले लेंकरांसाठीं रडती आहे तीं नाहींत ह्मणून ती समजूत घेत नाहीं

## ख्रिस्ताचे जन्मदिवसानंतर जो आदित्यवार तो

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आम्हाला आपला एकुलता पुत्र मनुष्यावतार घ्यावयास आणि या समयानुसार पवित्र कुमारीपासून जन्मावयास दिला आहे याकडून आम्ही नवा स्वभाव पावून आदत्तपुत्रत्व आणि कृपा यांकडून तुझीं लेंकरें होऊन तुझे पवित्र आत्म्याकडून नित्य उत्तरोत्तर पुण्यवान केले जावे त्याच आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून जो तुझे व त्याच पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन

### पत्र गाल. ४. १.

तर मी म्हणतों कीं कुलपति जोंपर्यंत लाहान आहे तोंपर्यंत जरीं तो सर्वांचा धनी असला तरीं तो सेवकांहून विशेष नाहीं पण बापानें नेमिलेले वेळेपर्यंत पालक व कारभारी यांचे हाताखालीं तो असतो याप्रमाणें आम्ही



लाहान होतों तेव्हां जगाचे प्रथम विद्येखालतीं सेवक ठेविलेले होतों पण वेळ पूर्ण झाला तेव्हां स्त्रीपासून जन्मलेला आणि नेमाखालीं ठेविलेला आपला पुत्र देवानें पाठवून दिला अशाकरितां कीं जे नेमाखालीं होते त्यांस खंडणी देऊन परत घ्यावें आणि आम्हास आदत्तपुत्रता मिळावी तुह्मी तर पुत्र आहां म्हणून देवानें तुमचे हृदयांत आपले पुत्राचा आत्मा आब्बा म्हणजे हे बापा बोलतां पाठवून दिला आहे यास्तव याउपर तूं सेवक नाहींस पण पुत्र झालास आणि पुत्र असलास तर ख्रिस्ताकडून देवाचा कुलपति आहेस

### सुवार्त्ता मात्थी १. १८.

येशू ख्रिस्ताचा जन्म याप्रकारें झाला कीं त्याची आई जी मारया तिची योसेफाशीं मागणी झाली असतां त्यां उभयतांची संगति झाल्याचे पूर्वीं ती पवित्र आत्म्याकडून गरोदर झाली तेव्हां तिचा नवरा योसेफ सात्विक असतां आणि तिची फजीती करायास त्याला बरें वाटत नसतां तिला गुप्तरूपेंकरून सोडायाचा संकल्प करीत होता यां गोष्टींविषयीं तो विचार करीत असतां पहा प्रभूचे दूतानें स्वप्नांत त्याचे दृष्टीस पडून सांगीतलें कीं हे योसेफा दावीदाचे संताना तुझी बायको मारया इला आपलेपाशीं घ्यावयास भिऊं नको कांकीं जें तिचे ठायीं उत्पन्न झालें आहे तें पवित्र आत्म्याकडून आहे ती पुत्र प्रसवेल मग तूं त्याचें नाम येशू ठेविशील कां तर तो आपले लोकास

त्यांचे पापापासून तारील हें अवघें अशासाठीं झालें कीं ईश्वरानें जें भविष्यवाद्यांकडून सांगीतलें होतें तें प्रत्ययास यावें पहा कीं कुमारी गरोदर होईल आणि पुत्र प्रसवेल आणि त्याचें नाम इम्मानूएल ह्मणजे आह्मासहवर्त्तमान देव असें म्हणतील नंतर योसेफ झोपेंतून उठून ईश्वराचे दूतानें जशी त्यास आज्ञा दिली होती तसें करून आपले बायकोला त्यानें मान्य करून घेतलें पण ती आपला प्रथम झालेला पुत्र प्रसवेपर्यंत त्यानें तिला जाणिलें नाहीं नंतर त्यानें त्याचें नाम येशू ठेविलें

## ख्रिस्ताची सुंता

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां मनुष्यांकरितां आपला सुवंदित पुत्र सुंतेचा आणि नेमाखालचा होई असें केलें आम्हास आत्म्याची खरी सुंता दे अशासाठीं कीं आमचीं हृदयें आणि सर्व इंद्रियें सर्व संसारसंबंधी व इंद्रियसंबंधी इच्छांपासून शुद्ध केलीं असतां आह्मीं तुझे चांगले मनोरथाप्रमाणें वर्त्तावें तोच तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र राम. ४. ८.

ज्या माणसाला देव दोष ठेवणार नाहीं तोच धन्य आहे तर ही धन्यता सुंतेच्यांला मात्र होती किंवा ज्यांची सुंता झाली नाहीं त्यांलाहि होती काय आम्ही तर



म्हणतों कीं विश्वास तो आब्रहामाला यथार्थपण असा मोजिलेला होता तर कशानें मोजिलेला होता सुंतेचा असतां किंवा सुंतेचा नसतां सुंतेचा असतां तर नव्हता पण सुंतेचा नसतां तेव्हां तोहि सुंतेचा नसतां सुंतेची खूण त्यानें घेतली म्हणजे विश्वासेंकडून जें यथार्थपण होतें त्याची मुद्रा अशासाठीं कीं सुंतेचे नसतांहि जे सर्व विश्वास धरितात त्यांचा बाप तो असावा आणि त्यांलाहि यथार्थपण मानावें आणि जे सुंतेचे आहेत त्यांला मात्र असें नसो पण सुंतेचे नसतांहि आमचा पिता आब्राहाम याचे विश्वासाचे पावलांत जे चालतात त्यांचाहि तो पिता असावा कांकीं आब्राहामाला किंवा त्याचे संततीला जगाचा कुलपति होण्याचें वचन नियमेंकडून नव्हतें पण विश्वासाचे यथार्थपणाकडून होतें कांकीं नेमाखालचे जर कुलपति होतात तर विश्वास व्यर्थ झाला आहे आणि वचन निरर्थक झालें आहे

### सुवार्त्ता लूक. २. १५.

तेव्हां असें झालें कीं त्यांपासून दूत आकाशांत गेल्यावर ते मेंढक्ये मनुष्य एकमेकांस बोलिले कीं आपण बेथलेहेमापावेतों जाऊं आणि जी गोष्ट झाली आहे जी ईश्वरानें आपल्याला कळविली आहे ती पाहूं मग ते लौकर येऊन मारया व योसेफ आणि बाळक जें गव्हाणींत निजत होतें तीं प्राप्त झालीं तें पाहून त्यांला या बालकाविषयीं जी गोष्ट सांगीतली होती तिचा निश्चय झाला आणि सर्व

जे ऐकत होते त्यांस त्यां मेंढक्यानीं ज्या गोष्टी सांगीतल्या त्यांविषयीं ते विस्मित झाले पण मारयेनें ह्या सगळ्या गोष्टी आपले मनांत विचार करून ठेविल्या तेव्हां मेंढक्ये जसें त्यांला सांगीतलें होतें तसें ज्या गोष्टी त्यानीं ऐकिल्या व पाहिल्या यांविषयीं देवाचें गौरव आणि स्तुति करीत परत गेले नंतर बाळकाची सुंता करायाची वेळ म्हणजे आठ दिवस झाले तेव्हां त्याचें नाम येशू ठेविलें गेलें जसें तो पोटांत गर्भ झाल्याचे पूर्वीं दूतानें ठेविलें होतें तसें

## परदेशस्थांस ख्रिस्ताचा प्रादुर्भाव

### प्रार्थनासारांश

हे देवा ज्या त्वां ताऱ्याकडून मार्ग दाखवून आपला एकुलता पुत्र परदेशस्थ लोकांस प्रकट करून दिला जे आम्ही आतां तुला विश्वासेंकरून जाणतों त्यां आम्हास कृपा करून परलोकीं तुझे गौरवी देवत्वाचा संभोग पावूं दे येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र एफेस. ३. १.

यास्तव मी पाऊलस जो तुम्हा परदेशस्थ लोकांमुळें ख्रिस्ताचा बंदीवान आहें देवाचे कृपेचा जो विधि तुम्हा करितां मला दिला आहे तो जर तुह्मी ऐकिला कीं दिव्यसूचनेंकरून मला त्यानें हें रहस्य कळविलें (जसें म्यां पूर्वीं थोडक्यांत लिहिलें ज्यावरून ख्रिस्ताचे रहस्याविषयीं



माझा समज कसा आहे हा तुम्ही वाचून जाणाल) जें दुसरे पिढींत मनुष्यांस तसें कळविलें नव्हतें जसें आतां त्याचे पवित्र प्रेषितांस आणि उपदेशकांस आत्म्यानें प्रकट केलें आहे कीं परदेशस्थ लोक समान विभागाचे व समान मंडळीचे आणि ख्रिस्ताविषयींचें जें त्याचें वचन याचे समान विभागी सुवार्त्तेकडून होतील जिचा आचार्य मी झालों आहें देवाचे कृपादानाप्रमाणें जें त्याचे बलवान शक्त्यनुसार मला दिलें आहे जो मी सर्व पुण्यवानांमध्यें जे अगदीं लाहान त्यांच्याहून फारच लाहान आहें त्या मला हीच कृपा दिली आहे कीं म्यां परदेशस्थ लोकांमध्यें ख्रिस्ताचें असमीक्ष्य धन सांगून दाखवावें आणि देव ज्यानें ख्रिस्ता करवें विश्व उत्पन्न केलें यांत जें रहस्य बहुत पिढ्यांहून गुप्त होतें त्याचें सहायत्व सर्वांला प्रकट करावें अशासाठीं कीं आकाशांतील आधिपत्यें व अधिकार यांला मंडळी कडून देवाचें बहुविध ज्ञान कळवावें त्याचे अनादिसंकल्पानुसार जो त्यानें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याविषयीं केला होता ज्या त्याकडून त्याजवरील विश्वासेंकडून आम्हाला धीरता आणि सधैर्यआगमन हीं होतात

### सुवार्त्ता मात्थी २ १.

हेरोद राजाचे दिवसांत यहूद देशांतील बेथलेहेमांत येशू जन्मला असतां पहा पूर्वेकडून ज्ञानी मनुष्य येरूशाले मास येऊन बोलिले कीं जो यहूद्यांचा राजा जन्मला आहे तो कोठें आहे त्याचा तारा आह्मी पूर्वेमध्यें पाहून त्याचे पायां

पडायास आलों आहों तेव्हां हेरोद राजा असें ऐकून क्षोभला आणि त्याजसहवर्त्तमान सगळें येरूशालेम क्षोभलें नंतर त्यानें सर्व मुख्य आचार्य आणि लोकांतले लेखक यांस मेळवून त्यांजपाशीं विचारिलें कीं ख्रिस्त कोठें जन्मेल त्यानीं सांगीतलें कीं यहूद्याचे बेथलेहेमांत कांकीं भविष्यवाद्यानें असें लिहिलें आहे कीं हे यहूद देशांतले बेथलेहेमा यहूद्याचे अधिष्ठानामध्यें तूं अगदीं लहान केवळ नाहींस कांकीं तुझ्यांतून एक अधिपति येईल तो माझे इस्राएल लोकांचें पालन करील नंतर हेरोदानें त्यां ज्ञान्यांस गुप्तरूपें बलावून त्यांपासून तारा दिसण्याची वेळ नीट समजून घेतली आणि त्यांजला बेथलेहेमास पाठवितां म्हटलें कीं तुम्ही जाऊन बालकाचा पक्का शोध लावा आणि तो तुम्हाला सांपडेल तेव्हां मला सांगा अशाकरितां कीं मीहि येऊन त्याचे पायां पडेन मग ते राजाचें ऐकून निघाले तेव्हां पहा जो तारा त्यानीं पूर्वेस पाहिला होता तो त्यांचे पुढें गेला आणि जेथें तो बालक होता तेथपर्यंत येऊन वरतीं राहिला तेव्हां ते तो तारा पाहून अत्यंत आनंद पावले आणि घरांत गेले तों तो बालक त्याची आई जी मारया तिजपाशीं त्यानीं पाहिला नंतर पायां पडून त्यास भजलें आणि आपलीं गांठोडीं सोडून त्याला सोनें ऊद बोळ अशीं दानें अर्पण केलीं नंतर हेरोदाकडेस पुनः न जावें अशी सूचना स्वप्नांत पावून ते निराळे वाटेनें आपले देशांत परत गेले



## प्रादुर्भावानंतर जो प्रथम आदित्यवार तो

### प्रार्थनासारांश

हे ईश्वरा जे तुझे लोक तुला प्रार्थितात त्यांच्या प्रार्थना दया करून ऐकून घ्याव्या म्हणून आम्ही तुला विनवितों आणि जीं कामें त्यांला करायास योग्य आहेत तीं त्यानीं पहावीं आणि जाणावीं अणखीं तीं कामें विश्वासरूपणें करावयास जो सत्वगुण आणि जें सामर्थ्य लागेल तें त्यांला प्राप्त व्हावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र रोमे १२. १.

भाव्वानों देवाचे दयेचे नामावर मी तुम्हाला विनवितों कीं तुम्ही आपलीं शरीरें देवाला जीवंत पवित्र प्रिय बलिदान अशीं अर्पण करावीं कां ही तुमची योग्य सेवाच आहे आणि यासंसाराशीं सरूप असूं नका पण तुमचें चित्त नवें होतां होतां तुम्ही अन्यरूप असा अशाकरितां कीं देवाचा जो उत्तम प्रिय सात्विक मनोदय तो तुम्ही पारखून समजावा कांकीं मला दिलेली जी कृपा तीणेंकरून मी तुह्मांतील प्रत्येकास सांगतों कीं जें कल्पावयास योग्य त्यापेक्षां अधिक आपणाविषयीं कल्पूं नये पण देवानें जसें प्रत्येकास विश्वासाचें परिमाण वांटून दिलें आहे त्याप्रमाणें सुबुद्धीनें कल्पावें कांकीं जसे आमचे एके देहास अनेक अवयव असून त्यां सर्व अवयवांला समानच करणें नाहीं तसे आम्हीं बहुत असून

ख्रिस्ताशीं एकच देह आहों आणि प्रत्येक परस्परांचे अव यव आहों

सुवार्त्ता लूक २. ४१.

आणि पेसाह नामा जो सण त्यासाठीं त्याचे आईबाप प्रतिवर्षीं येरूशालेमास जात असत तो बारावर्षांचा झाला तेव्हां सणाचे रीतीप्रमाणें ते येरूशालेमास जाऊन आणि वेळ समाप्त करून परत जातेसमयीं तो बाल येशू मागें येरूशालेमांत राहिला पण हें त्याची आई व योसेफ यांस कळलें नव्हतें आणि तो आपले संगतींच आहे असें समजून तीं एक दिवसाची वाट चालून गेलीं नंतर त्यानीं आपले नातलग व ओळखीचे यांमध्यें त्याचा शोध केला पण सांपडला नाहीं तेव्हां तीं त्याचा शोध करीत परत येरूशालेमास गेलीं तेव्हां असें झालें कीं तीन दिवस गेल्यावर तो देवळांत पंडितांमध्यें बसतां आणि त्यांचें ऐकतां व विचारितां त्याला सांपडला आणि जे सर्व त्याचें ऐकत होते ते त्याची बुद्धि आणि प्रत्युत्तरें यांवरून आश्चर्य पावले तेव्हां तीं त्याला पाहून विस्मित झालीं आणि त्याची आई त्याला बोलिली कीं लेंकरा तूं आम्हाशीं कां असें केलेंस पहा तुझा बाप आणि मी शोक पावून तुझा शोध करीत होतों तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें कीं माझा शोध कां करीत होतां काय तुम्हाला कळलें नव्हतें कीं माझे बापाचे कामामध्यें मला असावें लागतें पण जी गोष्ट तो त्यांस बोलिला ती त्यांला समजली नाहीं मग तो त्यांचे संगतीं नाजरेथ गांवास उतरून गेला आणि त्यांचे स्वाधीन



असे आणि त्याचे आईनें ह्या सर्व गोष्टी आपले मनांत राखून ठेविल्या येशूहि ज्ञान आणि उंची व देवाची आणि मनुष्यांची कृपा यांत वाढत गेला

## प्रादुर्भावानंतर जो दुसरा आदित्यवार तो

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा जो तूं सर्व जें आकाशांत आणि पृथ्वींत आहे याचें राज्य करितोस तूं आपले लोकांच्या विनंत्या ऐक आणि हें आयुष्य संपे तोंपर्यंत तूं आपलें समाधान आम्हाला दे येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र रोमे. १२. ६.

तर जो सत्गुण आम्हास दिला आहे तदनुसार विविध अपदानें आम्हास असतां जर कोणाला भविष्यवाद असला तर त्यानें विश्वास परिमाणाप्रमाणें सांगावा कोणी सेवा करणारा असेल त्यानें सेवेंत वर्त्तावें कोणी शिकविणारा असेल त्यानें शिकवीत जावें कोणी उपदेशक असेल त्यानें उपदेश करावा कोणी वांटणारा असेल त्यानें सत्यमनानें वांटून द्यावें कोणी अधिकारी असेल त्यानें झटून अधिकार करावा कोणी दानधर्म करितो तर त्यानें संतोषानें करावा प्रीति निष्कपट असावी जें दुष्ट त्याचा वीट धरून जें उत्तम त्यास चिकटावें भ्रातृक प्रीतीनें एकमेकांवर मायावंत असा परस्परांस आदरानें पुढें करीत असा उद्योगांत आळशी नसून आत्म्यां

मध्यें सदावेश धरून ईश्वराची सेवा करावी आशेंत हर्ष करून कष्टांत सहिष्णु असून एकाग्रतेनें प्रार्थना करीत जावें दरिद्री साधूंचें साहाय्य करावें घरीं पाहुणे घेत जावें जे तुमचे पाठीस लागतात त्यांजला आशीर्वाद द्या आशीर्वाद द्या पण शाप देऊं नका जे आनंद करितात त्यांशीं आनंद करा जे रडतात त्यांशीं रडा परस्परांशीं एकचित्त असा थोर विषयावर चित्त लावूं नका पण जे नम्र त्यांजकडे मन वळवून मान्य असा

सुवार्त्ता योहान्न २. १.

तर तिसरे दिवशीं गालील देशांतील काना नामें जो गांव त्यांत लग्न होतें येशूची आईहि तेथें होती त्या लग्नास येशू व त्याचे शिष्यहि बलाविले होते तेव्हां द्राक्षारस न्यून पडला असतां येशूची आई त्याला बोलिली कीं त्यांला द्राक्षारस नाहीं येशू तिला म्हणाला कीं अगे स्त्रिये मशीं आणि तुशीं काय माझी वेळ अजून आली नाहीं नंतर त्याचे आईनें सेवकांस सांगीतलें कीं तो जें कांहीं तुम्हाला सांगेल तें करा तेव्हां तेथें सहा दगडी रांझण ठेविले होते यहूद्यांचे शुद्धकरण्या प्रमाणें दोनमणाचे किंवा तीनमणाचे होते येशूनें त्यांला सांगीतलें कीं ते रांझण पाण्यानें भरून द्या तेव्हां त्यानीं ते कांठापावेतों भरून दिले मग त्यानें त्यांला सांगीतलें कीं आतां काढून नेऊन यजमानाला द्या तेव्हां त्यानीं नेऊन दिलें मग द्राक्षारस झालें होतें जें पाणी तें यजमानानें चाखलें (तो तर हें कोठून आहे असें जाणत नव्हता पण ज्यां सेव



कानीं तें पाणी काढिलें ते जाणत होते) तेव्हां यजमानानें नवऱ्याला बलावून त्याला सांगीतलें कीं प्रत्येक मनुष्य प्रथम उत्कृष्ट द्राक्षारस घालीत असतो मग बहुत प्याला असतां कनिष्ठ द्राक्षारस घालितो पण त्वां अजूनपावेतों उत्तम द्राक्षारस राखून ठेविला आहे हा चमत्कारांचा प्रारंभ गालीलांतील काना यांत येशूनें केला आणि आपलें गौरव प्रकट केलें व त्याचे शिष्यानीं त्याजवर विश्वास ठेविला

## प्रादुर्भावानंतर जो तिसरा आदित्यवार तो

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा आमचे दोषांवर कृपादृष्टि करावी आणि आमचे सर्व धोक्यांत व संकटांत आमचें साहाय्य आणि रक्षण करावयास आपला उजवा हात लांब करून दे येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र रोमे १२ १६.

आपले बुद्धीविषयीं अभिमानी होऊं नका कोणाचें वाईटा बदल वाईट करूं नका सर्व माणसांदेखतां जें यथार्थ तें पाहून प्राप्त करून घ्या शक्य असेल तर आपलें तात्पर्यानें सर्व माणसांशीं सुमति राखावी प्रियानों तुम्ही स्वतां सूड उगवूं नका पण राग सोडून द्या कारण लिहिलें आहे कीं सूड उगवणें माझेंच आहे मीच परत भरून देईन असें ईश्वर म्हणतो यास्तव तुझा द्वेषक भुकेला असला तर त्याला खायला दे तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे कां तर असें करून

त्याचे डोकीवर अग्नीचे कोळसे एकवटून घालशील जें वाईट त्यानें जिंकला जाऊं नको परंतु चांगल्याकडून वाईट जिंक

सुवार्त्ता मात्थी ८. १.

तो डोंगरावरून उतरला तेव्हां बहुत समुदाय त्याचे मागें गेले आणि पहा एक कोढ्या येऊन त्याचे पायां पडून बोलिला हे प्रभो तुला बनेल तर मला शुद्ध करायास तूं समर्थ आहेस तेव्हां येशू आपला हात लांब करून त्याजला स्पर्शून म्हणाला मला बनतें तूं शुद्ध हो आणि लागलेंच त्याचें कोढ नाहींसें होऊन गेलें नंतर येशूनें त्याला सांगीतलें पहा कोणाला सांगूं नको पण तूं जाऊन आचार्याला आपलें शरीर दाखीव आणि त्यांला साक्ष व्हावी म्हणून जें बलिदान मोशेनें नेमिलेलें तें तूं अर्पण कर नंतर येशू कापेर्नाऊमांत आला तों एक जमादार त्याजवळ येऊन विनंती करून बोलिला हे प्रभो माझा लेंक अपस्मारानें फार पीडित घरांत पडला आहे येशूनें सांगीतलें कीं मी येऊन त्याला बरा करीन जमादार उत्तर करून बोलिला हे प्रभो मी इतका योग्य नाहीं कीं तूं माझे घरीं यावेंस पण केवळ शब्द बोल म्हणजे माझा लेंक बरा होईल कांकीं मीहि अधिकाराखालचा मनुष्य असतां माझे हाताखालीं शिपाई आहेत आणि कोणे काला मी म्हणतों कीं तूं जा तेव्हां तो जातो आणि दुसऱ्याला म्हणतों कीं तूं ये तर तो येतो आणि मी आपले सेवकाला सांगतों कीं हें तूं कर तर तो करितो नंतर हें ऐकून येशूला आश्चर्य वाटलें आणि पाठीमागें जे चालत होते त्यांजपाशीं तो



बोलिला कीं मी तुम्हाला खचीत सांगतों इस्राएलांतहि एवढा विश्वास मला सांपडला नाहीं आणि मी तुम्हाला सांगतों पूर्वे कडून व पश्चिमेकडून बहुत येतील आणि आब्राहाम व इजाक व याकोब यांसहवर्त्तमान आकाशाचे राज्यांत वसतील पण या राज्यांतले लोक बाहेरील अंधारांत टाकिले जातील तेथें रडणें आणि दांत खाणें होईल मग येशूनें जमादाराला सांगीतलें कीं तूं जा आणि जसा त्वां विश्वास धरिला आहे तसें तुला होवो नंतर त्याचा लेंक त्याच घटकेस बरा झाला

## प्रादुर्भावानंतर चौथा जो आदित्यवार तो

प्रार्थनासारांश

हे देवा जो तूं जाणतोस कीं आम्ही एवढ्या मोठ्या धोक्यांत असतां कीं आपले स्वभावाचे अशक्ततेमुळें आम्ही सर्वदा स्थिर रहावयास समर्थ नाहीं जितकें सामर्थ्य आणि रक्षण आम्हास कोणताहि धोका पडला असतां संभाळील आणि कोणतीहि परीक्षा पडली असतां निभावील तितकें आम्हाला कृपा करून दे येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र रोमी. १३. १.

आपल्यावरचे अधिकारांस प्रत्येक जीवानें वश राहून मानावें कांकीं देवापासून झाल्यावांचून कोणताहि अधि कार नाहीं जे अधिकार आहेत ते देवानें नेमिलेले आहेत यास्तव जो कोणी अधिकारास आडवें आणितो तो देवाचे

विधीस आडवें आणितो पण जे आडवें आणितात ते शासन पावतील कां तर अधिकारी सत्कर्मांचें भयकारण नाहींत पण दुष्कर्माचें तर अधिकारास न भ्यावें म्हणून इच्छितोस काय जें उत्तम तें कर मग त्यापासून सन्मान पावशील कांकीं तुला हित असावें ह्मणून अधिकारी देवाचा सेवक आहे पण जें दुष्ट तें करिशील तर भीत अस कांकीं तो एरव्हीं तरवार धरीत नाहीं कारण तो देवाचा सेवक म्हणजे दंडाविषयीं दुष्ट करणाऱ्याचा सूड उगविणारा आहे यास्तव दंडामुळें केवळ नव्हे परंतु सत्य बुद्धीमुळेंहि वश राहून मानावें लागतें याकरितां तर तुम्ही वसूलच भरून द्या कांकीं ते याच उद्योगांत सदा झटून देवाचे सेवक झाले आहेत सर्वांला जें जें योग्य तें तें भरून द्या ज्याला वसूल योग्य आहे त्याला वसूल भरून द्या ज्याला जकात त्याला जकात द्या ज्यास भय त्यास भय द्या ज्याला आदर त्याला आदर देत जा कोणाचे ऋणी असूं नका पण परस्परांची प्रीति करा कांकीं जो कोणी दुसऱ्यावर प्रीति करितो त्यानें नियम पूर्ण केला आहे

सुवार्त्ता मात्थी. ८. २३.

मग तो गलबतावर चढून त्याचे शिष्य त्याचे मागें गेले तेव्हां पहा समुद्रांत एवढें मोठें वादळ झालें कीं तें गलबत लाटांनीं वेष्टिलें परंतु तो झोंप घेत होता नंतर त्याचे शिष्य येऊन त्याला जागें करून बोलिले कीं हे प्रभो बुडतों



आम्हास तार तो त्यांस म्हणाला अहो अल्पविश्वासाचे तुह्मी कां भयभीत आहां तेव्हां त्यानें उठून वारा आणि समुद्र यांस दबाविलें नंतर फारच निवात झालें आणि ते मनुष्य विस्मय पावून बोलिले हा कसा आहे कीं वारा आणि समुद्र हेहि याला मानितात नंतर तो गर्गसेनांचे देशांत पार आल्यावर दोघे भूतग्रस्त मनुष्य थडग्यांतून येऊन त्याला भेटले इतके विक्राळ होते कीं कोण्हाच्यानें त्या वाटेनें जाववत नव्हतें तेव्हां पहा ते ओरडत बोलिले हे येशू देवाचे पुत्रा आम्हाशीं आणि तुशीं काय समयाचे आगो दर आम्हाला पीडायाला इकडे आलास काय तेव्हां त्याज पासून दूर बहुत डुकरांचा एक कळप चरत होता नंतर भुतानीं त्यास विनंती करून म्हटलें कीं तूं आम्हाला घालवशील तर आम्हास त्या डुकरांचे कळपांत जाऊं दे त्यांजला त्यानें ह्मटलें जा मग ते निघून डुकरांचे कळपांत गेले तेव्हां पहा तो डुकरांचा सारा कळप कड्यावरून वेगानें धांवून समुद्रांतले पाण्यामध्यें बुडून मेला मग चारणारे पळाले आणि गांवांत जाऊन त्यानीं भूतग्रस्ताचे वर्त्तमाना सुद्धां सर्व झालेलें वर्त्तमान सांगीतलें तेव्हां पहा सारा गांव येशूचे दर्शनास निघाला आणि त्यास पाहून त्यानीं विनंती केली कीं तो त्यांचे देशांतून निघून जावा

## प्रादुर्भावानंतर पांचवा जो आदित्यवार तो.

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा त्वां आपली मंडळी आणि आपलें कुटुंब

यांस तुझे पवित्र धर्मांत सर्वदा राखावें म्हणून आम्ही तुला विनवितों अशासाठीं कीं जे तुझे दिव्य कृपेची आशा मात्र धरून भाव ठेवितात त्यांचें संरक्षण तुझे महा सामर्थ्यानें सर्वकाळ करावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र कोलोस ३. १२.

तर जसे देवाचे पवित्र आणि प्रिय निवडलेले लोक तसे तुम्ही दया उदारत्व नम्रता लीनता सहिष्णुता यांस अंगीं धरा कोणाचें कोणावर गऱ्हाणें असलें तर परस्पर सहन आणि क्षमा करा जशी ख्रिस्तानें तुम्हाला क्षमा केली तशी तुह्मीहि करा अणखीं यां सगळ्यांवर प्रीति अंगीं धरा ही सिद्धीचा कमरबंद आहे देवाचें समाधान तुमचे हृदयांत बहुत असावें यासाठीं तुह्मी एका मंडळींत बोलाविलेले आहां म्हणून उपकार मानीत जा ख्रिस्ताची गोष्ट तुमचे मनांत फार रहावी सुबुद्धीनें एकमेकांस शिकवीत आणि बोध करीत जा गीतें आणि स्तोत्रें व आत्मिक लावण्या यांकडून सत्वगुणानें तुह्मी आपले हृदयांत ईश्वराला गात जा आणि जें कांहीं तुह्मी बोलून किंवा आचरून करितां तें सर्व प्रभु येशूचे नामानें त्याकडून देव जो बाप याला उपकारस्तुति करून करा

सुवार्त्ता मात्थी १३. २४.

आकाशाचें राज्य एका मनुष्याला उपमित आहे ज्यानें आपले शेतांत चांगलें बीं टाकिलें पण मनुष्यें निजलीं असतां त्याचा वैरी येऊन गव्हांमध्यें निदण टाकून गेला जेव्हां कोंवळें उगवून कणसें निपजलीं तेव्हां निदणहि दिसलें नंतर त्या गृहस्थाचे सेवकानीं येऊन म्हटलें कीं साहेब आपण शेतांत चांगलें बीं टाकिलें कीं नाहीं तर हें निदण कुटलें आहे त्यांस तो बोलिला कीं हें कोणी एकादे वैऱ्यानें केलें आहे तेव्हां सेवक त्याला म्हणाले आह्मीं जाऊन तें एकवटून काढावें असा तुझा मनोदय आहे काय तो बोलिला नका कदाचित तुम्ही निदण काढीत असतांना त्याजसहवर्त्तमान गहूंहि उपडून काढाल कापणीपर्यंत दोन्ही बरावर वाढूं द्या मग कापणीचे वेळेस मी कापणाऱ्यांला सांगेन कीं आगोधर तुह्मी निदण काढून जाळायासाठीं त्याच्या पेंढ्या बांधा पण गहूं माझे कोठारांत एकवटून ठेवा



## प्रादुर्भावानंतर जो सहावा आदित्यवार तो

प्रार्थनासारांश

हे देवा जो तुझा सुवंदित पुत्र सैतानाचीं कामें नाहींशीं करायास आणि आम्हास देवाचीं लेंकरें आणि सनातन जीवनाचे विभागी घडवायास प्रादुर्भावित झाला ही आशा धरून आह्मीं जसा तो पवित्र आहे तसें आपणास पवित्र करावें ह्मणून आम्ही तुला विनवितों अशासाठीं कीं प्रताप आणि महागौरव यांकडून तो पुन: प्रकट होईल तेव्हां त्याचे गौरवी आणि सनातन राज्यांत आम्हीं त्यासारिखें व्हावें

जेथें हे बापा तुझे सहवर्त्तमान व हे पवित्र आत्म्या तुझे सह वर्त्तमान तो आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

पत्र पहिलें योहान्न ३. १.

पहा देवानें आम्हावर कशी प्रीति केली आहे कीं आम्ही त्याचीं लेंकरें म्हटलीं जातों म्हणून जग आम्हाला ओळखत नाहीं कांकीं त्यानें त्याला ओळखलें नाहीं प्रियानों आतांच आम्ही देवाचीं लेंकरें आहों पण आम्ही काय होऊं हें अजून दिसत नाहीं तथापि आम्हास कळतें कीं जेव्हां तो प्रकट होईल तेव्हां आम्ही त्यासारिखे होऊं कारण तो जसा आहे तसा आम्ही त्याला पाहूं तर त्याविषयीं ही आशा जो कोणी धरितो तो जसा तो पवित्र आहे तसा आपणास पवित्र करितो जो कोणी पाप करितो तो अन्याय करितो पाप तर अन्यायच आहे तुम्हीहि जाणतां कीं आमचें पापहरण करा यास तो प्रादुर्भावित झाला पण त्याजपाशीं पाप नाहीं जो कोण्ही त्यापाशीं राहतो तो पाप करीत नाहीं जो कोणी पाप करीत असतो त्यानें त्याला पाहिलें व जाणिलें नाहीं लेंकरानों कोण्ही तुम्हाला फसवूं नये जो कोणी यथार्थपण करीत असतो तो जसा यथार्थ आहे तसा होहि यथार्थ आहे जोकोणी पाप करीत असतो तो सैतानाचा आहे कांकीं पहिल्यापासून सैतान पाप करी यासाठीं देवाचा पुत्र प्रादुर्भावित झाला कीं त्यानें सैतानाचीं कामें नाहींशीं करावीं



सुवार्त्ता मात्थी २४. २३.

तेव्हां कोणीहि तुम्हाला जर सांगेल कीं पहा इथें ख्रिस्त आहे किंवा तिथें तर हें तुम्हाला खरें न वाटावें कांकीं बहुत खोटे ख्रिस्त आणि खोटे भविष्यवादी होतील आणि एवढे मोठे चमत्कार व एवढों मोठीं आश्चर्याचीं कर्में करितील कीं शक्य असलें तर निवडलेल्यांसहि फसवितील पहा मी आगोदर तुम्हाला सांगीतलें आहे म्हणून जर तुम्हाला सांग तील कीं पहा तो रानांत आहे तर निघून जाऊं नका पहा तो एकांतामध्यें आहे तर खरें मानूं नका कांकीं जशी वीज पूर्वेपासून येत्ये आणि पश्चिमेपर्यंत चकाकत्ये तसेंच मनुष्याचे पुत्राचें येणें होईल कांकीं जेथें कोठें मडें असेल तेथें गीध मिळतील मग त्यां दिवसांची आपत्ति झाल्यावर तेव्हांच सूर्याला काळोखी येईल आणि चंद्र आपला प्रकाश पडूं देणार नाहीं आणि तारे आकाशापासून पडतील व आका शाचे अधिकार अस्थिर केले जातील तेव्हां मनुष्याचे पुत्राचें चिन्ह आकाशांत दिसेल त्यासमयींहि पृथ्वीवरील सर्व प्रजा ऊर बडवून रडतील आणि मनुष्याचे पुत्राला आकाशांतले आभाळावर मोठे पराक्रमानें आणि वैभवानें येतां पाहतील तोहि आपले दूतांस करण्याचे मोठे शब्दासहवर्त्तमान पाठवील आणि ते त्याचे निवडलेल्यांस चहीं दिशांतून आकाशाचे एका शेवटापासून दुसरे शेवटापावेतों एकच मिळवितील

## उपोषणसमयाचे पूर्वींचा जो तिसरा आदित्यवार तो

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा कृपा करून आपले लोकांच्या प्रार्थना ऐकाव्या म्हणून आम्ही तुला विनवितों अशासाठीं कीं जे आम्ही आपल्या अपराधामुळें वास्तविक पीडलों आहों ते आम्ही तुझे नामाचे गौरवासाठीं तुझे परमदयेनें तारिले जावे येशू ख्रिस्त आमचा तारणारा याचे योगानें जो तुझे आणि पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन

पत्र पहिलें कोरिंथ ९. २४.

काय तुम्हाला कळत नाहीं कीं जे पैज मारून धांव धांवतात ते सर्व धांवतात खरें पण एकच मात्र होड उच लून घेतो तुह्मीहि घ्यावें म्हणून असे धांवत जा जो कोणी मल्लयुद्ध करितो तो सर्वथा सुनीति राखितो ते तर क्षय्य मुकुट मिळवायास मल्लयुद्ध करितात खरें परंतु आम्ही अक्षय्यमुकुट मिळवायास मी तर संशयानें धांवत नाहीं जसा कोणी वाऱ्यास नडवितो तसा मी मुष्टीमुष्टि करीत नाहीं पण मी आपलें देहदंडन आणि दमन यासाठीं करितों कीं असें नघडावें कीं मी दुसऱ्यांला उपदेश करून आपण अयोग्य पडेन

सुवार्त्ता मात्थी २०. १.

आकाशाचें राज्य एका गृहस्थाला उपमित आहे जो



आपले द्राक्षांचे बागेंत मोलकरी करून आणायला पहांटेस निघला त्यानें तेव्हां नित्य एक पावला देईन अशी मोल कऱ्यांशीं बोली करून आपले त्यांला द्राक्षांचे बागांत पाठविलें नंतर तो नऊ वाजतां निघाला तों बाजारांत दुसरे रिकामे होते ते पाहून त्यांस सांगीतलें तुह्मीहि माझे द्राक्षांचे बागांत जा आणि जें ठीक असेल तें तुम्हाला देईन ते तर गेले अणखीं त्यानें बारा वाजतां आणि तीन वाजतां जाऊन तसेंच केलें नंतर तो सुमारें पांच वाजतां गेला दुसरेहि त्याला रिकामे उभे राहतां सांपडले त्यांजला त्यानें विचारिलें कीं सारा दिवस तुम्ही इथें रिकामे कां उभे असतां ते त्यास बोलिले कीं आम्हाला अजून कोणी केलें नाहीं ह्मणून त्यांस तो सांगतो कीं तुम्हीहि माझे द्राक्षांचे बागांत जा आणि जें यथार्थ असेल तें मिळेल मग सांज झाली तेव्हां द्राक्षांचे बागाचे धन्यानें आपले कारभाऱ्यास सांगीतलें कीं मोलकऱ्यांस बलावून शेवटल्या पासून आरंभ करून पहिल्यापावेतों त्यांला मोल दे तेव्हां जे पांच वाजायचे सुमारें आले होते त्यां प्रत्येकांस पावला पावला मिळाला तेव्हां जे प्रथम आलेले होते त्यांला वाटलें कीं आम्हाला अधिक मिळेल पण त्यांसहि एकेकास पावला पावलाच मिळाला तो घेऊन ते त्या गृहस्थाशीं गुणगुणून बोलिले कीं त्यां शेवटल्यानीं तीन घटका मात्र काम केलें आणि ज्यां आम्ही दिवसभर ओझें व ऊन सोसून घेतलें त्यां आह्माशीं तुल्य त्यांला त्वां केलें आहे तो उत्तर करून

त्यांतले एकाला ह्मणाला सख्या मी तुला अवास्तविक करीत नाहीं तुझी आमची एका पावल्याची बोली आहे कीं नाहीं जें तुझें तें तूं घेऊन जा जसें तुला तसें या शेवटच्याला द्यायचा माझा मनोदय आहे जें माझें आहे त्याचें जसें मला बनेल तसें करण्यास मला उचित आहे कीं नाहीं मी उदार आहें म्हणून तुला देखवत नाहीं काय याप्रमाणें शेवटले ते पहिले आणि पहिले ते शेवटले होतील कारण कीं बहुत बोलाविलेले असून निवडलेले थोडे आहेत

## उपोषणसमयाचे पूर्वींचा जो दुसरा आदित्यवार तो.

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा देवा जो तूं पाहतोस कीं जें कांहीं कर्म आम्ही करितों त्याजवर आम्ही भरवंसा ठेवीत नाहीं तुझे पराक्रमानें आह्मास सर्व अरिष्टांपासून कृपा करून रक्षावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र दुसरें कोरिंथ ११. १९.

कारण कीं तुम्ही बुद्धिवंत असून मूर्खांस आनंदानें सहन करितां जर कोणी तुम्हाला दासपणांत ठेवील जर कोणी तुम्हाला खाऊन टाकील जर कोणी तुमचें हरण करील जर कोणी तुम्हावर बलात्कार करील जर कोणी तुमचे तोंडांत चपराका मारील तर तुह्मी सहन कराल मी अशक्तावाणीं नीचतेनें बोलतों पण ज्याविषयीं कोणी प्रगल्भ असेल (मूर्खतेनें तर बोलतों) त्याविषयीं मीहि प्रगल्भ असावा ते इब्री आहेत काय मीहि इब्री आहें ते इस्राएली आहेत काय मीहि तसाच आहें ते आब्राहामाची संतति आहेत काय मीहि तसाच आहें ते ख्रिस्ताचे सेवक आहेत काय (मी तर वेड्यावाणीं बोलतों) मी त्यांहून अधिक आहें त्यांपेक्षां श्रमांत अधिक फटक्यांमध्येंहि विशेष बंदींत अधिक बहुत वेळा मरणांत यहूद्यांपासून पांचवेळां स्यां एकुंचाळीस फटके सोसून घेतले तीनदां मला छड्या मारिल्या एकदां मी दगडमार खाल्ला तीनवेळां माझें गलबत फुटलें एक रात्र आणि एक दिवस खोल समुद्रांत राहिलों आहें बहुत वेळां मार्ग चालण्यांत नद्यांचे जोखमांत लुटाऱ्यांचे जोखमांत आपले जातीचे जोखमांत परदेशस्थ लोकांचे जोखमांत नगरांतले जोखमांत रानांतले जोखमांत समुद्रांतले जोखमांत खोटे भाव्वांतले जोखमांत श्रमांत व कष्टांत बहुत वेळां जागरणांत भुकेंत व तान्हेंत आणि बहुत वेळां उपासांत थंडींत उघड्यानें अणखीं ह्या बाहेरच्या गोष्टींवांचून ती आहे जी नित्य माझे अंगावर पडत्ये म्हणजे सगळ्या मंडळीची चिंता कोणी अशक्त होतो आणि मी अशक्त होत नाहीं काय कोणाला संशय आहे आणि मला संताप होत नाहीं काय मला जर आपली स्तुति करायास योग्य असलें तर मी आपले अशक्तपणाचे गोष्टींविषयीं आपलें वर्णन करीन देव जो आमचे प्रभु

येशू ख्रिस्ताचा बाप जो सनातनतः सुवंदित आहे तो जाणतो कीं मी खोटें बोलत नाहीं

सुवार्त्ता लूक. ८. ४.

तेव्हां मोठा समुदाय आणि त्यापाशीं जे शहरोशहरांतून आले होते ते एकच मिळाले असतां तो दाखल्यानें बोलिला कीं कोणीएक पेरणारा आपली पेरणी करायला निघाला तेव्हां तो पेरीत असतां कांहीं वाटेवर सांडून तुडविलें गेलें आणि आकाशांतले पांखरांनी तें खाऊन टाकिलें दुसरेंहि कांहीं खडकावर पडलें होतें त्याला दम पुरला नाहीं म्हणून उगवलेलें करपून गेलें व दुसरें कांहीं कांटेरे झाडांमध्यें पडून तें कांटेरे झाडांसंगतीं उगवून त्यांचे दाटीनें तें नासून गेलें अणखीं कांहीं चांगले भुईवर पडलें त्यानें उगवून शंभर पट फळ दिलें ह्या गोष्टी सांगून मोठ्यानें तो बोलिला कीं ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको नंतर त्याचे शिष्यानीं त्यास विचारून म्हटलें कीं या दाखल्याचें तात्पर्य काय आहे तेव्हां त्यानें सांगीतलें देवाचे राज्याचीं रहस्यें तुम्हाला जाणूं दिलीं आहेत पण वरकडांस दाखल्यानीं बोलतों अशासाठीं कीं त्यांला पाहून न दिसावें आणि ऐकून न समजावें ह्यां दाखल्याचें तात्पर्य हेंच आहे ती पेरणी देवाची गोष्ट आहे जें वाटेवर पडलें ते ऐकणारे आहेत मग त्यानीं विश्वास धरून न तरावें म्हणून सैतान येऊन त्यांचे हृदयांतून ती गोष्ट काढून टाकितो जें खडकावर पडलें तें असे आहेत जे ऐकून आनंदानें गोष्ट ध्यानांत आणितात पण त्यांला मूळ नाहीं



यास्तव ते थोडा वेळ विश्वास धरून परीक्षेसमयीं फिरून जातात जें कांटेरे झाडांमध्यें पडलें ते असे आहेत जे ऐकून या आयुष्याची चिंता व धन आणि भोग यांत गुंतून थकतात आणि सिद्धीस जात नाहींत जें चांगले भूमीवर पडलें ते असे आहेत जे ऐकून सुशील आणि सात्विक हृदयांत गोष्ट धरितात आणि धीरानें फळ देतात

## उपोषणसमयाचे पूर्वींचा जो आदित्यवार तो

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा ज्या त्वां आम्हास कळविलें कीं आमचें कोणतेंहि कर्म प्रीतीनें केलेलें नसलें तर अनर्थच आहे आपला पवित्र आत्मा पाठवून प्रीति म्हणून जो उत्तम गुण आहे तो आमचे हृदयांत उत्पन्न करावा तो सुमतीचा आणि सर्व सद्गुणाचा बंधच आहे जिजवांचून कोणीहि जरीं जीवंत असला तरीं तुझे दृष्टींत तो निर्जीवच मानिला जातो तुझा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त याजकरितां हें आम्हाला द्यावें आमेन

पत्र पहिलें कोरिंथ १३. १.

मनुष्यांच्या भाषा आणि दूतांच्या भाषा मला बोलतां आल्या असल्या तरीं मला जर प्रीति नसली तर मी वाजतें पितळ किंवा घणघणती झांज असा झालों आहें आणि मला भविष्यवाद असला व सर्व रहस्यें व सर्व विद्या मला कळली असली आणि डोंगर उखळून टाकी एवढा विश्वास मला

असला तरीं मला जर प्रीति नसली तर मी कांहींच नाहीं आणि म्यां आपलें सर्व धन धर्मकरून वांटून दिलें असलें व आपला देह जाळायला अर्पण केला असला तरीं मला जर प्रीति नसली तर मला कांहींच प्राप्ति झाली नाहीं प्रीति सहिष्णु आहे उपकारकर्त्ती आहे प्रीति हेवा करीत नाहीं उतावळी करीत नाहीं शेफरत नाहीं अमर्यादेनें वर्त्तत नाहीं स्वार्थासाठीं अहंकारानें झटत नाहीं रुसत नाहीं दुश्शंका करीत नाहीं अन्यायाविषयीं हर्ष करीत नाहीं पण सत्याविषयीं हर्ष करित्ये सर्व क्षमा करित्ये सर्व विश्वासत्ये सर्वांविषयीं आशा धरित्ये सर्व सोशित्ये प्रीति कधीं थकत नाहीं पण भविष्यवाद असले तर ते नाहींसे होतील अथवा भाषा असल्या तर त्या होतां राहतील किंवा विद्या असली तर ती नष्ट होऊन जाईल कारण कीं आम्ही भागशः जाणतों आणि भागशः भविष्यवाद सांगतों पण जें पुरतें तें येईल तेव्हां जें भागशः आहे तें नाहींसें होईल जेव्हां मी पोर होतों तेव्हां पोरासारिखें बोलत असें पोरासारिखें समजत असें पोरासारिखें विचारीत असें पण मी पुरुष झालों तेव्हां म्यां पोरांच्या गोष्टी सोडून दिल्या तर अजून आम्हीं आदर्शाकडून अस्पष्टें पाहतों पण तेव्हां संमुखेंकरून पाहूं अजून मी भागशः जाणतों पण तेव्हां जसें मजविषयीं कळत आहे तसें मला कळेल तर आतां विश्वास आशा प्रीति हे तीन सद्गुण आहेत पण ह्यांतील जो मुख्य तो प्रीति आहे

सुवार्त्ता लूक १८, ३१.

नंतर त्यानें ते बारा शिष्य जवळ घेऊन त्यांस म्हटलें पहा



आह्मी येरूशालेमास जातों आणि सर्व जें भविष्यवाद्यांनीं मनुष्याचे पुत्राविषयीं लिहिलें आहे तें सिद्धीस जाईल कां कीं तो परदेशस्थ लोकांचे स्वाधीन केला जाईल आणि उपहासिला जाईल व भर्त्सित केला जाईल आणि त्याज वर थुंकणें केलें जाईल व फटके मारून त्याला जिवें मारितील नंतर तिसरे दिवशीं तो जीवंत होऊन उठेल पण यांतलें त्यांजला कांहीं समजलें नाहीं कां तर ही गोष्ट त्यांपासून गुप्त होती आणि जें तो बोलिला तें ते समजले नाहीं मग असें झालें कीं तो येरीखो शहराजवळ येऊन एक आंधळा वाटेवर भीक मागायला बसला आहे तेव्हां समुदाय दूकडून चालिला आहे असें त्यानें ऐकून विचारिलें कीं हें काय आहे त्यांनीं त्याला सांगीतलें कीं येशू जो नाजोरी तो दूकडून चालिला आहे तेव्हां तो ओरडत बोलिला हे येशू दावीदाचे संताना मजवर दया कर मग जे पुढें चालत होते त्यांनीं त्याला दबावून म्हटलें कीं उगाच रहा परंतु उत्तरोत्तर ओरडला कीं हे दावीदाचे संताना मजवर दया कर येशूनें उभें राहून त्याला आपले जवळ आणावें म्हणून आज्ञा केली मग जवळ आल्यावर येशू त्याला विचारीत बोलिला म्यां तुझें काय करावें म्हणून इच्छितोस तो म्हणाला हे प्रभो मला दृष्टि यावी म्हणून इच्छितों तेव्हां येशूनें त्याला सांगीतलें तूं पहात जा तुझे विश्वासानें तुला तारिलें आहे तेव्हां लागलीच त्याला दृष्टि प्राप्त झाली आणि त्याचे मागें देवाची स्तुति करीत गेला

आणि ते सर्व लोकहि पाहून देवाची स्तुति करिते झाले

## उपोषणसमयाचा पहिला दिवस.

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा जो तूं जें कांहीं त्वां उत्पन्न केलें आहे त्याचा द्वेष करीत नाहींस आणि सर्व जे अनुतापी आहेत त्यांचे पापांची क्षमा करीत असतोस आमचे ठायीं नवीं व अनुतापी हृदयें उत्पन्न कर अशासाठीं कीं आह्मी आपले पापांविषयीं योग्यपणें शोक करून आपली दुर्दशा अंगीकारून जो तूं परम दयालु देव त्या तुजपासून पुरती मुक्ति आणि क्षमा पावावी येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

ह्या प्रार्थनासारांश उपोषणसमयाचे प्रत्येक दिवसीं वाचावा.

पत्राचे स्थानीं योएल २. १२.

ईश्वर म्हणतो आतांच तुम्ही आपले संपूर्ण हृदयानें उपोषण करीत आणि रडत व आकांत करीत फिरा आणि तुम्ही केवळ आपलीं वस्त्रें फाडीत नसतांना आपलीं हृदयें फाडा आणि ईश्वर जो तुमचा देव त्याज कडे फिरा कां तर तो मंदक्रोध आणि परम दयालु आहे व दंडाविषयीं अनुतापी आहे तो फिरेल आणि अनुताप पावेल व आपले पाठीमागें उपकार म्हणजे ईश्वर जो तुमचा देव त्याला अन्नबलि किंवा पानबलि



ठेवील कीं नाहीं हें कोण जाणे जीयोनामध्यें करणा वाजवा उपोषण प्रसिद्ध करा सभा करा लोक मिळवा मंडळी नेमा वडील एकवटा बालकें व तान्हीं यांस एकच मिळवा नवरा आपले खोलींतून निघावा आणि नवरी आपले मंडपांतून निघावी द्वार आणि वेदी यांमध्यें आचार्य जे ईश्वराचे सेवक त्यानीं रडावें आणि म्हणावें कीं हे ईश्वरा तुझे लोकांला वांचू दे आणि परदेशस्थ लोक त्यांजवर राज्य करितील एवढ्या अपमानाला तूं आपलें वतन घालूं नको त्यांचा देव कोठें आहे असें परदेशस्थ लोकांमध्यें कशाला म्हणतील

सुवार्ता मात्थी ६, १६.

जेव्हां तुम्ही उपोषण करितां तेव्हां ढोंग्यासारिखे म्लान मुख होऊं नका कांकीं ते उपोषण करिताहेत हें मनुष्यांस दिसावें म्हणून ते आपलीं तोंडें वाईट करितात मी तुह्माला खचीत सांगतों कीं ते आपलें फळ पावतात पण तूं उपोषण करीत असतां आपली डोई अभ्यंगित कर आणि आपलें तोंड धू अशासाठीं कीं तूं उपोषण करीत आहेस हें मनुष्यांला दिसूं नये पण तुझा बाप जो गुप्तांत आहे त्यालाच दिसावें मग तुझा बाप जो गुप्तांत पाहतो तो तुला उघडीं फळें भरून देईल जेथें कसर व तांब नाश करितात जेथें चोरहि फोडून चोरी करितात त्या पृथ्वींत तुम्ही आपलेसाठीं धन सांठवूं नका पण जेथें कसर व तांब नाश करीत नाहींत जेथें चोरहि फोडून चोरी

करीत नाहींत त्या आकाशांत तुह्मी आपल्यासाठीं धन सांठवा कारण कीं जिथें तुमचें धन आहे तिथेंच तुमचें चित्त लागेल

## उपोषणसमयाचा पहिला आदित्यवार

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा ज्या त्वां आम्हासाठीं चाळीस दिवस आणि चाळीस रात्रि उपोषण केलें आम्हाला एवढें भोगनियमन करायास सत्गुण दे कीं आमचा देह आत्म्याचे स्वाधीन केला असतां आम्ही यथार्थपण आणि पवित्रता यांकडून तुझीं पवित्र उत्तेजनें मानावीं तुझें गौरव व्हावें म्हणून जो तूं बाप आणि पवित्र आत्मा यांजसहवर्त्तमान सर्वदा आहेस आणि राज्य करितोस तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन

पत्र दुसरें कोरिंथ ६. १.

अहो सहकारी तुह्मीं देवाची कृपा व्यर्थ घेऊं नये म्हणून तुह्माला आम्ही संबोध करितों कां तर तो म्हणतो कीं म्यां प्रसादसमयीं तुझें ऐकिलें आहे आणि तारणदिवसीं तुझें म्यां साहाय्य केलें आहे पहा आतांच प्रसादसमय आहे पहा आतांच तारणदिवस आहे आचार्यत्वाला दोष न ठेवावा म्हणून आम्हीं कशाहिविषयीं कांहीं अडचण पाडीत नाहीं परंतु आम्हीं देवाचे सेवक आहों असें सर्व गोष्टींत प्रमाण देतों कष्ट संकटें



कचाटें फटके बंद्या लोकांच्या धुंदाया श्रम उजागरे आणि उपास यांत असतांना विमलात्मकपणें बहुधीरपणें ज्ञानानें सहिष्णुतेनें उपकारिकपणानें पवित्र आत्म्यानें हृद्य प्रीतीनें सत्याचे गोष्टीनें देवाचे शक्तीनें उजवे आणि डावे हाताकडील यथार्थपणाचे कवचानें सन्मानांत आणि अपमानांत सुकीर्त्तींत व अपकीर्त्तींत ठकांसारिखे असलों तरीं सात्विक आहों अज्ञातांसारिखे तरीं सुज्ञात मरणोन्मुखांसारिखे तरीं पाहा आम्ही जीवंत आहों जसे शिक्षा केलेले तथापि जिवें न मारिलेले जसे दुःखित तथापि सर्वदा आनंदित जसे दरिद्री तथापि बहुतांस धनवंत करीत आम्हास कांहीं नाहीं असें दिसत असतांहि आम्हास सर्व आहे

सुवार्त्ता मात्थी ४. १.

तेव्हां सैतानानें येशूची परीक्षा करावी म्हणून तो आत्म्याकडून रानांत नेला गेला तेथें चाळीस दिवस आणि चाळीस रात्रि उपोषण करून मग त्याला भूक लागली तेव्हां तो परीक्षक येऊन त्याला म्हणाला जर तूं देवाचा पुत्र आहेस तर ह्या धोंड्यानीं भाकरी व्हावें म्हणून आज्ञा कर मग तो उत्तर करीत म्हणाला लिहिलें आहे केवळ भाकरीनें मनुष्य वांचेल असें नव्हे पण जो प्रत्येक गोष्ट देवाचे तोंडांतून निघाली आहे तिनेंच वांचेल नंतर सैतानानें त्याला पवित्र नगरांत नेलें आणि त्याला देवळाचे शिखरावर उभें करून ह्मटलें जर तूं देवाचा पुत्र आहेस तर खालीं उडी टाक कां तर लिहिलें आहे कीं तुजविषयीं तो आपले दूतांला आज्ञा देईल आणि

तुझे पायांला दगडाशीं ठेंच न लागावी म्हणून ते आपल्या हातानीं तुला उद्धरितील येशूनें त्याला सांगीतलें अणखीं लिहिलें आहे देव जो तुझा ईश्वर त्याची परीक्षा पाहूं नको पुन: सैतानानें त्याला फार उंच डोंगरावर नेलें आणि त्याला जगांतलीं सर्व राज्यें व त्यांचें गौरव दाखवून ह्मटलें जर तूं पायां पडून मला भजशील तर हीं अवघीं तुला देईन तेव्हां येशू त्याला बोलिला अरे सैताना जा तूं कां तर लिहिलें आहे ईश्वर जो तुझा देव त्याला भजत जा आणि केवळ त्याचीच सेवा करीत जा तेव्हां सैतान त्याला सोडून गेला नंतर पाहा दूत येऊन त्याचे उपचार करिते झाले

## उपोषणसमयाचा दुसरा आदित्यवार

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा जो तूं पाहतोस कीं आम्ही आपणास उपाय करायास स्वत: समर्थ नाहीं आमचें बाहेरचें म्हणजे देहाचें आणि आमचें आंतलें म्हणजे जीवात्म्याचें संरक्षण कर अशासाठीं कीं जीं कांहीं अरिष्टें देहाला लागतील आणि ज्या कांहीं दुष्ट कल्पना मनाला बाधून उपद्रव करितील त्यां सर्वांपासून आम्हास रक्षावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र पहिलें थेस्सल ४. १.

भाव्वानों तर अणखीं आह्मी तुम्हाला विनवितों आणि संबोध करितों कीं जसें आम्हापासून तुम्ही ऐकून घेतलें कसें



वर्त्तल्यानें देवाला प्रिय व्हावयास तुम्हाला योग्य आहे तसें तुम्हीं उत्तरोत्तर सिद्ध होत जा कांकीं आम्हीं ज्या आज्ञा प्रभु येशूकडून तुम्हाला दिल्या त्या तुम्हाला ठाऊक आहेत तर देवाची इच्छा हीच आहे म्हणजे तुमची पवित्रता म्हणून तुम्हीं व्यभिचारापासून दूर असावें तुम्हा प्रत्येकाला आपलें पात्र पवित्रतेंत आणि शुभवृत्तींत कसें राखावें हें समजावें कामरसांत नको परदेशस्थ लोकांवाणीं कांकीं ते देवाला जाणत नाहींत व्यापारांत कोणी आपले भाव्वास प्रतारून न ठकवावें कां तर अशां सर्वांचा सूड घेणारा ईश्वरच आहे जसें आम्हीं आगोदर सांगीतलें आणि साक्ष दिली तर देवानें आम्हाला मलिनतेंत बलाविलें नाहीं पण पवित्रतेंत बलाविलें आहे यास्तव जो कोणी तुच्छ मानितो तो केवळ मनुष्याला नाहीं पण देवाला तुच्छ मानितो ज्यानेंहि आपला पवित्र आत्मा आम्हाला दिला आहे

### सुवार्त्ता मात्थी १५. २१.

तेव्हां येशू तेथून निघून जूर आणि सीदोन या दोहोंचे प्रदेशांत गेला तेव्हां पहा एक खनानी स्त्री त्या शिवांतून येऊन त्याला ओरडत बोलिली हे प्रभो दावीदाचे संताना माझी कन्या भुतानें भारी पीडिली आहे मज वर दया कर पण त्यानें तिजला कांहीं उत्तर केलें नाहीं मग त्याचे शिष्य जवळ येऊन त्याला विनवीत बोलिले तिला निरोप दे कांकीं आमचे मागें ओरडत्ये आहे त्यानें उत्तर करून ह्मटलें इस्राएलाचे घराण्याचे हरपलेले

मेंढरांवांचून कोण्हाला मी पाठविलेलों नाहीं तेव्हां ती येऊन त्याचे पायां पडून म्हणाली हे प्रभो माझें साहाय्य कर तो उत्तर करून म्हणाला लेंकरांची भाकर घेऊन कुत ऱ्यांला टाकावी हें योग्य नव्हे ती बोलिली होय प्रभो तथापि कुतरीं आपले धन्यांचे मेजांवरून जे चूर पडतात त्यांतून खातात तेव्हां येशू उत्तर करून तिला बोलिला हे स्त्रिये तुझा विश्वास मोठा आहे बरें जसें तूं इच्छित्येस तसें तुझें होवो नंतर तिची कन्या त्याच घटकेपासून बरी झाली

## उपोषणसमयाचा तिसरा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा तुझे नम्र सेवकांच्या हृद्य इच्छा पाहून मानाव्या ह्मणून आम्ही तुजला विनवितों आणि तूं आपला महापराक्रमी उजवा हात लांब करून आमचे सर्व शत्रूं पासून आमचें संरक्षण करावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र एफेस ५. १.

तर आवडते लेंकरासारिखे तुम्ही देवाचे अनुकारी व्हा आणि प्रीतीनें वर्त्ता जशी ही ख्रिस्तानें आह्मावर प्रीति केली आहे आणि देवाला सुगंधाचा वास व्हावा म्हणून आमचे स्थानीं आपणातें अर्पण व बलि दिलें आहे तर व्यभिचार किंवा मलिनपण अथवा लोभ यांचें नावहि



तुम्हामध्यें कोणी उच्चारूं नये जसें पवित्र जनांस शोभतें तसें किंवा जीं उचित नाहींत ह्मणजे दुर्भाषण निरर्थक भाषण व विनोद हीं उच्चारूं नयेत पण यांपेक्षां उपकार स्तुति उच्चारावी कां तर तुम्हास कळतें आहे कीं कोणी व्यभिचारी किंवा मलिन किंवा लोभिष्ट जो मूर्त्तिपूजकच आहे त्याला ख्रिस्ताचे आणि देवाचे राज्यांत वतन मिळत नाहीं मिथ्याभाषणानें कोणी तुम्हाला न फसवो कांकीं अशां गोष्टींमुळें देवाचा क्रोध अनाचारी जनांवर होतो यास्तव तुम्ही त्यांचे सहवर्त्तमानी होऊं नका तुम्ही तर पूर्वीं अंधार होतां पण आतां प्रभूकडून उजेड झालां आहां जसे प्रकाशित तसे तुह्मी वर्त्ता कांकीं सर्व भलाई व यथार्थपण व सत्य यांत आत्म्याचें फल आहे जें ईश्वरास आवडत आहे हें पारखून घ्या आणि अंधाराचे निष्फल कर्मांशीं कांहीं सहवर्त्तन करूं नका तर यापेक्षां त्यांचें गर्हण करा कांकीं जीं गुप्त कर्मैं त्यांकडून होऊन जातात तीं उच्चारण्यासहि अनुचित आहेत तर गर्हायाच्या ज्या सर्व गोष्टी आहेत त्या उजेडानें प्रकट होतात कारण जें कांहीं प्रकट करितें तें उजेडच आहे यास्तव तो म्हणतो हे निजणारा जागृत हो आणि मेलेल्यांमधून ऊठ आणि ख्रिस्त तुला प्रकाशित करील

### सुवार्त्ता लूक ११. १४.

तो एक भूत घालवीत होता तेंहि मुकें होतें तेव्हां असें झालें कीं तें भूत घालविलें असतां तो मुका बोलता

झाला आणि समुदायांस आश्चर्य वाटलें पण त्यांतले कित्येक म्हणाले भुतांचा अधिकारी जो बअल्जबूब याकडून भुतें घालवितो दुसरेहि परीक्षा करीत त्यापाशीं आकाशांतील चिन्ह मागते झाले तेव्हां तो त्यांच्या कल्पना जाणून त्यांस बोलिला कोणतेंहि राज्य आपले प्रतिकूलपक्षांत भिन्न झालें असतां उजाड होतें आणि घरहि घराचे प्रतिकूल भिन्न झालें असतां पडतें मग शैतान जर आपले प्रतिकूल भिन्न झाला तर त्याचें राज्य कसें टिकेल कांकीं तुम्ही म्हणतां मी बअल्जबूबाकडून भुतें घालवितों परंतु मी जर बअल्जबूबाकडून भुतें घालवितों तर जे तुमचे जातीचे ते कोणाकडून भुतें घालवितात यास्तव ते तुमचे न्यायाधीश असावे मग जर मी देवाचे बोटाकरवें भुतें घालवितों तर देवाचें राज्य तुम्हाजवळ आलें आहे जेव्हां कोण्ही सज्जित बलवान मनुष्य आपला वाडा राखितो तेव्हां त्याचें धन यथास्थित असतें पण त्यापेक्षां कोणी अधिक बलवान येऊन जर त्याला जिंकील तर ज्या कवचावर तो विश्वासे तें हरून घेईल आणि त्याची हरलेली वांटून देईल जो माझेकडला नाहीं तो माझे प्रतिकूलच आहे जोहि माझे संगतीं मिळवीत नाहीं तो विखरतो जेव्हां अशुद्ध आत्मा मनुष्यांतून निघून शुष्क जाग्यामधून शांति शोधीत फिरतो आणि न सांपडून म्हणतो ज्या घरांतून मी निघालों त्यांत परत जाईन मग येऊन तें त्याला झाडलेलें शोभावंत केलेलें असें सांपडतें नंतर तो जाऊन अणखीं



सात आत्मे जे आपलेपेक्षां दुष्ट ते संगतीं घेतो आणि ते आंत जाऊन तेथें राहतात तेव्हां त्या मनुष्याची शेवटली दशा पहिलेपेक्षां वाईट होत्ये तो ह्या गोष्टी बोलत असतां असें झालें कीं एक स्त्री समुदायांतून त्याला हाक मारून बोलिली ज्या उदरानें तुझें गर्भधारण केलें आणि जीं थानें त्वां चोंखिलीं तीं धन्य तेव्हां तो ह्मणाला खरें तर जे देवाची गोष्ट ऐकून ती पाळितात ते धन्य आहेत

## उपोषणसमयाचा चौथा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा आम्ही तुला विनवितों कीं जे आम्ही आपले दुष्कर्मामुळें दंड पावायास योग्य आहों त्यां आम्हास कृपा करून तूं आपले सत्वगुणाचे समाधानानें मुक्त करावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु आणि तारणारा याचे योगानें आमेन

### पत्र गालात ४. २१.

जे तुम्ही नेमाखालीं राहूं इच्छितां ते तुम्ही नेमाचें ऐकत नाहीं काय हें मला सांगा कां तर लिहिलें आहे कीं आब्राहामाला दोघे पुत्र होते एक दासीपासून आणि दुसरा कुलीन स्त्रीपासून तर जो दासीपासून तो देहानुसार उत्पन्न झाला खरें परंतु जो कुलीन स्त्रीपासून तो वचनाप्रमाणें उत्पन्न झाला ह्या गोष्टी लाक्षणिक आहेत कांकीं ह्याच दोन संधा आहेत एक तर सीनाडोंगरापा

ह्मन जी दास्यासाठीं प्रसवित्ये ही हागार आहे तर ती हागार अरबस्थानांतला सीनाडोंगर आहे आणि जी येरूशालेम आतां आहे आणि आपले लेंकरांसुद्धां दास्यांत ठेविली आहे हिची तुल्यता ती घेत्ये पण वरतीं जी येरूशालेम जी आमची सर्वांची माता आहे ती मोकळी आहे कांकीं लिहिलें आहे अगे वंध्या जी तूं प्रसवत नाहींस ती तूं आनंदित हो ज्या तुला प्रसूतिवेदना लागत नाहीं ती तूं ओरडत सूट कांकीं जिला दादला आहे तिचे लेंकरांपेक्षां एकलीचीं लेंकरें पुष्कळ आहेत तर भाव्वानों इजाकाप्रमाणें आह्मी वचनाचीं लेंकरें आहों परंतु जसें तेव्हां देहानुसार उत्पन्न झालेला आत्मानुसार उत्पन्न झालेल्याचे पाठीस लागत असे तसें आतांहि आहे तर लेख काय ह्मणतो दासी आणि तिचा पुत्र यांस घालवून दे कां तर दासीचे पुत्रास कुलीन स्त्रीचे पुत्राबराबर वतन मिळणार नाहीं तर भाव्वानों आम्ही दासीचीं लेंकरें नव्हों पण कुलीन स्त्रीचीं लेंकरें आहों

सुवार्त्ता योहान्न ६. १.

यानंतर येशू गालीलाचा समुद्र जो तिबेर्यासाचा समुद्र म्हटलेला आहे त्याचे पलीकडेस गेला आणि मोठा समुदाय त्याचे मागें गेला कांकीं रोगी लोकांवर जे त्यानें चमत्कार केले ते त्यानीं पाहिले होते मग येशू एका डोंगरावर चढून तिथें आपले शिष्यांसहवर्त्तमान बसला तेव्हां दूत संक्रांति ह्मणून जो यहूदी लोकांचा एक सण तो जवळ



होता तर येशूनें डोळे लावून मोठा समुदाय आपलेकडे येतो आहे असें पाहून फिलिप्पसाला म्हटलें यांला खाया साठीं भाकरी कोठून विकत घेऊं पण हें त्यानें त्याची परीक्षा करीत म्हटलें कांकीं आपण जें करणार होता तें त्याला कळत होतें फिलिप्पसानें त्याजला उत्तर केलें कीं त्यांतले प्रत्येकानें थोडथोडें घ्यावें अशाला दोनशें पावल्यांच्या भाकरी त्यांला पुरणार नाहींत त्याचे शिष्यां तला एक जो आंद्रेआस शिमोन पेत्रसाचा भाऊ तो त्याला बोलिला कीं एक मुलगा इथें आहे त्याजवळ जवांच्या पांच भाकरी आणि दोन लाहान मासे आहेत पण येवढे लोकांला तीं काय होत नंतर येशू बोलिला माणसांला बसवा तर त्या जागीं बहुत गवत होतें मग तीं माणसें गणतीनें सुमारें पांच हजार बसलीं तेव्हां येशूनें भाकरी घेतल्या आणि उपकारस्तुति करून शिष्यांस वांटून दिल्या आणि शिष्यांनी त्या बसलेले लोकांस वांटून दिल्या याप्रमाणेंच माशांतले जितके त्यांला बनले तितके वांटून दिले जेव्हां ते तृप्त झाले तेव्हां तो आपले शिष्यांस बोलिला कांहीं फुकट न जावें म्हणून उरलेले तुकडे गोळा करा नंतर त्यानीं त्या जवांचे पांचां भाकरीं तले जे तुकडे जेवणारांपुढें उरले होते ते गोळा करून त्यांचे बारा करंडे भरले तर हा जो चमत्कार येशूनें केला हा पाहून तीं मनुष्यें म्हणालीं कीं जो भविष्यवादी जगांत याव याचा होता तो हाच आहे खरा

## उपोषणसमयाचा पांचवा आदित्यवार

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा त्वां आपले लोकांवर कृपादृष्टीनें पहावें म्हणून तुला आम्ही विनवितों अशासाठीं कीं त्यांला देहाविषयीं आणि आत्म्याविषयीं तुझे परमप्रसादानें वर्त्तावें आणि संरक्षित करावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र इब्री ९. ११.

तर ख्रिस्त येऊन भविष्य सुभद्र अर्थाचा मुख्य आचार्य आहे महत्तर आणि अधिक संस्कारित अहस्तकृत म्हणजे अनेतत्सृष्टीचे मंडपाकडून अज आणि वत्स यांचे रक्तानें नव्हे परंतु आपलेच रक्तानें आम्हासाठीं तारण पावून तो एकदांच परम पवित्र स्थलांत गेला आहे कांकीं जर वृष आणि अज यांचें रक्त आणि कालवडीची रक्षा अशुद्धांवर शिंपिलीं असतां देहाचे शुद्धतेविषयीं पवित्र करितील तर यांपेक्षां ज्या ख्रिस्तानें सनातन आत्म्याकडून देवाला आपणातें निर्दोष अर्पिलें त्याचें रक्त तुमचें अंतःकरण निर्जीवकर्मापासून जीवंत देवाची सेवा करायास केवढें अधिक शुद्ध करील आणि यासाठीं तो नव्या संधेचा मध्यस्थ आहे कीं पहिले संधेचे प्रतिकूल जीं पातकें घडलेलीं यांचें प्रायश्चित्त करायास तो मरण पावला असतां बलाविलेले जे ते सनातन वतनाचें वचन पावावे



पत्र योहान्न ८. ४६.

मी पापी असें तुह्मामधील कोण ठरवील परंतु मी जर सत्य बोलतों तर तुम्ही मजवर विश्वास कां धरीत नाहीं देवा कडचा, जो आहे तो देवाच्या गोष्टी ऐकतो तुम्ही यास्तव ऐकत नाहीं कीं तुह्मी देवाचे नाहीं तेव्हां यहूदी त्याला उत्तर करीत ह्मणाले काय आम्ही ठीक ह्मणत नाहीं कीं तूं शामारी आहेस आणि भूतग्रस्त आहेस येशूनें उत्तर केलें मी भूतग्रस्त नाहीं पण आपले बापाचा सन्मान मी करितों आणि तुह्मी माझा अपमान करितां मी आपले गौरवाविषयीं झटत नाहीं एक आहे जो झटतो आणि न्यायाधीशी करितो तो मी तुह्माला खचीत खचीत सांगतों जर कोण्ही माझी गोष्ट पाळील तर तो मृत्यु कधीं पाहणार नाहीं यावरून यहूदी त्याला ह्मणाले आतां आम्ही जाणतों कीं तूं भूतग्रस्त आहेस आब्राहाम आणि भविष्यवादी मरून गेले आहेत आणि तूं म्हणतोस जर कोणी माझी गोष्ट पाळील तर तो मरण कधीं चाखणार नाहीं आमचा जो बाप आब्राहाम मरून गेला आहे त्याहून तूं थोर आहेस काय भविष्यवादीहि मरून गेले आहेत तूं आपणास कोण ह्मणवितोस येशूनें उत्तर केलें जर मी आपलें गौरव करितों तर माझें गौरव कांहीं नाहीं जो माझें गौरव करितो तो माझा बाप आहे ज्याविषयीं तुह्मी म्हणतां कीं तो आमचा देव आहे आणि तुम्हीं त्याला वळखलें नाहीं परंतु मी त्याला जाणतों आणि जर मी

बोलतों कीं मी त्याला जाणत नाहीं तर मी तुम्हासारिखा
लटका होईन पण मी त्याला जाणतों आणि त्याची गोष्ट
पाळितों आब्राहाम तुमचा बाप माझा दिवस पहायासाठीं
उल्लासत असे त्यानेंहि तो पाहिला आणि आनंद पावला
नंतर यहूदी त्याला ह्मणाले अजून तुला पन्नास वर्षें झालीं
नाहींत आणि त्वां आब्राहामास पाहिलें काय येशूनें त्यांस
म्हटलें मी तुम्हाला खचीत खचीत सांगतों आब्राहाम झाल्या
पूर्वीं मी आहेंच यावरून त्यानीं त्याजवर फेंकायासाठीं धोंडे
उचलून घेतले पण येशू लपाला आणि देवळांतून निघाला

## पुनरुत्थानसमयाचे पूर्वींचा आदित्यवार

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा ज्या त्वां आपले मनुष्यां
वरचे परम दयेंकरून आपला पुत्र येशू ख्रिस्त आमचा तार
णारा यास मनुष्यावतार घ्यावयास आणि क्रूसावर मरण पावा
यास पाठविलें आहे अशासाठीं कीं त्याचे परम नम्रतेला मनु
ष्यानीं अनुसरावें आह्मी त्याचे सहिष्णुतेस अनुसरूं आणि
त्याचे पुनरुत्थानाचे विभागी होऊं असें कृपा करून दे तोच येशू
ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र फिलिप २. ५.

तर जशी ख्रिस्त येशूची मनोवृत्ति होती अशी तुमची
असावी जो देवरूप असतां देवसंभावित असणें अन्यायी असें
न समजे तथापि सेवकाचा प्रकार धरून व मनुष्यरूप होऊन



त्यानें आपल्यास गौरवशून्य केलें आणि मनुष्याकारी तो
सांपडला असतां आपणातें नम्र स्थितीचें करून मरण
क्रूसाचें मरणहि पावे एवढा अधीन झाला यास्तवच
त्याला देवानें थोर पदवीचें केलें आहे आणि त्याला प्रत्येक
नामाहून थोर नाम दिलें आहे अशासाठीं कीं येशूचे
नामाला जे आकाशांतले व पृथ्वींतले व अधोभुवनांतले यांचा
प्रत्येक गुडघा टेंकला जावा आणि देव जो बाप याचे गौरवा
साठीं येशू ख्रिस्त प्रभु आहे असें प्रत्येक जिव्हेनें अंगीकारावें

### सुवार्त्ता मात्थी २७. १.

तर पहांट उजाडतां सर्व मुख्य आचार्य आणि लोकांतले
वडील यानीं येशूला जिवें मारावें ह्मणून त्यास प्रतिकूल संमं
त्रण केलें मग त्यानीं त्याला बंदीवान करून केलें आणि
पोंत्यसपिलातस जो मुख्य अधिकारी याचे हाताखालीं बस
विलें तेव्हां ज्या यहूद्यानें त्याची सूचना केली होती त्यानें
पाहिलें कीं तो अन्यायी ठरला आहे मग तो पश्चात्ताप
पावला आणि मुख्य आचार्य व वडील यांजला ते तीसरुपये
परत देऊन म्हणाला म्यां निर्दोषी जीवाविषयीं सूचना करून
पाप मात्र जोडिलें आहे ते तर म्हणाले आह्माला काय तूं पहा
नंतर ते रुपये देवळांत टाकून देऊन तो निघाला आणि त्यानें
जाऊन आपण गळफांस घेतला नंतर मुख्य आचार्य ते
रुपये घेऊन ह्मणाले हे अर्पणनिधींत ठेवणें उचित नाहीं
कारण कीं रक्ताचें मोल आहे मग त्यानीं संमंत्रण करून त्या रु
पयानीं कुंभाराचें शेत परदेशी पुरायाठीं विकत घेतलें यावरून

त्या शेताचें नाव आजपर्यंत रक्ताचें शेत असें पडलें आहे तेव्हां दर्मिया भविष्यवाद्यानें जें सांगीतलें होतें त्याची प्रतिति आली कीं ज्याचें मोल ठरविलें होतें ज्याचें मोल इस्राएल लोकानीं ठरविलें होतें त्याचें मोल तीसरुपये ते त्यानीं घेऊन कुंभाराचे शेताला दिले जसें ईश्वरानें मला सांगीतलें तसें नंतर येशू मुख्य अधिकाऱ्यासमोर उभा होता आणि मुख्य अधिकारी त्याला विचारितांना बोलिला काय तूं यहूद्यांचा राजा आहेस येशू त्याजला म्हणाला तूं म्हणतोस मग त्याविषयीं मुख्य आचार्य आणि वडील यानीं साक्ष भरली असतां त्यानें कांहीं उत्तर केलें नाहीं तेव्हां पिलातस त्याला म्हणतो ते तुजविषयीं किती साक्षी भरतात ती तूं ऐकत नाहींस किं काय पण त्यानें कोणत्याहि गोष्टीविषयीं त्याला उत्तर केलें नाहीं यावरून मुख्य अधिकाऱ्याला फार आश्चर्य वाटलें तर प्रत्येक सणास कोण्ही एकादा बंदीवान जो लोकांस योग्य वाटे तो सोडावा अशी मुख्य अधिकाऱ्याची रीति होती त्यासमयीं बाराब्बास म्हणून एक विशेष बंदीवान त्यांजवळ होता तर ते मिळाले तेव्हां पिलातस त्यांला बोलिला म्यां तुम्हासाठीं कोणत्याला सोडावें ह्मणून इच्छितां बाराब्बासाला सोडूं किंवा ख्रिस्त म्हणून जो येशू त्याला सोडूं काय कारण तो समजला कीं मत्सरानें त्यानीं त्याला माझे हाताखालीं बसविलें तेव्हां न्याय सिंहासनावर बसला असतां त्याजकडे त्याचे बायकोनें सांगून पाठविलें कीं तुशीं आणि त्या न्यायी जनाशीं कांहीं नसावें कांकीं त्याविषयीं मला स्वप्नामध्यें आज बहुत



दुःख झालें आहे परंतु मुख्य आचार्य व वडील यानीं लोकांचें मन मानवलें अशासाठीं कीं त्यानी बाराब्बासाला मागून घ्यावें आणि येशूचा नाश करावा नंतर मुख्य अधिकारी यांस उत्तर करीत बोलिला तुम्हासाठीं या दोघांतून कोण त्याला मी सोडूं म्हणून इच्छितां तेव्हां ते बोलिले बाराब्बास पिलातस त्यांस ह्मणतो तर येशू जो ख्रिस्त म्हटलेला त्याला मी काय करूं त्यां सर्वांनीं त्याला ह्मटलें त्याजला क्रूसावर चढवावें मग मुख्य अधिकारी म्हणाला कां त्यानें काय वाईट केलें आहे पण ते अधिकच ओरडून बोलिले त्याला क्रूसावर चढवावें तर आपला उपाय चालत नाहीं पण धुंदाई अधिक होत आहे असें पाहून लोकांदेखतां पिलातस पाणी घेऊने आपल हात धुवीत म्हणाला या न्यायी मनुष्याचे रक्ताविषयीं मी निर्दोष आहें तुम्ही पहा तेव्हां ते सर्व लोक उत्तर करीत म्हणाले कीं त्याचें रक्त आम्हावर व आमचे लेंकरांवर असो तेव्हां त्यानें त्यांसाठीं बाराब्बासास सोडिलें आणि येशूला फटके मारून त्याला क्रूसावर चढवावें म्हणून दिलें तेव्हां मुख्य अधिकाऱ्याचे शिपायानीं येशूला चौकांत नेऊन सारें पलटण त्याजवळ जमविलें आणि त्याचीं चिरगुटें काढून त्याचे अंगांत किरमिजी रंगाचा जामा घातला आणि कांटेरे झाडांचा मुकुट वळून त्याचे डोकीला घातला आणि त्याचे उजवे हातांत एक बोरू दिला आणि त्यासमोर गुडघे टेंकून त्याची थट्टा करीत म्हणाले हे यहूद्यांचे राजा सलाम आणि त्याजवर थुंकून तो बोरू घेऊन त्याचे डोईवर मारिला

नंतर त्यानीं त्याची थट्टा करून तो जामा त्याचे अंगांतून काढिला आणि त्याचींच वस्त्रें त्याजवर घातलीं मग त्यानीं त्याला क्रूसावर चढवायासाठीं नेलें आणि ते निघत होते तेव्हां शिमोन नामें एक कुरेनी माणूस त्यांस सांपडला तो त्याचा क्रूस उचलून वाही असें त्यानीं बलात्कारानें केलें आणि गुल्गोथा म्हणून जी जागा म्हणजे करंटीचा ठाय तेथें घेऊन त्यानीं कडू मिसळलेला आंबट असा एक पदार्थ त्याला प्यायाला दिला तो त्यानें चाखला परंतु पिईना नंतर त्यानीं त्याला क्रूसावर चढवून त्याचीं वस्त्रें पण करून वांटून घेतलीं अशासाठीं कीं भविष्यवाद्यानें जें सांगीतलें तें प्रत्ययास यावें कीं त्यानीं आपापल्यांमध्यें माझीं वस्त्रें वांटलीं आणि माझे पांघरुणांवर पण केला मग तेथें ते त्याला पहात बसले नंतर त्यानीं त्याचे डोईचे वरतीं क्रूसास त्याचा दोषारोप लाविला तो असा लिहिला कीं येशू जो यहूद्यांचा राजा तो हाच आहे त्यावेळीं दोघे लुटारू त्याचे संगतीं क्रूसावर चढविले होते एक उजवे हाताकडेस आणि एक डावे हाताकडेस तेव्हां जे तिकडून चालिले होते त्यानी मान हालवून त्याची निंदा केली आणि म्हटलें जो तूं देऊळ मोडून तीन दिवसांत बांधणारा तो आपणास तार तूं जर देवाचा पुत्र आहेस तर क्रूसावरून उतर असेंच मुख्य आचार्य लेखक आणि वडील सहित त्याची थट्टा करीत बोलिले तो दुसऱ्याला तारित असे पण आपणास तारायला तो समर्थ नाहीं जर तो इस्राएलाचा राजा आहे तर आतां त्यानें क्रूसावरून खालीं उतरावें



म्हणजे त्याजवर आम्ही विश्वास ठेवूं तो देवावर भाव ठेवी जर तो देवाला पाहिजे तर आतां त्यानें त्यास मोकळें करावें कांतर तो ह्मणत असे कीं मी देवाचा पुत्र आहें व जे लुटारू त्याचे संगतीं क्रूसावर चढविले होते त्यानींहि अशीच त्याची निंदा केली आणि बारा वाजल्यापासून तीन वाजत तोंपर्यंत सारे भूमीवर काळोख पडला होता नंतर सुमारें तीन वाजतां येशू मोठ्या शब्दानें ओरडत बोलिला एली एली लाम्मा साबखथानीं म्हणजे माझे देवा माझे देवा मला कां सोडिलें आहेस तेव्हां जे तेथें उभे राहिले होते त्यांतील कित्येक ऐकून ह्मणाले कीं हा एलीयाला बलाविती नंतर लागलाच त्यांतला एक धांवाला आणि वस्त्री घेऊन तींत अम्ल भरून बोरूवर अडकवून त्याला प्यायला देत होता पण वरकड म्हणाले असूंदे एलीया त्याला तारायास येतो किं नाहीं हें पाहूं मग येशूनें पुन्हां मोठ्यानें ओरडून प्राण सोडिला तेव्हां पहा देवळाचा पडदा वरपासून खालपावेतों दुभाग फाटला आणि धरणी कांपली व खडकहि फुटले व थडीं उघडलीं गेलीं आणि वारलेल्यां साधूंचीं बहुत शरीरें उठलीं आणि तो उठल्यानंतर ते थड्यांतून निघून पवित्र नगरांत गेले आणि बहुतांस प्रकट झाले मग जमादार व त्याचे संगतीं जे येशूचा पाहरा करीत होते त्यानीं तो धरणीकंप आणि त्या झालेल्या गोष्टी पाहून ते फार भयभीत झाले आणि ह्मणाले हा देवाचा पुत्र होता खरा

## पुनरुत्थानसमयाचे पूर्वींचा सोमवार

पत्राचे स्थानीं यशाया ६३. १.

जो एदोमाहून येतो आहे जो लोहित वस्त्रांचा बाज
राहून येतो आहे हा कोण आहे हा जो आपले पांघ
रुणानें विराजित असून महापराक्रमानें चालत आहे मी
जो सत्यवादी तारायला समर्थ आहें तो तूं आपले पांघ
रुणानें तांबडा कां आहेस आणि द्राक्षें तुडविण्याचे पात्रांत
तुडविणाऱ्यासारिखीं कां तुझीं वस्त्रें आहेत म्यां एकल्या
नेंच कुंड भरून द्राक्षें तुडविलीं आणि लोकांतला कोण्ही
मसंगतीं नव्हता तर त्यांस मी आपले क्रोधानें तुडवीन
आणि आपले रागानें मी त्यांला सुंदडीन त्यांचें रक्तहि
माझे वस्त्रांवर उसळेल आणि आपला सारा वेष रंगवीन
कां तर प्रतिकाराचा दिवस माझे ध्यानांत आहे आणि
माझे उद्धरलेल्यांचें वर्ष आलें आहे तर कोणी साहाय्य
कर्त्ता नाहीं असें म्यां पाहिलें आणि कोणी उद्धारक नाहीं
म्हणून मला आश्चर्य्य वाटलें तेव्हां माझेच हातानें मसाठीं
तारण केलें व माझे मनस्तेजानेंच मला उद्धरिलें आणि
मी आपले क्रोधानें लोकांस रगडून तुडवीन आणि आपले
रागानें त्यांस उन्मत्त करीन व त्यांचें रक्त भूमीवर पाडीन
मी ईश्वराचे उपकार स्मरेन ईश्वरानें जें आमचें सर्व हित
केलें आहे आणि इस्राएलाचे वंशाचें जें त्यानें दयेनें व
परमकरुणेंकरून अत्यंत हित केलें आहे त्याविषयीं ईश्व



राची स्तुति करीन आणि तो म्हणाला ते माझे लोक
आहेत खरे लेंकरें जीं असत्य बोलणार नाहींत असे ते
आहेत ह्मणून तो त्यांचा तारणारा झाला त्यांचे सर्व कष्टांत
तो कष्ट पावे आणि त्याचा पुरस्कृत दूत त्यांस तारी तो
आपले प्रीतीनें व लीनतेनें त्यांस उद्धरी आणि सर्व पुरा
तन दिवसांत त्यांला उचलून वाही तथापि ते स्वतंत्र होत
असत व त्याचे पवित्र आत्म्यास गांजीत असत यास्तव उल
टून त्यांचा तो शत्रु झाला आणि त्यानें त्यांशीं युद्ध केलें
तदनंतर तो पुरातन दिवस मोशे व आपले लोक यांचें
स्मरण करी ज्यानें त्यांस त्याचे कळपाचे पालकासंगतीं समु
द्रांतून वर आणिलें तो कोठें आहे ज्यानें आपला पवित्र
आत्मा त्याजमध्यें घातला तो कोठें आहे जो आपले गौरवी
भुजानें मोशेचे उजवे हातास वागवीत असे ज्यानें आपल्या
साठीं सनातन नाम करायला त्यांपुढें समुद्र द्विभाग केला
ज्यानें त्यांस खोल स्थलांमधून नेलें तेव्हां जसा घोडा माळा
वर तसे ते अडखळले नाहीं जसा पशु कपारांत उतरत
असतो ज्याला ईश्वराचा आत्मा विसांवा देतो तसें त्वां
आपलेसाठीं गौरवी नाम करायला आपले लोक नेले
आकाशांतून अवलोकन कर आणि आपले पवित्र व गौरवी
वस्तींतून पहा तुझें मनस्तेज व तुझा पराक्रम कोठें आहेत
तुझे आंतड्यांचा कळवळा व तुझी करुणा मजविषयीं बंद
झालीं आहेत काय तूं तर आमचा पिता आहेस आब्राहाम
जरीं आम्हास जाणत नाहीं व इस्राएल आम्हास अंगीका

रीत नाहीं तरीं हे ईश्वरा तूं आमचा पिता आमचा उद्धा रक आहेस तुझें नाम अनादिकालाचें आहे हे ईश्वरा तूं आपले मार्गापासून आम्हास कां बहकूं दिलें आहेस आमचीं हृदयें तूं आपले भयापासून कां कठोर होऊं दिलीं आहेस तूं आपले सेवकांकरितां आपले क्षेत्राचे वर्ण परत आण थोडके वेळां तुझे पवित्र लोकानीं क्षेत्रधारण केलें आहे तुझें पवित्र स्थान आमचे शत्रूनीं तुंदडलें आहे आम्ही पुरातन परंपरेचे आहों तूं त्यांजवर राज्य केलें नाहींस तुझें नाम त्यांजवर ठेविलें नाहीं

सुवार्त्ता मार्कस १४ १.

तर दोन दिवसांनंतर वितरण आणि अफुगलेली भाकरी यांचा सण होता तेव्हां त्यास युक्तीनें धरून वधावें म्हणून मुख्य आचार्य आणि लेखक प्रयत्न करिते झाले ते म्हणाले सणांत नको कदाचित लोक धुंदाई करितील तर तो बेथानीयेंत शिमोन जो कोढ्या याचे घरांत असून तो बसत असतां एक स्त्री नर्द जें महामूल्य म्रक्षण याची एक मर्मरी कुपी घेऊन आली आणि ती मोडून तें म्रक्षण तिनें त्याचे डोईवर ओतलें नंतर कित्येक आपले मनांत कोपून म्हणाले हा म्रक्षणाचा व्यर्थ व्यय कशासाठीं झाला आहे कांकीं हें तीनशें पावल्यांहून अधिकाला विकलें जायास योग्य आणि दरिद्र्यांस दिलें जायास योग्य होतें तेव्हां ते तिला धमकावूं लागले मग येशू बोलिला हिला असूं द्या हिला कां दुःख देतां हिनें शुभकर्म मजवर केलें आहे



कां तर तुह्माला आपले जवळ दरिद्री सर्वदा आहेत आणि तुम्हाला बनतें तेव्हां त्यांचें हित तुह्मास करितां येतें पण मी तुम्हाला सर्वदा नाहीं जें हिच्यानें करवत होतें तें हिनें केलें माझा देह पुरण्यासाठीं हिनें समयाचे पूर्वीं अभ्यंगित केला आहे मी तुम्हास खचीत सांगतों जेथें जेथें ही सुवार्त्ता सर्व जगांत गाजिवली जाईल तेथें तेथें हेंहि जें हिनें केलें आहे हिचे स्मरणार्थ सांगीतलें जाईल मग त्यां बाराजणांतला एक जो यहूदा इस्कार्योतेस तो त्याला त्यांचे हातीं द्यावयास मुख्य आचार्यांजवळ गेला तर ते ऐकून हर्ष पावले आणि त्याला त्यानीं पैका देण्याचें वचन केलें नंतर त्याला त्यांचे हातीं द्यावयास तो सुसमयाची वाट पाहाता झाला मग अफुगलेले भाकरीचे सणाचे पहिले दिवसीं जेव्हां वितरणाचा बलि मारीत असत तेव्हां त्याचे शिष्य त्याला म्हणाले त्वां खावा म्हणून वितरणाचा बलि आम्हीं कोठें जाऊन सिद्ध करावा म्हणून इच्छितोस तेव्हां त्यानें आपले शिष्यांतून दोघांस पाठि वलें आणि सांगीतलें तुह्मी नगरांत जा आणि एक माणूस घागर भरून पाणी वहात तुह्माला आडवा येईल त्याचे मागें तुम्ही चला नंतर तो जेथें आंत जाईल तियल्या गृहस्थाला सांगा कीं तो उपदेशक म्हणतो जींत मी आपले शिष्यांसंगतीं वितरणाचा बलि खाईन ती कोठडी कुठें आहे तेव्हां तो तुह्मास एक मोठी वरची आंथरलेली सिद्ध केलेली अशी कोठडी दाखवील तिथें आम्हासाठीं सिद्ध करा नंतर

त्याचे ते शिष्य निघून गेले आणि नगरांत शिरून जसें त्यानें त्यांस सांगीतलें होतें तसें त्यांस प्राप्त झालें मग ते वितरणाचा बलि सिद्ध करिते झाले तेव्हां सांज झाल्यावर तो त्यां बाराजणांस संगतीं घेऊन आला नंतर ते बसून खात असतां येशू बोलिला मी तुम्हास खचीत सांगतों कीं तुम्हांतला एक जो मजबराबर खात आहे तो मला शत्रूंचे हातीं देईल मग ते खेद पावूं लागले आणि एकेक त्यास ह्मणूं लागले तो मीच आहें काय आणि दुसरा तो मीच काय तेव्हां तो त्यांस उत्तर करीत बोलिला यां बारा जणांतला एक जो मसंगतीं ताटांत तुकडा माखीत आहे तोच आहे मनुष्याचा पुत्र जसें त्याविषयीं लिहिलें आहे तसें जातो खरें पण ज्या माणसाचे हातून मनुष्याचा पुत्र शत्रूंचे हातीं दिला जातो त्याला हाय जर तो मनुष्य उत्पन्न झाला नसता तर त्याला बरें असतें आणि ते जेवीत असतां येशूनें भाकरी घेऊन स्तुति करून मोडिली आणि त्यांजला देऊन म्हटलें तुम्ही घेऊन खा हा माझा देह आहे नंतर त्यानें प्याला घेऊन उपकारस्तुति करून त्यांला दिला त्यांतून ते सगळे प्यायले आणि त्यांस तो म्हणाला हें माझें रक्त जें नवे संधेचें आहे जें बहुतांकरितां पाडिलें जातें मी तुम्हास खचीत सांगतों कीं मी अणखीं द्राक्षेचे उपजावें कांहीं पिणार नाहीं माझे बापाचे राज्यांत मी जेव्हां हें नवें पिणार आहें त्या दिवसापावेतों नंतर ते स्तुतिगायन करून जाइतांचे डोंगराकडे निघाले



तेव्हां येशू त्यांस म्हणतो कीं या रात्रीं तुम्हा सर्वांस मज विषयीं शंका लागेल कांकीं लिहिलें आहे मी मेंढपालास हाणीन आणि मेंढरें उधळलीं जातील पण मी उठल्या वर तुमचे पुढें गालीलांत जाईन नंतर पेत्रस त्याला म्हणाला जरीं सर्वांला शंका लागली तरीं मला लागणार नाहीं तेव्हां येशू त्यास म्हणतो मी तुला खचीत सांगतों आज रात्रीं कोंबडा दोनदां ओरडल्यापूर्वीं माझी अवज्ञा तीनदां करिशील पण तो अणखीं अधिक बोलिला जरीं मला तुसंगतीं मरावें लागलें तरीं तुझी अवज्ञा करणार नाहीं ते सर्वहि असेंच ह्मणाले मग गेथसेमानें म्हटलेले जागेंत ते येतात आणि तो आपले शिष्यांस ह्मणतो मी प्रार्थना करून घेतों तोंपर्यंत तुम्ही इथें बसा तेव्हां त्यानें आपले संगतीं पेत्रस व याकोब व योहान्न यांस घेतलें आणि फार विस्मित आणि खिन्न होऊं लागला आणि त्यांस ह्मणाला माझा जीव मी मरण पावें तोंहि शोकग्रस्त आहे तुह्मी येथें रहा जागृत असा तेव्हां तो थोडासा पुढें जाऊन भुईवर पडला आणि प्रार्थना करिता झाला कीं संभावित असलें तर ही वेळ मजपासून टळून जावी आणि म्हणाला हे बापा तुला सर्व कांहीं संभावित आहे हा प्याला मजपासून काढून घे तथापि माझे इच्छेप्रमाणें नसो पण तुझे इच्छे प्रमाणें असो मग आला तों त्याला ते निजलेले सांपडले तेव्हां तो पेत्रसास बोलिला हे शिमोन निजतोस काय तुला दोन घटका जागवत नाहीं काय तुम्ही जागृत असा आणि

प्रार्थना करा अशासाठीं कीं तुह्मी परीक्षेंत नपडावें आत्मा
तत्पर आहे खरें पण देह अशक्त आहे नंतर त्यानें पुनः
जाऊन तीच गोष्ट बोलत प्रार्थना केली आणि परत आला
ते त्याला फिरून निजलेले सांपडले कांकीं त्यांचे डोळे धुंद
झाले होते आणि त्याला काय उत्तर द्यावें हें त्यांस कळलें
नाहीं नंतर तो तिसऱ्यानें येऊन त्यांस म्हणतो तुम्ही पुढें
निजत जा आणि विसांवा घेत जा झालें वेळ आली आहे
पहा मनुष्याचा पुत्र पाप्यांचे हातीं दिला जातो उठा जाऊं
पहा जो मला हातीं देतो तो जवळ आला आहे नंतर
अजूनपर्यंत तो बोलत असतां लागलाच त्यां बाराजणांतला
एक जो यहूदा तो येतो आणि त्या संगतीं मोठा समु
दाय तलवारी व सोटे घेऊन मुख्य आचार्य व लेखक व
वडील यांपासून येतो ज्यानें त्याला हातीं दिलें त्यानें
त्यांशीं संकेत केला होता कीं ज्याला मी चुंबीन तोच तो
आहे त्याला धरा आणि सुरक्षित न्या मग त्यानें येऊन
लागलेंच त्याजवळ जाऊन म्हटलें राब्बी राब्बी आणि
त्यास चुंबिलें नंतर त्यानें आपले हात त्याला लावून त्यास
धरिलें तेव्हां जवळ उभे होते त्यांतले एकानें तलवार
उपसून मुख्य आचार्याचे सेवकास हाणून त्याचा एक कान
कापून टाकिला मग येशू उत्तर करीत त्यांस म्हणाला
जसे लुटाऱ्यांवर तसे तुम्ही तलवारी व सोटे घेऊन मला
धरायला निघून आलां आहां किं काय देवळांमध्यें नित्य
मी तुह्माला उपदेश करीं तेव्हां तुह्मी मला धरिलें नाहीं



पण हें अशासाठीं होतें आहे कीं लेख प्रत्ययास यावे तेव्हां
सर्व शिष्य त्यास सोडून पळाले आणि कोणी एक तरुण
आपले नागवे अंगावर पांढरें वस्त्र वेष्टून धरून त्यांचे
मागें चालिला तेव्हां त्याला ते दुसरे तरुण धरूं लागले
परंतु तो तें पांढरें वस्त्र टाकून त्यांजपासून नागवा पळाला
नंतर त्यानीं येशूला मुख्य आचार्याकडेस नेलें आणि त्याज
वळ सर्व मुख्य आचार्य व वडील आणि लेखक मिळाले
पेत्रसहि तो मुख्य आचार्याचे वाड्यांत पोंहचेपर्यंत त्याचे मागें
दुरून चालिला आणि सेवकांसंगतीं धगटीशीं आपण शेकत
बसला नंतर मुख्य आचार्य व सर्व मंत्री मंडळी यानीं येशूला
प्राणांत दंड करायासाठीं त्याचे प्रतिकूल साक्ष शोधिली
पण मिळाली नाहीं कांकीं बहुतांनी त्याचे प्रतिकूल खोटी
साक्ष दिली पण त्या साक्षी तुल्य नव्हत्या नंतर कित्येक
उभे राहून त्याचे प्रतिकूल खोटी साक्ष देत बोलिले कीं
आम्हीं त्यास बोलतां ऐकिलें कीं हें हस्तकृत देऊळ मी
मोडून टाकीन आणि तीन दिवसानीं दुसरें जें अहस्तकृत
तें मी बांधीन पण ही त्यांची साक्षहि तुल्य नव्हती मग
मुख्य आचार्य मध्यें उभा राहून येशूला विचारीत बोलिला
काय तूं कांहीं उत्तर करीत नाहींस ते तुझे प्रतिकूल
काय साक्ष देतात तथापि तो उगाच राहिला आणि
कांहीं उत्तर करीना मुख्य आचार्यानें पुनः त्यास विचा
रिलें आणि म्हटलें ख्रिस्त जो सुवंदिताचा पुत्र तो तूंच
आहेस काय तेव्हां येशू बोलिला मी आहें आणि मनु

त्याचे पुत्रास सामर्थ्याचे उजवेकडेस बसतां आणि आकाशांतले आभाळावर येतां तुम्ही पहाल मग मुख्य आचार्य आपलीं वस्त्रें फाडून बोलिला आम्हाला साक्ष्यांची आणखीं गरज काय आहे तुम्ही त्याचें दुर्भाषण ऐकिलें आहे तुम्हाला काय वाटतें त्यां सर्वांनी त्याला उत्तर केलें कीं तो मरणास योग्य आहे नंतर कित्येक त्याजवर थुंकूं लागले आणि त्याचें तोंड बांधून आणि त्यास चपराकून त्याला ह्मणूं लागले भविष्यवाद सांग आणि सेवकांनीं त्याला छड्या मारिल्या नंतर पेत्रस खालीं चौकांत असतां मुख्य आचार्याचे दासींतून एक आली आणि पेत्रसाला आपणास शेकतां पाहून त्याजकडे एक दृष्टि लावून म्हणत्ये येशू जो नाजोरी त्याचे संगतीं तूंहि होतास तेव्हां तो अवज्ञा करून बोलिला तूं जें बोलत्येस तें मला कळत नाहीं आणि समजत नाहीं नंतर तो समोरचे चौकांत बाहेर आला तेव्हां कोंबडा ओरडला मग ती दासी पुनः त्यास पाहून जवळ जे उभे होते त्यांस म्हणूं लागली कीं हा त्यांतलाच आहे तेव्हां त्यानें पुनः अवज्ञा केली मग अंमळशानें जे जवळ उभे होते ते पेत्रसाला बोलिले निश्चयें तूं त्यांतलाच आहेस कांकीं तूं गालीली आहेस आणि तुझी बोली तशीच आहे तेव्हां तो शाप देऊं आणि शपथ वाहूं लागला ज्याविषयीं तुह्मी बोलतां तो मनुष्य मी ओळखत नाहीं तो दुसऱ्यानें कोंबडा ओरडला मग जी गोष्ट येशूनें त्यास म्हटली होती कीं कोंबडा दोनदां ओरडण्यापूर्वीं तूं तीनदां माझी अवज्ञा



करिशील ती त्याला आठवली आणि ध्यानांत आणून तो रडला

## पुनरुत्थानसमयाचे पूर्वींचा मंगळवार.

पत्राचेस्थानीं यशाया ५०. ५.

ईश्वर देवानें माझा कान उघडला आहे मीहि अमान्य झालों नाहीं मी माघारें हटलों नाहीं म्यां मारणाऱ्यांला आपली पाठ दिली आणि केश उपटणाऱ्यांस आपले गाल दिले म्यां थट्टा व थुंकणें यांकडून आपलें तोंड आवरलें नाहीं ईश्वर देव माझें साहाय्य करील यास्तव मला लाज वाटणार नाहीं यास्तवच म्यां गारेसारिखें आपलें तोंड ठेविलें आहे कांकीं मी दबकणार नाहीं असें मला कळत आहे माझा न्याय ठरविणारा जवळ आहे मशीं विवाद कोण करील तर आह्मी दोघे संगतीं उभे राहूं माझा वादी कोण आहे तर तो जवळ येवो पहा ईश्वर देव माझें साहाय्य करील जो मला अन्यायी ठरवील तो कोण आहे पहा ते सर्व वस्त्रासारिखे जीर्ण होतील कसर त्यांला खाईल तुह्मामध्यें ईश्वराला कोण भितो आणि त्याचे सेवकांचें भाषण ऐकतो जो अंधारांत चालत असतांना ज्याला कांहीं उजेड नाहीं तो ईश्वराचे नामावर भाव ठेवो आपले देवाला आश्रयो पहा तुह्मी सर्व विस्तव झाडणारे आणि टेंभा बांधणारे तुम्ही आपले विस्तवाचे उजेडांत चाला आणि जे तुम्ही टेंभे पाजळले त्यांनींच चाला हेंच माझे हातून तुम्हाला होईल तुम्ही क्लेशांत लोळत राहाल

सुवार्त्ता मारकस १५. ५.

तेव्हां उजाडल्यावर लागलेंच मुख्य आचार्य आणि सर्व मंत्रीमंडळ यानीं वडील व लेखकसहित समंत्रण केलें आणि येशूला बंदीवान करून नेलें आणि पिलातसाचे हातीं दिलें मग पिलातसानें त्यास विचारिलें काय तूं यहूद्यांचा राजा आहेस तेव्हां येशू त्याला उत्तर करीत बोलिला तूं ह्मणतोस तेव्हां मुख्य आचार्य बहुत गोष्टींविषयीं त्याला दोष ठेविते झाले नंतर पिलातस पुन: त्याला विचारीत बोलिला तूं कांहीं उत्तर करीत नाहींस काय पहा ते किती तुझे प्रतिकूल साक्ष देतात तथापि येशूनें अजूनपर्यंत कांहींच उत्तर दिलें नाहीं यावरून पिलातसाला आश्चर्य वाटलें तर प्रत्येक सणास जो कोणी एकादा बंदीवान ते मागत त्याला तो सोडीत असे तेव्हां जे धुंदाई करणारे ज्यानींहि धुंदाईंत हत्या केली होती त्यांचे संगतीं एक बाराब्बास म्हणून बंदींत होता मग जसें तो त्यांला करीत असे तसें करावें ह्मणून लोक ओरडत मागूं लागले तेव्हां पिलातस त्यांस उत्तर करीत बोलिला म्यां तुम्हाला यहूद्यांचा राजा सोडावा म्हणून इच्छितां किं काय कांकीं मुख्य आचार्यांनीं मत्सरेंकरून त्याजला हातीं दिलें असें तो समजत होता तेव्हां मुख्य आचार्यांनीं लोकांला उत्तेजन केलें कीं त्यापेक्षां आह्मासाठीं त्यानें बाराब्बासाला सोडावें पण पिलातस पुन: उत्तर करितां त्यांस बोलिला तर तुम्हीं जो यहूद्यांचा राजा म्हणतां त्याला



म्यां काय करावें म्हणून इच्छितां तेव्हां ते पुन: ओरडले कीं त्याला क्रूसावर चढीव नंतर पिलातस त्यांस म्हणाला कां त्यानें काय वाईट केलें आहे पण ते अधिकच ओरडलें कीं त्याला क्रूसावर चढीव तेव्हां पिलातसानें लोकांस जें योग्य वाटलें तें करावयास इच्छून त्यांसाठीं बाराब्बासास सोडिलें आणि येशूस फटके मारून क्रूसावर चढवावें ह्मणून दिलें मग शिपायानीं त्याला प्राईतोर्यन ह्मणून चौकांत नेऊन सारें पलटण एकत्र बलाविलें तेव्हां त्यानीं किर्मिजी रंगाचें वस्त्र त्याचे अंगावर घातलें आणि कांटेरे झाडांचा मुकूट वळून त्याचे डोईस घातला आणि ते त्याला नमस्कारूं लागले कीं हे यहूद्यांचे राजा सलाम नंतर त्यानीं त्याचे डोईवर बोरू मारिला आणि त्याजवर थुंकले आणि गुडघे टेकून त्यास पूजिलें नंतर त्यानीं त्याची यट्टा केल्यावर किरमिजी रंगाचें वस्त्र त्याजवरून काढून त्याचींच वस्त्रें त्याजवर घातलीं आणि त्यास क्रूसावर चढवायासाठीं नेलें तेव्हां अलेक्षांद्रस व रूफस यांचा बाप जो शिमोन कुरेनी मनुष्य तो देशांतून येऊन तिकडून जात होता तो त्याचा क्रूस उचलून वाही असें त्यानीं बलात्कारानें केलें नंतर गुल्गोलथ म्हणून जागा जीचा अर्थ करंटीचा ठाय आहे तिथें त्यास आणितात तेव्हां त्यानीं बोळ मिसळलेला द्राक्षारस त्याला प्यायला दिला पणें तो घेईना मग त्यानीं त्याला क्रूसावर चढवून त्याचे वस्त्रांवर कोण कोणतें एकेकानें घ्यावें हें समजायासाठीं पण करून तीं वांटून घेतलीं आणि नऊ वाजले तेव्हां त्याला त्यानीं

क्रूसावर चढविलें आणि त्याचें अपराधपत्र वरतें लिहिलें होतें असें कीं हा यहूद्यांचा राजा आहे तेव्हां त्याचे संगतीं दोघे लुटारू एक त्याचे उजवेकडेस आणि एक त्याचे डावेकडेस क्रूसावर चढवितात याजवरून जो लेख म्हणतो कीं तो अपराध्यांसहवर्त्तमान मोजिला होता तो प्रत्ययास आला तेव्हां जे तिकडून चालत होते ते मान हालवून त्याला दुर्भाषण करीत बोलिले अरे जो तूं देऊळ मोडून तीन दिवसानीं फिरून बांधणारा तो तूं आपल्याला तार आणि क्रूसावरून उतर असेंच मुख्य आचार्य लेखक सहित परस्परें थट्टा करीत बोलिले तो दुसऱ्यांस तारी त्याच्यानें आपल्यास तारवत नाहीं आतां इस्राएलांचा राजा जो ख्रिस्त त्यानें खालीं उतरावें अशासाठीं कीं आम्हीं पहावें आणि विश्वास धरावा व जे त्याचे संगतीं क्रूसावर चढिवले होते त्यानींहि त्याची निंदा केली तेव्हां बारा वाजल्यापासून तीन वाजतपर्यंत सारे भूमीवर काळोख होता आणि तीन वाजतां येशू मोठे शब्दानें ओरडत बोलिला एलोही एलोही लाम्मा शाबाखथानी याचा अर्थ हे माझे देवा माझे देवा मला कां सोडलेंस तेव्हां जे जवळ उभे राहिले होते त्यांतले कित्येक ऐकून म्हणाले पहा तो एलीयाला बलाविता तेव्हां एकजण धांवाला आणि वज्री अम्लानें भरून बोरूला अडकवून त्याला प्यायला दिलें आणि म्हटलें असूं द्या एलीया त्याला उतरायला येईल किं नाहीं असें आपण पहावें नंतर येशूनें मोठा शब्द करून प्राण सोडिला तेव्हां देवळाचा पडदा वरपासून



खालपर्यंत दुभाग फाटला मग जो जमादार जवळ त्याचे समोर उभा राहिला होता त्यानें पाहिलें कीं त्यानें असें ओरडून प्राण सोडिला तेव्हां तो म्हणाला हा मनुष्य देवाचा पुत्र होता खरा

## पुनरुत्थानसमयाचे पूर्वींचा बुधवार.

पत्र इब्री ९. १६.

तर जेथें मृतपत्र आहे तेथें पत्र कर्त्याचें मरण व्हावें लागतें कारण मरणानंतर तें मृतपत्र ठरतें यामुळें कीं तें पत्र कर्त्ता जीवंत असतां कधीं चालत नाहीं यावरून पहिली जी संधा ती रक्तावांचून ठरविली नव्हती कांकीं नेमाप्रमाणें सारी आज्ञा मोशेनें सारे लोकांस सांगीतली असतां वत्स आणि अज यांचे रक्तासुद्धां पाणी व किरमिजी रंगाची लोंकर व एजोब यांस घेऊन त्याच पुस्तकास व सारे लोकांस शिंपडलें आणि म्हटलें जी संधा देवानें तुम्हाला नेमिली आहे तिचें रक्त हेंच आहे आणि मंडप व सगळीं भजनपात्रें यांसहि त्यानें तसेंच रक्तानें शिंपडलें नेमाप्रमाणेंच प्राय: सर्व पदार्थ रक्तानें शुद्ध केले जातात आणि रक्त पाडिल्यावांचून क्षमा होत नाहीं तर आकाशांतील गोष्टींच्या उपमा यानीं शुद्ध करायाच्या होत्या खरें पण त्याच आकाशांतील गोष्टी यांपेक्षां उत्तम बलीनीं शुद्ध कराव्या लागतात कांकीं खरे पवित्र स्थानाची प्रतिमा जें हस्तकृत पवित्र स्थान आहे त्यांत ख्रिस्त गेला नाहीं पण देवासमोर आम्हासाठीं आतां अभिमुख

व्हावयासाठीं आकाशांतच गेला आहे जसा मुख्य आचार्य प्रति
वर्षीं पररक्त घेऊन परम पवित्र स्थानांत जातो तसा तो आप
णातें वारंवार अर्पायाला आंत गेला असें नाहीं असें असतें
तर जगाचा पाया घातला तेव्हांपासून बहुतवेळां त्याला दुःख
सोसावें लागलें असतें पण आतां युगांचे समाप्तीस तो आपणा
तेंच बलिरूप अर्पून पापहरण करायास एकदांच प्रादुर्भूत
झाला आहे आणि मनुष्यांस जसें एकदांच मरावें लागतें
आणि त्यानंतर न्यायाधीशी होत्ये तसें बहुतांचें पापहरण
करायास ख्रिस्त एकदांच अर्पिला गेला असतां जे त्याची
वाट पाहातात त्यांस तारायासाठीं तो पापावांचून दुसऱ्यानें
प्रादूर्भूत होईल

सुवार्त्ता लूक २२. १.

तर अफुगलेले भाकरीचा जो वितरण म्हणून सण तो
जवळ आला तेव्हां त्यास कसें जिवें मारावें याविषयीं
मुख्य आचार्य व लेखक झटते झाले कांकीं ते लोकांस
भीत होते मग यहूदा ज्याचें उपनाम इस्कारयोतिस तो
त्यां बाराजणांचे गणांतला होता त्यांत सैतान शिरला
तेव्हां तो जाऊन त्याला त्यांचे हातीं कसें द्यावें याविषयीं
मुख्य आचार्य व सरदार यांजवळ बोलिला तेव्हां ते हर्ष
पावले आणि त्यानीं त्याला पैका द्यायाची बोली त्याशीं केली
तेव्हां तो मान्य झाला आणि लोकांस चुकवून त्याला
त्यांचे हातीं द्यावयास सुसमय शोधिता झाला नंतर अफु
गले भाकरीचे सणाचा दिवस आला ज्या त्यांत वितरणाचा



बलि मारून अर्पावा लागत असे तेव्हां तो पेत्रस व
योहान्न यांस पाठवितांना ह्मणाला आम्ही वितरणाचा बलि
खावा म्हणून तुम्ही जाऊन आम्हासाठीं तो सिद्ध करा
तेव्हां ते त्यास म्हणाले आम्ही कोठें जाऊन सिद्ध करावा
म्हणून इच्छितोस तेव्हां तो त्यांस ह्मणाला पहा तुम्ही नगरांत
जात असतां एक माणूस घागर भरून पाणी वहात तुम्हास
आडवा येईल तो ज्या घरांत जाईल तेथें त्याचे मागें
तुम्ही जा आणि त्या घराचे धन्यास सांगा तो उपदेशक
म्हणतो जींत मी आपले शिष्यांसहवर्त्तमान वितरणाचा
बलि भक्षीन ती कोठडी कुठें आहे तेव्हां तोच तुह्माला
एक वरची मोठी आंथरलेली कोठडी दाखवील तेथें तुम्ही
सिद्ध करा नंतर ते जाऊन जसें त्यानें त्यांला सांगीतलें होतें
तसें त्यांस प्राप्त झालें आणि ते वितरणाचा बलि सिद्ध करिते
झाले नंतर वेळ झाली तेव्हां तो जेवायला बसला अणि त्या
संगतीं ते बारा प्रेषितहि जेवायला बसले तेव्हां तो त्यांस
म्हणाला मी दुःख सोसण्याचे पूर्वीं तुह्मासंगतीं हा वित
रणाचा बलि भक्षायला फार आशा धरिली होती कां
तर मी तुम्हास सांगतों कीं जोंपर्यंत हा देवाचे राज्यांत
समाप्तीस येईल तोंपर्यंत यांतलें मी अणखीं कांहीं खाणार
नाहीं नंतर तो प्याला घेऊन उपकारस्तुति करून बोलिला
हें तुम्ही घ्या आणि आपल्यांमध्यें वांटा कांकीं मी तुम्हास
सांगतों कीं जोंपर्यंत देवाचें राज्य येई तोंपर्यंत द्राक्षेचे
उपजांतलें अणखीं कांहीं मी खाणार नाहीं नंतर त्यानें

भाकरी घेऊन उपकारस्तुति करून मोडिली आणि त्यांला देऊन म्हटलें जो माझा देह तुम्हाकरितां दिला आहे तो हाच आहे माझे स्मरणासाठीं तुम्ही हें करीत जा जेवण झाल्यावरहि असेंच त्यानें प्याला घेऊन ह्मटलें हा प्याला माझे रक्तच आहे जें तुम्हाकरितां पाडिलें जातें त्यांत नवी संधा आहे तर पहा जो मला शत्रूचे हातीं देतो त्याचा हात मजसंगतीं मेजावर आहे तर मनुष्याचा पुत्र जसें ठरलें आहे त्याप्रमाणें जातो खरें पण ज्या माणसाकरवें तो हातीं दिला जातो त्याला हाय तेव्हां जो हें करणारा आहे तो त्यांतून कोणता असेल या विषयीं ते आपापल्यांत विचारूं लागले नंतर त्यांतून कोणास थोर मानावें अशी स्पर्द्धा त्यांजमध्यें उत्पन्न झाली तेव्हां तो त्यांस म्हणाला परदेशस्थ लोकांचे राजे त्यांजवर प्रभुत्व करितात आणि त्यांतलें जे अधिकारी ते सुकृती ह्मटलेले आहेत तर तुम्ही असे होऊं नका पण जो कोणी तुम्हामध्यें थोर असावा तर तो धाकला असा व्हावा आणि जो कोणी धनी असावा तर तो सेवक असा व्हावा कांकीं कोणता थोर जो जेवायला बसला आहे तो किंवा जो सेवा करितो तो किं काय जो जेवायला बसला आहे तो किं नाहीं तर तुम्हामध्यें सेवक असा मीच आहें जेहि माझे परीक्षांत मजपाशीं राहिले आहेत ते तुम्हीच आहां आणि जसें मला माझे बापानें राज्य नेमून दिलें आहे तसें मी तुम्हाला राज्य नेमून देतों अशासाठीं कीं



माझे राज्यांत तुम्ही माझे मेजावर खावें प्यावें आणि इस्राएलांचे बारा वर्गांची न्यायाधीशी करीत सिंहासनावर बसावें तेव्हां प्रभु म्हणाला हे शिमोन हे शिमोन पहा तुम्हाला घेऊन गव्हांवाणीं पाखडायला सैतान इच्छिला आहे पण तुझा विश्वास नथकावा म्हणून तुसाठीं म्यां प्रार्थना केली आहे तर तूं फिरून निभावशील तेव्हां आपले भाव्वांस स्थिर कर नंतर तो त्यास म्हणाला हे प्रभो तुझे संगतीं तुरुंगांत व मरायासहि जायला मी सिद्ध आहें तेव्हां तो बोलिला हे पेत्रसा त्वां मला ओळखल्याविषयीं तीनदां नाकारिल्यापूर्वीं आज कोंबडा ओरडणार नाहीं तेव्हां त्यास तो बोलिला जेव्हां म्यां तुम्हास खिसा व झोळणा व जोडे यांवांचून पाठविलें तेव्हां तुम्हाला कांहीं उणें पडलें काय तेव्हां ते म्हणाले कांहीं उणें पडलें नाहीं मग तो त्यांस बोलिला पण आतां ज्याला खिसा आहे त्यानें तो घ्यावा झोळणाहि घ्यावा ज्याला तलवार नाहीं त्यानें आपलें वस्त्र विकून तलवारहि विकत घ्यावी कां तर तुम्हाला मी सांगतों कीं मजविषयीं जें लिहिलें आहे हें अजून प्रत्ययास आलें पाहिजे कीं तो अपराध्यांचे संगतीं मोजला होता कांकीं मजविषयीं ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्यांला समाप्ति लागत्ये तेव्हां ते म्हणाले हे प्रभो पहा इथें दोन तलवारी आहेत तो त्यांस बोलिला तर पुरतें आहे मग तो आपले रीतिप्रमाणें जाइतांचे डोंगरास निघून गेला आणि त्याचे शिष्यहि त्याचे मागें गेले

नंतर तो त्या जागेंत असतां त्यांला बोलिला तुम्ही परी
क्षेंत नपडावें म्हणून प्रार्थना करा तेव्हां तो त्यांपासून
सुमारें एक परतन भर दूर गेला आणि गुडघे टेंकून
प्रार्थना करीत बोलिला हे बापा तुला बनेल तर हा प्याला
मजपासून काढून घ्यावा तथापि माझी इच्छा व्हावी असें
नसो पण तुझी इच्छा व्हावी नंतर त्याचें साहाय्य करीत
एक आकाशांतला दूत त्यास दिसला आणि तो क्लेशांत
पडून फार तत्परतेनें प्रार्थना करीत होता त्याचा घर्महि
भूमीवर पडणारे रक्ताचे बिंदू सारिखा होता नंतर प्रार्थ
नेंतून उठून आपले शिष्यांजवळ आला ते ग्लानीमुळें
त्याला निजलेले सांपडले तेव्हां त्यांस तो बोलिला तुह्मी
निजतां कां परीक्षेंत नपडावें ह्मणून उठून प्रार्थना करा
तो बोलत असतां इतक्यांत पहा समुदाय आणि त्यां
बाराजणांतला एक जो यहूदा ह्मटलेला तो त्याचे पुढें
आला आणि येशूला चुंबायासाठीं त्याचे जवळ गेला पण
येशू त्याला ह्मणाला यहूदा तूं मनुष्याचा पुत्र चुंबनेंक
रून शत्रूंचे हातीं देतोस काय नंतर जे त्याजवळ होते
त्यानीं जें होणार आहे तें जाणून त्यास ह्मटलें हे प्रभो
तरवारीनें हाणूं काय मग त्यांतून कोणेकानें मुख्य आचा
र्याचे सेवकास हाणून त्याचा उजवा कान कापून टाकिला
तेव्हां येशू उत्तर करीत म्हणाला एवढें होऊं द्या मग
त्याचे कानास स्पर्शून त्यास बरें केलें नंतर जे मुख्य आचार्य
व देवळाचे सरदार व वडील जवळ आले होते त्यांस



येशू बोलिला जसे लुटाऱ्यांजवळ तसे तुह्मी तलवारा सोटे
घेऊन निघून आलां आह्मी काय मी नित्य तुम्हाजवळ
देवळांत असें तेव्हां तुम्ही मला हात लाविले नाहीं पण
हीच तुमची वेळ आणि अंधाराचा शक आहे मग त्यानीं
त्याला धरून नेलें आणि मुख्य आचार्याचे घरांत आणिलें
पेत्रसहि दूरून मागें चालिला मग ते चौकामध्यें धगटें
पेटवून तेथें एकत्र बसलें तेव्हां पेत्रस त्यांचे मध्यें बसला
तेव्हां एका दासीनें त्याला धगट्याजवळ बसता पाहिलें
आणि त्याजवर एक दृष्टि लावून म्हटलें हाहि त्यासंगतीं
होता तेव्हां तो त्याची अवज्ञा करीत बोलिला स्त्रिये
त्याला म्यां वळखलें नाहीं मग अंमळशानें कोणी दुसरा
त्यास पाहून म्हणाला तूंहि त्यांतला आहेस तेव्हां पेत्रस
बोलिला हे मनुष्या मी असा नाहीं नंतर सुमारें दोन
घटकांचा अवकाश मध्यें गेल्यावर दुसरा कोणी खरावून
ह्मणाला हाहि निश्चयें त्याचे संगतीं होता कारण कीं
गालीली आहे तेव्हां पेत्रस बोलिला माणसा जें तूं बोल
तोस तें मला समजत नाहीं आणि तो बोलत असतां
इतक्यांत कोंबडा ओरडला नंतर प्रभूनें मागें फिरून
पेत्रसावर दृष्टि लाविली तेव्हां येशूची गोष्ट जशी त्यानें
त्याला सांगीतली होती कीं कोंबडा ओरडल्यापूर्वीं तीनदां
तूं माझी अवज्ञा करिशील ती पेत्रसाला आठवली नंतर
पेत्रस बाहेर जाऊन कष्टेंकरून रडला नंतर जे मनुष्य
येशूला राखीत होते त्यानीं त्याला फटके मारून त्याची

थट्टा केली आणि त्याचें तोंढ बांधून त्यानीं त्याचे तोंडांत चपराका मारिल्या आणि त्याला विचारीत म्हटलें भविष्यवाद सांग ज्यानें तुला हाणिलें तो कोण आहे आणि दुसऱ्या बहुत गोष्टी दुर्भाषण करून ते त्याला बोलिले नंतर दिवस उगवल्यावर लोकांचे वडलांची मंडळी व मुख्य आचार्य व लेखक एकत्र मिळाले आणि त्यास आपले सभेंत आणून बोलिले जर तूं ख्रिस्त आहेस तर आम्हाला सांग तेव्हां त्यांस तो म्हणाला मी जर तुम्हाला सांगेन तर तुम्ही विश्वास धरणार नाहीं आणि मी जर तुम्हाला विचारीन तर तुम्ही मला उत्तर करणार नाहीं आणि मला सोडणार नाहीं आतांपासून पुढें मनुष्याचा पुत्र देवाचे सामर्थ्याचे उजवेकडेस बसेल ते सगळे म्हणाले तर तूं देवाचा पुत्र आहेस काय तो म्हणाला तुम्ही ह्मणतां कीं मी आहें नंतर ते बोलिले आम्हाला अणखीं साक्षीची गरज काय आहे कांकीं आह्मी स्वतां त्याचे तोंडून ऐकिलें आहे

## पुनरुत्थानसमयाचे पूर्वींचा बृहस्पतिवार

पत्र पहिलें कोरिंथ ११. १७.

तुह्मी अधिक बरें व्हावयास असें नाहीं पण अधिक वाईट व्हावयास एकत्र येत असतां असें बोलून मी तुमची स्तुति करीत नाहीं पहिलें तर तुम्ही मंडळींत एकत्र येऊन तुम्हामध्यें भेद असतात असें म्यां ऐकिलें आणि यांतलें मी



कांहींसें खरें मानितों कांकीं तुम्हामध्यें भेद असावे लागतात अशासाठीं कीं तुम्हामध्यें जे सात्विक आहेत ते प्रकट व्हावे तर तुम्ही एकवट होत असतां हें प्रभूचें भोजन खाणें नाहीं कांकीं खाण्यामध्यें प्रत्येक आपलें भोजन दुसऱ्याचे अगोदर घेतो आणि एक भुकेला राहून दुसरा मद्यग्रस्त होतो तर तुह्माला खायासाठीं व प्यायासाठी घरें नाहींत काय देवाचे मंडळीस तुह्मी तुच्छ मानितां आणि ज्यांस धन नाहीं त्यांचा अपमान करितां काय मी तुह्माला काय म्हणूं मी तुमची स्तुति करूं याविषयी मी तुमची स्तुति करीत नाहीं तर म्यां जें प्रभुपासून समजून घेतलें तेंच म्यां तुम्हाला सांगून दिलें आहे कीं ज्या रात्रीं प्रभु येशू शत्रुंचे हातीं दिला होता त्या रात्रीं त्यानें भाकर हातीं घेतली आणि उपकारस्तुति करून मोडली आणि म्हटलें घ्या खा जें माझें शरीर तुम्हाकरितां मोडिलें आहे तें हेंच आहे माझे स्मरणार्थ हें तुम्ही करीत जा भोजन झाल्यावरहि असेंच त्यानें प्याला घेऊन म्हटलें हा प्याला माझे रक्तांत नवी संधा आहे जेव्हां कधीं प्याल तेव्हां माझे स्मरणासाठीं हें करा कारण जेव्हां कधीं ही भाकर तुम्ही खाल आणि हा प्याला प्याल तेव्हां प्रभूचें स्मरण तो येईपर्यंत तुम्ही दाखवून द्याल तर जो कोणी अयोग्य असून प्रभूची भाकर खाईल किंवा प्रभूचा प्याला पिईल तो प्रभूचे शरीराविषयीं व रक्ताविषयीं दोषी होईल तर मनुष्याने आपणास पारखावें नंतर त्यानें त्या भाकरींतलें खावें आणि त्या प्याल्यांतलें प्यावें कांकीं

जो अयोग्य असून खातो आणि पितो तो प्रभूचे शरीराचा विवेक न करितां आपणाला दंड खातो व पितो यास्तव तुम्हामध्यें बहुत अशक्त व ग्लान आहेत आणि कित्येक झोंपेंत पडले आहेत मग जर आह्मीं आपली न्यायाधीशी करूं तर आमची न्यायाधीशी केली जाणार नाहीं पण आमची न्यायाधीशी केली असतां आह्मी प्रभूकडून शिक्षिले जातों अशासाठीं कीं आम्हीं जगासह्वर्त्तमान अन्यायी ठरले न जावें तर माझे भाव्वानों तुह्मी खायाला एकवट येत असतां एकमेकांची वाट पहा जर कोणाला भूक लागल्ये तर घरीं खावें अशासाठीं कीं तुम्हीं दंडास एकवट न यावें तर मी येऊन तेव्हां दुसरे अर्थ यथास्थित करीन

सुवार्त्त लूक २३. १.

तेव्हां त्याचा सर्व समुदाय उठून त्यास पिलातसाजवळ नेलें नंतर त्याला ते दोष ठेवूं लागले आणि बोलिले आम्हास हा लोकांचें मन मोडतां व कैसाराला वसूल देण्याविषयीं निषेध करितां व मी ख्रिस्त राजा आहें असें बोलतां सांपडला तेव्हां पिलातस त्यास विचारीत बोलिला यहूद्यांचा तूं राजा आहेस काय मग तो त्यास उत्तर करीत बोलिला तूं म्हणतोस नंतर पिलातसानें मुख्य आचार्य व समुदाय यांस म्हटलें या मनुष्याकडे मला कांहीं दोष सांपडत नाहीं परंतु ते आग्रह धरून बोलिले कीं तो गालीलाहून आरंभ करून सर्व यहूदा मधून एथपावेतों शिकवून लोकांस चेतवितो तेव्हां पिलात सानें गालिलाविषयीं ऐकून विचारिलें हा मनुष्य गालीली



आहे किं नाही मग तो हेरोदाचे राष्ट्रांतला आहे असें समज त्यावर त्यानें जो हेरोद आपणहि त्यासमयीं येरुशालेमांत होता त्याजवळ याजला पाठिवलें नंतर हेरोद येशूला पाहून फार हर्षला कांकीं त्याविषयीं बहुत गोष्टी ऐकून बहुत वेळ त्याला पहायला तो इच्छित होता आणि त्यानें केलेला कोणेक चमत्कार पहायासाठीं त्यानें आशा धरिली नंतर त्याने त्याला बहुत बोलून विचारिलें परंतु तो त्यास कांहीं उत्तर देईना तेव्हां मुख्य आचार्य व लेखक यानीं उभें राहून त्याजवर निकर्षानें दोष ठेविले नंतर हेरोदानें व त्याचे सरदा रानींहि त्यास तुच्छ मानिलें आणि थट्टाकरून त्यास शोभा वंत वस्त्र लेववून पिलातसाजवळ परत पाठविलें नंतर पिला तस आणि हेरोद त्याच दिवशीं परस्परें मित्र झाले पूर्वी तर ते एकमेकाचे वैरी होते मग पिलातसानें मुख्य आचार्य आणि अधिकारी व लोक यांस एकवट बलावून ह्मटलें तुम्हीं हा मनुष्य लोकांस चेतवितो म्हणून ह्याला मजवळ आणिलें तर पहा मी तुम्हादे खतां परीक्षाकरून ज्यांविषयीं तुम्हीं त्याजवर दोष ठेविला त्यांतला या मनुष्याचे अंगीं मला कांहीं दोष सांपडेना हेरोदालाहि सांपडेना कांकीं मी तुम्हाला त्याजवळ पाठिवलें तर पहा त्यानें मरणास योग्य कांहीं केलें नाहीं तर शिक्षाकरून त्याला सोडून देईन कारण प्रत्येक सणास त्यांस त्याला एक सोडावा लागत असे तेव्हां ते सर्व मिळून ओरडत बोलिले यास काढून टाक आणि आम्हासाठीं बाराब्बा साला सोड जो तो नगरांत कोणी धुंदाई केल्यामुळें व घातामुळें

बंदींत ठेविला होता पिलातस तर येशूला सोडायास इच्छून पुनः सोयानें बोलिला परंतु ते गोंगाट करून बोलिले त्याला क्रूसावर चढीव चढीव क्रूसावर तेव्हां तिसऱ्यानें तो त्यांला बोलिला तर त्यानें काय वाईट केलें आहे त्याजकडे मरणाचा कांहीं दोष मला सांपडत नाहीं तर शिक्षा करून त्यास सोडीन पण त्याला क्रूसावर चढवावें म्हणून सोर्यां शब्दानीं त्यानीं निकड लाविली आणि त्यांचे व मुख्य आचार्यांचे शब्द पराभव पावले तेव्हां पिलातसानें जसें त्यानीं मागीतलें तसें व्हावें असें ठरविलें आणि धुंदाईमुळें व घातामुळें बंदींत ठेविला होता जो त्यानीं मागीतला तोच त्यानें त्यांसाठीं सोडिला आणि येशू त्यांचे मनोदयास अर्पिला ते जेव्हां त्यास घेऊन जात होते तेव्हां शिमोन नामें एक कुरेनी माणूस देशांतून येत होता त्याला त्यानीं धरून येशूचे मागें क्रूस वहायाला लाविलें तेव्हां लोकांचा व बायकांचा मोठा समुदाय त्याचे मागें चालिला ज्या त्या बायका त्याजविषयीं ऊर बडवून शोक करून रडल्या तेव्हां येशू मागें वळून त्यांस म्हणाला अहो येरूशालेमाचे मुलीहो तुम्ही माझेकरितां रडूं नका पण आपलेसाठीं व आपले लेंकरांसाठीं रडा कां तर पहा दिवस येतात ज्यांत म्हणतील ज्या वांझा आहेत व जीं उदरें कधीं प्रसवलीं नाहीं आणि जीं थानें कधीं पाजिलीं नाहीं तीं धन्य आहेत तेव्हां डोंगरांस ह्मणूं लागतील आम्हावर पडा आणि टेंकाडांला म्हणूं लागतील आम्हाला लपवून ठेवा कांकीं जर ओले झाडांत ह्या गोष्टी करितात तर जें सुकें त्यांत काय होईल तेव्हां



दुसरे दोघे दुष्कर्मी त्याजसहवर्त्तनान जिवें मारिले जायास नेले गेले मग त्यानीं करंटीं म्हटलेली जो जागा तींत येऊन तेथें येऊन त्यास आणि त्यां दुष्कर्म्यांस एकास उजवेकडे आणि एकास डावेकडे असें क्रूसावर चढविलें तेव्हां येशू बोलिला हे बापा त्यांस क्षमा कर कांकीं जें करितात तें समजत नाहींत नंतर त्यानीं त्याची वस्त्रें वांटतांना पण केला तेव्हां लोक पहात उभे राहिले होते आणि अधिकारी त्यांसंगती मस्करी करीत बोलिले तो दुसऱ्यांस तारीत असे हाच जर ख्रिस्त देवाचा निवडलेला आहे तर तो आपणातें तारो आणि शिपायांनींहि त्याची थट्टा केली ते जवळ आले आणि त्यास अम्ल देऊन बोलिले जर तूं यहूद्यांचा राजा आहेस तर आपणास तार आणि त्याचे वरले अंगास क्रूसास एक पत्र हेल्लेनी व रोमी व इब्री लिपीनें लिहिलेलें लाविलें होतें असें कीं हा यहूद्यांचा राजा आहे तेव्हां जे क्रूसावर चढविलेले त्यांतला एक त्याला दुर्भाषण करीत बोलिला जर तूं ख्रिस्त आहेस तर आपल्यास आणि आम्हास तार नंतर जो दुसरा तो त्यास धमकावून उत्तर करीत बोलिला तूं याच दंडांत आहेस तर तूं देवाला भीत नाहींस काय तर आम्हीं न्यायानें खरें कांकीं आह्मीं जीं कामें केलीं त्यांचा योग्य दंड आम्ही पावत आहों पण यानें कांहीं अनुचित केलें नाहीं तेव्हां तो येशूला म्हणाला हे प्रभो तूं आपले राज्यांत येशील तेव्हां माझी आठवण कर तेव्हां येशू त्यास म्हणाला मी तुला खचीत सांगतों तूं आज मसंगतीं आकाशवासी

होशील तेव्हां सुमारें बारावाजत होते आणि तीन वाजत पर्यंत सर्व भूमीवर काळोख होता आणि सुर्यै अंधारानें व्याप्त झाला आणि देवळाचा पडदा मध्यें फाटून गेला तेव्हां येशूनें मोठ्या शब्दानें ओरडून ह्मटलें हे बापा मी आपला आत्मा तुझे हातीं सोपून देतों आणि हें म्हटल्यावर प्राण सोडिला मग जें झालें तें जमादारानें पाहून देवाचें गौरव करीत म्हटलें हा मनुष्य खचीत न्यायीच होता तेव्हां सर्व लोक जे तें प्रत्यक्ष पहात उभे होते त्यानीं जें जें झालें तें तें पाहून आपला ऊर बडवून माघारे गेले आणि त्याचे ओळखीचे सगळे व ज्या बायका गालीलाहून त्याचे मागें आल्या त्या ह्या गोष्टी पहात दूरून उभ्या राहिल्या होत्या

## सुभद्रशुक्रवार.

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा आह्मी तुला विनवितों कीं त्वां आपले या कुटुंबाला क्रपादृष्टीनें पहावें ज्या त्या करितां दुष्ट मनुष्याचे हातीं दिला जायास आणि क्रूसावर मरण पावायास आमचा प्रभु येशू ख्रिस्त मान्य झाला जो आतां तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे व राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः अनतां आमेन

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा ज्या तुझे आत्म्याकडून मंडळीचा सर्व समुदाय शासिला जातो व पवित्र केला जातो तुझे पवित्र मंडळींतील सर्व देशांचे मनुष्यांसाठीं आह्मी



तुला ज्या विनंत्या व प्रार्थना करितों त्या ऐकून घे अशासाठीं कीं तींतला प्रत्येकजन आपले प्रकरणांत व कर्मांत सत्यतेनें व भक्तीनें तुझी सेवा करीत जावा येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु आणि तारणारा याचे योगानें आमेन

हे दयाळु देवा ज्या त्वां सर्व मनुष्यांस उत्पन्न केलें जो तूंहि जें कांहीं उत्पन्न केलें आहे त्याचा द्वेष करीत नाहींस आणि कोणत्याहि पापी मनुष्याचा नाश न इच्छितां तो फिरावा व वांचावा म्हणून इच्छितोस सर्व यहूदी व मुसलमान व नास्तिक व पाखंडी जे आहेत त्यांजवर क्रपा करून त्यांपासून सारें अज्ञान व हृदयाचें कठोरपण व तुझे गोष्टींचें तुच्छ मानणें हीं काढून टाक मग हे सुवंदित ईश्वरा त्यांस तूं आपले कळपांत असें आणावें कीं ते साचे इस्राएल्याचे शेष्यामध्यें तारिले जावे आणि एकच कळप एकच मेंढपाळ जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे हाताखालीं व्हावे जो तुझे व पवित्र आत्म्याचे सह वर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

पत्र इब्री १०. १.

तर नेमाला भविष्य सभद्र अर्थांची छाया असून त्यां अर्थांची पुरती प्रतिमा नसून जे बलि प्रतिवर्षीं नित्य अर्पून देतात त्यांकडून त्याच्यानें शरणागतांस कधीं सिद्धीस आणवत नाहीं असें असलें तर ते बलि अर्पिले जातां राहिलें असते कांकीं यज्ञ करणारे एकदां शुद्ध झाले असतां

त्यांला अणखीं कांहीं पापाचें स्मरण रहात नसतें पण त्यां बलींकडून प्रतिवर्षीं पापांची आठवण होत्ये कां तर वृष आणि आज यांचे रक्ताच्यानें पापहरण करवेना यास्तव तो जगांत येत असतां ह्मणतो बलि आणि अर्पण हीं तूं इच्छिलीं नाहींस त्वां मसाठीं देह सिद्ध केला आहे सकलाग्निष्टोम व प्रायश्चित्त बलि तुला आवडेनात तेव्हां मी म्हणालों पहा हे देवा तुझा मनोदय सिद्ध करायास मी येतों असें मजविषयीं ग्रंथाचे गुंडळीमध्यें लिहिलें आहे वरतें जेव्हां म्हणाला कीं बलि व अर्पण व सकलाग्निष्टोम आणि प्रायश्चित्तबलि हीं तूं इच्छिलीं नाहींस आणि तुला तीं आवडलीं नाहींत म्हणजे जीं नेमाप्रमाणें अर्पिलीं जात असतात तीं तेव्हां तो ह्मणाला पहा हे देवा मी तुझा मनोदय सिद्ध करायास येतों तो पहिलें नाहींसें करून टाकितों अशासाठीं कीं त्यानें दुसरें स्थापावें ज्या त्या मनोदयानें आह्मी येशू ख्रिस्ताचा देह एकदांच अर्पिल्यानें पवित्र केले जातों तर प्रत्येक आचार्य नित्य सेवा करीत आणि सारखेच बलि ज्यां त्यांच्यानीं कधीं पाप हरण करवत नाहीं त्यां तें वारंवार अर्पित उभा राहतो खरें पण हा पापामुळें एकच बलि अर्पून देवाचे उजवे कडे सर्वकाळ बसला आहे आतांपासून त्याचे शत्रु त्याचें पादासन जोंपर्यंत ठेविले जातील तोंपर्यंत वाट पहात असून कांकीं त्यानें एकाच अर्पणेंकरून पवित्र केलेल्यांस पुरती सिद्धि केली आहे पवित्र आत्माहि आम्हास साक्ष देतो



कारण पूर्वीं सांगीतल्यावर कीं ईश्वर ह्मणतो त्यां दिवसा नंतर मी जो संधा त्यांशीं करीन तो हाच आहे मी त्यांचे हृदयांत आपले नेम घालून ते त्यांचे मनांत लिहून ठेवीन आणि त्यांचीं पापें व अपराध यांस पुढें मी आठि वणार नाहीं तर जिथें यांची क्षमा आहे तिथें प्राय श्चित्त बलि अणखीं होत नाहीं यास्तव भाव्वानों येशूनें जो नवा जीवंत मार्ग पडद्याकडून ह्मणजे आपले देहेंक डून आम्हासाठीं स्थापिला आहे त्याजकडून पवित्र स्थानांत जायाला आह्मास त्याचे रक्तांकडून धैर्य असतां व आम्हास देवाचे कुटुंबावर मुख्य आचार्य असतां सात्विक हृदय धरून पुरते विश्वासानें आम्ही जवळ यावें आमचीं हृदयें दुष्ट अंत:करणापासून स्वच्छ शिंपिलीं असतां आणि आमचा देह स्वच्छ पाण्यानें धुतला असतां आह्मी आशेचा अंगीकार स्थिर धरावा कां तर ज्यानें वचन दिलें आहे तो विश्वासू आहे आणि प्रीतीचें व सत्कर्माचें उत्तेजन व्हावें म्हणून आम्हीं एकमेकांस ध्यानांत धरावें जशी कित्येकांची चाल आहे तसें तुह्मी आपलें एकत्र मिळणें सोडूं नका पण एकमेकांस संबोध करीत जा आणि जितका जितका जवळ तो दिवस येतां पहाल तितका तितका अधिक संबोध करीत जा

सुवार्त्ता योहान्न १९. १.

तेव्हां तर पिलातसानें येशूला घेऊन त्याला फटके मारिले मग शिपायांनी कांटेरे झाडांचा मुकुट वळून त्याचे

डोईस घातला आणि किरमिजी रंगाचें चिरगूट त्याचे अंगावर घातलें आणि ह्मटलें हे यहूद्यांचे राजा सलाम नंतर त्यानें त्याला चपराका मारिल्या पिलातस तर पुनः बाहेर येऊन त्यांस बोलिला पहा मी त्याला तुम्हाजवळ बाहेर आणितों अशासाठीं कीं तुम्ही समजावें कीं मला त्याजकडे कांहीं दोष दिसत नाहीं मग येशू कांटेरे झाडांचा मुकुट आणि किरमिजी रंगाचें चिरगूट धरीत बाहेर आला तेव्हां त्यांस पिलातस म्हणतो पहा हा मनुष्य तर आचार्यांनीं व पुजाऱ्यानीं पाहिला तेव्हां ते ओरडत बोलिले याला क्रूसावर चढीव चढीव क्रूसावर तेव्हां पिलातस त्यांला म्हणाला तुम्ही याला घेऊन क्रूसावर चढवा कांकीं मला त्याजकडे कांहीं दोष दिसत नाहीं यहूदी त्याला उत्तर करीत बोलिले आमचा नेम आहे आणि आमचे नेमाप्रमाणें तो मरणास योग्य आहे कांकीं त्यानें आपल्याला देवाचा पुत्र म्हणिवलें तर ही गोष्ट जेव्हां पिलातसाचे कानीं पडली तेव्हां तो अधिकच भ्याला आणि वाड्यांत परत जाऊन येशूला म्हणतो तूं कोठचा आहेस पण येशूनें त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं यास्तव पिलातस त्याला म्हणतो तूं मशीं बोलत नाहींस काय तुला क्रूसावर चढवायला मला अधिकार आहे आणि तुला सोडायला मला अधिकार आहे हें तुला कळलें नाहीं किं काय येशूनें उत्तर केलें तुला जर वरतून दिलें नसतें तर मजवर तुझा कांहीं अधिकार नसता यास्तव



ज्यानें मला तुझे हातीं दिलें त्याला फारच पातक आहे तेव्हांपासून पिलातस त्याला सोडायला झटता झाला पण यहूदी ओरडत बोलिले जर तूं याला सोडशील तर तूं काईसाराचा मित्र नव्हेस जो कोणी आपणास राजा ह्मणिवतो तो काईसाराचे प्रतिकूल बोलतो तर पिलातसानें ही गोष्ट ऐकून येशूला बाहेर आणिलें आणि जो जागा चिरेबंदी ह्मटलेली आणि इब्री भाषेंत गब्बाथा म्हटलेली तेथें तो सिंहासनावर बसला तेव्हां वितरणाचें सिद्ध करणें होतें आणि सुमारें सहा वाजत होते तेव्हां तो यहूद्यांला बोलतो पहा तुमचा राजा तेव्हां ते ओरडले त्याला काढून टाक टाक काढून त्याला क्रूसावर बशीव पिलातस त्यांला म्हणतो कां पण मी तुमचा राजा क्रूसावर चढवूं मुख्य आचार्यांनीं उत्तर केलें काईसारा वांचून आमचा कोणी राजा नाहीं नंतर त्यानें त्याला क्रूसावर चढवाया साठीं त्यांचे हातीं दिलें तेव्हां ते येशूला घेऊन गेले आणि तो अपलें क्रूस वहात जी जागा करंटी ह्मटलेली व इब्री भाषेंत गुल्गोलेथ ह्मटलेली आहे तिकडे चालिला जेथें त्यानीं त्याला व त्याचे संगतीं दुसरे दोघांला दोहीं अंगांस आणि एकटे येशूला मध्यें क्रूसावर चढिवलें मग पिलातसानें एक नाम लिहून क्रूसावरतों लाविलें तें असें लिहिलें होतें येशू जो नाजोरी जो यहूद्यांचा राजा हें नाम तर यहूद्यांतील बहुतानीं वाचलें कांकीं येशूला जिथें क्रूसावर चढिवलें होतें तो जागा नगराजवळ होती

तेंहि इब्री व हेलेनी व रोमी या भाषांत लिहिलें होतें यास्तव यहूद्यांचे मुख्य आचार्य पिलातसास म्हणाले यहूद्यांचा राजा असें लिहूं नको परंतु असें कीं तो म्हणाला मी यहूद्यांचा राजा आहें पिलातसानें उत्तर केलें जें म्यां लिहिलें आहे तें लिहिलेंच आहे नंतर शिपायानीं येशूला क्रूसावर चढवून त्याचीं वस्त्रें घेतलीं आणि तीन वांटे केले एकेका शिपायाला एकेक वांटा आणि त्याचा अंगरखा तो अंगरखा तर शिवणी वांचून होता वरतून चहूंकडे विणलेला होता यास्तव ते एकमेकास म्हणाले तो आपण फाडूं नये पण कोणी घ्यावा म्हणून पण करावा अशासाठीं कीं जो लेख ह्मणतो माझीं वस्त्रें त्यानीं आपापल्यांमध्यें वांटून घेतलीं आणि माझे पांघरुणावर त्यानीं पण केला तो प्रत्ययास यावा शिपायानीं तर ह्या गोष्टी केल्या खरें आणि येशूचे क्रूसाजवळ त्याची आई व त्याचे आईची बहीण मार्था जी क्लिओपासाची बायको व मार्था जी माग्दालेनें ह्या उभ्या राहिल्या होत्या येशू तर आपले आईला व ज्या शिष्यावर तो प्रीति करीत असे त्याला उभें राहतां पाहून आपले आईला म्हणतो हे स्त्रिये पहा तुझा पुत्र नंतर त्या शिष्याला म्हणतो पहा तुझी आई मग त्याच वेळेपासून त्या शिष्यानें तिला आपले कुटुंबांत घेतलें मग येशूनें जाणलें कीं आतां सर्व गोष्टी समाप्तीस आल्या आहेत लेख प्रत्ययास यावयासाठीं बोलतो मला तहान लागली आहे तर अम्लानें भरलेलें एक भांडें



ठेविलें होतें त्यानीं तर एका वस्त्रांत अम्ल भरिला आणि एजोबावर ठेवून त्याचे तोंडाशीं लाविली तर जेव्हां तो अम्ल येशूनें घेतला तेव्हां तो म्हणाला समाप्त झालें आहे नंतर त्यानें ओणवून प्राण सोडिला तर तेव्हां सिद्धकरणें होतें यास्तव शाब्बाथांमध्यें तो शाब्बाथाचा दिवस मोठा दिवस होता मडीं क्रूसावर न रहावीं ह्मणून त्यांचे पाय मोडून तीं काढावीं असें यहूद्यांनी पिलातसाजवळ मागीतलें मग शिपायांनी येऊन पहिल्याचे व दुसरा जो त्यासंगतीं क्रूसावर चढिवला होता त्याचेहि पाय मोडिले खरें परंतु येशूजवळ आले तों तो अगोदरच मेलेला आहे असें पाहून त्यानीं त्याचे पाय मोडिले नाहीं तथापि एका शिपायानें त्याचे पार्श्वास भाला भोंसकला आणि लागलेंच रक्त व पाणी निघालें ज्यानें पाहिलें आहे त्यानेंच साक्ष दिली आहे व त्याची साक्ष खरी आहे तोहि जाणतो कीं आपण सत्य बोलतों अशासाठीं कीं तुह्मी विश्वास धरावा कांकीं ह्या गोष्टी यासाठीं झाल्या कीं लेख प्रत्ययास यावा कीं त्याचें एक हाडहि मोडलें जाणार नाहीं आणि दुसरा लेख म्हणतो ज्याला त्यानीं भोंसकलें त्याजकडे ते दृष्टि लावितील

## पुनरुत्थानसमयाचे पूर्वीचा सायंकाळ

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा जसा आम्हीं तुझा सुवंदित पुत्र आमचा तारणारा

येशू ख्रिस्त याचे मरणावारी बाप्तिस्मा घेतला तसें आम्हीं आपले दुष्ट मनोरथांस नित्य जिंकून त्याचे संगतीं पुरलें जावें आणि मरण व कबर यांचे द्वारामधून आमचे हर्षकारक पुनरुत्थानास पोंहचावें जो आम्हासाठी मरण पावला व पुरला गेला आणि पुनः उठला तो तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे पुण्याकरितां आमेन

पत्र पहिलें पेत्रस ३. १७.

कांकीं तुम्हीं दुःख सोसावें असा जर देवाचा मनोरथ असला तर वाईट करून दुःख सोसणें यापेक्षां बरेंकरून दुःख सोसणें हें उत्तम आहे कांतर ख्रिस्त जो न्यायी यानें अन्यायी जे यांचे स्थानीं पापामुळें एकदां दुःख सोशिलें अशासाठीं की त्यानें आम्हास देवाजवळ आणावें तो माणसाकडून जिवें मारिला गेला खरें पण आत्म्याकडून पुनः जीवंत झाला ज्या त्या आत्म्याकडूनच तो जाऊन जे आत्मे आतां बंदींत आहेत त्यांस उपदेश करी जे पूर्वीं अनधीन असत जेव्हां एकदां देवाची सहिष्णुता वाट पाहीं नोहाचे दिवसांत गलबत सिद्ध करायाचे वेळेस ज्यामध्यें थोडे म्हणजें आठजण पाण्यांतून तरले ज्याचीं प्रतिमा म्हणजे बाप्तिस्मा जो केवळ देहमलाची शुद्धि असा नाहीं पण देवाकडे सदंतकरणाचा प्रतिवाद आहे ती आम्हास येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थानेंकरून आतां तारित्ये जो आकाशांत जाऊन देवाचे उजवेकडे आहे दूत आणि अधिकार व सामर्थ्यें त्याचे स्वाधीन असतां



सुवार्त्ता मात्थी २७. ५७.

नंतर सांज झाली असतां एक योसेफ नामें धनवंत मनुष्य जो आपणहि येशूचा शिष्य होता तो अरिमाथाईपासून येऊन त्यानें पिलातसापाशीं जाऊन येशूचें प्रेत मागीतलें तेव्हां प्रेत द्यावें अशी पिलातसानें आज्ञा दिली नंतर योसेफानें प्रेत घेऊन स्वच्छ पांढरे वस्त्रानें गुंडाळिलें आपलें जें नवें थडें त्यानें खडकांत कोरिलें होतें त्यांत तें ठेविलें आणि थड्याचे द्वाराला मोठा एक दगड लोटून तो गेला तेव्हां मार्या माग्दालेनें आणि दुसरी मार्या ह्या तेथें थड्यासमोर बसल्या होत्या नंतर उद्यांचे दिवसीं जो दिवस सिद्धकरण्यानंतर आहे त्यांत मुख्य आचर्य व फरीशी पिलातसाजवळ एकवट येऊन बोलिले साहेब त्या ठकानें जीवंत असतांना म्हटलें मी तीन दिवसां नंतर जीवंत होऊन उठणार आहें असें आम्हाला स्मरतें यास्तव तीन दिवसां पर्यंत थडें सुरक्षित राखावें अशी तूं आज्ञा दे नाहींतर कदाचित त्याचे शिष्य रात्रीं येऊन त्याला चोरितील आणि लोकांला सांगतील तो मेलेल्यामधून उठला आहे मग शेवटलें ठकविणें पहिल्यापेक्षां वाईट होईल पिलातस त्यांस म्हणाला तुह्माला पाहरा आहे जा तुम्हाला ठाऊक आहे त्याप्रमाणें निर्भय करा नंतर त्यानीं जाऊन त्या दगडावर मुद्रा छापून पाहारा ठेवून थडें निर्भय केलें

## पुनरुत्थानाचा दिवस

सकाळचेप्रार्थनेस पंचाणवावे गीताचेस्थानीं हीं उपगीतें गावीं किंवा कथावीं

तर ख्रिस्तच जो आमचा वितरणबलि तो आह्मासाठीं मारून अर्पिलेला आहे यास्तव आम्हीं सण पाळावा ❋

जुने फुगवणाकडून किंवा द्रोह व दुष्टता यांचे फुगवणाकडून नव्हे पण सात्विकता सत्यता यांचे अफुगलेले भाकरीकडून असापाळावा ❋ पहिलें कोरिंथ. ५. ७.

ख्रिस्त मेलेल्यांमधून उठला असतां अणखी मरत नाहीं त्याजवर मृत्यु अणखीं प्रभुत्व करीत नाहीं ❋

कां कीं जेव्हां तो मेला तेव्हां पापामुळें एकदांच मेला पण तो जीवंत असतां देवाला जीवंत आहे ❋

तसे तुह्मीहि आपणातें पापामुळें मेलेले खरें पण ख्रिस्त जो आमचा प्रभु याकडून देवासाठीं जीवंत असें माना ❋ रोम. ६. ९.

ख्रिस्त मेलेल्यांमधून उठला आहे आणि जे निजलेले यांचा प्रथम उपजतो झाला आहे ❋

तर मनुष्याकडून मरण झालें याजकरितां मनुष्याकडून मेलेल्याचें पुनरुत्थानहि झालें आहे ❋

कांकीं जसे आदामाकडून सर्व मेले जातात तसेच ख्रिस्ताकडून सर्व जीवंत केले जातील ❋ पहिलें कोरिंथ. १५. २०.

बाप आणि पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें जसें पहिल्यानें होतें आतां आहे सनातनत: होईल आमेन



### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपला एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त याकडून मृत्यूला जिंकिलें आहे आणि आम्हासाठीं सनातन जीवनाचें द्वार उघडिलें आहे त्या तुला आम्ही नम्रतेनें विनवितों कीं जसा तूं आम्हाला आपला विशेष सत्वगुण आगोदर देऊन आमचे मनांत सदिच्छा उत्पन्न करीतोस तसें आह्मीं त्यांला तुझे अखंडीत साहाय्येंकरून सिद्धीस आणावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन:

पत्र कोलोस ३. १.

तुम्हीं ख्रिस्तासहित जर उठलां तर जेथें ख्रिस्त देवाचे उजवेकडे बसला आहे तेथचे वरले अर्थ तुम्ही शोधित जा वरील अर्थांवर तुम्ही आपलें मन लावा पृथ्वींतले अर्थांवर नका लावूं कां तर तुम्ही मेलेले आहां आणि तुमचें जीवन ख्रिस्ता संगतीं देवांत गुप्त राखिलें आहे ख्रिस्त जो आमचें जीवन तो जेव्हां प्रकट होईल तेव्हां तुम्हीहि त्याचे संगतीं गौरवयुक्त प्रकट व्हाल यास्तव व्यभिचार मलिनता दुर्माया दुरिच्छा व लोभ जो तो मूर्त्ति पूजाच आहे यांस सोडून तुम्ही आपले पृथ्वींतले अवयवांचें दंडन करा ज्यां त्यां अर्थांमुळें देवाचा क्रोध अनधीन मनुष्यांवर येतो ज्यां त्यांमध्यें तुम्हीहि वर्त्तत असा जेव्हां त्यांमध्यें तुह्मी जीवत असा तेव्हां

सुवार्त्ता योहान. २०. १.

मग शाब्बाथानंतर पहिले दिवशीं मार्या माग्दालेने मोठ्या पहांटेस काळोखी असतां थडग्यास येत्ये आणि थड्यापासून तो दगड काढिला आहे असें पाहत्ये तेव्हां शिमोन पेत्रस व तो दुसरा शिष्य ज्याशीं येशू मैत्री करी त्यांजवळ ती धावून येत्ये आणि त्यांला म्हणत्ये त्यानीं प्रभूला थड्यांतून काढून नेलें आणि त्याला त्यानीं कुठें ठेविलें हें आम्हाला कळत नाहीं नंतर पेत्रस आणि तो दुसरा शिष्य निघून थड्यास जात होते ते तर दोघे संगतीं धांवाले आणि तो दुसरा शिष्य पेत्रसापेक्षां वेगें धावून थड्यास प्रथम आला आणि डोई पुढें करून तीं पांढरीं वस्त्रें ठेविलीं पाहतो पण आंत गेला नाहीं नंतर शिमोन पेत्रस त्याच मागें येऊन पोंहचतो आणि थड्यांत जाऊन तोहि तीं वस्त्रें ठेविलीं पाहतो आणि जो रुमाल त्याचे डोईवर होता तो त्यां वस्त्रांसहित ठेविला नव्हता पण एके टिकाणीं वेगळा घडीकरून ठेविला होता तर तेव्हां दुसरा जो शिष्य प्रथम थड्यास आला त्यानेंहि आंत जाऊन पाहिलें आणि विश्वास धरिला कांकीं हा लेख ते अजून समजले नव्हते कीं त्याला मेलेल्यांमधून उठावें लागतें मग ते शिष्य माघारे आपले घरीं गेले

## पुनरुत्थानसमयानंतर जो सोमवार

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपला एकुलता पुत्र जो येशू



ख्रिस्त याकडून मृत्यूला जिंकिलें आहे आणि आम्हासाठीं सनातन जिवनाचें द्वार उघडिलें आहे त्या तुला आह्मी नम्रतेनें विनवितों कीं जसा तूं आह्मास आपला विशेष सत्गुण आगो दर देऊन आमचे मनांत सदिच्छा उत्पन्न करितोस तसें आम्हीं त्यांला तुझे अखंडित साहाय्येंकरून सिद्धीस आणावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

प्रचारेकांनीं प्रेषितांचा वृत्तांत १०. ३४.

तेव्हां पेत्रस आपलें तोंड उघडून बोलिला कीं निश्चयें मी समजतों कीं देव पक्षपात करणारा नाहीं पण सर्व जातीं मध्यें जो कोण्ही त्याला भितो आणि यथार्थपणें वर्त्ततो तो त्यास प्रिय आहे त्यानें जी गोष्ट येशू ख्रिस्त जो सर्वांचा प्रभु आहे याजकडून साम प्रसिद्ध करून इस्राएली लोकांस पाठविली तिजप्रमाणें जो योहानानें बाप्तिस्मा सांगून दिला त्यानंतर जें वर्त्तमान गालीलाहून आरंभून सारे यहूदामध्यें झालें तें तुम्हास कळलें आहे म्हणजे नाजरेथाचा जो येशू त्यास देवानें पवित्र आत्मा व सामर्थ्य यांकडून अभिषिक्त केलें जो तो सुकर्में करीत आणि सैतानानें पीडिलेले जे सर्व होते त्यांस बरें करीत फिरत असे कांकीं देव त्यासंगातें होता आणि यहूद्यांचे देशांत व येरूशलेमांत ज्या सर्व गोष्टी त्यानें केल्या त्यांचे साक्षी आह्मी आहों ज्याला त्यानीं खांबावर चढवून वधिलें त्याला

देवानें तिसरे दिवसीं उठिवलें आणि त्यास प्रकट होऊं दिलें सर्व लोकांस असें नाहीं पण देवानें पूर्वी निवडलेले साक्ष्यांस म्हणजे आम्हास तो मेलेल्यांमधून पुन: उठल्यावर जे आम्ही] त्याजसंगतीं खालों प्यालों आम्हालाहि त्यानें आज्ञा दिली कीं लोकांला गाजवून सांगावें आणि साक्ष द्यावी देवानें जो जीवंतांचा व मेलेल्यांचा न्यायाधीश नेमिलेला आहे तो हाच आहे त्याजविषयीं सर्व भविष्यवादी साक्ष देतात कीं जो कोणी त्याजवर विश्वास ठेवील तो त्याचे नामेंकरून पापांची क्षमा पावेल

सुवार्त्ता लूक २४. १३.

नंतर पहा त्याच दिवसीं त्यांतले दोघे एम्माऊस म्हणून एक गांव जो येरूशालेमाहून पावणे चार कोश होता त्याकडे जात होते तर ते त्या सर्व झालेल्या गोष्टींविषयीं परस्परें बोलत होते मग ते परस्पर बोलत व विचारित आसतां असें झालें कीं येशू आपण जवळ येऊन त्यांचे संगतीं चालिला पण त्यानीं त्याला न वळखावें म्हणून त्यांचे डोळे बंद झाले होते तेव्हां तो त्यांस बोलिला तुम्ही ज्या गोष्टी चालत आणि शोकार्त्त असत एकमेकाशीं बोलतां ह्या कोणत्या नंतर त्यांतला एक ज्याचें नाम क्लेओपास तो उत्तर करित त्याला ह्मणाला काय तूं एकलाच येरूशालेमांत राहतोस म्हणून यांदिवसांत तिथें ज्या गोष्टी झाल्या आहेत त्या तुला कळल्या नाहींत तेव्हां तो त्यांस म्हणाला कशा ते त्याला सांगूं लागले नाजरेथाचा जो येशू त्याजविषयीं जो भविष्यवादी



देवाचें व सर्व लोकांचे देखतां कर्माचा व वाचेचा समर्थ असा होता त्याला तर आमचे मुख्य आचार्य व अधिकारी यानीं प्राणांत दंड व्हावयास हातीं देऊन क्रूसावर चढिवलें तरीं आह्मी आशा धरीत होतों कीं इस्त्राएलांस जो मूक्तकरणारा आहे तो हाच आहे अणखीं दूसरें प्रकरण कीं तीं वर्त्तमानें झाल्या पासून आज तिसरा दिवस क्रमत आहे अणखीहि आमच्यां तील कित्येक स्त्रियांनीं आम्हास विस्मित केलें त्या पाहांटेस थड्यास गेल्या आणि त्याचें प्रेत नाहीं असें पाहून आल्या आणि बोलिल्य कीं आम्ही दुतांचा दृष्टावा पाहिला जे बोलिले कीं तो जीवत आहे मग आम्हाजवळचे कित्येक थड्यास जाऊन जसें स्त्रियानीं सांगीतलें होतें तसें त्यानीं पाहिलें परंतु त्याला त्यानीं पाहिलें नाहीं तेव्हां तो त्यांस म्हणाला अहो निर्बुद्धि अणखीं सर्व जें भविष्यवाद्यानीं सांगीतलें त्याचा विश्वास धरायला मनाचे मंद अहो ख्रिस्ताला तीं दुखें: सोसून आपले गौरवांत जावें लागलें होतें किं नाहीं मग त्यानें मोशे पासून आरंभ करून सर्व भविष्यवाद्यांपासून सर्व लेखांमध्यें आपलेविषयीं ज्या गोष्टी आहेत त्यांचा उलगडा केला नंतर ज्या गांवाकडे ते चालिले होते त्याजवळ आले तेव्हां तो अणखीं पूढें जाणार असा दिसला पण त्यानीं त्याला आग्रह करून म्हटलें आह्मासंगतीं रहा कांकीं सांज जवळ आहे आणि दिवस मावळतो तेव्हां तो त्यांसंगतीं रहायास आंत गेला नंतर असें झालें कीं त्यानें त्यांसंगतीं जेवायला बसून भाकरी घेऊन स्तुति केली आणि मोडून त्यांला दिली

तेव्हां त्यांचे डोळे उघडे झाले आणि त्याला त्यांनीं वळखलें मग तो त्यांजपासून अदृष्ट झाला तेव्हां ते एकमेकास म्हणाले तो वाटेंत आम्हाशीं बोलत होता आणि लेखांचा उलगडा करीत होता तेव्हां आम्हामध्यें आमचें हृदय जळत होतें किं नाहीं ते तर त्याच वेळेस उठून माघारे येरूशालेमास गेले तेव्हां त्यांला ते अकरा जण आणि त्याचें सहाय एकवट मिळालेले असे सांपडले ते बोलिले कीं प्रभु उठला आहे खरें आणि शिमोनाला प्रकट झाला आहे त्यांनींहि जीं वर्त्तमानें वाटेंत झालीं तीं सांगीतलीं आणि भाकर मोडण्यांत त्यांला तो कसा वळखला गेला होता हें सांगीतलें

## पुनरुत्थानसमयानंतर जो मंगळवार

### प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपला एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त याकडून मृत्यूला जिंकिलें आहे आणि आम्हासाठीं सनातन जिवनाचें द्वार उघडिलें आहे त्या तुला आह्मी नम्रतेनें विनवितों कीं जसा तूं आम्हास आपला विशेष सत्वगुण अगोदर देऊन आमचे मनांत सदिच्छा उत्पन्न करितोस तसें आह्मीं त्यांस तुझे अखंडीत साहाय्येंकरून सिद्धीस आणावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन



### पत्राचेस्थानीं प्रेषितांचा वृत्तांत. १३. २६.

अहो भाऊ आब्राहामाचे वंशांतले आणि तुम्हामधले जे कोणी देवाला भितात त्यां तुह्माला या तारणाची गोष्ट पाठविली आहे कांकीं येरूशालेमांतील राहणारे व त्यांचे अधिकारी यांनीं त्यास न अंगीकारून व दंड करून भविष्यवाद्यांच्या ज्या गोष्टी प्रतिशाब्बाथास वाचिल्या जातात त्या प्रत्ययास येत असें केलें आणि त्याजकडे कांहीं मरण योग्य दोष त्यांच्यानें लावविला नसतांहि त्याला वधून टाकावें असें पिलातसाजवळ मागितलें नंतर सर्व जें त्याजविषयीं लिहिलें होतें तें त्यानीं प्रत्ययास आणून त्याचें प्रेत खांबावरून काढून थड्यांत ठेविलें परंतु देवानें त्याला मेलेल्यांमधून उठिवलें तो बहुत दिवस जे त्याचे संगतीं गालीलाहून येरूशालेमास आले आणि त्याचे साक्षी लोकांत आहेत त्यांस प्रकट झाला आणि आम्ही तुम्हाला सांगतों कीं जें वचन वाडवडलांस केलें होतें तें देवानें येशूला उठवून जे आह्मी त्यांची संतति त्यां आम्हासाठीं फेडून दिलें आहे जसें दुसरे गीतामध्यें लिहिलें आहे तूं माझा पुत्र आहेस म्यां आज तुला जन्म दिला आहे आणि जेव्हां त्यानें त्याला फिरून कधीं क्षयांत न जावयास मेलेल्यांमधून उठविलें तेव्हां त्यानें असें म्हटलें कीं तुम्हाला मी दावीदाचीं पवित्र विश्वस्त वचनें फेडून देईन अणखीं एके दुसरे गीतांत म्हणतो तूं आपले पवित्राला क्षय पावूं देणार नाहींस दावीद तर देवाचे मनोरथाप्रमाणें आपले पिढीला सेवून निजून गेला आणि

आपले पितरांप्रत मिळाला आणि क्षय पावला खरें परंतु ज्याला देवानें उठविलें आहे तो क्षय पावला नाहीं यास्तव भाव्वानों तुम्हाला कळावें कीं याजकडून तुम्हाला पापांची क्षमा सांगीतली आहे आणि याचे योगानें ज्यां पापांपासून तुह्मास मोशेचे नेमाकडून न्यायी ठरविलें जावेना त्यां सर्वांपासून जो कोणी विश्वास ठेवितो तो न्यायी ठरविला जातो यास्तव भविष्यवादांत जें म्हटलें आहे तें तुम्हावर न यावें म्हणून सावध असा अहो तुच्छ मानणारानों तुह्मी पहा आणि आश्चर्य करा आणि नाश पावा कांकीं जें कार्य कोण्ही तुम्हाला सांगीतलें असतां तुह्मी विश्वासणार नाहीं असें कार्य तुमचे दिवसांत मी करणार आहें

सुवार्त्ता लूक २४. ३६.

ते असें बोलत असतां येशू प्रत्यक्ष त्यांजमध्यें उभा राहून त्यांस बोलिला तुह्माला समाधान असावें तेव्हां ते विस्मित व भयाभीत होऊन समजले कीं आपण एक आत्मा पाहिला होता मग तो त्यांला म्हणाला तुह्मी कां घाबरलेले आहां आणि तुमचे मनांत विकल्प कशामुळें उठतात माझे हात आणि पाय पहा मी तोच आहें मला चांपून पहा कांकीं मला मांस व हाडें आहेत असें तुम्ही पाहतां पण आत्म्याला तीं नसतात नंतर असें ह्मटल्यावर त्यानें आपले हात पाय त्यांला दाखिवले पण तोंपर्यंत ते हर्षामुळें विश्वासत नसतां आणि आश्चर्य करीत असतां तो त्यांस म्हणाला तुह्माजवळ कांहीं इथें भक्ष्य आहे काय तेव्हां त्यानीं त्याला भाजलेले



मासोळीचा व मधाचे पोव्याचा तुकडा दिला आणि त्यानें घेउन त्यांचे देखतां खाल्ला मग तो त्यांला ह्मणाला मी तुम्हासंगतीं होतों तेव्हां जीं वचनें मी तुम्हाला बोलत असें तीं हींच आहेत कीं जें जें मोशेचे नेमांत व भविष्यवादांत व गीतांत मजविषयीं लिहिलें आहे तें तें प्रत्ययास आलें पाहिजे तेव्हां त्यांला लेख समजावे म्हणून त्यानें त्यांची बुद्धि खुलविली आणि त्यांस ह्मटलें कीं असें लिहिलें आहे आणि असेंच ख्रिस्ताला दुःख सोसावें लागलें व तिसरे दिवसीं मेले त्यांमधून उठावें लागलें होतें व येरूशालेमाहून आरंभ करून सर्व देशांतले लोकांस माझे नामावर पश्चात्ताप व पापांची क्षमा सांगावी लागत्ये तर यां अर्थाचे तुम्ही साक्षी आहां

## पुनरुत्थानसमयानंतर पहिला आदित्यवार.

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ बापा ज्या त्वां आपला एकुलता पुत्र आमचे पापांमुळें मरायास आणि आम्हाला न्यायी ठरवावें म्हणून उठायास दिला आहे आह्मी द्रोह व दुष्टता यांचें फुगवण असें सोडावें कीं आह्मी सत्यता व पवित्र आचरण यांकडून सर्वदा तुझी सेवा करावी तोच तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे पुण्याकरितां आमेन

पत्र पहिलें योहान्न ५. ४.

जें कांहीं देवापासून जनित झालें आहे तें प्रपंचास

जिंकितें आणि जो जय प्रपंचास जिंकितो तो हाच आहे म्हणजे आमचा विश्वास येशू देवाचा पुत्र आहे असें जो विश्वासतो त्यावांचून कोण प्रपंचास जिंकितो पाणी व रक्त यांकडून जो आला हा येशू ख्रिस्तच आहे केवळ पाण्या कडूनच असें नाहीं पण पाणी आणि रक्त यांकडून आणि जो साक्ष देतो तो आत्माच आहे कांकीं आत्मा सत्यच आहे कारण आकाशांत तिघे साक्षी आहेत बाप आणि वाचक आणि पवित्र आत्मा आणि हे तिघे एकच आहेत पृथ्वींतहि तिघे साक्षी आहेत आत्मा व पाणी व रक्त आणि हीं तीन एकाचे ठायीं मिळतात जर मनुष्यांची साक्ष आम्ही घेतों तर यापेक्षां देवाची साक्ष मोठी आहे तर देवानें जी साक्ष आपले पुत्राविषयीं दिली आहे ती हीच आहे जो देवाचे पुत्रावर विश्वास ठेवितो त्याला आपल्यांत साक्षी होते व जो देवाला विश्वासत नाहीं त्यानें तो असत्य असा केला कांकीं जी साक्ष देवानें आपले पुत्राविषयीं दिली आहे तिचा त्यानें विश्वास धरिला नाहीं ती साक्ष तर हीच आहे कीं आम्हाला देवानें सनातन जीवन दिलें आहे आणि तें जीवन त्याचे पुत्राकडे आहे तो पुत्र ज्यास आहे त्यास तें जीवन आहे ज्याला देवाचा पुत्र नाहीं त्याला तें जीवन नाहीं

सुवार्ता योहान २०. १९.

जो शाब्बाथानंतर पहिला दिवस त्याच दिवसीं सांज झाली असतां आणि यहूद्यांचे भयामुळें जेथें शिष्य एकत्र मिळाले होते तेथलीं दारें बंद केलीं असतां येशू आला आणि मध्यें उभा राहून त्यांला बोलिला तुह्माला समाधान असावें हें बोलून त्यानें त्यांला आपले हात व आपला पार्श्व दाखिवले शिष्य तर प्रभूला पाहून आनंद पावले नंतर येशू पुन: त्यांस ह्मणाला तुम्हाला समाधान असावें जसें मला बापानें पाठिवलें तसें तुम्हाला मी पाठिवतों आणि हें बोलून त्यांजवर त्यानें फुंकर घातला आणि त्यांजला बोलिला तुम्ही पवित्र आत्मा घ्या ज्यां कोणाचे पापांची तुम्ही क्षमा कराल ती त्यांची क्षमा केली जाईल आणि ज्यां कोणाचीं पापें तुह्मी राखून ठेवाल तीं राखून ठेविलीं जातील



## पुनरुत्थानसमयानंतर दुसरा आदित्यवार.

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपला एकुलता पुत्र आम्हा साठीं पापाविषयींचा बलि आणि पवित्र आचरणाचें उदाहरण व्हावयास दिला आहे आम्ही त्याचा हा अमोलिक उपकार कृतज्ञतेनें सर्वदा मानावा आणि त्याचे परम पवित्र आचरणाचे पावलांस अनुसरायास नित्य झटावें म्हणून आम्हाला सत्गुण दे तोच येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र पहिलें पेत्रस २. १९.

जर कोण्ही देवाकडचे अंत:करणामुळें कांहीं योग्य कारण नसतां दुःखें सोसून घेतो तर हें सुकृतिच आहे जर तुम्ही पाप

करून चपराकलेले असतां सहिष्णुता करतां तर काय कीर्त्ति पण तुम्ही बरें करितांना जर पीडा पावून सहिष्णुता करितां तर हें देवा जवळ मान्य आहे ह्यालाच तर तुह्मी बलाविलेले आहां कांकीं ख्रिस्तानेंहि तुमचे स्थानीं दुःख सोसून तुम्हीं त्याचे पावलांस अनुसरावें म्हणून तुह्माला उदाहरण ठेविलें आहे ज्या त्यानें कांहीं पाप केलें नाहीं आणि त्याचे वाणींत कांहीं कपट सांपडेना ज्या त्याला वाईट बोलिलें असतां तो वाईट परत बोलेना पीडा पावून धाक दाखवीना परंतु जो न्यायतः न्यायाधीशी करितो त्यालाच तो आपणास सोंपी ज्या त्यानें स्वतः आमचीं पापें खांबावर आपले अंगीं वाहिलीं अशासाठीं कीं आम्ही पापांविषयीं मृत होऊन न्यायाविषयीं जीवंत व्हावें ज्या त्याचे क्षतानीं तुम्ही बरे झालां आहां कांकीं तुम्ही बहकलेले मेंढरांसारिखे होतेत पण आतां तुम्ही आपले जीवांचा पाळणारा व अधिकारी याप्रत फिरून आलां आहां

सुवार्त्ता योहान्न १०. ११.

मीच तो उत्तम मेंढपाल आहें जो उत्तम मेंढपाल तो मेंढराकरितां आपला जीव देतो परंतु जो मेंढपाल नसून मजूरच आहे ज्याचींच मेंढरें नाहींत तो लांडगा येतां पाहतो तेव्हां मेंढरें सोडून पळतो मग लांडगा त्यां मेंढरांला झोंबून दाणादाण करितो तो मजूर तर पळतो कांकीं मजूरच आहे आणि मेंढराविषयीं कांहीं चिंता करीत नाहीं उत्तम मेंढपाल तो मीच आहें आणि आपलीं मेंढरें



वळखतों मलाहि माझ्यानीं वळखिलें आहे जसा बाप मला ओळखतो तसा मीहि बापाला ओळखतों आणि मेंढरां करितां मी आपला जीव देतों अणखीं दुसरीं मेंढरें मला आहेत जीं या वाड्यांतलीं नाहींत तींहि मला आणिलीं पाहिजेत आणि माझी वाणी तीं ऐकतील तेव्हां एकच कळप आणि एकच मेंढपाल होईल

## पुनरुत्थानसमयानंतर तिसरा आदित्यवार,

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा जो तूं जे भ्रांतींत आहेत त्यांस आपले सत्याचा उजेड देतोस अशासाठीं कीं ते पुण्य मार्गांत फिरून यावें ज्यां सर्वांस ख्रिस्ती धर्माचे सहायत्वांत येऊं दिलें आहे त्यानीं आपले धर्माविपरीत जें कांहीं आहे त्यास चुकवावें आणि त्या धर्मास जें कांही शोभतें त्यास अनुसरावें आमचा प्रभु जो येशू ख्रिस्त याचे योगानें आमेन

पत्र पहिलें पेत्रस २. ११.

हे प्रियानों मी तुम्हास विनवितों कीं जसे आगंतुक आणि प्रवासी तसे तुम्ही दैहिक इच्छा सोडून द्या त्या तर जीवाच्याचे प्रतिकूल झुंजतात तुम्ही परदेशस्थ लोकांमध्यें आपलें आचरण उत्तम राखीत जा अशासाठीं कीं ज्याविषयीं जसें दुष्कर्म्याला तसें तुम्हाला ते वाईट बोलतात त्यांत त्यानीं तुमचीं सत्कर्में पाहून आगमाचे दिवसीं देवाचें गौरव करावें तर मनुष्याचे सर्व विधीला प्रभूकारणें तुम्ही अधीन

असा जर राजाला तर जसें मुख्याला तसें किंवा जर अधिकाऱ्यांला तर जे दुष्कर्म्यांला सूड घ्यायास आणि सत्कर्म्यांचा सन्मान करायास त्यानें पाठविलेले आहेत जसें त्यांला तसें कांकीं देवाचा मनोदय असा आहे कीं बरें रतांनकिा निर्बुद्धि मनुष्यांचें मुर्खपण अवाच करावें स्वतंत्र असे असतां तरीं स्वतंत्रपण जसें दुष्टपणाचें छादन असें नधरितां पण देवाचे सेवक असतां सर्वांचा सन्मान करा बंधुमंडळीची प्रीति करा देवाचें भय धरा राजाचा आदर करा

सुवार्त्ता योहान्न १६ १६.

थोडा वेळ गेल्यावर मला तुम्ही पाहणार नाहीं कांकीं मी आपले बापाजवळ जातों तथापि अणखीं थोडा वेळ गेल्यावर मला तुम्ही पहाल यास्तव त्याचे शिष्यांतले कित्येक परस्परें बोलिले आम्हाला जें तो बोलतो हें काय आहे थोडा वेळ गेल्यावर मला तुम्ही पाहणार नाहीं कांकीं मी आपले बापाजवळ जातों तथापि अणखीं थोडा वेळ गेल्यावर मला तुम्ही पहाल ते तर ह्मणाले तो जें बोलतो म्हणजे थोडा वेळ हें काय आहे जें तो बोलतो तें आम्ही समजत नाहीं तर ते आपल्यास विचारायास इच्छिताहेत असें येशूनें जाणलें आणि त्यास म्हटलें जें मी बोलिलों थोडा वेळ गेल्यावर तुह्मी मला पाहणार नाहीं तथापि अणखीं थोडा वेळ गेल्यावर मला पहाल याविषयीं तुह्मी परस्परें विचारितां किं काय तुम्हाला मी खचीत खचीत सांगतों कीं तुम्ही रडाल आणि आकांत कराल पण जग



आनंद करील तुह्मी शोक पावाल तरीं तुमचा शोक जाऊन आनंद होईल स्त्री जेव्हां प्रसूत होऊं लागत्ये तेव्हां तिची वेळ आली आहे म्हणून शोक पावत्ये पण ती बालक प्रसविल्यावर मनुष्य जगांत जन्मलें आहे याचे हर्षानें ती आपलें दुःख स्मरत नाहीं तर तुम्हालाहि आतां शोक आहे खरें पण पुनः मी तुम्हाला पाहीन तेव्हां तुमचें हृदय आनंद पावेल आणि तुमचा आनंद कोण्ही तुम्हापासून हरित नाहीं

## पुनरुत्थानसमयानंतर चौथा आदित्यवार

प्रार्थनासारांश

हे सर्वसमर्थ देवा जो तूं मात्र मनुष्याचे निर्यंत्र मनोरथ आणि राग मर्यादेंत राखायास समर्थ आहेस तूं ज्याविषयीं आज्ञा करितोस तें तुझे लोकांला अवडावें आणि तूं ज्याविषयीं वचन देतोस त्याची आशा त्यानीं धरावी अशासाठीं कीं संसाराचे विविध आणि बहुविध विकारांमध्यें जेथें खरा आनंद पावायाचा आहे तेथें आमचे चित्त स्थिर असावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र याकोब १. १७.

सर्व उत्तम दाय आणि सर्व पूर्ण दाय वरतूनच होतो आणि ज्या प्रकाशोत्पादकाजवळ पर्य्याय नाहीं आणि विवृत्तीचें कांहीं लक्षण नाहीं त्याजपासूनच वरतून येतो त्यानें आपले मनोदयानें आम्हास सत्यवादेंकरून जन्म दिला अशा

साठीं कीं आम्हीं त्याचे उत्पन्नांतील कांहींसा प्रथम उपज असावें यास्तव प्रिय भावांनों प्रत्येक मनुष्य ऐकायास उत्सुक बोलायास मंद क्रोधास मंद असो कांकीं मनुष्याचा क्रोध देवाचें यथार्थपण साधित नाहीं यास्तव सर्व मलिनता आणि दुष्ट विभाव यांस सोडून जी सत्वसंपन्न गोष्ट तुमचे जीवात्म्यास तारा यास समर्थ आहे ती तुह्मी लीनतेनें घ्या

सुवार्त्ता योहान्न १६. ५.

मला ज्यानें पाठविलें त्याजवळ मी आतां जातों तरीं तुम्हां तला कोणी मला कुठें जातोस असें विचारीत नाहीं पण हीं वचनें तुह्माला मी बोलिलों आहें यास्तव तुमचे हृदयांत शोक भरला आहे तथापि मी तुम्हाला सत्य सांगतों म्यां जावें हें तुम्हाला उपयोगी आहे कारण मी न जाईन तर तो संबोधक तुम्हाजवळ येणार नाहीं पण मी गेलों असतां त्याला तुम्हाजवळ पाठवीन आणि तो येऊन जगास पापा विषयीं व न्यायाविषयीं आणि न्यायाधीशीविषयीं मान्य कर वील पापाविषयीं कारण कीं मजवर विश्वास ठेवीत नाहींत आणि न्यायाविषयीं कारण कीं मी आपले बापाजवळ जातों आणि मला तुह्मी पुढें पाहणार नाहीं आणि न्याया धीशीविषयीं कारण कीं या जगाचे अधिपतीची न्यायाधीशी केली जात्ये तुम्हाला सांगायला अणखीं मजपाशीं बहुत वचनें आहेत पण तीं समजून घ्यायास तुम्ही अजून समर्थ नाहीं तथापि जो सत्याचा आत्मा तो येईल तेव्हां तुम्हाला सर्व सत्यांत आणील कांकीं आपले आपण तो बोलणार नाहीं



पण जितकें ऐकेल तितकेंच तो बोलेल आणि जें येणार आहे तें तो तुह्माला दाखवील तो माझें गौरव करील कारण कीं माझ्यांतलें तो घेईल आणि तुम्हाला दाखवील जें कांहीं बापाचें आहे तें माझेंच आहे याकरितां मी म्हणालों कीं माझ्यांतलें तो घेईल आणि तुम्हाला दाखवील

## पुनरुत्थानसमयानंतर पांचवा आदित्यवार

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा ज्या तुजपासून सर्व जें उत्तम तें येतें आम्हीं तुझे दीन सेवकानीं तुझा पवित्र आत्मा पावून जें जें उत्तम तें तें कल्पावें आणि तुझें दयालु नेणें पावून तेंच साधावें आमचा प्रभु येशू ख्रिस्त याचे योगानें आमेन

पत्र याकोब १. २२.

तुह्मीं गोष्ट आचरणारे व्हा आपल्यास फसवून केवळ ऐक णारे होऊं नका कांकीं कोणी केवळ गोष्ट ऐकणारा असून जर गोष्ट आचरणारा नसला तर हा त्या मनुष्यासारिखा आहे जो आपलें सहज मुख आदर्शांत पाहतो कां तर तो आपणास पाहून जातो आणि मी कसा होतों हें लागलेंच विसरतो परंतु जो स्वतंत्रपणाचे सिद्धनेमांत एकाग्रतेनें पाहतो आणि राहतो हा विस्मरक श्रोता नसतां पण कर्मकर्त्ता असून हाच आपले कर्मांत धन्य होईल जर कोणी तुम्हामध्यें भक्तिवान दिसतो परंतु तो आपलें मन फसवून आपली जीभ आकळीत नाहीं तर त्याची भक्ति व्यर्थच आहे देव जो बाप त्याजवळ शुद्ध

आणि विमल भक्ति हीच आहे पोरकें आणि विधवा यांस त्यांचे कष्टांत भेटून दान धर्म करावा आणि आपणास संसारापासून निर्दोष राखावें

सुवार्त्ता योहान्न १६. २३.

मी तुम्हाला खचीत खचीत सांगतों कीं माझे नामानें जें कांहीं तुम्ही बापापशीं मागाल तें तो तुम्हाला देईल अजूनपर्यंत माझे नामानें तुम्हीं कांहीं मागीतलें नाहीं मागा आणि पावून घ्याल अशासाठीं कीं तुमचा आनंद पूर्ण व्हावा हीं वचनें मी दृष्टांतानीं तुम्हाला बोलिलों आहें पण वेळ येत्ये जींत मी अणखीं दृष्टांतानीं तुम्हाला बोलणार नाहीं पण बापाविषयीं स्पष्टपणें तुम्हाला सांगेन त्यावेळेस माझे नामानें तुम्ही मागाल आणि मी तुम्हासाठीं बापाजवळ विनंती करीन असें मी तुम्हाला बोलत नाहीं कां तर बाप आपणच तुम्हावर प्रीति करितो कारण कीं मजवर तुम्हीं प्रीति केली आहे आणि मी देवापासून निघालों असा तुम्हीं विश्वास धरिला आहे मी बापापासून निघून जगांत आलों आहें फिरून जगाला सोडून बापाजवळ जातों त्याचे शिष्य त्याला म्हणतात पहा तूं आतां स्पष्टपणें बोलतोस आणि कांहीं दृष्टांत बोलत नाहींस आतां आह्मी समजतों कीं तूं सर्व जाणतोस आणि कोणी तुला विचारावें असें तुला कांहीं अगत्य नाहीं याजवरून आम्ही विश्वासतों कीं तूं देवापासून निघालास येशूनें उत्तर केलें एव्हां तुम्ही विश्वासतां काय पहा, वेळ येत्ये आणि आत्तां आली आहे जींत तुम्ही एक एक आपापले घरीं विकीर्ण व्हाल



आणि मला एकटा सोडून द्याल तथापि मी एकटा नाहीं कारण कीं बाप मजवळ आहे हीं वचनें मी तुम्हाला बोलिलों आहें अशासाठीं कीं मजपाशीं तुम्हाला समाधान व्हावें जगांत तुम्ही कष्ट पावाल तथापि धीर धरा म्यां जगास जिंकिलें आहे

## आरोहणदिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा आम्ही तुला विनवितों कीं तुझा एकुलता पुत्र जो आमचा प्रभु येशू ख्रिस्त यास आकाशांत चढलेल्यास जसें आह्मी विश्वासतों तसेंहि आम्हीं चित्तेंकरून व मनेंकरून तिकडें चढावें आणि त्याजपाशीं सर्वदा रहावें जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

प्रचाचेष्यानीं प्रेषितांचा वृत्तांत १. १.

हे थेओफिलस जें जें येशू करी आणि शिकवी त्या त्या विषयीं पहिला ग्रंथ म्यां केला होता खरें त्या दिवसापावेतों ज्यांत जे प्रेषित त्यानें निवडलेले होते त्यांस पवित्र आत्म्याकडून आज्ञा देऊन तो वरतीं घेतला होता ज्यांत्यांसहि त्यानें दुःख सोशिल्यावर आपणातें जीवंत दाखिवलें चाळीस दिवसपर्यंत बहुत सत्य प्रमाणेंकरून त्यांचे दृष्टीस पडतांना व देवाचे राज्याचे अर्थाविषयीं बोलतांना त्यानें त्यांशीं मिळून त्यांला आज्ञा दिली कीं तुह्मी येरु

शालेमापासून जाऊं नका परंतु बापाचें जें वचन तुम्हीं मजपासून ऐकिलें त्याची वाट पहात रहा कांतर योहान पाण्यानें बाप्तिस्मा करी खरें पण तुम्ही यां थोडे दिवसां नंतर पवित्र आत्म्याकडून बाप्तिस्मा पावाल ते तर एकवट मिळाले असतां त्याला विचारीत बोलिले हे प्रभो या समयीं तूं इस्राएलाचें राज्य पुन: स्थापिशील काय तेव्हां तो त्यांस म्हणाला जे काल आणि समय बापानें आपले सत्तेंत ठेविले आहेत ते जाणणें तुम्हाला लागत नाहीं पण पवित्र आत्मा तुम्हाला येईल तेव्हां तुम्ही शक्ति पावाल आणि येरुशालेमांत व सारे यहूद्यांत व सामार्यांत व पृथ्वीचे शेवटापर्यंत मजविषयीं तुह्मी साक्षी व्हाल तो हीं वचनें बोलिल्यावर ते पहात असतां वरतीं उचलिला गेला आणि मेघानें त्याला त्यांचे दृष्टीपासून घेतलें नंतर तो चढत असतां जेव्हां ते आकाशाकडे एक दृष्टीनें पहात होते तेव्हां पहा दोघे जण पांढरें वस्त्र धरून त्यांचे जवळ उभे होते तर ते म्हणाले अहो गालीली मनुष्यहो तुह्मी कां आकाशाकडे पहात उभे राहातां हाच जो येशू तुह्मापासून वरतीं आकाशांत घेतला आहे ज्या प्रमाणें तुह्मीं त्याला आकाशांत जातां पाहिलें त्याप्रमाणेंच तो येईल

सुवार्त्ता मार्कस १६. १४.

ते अकरा जण जेवायला बसले असतां येशू त्यांस प्रकट झाला आणि त्यांची अविश्वासता व हृदयकठिनता यां विषयीं त्यांचें त्यानें गर्हण केलें कारण कीं ज्यानीं त्याला



उठलेलें पाहिलें त्यांचा विश्वास ते धरीनात नंतर तो त्यांस म्हणाला तुम्ही सारें पृथ्वींत जाऊन सर्व लोकांला सुवार्त्ता गाजवून सांगा जो कोणी विश्वास ठेवील आणि बाप्तिस्मा घेईल तो तरेल आणि जो कोणी विश्वास न ठेवील तो अन्यायी ठरविला जाईल जे विश्वासतील त्यांस हीं चिन्हें अनुसरतील ते माझे नामानें भुतें घालवून देतील आणि नव्या भाषा बोलतील सर्प उचलून घेतील आणि कांहीं मरणकारक जरीं पितील तरीं तें त्यांला बाधणार नाहीं रोग्यांला त्यानीं आपले हात लाविले असतां ते निरोगी होतील तर प्रभु त्यांस बोलिल्यावर वरतीं आकाशांत घेतला होता आणि देवाचे उजवेकडे बसला खरें मग ते निघून सर्वत्र गाजिवते झाले प्रभु त्यांचें साहाय्य करितांना व अनुसरते चिन्हांकडून गोष्ट ठरवितांना

## आरोहणदिवसानंतर जो आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे देवा गौरवी राजा ज्या त्वां आपला एकुलता पुत्र येशू ख्रिस्त यास मोठे जयवैभवानें आपले आकाशांतील राज्यांत उंचाविलें आहे त्या तुला आह्मी विनवितों कीं आम्हास अनाथ सोडूं नको पण आमचें समाधान करायास व जेथें आमचा तारणारा ख्रिस्त पुढें गेला आहे तेथेंच आह्मास उंचावायास तुझा पवित्र आत्मा पाठवून दे

जो तो ख्रिस्त तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे व राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन

पत्र पहिलें पेत्रस ४. ७.

सर्वांची समाप्ति जवळ आली आहे यास्तव तुम्ही मनाचे शुद्ध असा आणि प्रार्थनासाठीं जागृत असा आणि विशे षेंकरून परस्परांशीं दृढ प्रीति करीत जा कां कीं प्रीति बहुत पाप आवरून ठेवील कुरकुरीवांचून परस्परांचें आतिथ्य करा प्रत्येक जसे सद्गुण पावला आहे तसे तुम्ही देवाचे बहु विधसत्वगुणाचे उत्तम विधायक असे त्याचा उपचार एक मेकांस करा जर कोणी बोलतो तर देवाचे गोष्टींप्रमाणें बोलो जर कोणी उपचार करितो तर जें सामर्थ्य देव देतो त्याप्रमाणें करो अशासाठीं कीं सर्वांनीं देवाचें गौरव येशू ख्रिस्ताकडून करावें ज्या त्याला गौरव व प्रताप सना तनत: असोत आमेन

सुवार्त्ता योहान्न १५. २६.

मी जो संबोधक तुम्हाला बापापासून पाठवीन तो सत्याचा आत्मा आहे जो बापापासून निघतो तो मजविषयीं साक्ष देईल आणि तुम्हीहि साक्ष द्याल कां कीं पहिल्यापासून तुम्ही मजवळ आहां तुम्हाला शंका न लागावी ह्मणून मी हीं वचनें तुह्माशीं बोलिलों आहें तुह्मास सभा निष्कासित करितील वेळहि येत्ये जेव्हां कोणी तुमचा घात करून सम जेल कीं आपण देवाची भक्ति करितों तीं कामें ते तुम्हाला



करितील कारण कीं त्यांनीं बापाला व मला वळखिलें नाहीं तर हीं वचनें मी तुम्हास बोलिलों आहें अशासाठीं कीं ती वेळ येईल तेव्हां हीं वचनें मी तुम्हाला बोलिलों आहें असें तुम्हीं आठवावें

## पवित्रात्मावतरण.

प्रार्थनासारांश.

हे देवा ज्या तां या समयानुसार आपले पवित्र आत्म्या चा उजेड पाठवून आपले विश्वासू लोकांचें मन शिकविलें त्याच आत्म्याकडून आम्हास सर्व गोष्टींविषयीं शुद्धबुद्धि व्हावीं आणि त्याचे पवित्र समाधानामुळें सर्वदा आनंद असावा येशू ख्रिस्त आमचा तारणारा याचे पुण्याकरितां जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन

पत्राचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत २. १.

नंतर पन्नासावा दिवस आला असतां ते सर्व संमतीनें एकाठिकाणीं होते तेव्हां एकाएकीं आकाशांतून जसा मोठे सुटलेले वाऱ्याचा तसा शब्द झाला आणि ज्या घरांत ते बसले होते तें सगळें घर त्यानें भरलें आणि त्यांजला अग्निसारिख्या विच्छिन्न जिव्हा दिसल्या आणि त्यांतलें प्रत्येकावर तो अग्नि बसला नंतर ते सर्व पवित्र आत्म्यानें पुर्ण झाले आणि आत्म्यानें जसें त्यांस उच्चारूं दिलें तसें

ते इतरां भाषानीं बोलूं लागले तेव्हां आकाशाखालचे सर्व
लोकांतले भक्तिवान यहूदी मनुष्य येरूशालेमांत रहात
होते मग हा बोभाटा झाला असतां समुदाय मिळाला
आणि गडबडला कां कीं त्यांस प्रत्येकानें आपापले भाषेनें
बोलतां ऐकिलें तेव्हां सर्व विस्मित झाले आणि आश्चर्य
करित एकमेकांस बोलिले पहा जे बोलत आहेत हे सर्व
गालीली आहेत कीं नाहींत तर आपण एकेक ज्या
आपले भाषेंत जन्मलों आहों तिनें कसें ऐकतों पार्थी व
मेदी व एलामी व मेसापोताम्येंत व यहूद्यांत व काप्पा
दोक्यांत व पोंतसांत व आसीयेंत व फ्रुगीयेंत व पांफुली
येंत व मिसरांत व लिबुयेचे कुरेनेंकडचे प्रदेशांत जे राहा
णारे व रोमी प्रवासी यहूदी व शरणागत क्रेती व अरबी
हे आह्मी त्यांस आमचे भाषानीं देवाच्या मोठ्या गोष्टी
बोलतां ऐकत आहों

सुवार्त्ता योहान्न १४. १५.

तुम्ही जर मजवर प्रीति करितां तर माझ्या आज्ञा पाळीत
जा मग मी बापाजवळ विनंती करीन तेव्हां तो तुम्हास दुसरा
संबोधक देईल अशासाठीं कीं तो सर्वदा तुम्हापाशीं रहावा
तो सत्याचाच आत्मा आहे ज्या त्याजला जगाच्यानें घेववत
नाहीं कां कीं तें त्याला पहात नाहीं आणि वळखत नाहीं
पण तुह्मी त्याला वळखतां कारण तो तुह्मापाशीं राहतो व
तुह्मामध्यें होईल तुह्माला मी अनाथ सोडणार नाहीं मी
तुम्हाजवळ येतों अणखीं थोडे वेळानंतर पुढें जग मला पाह



णार नाहीं पण तुह्मी मला पहाल मी जीवतों ह्मणून तुम्हीहि
जीवाल त्या दिवसीं मी बापांत आहें आणि तुह्मी माझ्यांत
आहां आणि मी तुमच्यांत आहें असें तुम्ही जाणाल जो
माझ्या आज्ञा स्वीकारून पाळितो तोच मजवर प्रीति करितो
आणि मजवर जो प्रीति करितो तो माझे बापानें प्रिय केला
जाईल मीहि त्याजवर प्रीति करीन आणि त्याला अनुभूत
होईन यहूदा जो इस्कार्योतेस नव्हे तो त्याला बोलतो हे
प्रभो तूं जगाला अनुभूत न होऊन आम्हाला अनुभूत होणार
आहेस हें कां होतें येशू त्याला उत्तर करीत बोलिला
जर कोणी मजवर प्रीति करितो तर तो माझी गोष्ट
पाळील मग माझा बाप त्याजवर प्रीति करील व त्याजवळ
आम्ही येऊं आणि त्या संगतीं वस्ती करूं जो मजवर प्रीति
करीत नाहीं तो माझ्या गोष्टी पाळीत नाहीं तर जो गोष्ट
तुम्ही ऐकतां ती माझी नव्हे पण ज्या बापानें मला पाठि
वलें त्याचीच आहे मी तुम्हाजवळ असतांना ह्या गोष्टी
तुम्हास बोलिलों आहें पण संबोधक जो पवित्र आत्मा
ज्याला बाप माझे नामानें पाठवील तोच तुह्माला सर्व शिक
वील आणि जें जें म्यां तुम्हास ह्मटलें तें तें तो तुमचे
आठवणींत आणील मी समाधान तुम्हापाशीं ठेवितों आपलें
समाधान तुम्हाला देतों जसें जग देतें तसें तुम्हास मी देत नाहीं
तुमचें हृदय घाबरें न व्हावें भयभीत न व्हावें जें म्या तुम्हाला
म्हटलें तें तुम्हीं ऐकिलें कीं मी निघून जातों नंतर तुह्माजवळ
येतों मजवर जर तुम्हीं प्रीति केली तर मी बापाजवळ जातों

असें म्यां ह्मटल्यावरून तुम्ही आनंद पावले असतेत कां कीं माझा बाप मजह्न थोर आहे आणि आतां झाल्यापुर्वीं म्या तुम्हाला सांगीतलें आहे अशासाठीं कीं होईल तेव्हां तुम्हीं विश्वास धरावा मी तुह्माशीं अणखीं बहुत बोलणार नाहीं कां कीं या जगाचा अधिपति येतो त्याला मजकडे कांहीं नाहीं पण अशासाठीं कीं मी बापावर प्रीति करितों आणि जशी मला बापानें आज्ञा दिली तसें करितों हें जगानें जाणावें

## पविचात्मावतरणानंतर जो सोमवार

### प्रार्थनासारांश.

हे देवा ज्या त्वां या समयानुसार आपले पवित्र आत्म्याचा उजेड पाठवून आपले विश्वासू लोकांचें मन शिकविलें त्याच आत्म्याकडून आह्मास सर्व गोष्टींविषयीं शुद्धबुद्धि व्हावी आणि त्याचे पवित्र समाधानामुळें सर्वदा आनंद असावा येशू ख्रिस्त आमचा तारणारा याचे पुण्याकरितां जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे व राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत:असतां आमेन

### पत्राचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत १०. ३४.

तेव्हां पेत्रस आपलें तोंड उघडून बोलिला कीं निश्चयें मी समजतों कीं देव पक्षपात करणारा नाहीं पण सर्व जातीं मध्यें जो कोणी त्यास भितो आणि यथार्थपणें वर्त्ततो तो त्यास प्रिय आहे त्यानें जी गोष्ट येशू ख्रिस्त जो सर्वांचा प्रभु आहे त्याकडून साम प्रसिद्धकरून इस्राएली लोकांस पाठविली तिजप्रमाणें जो योहान्नानें बाप्तिस्मा सांगून दिला त्यानंतर जें वर्त्तमान गालीलाहून आरंभून सारे यहूदामध्यें झालें तें तुह्मास कळलें आहे म्हणजे नाजरेथचा जो येशू त्यांस देवानें पवित्र आत्मा व सामर्थ्य यांकडून अभिषिक्त केलें जो तो सुकर्में करीत व सैतानानें पिडिलेले जे सर्व होते त्यांजला बरें करीत फिरत असे कांकीं देव त्यासंगातें होता आणि यहूद्यांचे देशांत व येरूशालेमांत ज्या सर्व गोष्टी त्यानें केल्या त्यांचे साक्षी आम्ही आहों ज्याला त्यांनीं खांबा वर चढवून वधिलें त्याला देवानें तिसरे दिवशीं उठिवलें आणि त्यास प्रकट होऊं दिलें सर्व लोकांस असें नाहीं पण देवानें पूर्वीं निवडलेले साक्ष्यांस म्हणजे आम्हास तो मेलेल्यांमधून पुन: उठल्यावर जे आम्ही त्यासंगतीं खाल्लों प्यालों त्यां आम्हालाहि त्यानें आज्ञा दिली कीं लोकांला गाजवून सांगावें आणि साक्ष द्यावी कीं देवानें जो जीवंतांचा व मेलेल्यांचा न्यायाधीश नेमिला आहे तो हाच आहे त्याजविषयीं सर्व भविष्यवादी साक्ष देतात कीं जो कोणी त्याजवर विश्वास ठेवील तो त्याचे नामेंकरून पापांची क्षमा पावेल एथपर्यंत हीं वाक्यें पेत्रस बोलत असतां सर्व जे गोष्ट ऐकत होते त्यांचेठायीं पवित्र आत्मा अवतरला तेव्हां जितके सुंतेच्यांतील विश्वासी पेत्रसासंगतीं आले होते ते विस्मित झाले कांकीं परदेशीय लोकांवरहि पवित्र आत्म्याचा उपकार प्रतिसृष्ट झाला आहे कारण कीं ते त्यांस नाना भाषा बोलतां व देवाला थोर म्हणवितां ऐकत

होते तेव्हां पेत्रसानें उत्तर केलें ते बाप्तिस्मा न पावावे म्हणून पाणी कोण निषिद्ध करील जे ते जसे आम्ही तसे पवित्र आत्मा पावले आहेत मग ते प्रभूचे नामानें बाप्तिस्मा पावावे ह्मणून त्याने आज्ञा दिली तेव्हां तो कित्येक दिवस रहावा असें त्याला त्यानीं विनविलें

सुवार्त्ता योहान्न. ३. १६.

देवानें जगावर अशी प्रीति केली कीं त्यानें आपला एकुलता पुत्र दिला अशासाठीं कीं त्याजवर जो कोणी विश्वास ठेवितो तो नाश पावूं नये पण सनातन जीवन पावावा कांकीं जगाचा दंड करायास देवानें आपला पुत्र जगांत पाठिवला असें नाहीं परंतु अशासाठीं कीं जग त्याच्यानें तारिलें जावें जो त्याजवर विश्वास ठेवितो तो अन्यायी ठरविला जात नाहीं पण जो विश्वास ठेवीत नाहीं तो एव्हांच अन्यायी ठरविला आहे कारण कीं त्यानें देवाचें एकुलते पुत्राचे नामावर विश्वास ठेविला नाहीं अपवाद हाच आहे कीं जगांत उजेड आला आहे आणि मनुष्यांला उजेडापेक्षां अंधार आवडतो कारण कीं त्यांचीं कर्मैं दुष्ट असतात जो कोणी दुष्ट कर्मैं करितो तो उजेडाचा द्वेष करितो आणि आपलीं कर्मैं गर्हित नव्हावीं म्हणून उजेडा जवळ येत नाहीं पण जो सत्य वर्त्ततो तो उजेडाजवळ येतो अशासाठीं कीं त्याचीं कर्मैं प्रकट व्हावीं कीं तीं देवाकडून घडलेलीं आहेत



## पवित्रात्मावतरणानंतर जो मंगळवार.

प्रार्थनासारांश.

हे देवा ज्या त्वां या समयानुसार आपले पवित्र आत्म्याचा उजेड पाठवून आपले विश्वासू लोकांचें मन शिकिवलें त्याच आत्म्याकडून आह्मास सर्व गोष्टींविषयीं शुद्धबुद्धि व्हावी आणि त्याचे पवित्र समाधानामुळें सर्वदा आनंद असावा येशू ख्रिस्त आमचा तारणारा याचे पुण्याकरितां जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतो आमेन

प्रेषितांचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत. ८. १४.

सामार्थेनें देवाची गोष्ट ऐकून घेतली असें येरूशाले मांतले प्रेषितानीं ऐकून त्यांचे जवळ पेत्रस व योहान्न यांस पाठिवलें ज्या ह्यानीं उतरत जाऊन ते पवित्र आत्मा पावावे म्हणून प्रार्थना केली कांकीं अजूनपर्यंत त्यांतले कोणेकाचे ठायीं तो उतरला नव्हता केवळ प्रभु येशूचे नामानें त्यानीं बाप्तिस्मा घेतला होता तेव्हां यानीं आपले हात त्यांस लावतांच ते पवित्र आत्मा पावले

सुवार्त्ता योहान्न. १०. १.

तुम्हाला मी खचीत खचीत सांगतों जो कोणी मेंढरांचे वाड्यांत दारांतून जात नाहीं पण दुसरेकडून चढून

जातो तो चोर व लुटारूच आहे तर जो दारांतून आंत जातो तो मेंढरांचा पाळणाराच आहे त्यासाठीं दारपाल उघडितो आणि मेंढरें त्याची वाणी ऐकतात आणि तो आपलीं मेंढरें नामानें बलावितो आणि त्यांला बाहेर नेतो जेव्हांहि तो आपलीं मेंढरें बाहेर निघूं देतो तेव्हां त्यांचे पुढें चालतो आणि मेंढरें त्याचे मागें जातात कांकीं त्याची वाणी वळखतात तर तीं परक्याचे मागें जाणार नाहींत पण त्यापासून पळतील कां कीं तीं त्याची वाणी वळखत नाहींत हा दृष्टांत त्यांला येशूनें सांगीतला पण ज्या गोष्टी त्यानें त्यांस सांगीतल्या त्या काय होत्या हें ते समजले नाहीं यास्तव येशूनें पुन: त्यांस म्हटलें तुम्हाला मी खचीत खचीत सांगतों कीं मेंढरांचें दार मीच आहें सर्व जितके माझे पूर्वीं आले तितके चोर व लुटारूच आहेत पण मेंढरें त्यांचें ऐकेनात तें दार मीच आहें मजकडून जर कोणी आंत जाईल तर तो तरेल आणि आंत येतां व बाहेर जातां त्यास चार मिळेल जो चोर तो चोरी व घात व नाश यांवांचून कांहीं करायास येत नाहीं पण त्यांस जीवन व्हावें आणि तें फारच व्हावें म्हणून मी आलों आहे

## त्रिकाचा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा ज्या त्वां आपले सेवकांस खरे विश्वासाचे अंगीकारानें सनातन त्रिकाचे गौरवातें मानायास आणि दिव्य महिम्याचे शक्तीनें एकत्वातें भजायास सत्वगुण दिला आहे या विश्वासांत त्वां आम्हास स्थिर राखावें आणि सर्व अरिष्टांपासून तारावें म्हणून तुला आम्ही विनवितों जो तूं आहेस आणि राज्य करितोस एकच देव सनातनत: असतां आमेन

### पत्राचे स्थानीं प्रकटविणें. ४. १.

यानंतर म्यां पाहिलें आणि पहा आकाशांत एक दार उघडलें होतें तेव्हां जो पहिला शब्द म्यां ऐकिला होता तो करण्यासारिखा बोलत मला ह्मणाला इकडे वरतीं ये मग यानंतर जीं वर्त्तमानें व्हावीं लागतात तीं तुला दाखवीन नंतर लागलाच मी आत्मव्याप्त झालों तेव्हां पहा आकाशांत सिंहासन मांडिलें आहे आणि त्या सिंहासनावर कोणी बसला आहे व जो बसला होता त्याचा रंग यास्पीस व सार्दीन यां पाषांणासारिखा होता आणि सिंहासना भोंवतीं धनुष्य जें रंगानें हरिन्मणिसारिखें होतें आणि त्या सिंहासनाभोंवतीं चोवीस सिंहासनें व त्यां सिंहासनांवर म्यां चोवीस वडील बसलेले पाहिले ते पांढरीं वस्त्रें ल्याले होते आणि आपल्या मस्तकांवर सुवर्णमुकुट धरीत होते आणि त्या सिंहासनापासून वीज व गर्जना व शब्द निघतात आणि सिंहासनासमोर सात दिवे तेवत होते ते तर देवाचे सात आत्मे आहेत व सिंहासनासमोर स्फटिकरूप समुद्र जो बिलोरासारिखा होता आणि सिंहासनांमध्यें व सिंहासना भोंवतीं चार जीव पुढें व मागें डोळ्यानीं भरलेले असे

होते तर पहिला जीव सिंहासारिखा आणि दुसरा जीव गोवत्सासारिखा होता आणि तिसरे जीवास मनुष्यासारिखें तोंड होतें आणि चौथा जीव उडते गरुडासारिखा होता त्यां चोहों जीवांला तर एकेकाला भोंवतों सहा सहा पक्ष होते आणि आंत डोळ्यानीं भरलेले होते ते तर रात्रं दिवस विसांवा न घेतां बोलत असतात पवित्र पवित्र पवित्र ईश्वर जो सर्वसमर्थ देव जो होता व आहे व होणार आहे आणि ते जीव जेव्हां जो सिंहासनावर बसून सनातनत: जीवतो त्यास गौरव व आदर व उपकार स्तुति करितात तेव्हां ते चोविस वडील जो सिंहासनावर बसलेला त्या समोर पडतात आणि जो सनातनत: जीवतो त्याला भजतात आणि सिंहासनासमोर आपले मुकुट टाकून बोलतात हे ईश्वरा तूं गौरव व आदर व शक्ति घ्यायास योग्य आहेस कांकीं त्वां विश्व उत्पन्न केलें होतें आणि तुझे मनोदयानेंच तें आहे व उत्पन्न केलें होतें

सुवार्त्ता योहान ३ १

तर फारीश्यांतील एक मनुष्य ज्याचें नाम नीकोदेमस यहूद्यांतील अधिकारी होता हा रात्रौ येशूजवळ येऊन त्याला म्हणाला हे राब्बी तूं देवापासून उपदेशक आला आहेस असें आम्ही जाणतों कांकीं जे चमत्कार तूं करितोस हे जर देव आपलेपाशीं नाहीं तर कोणाच्यानें करवत नाहीं येशू त्याजला उत्तर करीत म्हणाला मी तुला खचीत खचीत सांगतों कोणी जर पुन: जन्मला नसला तर त्याच्यानें



देवाचें राज्य पहावत नाहीं नीकोदेमस त्यास म्हणतो माणूस म्हातारा झाला असला तर त्याला कसें जन्मायास येईल त्याला आपले आईचे पोटांत फिरून जावयास व जन्मावयास येईल किं काय येशूनें उत्तर केलें मी तुला खचीत खचीत सांगतों जर कोणी पाणी व आत्मा यां कडून जन्मला नसला तर त्याच्यानें देवाचे राज्यांत जावत नाहीं जें देहापासून जन्मलें तें देहच आहे आणि जें आत्म्यापासून जन्मलें तें आत्माच आहे म्यां तुला म्हटलें तुम्हाला पुन: जन्मावें लागतें याविषयीं आश्चर्य करूं नको वारा आपल्यास बनतें तिथें वाहतो आणि त्याचा शब्द तूं ऐकतोस पण कोठून येतो आणि कुठें जातो हें तुला ठाऊक नाहीं जो कोणी आत्म्याकडून जन्मला आहे त्याची गोष्ट अशीच आहे नीकोदेमस त्यास उत्तर करीत बोलिला ह्या गोष्टी कशा घडतील येशू त्याला उत्तर करीत म्हणाला तूं इस्राएलांतील अध्यापक आहेस आणि ह्या गोष्टी जाणत नाहींस काय मी तुला खचीत खचीत सांगतों कीं जें आह्मी जाणतों तेंच बोलतों आणि जें आम्हीं पाहिलें त्याविषयीं साक्ष देतों आणि तुह्मी आमची साक्ष घेत नाहीं जर पृथ्वींतील गोष्टी मी तुम्हाला सांगीतल्या आणि तुह्मी विश्वासत नाहीं मग आकाशांतील गोष्टी तुम्हाला सांगेन तर तुह्मी कसे विश्वासाल आणि आकाशांतून जो अवतरला म्हणजे मनुष्याचा पुत्र जो आकाशांतच आहे त्यावांचून कोणी आकाशांत चढला नाहीं आणि जसा मोशेनें रानांत सर्प

उभारिला होता तसें मनुष्याचे पुत्राला उभारिलें जावें लागतें अशासाठीं कीं जो कोणी त्याजवर विश्वास ठेवील त्यानें नाश पावूं नये पण सनातन जीवन पावावें

## त्रिकानंतर पहिला आदित्यवार

### प्रार्थनासारांश

हे देवा जो तूं जे सर्व तुजवर भाव ठेवितात त्यांचें सामर्थ्य आहेस आमच्या प्रार्थना कृपेंकरून ऐक आणि आमच्यानें आपले मर्त्यप्रकृतीचे अशक्ततेमुळें तुजवांचून कांहीं उत्तम करवत नाहीं यास्तव आम्हास तूं आपले सत्गुणाचें साहाय्य दे अशासाठीं कीं आह्मीं मनांत व कर्मांत तुझ्या आज्ञा पाळून तुला प्रसन्न करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र पहिलें योहान ४. ७.

प्रियानों आम्हीं एकमेकावर प्रीति करावी कांकीं प्रीति देवाकडली आहे तर जो कोणी प्रीति करितो तो देवापासून जन्मला आहे व देवाला जाणतो जो प्रीति करीत नाहीं तो देवाला ओळखत नाहीं कारण कीं देव प्रीतिच आहे यांत देवाची प्रीति आम्हाकडे प्रकट झाली आहे कीं देवानें आपला एकुलता पुत्र जगांत पाठविला अशासाठीं कीं त्याकडून आह्मास जीवन असावें यांतच प्रीति आहे आम्हीं देवावर प्रीति केली असें नाहीं पण त्यानें आम्हावर प्रीति केली आणि आमचे पापाविषयीं शमबलि व्हावयास आपला पुत्र



पाठिवला प्रियानों आम्हावर देवानें अशी प्रीति केली असली तर आम्हालाहि एकमेकांवर प्रीति करावी लागते देवाला कधीं कोणी पाहिलें नाहीं आम्ही जर एकमेकांवर प्रीति करितों तर देव आम्हांत राहतो आणि त्याची प्रीति आम्हांत समापन्न झाली आहे आम्ही त्यांत राहतों आणि तो आम्हांत राहतो हें आम्ही यावरून जाणतों कीं त्यानें आपला पवित्र आत्मा कांहींसा आह्मास दिला आहे आणि आह्मीं पाहिलें आहे व साक्ष देतों कीं बापानें आपला पुत्र जगाचा तारणारा व्हावा यासाठीं पाठविला आहे जो कोणी मान्य होतो कीं येशू देवाचा पुत्र आहे त्यांत देव राहतो आणि तो देवांत राहतो आणि देवाचे ठायीं आम्हावरची जी प्रीति आहे ती आम्ही जाणतों आणि विश्वासलों आहों देव प्रीतीच आहे तर प्रीतींत जो राहतो तो देवांत राहतोच आणि देव त्यांत राहतो येणेंकरून प्रीति आम्हांत समापन्न झाली आहे अशासाठीं कीं न्यायाधीशीचे दिवशीं आम्हास धैर्य असावें कांकीं जसा तो आहे तसे आम्हीहि या जगांत आहों प्रीतींत भय नाहीं पण पुरती प्रीति भय घालवून देते कांकीं भय दुःखयुक्त आहे पण जो भयार्त असतो तो प्रीतींत समापन्न झाला नाहीं आम्ही त्याजवर प्रीति करितों कारण कीं त्यानें प्रथम आम्हावर प्रीति केली जर कोणी म्हणेल कीं मी देवावर प्रीति करितों आणि आपले भावाचा द्वेष धरितो तो लटकाच आहे कांकीं जो ज्या आपले भावाला त्यानें पाहिलें आहे त्याजवर प्रीति करीत नाहीं तो ज्या

देवाला त्यानें पाहिलें नाहीं त्याजवर कशी प्रीति करील तर त्यापासूनच आम्हाला आज्ञा आहे कीं जो देवावर प्रीति करितो त्यानें आपले भाव्वावरहि प्रीति करावी

सुवार्त्ता लूक. १६. १९.

एक धनवंत मनुष्य होता तो किरमिजी रंगाचें वस्त्र व उत्कृष्ट पांढरे रंगाचें वस्त्र धारण करित असे आणि प्रति दिवशीं फार व्यय करून आनंदित असे आणि लाजारस नामें कोणीएक भिकारी होता जो त्याचे दाराशीं व्रणाहत ठेविला असे आणि जे त्या धनवंताचे मेजावरून चूर पडत असत त्यानीं पोषिलें जावयास तो इच्छित असे पण कुत्रींहि येऊन त्याचा व्रण चाटीत असत नंतर असें झालें कीं तो भिकारी मेला आणि दूतानीं आब्राहामाचे उराशीं नेला गेला आणि तो धनवंतहि मेला आणि पुरला होता मग तो नरकांत क्लेशित असून आपली दृष्टि वरतीं लावून आब्राहामाला आणि त्याचे उराशीं लाजारसाला दूरून पाहतो तेव्हां तो ओरडत ह्मणाला हे बापा आब्राहामा मजवर दया कर आणि लाजारसाला पाठीव अशासाठीं कीं त्यानें आपले बोटाचें टोंक पाण्यांत भिजवून माझी जीभ निववावी कांकीं ह्या ज्वालांत मी क्लिष्ट आहें तेव्हां आब्राहाम म्हणाला लेंकरा तूं आठीव कीं मी आपले आयुष्यांत आपलें सुख पावलों आणि लाजारसहि आपलें दुःख पावला पण आतां तोच संतोषित आहे आणि तूं तर क्लेशित आहेस अणखीं याशिवाय आमचे व तुमचे मध्यें मोठी खिंड ठरविली आहे म्हणून



जे इथून तुह्माकडे पार जायास इच्छितात ते समर्थ नाहींत तिथूनहि जे आम्हाकडे पार यावयास इच्छितात ते समर्थ नाहींत मग तो म्हणाला तर हे बापा तुला मी विनवितों कीं त्याला माझे बापाचे घरीं पाठीव कांकीं मला पांच भाऊ आहेत त्यांला तर तो साक्ष देईल अशासाठीं कीं ते या क्लेशाचे जाग्यांत न यावे आब्राहाम त्यास बोलतो मोशे व भविष्यवादी त्यांला आहेत त्यांचें त्यानीं ऐकावें तेव्हां तो ह्मणाला खरें हे बापा आब्राहामा तथापि मेलेल्यांतून जर कोणी त्यांजवळ जाईल तर ते पश्चात्ताप पावतील तेव्हां तो त्यास म्हणाला मोशे व भविष्यवादी यांचें जर ते ऐकत नाहींत तर मेलेल्यांमधून जरीं कोणी उठला तरीं ते विश्वासणार नाहींत

## त्रिकानंतर दुसरा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा जो तूं आपलें स्थिर भय व प्रीति यांत ज्यांला प्रवृत्त करितोस त्यांचें साहाय्य व शासन करायला रहात नाहींस आम्ही तुला विनवितों कीं तुझे उत्तम राज्यांचे आश्रयाखालीं आम्हास राख आणि तुझे पवित्र नामाचें भय व प्रीति आह्मास सर्वदा वाटूं दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र पहिलें योहान ३. १३.

हे भाव्वानों जग जरीं तुमचा द्वेष करील तरीं तुम्ही आश्चर्य करूं नका आम्ही जाणतों कीं आम्ही मरणांतून जीव

नांत पार आलों आहों कारण कीं आम्ही भाव्वांवर प्रीति करितों जो आपले भाव्वावर प्रीति करीत नाहीं तो मरणांत राहतो जो कोणी आपले भाव्वाचा द्वेष करितो तो मनुष्य घातकच आहे आणि तुम्ही जाणतां कीं कोणी मनुष्यघातकाचे ठायीं सनातन जीवन वसत नाहीं यावरून आम्ही देवाची प्रीति समजतों कीं त्यानें आम्हासाठीं आपला जीव ठेवून दिला तर अम्हालाहि भाव्वांसाठीं आपले जीव ठेवून देणें योग्य आहे ज्या कोणेकास या जगाची जीविका आहे आणि त्याचे भाव्वाला गरज आहे असें पाहून त्याजपासून आपला कळवळा बंद करितो त्यांत देवाची प्रीति कशी राहत्ये माझे लेंकरानों केवळ शब्देंकरून व जिव्हेकडून नसो पण सत्यें व कर्मेंकरून आम्हीं प्रीति करावी मग येणेंकरून आह्मी समजतों कीं आपण सत्याचे आहों व त्याचे समोर आपलें अंतःकरण निस्चित करूं प्रियानों जर आमचें अंतःकरण आमचा अपवाद करितें तर आमचे अंतःकरणाहून देव थोर आहे आणि तो सर्व जाणतो प्रियानों आमचें अंतःकरण जर आमचा अपवाद करीत नाहीं तर आह्मास देवापाशीं धैर्य आहे व जें कांहीं आम्ही मागतों तें त्यापासून आम्हाला पावतें कारण कीं आह्मी त्याच्या आज्ञा पाळितों आणि जीं कामें त्याचे दृष्टींत उत्तम आहेत तीं आह्मी करितों व त्याची आज्ञा हीच आहे कीं त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याचे नामावर आम्ही विश्वास ठेवावा आणि जशी त्यानें आम्हास आज्ञा दिली तशी एकमेकांवर प्रीति करावी आणि जो त्याच्या



आज्ञा पाळितो तो त्यांत राहतो आणि तोहि ह्यांत राहतो तर यावरून आम्ही समजतों कीं तो आम्हांत राहतो ह्मणजे आह्मास जो त्यानें आत्मा दिला आहे यावरून

सुवार्त्ता लूक १४. १६.

कोणेक मनुष्यानें मोठें जेवण केलें आणि बहुतांस आमंत्रण दिलें आणि जेवणाचे वेळेस ज्यांस आमंत्रण दिलें होतें त्यांला त्यानें आपला सेवक पाठवून सांगीतलें कीं तुह्मी या आतां कांकीं सर्व सिद्ध आहे तेव्हां ते सर्व संमतीनें मिष करूं लागले पहिला जो त्यानें त्याला म्हटलें म्यां एक शेत विकत घेतलें आहे ह्मणून मला जाऊन तें पहावें लागतें मी तुला विनवितों मला विनाह्नत मोजावें आणि दुसऱ्यानें ह्मटलें म्यां पांच जोड्या बैलांच्या विकत घेतल्या आहेत त्या पारखायला मी जातों मी तुला विनवितों मलाहि विनाह्नत मोजावें आणि तिसऱ्यानें ह्मटलें म्यां लग्न केलें आहे ह्मणून माझ्यानें येवत नाहीं नंतर त्या सेवकानें येऊन ह्या सर्व गोष्टी आपले धन्याला सांगीतल्या तेव्हां त्या गृहस्थानें रागें भरून आपले सेवकास ह्मटलें तूं लौकर जाऊन नगरांतले मार्गांत व गल्ल्यांत जे दरिद्री व पांगळे व लंगडे व आंधळे असतील ते इकडे आण नंतर सेवक ह्मणाला अहो धनीसाहेब ज्याप्रमाणें आपण आज्ञा केली त्याप्रमाणें झालें आहे तरी इथपर्यंत जागा आहेच तेव्हां धन्यानें सेवकाला सांगीतलें तूं वाटांत व कुंडणांकडे जाऊन बलात्कारानें ते आंत येतसें कर अशासाठीं कीं

माझें घर भरावें कारण मी तुह्मास सांगतों कीं जे मनुष्य बलाविले होते त्यांतले कोणेकास माझें जेवण चाखायास मिळणार नाहीं

## त्रिकानंतर तिसरा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा कृपा करून आमचें ऐकावें ह्मणून तुला आह्मी विनवितों आणि ज्यां आह्मास त्वां प्रार्थना करायाची हृद्य इच्छा दिली आहे त्यां आम्हास जीं कांहीं जोखमें व कष्ट प्राप्त होतील त्यांत आपले समर्थ साहाय्यानें आमचें रक्षण व समाधान करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र पहिलें पेत्रस ५. ५.

तसेच तुम्ही जे कनीयान ते महत्तरांचे अधीन असा आणि तुम्ही सर्व एकमेकांचे अधीन असा आणि अंगीं नम्रता परिवेष्टून घ्या कांकीं देव गर्विष्ठांशीं विरोध करितो परंतु जे नम्र त्यांजवर कृपा करितो देवाचे बलवत्तर हस्ता खालीं तुम्ही नम्र व्हा अशासाठीं कीं सुसमयीं त्यानें तुह्माला उंचावावें तुम्ही आपली सारी चिंता त्याजवर सोंपून द्या कांकीं तो तुम्हाविषयीं चिंता करितो तुह्मी मनाचे शुद्ध असा जागृत असा कां तर तुमचा शत्रु जो सैतान तो गर्जत्या सिंहासारिखा कोणाला गिळून टाकावें म्हणून शोधित फिरतो त्याचा तुम्ही विश्वासांत स्थिर असून विरोध करा



असें समजून कीं तसेच कष्ट आपले भाऊंला या लोकीं घडतात तर सर्व सत्वगुणाचा देव ज्यानें आपले सनातन गौरवांत येशू ख्रिस्ताकडून आम्हाला बलाविलें आहे त्यानें तुह्मी थोडा वेळ कष्ट सोसल्यावर तुम्हास समापन्न करावें स्थिर करावें बलवान करावें तल स्थित करावें ज्या त्याला प्रताप व गौरव सनातनत: असावें आमेन

### सुवार्त्ता लूक. १५. १.

तर त्याचें ऐकायास सर्व वसूली व पापी त्याजवळ येत होते तेव्हां फारीशी व लेखक कुरकूर करीत बोलिले कीं हा पाप्यांला जवळ घेतो व त्यां संगतीं खातो तेव्हां तो त्यांजवळ हा दाखला सांगत म्हणाला तुमच्यांतला कोणता मनुष्य त्याला शंभर मेंढरें असतांना त्यांतलें जर एक हारपलें तर तीं नव्याण्णव रानांत न सोडून जें हारपलेलें तें त्याला सांपडे पर्यंत त्याचे मागें जाणार नाहीं मग तें त्याला सांपडलें असतां मोठे हर्षानें तें तो आपले खांद्यावर घेतो आणि घरीं येऊन आपले इष्ट मित्र व शेजारी यांस एकत्र बलावून म्हणतो तुम्ही मसंगतीं हर्ष माना कांकीं माझें हारपलेलें मेंढरूं मला सांपडलें आहे तुह्माला मी सांगतों कीं या प्रमाणें ज्यां नव्याण्णव पुण्यवानांला पश्चात्ताप व्हावा लागत नाहीं यांपेक्षां एकाच अनुतापी पाप्याविषयीं आकाशांत अधिक हर्ष होईल किंवा कोणती स्त्री तिला दाहा पावल्या असून जर एक पावली सांडली तर दिवा न लावील आणि ती सांपडे पर्यंत एकाग्रतेनें न शोधील मग तिला ती सांपडली

म्हणजे ती आपले इष्ट मित्र व शेजारी यांस बलावून म्हणत्ये तुम्ही मसंगतीं हर्ष माना कांकीं जी पावली म्यां गमावली होती ती मला सांपडली आहे मी तुम्हाला सांगतों याप्रमाणें अनुतापी पाप्याविषयीं देवाचे दूतांचे मनांस हर्ष होतो

## त्रिकानंतर चौथा आदित्यवार

### प्रार्थनासारांश

हे देवा जे सर्व तुजवर भाव ठेवितात त्यांचे संरक्षका ज्या तुजवांचून कांहीं समर्थ नाहीं कांहीं पवित्र नाहीं तूं आपली कृपा आम्हावर प्रवृद्ध आणि प्रभूत कर अशासाठीं कीं तूं आमचा शास्ता व नेता असून आह्मी सांसारिक अर्थांतून असे निभावूं कीं शेवटीं सनातन अर्थ न गमावूं हे आकाशांतील बापा आम्हास येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे कारणें हें द्यावें आमेन

### पत्र रोमे ८. १८.

कारण मी समजतों कीं आम्हाला जें गौरव प्रकट व्हाव याचें आहे त्याजसतुल्य या आयुष्याचे कष्ट मोजायास योग्य नाहींत कांकीं सृष्टिची तत्पर आशा देवाचीं लेंकरें प्रकट होण्याची वाट पाहत्ये कांकीं सृष्टिची स्वतःदुर्दशेस वशीकृत झाली असें नाहीं पण वशीकर्त्ता जो याकडून ह्या आशेनें कीं सृष्टि आपण क्षयाचे वश्यतेंतून देवाचे लेंकरांचे गौरवी स्वतंत्रपणांत मुक्त होईल कारण आम्ही जाणतों कीं हा वेळपर्यंत



सर्व सृष्टि कन्हत्ये व प्रसूतिवेदना भोगित्ये तर तीच केवळ असें नाहीं पण ज्यां आम्हाला आत्म्याचा प्रथम उपज आहे ते आम्हीहि आदत्तपुत्रत्वाची म्हणजे आमचे देहाचे मुक्तीची वाट पाहतांना आपल्यांत कन्हतों

### सुवार्त्ता लूक ६. ३६.

जसा तुमचा बाप दयालु आहे तसे तुम्हीहि दयालु व्हा तुम्ही शंका करूं नका ह्मणजे तुम्हाविषयीं शंका होणार नाहीं तुम्ही अपवाद करूं नका म्हणजे तुह्मी अपवादित होणार नाहीं क्षमा करा म्हणजे तुम्हाला क्षमा केली जाईल देत जा म्हणजे तुम्हाला दिलें जाईल चांगलें दडपिलेलें हालिवलेलें कांठावर भरलेलें असें माप तुमचे पदरीं घालतील कांकीं ज्या मापानें तुम्ही मोजतां त्यानेंच तुह्माला परत मोजलें जाईल तेव्हां त्यानें त्यांला एक दाखला सांगीतला आंधळा आंधळ्याला संगतीं कसें नेईल उभयतां खांचेंत पडतील किं नाहीं शिष्य आपले अध्यापकापेक्षां थोर नाहीं तरीं प्रत्येक सिद्ध झालेला शिष्य आपले अध्यापकासारिखा होईल तर तूं आपले भाव्वाचे डोळ्यांतलें कुसळ कां पाहतोस आणि आपले डोळ्यांतलें मुसळ कां ध्यानांत आणीत नाहींस अथवा तूं आपले डोळ्यांतलें मुसळ न पाहतां आपले भाव्वास कसें ह्मणशील हे भाऊ मला तुझे डोळ्यांतलें कुसळ काढूं दे अरे ढोंग्या पहिल्यानें तूं आपले डोळ्यांतलें मुसळ काढून टाक मग तुला आपले भाव्वाचे डोळ्यांतलें कुसळ काढायला स्पष्ट दिसेल

## त्रिकानंतर पांचवा आदित्यवार.

प्रार्थनासारांश

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं तुझे सुनीतीनें या जगाचा व्यवहार स्वस्थत: असा चालावा कीं तुझे मंडळीनें पूर्ण भक्तियुक्त समाधान पावून हर्षेंकरून तुझी सेवा करावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र पहिलें पेत्रस ३. ८.

तुम्ही संमतिवंत संमायाळु भ्रातृप्रिय सुदयाळु सुमत असा वाईटाबद्दल वाईट किंवा भर्त्सनाबद्दल भर्त्सन परत करूं नका पण त्यांचे विपरीत आशीर्वाद द्या असें जाणून कीं ह्यालाच तुम्हाला बलाविलेलें आहे कीं आशीर्वादाचे भाग धेय तुम्हीं व्हावें जो जीवनाचा संभोग करायाची व सुभद्र दिवस पहायाची आशा धरितो तो जें वाईट त्यापासून आपली जीभ आणि कपटभाषणापासून आपले ओंठ हीं आकळो जें वाईट त्यापासून वळून जावो आणि जें उत्तम तें करो संमतीला झटो व तिचा शोध करो कांकीं पुण्यवानां वर ईश्वराचे डोळे आणि त्यांचे प्रार्थनांकडे त्याचे कान अस तात पण ईश्वराचें मुख दुष्कर्म्यांस प्रतिकूलच आहे आणि जें उत्तम त्यास जर अनुसराल तर तुम्हाला उपद्रव कोण करील पण यथार्थपणामुळें देखील जर तुह्मी दु:ख सोसाल तर धन्य आहां त्यांचे भयानें भयभीत होऊं नका आणि



व्याकुल होऊं नका पण ईश्वर जो देव त्याला तुम्ही आपले हृदयांत पवित्र मानीत जा

सुवार्त्ता लूक ५. १.

तर असें झालें कीं समुदाय देवाची गोष्ट ऐकायला त्या जवळ दाटीनें लागला असतां तो गेनेसरेताचे तळ्याजवळ उभा रहात होता तेव्हां त्यानें तळ्याचे कांठीं दोन तारवें उभीं पाहिलीं तेव्हां धीवर त्यांतून उतरून आपलीं जाळीं धूत होते नंतर त्यां तारवांतलें एक जें शिमोनाचें त्यावर त्यानें चढून त्याजवळून इच्छिलें कीं भूमीपासून कांहींसें हाका रून जावें मग तो बसल्यावर तारवावरून समुदायास शिकविता झाला नंतर त्यानें भाषण समाप्त करून शिमोनास म्हटलें डोहा मध्यें हाकारून जा आणि आपलीं जाळीं संग्रहासाठीं खालीं टाका तेव्हां शिमोनाला त्यास उत्तर करीत ह्मणाला हे प्रभो सारी रात्र श्रम करून आम्हास कांहीं पावलें नाहीं तथापि तुझे आज्ञेप्रमाणें मी जाळें खालीं टाकतों मग तसें करून त्यानीं मोठा मत्स्यांचा समुदाय वेढिला असा कीं त्यांचें जाळें फाटूं लागलें नंतर जे त्यांचे सहाय दुसरे तारवांत होते त्यानीं येऊन साहाय्य करावें ह्मणून त्यांजला यानीं पालवून बलाविलें तेव्हां ते आले आणि त्यानीं दोन्हीं तारवें अशीं भरिलीं कीं तीं बुडूं लागलीं तेव्हां शिमोन पेत्रसानें पाहून येशूचे गुडघ्यांजवळ पडून म्हटलें प्रभो मजपासून दूर जा कारण कीं मी पापी मनुष्य आहें कां कीं मत्स्यांचा जो संग्रह त्यानीं केला यामुळें त्याला व सर्व जे त्याचे संगतीं होते

त्यांला आश्चर्य वाटलें तसेंच जेबेदीचे पुत्र जे याकोब व योहान्न जे शिमोनाचे सहाय होते त्यांलाहि आश्चर्य वाटलें तेव्हां शिमोनाला येशू ह्मणाला भिऊं नको आतांपासून तूं माणसाचा संग्राह करिशील मग ते आपलीं तारवें भूमीवर आणून सर्व सोडून त्याचे मागें गेले

## त्रिकानंतर सहावा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे देवा ज्या त्वां जे तुजवर प्रीति करितात त्यांसाठीं जे अर्थ एवढे उत्तम आहेत कीं मनुष्याचे बुद्धीनें पुरते समजायाचे नाहींत ते सिद्ध केले आहेत आमचे हृदयांत तूं आपलेविषयीं अशी प्रीति उत्पन्न करावी कीं आह्मीं सर्व पदार्थांपेक्षां तुजवरच अधिक प्रीति करून जें जें आह्मास इच्छितां येईल त्या सर्वांहून उत्तम जीं तुझीं वचनें तीं आह्मास प्राप्त व्हावीं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र रोमे ६. ३.

ज्या आह्मीं ख्रिस्त येशूसाठीं बाप्तिस्मा घेतला त्या आह्मीं त्याचे मरणासाठीं बाप्तिस्मा घेतला हें तुह्मी जाणत नाहीं किं काय आह्मी बाप्तिस्म्याकडून मरणासाठीं त्याचे संगतीं पुरिलों आहों अशासाठीं कीं जसा ख्रिस्त बापाचे गौरवें करून मेलेल्यांतून उठला तसें आह्मींहि नव्या जीवनीं वर्त्तावें कांकीं जर आह्मी त्याचे मरणाचे उपमानेंकरून संयुक्त



झालों आहों तर त्याचे पुनरुत्थानाचे उपमानेंकरूनहि होऊं असें समजून कीं आमचें जुनें मनुष्य त्यासंगतीं क्रूसावर वधिलेलें आहे अशासाठीं किं पापाचा सार नाहींसा होऊन आह्मीं पापाची सेवा अणखीं नकरावी कांकीं जो मेला तो पापापासून मुक्त झाला आहे मग जर आह्मी ख्रिस्ता संगतीं मेलों आहों तर त्या संगतीं जीवूं असें आह्मी विश्वासतों असें समजून कीं ख्रिस्त उठला असतां अणखीं मरत नाहीं मृत्यु त्याजवर अणखीं प्रभुत्व करीत नाहीं कांकीं जेव्हां तो मेला तेव्हां पापामुळें एकदांच मेला पण जेव्हां तो जीवतो तेव्हां देवासाठीं जीवतो तसे तुह्मीहि आपणांतें पापामुळें मेलेले खरे पण ख्रिस्त येशू आमचा प्रभु याकडून देवासाठीं जीवंत असें माना

### सुवार्त्ता मात्थी ५. २०.

मी तुह्माला सांगतों कीं लेखक व फारीशी यांचे न्याया पेक्षां जर तुमचा न्याय अधिक नसता तर तुह्मी आकाशाचे राज्यांत जाणार नाहीं प्राचीनास सांगितलें होतें कीं तूं घात करूं नको असें तुह्मीं ऐकिलें आहे आणि जो घात करील तो न्यायाधीशीला संभावित होईल पण मी तुह्माला सांगतों कीं जो कोणी आपले भाव्वावर उगीच रागें भरतो तो न्यायाधीशीला संभावित होईल आणि जो कोणी आपले भाव्वाला रका ह्मणेल तो सभेला संभावित होईल आणि जो कोणी मूर्खा असें ह्मणेल तो नरकाचे अग्नीला संभावित होईल तर तूं आपलें दान जर वेदीजवळ आणितास आणि

तेथें आठवितास कीं आपले भावाला आपले प्रतिकूल कांहीं आहे तर तेथें वेदीसमोर आपलें दान ठेव आणि जा पहिं त्यानें आपले भावाशीं समेट कर मग येऊन आपलें दान अर्पून दे लौकरच तूं आपले प्रतिपक्षाशीं सुमत हो जोंपर्यंत तूं त्याजसहवर्त्तमान वाटेंत आहेस तोंपर्यंत नाहीं तर प्रति पक्ष तुला न्यायाधीशाचे हातीं देईल नंतर तूं बंदीशाळेंत घातला जाशील मी तुला खचीत सांगतों शेवटली दमडी फेडून देस तोंपर्यंत तिथून तूं निघणार नाहींस

## त्रिकानंतर सातवा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि अनंत पराक्रमी ईश्वरा जो तूं सर्व जें उत्तम याचा उत्पादक आणि दायक आहेस आमचे हृदयांत आपले नामाची प्रीति संपृक्त कर आमचे ठायीं सात्विक भक्ति वाढीव सर्व कुशलानें आम्हास स्वस्थ कर आणि तूं आपले परमकृपेनें त्यांतच आम्हास राखावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र रोमे ६. १७.

तुमचे प्रकृतीचे अशक्ततेमुळें मी मनुष्याचे सारिखा बोलतों तर जसे तुह्मी आपले अवयव मलिनता व अन्याय यांचे सेवेंत अन्यायार्थ ठेविले आहेत तसे आतां तुम्ही आपले अवयव पवित्रतेसाठीं न्यायाचे सेवेंत ठेवा कांकीं



जेव्हां तुम्ही पापाचे सेवक होतेत तेव्हां न्यायाविषयीं स्वतंत्र होतेत ज्यांविषयीं तुम्ही एव्हां लज्जित आहां त्यांवरून तुम्हाला काय फल तेव्हां होतें कांकीं त्यांचा परिणाम मरणच आहे पण तुम्ही आतां पापापासून मुक्त होऊन देवाचे सेवक झाले असतांना पवित्रतेंत आपलें फल पावत आहां आणि परिणाम सनातन जीवनच होईल कांकीं पापाचें योग्य फल मरणच आहे पण ख्रिस्त येशू याकडून देवाचा जो सुदाय तो सनातन जीवनच आहे

### सुवार्त्ता मार्कस ८. १.

त्यां दिवसांत मोटा समुदाय असतां व त्याला खायला कांहीं नसतां येशू आपले शिष्य जवळ बलावून त्यांस म्हणतो मी समुदायावर दया करितों कांकीं आज ते तीन दिवस मजवळ राहिले आहेत आणि त्यांला खायला कांहीं नाहीं मग जर मी त्यांला त्यांचे घरीं उपाशीं जाऊं देतों तर वाटेंत गळून पडतील कांकीं त्यांतले कित्येक दूरून आले आहेत तेव्हां त्याचे शिष्यानीं त्याला उत्तर केलें इथें रानांत त्यांला भाकरीनें तृप्त करायास कोण कसा समर्थ होईल नंतर त्यानें त्यांस विचारिलें तुम्हापाशीं किती भाकरी आहेत ते म्हणाले सात मग त्यानें समुदायास भूमिवर बसावें म्हणून आज्ञा दिली नंतर त्यानें त्या सात भाकरी घेऊन उपकारस्तुति करून मोडिल्या आणि लोकांस खायला घालायासाठीं आपले शिष्यांपाशीं दिल्या तेव्हां त्यानीं त्या समुदायाला घातल्या अणखीं त्यांपाशीं

थोडे धाकले मासे होते तेंहि त्यानें उपकारस्तुति करून त्यांस घालावयास आज्ञा दिली तर ते खाऊन तृप्त झाले मग उरलेले तुकड्यांचे सात करंडे त्यानीं उचलून घेतले तेव्हां ज्यानीं खाल्लें ते सुमारें चार हजार होते मग त्यानें त्यांजला निरोप दिला

## त्रिकालंतर आठवा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे देवा ज्या तुझा निरंतर अधिकार आकाशांत व पृथ्वींत सर्व गोष्टींचा व्यवहार करितो त्या तुला आह्मी नम्रतेनें विनवितों कीं सर्व जें नाशकारक तें आह्मापासून दूर करावें आणि जें जें आह्मास हितकारक आहे तें तें आह्माला द्यावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र रोमे ८. १२.

यास्तव भाव्वानों आह्मी इंद्रियानुसार वर्त्तायला इंद्रियांस वश्य नाहीं कारण जर तुह्मी इंद्रियानुसार वर्त्ताल तर तुह्मी मराल पण देहाचीं चेष्टितें जर तुह्मी दान्त कराल तर वांचाल जितके देवाचे आत्म्यानें शिष्ट असतात तितके देवाचीं लेंकरेंच आहेत तर तुह्मी पुन: भ्यायास दास्याचा आत्मा पावलेत नाहीं पण आदत्तक पुत्राचा आत्मा पावलां आहां ज्या त्याचे योगानें आह्मी आब्बा ह्मणजे बापा असें ओरडतों तोच आत्मा आमचे आत्म्यास



साक्ष देतो कीं आह्मी देवाचीं लेंकरेंच आहों आणि जर लेंकरें तर भागधेयहि देवाचे भागधेय खरें आणि ख्रिस्ताशीं सहभागधेय जर आह्मी संगतीं दु:ख सोशितों अशासाठीं कीं आह्मी संगतीं गौरविले जावें

सुवार्त्ता मात्थी ७. १५.

असत्य भविष्यवाद्यांविषयीं सावध असा जे मेंढरांचा वेष धरून येतात ते अंतरीं हारक लांडगेच आहेत त्यांचे फलांवरून तुह्मी त्यांला जाणाल कांटेरे झाडांवरून द्राक्षें अथवा रिंगण्यांवरून अंजीर लोक काढून घेतात किं काय तसें प्रत्येक सुफल झाड सुफल फलें देतें दु:फल झाड दु:फल फलें देतें सुफल झाडाच्यानें दुष्फल फलें देवत नाहीं व दुष्फल झाडाच्यानें सुफल फलें देवत नाहीं प्रत्येक झाड जें चांगलें फल देत नाहीं तें तोडिलें जातें आणि अग्नींत टाकिलें जातें तर त्यांचे फलांवरून त्यांस तुम्ही जाणाल प्रत्येक जो मला प्रभो प्रभो असें ह्मणतो तो आकाशाचे राज्यांत जाईल असें नाहीं पण जो माझे आकाशांतील बापाचे मनोदयाप्रमाणें वर्त्ततो तो

## त्रिकालंतर नववा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं जें जें यथार्थ आहे तें तें सर्वदा कल्पायास व करायास आह्माला बुद्धि दे

अशासाठीं कीं ज्यां आमच्यानें तुजवांचून कांहीं उत्तम करवत नाहीं त्यां आह्मास तुझे मनोदयाप्रमाणें वर्त्तायास त्यां समर्थ करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र पहिलें कोरिंथ १०. १.

भाव्वांनों मी इच्छित नाहीं कीं तुह्मी न जाणावें कीं आमचे वडील सर्व त्या मेघाखालतीं होते व समुद्रांतून सर्व पार गेले आणि मेघांत व समुद्रांत ते सर्व मोशेकडे बाप्तिस्मा पावले आणि ते सर्व सारखेंच आत्मिक अन्न खात असत व सर्व सारखेंच आत्मिक पिणें पीत असत कांकीं आत्मिक अनुसरत्या खडकांतून ते पीत असत तो खडक तर ख्रिस्तच होता पण त्यांतले बहुतांविषयीं देव संतुष्ट नव्हता ह्मणून ते रानांत पाडिले गेले तर ह्या गोष्टी आह्मास उदाहरणें झाल्या आहेत अशासाठीं कीं जसे ते लोभ करीत असत तसे आह्मी वाईट गोष्टींविषयीं लोभिष्ट असूं नये आणि जसे त्यांतले कित्येक होते तसे तुह्मी मूर्त्तिपूजक होऊं नका जसें लिहिलें आहे लोक खायला व प्यायला बसले नंतर खेळायला उठले आणि जसा त्यांतले कित्येकानीं व्यभिचार केला मग ते एकादिवसीं तेवीस हजार पडले तसा आह्मी व्यभिचार न करावा आणि जशी त्यांतले कित्येकानीं ख्रिस्ताची परीक्षा केली मग ते सर्पांकडून नाशिले गेले तशी आह्मी त्याची परीक्षा न करावी आणि जशी त्यांतले कित्येकानीं कुरकूर केली नंतर ते



नाशकाकडून नाशिले गेले तशी तुह्मी कुरकूर करूं नका तर ह्या सर्व गोष्टी त्यांला उदाहरणें अशा झाल्या आणि ज्यां आह्माला युगांचे अंत्यशक लागले आहेत त्यां आमचे हितोपदेशासाठीं ह्या लिहिल्या आहेत यास्तव मी स्थिर आहें असें ज्याला वाटतें तो न पडावा ह्मणून सावध असो मनुष्यांस लागत असत्ये यावांचून तुह्मास कांहीं परीक्षा लागली नाहीं तर देव विश्वासु आहे जो तुह्माला तुमचे शक्ति परतें परीक्षित होऊं देणार नाहीं पण तुह्मीं सहन करायास समर्थ व्हावें ह्मणून तो परीक्षेसहवर्त्तमान निस्तरण करील

सुवार्त्ता लूक १६. १.

तर तो आपले शिष्यांस बोलिला कोणेक धनवान मनुष्य होता त्याचा कारभारी असे मग तो त्याचें धन दवडितो असा आरोप त्याजविषयीं त्याला सांगीतला होता तेव्हां त्यानें त्याला बलावून ह्मटलें तुजविषयीं जें मी ऐकतों हें काय आहे तूं आपले कारभाराचा हिशेब दे कारण तुला पुढें कारभार करूं द्यावयाचा नाहीं मग तो कारभारी आपले मनांत ह्मणाला माझा धनी मजकडला कारभार काढून घेतो तर मी काय करूं माझ्यानें कुदळवत नाहीं भीक मागायला लाज वाटत्ये तर कारभारांतून जेव्हां मी घालविला जाईन तेव्हां मला त्यानें आपले घरांत घ्यावें ह्मणून जें मला करायाचें तें मी जाणतों मग त्यानें आपले धन्याचे ऋण्यांतले एकेकाला बलावून पहिल्याला

पुसलें त्वां माझ्ये धन्याला किति दिलें पाहिजे तेव्हां तो ह्मणाला शंभर मण तेल नंतर त्यानें त्यास ह्मटलें तूं आपला हिशेब घे आणि लौकर बसून पन्नास लिहून ठेव मग त्यानें दुसऱ्यालाहि विचारलें त्वां किति दिलें पाहिजे तेव्हां तो ह्मणाला शंभर खंड्या गहूं नंतर तो त्यास ह्मणाला तूं आपला हिशेब घेऊन ऐंशी लिहून ठेव तेव्हां त्या अन्यायी कारभाऱ्यानें शाहाणपण केलें यास्तव त्या धन्यानें त्याची श्लाघा केली कां तर या जगाचीं लेंकरें आपले धर्मांत उजेडाचे लेंकरांपेक्षां शाहाणीं असतात तर मी तुह्माला सांगतों तुह्मी आपलेसाठीं अन्यायी लक्ष्मींतून मित्र करा अशासाठीं कीं तुह्मी थकाल तेव्हां त्यानीं तुह्माला सनातन वस्तींत घ्यावें

## त्रिकानंतर दाहावा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा तुझे नम्र सेवकांचे प्रार्थनांकडे कृपेंकरून तुझे कान उघडे असावे आणि जें मागतात तें त्यांस पावावें ह्मणून तुला जें जें बनेल तें तें मागायाची त्यांला बुद्धि दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र पहिलें कोरिंथ १२. १.

भाव्वानों आत्मिक अर्थांविषयीं तुह्मीं न जाणावें असें मला बरें वाटत नाहीं तुह्मी जाणतां कीं तुह्मी परदेशीय



होतेत अवाच मुर्त्तींकडे नेलेले जसे तरीं नेलेले असाल तसे यास्तव मी तुह्मास कळवितों कीं कोणी देवाचे आत्म्याकडून बोलत असतां येशूला शापग्रस्त ह्मणत नाहीं व पवित्र आत्म्याकडून नसलें तर कोणाच्यानें येशूला प्रभु ह्मणवत नाहीं तर सद्गुणाचे विविध प्रकार आहेत पण एकच आत्मा आणि सेवांचे विविध प्रकार आहेत पण प्रभु एकच आणि करणांचे विविध प्रकार आहेत पण देव जो सर्वांत सर्व करितो तो एकच आहे तर प्रत्येकाला त्या आत्म्याचा प्रत्यय हित होण्यासाठीं येऊं दिला आहे कांकीं एकाला त्याच आत्म्याकडून विद्येचा वाद दिला आहे व दुसऱ्याला त्याच आत्म्याकडून ज्ञानाचा वाद दिला आहे खरें आणि अन्याला त्याच आत्म्याकडून विश्वास व अन्याला त्याच आत्म्याकडून चिकित्सितांचे सद्गुण आणि अन्याला चमत्कार करणें आणि अन्याला भविष्यवाद आणि अन्याला आत्म्यांचा विवेक व अन्याला विविध भाषा आणि अन्याला भाषांचें उतरणें हे सर्व सद्गुण तोच एकच आत्मा आपले मनोदयाप्रमाणें एक एकाला वांटून उत्पन्न करितो

### सुवार्त्ता लूक १९. ४१.

मग तो जवळ आला तेव्हां नगरातें पाहून त्याजविषयीं रडत बोलिला कीं तुझे कल्याणास ज्या गोष्टी लागतात ह्या जर तूं जाणत्यास तूंच आपले समयीं आतां तर बरें पण आतां तुझे दृष्टींतून त्या गुप्त झाल्या आहेत कारण कीं

दिवस तुला येतील जेव्हां तुझे शत्रु तुझे भोंवतीं चर खोदून तुला वेढा घालितील आणि चहूंकडून तुला कोंडितील आणि तुला व तुजमध्यें तुझे लेंकराला पाडून टाकितील आणि तुजमध्यें दगडावर दगड राहूं देणार नाहींत कारण कीं तूं आपला प्रसादसमय जाणिला नाहींस मग तो देवळांत जाऊन त्यांत जे विकीत होते व विकत घेत होते त्यांस घालवूं लागला आणि त्यांला ह्मणाला लिहिलें आहे माझें घर प्रार्थनेचेंच घर आहे पण तुह्मीं तें लुटाऱ्यांची गुहा केली आहे तेव्हां तो देवळांत नित्य शिकवीत असे आणि मुख्य आचार्य व लेखक व लोकांचे पुरोगम त्याचा नाश करायला जपूं लागले पण यांला कांहीं करायला सांपडेना कां कीं त्याचें ऐकायला सर्व लोक वळघले असत

## त्रिकानंतर अकरावा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे देवा जो तूं कृपा व दया करण्यानें आपलें अनंत सामर्थ्य विशेषेंकरून दाखवितोस आह्मास कृपा करून आपला येवढा सत्वगुण दे कीं आह्मीं तुझे आज्ञामार्गांत चालून तुझीं कृपेचीं वचनें पावूं आणि तुझे दिव्य धनाचे विभागी होऊं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र पहिलें कोरिंथ. १५. १.

भाव्वानों जी सुवार्त्ता मी तुह्माला सांगीतली आहे जी



तुह्मींहि घेतली आहे जींत तुह्मींहि स्थिर राहिले आहां ती मी तुह्माला कळवितों तिजकडूनच तुह्मी तरतां जी गोष्ट मी तुह्मास सांगीतली ती जर धरीत जाल तर तराल नाहीं तर तुह्मीं वृथा विश्वास धरिला आहे कां कीं जें म्यां समजून घेतलें तें प्रथम अर्थात तुह्मास म्यां सांगून दिलें कीं ख्रिस्त लेखांप्रमाणें आमचे पापांमुळें मरण पावला आणि पुरिला होता व लेखांप्रमाणें तिसरे दिवसीं उठला तो केफासाला दिसला नंतर त्यां बारांजणाला दिसला मग एकदां पांचशें भाऊ यांहून अधिकांस दिसला ज्यांतले बहुतेक आजपर्यंत आहेत आणि कित्येक निजले आहेत नंतर याकोबाला दिसला मग सर्व प्रेषितांला दिसला आणि सर्वांचे शेवटीं मलाहि जसें अकालजाताला तसा दिसला मी तर प्रेषितांचा कनिष्ठ आहें जो मी प्रेषित ह्मणविला जायास योग्य नाहीं कांकीं देवाचे मंडळीचे पाठीस मी लागत असें तरीं मी जो आहें तो देवाचे कृपेनें आहें आणि मजवर जी त्याची कृपा होती ती व्यर्थ झाली नाहीं पण त्यां सर्वांहून म्यां फार व्यायाम केला आहे तरीं तो मजकडून नाहीं पण देवाची कृपा मसंगतीं होती तिजकडूनच तर मी किंवा ते असे आह्मी गाजवून सांगतों आणि तुह्मीहि असा विश्वास धरिला आहे

### सुवार्त्ता लूक १८. ९.

तेव्हां त्यानें जे कित्येक आपण न्यायी आहों असें आपणाविषयीं भावित असत आणि दुसऱ्यांस तुच्छ मानीत

असत त्यांस हा दाखला सांगीतला दोघे मनुष्य देवळांत प्रार्थना करायास चढले एक फारीशी व दुसरा वसूली होता तो फारीशी एकलाच उभा राहून प्रार्थना करीत ह्या गोष्टी बोलिला हे देवा मी तुझी उपकारस्तुति करितों कारण कीं जशीं दुसरीं माणसें हारक अन्यायी जारकर्मी आहेत किंवा जसा हा वसूली आहे तसा मी नाहीं मी सातां दिवसांत दोनदां उपोषण करितों मला जें सर्व आहे त्याचा दाहावा भाग धर्म करून देतों तर त्या वसूल्यानें दूर उभें राहून आपली दृष्टि आकाशाकडे लावायास इच्छिलें नाहीं पण आपला ऊर बडवून तो बोलिला हे देवा मज पाप्यावर दया कर मी तुह्माला सांगतों त्याजपेक्षां हा आपले घरीं न्यायी ठरलेला उतरून गेला कारण कीं जो कोणी आपणास थोर करितो तो नीच केला जाईल आणि जो आपणास नम्र करितो तो थोर केला जाईल

## त्रिकानंतर बारावा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा ज्या तुझा प्रार्थना ऐकायाचा स्वभाव आमचे प्रार्थना करायाचे स्वभावापेक्षां अधिकच आहे आणि जें आम्ही मागतों किंवा जें आह्मास योग्य आहे त्यापेक्षां अधिक देत असतोस त्वां आपली कृपा आह्मावर फार करावी ज्यां घडलेल्या कामांविषयीं



आमचे अंतःकरणास भय वाटतें त्यांची क्षमा करावी आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचें पुण्य आणि मध्यस्थी यां द्वारांवांचून इतर द्वारानें जें जें आह्मी मागायास योग्य नाहीं तें तें आह्मास द्यावें आमेन

### पत्र दुसरें कोरिंथ ३. ४.

तर ख्रिस्ताकडून देवावर तसा भाव आह्माला आहे आह्मी जसें आपल्यांतून तसें आपले आपण कांहीं कल्पायास समर्थ आहों असें नाहीं पण आमचें सामर्थ्य देवापासूनच आहे ज्यानें आह्मास नवे संधेचे सेवक व्हावयास सामर्थ्य दिलें आहे केवळ लेखाचे नाही पण आत्म्याचे कां तर लेख मारून टाकितो पण आत्मा जीवंत करितो मग जर मरणाचें विधान जें अक्षरानीं पाषाणांवर केलेलें तें एवढें गौरवी होतें कीं इस्राएल लोक मोशेचे मुखाचे तेजामुळें त्याचें मुख स्थैर्यैंकरून पाहायास समर्थ नव्हते जें तेज नाहींसें झालें आहे तें तर आत्म्याचें विधान कशासाठीं अधिक गौरवी होणार नाहीं कारण जर दंडाचें विधान गौरवी होतें तर न्यायाचे विधानाचें गौरव फार अधिक अतिशयित आहे

### सुवार्त्ता मार्कस ७' ३१.

मग जूर व जीदोन यांचे सीमांतून पुनः निघून देकापोलीसाचे सीमामधून गालीलाचे समुद्राजवळ आला तेव्हां ते त्याजकडे एक जो बहिरा आणि कांहींसा मुका तो

आणितात आणि त्याजवर हात ठेवावे ह्मणून त्याला विनंती करितात तेव्हां त्यानें त्याला समुदायापासून एकीकडे नेऊन आपलीं बोटें त्याचे कानांत घातलीं आणि थुंकून त्याचे जिव्हेस स्पर्शिलें मग वरतीं आकाशाकडे पाहून कन्हला आणि त्याला बोलतो एफ्फाथा म्हणजे उघडा हो तेव्हांच त्याचे कान उघडले गेले व त्याचे जिभेचा बंध सुटला आणि तो स्पष्ट बोलता झाला मग त्यानें त्यांस खरावून सांगीतलें कोणाला सांगूं नका पण जेवढें अधिक त्यानें सांगीतलें तेवढें अधिक त्यांनीं गाजिवलें आणि अतिशयें विस्मित होऊन बोलिले त्यानें सारें चांगलें केलें तो बहिऱ्यांस ऐकतें करितो आणि मुक्यांस बोलतें करितो

## त्रिकालंतर तेरावा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि परम दयाळो देवा ज्या तुझे कृपेनेंच तुझे विश्वासु लोक तुझी खरी व योग्य सेवा करितात आह्मी तुला विनवितों कीं या आयुष्यांत आह्मी तुझी सेवा एवढे विश्वासूपणें करावी कीं अंतकाळीं आह्मीं तुझे दिव्य वचनांचा अनुभव निश्चयें पावावा येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे पुण्याकरितां आमेन

### पत्र गालात ३. १६.

तर आब्राहामाला व त्याचे संततीला वचनें सांगीतलीं



होतीं आणि बीजांला जसें बहुतांविषयीं असें ह्मणत नाहीं पण जसें एकाविषयीं आणि तुझे बीजाला जें ख्रिस्तच आहे तर हेंच मी ह्मणतों जो संधा देवानें ख्रिस्ताविषयीं ठरविली होती ती चारशें वर्षांनंतर जो नेम झाला त्याच्यानें तें वचन नाहींसें करायाला मोडवत नाहीं कारण विभक्ति जर नेमाकडून असली तर वचनाकडून नसत्ये पण आब्राहामाला देवानें ती वचनाकडून कृपेनें दिली तर नेम कशाला अपराधामुळें तो अणखीं दिला होता ज्या बीजाविषयीं वचन सांगीतलें होतें तें येई तोंपर्यंत दूतांकडून मध्यस्थाचे हातीं स्थापिलेला असतां मध्यस्थ तर एकाचा असा नाहीं पण देव एकच आहे तर नेम देवाचे वचनाचे प्रतिकूळ आहे किं काय असें न व्हावें कांकीं जीवंत करायास समर्थ असा नेम जर द्यावयाचा असला तर निश्चयें नेमाकडून न्याय असता पण लेखानें सर्वांला पापाखालीं संरुद्ध केलें आहे अशासाठीं कीं येशू ख्रिस्तावरचे विश्वासाकडून विश्वासणाऱ्यांस तें वचन द्यावें

### सुवार्ता लूक १०. २३.

ज्या गोष्टी तुह्मी पहातां त्या जे डोळे पहातात ते सुखी आहेत कां तर मी तुह्माला सांगतों कीं ज्या गोष्टी तुम्ही पहातां त्या पहायला बहुत भविष्यवाद्यांनीं व राजांनीं इच्छिलें आहे पण पाहिल्या नाहीं व ज्या गोष्टी तुह्मी ऐकतां त्या ऐकायास त्यांनीं इच्छिलें आहे पण ऐकिल्या नाहीं तेव्हां पहा एक नैयायिक उठून त्यास परीक्षा करीत

बोलिला हे अध्यापका मला सनातन जीवनाचा भागधेय व्हावयासाठीं काय करावें लागतें तेव्हां तो त्यास ह्मणाला नेमांत काय लिहिलें आहे तूं कसें वाचितोस तेव्हां तो उत्तर करीत बोलिला ईश्वर जो तुझा देव त्याजवर तूं आपले सारे हृदयानें व आपले सारे जीवानें व आपले सारे शक्तीनें व आपले सारे बुद्धीनें प्रीति कर आणि जशी तूं आपल्यावर प्रीति करितोस तशी आपले सविधावर प्रीतिकर मग तो त्यास ह्मणाला त्वां ठीक उत्तर केलें आहे असें करीत जा आणि वांचशील पण त्यानें आपल्यास न्यायी ठरवायास इच्छून येशूला ह्मटलें तर माझा सविध कोण आहे तेव्हां येशू उत्तर करीत बोलिला कोणी एक मनुष्य येरुशालेमाहून उतरून येरीखोस जात होता तेव्हां लुटाऱ्यांचे हातीं सांपडला ते त्याचीं वस्त्रें काढून व त्याला फटकें मारून त्याला अर्धमेला सोडून गेले तेव्हां एक आचार्य सहज त्या वाटेनें उतरत जात होता आणि त्याला पाहून मागें वळून दुसरे अंगाकडून गेला याप्रमाणें एक लेवीहि त्या स्थानाजवळ होत्साता येऊन पाहून दुसरे अंगाकडून गेला पण एक शोमरोनी वाटचाल करितांना त्याजकडे आला आणि त्याला पाहून दयेनें कळवळला मग त्यानें जवळ येऊन त्याचे घाय तेल व द्राक्षारस ओतून बांधिले नंतर त्याला आपले वाहनावर बसवून सरांईत नेलें आणि त्याचा उपचार केला आणि दुसरे दिवसीं निघतांना त्यानें दोन पावले काढून



सरांईचे धन्याला दिले आणि त्याला सांगीतलें तूं त्याचा उपचार करीत जा आणि जें कांहीं तूं खरचशील तें मी फिरून येईन तेव्हां तुझें फेडून देईन तर जो लुटाऱ्यांचे हातीं सांपडला त्याचा शेजारी या तिघांजणांतला कोणता होता तुला काय वाटतें तेव्हां त्यानें म्हटलें ज्यानें त्याजवर दया केली तो तेव्हां येशूनें त्यास सांगीतलें तूंहि जाऊन तसेंच कर

## त्रिकानंतर चौदावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा विश्वास आशा प्रीति यांची वृद्धि आम्हाला दे आणि ज्याविषयींचें त्वां वचन दिलें आहे तें आह्मी पावावें ह्मणून ज्याविषयींची त्वां आज्ञा दिली आहे तें आम्हाला आवडे असें कर येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र गालात ५. १६.

तर मी म्हणतों आत्म्याकडून वर्त्ता ह्मणजे तुम्ही इंद्रियांची इच्छा तर्पिणार नाहीं कां तर इंद्रियें आत्म्याचे प्रतिकूल इच्छितात आणि आत्मा इंद्रियांचे प्रतिकूल इच्छितो अणखीं हीं परस्परें विरुद्ध आहेत म्हणून जें तुम्हास बनतें तें तुमच्यानें करवत नाहीं पण जर तुम्ही आत्म्याकडून वर्त्तविले जातां तर तुम्ही नेमाखालीं नाहीं

पण दुस्स्वभावाचीं कामें प्रकट आहेत तीं हींच आहेत म्हणजे जारकर्म व्यभिचार मलिनता लालसा मूर्त्तिपूजा गारूड द्वेष कलह ईर्ष्या उत्सव विप्रलाप विप्रयोग पाखंड मत्सर घात मद्यपान गोंधळ इत्यादि ज्यांविषयीं जसें म्यां पूर्वी सांगीतलें तसें तुम्हास आगोदर सांगतों कीं जे असलीं कामें करितात ते देवाचे राज्यांत विभाग पावणार नाहींत पण आत्म्याचें फल म्हणजे प्रीति आनंद समाधान सहिष्णुता उदारत्व सुकृति विश्वास लीनता भोगयमन अशां प्रतिकूल कांहीं नेम नाहीं तर जे ख्रिस्ताचे आहेत त्यानें इंद्रियें व त्यांच्या चेष्टा व इच्छा यांस दमन करून टाकिलें आम्ही जर आत्म्यानें जीवतों तर आत्म्यानेंच वर्त्तावें एकमेकाशीं स्पर्धा करितांना आम्हीं अभिमानी नसावें

लुकाची सूक १७. ११.

आणि येशू येरूशालेमाकडे जात असतांना असें झालें कीं सामार्या व गालील यांजमधून चालिला आणि तो कोणेका गांवांत जातांना कोढी मनुष्य दहा त्याला आडवे आले जे ते दूर उभे राहिले आणि उंच शब्देंकरून बोलिले हे प्रभो येशू आह्मावर दया कर तेव्हां त्यानें पाहून त्यांला ह्मटलें तुह्मीं जाऊन आचार्यांचे दृष्टीस पडा मग ते जातांना असें झालें कीं ते शुद्धता पावले तेव्हां त्यांतला एक मी शुद्धता पावलों आहें असें पाहून देवाला मोठे शब्दानें गौरवून माघारा गेला आणि त्याजला कृतज्ञता निवेदून त्याचे पायां



जवळ अधोमुख पडला तो तर शोमरोनी होता मग येशू उत्तर करीत बोलिला दहा जण शुद्धता पावले कीं नाहीं तर ते नऊ कुठें आहेत देवाचें गौरव करायास ह्या परकीया वांचून कोणी येतां दृष्टीस पडले नाहींत नंतर त्याला तो बोलिला उठून जा तुझे विश्वासानें तुला तारिलें आहे

## त्रिकानंतर पंधरावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं तुझे निरंतर कृपेनें तुझी मंडळी राखावी आणि तुझे पाठबळावांचून अशक्त मनुष्याच्यानें पतित होणें चुकवत नाहीं ह्मणून जें जें नाशक आहे त्याजपासून आह्माला आपले साहाय्यानें सर्वदा राख आणि जें जें आमचे तारणाविषयीं उपयोगी आहे त्याजकडली वाट आह्माला दाखीव येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र गालात ६. ११.

पहा किती अक्षरानीं म्यां आपले हातानें तुह्माला लिहिलें आहे जितके दुस्स्वभाव धरून बाहेर सुशोभित दिसायास इच्छितात तितके तुह्मीं सुंता घ्यावी ह्मणूनतुह्माला निकड लावितात केवळ यासाठीं कीं ख्रिस्ताचे क्रूसामुळें त्यांचे पाठीस न लागावें कांकीं ज्यानीं सुंता घेतली आहे ते आपण नेम पाळीत नाहींत पण तुह्मीं सुंता घ्यावी ह्मणून हे अशा

साठीं इच्छितात कीं यानीं तुमचे अंगाविषयीं अभिमान धरावा पण आमचा प्रभु येशू ख्रिस्त याचे क्रूसावांचून मला कांहीं दुसऱ्याविषयीं अभिमान धरणें नव्हावें ज्याजकडून प्रपंच मजविषयीं क्रूसावर बसविला आहे आणि मी प्रपंचा विषयीं कांकीं ख्रिस्त येशू जवळ सुंता किंवा असुंता कांहीं साधत नाहीं पण नवी प्रकृति साधत्ये व जितके या विधि प्रमाणें वर्त्ततात त्यांला व देवाचे इस्राएलाला समाधान व कृपा असावी यानंतर कोणी मला दुःख देऊंनये कांकीं मी आपले अंगावर प्रभु येशूमुळें डाग पावून धरितों भाव्वानों आमचा प्रभु येशू ख्रिस्त याची कृपा तुमचे आत्म्याशीं असावी आमेन

सुवार्त्ता मात्थी ६. २४.

कोणाच्यानें दोहों धन्यांची सेवा करवत नाहीं कां तर तो एकाचा द्वेष करील आणि दुसऱ्यावर प्रीति करील किंवा एकाला उत्तम मोजील आणि दुसऱ्याला तुच्छ मानील देवाची आणि लक्ष्मीची सेवा तुमच्यानें करवत नाहीं यास्तव मी तुह्माला सांगतों तुह्मीं काय खावें व काय प्यावें अशी आपले जीवाची व काय अंगीं ल्यावें अशी आपले अंगाची फार चिंता करूं नका अन्नापेक्षां जीव आणि वस्त्रापेक्षां अंग अधिक नाहीं किं काय आकाशांतलीं पांखरें पहा तीं कधीं पेरीत नाहींत कापणी करीत नाहींत कोठारांत सांठवीत नाहींत तरीं आकाशांतील तुमचा बाप त्यांस पोषितो त्यांजपेक्षां तुह्मी श्रेष्ठ आहां किं नाहीं आणि चिंता करून आपली



उंची अणखीं. एक हातभर वाढवायास तुह्मामध्यें कोण समर्थ आहे तर पांघरुणाविषयीं कां तुह्मी चिंता करितां रानां तलीं फुलझाडें कशीं रुझतात हें ध्यानांत आणा तीं श्रम करीत नाहींत सूत कांतीत नाहींत तथापि मीं तुह्माला सांगतों कीं शलोमो आपल्या सकल ऐश्वर्य्यांमध्येंहि यांतले एका फुल झाडासारिखा वस्त्रयुक्त नव्हता मग माळांतलें गवत जें आज आहे आणि उद्यां भटीमध्यें टाकिलें जातें तें जर असें वस्त्रयुक्त देव करितो तर अहो अल्प विश्वासी तुह्माला फार अधिक वस्त्रयुक्त करील किं नाहीं आह्मीं काय खावें काय प्यावें काय अंगीं ल्यावें असें फार चिंता करीत बोलूं नका कां तर ह्यां सर्वांविषयीं परदेशस्थ लोक ह्मटतात कारण कीं हीं अवघीं तुह्माला पाहिजेत असें तुमचा आकाशांतील बाप समजतो तर तुह्मी पहिल्यानें देवाचें राज्य व त्याचा न्याय यांविषयीं ह्मटा मग हीं अवघीं तुह्माला अणखीं दिलीं जातील यास्तव उद्यांसाठीं फार चिंता करूं नका कांकीं उद्यांचा दिवस आपल्यांगोष्टींची चिंता करील प्रत्येक दिवसाचें जें दुःख तें त्याला पुरें आहे

## त्रिकानंतर सोळावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितां कीं तुझे निरंतर कृपें करून तुझी मंडळी पवित्र व संरक्षित करावी व तुझे साहा य्यारहित तिच्यानें सुरक्षित राहवत नाहीं ह्मणून त्वां साहाय्य

व उपकार करून तिला सर्वदा राखावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र एफेस. ३. १३.

यास्तव मी विनवितों कीं माझे जे कष्ट तुमचे कारणें झाले त्यांमुळें तुह्मी भागूं नका ते तुमचें गौरवच आहेत यां करितां आमचा प्रभु येशू ख्रिस्त ज्यावरून आकाशांतलें व पृथ्वीतलें सर्व कुटुंब नामांकित आहे त्याचे बापाजवळ मी आपले गुडघे टेंकितों अशासाठीं कीं त्यानें आपले गौरवी आढ्यतेप्रमाणें आपले आत्म्याकडून तुह्माला अंतःकरणांत शक्तीनें समर्थ होऊं द्यावें व तुमचे हृदयांत ख्रिस्तानें विश्वासें करून रहावें अशासाठीं कीं तुह्मीं प्रीतींत मूलस्थित व तलस्थित होऊन जो रुंदी व लांबी व खोली व उंची यांस सर्व साधूंचे बरोबर समजायास व ख्रिस्ताची जी प्रीति ज्ञानास अप्रमेय आहे ती जाणायास समर्थ व्हावें अशासाठीं कीं तुह्मीं देवाचे सर्व पूर्तीनें पूर्ण व्हावें तर जी शक्ति आमचे ठायीं कार्य साधिते तिजप्रमाणें जें सर्व आह्मी प्रार्थितों किंवा कल्पितों त्याजपेक्षां अत्यंत अधिक करायाला जो समर्थ आहे त्यास युगोयुग सर्व पिढ्यांपर्यंत मंडळींत ख्रिस्त येशूकडून गौरव असावें आमेन

सुवार्त्ता लूक ७. ११.

आणि पुढले दिवसीं असें झालें कीं तो नाईन ह्मटलेले गांवांत होता आणि त्यासंगतीं त्याचे शिष्य व बहुत लोक चालत होते तो त्या गांवाचे दरवाज्याजवळ पोहोंचला तेव्हां



पहा एक मृत मनुष्य बाहेर वाहिला जात होता तो आपले आईचा एकुलता होता आणि ती विधवा होती व त्या गांवचे बहुत लोक तिजसंगतीं होते तेव्हां तिला पाहून प्रभु कृपेनें कळवळला आणि तिला ह्मणाला रडूं नको नंतर त्यानें जवळ येऊन तिरडीस स्पर्शिलें आणि वाहणारे उभे राहून तो बोलिला हे तरुणा मी तुला ह्मणतों ऊठ मग तो मृत मनुष्य उठून बसला आणि बोलूं लागला तेव्हां त्यानें तो त्याचे आईला सोंपून दिला मग सर्वांस भीड वाटली आणि ते देवाला गौरवीत बोलिले कीं मोठा भविष्यवादी आह्मामध्यें उत्पन्न झाला आहे आणि देव आपले लोकांस आसन्न झाला आहे मग त्याजविषयीं ही वार्त्ता सर्व यहूदांत व सर्व चहूंकडचे देशांत पसरली

## त्रिकानंतर सतरावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं तुझे कृपेनें आमचे पुढें आणि मागें सर्वदा असावें आणि सर्व सत्कर्मांमध्यें नित्य तत्पर असावयास आह्मास बुद्धि द्यावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र एफेस. ४. १.

तर प्रभूकरितां जो बंदिवान तो मी तुह्मास संबोध करितों कीं ज्या बलावण्यानें तुह्मी बलाविलेले आहां तद्योग्यतः वर्त्ता संपूर्ण नम्रता लीनता व सहिष्णुता ह्या धरितांना आणि प्रीतीनें

परस्परांशीं क्षमा करितांना सुमतीचे बंधांत आत्म्याचें एकत्व राखायास झटत जा एकच देह आणि एकच आत्मा आहे जसे तुह्मीहि आपले बोलवण्याचे एकाच आशेंत बोलाविलेले आहां तसा एकच प्रभु एकच विश्वास एकच बाप्तिस्मा सर्वांचा एकच देव व बाप जो सर्वांवरतीं व सर्वांत व्याप्त व तुह्मा सर्वांचेठायीं आहे

सुवार्त्ता लूक १४. १.

आणि असें झालें कीं तो फारीशांतले अधिकाऱ्यांतले कोणेकाचे घरीं शाब्बाथदिवसीं जेवायास गेला असतां ते लोक त्याजला जपून पहात होते तेव्हां पहा त्या समोर कोणीएक जठरामी माणूस होता आणि येशू नैयायिक व फारीशी यांस उत्तर करून बोलत ह्मणाला शाब्बाथांत निरोगी करणें उचित आहे किं नाहीं परंतु ते उगेच राहिले तेव्हां त्यानें त्यास घेऊन निरोगी केलें आणि निरोप दिला नंतर तो त्यांला उत्तर करीत बोलिला शाब्बाथदिवसीं तुमच्यांतले कोणेकाचा गाढव अथवा बैल जर खांचेंत पडेल तर तो तेव्हांच त्याला वर काढणार नाहीं काय तेव्हां त्यांच्यानें त्याला यांविषयीं कांहीं उत्तर देववेना तेव्हां ते श्रेष्ट गाद्या कसे निवडून घेत असत हें त्यानें पाहून जे बला विले होते त्यांस बोलून दाखला सांगीतला जेव्हां कोणेकानें तुला लग्नास बलाविलें आहे तेव्हां श्रेष्ट गादीवर बसूं नको कदाचित तुजपेक्षां कोणी योग्य त्यानें बलाविला असेल मग ज्यानें तुला व त्याला बोलाविलें तो येऊन तुला सांगेल याला



जागा दे मग तूं लज्जेनें शेवटली जागा घेऊं लागशील पण जेव्हां तुला बलाविलें आहे तेव्हां जाऊन शेवटले जागेंत बैस अशासाठीं कीं ज्यानें तुला बलाविलें होतें तो येईल तेव्हां त्यानें तुला ह्मणावें सख्या याजपेक्षां उंच जागेंत बस तेव्हां जे तुझे संगतीं बसले त्यांचे देखतां तुझा आदर होईल कांकीं जो कोणी आपणास थोर मानितो तो नीच केला जाईल आणि जो कोणी आपण नम्र होतो तो थोर केला जाईल

## त्रिकानंतर अठरावा आदित्यवार

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आम्ही तुला विनवितों कीं प्रपंच इंद्रियें आणि शैतान यांचे भुलविण्याचें निवारण करायास आणि पवित्र चित्तानें व मनानें जो तूं एकच देव त्या तुला अनुसरा यास तूं आपले लोकांस सत्गुण द्यावा येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र पहिलें कोरिंथ. १. ४.

तुम्हाविषयीं मी आपले देवाची उपकारस्तुति नित्य करितों ह्मणजे ख्रिस्त येशूकडून तुम्हास देवाची जी कृपा दिली इजकरितां कीं तुह्मी त्याकडून सर्वाविषयीं सर्व वाद व ज्ञान यांविषयीं परिपूर्ण झाले आहां जसें ख्रिस्ताचें प्रव चन तुम्हामध्यें स्थिराविलें होतें यावरून तुम्ही आमचा प्रभु येशू ख्रिस्त याचे प्रादुर्भावाची वाट पाहातांना कांहीं सदगु

णाविषयीं असिद्ध नाहीं जो तुह्मालाहि समाप्तिपर्यंत स्थिर करील ह्मणून तुह्मी आमचा प्रभु येशू ख्रिस्त याचे दिवसीं निर्दोषी व्हाल

सुवार्त्ता मात्थी २२. ३४.

त्यानें सादूक्यांस उगेंच बसविलें असें ऐकून फारीशी त्या जवळ एकत्र मिळाले तेव्हां त्यांतला एक जो नैयायिक हा त्याची परीक्षा करितांना विचारीत बोलिला हे अध्यापका नेमांत कोणती आज्ञा मोठी तेव्हां येशू त्यास ह्मणाला ईश्वर जो तुझा देव त्याजवर तूं आपले सारे चित्तानें व आपले सारे जीवानें व आपले सारे बुद्धीनें प्रीति कर हीच पहिली व मोठी आज्ञा आहे आणि दुसरी तिजसारिखी आहे कीं जशी तूं आपल्यावर प्रीति करितोस तशी आपले शेजाऱ्यावर प्रीति कर यां दोहों आज्ञांवर सारा नेम आणि भविष्यवादी अवलंबित आहेत तेव्हां फारीशी एकत्र मिळाले असतां येशू त्यांला विचारीत बोलिला ख्रिस्ताविषयीं तुह्माला काय वाटतें तो कोणाचा पुत्र आहे ते त्याजला म्हणतात तो दावीदाचा तो त्यांस ह्मणतो तर दावीद पवित्र आत्म्याकडून त्याला प्रभु कां ह्मणतो कीं ईश्वरानें माझे प्रभूला म्हटलें तुझे शत्रूंस मी तुझें पदासन करीन तोंपर्यंत माझे उजवेकडेस बैस जर दावीद त्याला प्रभु म्हणतो तर त्याचा पुत्र कसा आहे तेव्हां कोणाच्यानें त्याला एका वाक्याचें उत्तर करवेना आणि त्या दिवसापासून त्याला अणखीं विचारायास कोणी धैर्यवान नव्हता



# त्रिकानंतर एकूणिसावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे देवा तुझे साहाय्यारहित जें तुला प्रिय तें आमच्यानें करवत नाहीं ह्मणून सर्व गोष्टींविषयीं तुझे पवित्र आत्म्यानें आमचें मन संबोधित व शिष्ट करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र एफेस. ४. १७.

हें तर मी सांगतों आणि प्रभूसाठीं साक्ष देतों कीं जसे दुसरे परदेशस्थ आपले मनाचे शून्यतेंत वर्त्ततात तसे तुह्मी पुढें वर्त्तूं नका त्यांची बुद्धि अंधकारवृत आहे आपल्यांतील अज्ञानामुळें आणि आपले हृदयाचे कठिणपणामुळें ते देवसंबंधी आचारापासून फिरले आहेत त्यानीं निर्लज्ज होऊन लालसेंत सर्व मलिनता स्पृहेनें करावयास आपलें चित्त लाविलें आहे पण तुह्मी याप्रमाणें ख्रिस्त शिकलां नाहीं जर तुह्मी त्याचें ऐकिलें आहे आणि जसें येशूविषयीं सत्य आहे तसें जर त्याकडून शिकविलेले आहां कीं तुम्ही पूर्व आचारानुसार जें जुनें मानुष्य भुलवित्यां इच्छांनुसार दुष्ट आहे तें सोडून द्यावें आणि तुह्मी आपल्या मनःशीलाविषयीं नवें व्हावें आणि जें नवें मानुष्य देवानुसार न्याय व सत्य पवित्रता यांविषयीं उत्पन्न होतें तें अंगीं धरावें यास्तव लबाडी सोडून तुम्ही एक एक

आपले शेजाऱ्याशीं सत्य बोलत जा कां तर आह्मी एकमेकांचे अवयव आहों तुम्हास राग येईल तरीं पाप करूं नका तुमचे रागावर सूर्य मावळूं नये आणि सैतानास प्रसंग देऊं नका जो चोरी करी तो अणखीं चोरी न करो पण आपले हातानीं चांगलें काम करितांना उद्योग करो अशासाठीं कीं ज्याला अगत्य आहे त्याला द्यावयास समर्थ असावा कांहीं कुत्सित वाक्य तुमचे तोंडांतून निघूं नये पण जें उत्तम वाक्य ज्ञानवर्द्धनास उपयोगी असून ऐकणाऱ्यास सुबुद्धि देईल तें व देवाचे ज्या पवित्र आत्म्यानें तुम्ही उद्धाराचे दिवसाविषयीं मुद्रांकित झाले आहां त्याला जें अप्रिय तें करूं नका सर्व कडूपण उत्सव राग गोंगाट दुर्भाषण द्रोह यांस तुह्मीं आपलेपासून दुर करावें तुह्मी ऐकमेकाशीं उपकारिक आणि दयालु असा व जशी देवानें ख्रिस्ताकरितां तुम्हास क्षमा केली आहे तशी तुम्ही ऐकमेकांस क्षमा करीत जा

सुवार्त्ता मात्थी ९. १.

नंतर तो तारवावर चढून पार गेला आणि आपले गांवांत आला तेव्हां पहा त्यानीं बाजेवर घातलेला अर्धांगवायूचा माणूस त्याजवळ आणिला आणि येशूनें त्याचा विश्वास पाहून त्या पक्षघात्यास ह्मटलें हे लेंकरा धीर धर तुला तुझे पापांविषयीं क्षमा केली आहे तेव्हां लेखकांतले कित्येक आपापल्यांत म्हणाले हा पाखंड बोलतो तेव्हां येशूनें त्यांच्या कल्पना जाणून ह्मटलें तुह्मी आपले मनांत वाईट कल्पना कां करितां कांकीं तुला तुझे पापांविषयीं क्षमा केली आहे हें म्हणणें अथवा तूं उठून जा हें ह्मणणें कोणतें अधिक सोपें आहे पण पापांची क्षमा करायाला पृथ्वीवर मनुष्याचे पुत्राला अधिकार आहे हें तुह्मीं जाणावें ह्मणून तेव्हां तो त्या पक्षघात्याला म्हणतो तूं उठून आपली बाज उचल आणि आपले घरीं जा तेव्हां तो उठून आपले घरीं गेला मग लोकानीं पाहून आश्चर्यकरून ज्या देवानें मनुष्यास एवढा अधिकार दिला त्या देवाला गौरविलें



## त्रिकानंतर विसावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि परम कृपालो देवा आह्मी तुला विनवितों कीं जें कांहीं उपघातक असेल त्यापासून आम्हास त्वां आपले उदार कृपेनें राखावें अशासाठीं कीं आम्ही देह व मन यां दोहींविषयीं सिद्ध असतांना जें जें करावें म्हणून तूं इच्छितोस तें तें संतोषेंकरून साधावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र एफेस. ५. १५.

तुम्ही शुद्धतेनें वर्त्तावें ह्मणून सावध असा जसे अज्ञानी तसे नका पण जसे ज्ञानी तसे वर्त्ता तुम्ही आपले वेळाचा सुप्रयोग करा कांकीं हे दुर्दिवस आहेत यास्तव तुम्ही निर्बुद्धि होऊं नका पण ईश्वराचा मनोदय काय आहे

हें जाणा आणि मद्यानें उन्मत्त होऊं नका यांत सोदेपण आहे पण आत्म्यानें भरलेले असे व्हा गीतें स्तोत्रें व आत्मिक लावण्या यांकडून तुम्ही आपले मनांत ईश्वराला गायन व वादन करितांना आपल्यांत बोलत जा आमचा प्रभु येशू ख्रिस्त याचे नावानें देव जो बाप याची तुम्ही सर्वदां सर्वां विषयीं उपकारस्तुति करा देवाचें भय धरितांना तुह्मी एक मेकांचे अधीन असा

सुवार्त्ता मात्थी २२. १.

आकाशाचें राज्य एक माणूस जो राजा यास उपमित होतें ज्या त्यानें आपले पुत्राचें लग्न केलें तेव्हां लग्नास जे पाचारिले होते त्यांस बलावायास त्यानें आपले सेवक पाठविले परंतु ते येईनात मग पुनः तो दुसरे सेवकांस पाठा वितांना म्हणाला जे बलाविले आहेत त्यांस तुह्मी सांगा पहा म्यां आपलें भोजन सिद्ध केलें आहे मी आपले बैल व पुष्ट केले पशु मारिले आहेत आणि सारें सिद्ध आहे तुह्मी लग्नाला या पण ते तुच्छ मानून कोणी आपले शेताला कोणी आपले उदमाला असे गेले आणि वरकड जे होते त्यानीं त्याचे सेवकांस धरून भर्त्सिलें आणि मारून टाकिलें तेव्हां तें ऐकून तो राजा रागें भरला मग त्यानें आपलीं सैन्यें पाठवून त्यां घातकांचा नाश केला आणि त्यांचें नगर जाळून टाकिलें तेव्हां तो आपले सेवकांस म्हणतो लग्नसाहित्य सिद्ध आहे खरें पण जे बलाविलेले ते योग्य नव्हते यास्तव तुह्मी वाटांचे चतुष्पथांत जा आणि जितके



तुम्हाला सांपडतील तितक्यांला लग्नास बलावा नंतर त्यां सेवकानीं वाटांत जाऊन सर्व जितके बरे वाईट सांपडले तितके मेळविले तेव्हां लग्नघर बसणाऱ्यानीं भरलें नंतर त्या राजानें बसणारे पहायास आंत येऊन तिथें एका मनुष्याला लग्नवस्त्र न धारण केलेलें पाहिलें आणि त्यास ह्मटलें सख्या तूं लग्नवस्त्र नधारण करितां इथें आंत कां आला आहेस तेव्हां तो अवाच राहिला मग राजा सेवकांस म्हणाला त्याचे हात पाय बांधून त्याला उचलून न्या आणि बाहे रल्या अंधारांत द्या टाकून तेथें रडणें व दांत कडकड विणें होईल कांकीं बलाविलेले बहुत पण निवडलेले थोडे आहेत

## त्रिकानंतर एकविसावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश

हे दयालु ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं तूं आपले विश्वासू लोकांस क्षमा करून समाधान करावें अशासाठीं कीं त्यानीं आपले सर्व पापापासून शुद्ध होऊन शांत अंतःक रणेंकरून तुझी सेवा करावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र एफेस. ६. १२.

माझे भाव्वानों तुह्मी प्रभूकडून व त्याचे पराक्रमी साम र्थ्याकडून बलवान असा तुह्मी देवाचें पूर्ण कवच अंगीं ल्या अशासाठीं कीं तुम्ही सैतानाचे युक्तिविरुद्ध उभे रहायास

समर्थ व्हावें कारण कीं आमचें युद्ध केवल रक्तमांसापाशीं आहे असें नव्हे पण आधिपत्यांपाशीं अधिकारांपाशीं या जगाचे अंधाराचे राज्य कर्त्यांपाशीं वरचे स्थानांतले दुष्ट आत्मिकांपाशीं तें आहे यास्तव तुह्मी देवाचें पूर्ण कवच घ्या अशासाठीं कीं तुह्मीं दुर्दिवशीं आडवे उभे राहायास समर्थ व्हावें आणि सर्व प्रयत्न करून स्थिर रहावें तर तुह्मी आपली कटि सत्यानें वेष्टून न्यायाचें उरस्त्राण घालून स्थिर रहा आणि सामाचे सुवार्त्तेचे सज्जेनें आपले पाय उपनद्ध करून सर्वांवर तुह्मी विश्वासाची ढाल घ्या ज्या तिनें तुह्मी दुष्टाचीं सर्व तावलेलीं अस्त्रें विझवायास समर्थ व्हाल आणि तारणाचें शिरस्त्राण आत्म्याची तरवार जी देवाची गोष्ट आहे यांसहि घ्या सर्व समयीं आत्म्याकडून सर्व प्रार्थना व विनंती येणेंकरून प्रार्थना करीत जा आणि यासाठीं तुह्मी सर्व तत्परतेनें व सर्व साधूंविषयींचे विनंतीनें जागरूक असा आणि मजविषयीं कीं ज्या सुवार्त्तेमुळें मी बंदींत प्रेषित आहें तिचें रहस्य कळवायास म्यां आपलें तोंड धैर्यानें उघडावें ह्मणून मला प्रवचन द्यावें अशासाठीं कीं जसें मला बोलायास योग्य आहे तसें म्यां प्रगल्भतेनें बोलावें

सुवार्त्ता योहान ४. ४६.

आणि एक राजकीय मनुष्य होता ज्याचा पुत्र कापेर्नाऊम गांवांत रोगी पडला होता त्या मनुष्यानें येशू यहूदांतून गालीलांत आला आहे असें ऐकून त्याजवळ जाऊन विनंती केली कीं त्वां उतरून जाऊन माझे पुत्रास



निरोगी करावें कांकीं तो मरत पडला होता तेव्हां येशू त्यास ह्मणाला चमत्कार आणि उत्पात जर न पहाल तर तुह्मी विश्वास धरणार नाहीं तो राजकीय मनुष्य त्यास ह्मणाला हे प्रभो माझा लेंक मेल्याचेपूर्वीं उतरून ये येशू त्यास ह्मणाला तूं जा तुझा पुत्र वांचतो तेव्हां जें वचन येशूनें त्याला सांगीतलें त्याचा विश्वास धरून तो मनुष्य गेला मग तो उतरत जात असतां त्याचे सेवक त्यास भेटले आणि वर्त्तमान सांगत बोलिले कीं तुझा पुत्र वांचतो तेव्हां त्यानें तो कोणत्ये घटकेस बरा होता झाला हें त्यास विचारिलें तेव्हां ते त्यास ह्मणाले कीं काल एक वाजतां ज्वरानें त्यास सोडिलें तर बापानें जाणलें कीं ज्या घटकेस येशूनें मला ह्मटलें कीं तुझा पुत्र वांचतो तींतच झालें मग तो आणि त्याचें सर्व घर विश्वास धरितें झालें येशू यहूदांतून गालीलांत आला तेव्हां हा अणखीं दुसरा चमत्कार त्यानें केला

## त्रिकानंतर बेविसावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आम्ही तुला विनवितों कीं तुझें कुटुंब जी मंडळी ती निरंतर पवित्रतेंत राखावी अशासाठीं कीं तुझे संरक्षणेंकरून ती सर्व कष्टांपासून मोकळी रहावी आणि तुझे नामाचे गौरवासाठीं सत्कर्मांकडून तुझी सेवा करा

याला भक्तीनें तत्पर असावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र फिलिप १. २.

तुमचे प्रत्येक आठवणीवर मी आपले देवाची उपकार स्तुति करितों सर्वदा माझे सर्व प्रार्थनेंत तुम्हा सर्वांकरितां आनंदें करून विनंती करितांना सुवार्त्तेंत जें तुमचें सहायत्व पहिले दिवसापासून आतांपर्यंत आहे त्याविषयीं स्तुति करितों हाच भाव धरितांना कीं ज्यानें तुह्मामध्यें सत्कर्म आरंभिलें आहे तो येशू ख्रिस्ताचे दिवसापर्यंत तें सिद्धीस नेत जाईल जसेंच तुह्मा सर्वांविषयीं हें कल्पिणें मला योग्य आहे कारण कीं माझे बंदींत आणि सुवार्त्तेचें प्रत्यर्थ व स्थापन यांत सर्व तुह्मी माझे कृपेचे सहभागी आहां असें मी आपले मनांत धरितों कांकीं तुह्मा सर्वांसाठीं येशू ख्रिस्ताचे कळवळ्यानीं मी किती उत्कंठित आहें याविषयीं देव माझा साक्षी आहे आणि हेंच मी प्रार्थितों कीं ज्ञानांत व सर्व बुद्धींत तुमची प्रियता उत्तरोत्तर वाढावी जें जें उत्तम तें तें तुम्हीं पारखून घ्यावें ह्मणून अशासाठीं कीं ख्रिस्ताचे दिवसापर्यंत तुह्मी सात्विक आणि अस्खलित रहावें देवाचें गौरव व प्रशंसा होण्यासाठीं येशू ख्रिस्ताकडून न्यायाचीं जीं फळें आहेत त्यानीं पूर्ण झाले असतां

सुवार्त्ता मात्थी १८. २१.

तेव्हां पेत्रस त्याजवळ येऊन म्हणाला हे प्रभो कितिदां माझे भाव्यानें माझा अपराध केला असतां त्याची क्षमा



करीन सातवेळांपर्यंत किं काय येशूनें त्याला ह्मटलें सात वेळांपर्यंत असें मी तुला ह्मणत नाहीं पण सातांनी गुणित जे सत्तर तितके वेळांपर्यंत यास्तव आकाशाचें राज्य एक माणूस जो राजा याला उपमित होतें ज्यानें आपलें सेवकांपासून हिसाब घ्यावयास इच्छिलें तर तो हिसाब घेऊं लागला तेव्हां हजार तालांतांचा एक ऋणी त्याजवळ आणिला होता तेव्हां फेडायाला त्याजवळ कांहीं नसतां त्याचे धन्यानें आज्ञा दिली कीं तो व त्याची बायको पोरें अणखीं जें काय सर्व त्याचें असेल तें विकून फडशा करावा मग त्या सेवकानें त्याचे पायां पडून ह्मटलें प्रभो मजशीं सहिष्णुता कर ह्मणजे मी सर्व तुझें फेडीन तेव्हां त्या धन्यानें सेवकाविषयीं दयेनें कळवळून त्याला सोडिलें आणि त्या ऋणापासून त्याला मोकळें केलें नंतर तो सेवक निघून आपले सहायत्वाचे सेवकांतला एक जो त्याचा शंभर पाव त्यांचा ऋणी होता तो त्याला सांपडला तेव्हां त्यानें त्याला धरून त्याची नरडी घट्ट आंवळून ह्मटलें जें तुजकडे माझें यावयाचें आहे तें फेडून दे नंतर तो सहाय सेवक त्याचे पायां पडून त्याची काकळूत करीत ह्मणाला मशीं सहिष्णुता कर म्हणजे मी तुझें सर्व फेडीन तरीं तो मान्य झाला नाहीं पण त्यानें जाऊन तो तें सारें ऋण फेडीपर्यंत त्याला बंदीशाळेंत घातलें तर जें जें झालें तें तें त्याचे सहायत्वाचे सेवक पाहून फार कष्टी झाले मग त्यानीं जाऊन आपले धन्याला सारें सांगून दाखविलें तेव्हां त्याचे धन्यानें त्यास

बलावून म्हटलें अरे दुष्टा सेवका त्वां मला विनंती केली ह्मणून म्यां तें सारें ऋण तुला सोडिलें जशी म्यां तुज वर दया केली तशी तुला आपले सहायलाचे सेवकांवर दया करणें योग्य होती किं नाहीं मग त्याचे धन्यानें रागें भरून तो तें त्याचें सारें ऋण फेडीपर्यंत त्याला पीडकांचे हातीं दिलें असें माझा आकाशांतील बाप तुह्माला करील तुम्ही प्रत्येक जर आपले मनापासून आपले भाव्वांचे अप राधांची त्यांला क्षमा न कराल तर

## त्रिकानंतर तेविसावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे देवा आमचे आश्रया आणि सामर्थ्या जो तूं सर्व पुण्यतेचा उत्पादक आहेस आम्ही तुला विनवितों कीं तूं आपले मंडळीच्या सभक्तिक प्रार्थना ऐकायास मान्य ऐस आणि जें जें आह्मी विश्वासानें मागतों तें तें सिद्धपणें पावावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र फिलिप ३. १७.

भाव्वानों तुह्मी माझे अनुकर्त्ते व्हा आणि जसें आह्मी तुह्मास उदाहरण आहों तसें जे वर्त्ततात त्यांस लक्षीत जा कांकीं ज्यांविषयीं म्यां तुह्मास बहुत वेळां सांगीतलें व आतांहि रडत सांगतों कीं ते ख्रिस्ताचे क्रूसाचे वैरी आहेत तसेच बहुत वर्त्ततात ज्यांं त्यांचा परिणाम नाशच ज्यां



त्यांचा देव त्यांचें पोटच आणि जें त्यांस लज्जाकारक असावें तें त्यांचें गौरवच आहे ते पृथ्वींतील पदार्थांवर आपलें चित्त ठेवितात कांकीं आमचें प्रजाल आकाशांतच आहे तेथूनच तारणारा प्रभु येशू ख्रिस्त त्याची वाट आह्मी पाहतों तो आमचा नीच देह अन्यरूप करील तो त्याचे गौरवी देहस्वरूप व्हावा म्हणून ज्या शक्तीनें तो आपल्यास सर्व वश करायास समर्थ आहे तिणेंच

सुवार्त्ता मात्थी २२. १५.

तेव्हां फारीशानीं जाऊन त्याला भाषण प्रसंगीं गुंतवावें ह्मणून संमंत्रण केलें आणि ते आपले शिष्य हेरोद्यांसुद्धां त्याजवळ पाठवितांना म्हणतात हे अध्यापका आह्मी जाणतों कीं तूं वास्तविक आहेस आणि देवाचा मार्ग सत्यतेनें शिक वितोस आणि कोणत्याविषयींहि तूं चिंता करीत नाहींस कांकीं तूं मनुष्याचा पक्षपात धरीत नाहींस तर आह्माला सांग तुला काय वाटतें कैसाराला कर देणें हें योग्य आहे किं नाहीं तेव्हां येशूनें त्यांचें दुष्टपण जाणून ह्मटलें अरे ढोंग्यानों माझी परीक्षा तुम्ही कां करितां कराचें नाणें मला दाखवा तेव्हां त्यानीं त्याजवळ एक पावली आणिली नंतर तो त्यांस ह्मणतो हें प्रतिरूप आणि ही मोहोर कोणाचीं ते त्यास ह्मणतात कैसाराचीं तेव्हां तो त्यांस ह्मणतो जें जें कैसाराचें तें तें कैसाराला द्या आणि जें जें देवाचें तें तें देवाला द्या तेव्हां ते ऐकून आश्चर्य पावले आणि त्याला सोडून निघाले

## त्रिकानंतर चोविसावा आदित्यवार.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं तूं आपले लोकांस त्यांचे अपराधांपासून मोकळें करावें अशासाठीं कीं आमचे अशक्ततेमुळें जीं पापें आह्मापासून घडलीं आहेत त्यांचे बंधनांपासून तूं आपले उदार उपकारिकपणानें आह्मा सर्वांस मुक्त करावें हे दिव्य बापा येशू ख्रिस्त आमचा सुवंदित प्रभु आणि तारणारा याचे कारणें हें द्यावें आमेन

पत्र कोलोस १. ३.

देव जो आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचा बाप त्याला तुह्मा विषयीं नित्य प्रार्थितांना आह्मी उपकारस्तुति करितों ख्रिस्त येशूवर जो तुमचा विश्वास व सर्व पवित्र लोकांवर जो तुमची प्रीति यांजविषयीं आह्मीं ऐकिलें आहे ह्मणून जो आशार्थ तुह्मासाठीं आकाशांत ठेविला आहे ज्या त्याविषयीं सुवार्त्तेचे सत्य गोष्टीकडून पूर्वीं तुह्मीं ऐकिलें त्यासुद्धां ती सुवार्त्ता जशी सर्व जगांत तशी तुह्माजवळ आली आहे आणि फल देत आहे जशीहि ज्या दिवसीं तुम्हीं सत्येंकरून देवाची कृपा ऐकिली आणि जाणिली तेव्हांपासून तुम्हा मध्यें फल देत आहे जसेंहि एपाफ्रास जो आमचा प्रिय सह सेवक त्यापासून तुम्ही शिकलां तो तुह्मासाठीं ख्रिस्ताचा विश्वासु सेवक आहे आणि आत्म्याकडून जी तुमची प्रीति



ती त्यानें आह्मास कळविली आहे यास्तव आह्मींहि ज्या दिवसीं ऐकिलें तेव्हांपासून तुम्हासाठीं प्रार्थना व विनंती करितां विसांवत नाहीं कीं सर्व विवेक व आत्मिक बुद्धि यांकडून त्याचे इच्छेचें जें ज्ञान त्यानें तुह्मीं भरलें जावें आणि प्रभूला पुरतेपणें प्रिय होण्यास त्याचे योग्यतः वर्त्तावें सर्व उत्तम कामामध्यें फल देत असतां व देवाचे ज्ञानांत वाढत असतां सर्व हर्षयुक्त क्षांति व सहिष्णुता व्हावयासाठीं त्याचे गौरवयुक्त सामर्थ्याप्रमाणें सर्व शक्तीनें समर्थ होत असतां ज्या बापानें प्रकाशांतले पवित्र लोकांचे विभागाचे विभागी व्हावयास आम्हास योग्य केलें आहे त्याला उपकार करित असतां

सुवार्त्ता मात्थी ९. १८.

येशू योहान्नाचे शिष्यांस ह्या गोष्टी सांगतांना पहा एका अधिकाऱ्यानें येऊन त्याचे पायां पडून ह्मटलें कीं माझी कन्या आतांच मरून गेली आहे पण तूं येऊन तिला आपला हात लाव ह्मणजे ती जीवंत होईल तेव्हां येशू उठून आपले शिष्यांसुद्धां त्याचे मागें गेला तेव्हां पहा एक स्त्री जिला बारा वर्षांची रक्तपिती होती तिनें मागून जवळ येऊन त्याचे वस्त्राचे कांठास स्पर्शिलें कांकीं ती आपले मनांत म्हणाली मी जर केवळ त्याचे वस्त्रास स्पर्शीन तर बरी होईन मग येशूनें मागें वळून तिला पाहून म्हटलें हे कन्ये धीर धर तुझे विश्वासानें तुला बरें केलें आहे मग ती त्याच घटकेपासून बरी झाली नंतर येशू त्या अधि

काऱ्याचे घरांत आला आणि वाजंत्री व आकांत करणारा समुदाय पाहून त्यांस म्हणाला तुह्मी निघा कांकीं मुलगी मेली नाहीं पण झोंपेंत आहे तेव्हां त्यानीं त्याचा उपहास केला पण जेव्हां समुदाय घालविला गेला तेव्हां त्यानें आंत जाऊन तिचा हात धरिला आणि ती मुलगी उठली नंतर ही वार्त्ता त्या सारे देशांत प्रसिद्ध झाली

## त्रिकानंतर पंचविसावा आदित्यवार.

### प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं तुझे विश्वासु लोकांचे मनोवृत्तीचें उत्तेजन करावें अशासाठीं कीं ते पूर्ण सत्कर्मरूप फल देत असतां तुजपासुन पूर्ण प्रतिदान पावावे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्राचे स्थानीं इर्मिया २३. ५.

पहा ईश्वर ह्मणतो कीं दिवस येतात ज्यांमध्यें मी दावीदासाठीं न्यायी कोंब उत्पन्न करीन आणि राजा राज्य करील व कल्याण विशिष्ट होईल आणि पृथ्वींत नीति व न्याय करील त्याचे दिवसांत यहूदा तारिला जाईल इस्राएल सलामत वस्ती करील आणि जें नाम त्याला ठेविलें जाईल तें हेंच ह्मणजे ईश्वर जो आमचा न्याय यास्तव ईश्वर म्हणतो कीं ते दिवस येतात ज्यांमध्यें अणखी लोक न ह्मणतील कीं ईश्वर जीवंत आहे ज्या त्यानें इस्रा



एल लोकांस मिसर देशांतून वरतीं आणिलें पण ईश्वर जीवंत आहे ज्या त्यानें इस्राएलाचे घराण्याचे वंशाला उत्तर देशांतून आणि ज्यां सर्व देशांत म्यां त्यांला पिटिलें आहे त्यांतून चढविलें व आणिलें असें ह्मणतील आणि ते आपले भूमीवर राहतील

### सुवार्त्ता योहान्न ६. ५.

तेव्हां येशू दृष्टि लावून मोठा समुदाय आपलेकडे येतो आहे असें पाहून फिलिप्पसाला ह्मणतो त्यांला खाया साठीं आम्ही भाकर कुठून विकत घेऊं हें तर तो त्याची परीक्षा करितां म्हणाला कांकीं जें त्याला करायाचें होतें तें त्यानें जाणलें होतें फिलिप्पसानें त्यास उत्तर केलें कीं त्यांतले प्रत्येकानें कांहींसें थोडें थोडें घ्यावें ह्मटलें असतां दोनशें पावल्यांच्या भाकरी त्यांला पुरणार नाहींत तेव्हां त्याचे शिष्यांतला एक जो शिमोन पेत्रसाचा भाऊ आंद्रे आस तो त्यास म्हणतो इथें एक तरुण आहे त्यापाशीं जवांच्या पांच भाकरी आणि दोन धाकटे मासे आहेत पण एवढे लोकांमध्यें हीं काय आहेत मग येशूनें म्हटलें तीं मनुष्यें तुह्मी बसवा आणि त्या स्थलांत पुष्कळ गवत होतें मग त्यां मनुष्यांची संख्या सुमारें पांच हजार बसली तेव्हां येशूनें त्या भाकरी घेऊन उपकारस्तुति करून शिष्यांस वांटल्या आणि शिष्यानीं बसणाऱ्यांस वांटिल्या याप्र माणेंच त्या माशांतलें जितकें त्यांस बनलें तितकें वांटलें मग ते तृप्त झाले तेव्हां तो आपले शिष्यांस ह्मणतो कांहीं

फुकट नजावें म्हणून उरलेले तुकडे तुह्मी गोळा करा तेव्हां त्यानीं गोळा केले आणि त्यां जवांचे पांचां भाकरींचे जे तुकडे खाणाऱ्यांपुढें उरलेले त्यानीं बारा करंडे भरले नंतर जो चमत्कार येशूनें केला तो त्या मनुष्यानीं पाहून म्हटलें कीं जो भविष्यवादी जगांत यावयाचा होता तो हाच आहे खरा

## आंद्रेआस साधु याचा दिवस.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपले पवित्र प्रेषित आंद्रेआस साधूला एवढा सत्वगुण दिला कीं तो तुझे पुत्र येशू ख्रिस्तानें बलाविला असतां तेव्हांच मान्य होऊन कांहीं उशीर न करितां त्याचे मागें गेला तसेंच आम्हीं सर्व तुझे पवित्र गोष्टीनें बलाविलेले असतां लवकरच तुझ्या पवित्र आज्ञा मान्यत: पाळायास तत्पर व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्र रोमे १०. ९.

जर तूं आपले तोंडानें प्रभु येशूला अंगीकारिशील आणि देवानें त्याला मेलेल्यांमधून उठविलें आहे असा जर आपले मनांत विश्वास धरिशील तर तूं तारिला जाशील कांकीं न्याय व्हावयासाठीं मनुष्य मनानें विश्वास धरितो व तारण व्हावयासाठीं तोंडानें अंगीकार केला जातो कां कीं लेख म्हणतो जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो तो



लज्जास्त होणार नाहीं कां तर यहूदी आणि यवनी यांचा कांहीं भेद नाहीं कां सर्वांचा एकच प्रभु आहे सर्व जे त्याची प्रार्थना करितात त्यांला तो उदारच आहे मग जो कोणी प्रभूचें नाम घेऊन प्रार्थना करील तो तारिला जाईल तर ज्यावर त्यानीं विश्वास ठेविला नाहीं त्याची प्रार्थना कशी करितील आणि ज्याविषयीं त्यानीं ऐकिलें नाहीं त्याचा विश्वास कसा धरितील आणि सांगणाऱ्यांवांचून ऐकतील कसें आणि पाठविले नसले तर सांगतील कसें जसें लिहिलें आहे जे कुशलाची सुवार्त्ता सांगत येतात जे सुभद्र अर्थांची सुवार्त्ता सांगत येतात त्यांचे पाय केवढे मनोरम आहेत परंतु सर्वांनीं सुवार्त्ता मानिली नाहीं कां कीं यशाय ह्मणतो हे ईश्वरा आमचे प्रवादाचा विश्वास कोण्ही धरिला आहे तर प्रवादाकडून विश्वास होतो आणि प्रवाद देवाचे गोष्टीकडून होतो पण मी म्हणतों त्यानीं ऐकिलें नाहीं किं काय निश्चयें त्यांचा शब्द सर्व पृथ्वीवर पसरला आहे आणि भूमीचे शेवटापर्यंत त्यांचीं वाक्यें पसरलीं आहेत पण मी म्हणतों इस्राएलानें जाणलें नाहीं किं काय प्रथम मोशे ह्मणतो जे लोक कांहीं नाहींत त्यांजकडून मी तुह्मास आवेशी करीन आणि निर्बुद्धि लोकांकडून तुह्मास रागें भरवीन आणि यशाय प्रगल्भ होऊन म्हणतो ज्यानीं मला शोधिलें नाहीं त्यांस मी सांपडलों आहें ज्यानीं मजविषयीं विचारिलें नाहीं त्यांला मी प्रकट झालों आहें पण इस्राएलास तो ह्मणतो सारादिवस अमान्य आणि प्रतिकूल बोलत्यां लोकांस म्यां आपले हात लांब केले आहेत

सुवार्त्ता मात्थी ४. १८.

तेव्हां येशू गालीलाचे समुद्राचे तीरीं चालत असतां त्यानें एक शिमोन पेत्रस व दुसरा त्याचा भाऊ आंद्रेआस यां दोघांला आपलीं जाळीं समुद्रांत टाकितां पाहिलें कां कीं ते धीवर होते तेव्हां तो त्यांस म्हणतो माझे मागें या म्हणजे तुम्हास मी मनुष्यांचे धीवर करीन आणि तेव्हांच ते आपलीं जाळीं सोडून त्याचे मागें गेले नंतर त्यानें तेथून पुढें जाऊन दुसरे दोघे भाऊ एक जेबेदीचा पुत्र याकोब व दुसरा त्याचा भाऊ योहान्न त्यांस त्यांचे जेबेदीबापाचे संगतीं तारवांत आपलीं जाळीं नीट करितां पाहिलें आणि त्यांला त्यानें बलाविलें नंतर तेव्हांच ते आपलें तारूं व आपला बाप सोडून त्याचे मागें गेले

## थोमास जो प्रेषित याचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि निरंतर जीवित्या देवा ज्या त्वां विश्वस्थ गोष्टींचें विशेष प्रमाण व्हावें म्हणून तुझे थोमासा पवित्र प्रेषिताला तुझे पुत्राचे पुनरुत्थानाविषयीं संशयी होऊं दिलें आह्मीं पुरतेपणें व कांहीं संशय नसतां तुझे पुत्र येशू ख्रिस्तावर असें विश्वासावें कीं आमचा विश्वास तुझे समोर कधीं गर्हणीय नपडावा हे ईश्वरा त्याच येशू ख्रिस्ताकडून आमचें ऐक ज्या त्याला आणि तुला व पवित्र आत्म्याला सर्व आदर व गौरव आतां व सर्वदा असावें आमेन



पत्र एफेस. २. १९.

यास्तव यापुढें तुह्मी प्रवासी व आगंतुक नाहीं पण पवित्रांचे सहवासी आणि देवाचे घरचे आहां प्रेषित आणि भविष्यवादी यांचा जो पाया त्याजवर तुम्ही बांधिलें आहां येशू ख्रिस्त आपणच कोंपऱ्याचा मुख्य दगड असतां त्याच्यानें सर्व बंदिस्त सुसंबद्ध होत असतां तो वाढतां वाढतां ईश्वरासाठीं पवित्र देऊळ होतें त्याजवर तुम्हीहि देवाचा निवास आत्म्याकडून व्हावयासाठीं बांधिलें आहां

सुवार्त्ता योहान्न २०. २४.

आणि त्यां बाराजणांतला एक थोमास जो दिदूमस ह्मटलेला तो जेव्हां येशू आला तेव्हां त्यां संगतीं नव्हता मग दुसरे शिष्य त्यास म्हणाले प्रभूला आम्हीं पाहिलें तेव्हां तो त्यांस ह्मणाला मी जर त्याचे हातास खिळ्यांचें छिद्र पाहाणार नाहीं आणि जर आपलें बोट खिळ्यांचे छिद्रांत घालणार नाहीं आणि जर आपला हात त्याचे पार्श्वांत घालणार नाहीं तर मी विश्वास धरणार नाहीं आणि आठ दिवसांनंतर त्याचे शिष्य पुनः आंत होते आणि थोमास त्यांचे संगतीं होता तेव्हां दारें लाविलीं असतां येशू येऊन मध्यें उभा राहिला आणि म्हणाला तुह्माला समाधान असो नंतर थोमासाला म्हणतो तूं आपलें बोट इकडे करून माझे हात पहा आणि आपला हात लांब करून माझे पार्श्वांत घाल मग अविश्वस्त होऊं नको पण विश्वस्त

ली तेव्हां थोमास उत्तर करीत म्हणाला माझे प्रभो आणि माझे देवा येशू त्यास म्हणतो थोमासा मला त्वां पाहिलें आहे म्हणून विश्वासला आहेस पण जे न पाहतां विश्वासले आहेत ते धन्य आहेत तर अणखीं दुसरे बहुत चमत्कार येशूनें आपले शिष्यांदेखतां केले खरें जे ते या पुस्तकांत लिहिले नाहींत पण हे अशासाठीं लिहिले आहेत कीं येशू तो ख्रिस्त देवाचा पुत्र आहे असा विश्वास तुह्मीं धरावा आणि विश्वास धरून तुम्हाला त्याचे नामाकडून जीवन असावें

## पाउलस साधु याची सन्मनःप्राप्ति.

### प्रार्थनासारांश.

हे देवा ज्या त्वां आपले आशिर्वादित प्रेषित पाउलस साधूचे उपदेशेंकरून सुवार्तेचा उजेड जगांत प्रकाशविला आहे त्या तुला आह्मी विनवितों कीं आह्मीं त्याची चमत्कारविशिष्ट सन्मनःप्राप्ति आठवून त्यानें जो पवित्र हितोपदेश केला आहे त्यास अनुसरत असतां तिजकरितां आमची कृतज्ञता तुला दाखवावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्राचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत ९. १.

आणि शाउलस एथपर्यंत प्रभूचे शिष्यांप्रतिकूल धमकावणी व घात यांविषयीं फोंफावून बोलत असतां त्यानें मुख्य आचार्याजवळ जाऊन त्याजपासून दामास्कसांतील सभांसाठीं पत्रें मागीतलीं अशास कीं त्या मार्गाचे जर कोणी पुरुष अथवा स्त्रिया त्याला सांपडतील तर त्यानें त्यांस बंदींत येरूशालेमाकडे आणावें मग तो जात असतां दामास्कसाजवळ आला तेव्हां असें झालें कीं अकस्मात आकाशापासून तेज त्या भोंवतें चकाकलें तेव्हां त्यानें भूमीवर पडून शाउलसा शाउलसा माझा पाठलाग कां करितोस अशी वाणी आपल्याला बोलतां ऐकिली तेव्हां तो ह्मणतो हे प्रभो तूं कोण आहेस प्रभूनें ह्मटलें ज्याचा पाठलाग करितोस तो येशूच मी आहें कांट्यांला लात मारणें तुला कठिनच आहे तेव्हां त्यानें कांपून विस्मित होऊन ह्मटलें हे प्रभो म्यां काय करावें ह्मणून इच्छितोस तेव्हां प्रभूनें त्याला म्हटलें तूं उठून नगरांत जा मग जें तुला केलें पाहिजे तें तुजला सांगीतलें जाईल तेव्हां जे पुरुष त्या संगतीं वाटचाल करीत होते त्यांनीं वाणी ऐकिली खरी पण कोणी दृष्टीस येईना म्हणून अवाच उभे राहिले नंतर शाउलस भूमीवरून उठला आणि त्याचे डोळे उघडले असतां त्यास कांहीं दिसेना तेव्हां त्यां माणसानीं त्याला हातीं धरून दामास्कसांत आणिलें आणि त्याला न दिसतांना तो तीन दिवस राहिला आणि त्यानें कांहीं खालें नाहीं व प्यालें नाहीं तेव्हां आनानीआस नामें एक शिष्य दामास्कसांत होता आणि प्रभूनें त्याला स्वप्नांत म्हटलें अहो आनानीआस तेव्हां त्यानें ह्मटलें हे प्रभो मी हाजीर आहें तेव्हां प्रभु त्यास ह्मणाला तूं उठून सरळ ह्मटलेली जो आळी

तींत जा आणि यहूद्याचे घरीं शाउलस नामें तार्ससकर याचा शोध कर कांकीं पहा तो प्रार्थना करितो त्यानेंहि स्वप्नांत आनानीआस नामें एक मनुष्य आंत येतां व आप त्यास दृष्टि प्राप्त व्हावी ह्मणून आपल्याला हात लावितां पाहिला आहे तेव्हां आनानीआसानें उत्तर केलें हे प्रभो येरुशालेमांत तुझे पवित्र लोकांस कितीं वाईट हा पुरुष करीत असे हें बऊतांपासून याजविषयीं म्यां ऐकिलें आहे आणि तुझें नाम घेऊन जे प्रार्थना करितात त्यां सर्वांस बंदीवान करायास त्याला मुख्य आचार्यांपासून इथेंहि अधिकार आहे तेव्हां प्रभु त्याला म्हणाला तूं चल कांकीं परदेशस्थ लोक व राजे व इस्राएल लोक यांज समोर माझें नाम वाहायासाठीं तो मला निवडलेलें पात्र आहे कांकीं माझे नामाकरितां कितीं त्याला सोसावें लागतें तें मी त्याला दाखवीन मग आनानीआस निघाला आणि त्या घरांत गेला तेव्हां आपले हात त्याजवर ठेवून म्हणाला हे भाव्वा शाउलसा ज्या वाटेनें तूं आलास त्या वाटेंत जो येशू तुझे दृष्टीस पडला त्या प्रभूनें त्वां दृष्टि पावावी आणि पवित्र आत्म्यानें भरावें ह्मणून मला पाठ विलें आहे आणि तेव्हांच त्याचे डोळ्यांवरून खवलेंशीं पडलीं आणि लागलेंच त्याला दिसूं लागलें मग त्यानें उठून बाप्तिस्मा घेतला नंतर अन्न घेऊन तो शक्ति पावला मग शाउलस दामास्कसांतले शिष्यां संगतीं कित्येक दिवस होता आणि तो लागलाच ख्रिस्ताविषयीं सभांत गाजवून सांगता



झाला कीं हा देवाचा पुत्र आहे तेव्हां ज्यानीं ऐकिलें ते सगळे विस्मित होऊन ह्मणाले जो येरुशालेमांत या नामाचे भक्तांस नाशीत असे आणि त्यांस बंदीवान करून मुख्य आचार्यांकडे न्यावें ह्मणून इकडे आला होता तो हाच आहे किं नाहीं आणि शाउलस उत्तरोत्तर शक्तिमान होई आणि हा ख्रिस्तच आहे असें प्रमाण दाखवून जे यहूदी दामास्कसांत रहात होते त्यांस तो कुंठित करी

सुवार्त्ता मात्थी. १९. २७.

तेव्हां पेत्रस त्याला उत्तर करीत ह्मणाला पहा आह्मी सर्व सोडून तुझे मागें आलों आहों ह्मणून आह्माला काय होईल तेव्हां येशूनें त्यांला ह्मटलें मी तुह्माला खचीत सांगतों कीं पुनरुत्पत्तींत मनुष्याचा पुत्र आपले गौरवी सिंहासनावर बसेल तेव्हां जे तुह्मी माझे मागें आलां ते तुह्मीहि बारा सिंहासनांवर इस्राएलाचे बारां वर्गांची न्यायाधीशी करीत बसाल आणि ज्या कोणत्यानेंहि माझे नामाकरितां घरें अथवा भाऊ अथवा बहिणी अथवा बाप अथवा आई अथवा बायको अथवा लेंकरें किंवा शेतें सोडिलीं आहेत तो शंभरपट पावेल आणि सनातन जीवनाचा विभाग पावेल आणि पहिले जे बऊत ते शेवटले होतील आणि शेवटले जे ते पहिले होतील

## देवळांत जें ख्रिस्ताचें निवेदन झालें तें.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि निरंतर जीवित्या ईश्वरा आह्मी

तुझा महिमा मानून तुला विनवितों कीं जसा तुझा एकुलता पुत्र आमचे प्रकृतियुक्त असतांना या दिवसाचे समयानुसार देवळांत विद्यमान केला होता तसे आम्ही स्वच्छ पवित्र मन पावून तुझे जवळ विद्यमान केले जावे तोच तुझा पुत्र येशू ख्रिस्त याचे योगानें आमेन

पत्राचे स्थानीं मालाखी ३. १.

पहा मी आपला दूत पाठवितों तो तुझे पुढें वाट सिद्ध करील आणि ज्या प्रभूचा शोध तुह्मी करितां तो आपले देवळांत एकाएकीं येईल आणि संधेचे ज्या दूताविषयीं तुह्मी आनंदत असतां पहा तो येईलच असें सैन्यांचा ईश्वर ह्मणतो आणि त्याचे येण्याचा दिवस कोण सहन करील आणि तो प्रकट होईल तेव्हां कोण उभा राहील कारण कीं तो धातुवाद्याचे अग्निसारिखा व रजकाचे पापडखारासारिखा आहे आणि रुप्याचा रसकर्त्ता व शुद्धकर्त्ता असा तो बसेल आणि लेवीचा वंश तो शुद्ध करील सोनें व रुपें यांचे सारिखा त्यास तो पावन करील तेव्हां शुद्धपणें ईश्वराला दान अर्पण करितील तेव्हां यहूदा व येरूशालेम यांचें दानार्पण ईश्वराला प्रिय होईल जसें पूर्व दिवसांत व पुरातन वर्षांत झालें असे तसें आणि न्यायाधीशीसाठीं मी तुह्माजवळ येईन आणि गारुडी व जारकर्मी व खोटे शाप वाहणारे व जे आपले मोलकऱ्याचे मोलाचा निग्रह करणारे जे विधवा व आईबा पोरका व विदेशी यांचा



अन्याय करणारे त्यांचे प्रतिकूल मी तीक्ष्ण साक्षी होईन कां ते माझें भय धरीत नाहींत असें सैन्यांचा ईश्वर ह्मणतो

सुवार्त्ता लूक. २. २२.

मोशेचे नेमाप्रमाणें त्यांचे पावनाचे दिवस संपले तेव्हां त्यानीं त्याला ईश्वरापाशीं विद्यमान करायासाठीं येरूशालेमास आणिलें जसें ईश्वराचे नेमांत लिहिलें आहे कीं जो प्रत्येक पुरुष योन्युद्घाटन करितो तो ईश्वरासाठीं पवित्र ह्मटला जाईल आणि जसें ईश्वराचे नेमांत सांगीतलें आहे रानटी कपोतांचा जोडा किंवा कबूतरांचीं दोन पिलें असा बलि द्यावा ह्मणून आणि पहा सुमेओन नामें एक माणूस येरूशालेमांत होता हा मनुष्य इस्राएलाचे आनंदाची वाट पहात असतां न्यायी व भक्तिवान होता आणि त्याजपाशीं पवित्र आत्मा असे आणि पवित्र आत्म्यानें त्याला दिव्य सुचना केली होती कीं ईश्वराचे ख्रिस्ताला तूं पहास तोंपर्यंत तूं मृत्यु पाहणार नाहींस आणि पवित्र आत्म्याकडून तो देवळांत आला तेव्हां आईबापानीं तो जो बालक येशू त्याजविषयीं नेमाचे विधिप्रमाणें करायासाठीं आंत आणिला नंतर त्याला त्यानें आपले कांखेस मारून देवाचें सुवंदन करीत ह्मटलें हे प्रभो आतां आपले वचनाप्रमाणें आपले सेवकास कुशलेंकरून जाऊं देतोस कारण कीं माझे डोळ्यानीं तुझें तारण पाहिलें आहे जें सर्व लोकांदेखतां त्वां सिद्ध केलें आहे तें परदेशस्थ लोकांस प्रकाशित करायास आणि तुझे

इस्राएल लोकांचें गौरव व्हावयास तें उजेडच आहे आणि त्याजविषयीं जें जें सांगीतलें होतें त्या त्या कारणें योसेफ आणि त्याची आई आश्चर्य करीत होतीं तेव्हां सुमेओनानें त्यांस आशीर्वाद दिला आणि त्याची आई मारया इजला सांगीतलें पहा इस्राएलांतील बहुतांचें पडणें व पुन: उठणें यांसाठीं व प्रत्याख्यात चिन्ह व्हावयासाठीं हा स्थापिलेला आहे (आणि तरवार तुझे जीवामधूनहि पार जाईल) अशासाठीं कीं बहुत मनांच्या कल्पना प्रकट व्हाव्या आणि आशेराचे वर्गांतील फानूएलाची कन्या आन्ना भविष्यवादिनी होती ती बहुत दिवसानीं वृद्ध झाली आणि ती आपले कुमारीपणापासून सात वर्षें दादल्याशीं राहिली होती व ती सुमारें चौऱ्यायशीं वर्षांची विधवा होती ती रात्रं दिवस उपोषण व प्रार्थना यांकडून देवाची सेवा करितां देवळांतून जाईना तीहि त्याच घटकेंत जवळ येऊन देवाची उपकारस्तुति करिती झाली आणि येरूशालेमांत जे उद्धाराची वाट पहात होते त्यां सर्वांस त्याजविषयीं बोलिली मग ईश्वराचे नेमाप्रमाणें सारें समाप्त झालें तेव्हां तीं गालीलांत आपले गांवीं नाजरेथास परत गेलीं आणि तो बालक वाढत गेला आणि बुद्धीनें पूर्ण असतां आत्म्यानें बळावला आणि देवाची कृपा त्याजवर होती

## मात्थीयास साधु याचा दिवस.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां असत्य जो यहूदा त्याचे



स्थानीं आपला विश्वासु सेवक मात्थीयास बारा प्रेषितांचे गणांतला व्हावयास निवडिला तुझी मंडळी असत्य प्रेषितांपासून सर्वदा रक्षिली असतां विश्वासु आणि सात्विक पाळकानीं तिचें शासन व नयन करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्राचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत १. १५.

आणि त्यां दिवसांत पेत्रस शिष्यांमध्यें उभा राहून ह्मणाला तर नामांचा समुदाय मिळून सुमारें एकशें एक वीस होता भाव्वानों ज्यानीं येशूला धरिलें त्यांचा वाटाड्या जो यहूदा होता त्याजविषयीं पवित्र आत्म्यानें दावीदाचे तोंडून जो लेख पूर्वीं सांगीतला होता तो प्रत्ययास आला पाहिजे कांकीं तो आम्हाशीं गणला होता आणि या सेवेचा विभाग पावला ह्यानें तर अन्यायाचे वेतनानें शेत विकत घेतलें खरें आणि तोंडघशीं पडून तो मध्यें फाटला आणि त्याचीं सगळीं आंतडीं निघालीं आणि येरूशालेमांतील सर्व राहणाऱ्यांस हें कळलें होतें ह्मणून तें शेत त्याचे स्वभाषेंत अकेल्दमा ह्मणजे रक्ताचें शेत म्हटलें आहे कांकीं गीतांचे पुस्तकांत लिहिलें आहे त्याची वस्ती ओसाड व्हावी तींत तर कोणी राहणारा नसो अणखीं त्याचा अधिकार दुसऱ्यानें घ्यावा तर ज्या सर्व वेळीं प्रभु येशू योहान्नाचे बाप्तीस्म्यापासून आरंभून तो ज्या दिवशीं आम्हापासून वरतीं घेतला गेला त्या दिवसापर्यंत आमचे संगतीं येत जात असे त्या सर्ववेळीं जे मनुष्य आम्हाशीं वर्त्तले त्यांतला एक आम्हासंगतीं त्याचे पुनरुत्थानाचा साक्षी व्हावा लागतो तेव्हां त्यानीं

दोघे जण उभे केले एक योसेफ जो बारसाबास म्हटलेला ज्याचें उपनाम जुस्तस आणि दुसरा मात्थीयास आणि ते प्रार्थना करितां म्हणाले हे ईश्वरा सर्वांचे अंतःसाक्ष्या ज्या सेवेपासून व ज्या प्रेषितपणापासून यहूदा आपले जागेंत जावा ह्मणून भ्रष्ट झाला त्याचा विभाग घ्यावयास यां दोघां जणांतला जो त्वां निवडिला आहे तो दाखवावा नंतर त्यांचे त्यांनीं पण पाडिले तेव्हां मात्थीयासावर पण लागू झाला मग तो त्यां अकरा प्रेषितांशीं गणला गेला

सुवार्त्ता मात्थी ११. २५.

त्यासमयीं येशू उत्तर करीत ह्मणाला हे बापा आका शाच्या आणि पृथ्वीच्या प्रभो तुझी उपकारस्तुति मी अशा साठीं करितों कीं त्वां ह्या गोष्टी ज्ञानी व बुद्धिवंत यांज पासून गुप्त राखून बालकांस प्रकट केल्या आहेत होय बापा कारण कीं तुझे देखतां असें बरें वाटलें मला माझे बापानें सर्व सोंपून दिलें आहे आणि बापाशिवाय पुत्राला कोणी वळखत नाहीं आणि पुत्राशिवाय व ज्या कोणाला पुत्र बापातें प्रकट करायास इच्छितो त्याशिवाय कोणी बापाला वळखत नाहीं अहो जे तुह्मी सर्व श्रांत आणि लादलेले ते माझे जवळ या ह्मणजे मी तुह्मास विश्रांति देईन माझें जोकड तुह्मी आपल्यावर घ्या आणि मजपासून शिका कां मी लीन आणि मनाचा नम्र आहें मग तुह्मीं आपले जीवांस विश्रांति पावाल कां कीं माझें जोखड सुवह आणि माझें ओझें लघु आहे



## मारया कुमारीस जें अभिवंदन झालें तें.

प्रार्थनासारांश.

हे ईश्वरा आह्मी तुला विनवितों कीं त्वां आपला सत्व गुण आमचे हृदयांत घालावा अशासाठीं कीं जसा दूताचे निरोपाकडून तुझा पुत्र येशू ख्रिस्त याचा अवतार आम्हीं जाणिला आहे तसें त्याचें क्रूस व क्लेश यांकडून आह्मास त्याचे पुनरुत्थानाचे गौरवास आणावें तोच येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्राचे स्थानीं यशाया ७. १०.

आणि ईश्वरानें आहाजाला फिरून बोलतां ह्मटलें तूं आपल्यासाठीं ईश्वर तुझा देव यापासून चिन्ह माग खालतीं खोल कर अथवा वरतीं उंच कर तेव्हां आहाजानें ह्मटलें मी मागणार नाहीं आणि ईश्वराची परीक्षा मी करणार नाहीं तेव्हां त्यानें ह्मटलें अहो दावीदाचे वंश हो तुम्ही ऐका काय मनुष्यांस कंटाळा देणें तुह्मास हलकें वाटतें कीं माझे देवालाहि कंटाळा देतां यास्तव प्रभु स्वतां तुम्हास चिन्ह देतो पहा कुमारी गरोदर होईल आणि पुत्र प्रस वेल आणि त्याचें नाम इम्मानूएल असें ठेवील जें वाईट तें टाकायास आणि जें चांगलें तें निवडायास तो समजेल तेव्हां तो लोणी आणि मधु खाईल

सुवार्त्ता लूक १. २६.

आणि सहावे महिन्यांत गाब्रीएल जो दूत तो गालीलांतलें नाजरेथ नामें गांवांत जी कुमारी दावीदाचे कुलांतील योसेफ नामें पुरुषास वाग्दत्त झाली होती तिजवळ देवानें पाठविला आणि त्या कुमारीचें नाम मारया होतें व त्या दूतानें तिजवळ आंत येऊन म्हटलें अगे जी तूं फार कृपा पावली आहेस तुशीं ईश्वर आहे तूं स्त्रियांमध्यें आशीर्वादित आहेस तेव्हां ती पाहून त्याचे बोलण्यामुळें घाबरी झाली आणि हें अभिवंदन कसें असेल असा विचार करीत होती तेव्हां तिला त्या दूतानें ह्मटलें हे मारये भिऊं नको कांकीं देवाजवळ तूं कृपा पावली आहेस आणि पहा तूं गर्भार होशील आणि पुत्र प्रसवशील आणि त्याचें नाम येशू ठेविशील तो थोर होईल आणि परात्पराचा पुत्र ह्मटला जाईल आणि त्याला आपला बाप जो दावीद याचें सिंहासन ईश्वर देव देईल आणि याकोबाचे वंशाचें राज्य तो युगीयुग करील व त्याचे राज्याचा अंत कधीं होणार नाहीं मग मारयेनें दूतास ह्मटलें मी पुरुषास जाणत नाहीं मग हें कसें होईल तेव्हां दूत तिला उत्तर करीत बोलिला तुजवर पवित्र आत्मा येईल आणि परात्पराची शक्ति तुजवर अभिछाया करील यास्तवच जें पवित्र जन्मेल तें देवाचा पुत्र ह्मटला जाईल आणि पहा तुझी माऊस बहीण एलीसाबेत तिनेंहि आपले ह्मातारपणीं पुत्रगर्भधारण केलें आहे आणि बन्ध्या ह्मटली होती तिजला हाच सहावा



महिना आहे कांकीं देवाला कांहीं असंभावित होईना तेव्हां मारया ह्मणाली पहा ईश्वराची सेवकी तुझे वचनाप्रमाणें मला व्हावें तेव्हां दूत तिजपासून निघून गेला

## मार्कस साधूचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या लां आपला सुवार्त्ता लेखक मार्कस साधु याचे दिव्य हितोपदेशेंकरून आपली मंडळी शिकविली आहे आह्मास सत्गुण अशासाठीं द्यावा कीं जे पोरांसारिखे अनर्थक उपदेशाचे प्रत्येक वायुवेगानें वाहून नेले जातात त्यांसारिखें आह्मी नसून तुझे सुवार्त्तेचे सत्याविषयीं निश्चययुक्त असावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र एफेस. ४. ७.

आह्मांतील प्रत्येकास ख्रिस्ताचे दानपरिमाणाप्रमाणें सत्गुण दिला आहे याविषयीं भविष्यवादी ह्मणतो त्यानें वरतीं चढून ग्टहीतसमुदाय धरून नेला आणि मनुष्यांस दानें दिलीं तर तो वरतीं चढला याचा अर्थ काय तो अगोदर पृथ्वीचे खालचे प्रदेशांत उतरला यावांचून आहे किं काय जो उतरला तोच आहे जो सर्व आकाशांहून फार वरतीं चढला अशासाठीं कीं त्यानें सर्व पूर्ण करावें तर कित्येक प्रेषित व कित्येक भविष्यवादी व कित्येक सौवार्त्तिक व कित्येक पालक आणि उपदेशक पवित्रांस संस्कृत करायासाठीं सेवेचे

कामासाठीं ख्रिस्ताचे देहाचा संबोध करायासाठीं त्यानें दिले आहेत विश्वासाचे एकत्वास आणि देवाचे पुत्राचे पूर्ण ओळखीस पुरते पुरुषास ख्रिस्ताचे पुरते उंचीचे परिमाणास आह्मी सर्व पोंहचूंपर्यंत अशासाठीं कीं आह्मीं यापुढें पोरें भ्रांतीचे युक्तिप्रमाणें धूर्त्ततेनें मनुष्यांचे कपटानें उपदेशाचे प्रत्येक वाऱ्यानें डळमळलेलीं व वाहून नेलेलीं नसावीं पण प्रीतीनें सत्य बोलत असतां ख्रिस्त जो शिर आहे त्याशीं आम्हीं सर्वांविषयीं वाढावें ज्या त्यापासून सारा देह प्रत्येक संधीचे पुरवणीकडून सुसंप्रयुक्त व सुसंबद्ध होत्सातां प्रत्येक अवयवाचे परिमाणांतले शक्तिप्रमाणें प्रीतीनें आपला संबोध व्हावयासाठीं देहसंवर्द्धन करितो

सुवार्त्ता योहान्न १५. १.

मी खरी द्राक्षा आहें आणि माझा बाप द्राक्षेचा माळी आहे मजसंबंधी जी प्रत्येक खांदी फळ देत नाहीं ती तो काढितो आणि जी प्रत्येक खांदी फळ देते तीणें अधिक फळ द्यावें ह्मणून तो ती शुद्ध करितो जी गोष्ट मी तुह्मास सांगीतली तीणें तुह्मी आतां शुद्ध आहां तुह्मी माझ्यांत रहा आणि मी तुह्मांत राहीन जसें खांदीच्यानें द्राक्षेंत रहात नसतां स्वतां फल देवत नाहीं तसें तुमच्यानें माझ्यांत नराहतां फल देवत नाहीं मी द्राक्षा आहें तुह्मी खांद्या आहां ज्यांत मी राहतों आणि जो माझ्यांत राहतो तोच बहुत फल देतो कां मजरहित तुमच्यानें कांहीं करवत नाहीं जर कोणी माझ्यांत नराहतो तर तो खांदीवाणीं



बाहेर टाकिला जातो आणि सुका होतो आणि लोक त्या खांद्या गोळाकरून अग्नींत टाकितात मग त्या जाळिल्या जातात जर तुह्मी माझ्यांत रहाल व माझ्या गोष्टी जर तुह्मांत राहतील तर जें कांहीं तुह्मी इच्छून मागाल तें तुम्हासाठीं केलें जाईल तुह्मी फल द्याल तर तेणेंकरून माझा बाप गौरविला जाईल तसेच तुम्ही माझे शिष्य व्हाल जशी बापानें मजवर प्रीति केली आहे तशी म्यां तुह्मावर प्रीति केली आहे माझे प्रीतींत तुह्मी रहा जर तुह्मी माझ्या आज्ञा पाळाल तर माझे प्रीतींत रहाल जशा मी आपले बापाच्या आज्ञा पाळून त्याचे प्रीतींत राहतों तसा माझा आनंद तुह्मांत रहावा आणि तुमचा आनंद पूर्ण व्हावा ह्मणून ह्या गोष्टी म्यां तुह्माला सांगीतल्या आहेत

## फिलिप्पस साधु व याकोब साधु यांचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या तुला सत्यतेनें जाणणें सनातन जीवनच आहे तुझा पुत्र येशू ख्रिस्त मार्गच सत्यच व जीवनच आहे हें आह्मी निश्चयें जाणावें अशासाठीं कीं तुझे पवित्र प्रेषित फिलिप्पस साधु व याकोब साधु यांचे पावलांतें आह्मी अनुसरून सनातन जिवनाचे मार्गांत अस्खलितपणें चालावें तोच तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र याकोब १. १.

देवाचा आणि प्रभु येशू ख्रिस्ताचा सेवक जो याकोब तो जे बारा वर्ग बहुत प्रवासांत आहेत त्यांस कुशल असावें ह्मणून इच्छितो तर माझे भाव्वांनों जेव्हां तुह्मी विविध परीक्षांत पडतां तेव्हां हें पूर्ण हर्षकारण आहे असें माना असें जाणून कीं आमचे विश्वासाची परीक्षा सहिष्णुता घडवित्ये तर सहिष्णुतेला आपली क्ृति पुरती असावी अशा साठीं कीं तुह्मास कांहीं उणें नसून तुह्मीं पुरतें व समापन्न असावें तुह्मांतील कोणास जर ज्ञान उणें असतें तर जो देव सर्वांला उदारत्वेंकरून देतो आणि कांहीं गर्हण करीत नाहीं त्यापासून त्यानें मागावें म्हणजे त्याला दिलें जाईल त्यानें कांहीं शंका न धरितां विश्वासानें मागावें कांकीं जो शंका धरितो तो जशी समुद्रांतील लाट वाऱ्यानें उचंबळली व हेलकावली जात्ये तसा होतो त्या मनुष्यानें न कल्पावें कीं आपणास कांहीं ईश्वरापासून प्राप्त होईल द्विचित्त पुरुष आपले सर्व वर्त्तणुकींत अस्थिर असतो जो नीच भाऊ तो आपले थोरपणाविषयीं हर्षित असावा आणि जो धनवान तो आपले नीचपणाविषयीं हर्षित असावा कां तर तो गवताचे फुलासारिखा जाईल कारण कीं सूर्य जळत उष्ण सहित उगवून गवत वाळवितो आणि त्याचें फुल गळतें आणि त्याचे रूपाची शोभा बिघडत्ये तसा धनवानहि आपले चालींत म्लान होऊन जाईल जो पुरुष परीक्षा सोशितो तो धन्य आहे कांकीं खरा निघेल तेव्हां जीवनाचे ज्या



मुकुटाविषयीं ईश्वरानें आपले प्रीतिकर्त्यास वचन दिलें आहे तो त्याला प्राप्त होईल

सुवार्त्ता योहान्न १४. १.

तुमचें मन व्याकुल नसावें तुह्मी देवावर भाव ठेवितां मजवरहि भाव ठेवा माझे बापाचे घरांत बहुत निवास आहेत असें नसतें तर म्यां तुह्माला सांगीतलें असतें तुह्मासाठीं मी जागा सिद्ध करायला जातों आणि जर जातों तर तुह्मा साठीं जागा सिद्ध करून परत येईन आणि आपले जवळ तुह्माला घेईन अशासाठीं कीं जेथें मी असतों तेथें तुह्मीहि असावें आणि जेथें मी जातों तें तुह्मी जाणतां व मार्गहि जाणतां थोमास त्यास ह्मणतो प्रभो जेथें तूं जातोस तें आह्मी जाणत नाहीं मग मार्ग कसा जाणूं येशू त्यास म्हणतो मी मार्गच सत्यच आणि जीवनच आहें माझेकडून नसलें तर कोणी बापाजवळ येत नाहीं जर मला तुम्ही जाणलें असतें तर माझे बापालाहि जाणलें असतें पण आतांपासून तुह्मी त्याला जाणतां तुम्हीहि त्याला पाहिलें आहे फिलिप्पस त्यास ह्मणतो प्रभो आह्माला बाप दाखीव मग तें आह्मास पुरे होईल येशू त्यास ह्मणतो फिलिप्पसा एवढा वेळ मी तुह्माशीं आहें आणि त्वां मला जाणलें नाहीं किं काय ज्यानें मला पाहिलें आहे त्यानें बापाला पाहिलें आहे तर मग आम्हाला बाप दाखीव म्हणून तूं कसें ह्मण तोस मी बापांत आणि बाप मजमध्यें आहे असें विश्वासत नाहींस काय ज्या गोष्टी मी तुह्मास सांगत असतां त्या स्वतः

बोलत नाहीं पण जो बाप मजमध्यें राहतो तोच असलीं कामें करितो मी बापांत आहें आणि बाप मजमध्यें आहे असा विश्वास मजवर ठेवा नाहीं तर कामांमुळेंच मजवर विश्वास ठेवा तुह्मास मी खचीत खचीत सांगतों जो मजवर विश्वास ठेवील तो जीं कामें मी करितों तींहि करील आणि त्यांपेक्षां मोठीं कामें करील कांकीं मी आपले बापाजवळ जातों आणि जें कांहीं माझे नामानें मागाल तें करीन अशासाठीं कीं बाप पुत्राकडून गौरविला जावा जर तुह्मी माझे नामानें कांहीं मागाल तर तें मी करीन

## बार्नाबास साधु प्रेषिताचा दिवस.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ ईश्वरा देवा ज्या त्वां आपला पवित्र प्रेषित बार्नाबास पवित्रात्मोत्पन्न विशेष सद्गुणानीं विशिष्ट केला त्या तुला आह्मी विनवितों कीं आपले विविध सद्गुण रहित आह्मास सोडूं नको पण तुझा आदर व तुझें गौरव व्हावें यासाठीं ते सद्गुण सर्वदा प्रयुक्त करायाला आह्मास सत्गुण दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्राचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत ११. २२.

तर यांविषयीं येरुशालेमांतील मंडळीचे कानीं वर्त्तमान पडलें गेलें तेव्हां त्यानीं आंत्योखीयेपर्यंत जावयास बार्नाबास पाठविला तो आला आणि देवाची कृपा पाहून हर्ष



पावला आणि ते मनस्संकल्पेंकरून ईश्वरापाशीं रहावे ह्मणून त्यानें त्यां सर्वांस संबोध केला कां तो भला मनुष्य होता व पवित्र आत्म्यानें व विश्वासानें भरला होता मग ईश्वराशीं मोठा समुदाय जडला गेला नंतर शाउलसाचा शोध करायाला बार्नाबास तार्ससाकडे गेला आणि तो सांपडून त्याला त्यानें आंत्योखीयेस आणिलें नंतर असें झालें कीं त्यानीं संपूर्ण एक वर्ष मंडळीशीं सहायत्व केलें आणि मोठे समुदायास शिकविलें आणि पहिल्यानें आंत्योखीयेंत शिष्य ख्रिस्ती असे नामांकित झाले त्यांदिवसांत येरुशालेमाहून आंत्योखीयेस भविष्यवादी आले त्यांतला एक आगाबास नामा यानें उभें राहून पवित्र आत्म्याकडून सूचना केली कीं सर्व पृथ्वीवर मोठा दुष्काळ होणार आहे तो तर क्लौद्यस कैसार याचे राज्यांत झाला तेव्हां जे भाऊ यहूदांत रहात होते त्यांचे उपचारास शिष्यानीं प्रत्येकानें आपापले संपत्तिप्रमाणें कांहींसें पाठवायाचा संकल्प केला हें तर त्यानीं साधलें आणि बार्नाबास व शाउलस यांचे हातून वडिलांजवळ पाठविलें

### सुवार्त्ता योहान १५. १२.

हीच माझी आज्ञा आहे कीं जशी म्यां तुह्मावर प्रीति केली आहे तशी तुह्मीं एकमेकांवर प्रीति करावी कोणी आपला जीव आपले मित्रांसाठीं द्यावा यापेक्षां कोणाला अधिक दया नाहीं जें जें तुह्मास आज्ञा देऊन मी सांगतों तें तें जर करितां तर तुह्मी माझे मित्र आहां यापुढें मी

तुह्मास सेवक ह्मणत नाहीं कांकीं जें आपला प्रभु करितो तें सेवक जाणत नाहीं पण म्यां तुह्मास मित्र म्हटलें आहे कांकीं म्यां जें सर्व आपले बापापासून ऐकिलें तें म्यां तुम्हास कळविलें आहे तुम्हीं मला वृत केलें असें नव्हे पण मीच तुम्हास यासाठीं निवडलें आणि नेमिलें आहे कीं तुह्मीं जाऊन फल द्यावें व तुमचें फल रहावें अशासाठीं कीं जें कांहीं तुह्मी माझे नामानें बापापाशीं मागाल तें त्यानें तुम्हास द्यावें

## बाप्तिस्माकरणाऱ्या योहान्न साधूचा दिवस.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या तुझे विधानेंकरून बाप्तिस्मा करणारा तुझा सेवक योहान्न चमत्कारविशिष्ट जन्म पावला आणि आमचा तारणारा तुझा पुत्र याचा मार्ग पश्चात्तापाचा उपदेश करून सिद्ध करायास पाठविला गेला त्याचे हितोपदेशास व पवित्र आचारास अनुसरायास आह्मास अशी बुद्धि द्यावी कीं त्याचे उपदेशाप्रमाणें आह्मीं खरा पश्चात्ताप करावा आणि त्याचे रीतिप्रमाणें नित्य सत्य बोलावें धैर्येंकरून पातकाचा निषेध करावा आणि सत्यामुळें सहिष्णतेनें दुःख सोसावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

### पत्राचे स्थानीं यशाया ४०. १.

माझे लोकांचें सांत्वन करा करा सांत्वन असें तुमचा



देव ह्मणतो येरूशालेमेस हाक मारा आणि तिला सांत्वनवाद सांगा कीं तुझें युद्धकरण समाप्त झालें आहे तुझे अन्यायाची क्षमा केली आहे आणि आपले सर्व पापासाठीं त्वां ईश्वराचे हातून दुप्पट घेतलें आहे रानांत वाणी शब्द करिते ईश्वराचा मार्ग सिद्ध करा आमचे देवासाठीं जंगलांत सडक रस्ता नीट करा प्रत्येक खळगा उंचवट केला जाईल व प्रत्येक डोंगर व टेंकाड खोलवट केलीं जातील कडा मैदानच होईल आणि खडक शेतजमीनच होतील आणि ईश्वराचें गौरव प्रकट होईल आणि त्यास सर्व मनुष्यें मिळून पाहतील कांकीं ईश्वरानें असें सांगीतलें आहे वाणी ह्मणाली तूं हाक मार तेव्हां त्यानें म्हटलें काय हाक मारूं सर्व मनुष्यजाति गवतच आहे व त्याची सर्व शोभा माळांतलें फूलच आहे गवत कोमतें फूल गळतें कारण कीं ईश्वराचा वारा त्याजवर वाहतो निश्चयें लोक गवतच आहेत गवत कोमतें फूल गळतें पण आमचे देवाची गोष्ट सनातनतः टिकेल अगे जीयोने सुवार्त्ता सांगणारे तूं उंच डोंगरावर चढ अगे येरूशालेमे सुवार्त्ता सांगणारे बळेंकरून तूं आपली वाणी उंच कर कर उंच भिऊं नको यहूदाचे नगरांस सांग पहा तुमचा देव पहा प्रभु देव पराक्रमानें येईल आणि त्याचा भुज आपलें राज्य करील पहा त्याचें मोल आपल्यापाशींच आहे व त्याचें वेतन आपल्यापुढेंच आहे तो मेंढक्यावाणीं आपला कळप चारील आपले हातानें कोंकरें गोळा करील आणि आपल्या उराशीं धरून वाहील आणि गाभण्या मेंढ्या चौकशीनें नेईल

सुवार्ता लूक १. ५७.

आणि एलीसाबेतीचा प्रसूत होण्याचा समय पूर्ण झाला तेव्हां ती पुत्र प्रसवली मग ईश्वरानें तिजवर आपली कृपा मोठी केली आहे असें ऐकून तिचे शेजारी व नातलग तिजशीं आनंद पावले आणि असें झालें कीं आठवे दिवशीं ते त्या बाळकाची सुंता करायास आले तेव्हां त्यानीं त्याचे बापाचें जें नाम जाखारीयास तेंच त्याला ठेविलें नंतर त्याचे आईनें उत्तरकरून ह्मटलें असें नको पण तो योहान्न ह्मटला जाईल तेव्हां त्यानीं तिला म्हटलें कीं या नामानें ह्मटला गेला असा तुझे वंशांतला कोणी नाहीं तेव्हां त्याला काय ह्मणावें म्हणून त्याचा बाप इच्छीत असेल हें समजा यास त्यानीं त्याजकडे अभिनय केला तेव्हां त्यानें एक पाटी आणवून लिहिलें कीं त्याचें नाम योहान्न आहे मग ते सर्व आश्चर्य पावले आणि लागलेंच त्याचें तोंड व त्याची जीभ मोकळीं झालीं नंतर तो देवाचें सुवंदन करीत बोलता झाला आणि त्याचे आसपासचे सर्व वस्ती करणाऱ्यांस भय वाटलें आणि यहूदाचे सर्व डोंगरवट देशांत ह्या सर्व गोष्टी सांगितल्या गेल्या व ज्यानीं ह्या ऐकिल्या त्यां सर्वांनीं आपले मनांत ठेविल्या आणि ह्मटलें हा बालक तर काय होईल आणि ईश्वराचा हात त्यासंगतीं होता मग त्याचा बाप जाखारीयास पवित्र आत्म्याकडून भरला गेला आणि भविष्यवाद सांगत बोलिला ईश्वर इस्राएलाचा देव सुवंदित असावा कांकीं त्यानें आपले लोकांस पाहून त्यांचें तारण केलें आहे आणि आपले दावीद सेवकाचे वंशांत आम्हासाठीं बलवान तारणारा उत्पन्न केला आहे जसें त्यानें आपले पवित्र भविष्यवाद्यांच्या मुखेंकरून पहिल्यापासून सांगीतलें असे तसें आह्मास आपले शत्रूंपासून व आपले सर्व वैऱ्यांचे हस्तापासून तारायाला आमचे वाडवडलांकडची कृपा साधायाला आणि आपली पवित्र संधा आठवायाला जी शपथ त्यानें आमचे वडील आब्राहामाशीं वाहिला तदनुसार आम्हास द्यायाला कीं आह्मीं आपले वैऱ्यांचे हातून मुक्त झालों असतां आमचे आयुष्याचे सर्व दिवस त्या समोर पवित्रता व न्याय यांकडून त्याची सेवा निर्भयपणें करावी आणि बाळका तूं परात्पराचा भविष्यवादी ह्मटला जाशील कांकीं त्याचे मार्ग सिद्ध करायास तूं ईश्वरापुढें चालशील त्यांचे पापांचे क्षमेनें जें तारण होतें त्याचें ज्ञान द्यावयासाठीं आमचे देवाचे ज्या दयामय कळवळ्यानें पहांट आम्हास वरतून आली आहे त्याकडून अंधारांत व मृत्युच्छायेंत जे बसत आहेत त्यांस प्रकाशित करायाला समाधानाचे मार्गांत आमचे पाय नीट चालवायाला नंतर तो बालक वाढत गेला व आत्म्यानें बळावला आणि इस्राएलास तो आदिष्ट झाला त्या दिवसापर्यंत तो रानांत असे



## पेत्रस साधूचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपला पुत्र येशू ख्रिस्त

याकडून आपले प्रेषित पेत्रस साधूला बहुत विशेष सद्गुण देऊन आज्ञा दिली कीं त्यानें तुझा कळप मनापासून झटून पाळावा त्या तुला आम्ही विनवितों कीं सर्व एपिस्कोपसानीं व पाळकानीं तुझी पवित्र गोष्ट यत्नतः सांगावी आणि तिजप्रमाणें तुझे लोकानीं मान्यतः वर्त्तावें ह्मणून त्यांला बुद्धि व शक्ति दे अशासाठीं कीं त्यांजला सनातन गौरवाचा मुकुट प्राप्त व्हावा येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्राचे स्थानीं प्रेषितांचा वृत्तांत १२. १०

त्यासमयीं हेरोद राजानें मंडळींतले कित्येकांस उपद्रव करायास आपले हात लांब केले आणि योहान्नाचा भाऊ जो याकोब याजला तरवारीनें जिवें मारिलें हे यहूद्यांस संतोषक आहे असें पाहून तो पेत्रसालाहि धरायास प्रवृत्त झाला (तेव्हां अफुगलेल्या भाकरीचे दिवस होते) त्याला तर त्यानें धरून तुरुंगांत घातलें आणि पेसाह झाल्यावर लोकांसाठीं बाहेर आणावें असा संकल्पकरून त्याला राखावें ह्मणून चार चौकड्या शिपायांचे स्वाधीन ठेविलें पेत्रस तुरुंगांत राखिला गेला खरें पण त्याजकरितां मंडळीनें देवाची फार प्रार्थना केली मग त्याला हेरोद बाहेर काढणार होता त्या रात्रीं पेत्रस दोहीं सांखळ्यानीं बंद केला असून दोहीं शिपायांमध्यें निजला होता आणि पाहरेकरी दारापुढें तुरुंग राखीत होते तेव्हां पहा ईश्वराचा दूत आला आणि त्या खोलींत उजेड पडला



मग त्यानें पेत्रसाचे पार्श्वभागीं धका लावून त्यास उठवून ह्मटलें तूं लौकर ऊठ तेव्हां त्याचे हातांवरल्या त्या सांखळ्या पडल्या नंतर दूतानें त्यास म्हटलें तूं आपली कमर बांध आणि आपल्या वाहणा पायांत घाल तेव्हां त्यानें तसें केलें मग तो त्याला ह्मणाला तूं आपलें वस्त्र पांघरून माझे मागें ये तेव्हां तो निघून त्याचे मागें गेला आणि दूतानें जें केलें तें वास्तविक आहे असें तो जाणत नव्हता पण आपण दृष्टांत पाहिला आहे असें त्याला वाटलें नंतर पहिला व दुसरा या पाहऱ्यांमधून ते जाऊन ज्या लोखंडी दरवाज्यांतून नगराकडची वाट होती त्याजवळ येतांच त्यांसाठीं तो आपोआप उघडला तेव्हां ते निघून एका आळींतून गेले आणि तेव्हांच दूत त्याजपासून गेला नंतर पेत्रसास बोध होऊन त्यानें ह्मटलें आतां मी निश्चयें जाणतों कीं ईश्वरानें आपला दूत पाठवून मला हेरोदाचे हातून व यहूदी लोकांचे सर्व प्रतीक्षेपासून मुक्त केलें आहे

सुवार्त्ता मात्थी १६. १२.

आणि येशू फिलिप्पी कैसारीयेचे प्रदेशांत येऊन आपले शिष्यांस विचारितां ह्मणाला मनुष्याचा पुत्र जो मी तो कोण आहें ह्मणून लोक काय बोलतात तेव्हां ते ह्मणाले कोणी ह्मणतात तूं योहान्न बाप्तिस्माकरणारा आहेस दुसरे एलीया इतर इर्मिया अथवा भविष्यवाद्यांतला एखादा आहेस असें ह्मणातात तेव्हां तो त्यांस ह्मणतो तर मी कोण आहें याविषयीं तुह्मी काय ह्मणतां तेव्हां शिमोन

पेत्रस उत्तर करीत ह्मणाला तूं ख्रिस्त जीवंत देवाचा पुत्रच आहेस ते समयीं येशू त्याजला उत्तर करितांना ह्मणाला हे शिमोन बारयोना तूं धन्य आहेस कांकीं मांस व रक्त यानीं तुला हें प्रकट केलें नाहीं पण माझे आकाशांतील बापानें प्रकट केलें आहे आणि मी तुला सांगतों कीं तूं पेत्रस आहेस आणि याच खडकावर मी आपली मंडळी बांधीन आणि नरकाचे द्वारांचें बल तिजवर चालणार नाहीं आकाशाचे राज्याच्या किल्ल्या मी तुला देईन आणि जें कांहीं तूं पृथ्वीवर बंद करिशील तें आकाशांत बंद केलें जाईल आणि जें कांहीं तूं पृथ्वीवर सोडिशील तें आकाशांत सोडिलें जाईल

## याकोब साधु प्रेषिताचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे दयालु देवा जसा तुझा पवित्र प्रेषित याकोब साधु आपला बाप व जें कांहीं आपलें होतें त्यांस सोडून तुझे पुत्र येशू ख्रिस्ताचे बलावण्यास कांहीं उशीर नकरितां मान्य झाला आणि त्याला अनुसरला तसे अह्मीं सर्व प्रापंचिक व ऐंद्रियक राग सोडून तुझे पवित्र आज्ञानुसार वर्त्तायास सर्वदा तत्पर असावें येशूख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्राचेस्थानीं प्रेषितांचा वृत्तांत ११. २७.

त्यां दिवसांत येरूशालेमाहून आंत्योखीयेस भविष्यवादी आले त्यांतला एक आगाबास नामा यानें उभें राहून पवित्र



आत्म्याकडून झालेली सूचना सांगीतली कीं सर्व पृथ्वीवर मोठा दुष्काळ होणार आहे तो तर क्लौद्यस कैसार याचे राज्यांत झाला तेव्हां जे भाऊ यहूदांत राहत होते त्यांचे उपचारास शिष्यानीं प्रत्येकानें आपले संपत्तिप्रमाणें कांहींसें पाठवायाचा संकल्प केला हें तर त्यानीं साधलें आणि बार्नाबास व शाउलस यांचे हातून वडलांजवळ पाठविलें त्या समयीं हेरोद राजानें मंडळींतले कित्येकांस उपद्रव करायास आपले हात लांब केले आणि योहान्नाचा भाऊ जो याकोब यास तरवारीनें जिवें मारिलें हें यहूद्यांस संतोषक आहे असें पाहून तो पेत्रसालाहि धरायास प्रवृत्त झाला

सुवार्त्ता मात्थी २०. २०.

तेव्हां जेबेदीचे पुत्रांची आई आपले पुत्रांसंगतीं त्या जवळ येऊन पायांपडून त्याजपासून कांहीं मागणार होती तेव्हां तो तिला म्हणाला तूं काय इच्छित्येस ती त्याजला म्हणाली हे माझे दोघे पुत्र तुझे राज्यांत एक तुझे उजवे हाताकडे आणि एक तुझे डावे हाताकडे बसावे ह्मणून आज्ञा दे तेव्हां येशूनें उत्तर करीत ह्मटलें जें तुम्ही मागतां तें तुह्मी समजत नाहीं जो प्याला मी पिणार आहें तो प्यावयास आणि जो बाप्तिस्मा मी घेणार आहें तो घ्यावयास तुह्मी समर्थ आहां काय ते त्यास ह्मणतात होय समर्थ आहों नंतर तो त्यांला ह्मणतो माझा प्याला तुह्मी प्याल व जो बाप्तिस्मा मी घेणार आहें तो तुह्मी घ्याल खरें तरीं माझे उजवे हाताकडे अथवा माझे डावे हाताकडे बसणें हें

देणें माझें नाहीं पण ज्यांसाठीं माझे बापानें तें सिद्ध केलें आहे त्यांलाच प्राप्त होईल मग ते दहा जण ऐकून त्यां दोघां भाव्वांवर फार रुसले तेव्हां येशूनें त्यांस जवळ बलावून म्हटलें तुह्मी जाणतां कीं परदेशस्थ लोकांचे अधिकारी त्यांजवर प्रभुत्व करितात आणि जे थोर ते त्यांजवरहि अधिकार करितात पण तुह्मामध्यें असें होणार नाहीं तर जो कोणी तुम्हामध्यें मोठा होऊं इच्छितो तो तुमचा सेवक होवो आणि जो कोणी तुह्मामध्यें मुख्य होऊं इच्छितो तो तुमचा दास होवो जसा मनुष्याचा पुत्र सेवा घ्यायास नाहीं परंतु सेवा करायास व बहुतांसाठीं आपला जीव प्रतिदान असा द्यायास आला आहे तसा

## बारथलमी साधु प्रेषिताचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा ज्या त्वां आपला प्रेषित बारथलमी यास तुझे गोष्टीवर विश्वासायाला आणि ती सांगायाला सत्गुण दिला त्या तुला आह्मी विनवितों कीं ज्या गोष्टीचा विश्वास त्यानें धरिला ती तुझे मंडळीला आवडावी व ती गोष्ट मंडळीनें गाजवून सांगावी आणि मान्य करावी येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पचाचेस्थानीं प्रेषितांचा वृतांत ५. १२.

आणि लोकांमध्यें प्रेषितांचे हातून बहुत चमत्कार व आश्चर्यकर्में घडलीं व ते सर्व एकचित्तेंकरून सलोमोनाचे



प्रघाणांत असत आणि इतरांतला कोणी त्यांसंगतीं चिकटायास धैर्य धरीना पण लोकानीं त्यांस थोर मानिलें आणि विश्वास धरणारे म्हणजे पुरुषांचे व स्त्रियांचे समुदाय ईश्वराशीं अणखीं मिळाले इथपर्यंत कीं त्यानीं रोग्यांस बाहेर आणून आळ्यांचे वाटांत मंचकांवर व बाजांवर ठेविलें अशासाठीं कीं पेत्रस तिकडून चालत असतां त्याची छाया देखील त्यांतले कोणेकावर पडावी व चहूंकडचे नगरांतले बहुत लोक रोग्यांस व अशुद्ध आत्म्यानीं जे बाधलेले यांस घेऊन येरुशालेमांत आले मग ते सर्व बरे झाले

सुवार्त्ता लूक २२. २४.

आणि त्यांतील कोणत्याला श्रेष्ठ मानावें याविषयीं त्यांजमध्यें स्पर्द्धा झाली तेव्हां त्यानें त्यांस म्हटलें परदेशस्थांचे राजे त्यांजवर प्रभुता करितात आणि त्यांचे अधिकारी सुकर्मी ह्मटले जातात पण तुह्मी असे नाहीं तर जो तुह्मामध्यें मोठा असेल तो धाकटा होवो व जो नायक असेल तो सेवकसा होवो कांकीं कोणता श्रेष्ठ जो भोजनास बसला तो किंवा जो सेवा करितो तो किं काय तर जो भोजनास बसला तो किं नाहीं तर जो सेवा करितो त्यासारिखा मी तुह्मामध्यें आहें आणि माझे परीक्षांत जे मसंगतीं नित्य राहिले आहेत तेच तुम्ही आहां आणि जसें मला माझे बापानें राज्य नेमून दिलें आहे तसें मीहि तुह्मास राज्य नेमून देतों अशासाठीं कीं माझे राज्यांत तुह्मीं माझे मेजावर खावें व प्यावें व इस्राएलाचे बारा वर्गांची न्यायाधीशी करितांना सिंहासनावर बसावें

## मात्थी साधु प्रेषिताचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपले सुवंदित पुत्राकडून मात्थीला नाक्यावरून प्रेषित व सुवार्त्तिक होण्यास बलाविलें सर्व लोभिष्ट मनोरथ व धनाची फार आवड यांस सोडण्यास व तुझा पुत्र येशू ख्रिस्त त्यालाच अनुसरण्यास आम्हास सत्गुण दे जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान सर्वदा आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन

पत्र दुसरें कोरिंथ. ४. १.

यास्तव ही सेवा आह्मास असतां आह्मावर दया केली आहे म्हणून आह्मीं थकत नाहीं पण कुत्सित गुप्त कर्मे आह्मीं नाकारिलीं आहेत धूर्त्ततेनें चालत नसतां व देवाची गोष्ट भेलीत नसतां पण सत्य प्रकट करीत असतां आम्हीं आपल्यास देवासमोर प्रत्येक मनुष्याचे अंत:करणाप्रत प्रकट करितों आणि आमची सुवार्त्ता जर गुप्त असली तर जे नाश पावतात त्यांलाच गुप्त आहे ज्या विषयानीं ह्या जगाचा देव अविश्वस्तांचें मन अशासाठीं आंधळें करितो कीं जो ख्रिस्त देवाची प्रतिमा आहे त्याचे गौरवी सुवार्त्तेचा प्रकाश त्यांजवर पडूं नये त्याविषयानीं तर आह्मी आपणास नाहीं पण ख्रिस्त येशू जो प्रभु त्यास गाजवून सांगतों आणि येशूकरितां आपणास तुमचे सेवक ह्मणवितों कांकीं ज्या देवानें



अंधाराचे स्थानीं उजेड प्रकाशावा म्हणून सांगीतलें त्यानें आमचे मनांत प्रकाश पाडिला आहे अशासाठीं कीं येशू ख्रिस्ताचे अंगीं देवाचें जें गौरव आहे त्याची ज्ञानप्रभा आह्मास द्यावी

सुवार्त्ता मात्थी ९. ९.

आणि येशूनें तेथून जाऊन मात्थी म्हटलेले मनुष्यास नाक्यावर बसलेलें पाहिलें आणि त्याला ह्मटलें माझे मागें ये तेव्हां तो उठून त्याचे मागें गेला नंतर असें झालें कीं तो घरांत बसला असतां पहा तेव्हां बहुत वसूली व पातकी येऊन येशूसंगतीं व त्याचे शिष्यांसंगतीं जेवायास बसले तेव्हां फारीशी तें पाहून त्याचे शिष्यांला ह्मणाले वसूली आणि पातकी यांसंगतीं तुमचा अध्यापक कां खातो तेव्हां येशूनें ऐकून त्यांस म्हटलें जे बरे आहेत त्यांला वैद्याची गरज नाहीं पण जे रोगी त्यांला आहेच आणि मला यज्ञापेक्षां दया फार आवडत्ये याचा अर्थ तुह्मी जाऊन शिका कांकीं त्यानीं पश्चात्ताप करावा मी पुण्यवानांस नाहीं पण पाप्यांस बोलावायास आलों आहें

## मीखाएल व सर्व दूत यांचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सनातन देवा ज्या त्वां दूत आणि मनुष्यें यांचीं सेवाकर्मे चमत्कारिक अनुक्रमें नेमिलेलीं व स्थापिलेलीं आहेत जसें आकाशांत तुझे पवित्र दूत सर्वदा तुझी सेवा करितात तसें

त्यानीं तुझे विधानेंकरून पृथ्वींत आमचें साहाय्य व संरक्षण
करावें हें कृपा करून घडूं दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे
योगानें आमेन

पत्राचेस्थानीं प्रगटविणें. १२. ७.

आणि आकाशांत युद्ध होतें मीखाएल व त्याचे दूत
नागाशीं झुंजले आणि नाग व त्याचे दूत झुंजले पण त्यानी
जिंकिलें नाहीं व त्याचें स्थान आकाशांत पुढें सांपडलें नाहीं
तेव्हां तो मोठा नाग पुरातन सर्प जो द्याबलस व सैतान
म्हटलेला आहे सर्व भूमिहि जो फसवितो तो बाहेर पृथ्वींत
टाकिला गेला व त्याचे संगतीं त्याचे दूत बाहेर टाकिले
गेले तेव्हां म्यां आकाशांत मोठी वाणी ऐकिली आतां
तारण व पराक्रम व आमचे देवाचें राज्य आलें आहे
आणि त्याचे ख्रिस्ताचा अधिकार आला आहे कांकीं आमचे
भाव्वांचा जो अपवादी त्यांचा अपवाद आमचे देवासमोर
रात्रंदिवस करी तो खालीं टाकिला गेला आहे तर त्यानी
त्या कोंकराचे रक्तेंकरून व आपले साक्षीचे गोष्टीकडून त्यास
जिंकिलें आणि मरण पावतपर्यंत त्यानीं आपला जीव प्रिय
मानिला नाहीं यास्तव अहो आकाश व त्यांतले राहणारे
जे तुह्मी ते आनंद करा पृथ्वींत व समुद्रांत जे वस्ती करितां
त्यां तुम्हाला हाय हाय कारण कीं द्याबलस फार कोप
पावून व आपला काळ थोडा उरला असें जाणून तुम्हाज
वळ उतरला आहे

सुवार्त्ता मात्थी १८. १.

त्यासमयीं शिष्यानीं येशूजवळ येऊन ह्मटलें तर आका



शाचे राज्यांत कोण श्रेष्ट आहे तेव्हां येशूनें एका लहान
पोरास जवळ बोलावून त्यांजमध्यें ठेविलें आणि ह्मटलें मी
तुह्माला खचीत सांगतों जर तुह्मी फिरविले जात नाहीं व
लहान पोरासारिखे होत नाहीं तर तुह्मी आकाशाचे राज्यांत
जाणार नाहीं तर जो कोणी या लहान पोरासारिखा
आपणातें नम्र करितो तोच आकाशाचे राज्यांत श्रेष्ट आहे
व जो कोणी असें एक लहान पोर माझे नामानें घेतो
तो मला घेतो आणि हे जे धाकले मजवर विश्वास ठेवि
तात यांतील एकाला जो कोणी आडखळवील त्याचे माने
वर गाढवाचें जातें टांगलें आणि तो खोल समुद्रांत बुड
विला तर त्याला बरें असतें आडखुळांमुळें जगाला हाय
हाय कांकीं आडखुळें येण्याचें अगत्य आहे पण ज्या मनु
ष्याकडून आडखूळ येतें त्याला हाय हाय मग तुझा हात
अथवा पाय जर तुला आडखळवितो तर तो आपलेपासून
तोडून टाक तुला दोन हात अथवा दोन पाय असून सना
तन अग्नींत टाकिलें जाणें यापेक्षां लंगडा अथवा पांगळा
असून जीवनांत जाणें तुला बरें आहे आणि तुझा डोळा
जर तुला आडखळवितो तर तो आपलेपासून काढून टाक
दोन डोळे तुला असून नरकाग्नींत टाकिलें जाणें यांपेक्षां
एकाक्ष जीवनांत जाणें तुला बरें आहे यां धाकट्यांतले
एकाला तुह्मी तुच्छ न मानावें म्हणून सावध असा कारण
मी तुम्हास सांगतों कीं आकाशांत त्यांचे दूत माझे आका
शांतील बापाचें तोंड सर्वदा पाहातात

## लूकाससाधु सुवार्त्ता लेखकाचा दिवस.

### प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां लूकास जो वैद्य ज्याची स्तुति सुवार्त्तेंत आहे त्यास सुवार्त्तिक व जीवात्म्याचा वैद्य व्हावयास बलाविलें त्या तुझा मनोदय असा असावा कीं त्यानें प्रसिद्ध केलेलें जें ज्ञान त्याचे कुशलकारक उपायानीं आमचे जीवात्म्याचे सकल रोग दूर करावे तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे पुण्याकरितां आमेन

### पत्र दुसरें तिमथ्यस ४. ५.

तर तूं सर्वांविषयीं सावध अस कष्टांची सहिष्णुता करीत जा सुवार्त्तिकाचें काम करीत जा तूं आपली सेवा पुरतेपणें साधीत जा कारण कीं मी आतां अर्पिला जातों आणि माझा अवसानसमय जवळ आला आहे म्यां मल्लयुद्धरूप सुप्रयत्न केला आहे म्यां आपली धांव समाप्त केली आहे म्यां विश्वास अखंडित राखिला आहे यापुढें मजसाठीं न्यायाचा मुकुट राखून ठेविला आहे जो मुकुट ईश्वर जो वास्तवीक न्यायाधीश त्यादीवसीं मला देईल तो आणि तो मला मात्र असें नाहीं पण जे सर्व त्याचे प्रादुर्भावाची आवड धरीत असतात त्यांलाहि देईल तर लौकर मजकडे यावयास प्रयत्न कर कां कीं देमास विद्यमान संसारावर चित्त ठेवून मला सोडून थेस्सालोनीकेस गेला आहे क्रेस्केस गालातीयेस गेला आहे तीतस दालमांतीयेस गेला आहे लूकास मात्र मजपाशीं आहे तूं



आपले संगतीं मार्कसाला घेऊन ये कांकीं तो सेवेविषयीं मला उपयोगी आहे म्यां तुखिकस एफेससाकडे पाठविला आहे जो झगा म्यां त्रोआसेंत कार्पसापाशीं ठेविला तो व पुस्तकें विशेषेंकरून चर्मपत्रें ती तूं येशील तेव्हां आण आलेक्षांद्रस कांस्यकरनें माझें फार वाईट केलें आहे त्याला त्याचे कामांप्रमाणें ईश्वर भरून देईल त्याजविषयीं तूंहि सावध हो कारण कीं त्यानें आमचे गोष्टींचा फार विरोध केला आहे

### सुवार्त्ता लूक १०. १.

यानंतर प्रभूनें दुसरे सत्तर जणांस नेमिलें आणि जेथें आपण येणार होता तेथें प्रत्येकानगरांत व स्थानांत आपत्यापुढें ते दोघे दोघे पाठविले यास्तव त्यानें त्यांस सांगीतलें कापणी मोठी आहे खरें परंतु कामकरी थोडके आहेत ह्मणून कापणीचे प्रभुपाशीं अशासाठीं विनंती करा कीं त्यानें आपले कापणीवर कामकरी पाठवावे जा पहा मी तुम्हास कोंकरांसारिखें लांडग्यांमध्यें पाठवितों कसणी अथवा झोळणा अथवा जोडे सहवर्त्तमान नेऊं नका आणि वाटेंत कोणाचें अभिवंदन करूं नका ज्या कोणत्या घरांत तुम्ही जाल तेव्हां पहिल्यानें म्हणा याघराचें कल्याण असो आणि कल्याणाचा पुत्र जर तिथें असेल तर तुमचें कल्याण त्याजवळ राहील आणि जर नसेल तर तें तुह्मांजवळ परत येईल आणि त्याच घरांत त्यांजपाशीं जें जें असेल तें तें खात पीत रहा कां तर कामकरी आपले मोलास योग्य आहे

## शिमोनसाधु व यूदाससाधु प्रेषित यांचादिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां प्रेषित व भविष्यवादी यांचे पायावर आपली मंडळी येशू ख्रिस्तच कोंपऱ्याचा मुख्य दगड असतां बांधिली आहे आह्मास त्यांचे हितोपदेशेंकरून आत्म्याचे ऐक्यांत परस्परांशीं असे जडलेले होऊं दे कीं आह्मीं तुसाठीं पवित्र व योग्य देवालय व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पत्र यूदास १. १.

येशू ख्रिस्ताचा सेवक आणि याकोबाचा भाऊ जो यूदास तो जे तुह्मी देवा बापानें पवित्र केलेले आणि येशू ख्रिस्तानें बलाविले असतां रक्षिलेले आहां त्यां तुम्हास दया समाधान आणि प्रीति बहुत व्हावीं ह्मणून इच्छितो प्रियानों सामान्य तारणाविषयीं तुह्मास लिहायाला पूर्ण मनोरथकरून जी विश्वस्य गोष्ट पवित्रांस एकदां सोंपून दिली होती तिज विषयीं मल्लयुद्धरूप प्रयत्न करावा ह्मणून तुह्माला बोध करायास म्यां लिहिण्याचें अगत्य धरिलें कारण कीं या दंडासाठीं पूर्वीं लिहून ठेविलेले कित्येक भक्तिहीन मनुष्य जे आमचे देवाची कृपा उलटी लालसेंत पालटून देव जो एकच अधिपति आणि आमचा प्रभु येशू ख्रिस्त यांस नाकारून गुप्तरूपें शिरले आहेत जरीं तुम्हाला एकदा कळलें होतें



तरीं याविषयीं मी तुम्हाला बोध करायास इच्छितों कीं ईश्वरानें लोकांला मिसर देशांतून तारून त्यानंतर जे विश्वास धरीनात त्यांचा नाश केला आणि ज्या दूतानीं आपली पदवी राखून धरिली नाहीं पण आपली वस्ती सोडिली त्यांस त्यानें अंधाराखालीं सनातन बंधनांत मोटे दिवसांतले न्यायाधीशीसाठीं ठेविलें आहे जशीं सदोम व गमोरा व त्यांसारिखीं त्यांचे आसपासचीं नगरें जीं फार व्यभिचारकरून व अन्यदेहाचे मागें लागून उदाहरणेंशीं पुढें ठेविलीं आहेत आणि सनातन अग्नीचा दंड भोगीत आहेत त्यांप्रमाणेंच हे स्वप्न पाहणारे देह बाटवितात खरें आणि प्रभुता तुच्छ मानितात व थोर पदांविषयीं दुर्भाषण बोलतात

सुवार्त्ता योहान्न. १५. १७.

तुह्मीं एकमेकांवर प्रीति ठेवावी ह्मणून यांविषयीं मी तुह्मास आज्ञा देतों जग जर तुमचा द्वेष करितें तर तुह्मी जाणतां कीं तुमचा द्वेष केल्यापूर्वीं त्यानें माझा द्वेष केला आहे जर तुम्ही जगाचे असतां तर जग आपल्यावर प्रीति ठेवितें पण तुह्मी जगाचें नाहीं आणि म्यां तुह्मास जगांतून निवडिलें आहे यास्तव जग तुमचा द्वेष करितें म्यां जी गोष्ट तुह्माला सांगीतली ती आठवा सेवक आपले प्रभूपेक्षां श्रेष्ठ नाहीं जर ते माझे पाठीस लागले तर तुमचे पाठीसहि लागतील जर ते माझे गोष्टीस जपले तर तुमचे गोष्टीलाहि जपतील पण माझे नामामुळें हीं सर्व अरिष्टें ते तुह्मास करितील कांकीं ज्यानें मला पाठविलें त्याला त्यानीं जाणिलें

नाहीं मी जर येऊन त्यांला बोलिलों नसतों तर त्यांला पाप नसतें पण आतां त्यांला आपले पापाविषयीं कांहीं आच्छादन नाहीं जो माझा द्वेष करितो तो माझे बापाचा द्वेष करितो जीं कामें दुसरे कोणी केलीं नाहीं तीं जर म्यां त्यांज मध्यें केलीं नसतीं तर त्यांला पाप नसतें पण आतां त्यानीं मला व माझे बापालाहि पाहिलें आणि द्वेषिलें आहे तर जी गोष्ट त्यांचे नेमामध्यें लिहिली आहे म्हणजे उगीच त्यानीं मशीं द्वेष केला त्या गोष्टीची प्रतीति व्हावी लागत्ये व जो संबोधक बापापासून मी तुम्हाला पाठवीन म्हणजे जो सत्याचा आत्मा बापापासून येतो तो येईल तेव्हां मजविषयीं साक्ष देईल व तुह्मीहि साक्ष द्याल कांकीं पहिल्यापासून तुम्ही मजपाशीं आहां

## सर्व पवित्रलोकांचा दिवस.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपला पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे राहस्यिक देहसंबंधी एका सहायत्वांत आपले निवडलेल्यांस जडलें आहे सर्व सद्गुणयुक्त व भक्ति विशिष्ट आचरणें करून तुझे धन्य पवित्रांप्रत असें अनुसरा यास आम्हाला सत्वगुण दे कीं जे मनापासून तुजवर प्रीति ठेवितात त्यांसाठीं जें अकथनीय सुख त्वां सिद्ध केलें आहे तें आह्मास प्राप्त व्हावें येशू ख्रिस्त जो आमचा प्रभु याचे योगानें आमेन

प्रचाचेस्थानीं प्रकटविणें ७. २.

आणि म्यां दुसरा दूत जीवंत देवाची मुद्रा धरून उग



वतेंतून चढतां पाहिला आणि ज्यां चोहों दूतांस भूमि व समुद्र यांस उपद्रव करायास अधिकार दिला होता त्यांला त्यानें मोठे शब्दानें हाक मारून सांगीतलें आम्ही आपले देवाचे सेवकांस त्यांचे कपाळावर मुद्रांकित करूंपर्यंत तुम्हीं भूमीस समुद्रास अथवा झाडांस उपद्रव करूं नका आणि जे मुद्रांकित झाले त्यांची गणती म्यां ऐकिली ह्मणजे इस्राएलाचे सर्वां वंशांतून एकलक्ष चौवेंताळीस हजार मुद्रांकित झाले यहूद्याचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले रूबेनाचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले गादाचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले आशेराचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले नफ्थालीचे वंशांतून बाराहजार मुद्रांकित झाले मेनाश्शेचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले शिमोनाचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले लेविचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले इस्साखाराचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले जेबूलूनाचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले योसेफाचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले बेन्यामीनाचे वंशांतून बारा हजार मुद्रांकित झाले त्यानंतर म्यां पाहिलें आणि पहा ज्यांला गणायास कोणी समर्थ नव्हता असा प्रत्येक जातींतून व वंशांतून व लोकांतून व भाषांतून मोठा समुदाय ज्याचे अंगांतून पांढरे झगे घातलेले असून सिंहासनासमोर व त्यां कोंकरांसमोर उभे रहात होते व त्यांचे हातांत जयपत्रें होतीं आणि ते मोटे शब्दानें ओरडत बोलिले सिंहासनावर जो बसलेला त्या आमचे देवानें व त्या कोंकरानें जें तारण केलें आहे तें

वर्णिलें जावो आणि सिंहासन व ते वडील व ते चार जीव यां भोंवतीं सर्व दूत उभे रहात होते आणि सिंहासनासमोर अधोमुख पडून देवाचें भजन करितांना ह्मणाले आमेन सुवंदन व गौरव व ज्ञान व उपकारस्तुति व आदर व सामर्थ्य व पराक्रम आमचे देवाला सनातनतः असोत आमेन

सुवार्त्ता मात्थी. ५. १.

तेव्हां समुदायांस पाहून तो डोंगरावर चढला आणि बसला असतां त्याचे शिष्य त्याजवळ आले तेव्हां त्यानें आपलें तोंड उघडून त्यांस शिकवीत सांगीतलें जे मनाचे नम्र आहेत ते धन्य कांकीं आकाशाचें राज्य त्यांचें आहे जे शोक करितात ते धन्य कांकीं ते सांत्वन पावतील जे लीन आहेत ते धन्य कांकीं ते पृथ्वीचे विभागी होतील ज्यांला न्यायाची भूक व तहान लागली आहे ते धन्य कांकीं ते तृप्त होतील जे दयालु आहेत ते धन्य कांकीं त्यांजवर दया केली जाईल जे हृदयाचे पवित्र ते धन्य कांकीं ते देवाला पाहतील जे समेट करितात ते धन्य कांकीं ते देवाचे पुत्र म्हटले जातील न्यायामुळें ज्याचे पाठीस लागलें आहे ते धन्य कांकीं आकाशाचें राज्य त्यांचें आहे जेव्हां तुह्मास निंदितील व तुमचे पाठीस लागतील आणि माझेमुळें सर्व वाईट गोष्ट तुह्मावर लबाडी बोलून ह्मणतील तेव्हां तुम्ही धन्य आहां तुह्मी आनंदित व उल्लासित व्हा कारण कीं तुमचें प्रतिदान आकाशांत मोठें होईल कांकीं तुम्हापूर्वीं जे भविष्यवादी होते त्यांचे पाठीस तसेच लागत असत

समाप्त.

# प्रभूचें रात्रिभोजन किंवा पवित्र सहायत्व याची अनुष्ठानपद्धति

पवित्र सहायत्व करण्याचे वेळेस मेजावर स्वच्छ पांढरें वस्त्र घालावें आणि लोक गुडघेटेंकीत असतांना आचार्यानें मेजाचे एके अंगास उभें राहून प्रभूची प्रार्थना व तिजपुढला प्रार्थनासारांश बोलावा.

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छे प्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हास दे जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास क्षमा कर आणि आम्हाला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्माला तार आमेन

हे सर्वसमर्थ देवा ज्या तुला सर्व हृदयें उघडीं आहेत आणि त्यांच्या इच्छा कळल्या आहेत ज्या तुजपुढें कोणतेंहि गुप्त लपत नाहीं तूं आपले पवित्र आत्म्याचे योगानें आमचे मनांतल्या कल्पना शुद्ध कर अशासाठीं कीं तुजवर आह्मी पूर्णतः प्रीति ठेवावी व तुझें पवित्र नाम योग्यतः मानावें आमचा प्रभु ख्रिस्त याचे योगानें आमेन

देव हीं सर्व वाक्यें बोलिला मी ईश्वर तुझा देव आहें माझे समोर तुला इतर देव नसोत

हे ईश्वरा आह्मावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर.

तूं आपलेसाठीं कोरींव मुर्त्ति करूं नको आणि जें कांहीं वरतीं आकाशांत अथवा खालतीं पृथ्वींत अथवा भूमी खालतीं पाण्यांत आहे त्याची प्रतिमा करूं नको त्यांचे पायां पडूं नको त्यांची सेवा करूं नको कांकीं मी ईश्वर तुझा देव स्वगौरवतत्पर देव आहे जे माझा द्वेष करितात त्यांचे तिसरे व चौथे पिढीपर्यंत बापांचे अन्यायाचें शासन मी लेंकरांस करितों आणि जे मजवर प्रीति ठेवून माझ्या आज्ञा पाळितात त्यांचे हजारोंवर मी दया करितों

हे ईश्वरा आह्मावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर'

ईश्वर जो तुझा देव त्याचें नाम तूं उगीच घेऊं नको कांकीं जो निष्कारण त्याचें नाम घेतो त्याला ईश्वर निरपराध असें मानणार नाहीं

हे ईश्वरा आह्मावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर.

शाब्बाथ जो दिवस तो पवित्र राखायाचें स्मरण ठेव तूं सहादिवस खपून सारा आपला धंदा कर पण सातवा जो दिवस तो ईश्वर जो तुझा देव त्याचा शाब्बाथ आहे त्यांत तूं कांहीं उद्योग करूं नको आणि तुझा पुत्र अथवा तुझी कन्या तुझा दास अथवा तुझी दासी अथवा तुझा पशु अथवा तुझे दारांतील तुझा विदेशी न करो कारण कीं ईश्वरानें सहादिवसांत आकाश व पृथ्वी व समुद्र आणि जें कांहीं त्यांत आहे तें उत्पन्न केलें आणि सातवे दिवशीं



विसांवा घेतला यास्तव ईश्वरानें सातवे दिवसाला आशीर्वाद देऊन पवित्र ठरविलें

हे ईश्वरा आह्मावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर

तूं आपले आईबापाचा सन्मान कर अशासाठीं कीं ईश्वर तुझा देव जी भूमि तुला देतो तिजवर तुझें आयुष्य दीर्घ व्हावें

हे ईश्वरा आम्हावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर

तूं हिंसा करूं नको

हे ईश्वरा आह्मावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर

तूं जारकर्म करूं नको

हे ईश्वरा आह्मावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर

तूं चोरी करूं नको

हे ईश्वरा आम्हावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर

तूं आपले सविधाविषयीं खोटी साक्ष देऊं नको

हे ईश्वरा आह्मावर दया कर आणि ही आज्ञा पाळायास आमचीं हृदयें मान्य कर

तूं आपले सविधाचे घरावर लोभ ठेवूं नको तुझे सविधाची बायको अथवा त्याचा दास अथवा त्याची दासी

अथवा त्याचा बैल अथवा त्याचा गाढव अथवा जें कांहीं तुझे सविधाचें असेल त्याजवर लोभ ठेवूं नको

हे ईश्वरा ह्या तूं आपल्या सर्व आज्ञा आमचे ह्वदयांत ठशीव असें तुला आह्मी विनवितों

ह्या प्रार्थनासारांश राजाविषयीं आचार्यानें बोलावा.

हे सर्वसमर्थ देवा ज्या तुझें राज्य सनातन आणि तुझी शक्ति अनंतच आहे तूं आपले अवघे मंडळीवर दया कर आणि तुझा निवडलेला सेवक जो आमचा राजा व शास्ता त्याचें मन त्वां असें वर्त्तवावें कीं त्यानें आपण तुझा सेवक आहें असें जाणून सर्व अर्थापेक्षां तुझा आदर व तुझें गौरव व्हावयासाठीं झटावें आणि आह्मीं व त्याचे सर्व प्रजेनें ज्याचा अधिकार तो धरितो हें योग्यत: ध्यानांत आणून तुझी सुभद्र गोष्ट व विधि यांप्रमाणें तुजविषयीं व तुसाठीं विश्वास्त पणें व नम्रपणें त्याची सेवा आदर व मान्यता करावी येशू खिस्त आमचा प्रभु याचे योगानें जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनत: असतां आमेन

अथवा हाच बोलावा.

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा आम्हाला तुझे पवित्र गोष्टीनें सांगीतलें आहे कीं राजांचें मन आणि बुद्धि तुझे शासनाचे स्वाधीन आहेत आणि त्यांस तूं आपले ईश्वरी ज्ञानाप्रमाणें सुस्थित करितोस व वर्त्तवितोस आह्मी तुला नम्रतेनें विनवितों कीं तुझा सेवक जो आमचा राजा व शास्ता त्याचें मन असें सुशील आणि सुशिष्ट करावें कीं त्यानें आपल्या सर्व कल्पना शब्द व कर्मे यांकडून तुझा आदर व गौरव व्हावयासाठीं सर्वदा झटावें आणि तुझे जे लोक त्याचे अधिकाराखालीं ठेविले आहेत त्यांस कल्याण स्वास्थ्य आणि भक्तिशीलता यांत राखायास त्यानें जपावें हे दयाळो बापा तुझा प्रिय पुत्र येशू खिस्त आमचा प्रभु याचे कारणें हें द्यावें आमेन



मग आचार्यानें वर्त्तमान दिवसाचा नेमिलेला प्रार्थनासारांश बोलावा आणि पत्र व सुवार्त्ता वाचावी आणि नंतर आचार्यानें व लोकानीं

पुढला मतांगीकार बोलावा

एकच देव जो सर्वसमर्थ बाप आकाशाचा व पृथ्वीचा व सर्व दृश्य आणि अदृश्य पदार्थांचा उत्पन्न करणारा याचा विश्वास मी धरितों

आणि एकच प्रभु येशू खिस्त जो देवाचा एकुलता पुत्र जो अवघे जगाचे पूर्वी आपले बापापासून अनादि जनन पावला देवापासून देव उजेडापासून उजेड वास्तविकदेवा पासून वास्तविक देव जो जात असून उत्पन्न नव्हता जो बापाचे एकसत्वाचाच आहे ज्यानें सर्व पदार्थ उत्पन्न केले होते जो आम्हा मनुष्यांसाठीं व आमचे तारणासाठीं आका शांतून अवतरला आणि पवित्र आत्म्याकडून मारया जी कुमारी तिजपासून देहधारण पावून मनुष्य झाला आणि पोंत्यस पिलातसाचे अधिकाराखालीं क्रूसावर चढविला गेला तो मरण पावून पुरिला गेला नंतर लेखाप्रमाणें तिसरे

दिवशीं जीवंत होऊन उठला आणि आकाशांत चढून देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे तो बसला आहे आणि जीवंतांची व मेलेल्यांची न्यायाधीशी करायासाठीं वैभवानें तो परत येईल ज्याचें राज्य कधीं अंत पावणार नाहीं याचा विश्वास मी धरितों

आणि पवित्र आत्मा जो जीवनाचा प्रभु आणि दाता आहे जो बाप आणि पुत्र यांचा अखंडित सत्ताचा आहे जो बाप आणि पुत्र यां सहवर्त्तमान भजिला व गौरविला जातो जो भविष्यवाद्यांकडून बोलत असे याचा विश्वास मी धरितों एक सामान्य प्रेषितिय मंडळीचा विश्वास मी धरितों पापांची क्षमा पावायासाठीं जो एकच बाप्तिस्मा तो मी अंगीकारितों आणि मेलेल्यांचें पुनरुत्थान व परलोकींचें जीवन यांची वाट मी पाहतों आमेन

तेव्हां आचार्यानें प्रभूचे मेजाजवळ उभें राहून दानकर्म आरंभावे आणि त्या वेळेस पुढले वाक्यांतलीं कित्येक आपले विवेकाप्रमाणें सांगावीं.

तुमचा प्रकाश मनुष्यांचे देखतां असा पडावा कीं त्यानीं हि तुमचीं उत्तम कर्में पाहून तुमचे आकाशांतील बापाचें गौरव करावें ⁂ मात्थी. ५.

जेथें कसर व तांब नाश करितात व चोर जेथें फोडून चोरितात अशे पृथ्वीवर तुह्मी आपल्यासाठीं धन सांठवूं नका पण जेथें कसर व तांब नाश करीत नाहींत व चोर जेथें फोडून चोरीत नाहींत तेथें आकाशांत तुह्मी आपल्यासाठीं धन सांठवा ⁂ मात्थी. ६.

जें कांहीं मनुष्यानीं तुम्हास करावें ह्मणून तुह्मी इच्छितां



तसेंच तुम्हीहि त्यांस करीत जा कांकीं नेमाचें व भविष्यवाद्यांचें तात्पर्य हेंच आहे ⁂ मात्थी. ७.

जाखायसानें उभें राहून प्रभूला सांगीतलें हे प्रभो पहा मी आपली अर्धी संपत्ति दरिद्र्यांस देतों आणि कोणापासून नहि म्यां जर कांहीं अन्यायानें घेतलें तर त्याला चौपट परत देतों ⁂ लूक. १९.

कोण आपले पदरचे द्रव्यानें कधीं युद्धप्रस्थान करितों कोण द्राक्षीचा मळा लावून तिचे फळांतून कांहीं खात नाहीं अथवा कळप चारितांना कोण कळपाचे दुधांतलें कांहीं खात नाहीं ⁂ १. ९.

जर आह्मी तुह्मासाठीं आत्मिक गोष्टी पेरिल्या तर तुमचे सांसारिक पदार्थ कापणीप्रमाणें आह्मी घेऊं हें फार आहे काय ⁂ १. कोर ९.

जे पवित्र अनुष्ठानें साधितात ते बलींतून खातात हें तुह्मास कळत नाहीं काय जे वेदीचा उद्योग करितात ते वेदीचे विभागी होतात तसेंच ईश्वरानें नेमिलेलें आहे कीं जे सुवार्त्ता सांगतात त्यानीं सुवार्त्तेपासून जीवावें ⁂ १. कोर ९.

जो थोडें पेरितो तो थोडेंच कापील आणि उदारपणें जो पेरितो तो उदारपणेंच कापील प्रत्येक जसा आपले मनांत संकल्प करितो तसें करो असंतोषानें किंवा अगत्यानें नको कारण कीं देवाला संतोषी दाता आवडतो ⁂ २ कोर. ९.

ज्याला देवाची गोष्ट शिकविली जात्ये त्यानें शिकविणाऱ्यास जें जें उत्तम तें तें द्यावें तुम्ही फसूं नका देव निंदिला

जात नाहीं कांकीं जें कांहीं कोणी मनुष्य पेरितो तेंच तो कापील ※ गालात. ६.

जसा आह्मास प्रसंग पडतो तसें आम्ही सर्वांचें हित करावें पण विशेषेंकरून जे विश्वासाचे घरचे आहेत त्यांचें ※ गालात. ६.

भक्ति अल्पसंतुष्टतासहित हा मोठाच लाभ आहे कांकीं आह्मी कांहीं जगांत आणिलें नाहीं आणि स्पष्ट दिसतें कीं त्यांतून आमच्यानें कांहीं नेववत नाहीं ※ १. तिम' ६.

जे या लोकीं धनवंत आहेत त्यांस आज्ञा दे कीं त्यांनीं हर्षानें वांटून द्यावें आणि दुसऱ्याशीं सहभाग करावा अशा साठीं कीं त्यांनीं आपल्यास भविष्यकाळाप्रत उत्तम पाया रचून सनातन जीवन प्राप्त करून घ्यावें ※ १. तिम. ६.

तुमचें काम आणि प्रीतियुक्त जो तुमचा श्रम तुम्ही पवित्रांस उपचार करून किंवा करितांना त्याचे नामासाठ केला आहे यांस विसरायास देव अन्यायी नाहीं ※ इब्री. ६.

हित करायास व दुसऱ्याशीं सहभाग करायास विसरूं नका कांकीं असल्यां यज्ञानीं देव संतुष्ट आहे ※ इब्री . १३ .

ज्या कोणाला संसारोपयुक्त जीविका आहे त्यानें तिचें आपले भावाला अगत्य आहे असें पाहून जर त्याजपासून आपले दयेचा कळवळा बंद केला तर त्याचे अंगीं देवाची प्रीति कशी राहत्ये ※ १. योह. ३

तूं आपले संपत्तींतून दानधर्म कर आणि कोणी दरिद्री माणसापासून तूं आपलें तोंड आवरूं नको म्हणजे तुजपासून ईश्वराचें तोंड आवरलें जाणार नाहीं ※ तोबीत. ४.



तूं आपले सामर्थ्याप्रमाणें दया कर तुला बहुत असलें तर बहुत दे थोडें असलें तर त्या थोड्यांतून संतोषानें देण्यास जपत जा कांकीं असें केल्यानें तूं आपल्यासाठीं अग त्याचे दिवसांप्रत उत्तम प्रतिदान सांठवितोस ※ तोबीत. ४.

जो दरिद्र्यावर दया करितो तो ईश्वराला उसणें देतो आणि त्याचें प्रतिदान ईश्वर त्याला परत देईल ※ दृष्टांत. १ ९.

जो दरिद्र्यांची चिंता करितो तो धन्य आहे त्यास कष्टांचे समयीं ईश्वर मोकळें करील ※ गीत ४१.

सहायलकर्म असतांना आचार्याला जितकी भाकर आणि जितका द्राक्षारस पुरे वाटेल तितकें दोहोंतलें त्यानें मेजावर ठेवावें.

नंतर आचार्यानें बोलावें

ख्रिस्ताची जी मंडळी या पृथ्वींत झटत्ये आहे तिचे संपूर्ण स्थितिविषयीं आपण प्रार्थना करूं

हे सर्वसमर्थ आणि निरंतर जीवित्या देवा ज्या त्वां आपले पवित्र प्रेषितांकडून आम्हास सर्व मनुष्यांसाठीं प्रार्थना विनंती व उपकारस्तुति करावी ह्मणून सांगीतलें आहे त्या तुला आह्मी फार नम्रतेनें विनवितों कीं फारच कृपा करून हीं आमचीं दानें अर्पणें घ्यावीं आणि ज्या प्रार्थना आह्मी तुला करितों ह्या ऐकाव्या आणि तुझे सर्व मंडळीस सर्वदा सत्य एकल आणि संमति यांविषयींचा स्वभाव द्यावा म्हणून तुला आम्ही विनवितों तुझें पवित्र नाम जे अंगीकारितात ते सर्व तुझे पवित्र गोष्टीचे सत्याविषयों एकमताचे असावे आणि एकल व भक्तियुक्त प्रीति यांमध्यें वर्त्तावें आणि आम्ही तुला

विनवितों कीं सर्व ख्रिस्ती राजे अधिपति आणि अधिकारी यांचें तारण व रक्षण करावें तुझा सेवक जो आमचा राजा याला विशेषेंकरून रक्षावें अशासाठीं कीं आम्ही त्याचे अधिकाराखालीं धार्मिकपणें आणि स्वस्थपणें शिष्ट केले जावे व त्याचें सर्व मंत्री आणि जे सर्व त्याचे हाताखालीं अधिकार विशिष्ट आहेत त्यानीं दुष्टपण व दुष्कर्म यांची शिक्षाकरून आणि तुझा खरा धर्म व सुनीति यांस रक्षून सत्यतः व अपक्षतः न्याय करावा हे आकाशांतील बापा सर्व एपिस्कोपस व प्रेसबुतरस यांला सत्वगुण दे अशासाठीं कीं त्यानीं आपले आचरणानें व उपदेशेंकडून तुझी खरी व जीवकारक गोष्ट प्रसिद्ध करावी आणि तुझीं पवित्र अनुष्टानें उचितपणें व योग्यपणें साधावीं आणि तूं आपले सर्व लोकांस तुझे दिव्य सत्वगुण दे जी मंडळी इथें विद्यमान आहे तिजला विशेषें करून अशासाठीं कीं त्यानीं नम्र अंतःकरणानें व योग्य आदरानें तुझी पवित्र गोष्ठ ऐकून घ्यावी आणि आपले आयुष्याचे सर्व दिवसपर्यंत पवित्रतेनें व न्यायानें तुझी सेवा खरेपणें करावी आणि हे ईश्वरा आम्ही तुला फार नम्रतेनें विनवितों कीं जे सर्व या नश्वर आयुष्यांत कष्ट शोक अगत्य रोग यानीं अथवा कोणत्याहि दुसऱ्या पीडेनें पीडित आहेत त्यांचें दया करून सांत्वन व साहाय्य करावें जे तुझे सेवक तुझा विश्वास व भक्ति धरून मरून गेले आहेत त्यांजविषयीं आम्हीं तुझें पवित्र नाम सुवंदित म्हणतों व त्यांजसहवर्त्तमान आम्हीं तुझे आकाशांतील राज्याचे विभागी व्हावें म्हणून त्यांचे उत्तम



वर्त्तणुकीस अनुसरायास आह्माला सत्वगुण दे हे ईश्वरा हें आह्माला द्यावें येशू ख्रिस्त आमचा एकच मध्यस्थ व प्रतिनिधि याचे कारणें आमेन

प्रभूचे रात्रिभोजनाविषयीं ही सुचना त्याजपूर्वीचे आदित्यवारीं आचार्यानें सांगावी.

प्रियलोकानों—वारीं जे सर्व धार्मिक व भक्तियुक्त स्वभाव धरून मान्य होतील त्यां सर्वांस ख्रिस्ताचा देह आणि रक्त यांचा समाधानक संस्कार देवाचे साहाय्यानें द्यायास मी संकल्प करितों आहें ख्रिस्ताचे ज्या पुण्यसाधक दुःखानें व मरणेंकडून आम्ही पापांची क्षमा पावतों आणि आकाशाचे राज्याचे योग्य विभागी होतों त्यांचे स्मरणासाठीं हा संस्कार घ्यावयाचा आहे यास्तव ज्या सर्वसमर्थ देवानें आमचे दिव्य बापानें आपला पुत्र येशू ख्रिस्त आमचा तारणारा दिला आहे आह्मासाठीं मरण पावायास मात्र असें नव्हे पण या संस्कारांत आमचें आत्मिक पोषण व जीविका होण्यासहि त्याला फार नम्र व हृद्य उपकारस्तुति करायास आह्मास योग्य आहे हा संस्कार जे योग्यतः घेतात त्यांस हा दिव्य आणि समाधानकारक होतो पण धैर्य धरून जे यास अयोग्यतः घेतात त्यांला हा अपकारक होतो याजकरितां तुम्हीं या रहस्याची अर्हता व याचे अयोग्य घेण्याचें जोखीम ध्यानांत आणावें म्हणून मला आतां तुम्हाला संबोध करावा लागतो आणि सरासरी किंवा जे देवाशीं ढोंग करितात त्यांप्रमाणें नका पण तुम्ही आपले अंतःकरणाची झडती

व परीक्षा अशी करा कीं तुह्मी पवित्र व स्वच्छ असतांना व देवानें पवित्र लेखांत नेमिलेलें जें वस्त्र तें धारण केलें असतांना अशा दिव्य भोजनास येऊन या पवित्र मेजाचे योग्य सहभागी असे घेतले जावे

याविषयीं रीति व साधनें अशींच आहेत पहिलें देवाचे आज्ञांचे प्रमाणेंकरून आपली वर्त्तणूक व आपलें आचरण हीं पारखावीं आणि ज्यांविषयीं इच्छेनें शब्दानें अथवा कामानें आपण दोषी झालों आहों ह्मणून समजाल तेव्हां पापिष्ठपणाविषयीं फार शोक करून व देवाजवळ पापांचा अंगीकार करून पुढें आपलें आचरण शुद्ध राखायास पुरता संकल्प करावा व देवाचे मात्र आपण अपराध केले असें नव्हे पण आपले शेजाऱ्यांचेहि अपराध केले आहेत असें जर समजाल तर त्यांचा व आपला तुम्ही समेट करा आणि ज्या कोणाचाहि तुम्हीं कांहीं अन्याय अथवा अपराध केला असेल त्यांचें आपले सामर्थ्याप्रमाणें परिमार्जन करायाला मान्य व्हा आणि जशी तुह्मीं आपले अपराधांची क्षमा देवापासून पावायास इच्छितां तशी जे तुमचे अपराधी आहेत त्यांची क्षमा करायास मान्य व्हा नाहीं तर हा पवित्र संस्कार घेतल्यावर तुम्ही केवळ अधिक दंडास योग्य व्हाल यास्तव जर तुह्मांतला कोणी देवाचें नाम व्यर्थ घेणारा अथवा त्याचे गोष्टीचा विरोधक किंवा निंदक अथवा जारकर्मी अथवा द्रोह मत्सर अथवा कोणतेंहि दुसरें दुष्कर्म करणारा आहे तर तुम्ही प्रत्येक आपले पापांचा पश्चात्ताप



करा नाहीं तर या पवित्र मेजाजवळ येऊं नका असें नव्हावें कीं तुम्हीं हा संस्कार घेतल्यावर जसा यूदासांत सैतान शिरला तसा तुह्मांत शिरेल आणि तुम्हाला सर्व दुर्गुणानीं भरील आणि तुमचे देहाचा व जीवात्म्याचा सत्य नाश करील

अणखीं अगत्य आहे कीं देवावर पुरता भाव ठेविल्या वांचून व शांत अंतःकरणावांचून कोणी हा पवित्र संस्कार घेऊं नये यास्तव या साधनानें आपलें अंतःकरण शांत करायास समर्थ नाहीं आणि अधिक सांत्वन व संबोध पावायास इच्छितो असा जर कोणी तुम्हामधील आहे तर त्यानें मजपाशीं येऊन अथवा देवाचे गोष्टीचे दुसरे कोणतेहि बुद्धिवान व विद्वान उपदेशकापाशीं जाऊन आपला खेद व संशय सांगावा अशासाठीं कीं देवाचे गोष्टीचे उपचारेंकडून त्याला क्षमेचा उपकार प्राप्त व्हावा आणि त्यानें सर्व शंका व संशय दूर करून आपलें अंतःकरण शांत करावें म्हणून आत्मिक संबोध आणि उपदेश ऐकून घ्यावा

पवित्र सह्वायलास येण्याविषयीं लोक उदासीन आहेत असें जर आचार्य पाहील तर त्यानें मागले उपदेशाबद्दल हा पुढला उपदेश सांगावा

प्रिय भाव्वानों—वारीं देवाचे कृपेनें प्रभूचे रात्रिभोजनाचें अनुष्ठान करायला मी संकल्पितों त्याला जे तुह्मी इथें विद्यमान आहां त्यां तुम्हा सर्वांला मी देवाचे नामानें बलावितों आणि प्रभु येशू ख्रिस्ताकरितां तुह्मास विनवितों कीं तुम्हाला देवानें प्रियतः बलाविलें असतां त्याजकडे याव

यास तुम्हीं अमान्य नसावें जेव्हां कोणेकानें चांगलें भोजन सिद्ध केलें आहे आणि सर्व प्रकारचे उत्तम पदार्थांनीं आपलें मेज सुशोभित केलें आहे एथपर्यंत कीं जे बोलाविले ते बसावे इतकेंच उणें आहे तथापि बोलाविलेले जे आहेत ते कांहीं कारण नसतां फार कृतघ्नता करून याव यास अमान्य होतात हें केवढें खेदकारक व अप्रिय आहे तुम्ही समजतां अशावरून कोणता तुह्मामध्यें खिन्न नहोईल फार अनिष्ट व अन्याय आपल्यास प्राप्त झाला आहे असें कोणास न वाटेल यास्तव ख्रिस्तासंबंधी परम प्रियानों या पवित्र भोजनापासून तुह्मी दूर राहून आपल्यावर देवाचा क्रोध उत्तेजित न करावा म्हणून फार सावध व्हा मी संसाराचे उद्योगांत गुंतलेलों आहें यास्तव पवित्र सह्वायल मी करणार नाहीं असें म्हणणें कोणालाहि सोपें आहे पण असलीं निमित्तें देवापाशीं मान्य केलीं जात नाहींत मी फार पापी आहें ह्मणून यावयास भितों असें जर कोणी म्हणेल तर तुम्ही पश्चात्ताप करून कां शुद्ध होत नाहीं जेव्हां देव तुह्मास बलावितो तेव्हां आम्ही येणार नाहीं असें ह्मणायला तुह्माला लाज वाटत नाहीं काय तुम्हास जेव्हां देवाकडे फिरणें योग्य आहे तेव्हां तुम्ही निमित्त सांगून आह्मी सिद्ध नाहीं असें म्हणाल काय असलीं कल्पित निमित्तें कशीं देवापाशीं चालतील तुह्मी शुद्धपणें ध्यानांत आणा सुवार्त्तेंत जे भोजनाविषयीं अमान्य झाले ते असे कीं कित्येकांला शेताकडे जायचें होतें आणि कित्येकांला आपले



बैलांचे जोड्यांची परीक्षा करायाची होती व कित्येकांचें लग्न झालें होतें अशां निमित्तां करितां ते निर्दोष निघाले नाहीं पण दिव्य भोजनास अयोग्य असे मोजले गेले मीच सिद्ध होईन व मी आपले अधिकाराप्रमाणें देवाचे नामानें तुह्मास आमंत्रण देतों ख्रिस्ताकरितां मी तुम्हास बलावितों जर तुह्मी आपलें तारण इच्छितां तर तुह्मास मी उपदेशितों कीं या पवित्र सह्वायलाचे संभागी तुह्मी व्हा. आणि तुमचे तारणासाठीं जसा देवाचा पुत्र आपला जीव क्रूसावर द्यायास मान्य झाला तसा त्याचे आज्ञाप्रमाणें त्याचे मरणाचे स्मरणार्थ हा पवित्र संस्कार तुह्मास घ्यावा लागतो हें करायास जर तुह्मी चुकाल तर तुह्मी देवाचा केवढा मोठा अपराध करितां व याच करितां तुह्मी केवढे मोठे दंडास योग्य आहां हें तुम्ही ध्यानांत आणा जे तुम्ही स्वतंत्रपणें देवाचे मेजापासून दूर राहतां आणि जे तुमचे भाऊ ह्या दिव्य अन्नाचें भोजन घ्यायास येतात त्यांपासून विप्रयुक्त राहतां जर तुह्मीं यां गोष्टींचा विचार मन घालून कराल तर देवाचे कृपेनें तुमचें मन चांगलें होऊन फिरेल हें घडावें ह्मणून सर्व समर्थ देव जो आमचा दिव्य बाप त्याजपाशीं आह्मी विनंती करितांना राहणार नाहीं

सह्वायलाचें अनुष्ठान करित्येवेळेस संस्कार घेणारे पवित्र संस्कार घ्यायासाठीं नीट बसले असतां आचार्यानें हा उपदेश सांगावा.

प्रभुसंबंधी प्रियानों जे तुह्मी आमचे तारणारे ख्रिस्ताचा देह व रक्त यांचे पवित्र सह्वायलाला यावयास मान्य आहां

ते तुह्मी ध्यानांत आणा कसें पाऊलस साधु सर्वांस ही भाकर खायास अथवा हा प्याला प्यायास धैर्यवान होतील त्यापूर्वीं आपली परीक्षा मन घालून करायासाठीं उपदेश करितो कांकीं जसें मोठें फल होतें जर आम्ही अनुतापी मनानें आणि खरे विश्वासानें हा पवित्र संस्कार घेतों (कारणकीं तेव्हां आम्ही आत्मिकाप्रमाणें ख्रिस्ताचा देह खातों आणि त्याचें रक्त पितों तेव्हां आम्ही ख्रिस्तामध्यें राहतों आणि ख्रिस्त आम्हामध्यें राहतो आम्ही ख्रिस्ताशीं एकच आहों आणि ख्रिस्त आम्हाशीं एकच आहे) तसें हाच जर आम्ही अयोग्यत: घेतों तर मोठें जोखीम आहे कारण कीं तेणेंकरून आमचे तारणारे ख्रिस्ताचा देह व रक्त यांविषयीं आम्ही दोषी होतों आम्ही प्रभूचा देह ध्यानांत न आणून आपला दंड खातों आणि पितों आम्ही आपल्यावर देवाचा क्रोध चेतवितों आम्हास विविध रोगानीं व नाना प्रकारचे मरणानें पीडायास त्याला आम्ही उत्तेजित करितों यास्तव भाव्वानों तुम्ही आपली परीक्षा करा म्हणजे देवाकडून तुमची शिक्षा केली जाणार नाहीं तुम्ही आपले घडलेले पापांचा खरा पश्चत्ताप करा आमचे तारणारे ख्रिस्तावर सत्य व स्थिर विश्वास ठेवा आपलें आचरण शुद्ध करून सर्व मनुष्यांशीं पूर्ण प्रीतीनें वर्त्ता येणेंकरूनच तुह्मी यां पवित्र रहस्यांचे योग्य संभागी व्हाल आणि विशेषेंकरून देवाला म्हणजे बापाला पुत्राला आणि पवित्र आत्म्याला आमचा तारणारा ख्रिस्त जो देव आणि



मनुष्य मिळून एकच आहे त्याचें दु:ख व मरण यांकडून जें जगाचें तारण झालें आहे त्याविषयीं तुह्मी नम्र व हृद्य उपकारस्तुति करा आह्मा दीन पाप्यांकरितां ज्यानें आपल्यास क्रूसाचे मरणापर्यंत नम्र स्थितीचें केलें जो अंधारांत व मृत्युप्राय छायेंत राहिला अशासाठीं कीं त्यानें आह्मास देवाचीं लेंकरें करावें आणि सनातन जीवनांत उंचावावें आणि आमचा प्रभु व एकच तारणारा येशू ख्रिस्त आह्माकरितां मरण पावला त्याची अत्यंत प्रीति व त्यानें आपलें रक्त पाडून जे असंख्य उपकार आह्मासाठीं मेळविले आहेत त्यांचें स्मरण आह्मीं सर्वदां करावें म्हणून त्यानें पवित्र रहस्यें नेमिलेलीं व स्थापिलेलीं आहेत तीं त्याचे प्रीतीचीं प्रतिदेयें आहेत व आमचें मोठें व अनंत समाधान करायाला त्याचे मरणाचे निरंतर स्मरणासाठीं आहेत यास्तव त्याची व बापाची व पवित्र आत्म्याची आह्मीं (जसें आम्हाला परम योग्यच आहे) नित्य उपकारस्तुति करावी आणि त्याचे पवित्र इच्छेस व मनोदयास अनुकूल असतां आमचे आयुष्याचे सर्व दिवसांत खरी पवित्रता व न्याय यांकडून त्याची सेवा करायास झटावें आमेन

पवित्र सहायल घ्यायास आले आहेत त्यांस आचार्यानें सांगावें.

जे तुह्मी आपले पापांविषयीं खरेपणें व मनापासून अनुतापी आहां आणि आपले शेजाऱ्याशीं प्रीतीनें व दयेनें वर्त्ततां आणि देवाचे आज्ञांस अनुसरतांना व यापुढें त्याचे पवित्र मार्गांत चालतांना शुद्ध आचरण राखायास संकल्प करिता

ते तुह्मी विश्वासानें जवळ या आणि आपले समाधानासाठीं हा पवित्र संस्कार घ्या आणि नम्रतेनें आपले गुडघे टेंकून सर्वसमर्थ देवाजवळ तुम्ही आपला नम्र पापांगीकार करा

तेव्हां जे सब पवित्र सह्भायल घ्यायास मान्य आहेत त्यांचे नामानें हा सामान्य पापांगीकार आचार्यांनें सांगावा त्यानें व सर्व लोकांनीं नम्रतेनें आपले गुडघे टेंकून असें बोलावें.

हे सर्वसमर्थ देवा आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे बापा सर्व पदार्थांचे उत्पन्न करणाऱ्या सर्व मनुष्यांचे न्यायाधीशा जीं पापें व दुष्टपण बहुत वेळां तुझ्या प्रतिकूल कल्पनेनें व शब्दानें व कर्मेंकरून आह्मीं मोठे अपराधी होऊन तुझा परम न्यायी क्रोध व रोष आम्हावर चेतवून घडलेलीं आहेत त्यांजविषयीं आह्मी अंगीकार व शोक करितों आह्मी मनापासून पश्चात्ताप करितों त्यां दुष्कर्मांमुळें आह्मी आपले मनांत खिन्न आहों त्यांचें स्मरण आह्मांस खेदकारक आहे त्यांचा भार असह्य आहे हे परम दयाळो बापा आह्मावर दया कर आह्मावर दया कर तुझा पुत्र आमचा प्रभु येशू ख्रिस्त त्याचे कारणें आमचे सर्व घडलेले पापांची क्षमा कर आणि तुझे नामाचा सन्मान व गौरव व्हावें ह्मणून यानंतर नवे पवित्र आचरणाकडून तुझी सेवा व संतोष सर्वदा करायाला आम्हास दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

तेव्हां आचार्यानें अथवा एपिस्कोपसानें विद्यमान असून उभें राहावें आणि लोकांकडे वळून ही क्षमेची सूचना सांगावी.

ज्या सर्वसमर्थ देवानें आमचे दिव्य बापानें जे सर्व हृद



पश्चात्तापानें व सत्य विश्वासानें त्याजकडे फिरतात त्यां सर्वांला आपले परम कृपेंकरून पापांचे क्षमेचें वचन दिलें आहे त्यानें तुह्मावर दया करावी सर्व पापांपासून तुम्हास क्षमा विशिष्ट व मुक्त करावें सर्व सद्गुणानीं तुह्मास स्थिर व बलवान करावें आणि सनातन जीवनांत आणावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

तेव्हां आचार्यानें सांगावें.

आमचा तारणारा ख्रिस्त त्याजकडे जे फिरतात त्यां सर्वांला जीं सांत्वनकारक वाक्यें सांगतों तीं तुह्मी ऐका

जे तुम्ही कष्टी आणि भारानें पीडित आहां ते तुह्मी सर्व मजकडे या ह्मणजे मी तुह्मास विश्रांत करीन ※ मात्थी. ११. २८.

देवानें जगावर एवढी प्रीती केली कीं त्यानें आपला एकुलता पुत्र पाठवून दिला अशासाठीं कीं जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो तो नाशास नजावा पण त्याला सनातन जीवन प्राप्त व्हावें ※ योहान्न. ३ .१६.

जें पाऊलस साधु ह्मणतो तें हि ऐका.

हें वाक्य विश्वस्त व पूर्णत: मानायास योग्य आहे कीं पाप्यांस तारायासाठीं ख्रिस्त येशू जगांत आला ※. १ तिम. १. १५.

योहान्न साधुहि जें ह्मणतो तें ऐका

जर कोणी पाप करिता तर आम्हाला जो बापापाशीं येशू

ख्रिस्त न्यायवंत प्रतिनिधि आहे तोच आमचे पापांविषयीं क्षमाकारण आहे ॥ १ योह. २. १.

मग आचार्यानें सांगावें.

तुह्मी आपले मनोरथ उंचावा

उत्तर ॥ आह्मी आपले मनोरथ ईश्वराकडे उंचावितों

आचार्य ॥ आह्मी आपले ईश्वरा देवाची उपकारस्तुति करूं

उत्तर ॥ असें करायास योग्य व यथार्थच आहे

तेव्हां आचार्यानें प्रभूचे मेजाकडे वळून सांगावें.

परमयोग्य व यथार्थच आहे आणि आमचें अगत्य कार्य आहे कीं सर्व समयांत व स्थानांत हे ईश्वरा *पवित्र बापा सर्वसमर्थ व सनातन देवा आह्मी तुझी उपकारस्तुति करावी

इथें समयाप्रमाणें नियमित प्रस्तावना सांगावी जर कोणी विशेषें करून नेमिलेली आहे तर नाहीं तर हें ईश्वरस्तवन सांगावें.

यास्तव दूत आणि अधिदूत व आकाशांतील सर्व समुदाय यांचे संगतीं आह्मी तुझें गौरवी नाम स्तवितों व थोर ह्मणतों आणि आह्मी तुझी स्तुति करितांना नित्य ह्मणतों पवित्र पवित्र पवित्र ईश्वरा सैन्यांचे देवा आकाश आणि पृथ्वी तुझें गौरवानें भरलेलीं आहेत हे परात्पर ईश्वरा तुझें गौरव असावें आमेन

---

* ( पवित्रबापा ) हे शब्द त्रिकाचे आदित्यवारीं वर्जावे



नियमित प्रस्तावना.

ख्रिस्ताचे जन्मदिवसांत आणि त्यानंतर सात दिवसांत ही प्रस्तावना सांगावी.

त्वां आपला एकुलता पुत्र येशू ख्रिस्त आम्हासाठीं या समयानुसार जन्मला जायास दिला तो त्याची आई जी मारया कुमारी तीचे सत्वापासून पवित्र आत्म्याचे योगानें वास्तविक मनुष्य झाला आणि असा झाला असतां आम्हास सर्व पापापासून शुद्ध करायासाठीं तो अगदीं पापरहित होता

यास्तव दूत . . . . . . .

पुनरुत्थानाचे दिवसांत आणि त्यानंतर सात दिवसांत ही प्रस्तावना सांगावी.

पण तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे गौरवी पुनरुत्थानामुळें विशेषेंकरून आम्हास तुझी स्तुति करावी लागते कांकीं ज्या खरे वितरणाचे कोंकरानें आम्हासाठीं अर्पिलें जाऊन जगाचें पापहरण केलें आहे तें तोच आहे त्यानें आपल्या मरणेंकडून मृत्यूचा नाश केला आहे व आपले पुनरुत्थानेंकडून आम्हास सनातन जीवनांत परत आणिलें आहे

यास्तव दूत . . . . . . .

आरोहणाचे दिवसांत आणि त्यानंतर सात दिवसांत ही प्रस्तावना सांगावी.

तुझा परमप्रिय पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे

योगानें जो आपलें गौरवी पुनरुत्थान झाल्यावर आपले सर्व प्रेषितांस प्रादुर्भूत झाला आणि आह्मासाठीं जागा सिद्ध करायास त्यांचे देखतां आकाशांत चढला अशासाठीं कीं जेथें तो आहे तेथें आह्मींहि चढावें आणि त्याचे संगतीं गौरवांत राज्य करावें

यास्तव दूत . . . . . . .

पवित्रात्मावतरणाचे दिवसांत आणि त्यानंतर सात दिवसांत ही प्रस्तावना सांगावी.

येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें ज्या त्याचे परम सत्य वचनाप्रमाणें पवित्र आत्मा आकस्मिक मोठे शब्दसहित मोठे वाऱ्यासारिखा या समयानसार आकाशापासून उतरला आणि आग्नेय जिव्हांचें रूप धरून प्रेषितांला शिकवायाला व सर्व सत्याचा मार्ग दाखवायाला त्यांजवर आरूढ झाला त्यांजला त्यानें विविध भाषा बोलण्याची शक्ति दिली आणि त्यानीं सर्व लोकांस सुवार्त्ता गाजवून सांगावी ह्मणून धैर्य व संतप्त मनोरथ हे सद्गुण दिले त्यांचे योगानें आह्मी अंधारांतून व भ्रांतींतून तुझे व तुझा पुत्र येशू ख्रिस्त याचे स्पष्ट प्रकाशांत व सत्यज्ञानांत आणिलेले आहों

यास्तव दूत . . . . . . . .

त्रिकाचे दिवशीं मात्र ही प्रस्तावना सांगावी.

जो तूं एकच देव एकच ईश्वर आहेस केवळ एक जण नव्हे पण एकाच सत्वाचे तिघे जण कांकीं ज्याप्रमाणें बापाचे गौरवाविषयीं आह्मी विश्वासतों त्याप्रमाणेंच कांहीं भेद अथवा



अतुल्यता नसतां पुत्राविषयीं व पवित्र आत्म्याविषयीं आम्ही विश्वासतों

यास्तव दूत . . . . . . . .

तेव्हां आचार्यानें प्रभूचे मेजाजवळ गुडघे टेंकून जे सर्व सद्भायल घेणार आहेत त्यांचे नामानें ही प्रार्थना बोलावी.

हे दयाळो ईश्वरा आम्ही आपले पुण्यावर नाहीं पण तुझे परम कृपेवर भाव धरून ह्या तुझे मेजाजवळ यावयास धैर्यवान आहों तुझे मेजाखालचे चूर देखील वेंचून घ्यायास आम्ही योग्य नाहीं पण तूं तोच ईश्वर आहेस ज्याचा स्वभाव सदासर्वकाळ दयालु आहे यास्तव हे कृपाळो ईश्वरा तुझे पुत्र येशू ख्रिस्ताचें शरीर व त्याचें रक्त आह्मास असें खाऊं पिऊं दे कीं त्याचे शरीरानें आमचीं पापी शरीरें पवित्र व्हावीं व त्याचे परम अमूल्य रक्तेंकडून आमचे जीवात्मे स्वच्छ धुतले जावे आणि आह्मीं सर्वदा त्यांत रहात असून तो आह्मांत सर्वदा रहावा आमेन

आचार्यानें मेजापुढें उभें राहून भाकर व द्राक्षारस नीट ठेवून ही प्रतिष्ठापनाची प्रार्थना बोलावी.

हे सर्वसमर्थ देवा आमचे दिव्य बापा ज्या त्वां आपले परम कृपेनें आपला एकुलता पुत्र येशू ख्रिस्त आह्मास तारायासाठीं क्रूसावर मरण पावायास दिला त्यानें (आपलें एकच अर्पण एकदांच अर्पिल्यानें ) तेथें अवघे जगाचे पापासाठीं पूर्ण समापन्न व पुरता बलि अर्पण व प्रायश्चित्त केलें आणि तो परत येईपर्यंत त्याचे अमूल्य मरणाचें स्मरण

निरंतर रहावें म्हणून त्यानें विधि स्थापिला आणि तो विधि पाळायास आपले पवित्र सुवार्त्तेंत आह्माला आज्ञा दिली हे कृपाळो बापा आमचें ऐकावें ह्मणून तुला आम्ही फार नम्रपणें विनवितों आणि तुझा पुत्र आमचा तारणारा येशू ख्रिस्त याचे विधिप्रमाणें आह्मीं हे तुझे उत्पन्न केलेले पदार्थ भाकर व द्राक्षारस त्याचें दुःख व मरण यांचे स्मरणासाठीं घेऊन त्याचे परम सुवंदित शरीराचे व रक्ताचे संभागी व्हावें हें कृपा करून दे ज्यानें ज्या रात्रींत तो शत्रूचे हातीं दिला गेला त्याच रात्रींत (अ) भाकर घेतली आणि उपकारस्तुति करून (ब) मोडिली आणि आपले शिष्यांला दिली आणि ह्मटलें घ्या खा (क) हें माझें शरीर आहे जें तुम्हासाठीं दिलें आहे माझे स्मरणासाठीं तुम्ही हें करा याप्रमाणेंच रात्रिभोजन झाल्यावर त्यानें (द) प्याला घेतला आणि उपकारस्तुति करून त्यांला दिला आणि ह्मटलें तुह्मी सर्व यांतून प्या कांकीं हें (ए) माझें रक्त जें नवे संधेचें आहे जें तुह्मासाठीं व बहुतांसाठीं पापांची क्षमा व्हावी ह्मणून पाडिलें जातें हा प्याला जेव्हां कधीं तुह्मी प्याल तेव्हां माझे स्मरणासाठीं हें करा

---

(अ) इथें आचार्यानें आपले हातांत पात्र घ्यावें
(ब) इथें भाकर मोडावी.
(क) इथें त्यानें आपला हात सगळे भाकरीवर ठेवावा
(द) इथें त्यानें आपले हातांत प्याला घ्यावा
(ए) इथें त्यानें आपला हात द्राक्षारसाचे सर्व भांड्यांवर ठेवावा



तेव्हां आचार्यानें दोन्हीं प्रकारानीं स्वतां सहायल घ्यावें आणि त्यानंतर त्यानें एपिस्कोपस प्रस्बुतरस आणि द्याकोन यांस (जर कोणी विद्यमान आहेत तर) तें द्यावें लोकांसहि अनुक्रमानें त्यांचे हातांत द्यावें सर्व गुडघे टेंकलेले असतां व जेव्हां कोणाएकास आचार्य भाकर देतो तेव्हां त्यानें म्हणावें.

जें आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचें शरीर तुसाठीं दिलें होतें त्यानें तुझे शरीरास आणि जीवात्म्यास सनातन जीवनापर्यंत राखावें तुसाठीं जो ख्रिस्त मरण पावला त्याचे स्मरणासाठींहि घेऊन खा आणि त्याजपासून तूं आपले मनानें विश्वास व उपकारस्तुति यांकडून पोषण घे

आणि जो आचार्य अथवा द्याकोन कोणाएकास प्याला देतो त्यानें म्हणावें.

जें आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचें रक्त तुसाठीं पाडिलें होतें त्यानें तुझे शरीरास व जीवात्म्यास सनातन जीवनापर्यंत राखावें ख्रिस्ताचें रक्त तुझेसाठीं पाडिलें होतें त्याचे स्मरणासाठीं हा प्याला पी आणि उपकार मानीत जा

जर प्रतिष्ठापित भाकर आणि द्राक्षारस सर्वांनीं घेतल्यापूर्वीं संपतील तर आचार्यानें नेमिलेल्या रीतीप्रमाणें अणखी कांहींसें प्रतिष्ठापित करावें.

सर्वांनीं सहायल घेतल्यावर आचार्यानें प्रभूचे मेजाजवळ परत जाऊन प्रतिष्ठापित पदार्थांतलें जें उरलें असेल तें मेजावर सन्मान्यतः ठेवावें आणि त्याजवर पांढरें वस्त्र घालावें.

तेव्हां आचार्यानें प्रभूची प्रार्थना बोलावी लोकानींहि त्याचे मागें प्रत्येक वाक्य बोलावें.

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मनिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छे

प्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हाला दे जशी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास क्षमा कर आणि आह्मास परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आम्हाला तार कांकीं राज्य सामर्थ्य आणि गौरव हीं सनातनत: तुझींच आहेत आमेन

नंतर ही प्रार्थना बोलावी.

हे ईश्वरा आकाशांतील बापा हा आमचा स्तुतीचा आणि कृतज्ञतेचा यज्ञ त्वां मान्य करून घ्यावा ह्मणून आह्मी तुझे नम्र सेवक मनापासून तुला प्रार्थितों व फार नम्रपणें आह्मी तुला विनवितों कीं तुझा पुत्र येशू ख्रिस्त याचें पुण्य व मरण यांकडून व त्याचे रक्तावरचे विश्वासें कडून आह्मास व तुझे सर्व मंडळीस पापांचीं क्षमा व त्याचे दु:खसहानाचीं सर्व उत्तम फळें प्राप्त व्हावीं आणि हे ईश्वरा इथें आह्मी आपण आपले जीवात्मे व आपलीं शरीरें तुला योग्य पवित्र आणि जीवंत बलि व्हावयासाठीं अर्पितों व आह्मी तुला नम्रपणें विनवितों कीं जे आह्मी ह्या पवित्र सहायत्वाचे संभागी आहों ते आह्मी सर्व तुझे कृपेनें व तुझे दिव्य आशीर्वादानें परिपूर्ण व्हावें आणि जरीं आह्मी आपले बहुविध पापांमुळें तुला कांहीं यज्ञ अर्पायास योग्य नाहीं तरीं त्वां आमचें पुण्य न तोलून पण आमचे अपराधांची क्षमा करून हें आमचें अगत्य कृत्य व सेवन अंगीकारून घ्यावें म्हणून आह्मी तुला विनवितों येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें ज्या त्याकडून व



त्यासहवर्त्तमान पवित्र आत्म्यासहित हे सर्वसमर्थ बापा तुला सर्व आदर व गौरव सनातनत: असोत आमेन

अथवा ही बोलावी.

हे सर्वसमर्थ व निरंतर जीवित्या देवा ज्यां आम्हीं हीं पवित्र रहस्यें योग्यत: घेतलीं त्यां आम्हास तूं आपला पुत्र येशू ख्रिस्त आमचा तारणारा याचे अमूल्य शरीराचे व रक्ताचे आत्मिक अन्नानें कृपा करून पोषितोस म्हणून मनापासून आम्ही तुझी उपकारस्तुति करितों आणि तेणेंकरून तूं आम्हास निश्चित करितोस कीं आम्हावर तुझा प्रसाद व तुझी कृपा आहे आणि तुझे पुत्राचें जें राहस्यिक शरीर तुझे विश्वासु लोकांची आशीर्वादित मंडळी आहे तत्संयुक्त वास्तविक अवयव आह्मी आहों व तुझे प्रिय पुत्राचें अमूल्य दु:खसहन व मरण यांचे पुण्याकडून आम्ही आशेनें तुझे सनातन राज्याचे विभागी आहों याविषयींहि तूं आह्मास निश्चित करितोस आणि हे दिव्य बापा तुला आह्मी फार नम्रपणें विनवितों कीं तुझे कृपेनें असें आमचें साहाय्य करावें कीं आम्हीं सर्वदा त्या पवित्र संबंधांत रहावें आणि जीं सत्कर्में आम्हाला आचरायासाठीं त्वां नेमिलेलीं आहेत तीं आह्मीं करावीं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें ज्या त्याला व तुला व पवित्र आत्म्याला सर्व आदर व गौरव सनातनत: असोत आमेन

तेव्हां हें स्तवन बोलावें.

देवाला आकाशांत गौरव असावें पृथ्वीवर स्वास्थ्य मनुष्यां

मध्यें सुप्रीति असावी आह्मी तुला स्तवितों आह्मी तुझें सुवंदन करितों आम्ही तुला भजतों आम्ही तुला गौरवितों तुझे महा गौरवासाठीं आह्मी तुझी उपकारस्तुति करितों हे देवा दिव्य राजा देवा सर्वसमर्थ बापा

हे ईश्वरा एकुलते पुत्रा येशू ख्रिस्ता हे ईश्वरा देवा देवाचे कोंकरा बापाचे पुत्रा जो तूं जगाचें पापहरण करितोस तो आह्मावर दया कर जो तूं जगाचें पापहरण करितोस तो आह्मावर दया कर जो तूं जगाचें पापहरण करितोस तो आमची प्रार्थना अंगीकारून घे जो तूं देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला आहेस तो आह्मावर दया कर

कारण कीं तूं मात्र पवित्र आहेस तूं मात्र प्रभु आहेस हे ख्रिस्ता तूं मात्र पवित्र आत्म्यासहित देव जो बाप त्याचे गौरवांत परात्पर आहेस आमेन

जेव्हां आचार्यानें अथवा एपिस्कोपस जर विद्यमान आहे तर त्यानें हा आशीर्वाद सांगून लोकांस निरोप द्यावा.

देवाकडील जें समाधान सर्व बुद्धीहून वरचढ आहे त्यानें देवाचे व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याचे ज्ञानांत व प्रीतींत तुमचें हृदय व मन राखावें आणि सर्वसमर्थ देवाचा ह्मणजे बापाचा पुत्राचा आणि पवित्र आत्म्याचा आशीर्वाद तुह्मावर असावा आणि सर्वदा तुह्माशीं राहवा आमेन

जेव्हां सद्दायत्न नाहीं तेव्हां दानकर्म झाल्यावर पुढले प्रार्थना सारांशातील एक किंवा अधिक बोलावे आणि सकाळची किंवा संध्याकाळची



प्रार्थना सद्दायत्न अथवा विनंती यांचे प्रार्थनासारांश बोलल्यावर आचार्याचे विवेकाप्रमाणें हे बोलले तर बरें.

हे ईश्वरा जेव्हां आम्ही तुझी विनंती व प्रार्थना करितों तेव्हां कृपा करून आमचें साहाय्य कर आणि सनातन तारण प्राप्त व्हावयासाठीं तूं आपले सेवकांचा मार्ग नीट कर अशास कीं ह्या नश्वर आयुष्याचे सर्व विकारांत आणि आपदांमध्यें ते तुझ्या परम कृपाळु व त्वरित साहाय्यानें सर्वदा रक्षावे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे सर्वसमर्थ ईश्वरा व सनातन देवा आह्मी तुला विनवितों कीं त्वां आमचीं अंतःकरणें व शरीरें पवित्र करून तुझे नेमाचे मार्गांत आणि तुझे आज्ञांचे कर्मांत नीट वर्त्तावीं अशासाठीं कीं तुझे परमपराक्रमी संरक्षणेंकरून आह्मी देहाविषयीं व आत्म्याविषयीं आतां व सर्वदा संरक्षित व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु व तारणारा याचे योगानें आमेन

हे सर्वसमर्थ देवा आम्ही तुला विनवितों कीं ज्या गोष्टी आज आम्हीं आपले कानानीं ऐकिल्या आहेत त्या गोष्टी आमचे अंतःकरणांत अशा ठसाव्या कीं त्यांकडून आह्मीं तुझे नामाचा आदर व त्याची प्रशंसा व्हावयासाठीं उत्तम आचरणाचें फल द्यावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे ईश्वरा आमचे सर्व कर्मांत तूं आपले परमकृपालु प्रसादानें आमचे पुढें ये आणि आपले नित्य साहाय्यानें आह्मास प्रवृत्त कर अशासाठीं कीं आमचीं सर्व कर्में तुजशीं प्रारब्ध

प्रवृत्त आणि समाप्त असतां त्यांकडून आम्हीं तुझे नामाचें गौरव करावें आणि शेवटीं आम्हास तुझे कृपेनें सनातन जीवन प्राप्त व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे सर्वसमर्थ देवा सर्वज्ञानसागरा जो तूं आह्मी मागी तत्यापूर्वीं आमचीं अगत्यें जाणतोस व मागण्याविषयीं आमचें अज्ञान जाणतोस त्या तुला आह्मी विनवितों कीं आमचे अशक्ततेविषयीं कृपा करावी आणि जें जें आह्मी आपले अयोग्यतेमुळें मागायास धैर्यवान नाहीं व आपले अज्ञानामुळें मागायास समर्थ नाहीं तें तें तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योग्यतेमुळें कृपा करून आह्मास द्यावें आमेन

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां जे सर्व तुझे पुत्राचे नामानें मागतात त्यांच्या प्रार्थना ऐकायाचें वचन दिलें आहे ज्या आह्मीं आतां आपल्या प्रार्थना व विनंत्या तुजशीं केल्या आहेत त्यां आह्माकडे त्वां आपले कान लावावे ह्मणून आम्ही तुला विनवितों आणि जें जें आह्मीं विश्वास धरून तुझे इच्छेप्रमाणें मागीतलें आहे तें तें आमचीं अगत्यें पुरवायासाठीं आणि तुझें गौरव प्रकट करायासाठीं आह्मास प्राप्त व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

पवित्र सह्वायल समाप्त.



## बाळकांचा लौकिक बाप्तिस्मा करण्याची जी पद्धति सभामंदिरांत पाळायाची आहेती.

ज्या प्रत्येक पुरुषबालकाचा बाप्तिस्मा करायाचा आहे त्याला एक उपमाता व दोन उपपिते पाहिजेत आणि पत्येक स्त्रीबाळकाला दोन उपमाता व एक उपपिता पाहिजे.

आचार्यानें कुंडाजवळ उभें राहून पुसावें.

ह्या बालकाचा बाप्तिस्मा अजून झाला आहे किं नाहीं

जर आईबाप नाहीं असें म्हणतील तर आचार्यानें पुढील गोष्ट बोलत जावी.

प्रिय लोकानों सर्व मनुष्यें पापांत गर्भधारण व जन्म पावतात आणि आमच्या तारणाऱ्या ख्रिस्तानें सांगीतलें आहे कीं जो कोणी पाण्याकडून व पवित्र आत्म्याकडून नवें जन्म पावत नाहीं त्याच्यानें देवाचे राज्यांत शिरवत नाहीं यास्तव मी तुम्हास विनवितों कीं तुह्मीं आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून देव जो बाप याची प्रार्थना करावी कीं त्यानें आपले परम कृपेनें ह्या बालकाला जें प्रकृतीकडून पाववत नाहीं तें ह्याला द्यावें म्हणजे पाण्याकडून आणि पवित्र आत्म्याकडून तें बाप्तिस्मी व्हावें आणि ख्रिस्ताचे पवित्र मंडळींत घेतलें जावें आणि तिची एक जीवंत व्यक्ति असें व्हावें

तेव्हां आचार्यानें म्हणावें.

आपण प्रार्थना करूं.

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा ज्या त्वां आपले परम

कृपेनें नोहा व त्याचें कुटुंब पाण्यांत बुडण्यापासून पेटी रूप गलबतांत तारिलें आणि तुझे बाप्तिस्म्याची उपमा करितांना तुझे इस्रायल लोक तांबडे समुद्रांतून सुरक्षित नेले आणि तुझे प्रिय पुत्र येशू ख्रिस्ताचा जो यार्देन नदींत बाप्तिस्मा झाला त्याकडून पापाचे राहस्यिक धुण्याविषयीं पाणी पवित्र केलें त्या तुला आह्मी विनवितों कीं त्वां आपले अनंत दयेनें ह्या बालकावर कृपादृष्टि करावी त्याला धुवावें आणि पवित्र आत्म्याकडून पवित्र करावें अशासाठीं कीं तें तुझे क्रोधापासून तारिलेलें असतां ख्रिस्ताचे नौकारूप मंडळींत घेतलें जावें आणि तें विश्वासामध्यें स्थिर आशेंत आनंदित व प्रीतींत मूलस्थित असतां या कष्टकारक संसाराचे लहरींतून असें निभावून जावें कीं शेवटीं सनातन जीवनाचे स्थानास पोंचावें आणि तेथें सदासर्वकाळ त्यानें तुशीं राज्य करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे सर्वसमर्थ आणि अमर देवा जो तूं जे सर्व अगत्यवान आहेत त्यांचा साहाय्यकर्त्ता जे सर्व तुला शरण जातात त्यांचा संरक्षक जे विश्वास धरितात त्यांचा जीवनदायक आणि मेलेल्यांचा पुनरुत्थानकर्त्ता आहेस या बालका विषयीं आम्ही तुझी प्रार्थना करितों कीं हें तुझे पवित्र बाप्तिस्म्याकडे येऊन आत्मिक पुनर्जन्माकडून ह्याला आपल्या पापांची क्षमा प्राप्त व्हावी हे ईश्वरा ह्याला अंगीकारून घे जसें त्वां आपले प्रियपुत्राकडून वचन दिलें आहे कीं



मागा ह्मणजे तुम्हाला प्राप्त होईल शोधा मग तुह्माला सांपडेल दार ठोका ह्मणजे तुह्माला उघडलें जाईल तसें जे आह्मी आतां मागतों त्यां आह्मास दे जे आह्मी शोधितों त्यां आह्मास सांपडूं दे जे आह्मी दार ठोकितों त्यां आम्हास तें उघडूं दे अशासाठीं कीं ह्या बालकानें तुझे दिव्य धुण्याचा सनातन उपकार भोगावा आणि ख्रिस्त आमचा प्रभु याकडून ज्या सनातन राज्याचें वचन त्वां दिलें आहे त्यास पोंहचावें आमेन

तेव्हां लोक उभे रहावे आणि आचार्यानें सांगावें.

मार्कस साधूनें लिहिलेली जी सुवार्त्ता तिचे दहावे अध्यायांत तेरावे ओवींत जीं वाक्यें आहेत तीं ऐका

त्यानीं बाळकें त्याजवळ आणिलीं अशासाठीं कीं त्यानें त्यांला स्पर्शावें पण ज्यानीं तीं आणिलीं त्यांला शिष्य धमकावूं लागले तेव्हां येशूनें पाहून खिन्न होऊन त्यांला म्हटलें बालकांस मजवळ येऊं द्या व त्यांस निषेधूं नका कांकीं देवाचें राज्य अशांचें आहे मी तुह्मास खचीत सांगतों जो कोणी देवाचें राज्य बाळकावाणीं घेत नाहीं तो त्यांत जायाचा नाहीं मग त्यानें त्यांजला आपले उराशीं धरून त्यांजवर हात ठेविले आणि त्यांस आशीर्वाद दिला

ही सुवार्त्ता वाचिल्यावर हिचे वाक्यांवरून आचार्यानें हा उपदेश सांगावा.

प्रियांनो या सुवार्त्तेंत आमचे तारणाऱ्या ख्रिस्ताचीं वाक्यें

तुम्ही ऐकतां कीं त्यानें आपलेजवळ बाळकें आणावीं म्हणून आज्ञा दिली आणि जे त्यांला त्याजवळ येऊं देत नव्हते त्यांचें गर्हण त्यानें कसें केलें व त्यांचे निर्दोषपणास अनुसरायास कसा तो सर्वांस बोध करितो हेंहि तुम्ही ऐकिलें तुम्ही पाहतां कीं त्यानें आपले अभिनयानें व कामानें आपली प्रीति त्यांजवर दाखविली कांकीं त्यानें त्यांस आपले कवेंत घेऊन उराशीं धरिलें त्यांजवर त्यानें आपले हात ठेविले आणि त्यांस आशीर्वाद दिला यास्तव तुह्मीं संशय धरूं नका पण मनांत विश्वास धरा कीं हें बालकहि तो कृपा करून अंगीकारून घेईल आणि आपल्या दयेचे कवेंत त्याला घेऊन आलिंगील आणि याला सनातन जीवनाचा उपकार देऊन आपले सनातन राज्याचें विभागी करील यास्तव या बालकावरची आमचे दिव्य बापाची जी प्रीति त्याचे पुत्र येशू ख्रिस्तानें प्रकट केली तिजविषयीं आह्मी निश्चित असतां व आम्ही हें बालक त्याचे पवित्र बाप्तिस्म्याकडे आणीत असतां तो या आमचे दयेचे कामाविषयीं मान्य आहे याचा आम्ही कांहीं संशय धरीत नसतां विश्वास व भक्ति यांकडून त्याची उपकारस्तुति करीत म्हणूं

हे सर्वसमर्थ व सनातन देवा आकाशांतील बापा तुझे कृपेचे ज्ञानांत आणि तुजवरचे विश्वासांत त्वां प्रसादेंकरून आम्हाला बलावून आणिलें आहे म्हणून आह्मी नम्रपणें तुझी उपकारस्तुति करितों आमचे मनांत सर्वदा हें ज्ञान वाढीव आणि हा विश्वास स्थिर कर या बालकाचें पुनर्जन्म व्हावें आणि हें सनातन तारणाचें विभागी व्हावें म्हणून याला तूं आपला पवित्र आत्मा दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आतां व सर्वदा आहे आणि राज्य करितो आमेन



तेव्हां उपपिते व उपमाता यांस आचार्यानें सांगावें.

प्रियांनो या बालकाचा बाप्तिस्मा करावा म्हणून याला तुम्ही इथें आणिलें आमचे प्रभु येशू ख्रिस्तानें हें अंगीकारून घ्यावें पापापासून मुक्त करावें पवित्र आत्म्याकडून पवित्र करावें आणि आकाशाचें राज्य व सनातन जीवन याला द्यावें ह्मणून तुह्मी प्रार्थना केली आहे व तुह्मीं ऐकिलें आहे कीं जें सर्व तुह्मीं प्रार्थना करून मागीतलें तें सर्व द्यायास आमचे प्रभु येशू ख्रिस्तानें आपले सुवार्तेंत वचन दिलें आहे तें वचन तोच सतां निश्चयें राखील आणि खरें करील यास्तव ख्रिस्ताचे या वचनाप्रमाणें या बालकानेंहि जे तुम्ही याचे प्रतिभु आहां त्यां तुह्माकडून [योग्य आयुष्यास पोंहचेपर्यंत] वचन द्यावें कीं सैतान आणि त्याचीं सर्व कर्में सोडून देईन आणि देवाची पवित्र गोष्ट सर्वदा विश्वासेन आणि त्याचे आज्ञाप्रमाणें नम्रपणें वर्त्तेन

यास्तव मी तुम्हास प्रत्येकास विचारतों

तूं या बालकाचे नामानें सैतान आणि त्याचीं सर्व कामें संसाराची व्यर्थ शोभा व त्याचें वैभव व त्याच्या सर्व लोभिष्ट

इच्छा आणि देहाच्या कामी इच्छा अशा नाकारितोस कीं तूं त्यांस अनुसरणार नाहींस आणि त्यानीं जिंकिला जाणार नाहींस किं काय

उत्तर ॥ मी त्यां सर्वांस नाकारून टाकितों

आचार्यानें विचारावें.

देव जो सर्वसमर्थ बाप आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा त्याविषयीं तूं विश्वास धरितोस किं काय

आणि त्याचा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो पवित्र आत्म्याचे योगेंकरून गर्भरूप झाला मारया जी कुमारी तिजकडून जन्मला पोंत्यस पिलातसाचे अधिकारांखालीं ज्यानें दुःखसहन केलें जो क्रुसावर बसविला गेला मरण पावला आणि पुरला गेला जो मृत्युलोकांत गेला तिसरे दिवशीं पुनः जीवंत होऊन मेलेल्यांमधून उठला आकाशांत चढला आणि सर्वसमर्थ देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला तेथून जीवंत व मेलेले यांची न्यायाधीशी करायला येणार आहे त्याचा विश्वास धरितोस काय

पवित्र आत्मा जी एकच पवित्र मंडळी पवित्र मनुष्यांचें सहायत्व पापांची क्षमा देहाचें पुनरुत्थान आणि सनातन जीवन यांचा तूं विश्वास धरितोस काय

उत्तर ॥ या सर्वांचा विश्वास मी धरितों

आचार्यानें विचारावें.

प्रश्न ॥ हा विश्वास धरून तूं बाप्तिस्मा घेशील काय

उत्तर ॥ तशीच माझी इच्छा आहे



आचार्यानें विचारावें.

प्रश्न ॥ तर तूं देवाची इच्छा मानिशील आणि त्याच्या आज्ञा मान्यतः पाळिशील आणि त्यांप्रमाणें तूं आपले आयुष्याचे सर्व दिवसांत वर्त्तशील काय

उत्तर ॥ तसेंच मी इच्छितों

तेव्हां आचार्यानें बोलावें.

हे दयाळो देवा या बाळकांतला जुना आदाम असा पुरिला जावा कीं याजमध्यें नवें मनुष्यपण उत्पन्न करावें आमेन

यांतल्या सर्व कामी इच्छा मरून जाव्या आणि याजमध्यें आत्मिक सर्व उत्तम अर्थ रहावे आणि वाढावे आमेन

हा विजय पावावा आणि सैतानावर संसारावर व इंद्रियांवर यानें जयोत्साह करावा ह्मणून कृपा करून याला सामर्थ्य दे आमेन

जें जें इथें आमचे कर्मानें व सेवेनें तुला प्रतिष्ठित केलें जातें तें तें दिव्य सद्गुणानीं संपन्न करावें, आणि तुझे इथें करून सनातनतः उपकारित व्हावें हे सुवंदितं ईश्वरा देवा जो तूं सदासर्वकाळ आहेस आणि विश्वाचें राज्य करितोस आमेन

हे सर्वसमर्थ व निरंतर जीवित्या देवा ज्या तुझे प्रियपुत्र येशू ख्रिस्तानें मनुष्यांचे पापांची क्षमा व्हावी ह्मणून आपले कुक्षींतून पाणी व रक्त दोन्हीं पाडिलीं जाऊं दिलीं आणि

आपले शिष्यांस आज्ञा दिली कीं तुह्मीं जाऊन सर्व लोकांस शिकवावें आणि बापाचे व पुत्राचे व पवित्र आत्म्याचे नामानें त्यांला बाप्तिस्मा द्यावा आह्मी तुला विनवितों कीं त्वां आपले मंडळीच्या विनंत्या ऐकाव्या पापाचे राहस्यिक धुण्यासाठीं हें पाणी पवित्र करावें आणि याकडून ज्या बाळकाचा बाप्तिस्मा आतां होणार आहे याला तुझी पूर्ण कृपा प्राप्त व्हावी आणि तुझे विश्वासु व निवडलेले लेंकरांमध्यें हें सर्वदा रहावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

तेव्हां आचार्यानें आपले हातांत बालक घेऊन उपपिते व उपमाता यांस सांगावें.

तुम्ही या बालकाचें नाम ठेवा

तेव्हां आचार्यानें तदनुसार बाळाचें नाम ठेवून सावधपणें त्याजवर पाणी ओतून अथवा शिंपून सांगावें.

बापाचे आणि पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नामानें मी तुझा बाप्तिस्मा करितों आमेन

तेव्हां आचार्यानें सांगावें.

हें बालक आह्मी ख्रिस्ताचे मंडळींत घेतों (*) आणि क्रूसाचे चिन्हानें याला चिन्हांकित करितों यावरून असें समजावें कीं यापुढें क्रूसावर चढविलेले ख्रिस्ताचा विश्वास अंगी कारायास आणि त्याचे ध्वजाखालीं पराक्रमानें पाप प्रपंच

(*) इथें आचार्यानें बालकाचे कपाळावर क्रूसाचें चिन्ह करावें.



आणि सैतान यांचे प्रतिकूल युद्ध करायास व याचें आयुष्य संपेपर्यंत ख्रिस्ताचा विश्वासु सैनिक व सेवक टिकायास हें लज्जित होणार नाहीं आमेन

तेव्हां आचार्यानें सांगावें.

प्रियानों या बालकाचें पुनर्जन्म झालें आहे व हें ख्रिस्ताचे मंडळीशीं संप्रयुक्त झालें आहे यास्तव आह्मीं या उपकारांमुळें सर्वसमर्थ देवाची उपकारस्तुति करावी आणि याप्रारंभाप्रमाणें ह्या बालकानें आपलें सारें उरलें आयुष्य सरेपर्यंत वर्त्तावें ह्मणून एकचित्तानें आह्मीं देवाची प्रार्थना करावी

तेव्हां सर्वांनीं गुडघे टेंकून बोलावें.

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हास दे जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आह्मास क्षमा कर आणि आह्माला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्माला तार आमेन

तेव्हां आचार्यानें बोलावें

हे परमदयाळो बापा त्वां कृपेंकरून आपले पवित्र आत्म्याकडून या बालकाचें पुनर्जन्म घडविलें हें तुझेंच लेंकरूं व्हावें ह्मणून याला त्वां आदत्तपुत्रत्वानें घेतलें आणि आपले पवित्र मंडळीशीं संप्रयुक्त केलें आहे यास्तव मनापासून आह्मी तुझी उपकारस्तुति करितों व तुला आह्मी नम्रपणें विन

वितों कीं त्यानें पापाविषयीं मृत आणि न्यायाविषयीं जीवंत होऊन व ख्रिस्तासहवर्त्तमान त्याचे मरणांत पुरिलेल्या प्रमाणें होऊन जुनें मनुष्य क्रूसाचे मरणीं मारून टाकावें आणि पापाचा सर्व भार नाहींसा करावा आणि जसें हें ख्रिस्ताचे मरणाचें संभागी झालें आहे तसें त्याचे पुनरुत्थानाचेंहि संभागी व्हावें अशासाठीं कीं शेवटीं तुझे अवघे पवित्र मंडळीसहवर्त्तमान तुझे सनातन राज्याचें विभागी व्हावें ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

तेव्हां सर्व उभे राहून आचार्यानें उपमाता व उपपिते यांस हा उपदेश सांगावा.

या बालकानें जे तुह्मी याचे प्रतिभू आहां त्यां तुह्माकडून सैतान व त्याचीं सर्व कामें नाकारून टाकायास देवावर भाव ठेवायास व त्याची सेवा करायाला वचन दिलें आहे यास्तव तुह्माला स्मरावें लागतें कीं या बालकाला शिकतां येईल तेव्हां केवढा भारी नवस वचन आणि प्रदर्शन यानें तुह्माकडून इथें केलें आहे हें याला शिकवावें म्हणून पाहणें तुमचें अगत्य कार्यच आहे आणि हे अर्थ उत्तम प्रकारें याला समजावे ह्मणून तुह्मी याला आचार्यांचा उपदेश ऐकायाला संबोध करा पण विशेषेंकरून तुह्मी चौकशी करून पहा कीं यानें मतांगीकार प्रभूची प्रार्थना आणि दहा आज्ञा शिकाव्या आणि ख्रिस्ती माणसाला तारणाविषयीं जें जें जाणावें लागतें तें तें यानें शिकावें ह्मणून चौकशी करून पहा आणि या बालकानें भक्तियुक्त ख्रिस्ती आचरण राखावें



ह्मणून याचा उत्तम सांभाळ करवायासाठीं तुह्मी चिंता बाळगीत जा आणि सर्वदा स्मरण करा कीं बाप्तिस्मा आमचे धर्माची उपमा देतो तो धर्म ह्मणजे आमचे तारणारे ख्रिस्ताचे आचरणास अनुसरणें आणि त्यासारिखें होणें जसा आह्माकरितां तो मेला आणि पुनः जीवंत होऊन उठला तसें जे आह्मी बाप्तिस्मा पावलों ते आह्मीं पापाविषयीं मरावें आणि न्यायाविषयीं उठावें सर्वदा आपल्या दुष्ट इच्छा मारून टाकितांना आणि सर्व सद्गुण व भक्तियुक्त आचरण यांत नित्य वाढतांना

तेव्हां आचार्यानें आणखीं सांगावें.

आणि तुह्मी चौकशीकरून पहा कीं हें बालक मतांगीकार प्रभूची प्रार्थना आणि दहा आज्ञा यांचा पाठ समाप्त करील आणि मंडळीचे प्रश्नोत्तरावलीची आणखी अधिक शिक्षा पावेल तेव्हां स्थिरकरण घ्यायासाठीं एपिस्कोपसा जवळ आणावें

समाप्त.

## बालकांचा बाप्तिस्मा करण्याची जी पद्धति घरांत पाळायाची आहे ती.

जेव्हां बाप्तिस्मा अगत्य कारणास्तव घरांत केला पाहिजे तेव्हां आचार्यानें व जे विद्यमान आहेत त्यानीं प्रभूची प्रार्थना आणि मागले पद्धतींचे कित्येक प्रार्थनासारांश बोलावे मग बालकांचें नाम ठेविल्यावर आचार्यानें त्याजवर पाणी ओतून हें बोलून त्याचा बाप्तिस्मा करावा.

**बापाचे आणि पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नामानें मी तुझा बाप्तिस्मा करितों आमेन**

तेव्हां सर्वांनीं गुडघे टेंकून आचार्यानें देवाची उपकारस्तुति करीत बोलावें.

**हे परमकृपाळो बापा त्वां कृपेंकरून आपले पवित्र आत्म्याकडून या बालकाचें पुनर्जन्म घडविलें हें तुझेंच लेंकरूं व्हावें म्हणून याजला त्वां आदत्तपुत्रत्वानें घेतलें आणि आपले पवित्र मंडळीशीं संप्रयुक्त केलें आहे यास्तव मना पासून आम्ही तुझी उपकारस्तुति करितों व तुला आम्ही नम्रपणें विनवितों कीं जसें हें ख्रिस्ताचे मरणाचें संभागी झालें आहे तसें त्याचे पुनरुत्थानाचेंहि संभागी व्हावें अशासाठीं कीं शेवटीं तुझे अवघे पवित्र मंडळीसहवर्त्तमान तुझे सनातन राज्याचें विभागी व्हावें ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन**

ज्या बालकाचा बाप्तिस्मा याप्रमाणें झाला आहे तें जर वांचेल तर सभामंदिरांत आणावें अशासाठीं कीं आचार्यानें सभेस निश्चित करावें



कीं या बालकाचा बाप्तिस्मा खऱ्यारीतीप्रमाणें केला होता तेव्हां त्यानें असें सांगावें कीं.

**तुम्हास मी निश्चित करितों कीं मंडळीचे योग्य आणि नेमिलेले रीतीप्रमाणें अमुक वेळेस व अमुक स्थानांत कित्येक साक्ष्यांचे देखतां या बालकाचा बाप्तिस्मा म्यां केला**

पण कोणी दुसरे योग्य आचार्यानें बालकाचा बाप्तिस्मा केला असला तर ज्या गांवांत बालक जन्म किंवा बाप्तिस्मा पावलें तेथल्या आचार्यानें त्या बालकाचा बाप्तिस्मा खऱ्यारीतीप्रमाणें झाला किं नाहीं म्हणून शोध करावा असें असतां जे लोक कोणेक बाळक सभामंदिरांत आणितात ते जर सांगतात कीं या बालकाचा बाप्तिस्मा झाला आहे तर आचार्यानें त्याची झडती करीत बोलावें.

**या बालकाचा बाप्तिस्मा कोणी केला**

**या बालकाचा बाप्तिस्मा झाला तेव्हां कोण विद्यमान होते अशे संकटसमयीं भयानें अथवा उतावळीनें या संस्काराचे कित्येक अगत्य अर्थ चुकले असतील यास्तव तुम्हास मी अणखीं विचारितों कीं**

**कोणत्या पदार्थाकडून या बाळकाचा बाप्तिस्मा झाला**

**कोणत्या शब्दानीं या बालकाचा बाप्तिस्मा झाला**

मग ज्या लोकानीं बालक आणिलें त्यांचे उत्तरांवरून जर आचार्य समजेल कीं हें सारें रीतीप्रमाणें आहे तर त्यानें त्या बालकाचा बाप्तिस्मा पुन्हां करूं नये पण त्याला खऱ्या ख्रिस्ती मंडळींत घ्यावें आणि हें सांगावें.

**तुम्हास मी निश्चित करितों कीं या बालकाचा बाप्तिस्मा शुद्ध रीतीप्रमाणें झाला आहे हें पापांत व देवाचे क्रोधा खालीं जन्मलें असतांहि आतां बाप्तिस्म्यांतले पुनर्जन्माचे क्षालनेंकडून देवाचीं लेंकरें आणि सनातन जीवनाचे विभागी**

यांचे मंडळींत घेतलें आहे कांकीं आमचा प्रभु येशू ख्रिस्त अशे बालकांवर आपली दया व कृपा करायास अमान्य होत नाहीं पण फार प्रीतीनें त्यांस आपल्याजवळ बलावितो जशी पवित्र सुवार्त्ता आमचे समाधानासाठीं साक्ष देत्ये कीं

मार्कस १०. १३.

त्यानीं बाळकें त्याजवळ आणिलीं अशासाठीं कीं त्यानें त्यांला स्पर्शावें पण ज्यानीं तीं आणिलीं त्यांला शिष्य धमकावूं लागले तेव्हां येशूनें पाहून खिन्न होऊन त्यांस म्हटलें बालकांला मजवळ येऊं द्या आणि त्यांस निषेधूं नका कां कीं देवाचें राज्य अशांचें आहे मी तुह्मास खचीत सांगतों जो कोणी देवाचें राज्य बालकासारिखें घेत नाहीं तो त्यांत जायाचा नाहीं नंतर त्यानें त्यांला आपले उराशी धरून त्यांजवर हात ठेविले आणि त्यांला आशीर्वाद दिला

ही सुवर्त्ता वाचल्यावर हिचे वाक्यांवरून आचार्यानें हा उपदेश सांगावा.

प्रियानों या सुवार्त्तेंत आमचे तारणाऱ्या ख्रिस्ताचीं वाक्यें तुह्मी ऐकतां कीं त्यानें आपल्याजवळ बालकें आणावी ह्मणून आज्ञा दिली आणि जे तीं त्याजवळ घेऊं देत नव्हते त्यांचें त्यानें गर्हण कसें केलें व त्याचें निर्दोषपणास अनुसरायास कसा तो सर्वांस बोध करितो हेंहि तुम्हीं ऐकिलें तुह्मी पाहातां कीं त्यानें आपले अभिनयानें व कामानें आपली प्रीति त्यांजवर दाखविली कांकीं त्यानें त्यांला आपले कवेंत घेऊन उराशीं धरिलें त्यांजवर त्यानें



आपले हात ठेविले आणि त्यांस आशीर्वाद दिला यास्तव तुम्ही संशय धरूं नका पण मनांत विश्वास धरा हें बालकहि तो कृपा करून घेईल आणि आपले दयेचे कवेंत घेऊन आलिंगील आणि याला सनातन जीवनाचा उपकार देऊन आपले सनातन राज्याचें विभागी करील यास्तव या बालकावरची आमचे दिव्य बापाची जी प्रीती त्याचे पुत्र येशू ख्रिस्तानें प्रकट केली तिजविषयीं आह्मी निश्चित असतां व हें बालक आम्ही त्याचे पवित्र बाप्तिस्म्याकडे आणीत असतां तो ह्या आमचे दयेचे कामाविषयीं मान्य आहे याचा आह्मी कांहीं संशय धरीत नसतां विश्वास व भक्ति यांकडून त्याची उपकारस्तुति करीत जी प्रार्थना प्रभूनें स्वतां आह्मास शिकविली ती बोलूं

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्माला दे जशी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तू आह्मास क्षमा कर आणि आह्माला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्माला तार आमेन

हे सर्वसमर्थ व सनातन देवा आकाशांतील बापा तुझे कृपेचे ज्ञानांत आणि तुजवरचे विश्वासांत त्वां प्रसादेंकरून आह्मास बलावून आणिलें आहे ह्मणून आम्ही नम्रपणें तुझी उपकारस्तुति करितों आमचे मनांत सर्वदा हें ज्ञान वाढीव आणि हा विश्वास स्थिर कर या बालकाचें

पुनर्जन्म व्हावें व हें सनातन तारणाचें विभागी व्हावें म्हणून त्याला तूं आपला पवित्र आत्मा दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सह वर्त्तमान आतां व सर्वदा आहे आणि राज्य करिता आमेन

तेव्हां आचार्यानें बाळकाचें नाम पुसून घ्यावें तें उपपिते व उपमाता यानीं सांगीतल्यावर आचार्यानें विचारावें.

तूं या बालकाचे नामानें सैतान आणि त्याचीं सर्व कामें संसाराची व्यर्थ शोभा व त्याचें वैभव व त्याच्या सर्व लोभिष्ठ इच्छा आणि देहाच्या कामी इच्छा अशा नाकारितोस कीं तूं त्यांस अनुसरणार नाहींस व त्यानीं जिंकला जाणार नाहींस किं काय

उत्तर॥ मी त्या सर्वांस नाकारून टाकितों

आचार्यानें विचारावें.

देव जो सर्वसमर्थ बाप आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा त्याविषयीं तूं विश्वास धरितोस किं काय

आणि त्याचा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो पवित्र आत्म्याचे योगेंकरून गर्भरूप झाला मारया जी कुमारी तिजकडून जन्मला पोंत्यस पिलातसाचे अधिकाराखालीं ज्यानें दुःखसहन केलें क्रूसावर बसविला गेला मरण पावला व पुरला गेला जो मृत्युलोकांत गेला तिसरे दिवशीं पुन्हां जीवंत होऊन मेलेल्यांमधून उठला आकाशांत चढला आणि सर्वसमर्थ देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला



तेथून जीवंत व मेलेले यांची न्यायाधीशी करायाला येणार आहे त्याचा विश्वास धरितोस काय

पवित्र आत्मा जी एकच पवित्र मंडळी पवित्र मनुष्यांचें सहायत्व पापांची क्षमा देहाचें पुनरुत्थान आणि सनातन जीवन यांचा तूं विश्वास धरितोस काय

उत्तर॥ या सर्वांचा विश्वास मी धरितों

आचार्यानें विचारावें.

तर तूं देवाची इच्छा मानिशील व त्याच्या आज्ञा मान्यतः पाळिशील आणि त्यांप्रमाणें तूं आपले आयुष्याचे सर्व दिवसांत वर्त्तशील काय

उत्तर॥ तसेंच मी इच्छितों

तेव्हां आचार्यानें सांगावें.

आह्मी हें बाळक ख्रिस्ताचे मंडळींत घेतों (*) आणि क्रूसाचे चिन्हानें याला चिन्हांकित करितों यावरून असें समजावें कीं यापुढें क्रूसावर चढविलेल्या ख्रिस्ताचा विश्वास अंगीकारायास आणि त्याचे ध्वजाखालीं पराक्रमानें पाप प्रपंच आणि सैतान यांचे प्रतिकूल युद्ध करायास व याचें आयुष्य संपेपर्यंत ख्रिस्ताचा विश्वासु सैनिक व सेवक टिकायास हें लज्जित होणार नाहीं आमेन

---

(*) इथें आचार्यानें बाळकाचे कपाळावर क्रुसाचें चिन्ह करावें

तेव्हां आचार्यानें सांगावें.

प्रियानों या बालकाचें पुनर्जन्म झालें आहे आणि हें ख्रिस्ताचे मंडळीशीं संप्रयुक्त झालें आहे यास्तव आह्मीं यां उपकारांमुळें सर्वसमर्थ देवाची उपकारस्तुति करावी आणि या प्रारंभाप्रमाणें ह्या बालकानें आपलें सारें उरलें आयुष्य सरेपर्यंत वर्त्तावें ह्मणून एकचित्तानें आम्हीं देवाची प्रार्थना करावी

तेव्हां आचार्यानें बोलावें.

हे परमदयाळो बापा त्वां कृपेंकरून आपल्या पवित्र आत्म्याकडून या बालकाचें पुनर्जन्म घडविलें हें तुझेंच लेंकरूं व्हावें ह्मणून याला त्वां आदत्तपुत्रत्वानें घेतलें आणि आपले पवित्र मंडळीशीं संप्रयुक्त केलें आहे यास्तव मनापासून आह्मी तुझी उपकारस्तुति करितों आणि तुला आम्ही नम्रपणें विनवितों कीं त्यानें पापाविषयीं मृत आणि न्यायाविषयीं जीवंत होऊन आणि ख्रिस्तासहवर्त्तमान त्याचे मरणांत पुरिलेल्याप्रमाणें होऊन जुनें मनुष्य क्रूसाचे मरणीं मारून टाकावें आणि पापाचा सर्व भार नाहींसा करावा व जसें हें ख्रिस्ताचे मरणाचें संभागी झालें आहे तसें त्याचे पुनरुत्थानाचेंहि संभागी व्हावें असासाठीं कीं शेवटीं तुझे अवघे पवित्र मंडळीसंगतीं तुझे सनातन राज्याचें विभागी व्हावें ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन



तेव्हां सर्व उभे राहून आचार्यानें उपमाता व उपपिते यांस हा उपदेश सांगावा

या बालकानें जे तुह्मी याचे प्रतिभू आहां त्यां तुह्माकडून सैतान व त्याचीं सर्व कामें नाकारून टाकायास देवावर भाव ठेवायास व त्याची सेवा करायाला वचन दिलें आहे यास्तव तुह्मास स्मरावें लागतें कीं या बालकाला शिकतां येईल तेव्हां केवढा भारी नवस वचन आणि प्रदर्शन यानें तुम्हाकडून इथें केलें आहे हें याला शिकवावें ह्मणून पाहणें तुमचें अगत्य कार्यच आहे आणि हे अर्थ याला उत्तम प्रकारें समजावे ह्मणून तुह्मी याला आचार्यांचा उपदेश ऐकायाला संबोध करा पण विशेषेंकरून तुम्ही चौकशी करून पहा कीं यानें मतांगीकार प्रभूची पार्थना आणि दहा आज्ञा शिकाव्या आणि ख्रिस्ती माणसाला तारणाविषयीं जें जें जाणावें लागतें तें तें यानें शिकावें म्हणून चौकशी करून पहा व या बालकानें भक्तियुक्त ख्रिस्ती आचरण राखावें ह्मणून याचा उत्तम सांभाळ करवायासाठीं तुह्मी चिंता बाळगीत जा आणि सर्वदा स्मरण करा कीं बाप्तिस्मा आमचे धर्माची उपमा देतो तो धर्म म्हणजे आमचे तारणारे ख्रिस्ताचे आचरणास अनुसरणें आणि त्यासारिखें होणें जसा आह्माकरितां तो मेला आणि पुन्हां जीवंत होऊन उठला तसे जे आम्ही बाप्तिस्मा पावलों त्या आह्मीं पापाविषयीं मरावें आणि न्यायाविषयीं उठावें सर्वदा आपल्या दुष्ट इच्छा

मारून टाकितांना आणि सर्व सद्गुण व भक्तियुक्त आचरण यांत नित्य वाढतांना

पण ज्यां लोकानीं बालक सभामंदिरांत आणिलें त्यांचे उत्तरांवरून जर आचार्य समजेल कीं बापाचे व पुत्राचे व पवित्र आत्म्याचे नामानें पाण्याकडून त्या बालकाचा बाप्तिस्मा झाला नाहीं तर आचार्यानें बालकांचे लौकिक बाप्तिस्म्याचे पद्धतीप्रमाणें त्याचा बाप्तिस्मा करावा पण हा भेद व्हावा म्हणजे पाणी बालकावर ओतितांना त्यानें या प्रकारें बोलावें

जर तुझा बाप्तिस्मा अजून झाला नाहीं तर बापाचे आणि पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नामानें मी तुझा बाप्तिस्मा करितों आमेन

समाप्त.



# जे वयानें कांहींसे वाढले असतां आपलेसाठीं उत्तर करायास योग्य आहेत त्यांचा बाप्तिस्मा करण्याची पद्धति

जे वयांत कांहींसे वाढले आहेत त्यांचा बाप्तिस्मा जेव्हां करायाचा आहे तेव्हां ख्रिस्ती धर्माचें सत्यज्ञान ते शिकले आहेत किं नाहीं हें कळावें म्हणून त्यांची झडती घ्यावी आणि त्यांस संबोध करावा कीं ते हा पवित्र संस्कार घ्यायास सिद्ध व्हावें म्हणून प्रार्थना व उपोषण करीत जावे

ते योग्य आहेत असें कळलें असतां आचार्य सांगेल तेव्हां त्यांस प्रतिभूनीं कुंडाजवळ आणावें आणि आचार्यानें तिथें उभें राहून त्यां जनांतला कोणी एक अजून बाप्तिस्मा पावला किं नाहीं असें पुसावें ते नाहीं असें म्हणतील तर आचार्यानें बोलावें

प्रियानों सर्व मनुष्यें पापांत गर्भधारण पावतात आणि आमचे तारणाऱ्या ख्रिस्तानें सांगीतलें आहे कीं जो कोणी पाण्याकडून व पवित्र आत्म्याकडून नवें जन्म पावत नाहीं त्याच्यानें देवाचे राज्यांत शिरवत नाहीं यास्तव मी तुह्मास विनवितों कीं तुम्ही आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून देव जो बाप याची प्रार्थना करावी कीं त्यानें आपले परम कृपेनें यां जनांला जें प्रकृतीकडून पाववत नाहीं तें ह्यांला द्यावें ह्मणजे पाण्याकडून व पवित्र आत्म्याकडून ते बाप्तिस्मी व्हावे आणि ख्रिस्ताचे पवित्र मंडळींत घेतले जावे आणि तिच्या जीवंत व्यक्ति असे व्हावे

तेव्हां आचार्यानें म्हणावें

आपण प्रार्थना करूं

इथें सर्व मंडळीनें गुडघे टेंकावे

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा ज्या त्वां आपले परम कृपेनें नोहा व त्याचें कुटुंब पाण्यांत बुडण्यापासून पेटीरूप गलबतांत तारिलें आणि तुझे बाप्तिस्म्याची उपमा करितांना तुझे इस्राएल लोक तांबड्या समुद्रांतून सुरक्षित नेले आणि तुझे प्रियपुत्र येशू ख्रिस्ताचा जो यार्देन नदींत बाप्तिस्मा झाला त्याकडून पापाचे राहस्यिक धुण्याविषयी याणि पवित्र केलें त्या तुला आह्मी विनवितों कीं त्वां आपले अनंत दयेनें यां तुझे सेवकांवर कृपादृष्टि करावी यांला धुवावें आणि पवित्र आत्म्याकडून पवित्र करावें अशासाठीं कीं ते तुझे क्रोधापासून तारिलेले असतां ख्रिस्ताचे नौकारूप मंडळींत घेतले जावे आणि ते विश्वासामध्यें स्थिर आशेंत आनंदित आणि प्रीतींत मूलस्थित आतां या कष्टकारक संसाराचे लहरींतून असे निभावून जावे कीं शेवटीं सनातन जीवनाचे स्थानास पोंहचावे आणि तिथें सदां सर्वकाळ यानीं तुशीं राज्य करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे सर्वसमर्थ आणि अमर देवा जो तूं जे सर्व अगत्यवान आहेत त्यांचा साहाय्यकर्त्ता जे सर्व तुला शरण जातात त्यांचा संरक्षक जे विश्वास धरितात त्यांचा जीवनदायक आणि मेलेल्यांचा पुनरुत्थानकर्त्ता आहेस यां जनांविषयीं आह्मी तुझी प्रार्थना करितों कीं हे तुझे पवित्र बाप्तिस्म्याकडे येऊन आत्मिक पुनर्जन्माकडून यांला आपले पापांची क्षमा



प्राप्त व्हावी हे ईश्वरा ह्यांला अंगीकारून घे जसें त्वां आपले प्रिय पुत्राकडून वचन दिलें आहे कीं मागा म्हणजे तुह्माला प्राप्त होईल शोधा मग तुह्माला सांपडेल दार ठोका ह्मणजे तुह्माला उघडलें जाईल तसें जे आह्मी आतां मागतों त्यां आह्मास दे जे आह्मी शोधितों त्यां आह्माला सांपडूं दे जे आह्मी दार ठोकितों त्यां आह्मास तें उघडूं दे अशासाठीं कीं यां जनानीं तुझे दिव्य धुण्याचा सनातन उपकार भोगावा आणि ख्रिस्त आमचा प्रभु याकडून ज्या सनातन राज्याविषयीं त्वां वचन दिलें आहे त्यास पोंहचावें आमेन

तव्हां लोक उभे रहावे आणि आचार्यानें सांगावें

योहान्न साधूनें लिहिलेली जो सुवार्त्ता तीचे तिसऱ्ये अध्यायांत पहिले ओवीस जीं वाक्यें आहेत तीं ऐका

फारीशांतील नीकोदेमस नामें एक माणूस यहूद्यांतला अधिकारी होता हा रात्रीं येशूजवळ येऊन त्याला बोलिला राब्बी तूं देवापासून उपदेशक आला आहेस असें आह्मी जाणतों कारण कीं जे चमत्कार तूं करितोस ते जर ज्या कोणेकापाशीं देव नसला तर त्याच्याने करवत नाहीं येशू उत्तर करितां त्यास म्हणाला मी तुला खचीत खचीत सांगतों कीं जर कोणी पुनः जन्मला जात नाहीं तर त्याच्यानें देवाचें राज्य पाहवत नाहीं नीकोदेमस त्याला ह्मणाला मनुष्य ह्मातारा झाला असतां कसा पुनः जन्मला जाईल तो आपले आईचे उदरीं दुसऱ्यानें शिरेल आणि जन्मला जाईल काय येशूनें उत्तर केलें मी तुला खचीत खचीत सांगतों

जर कोणी पाण्याकडून व पवित्र आत्म्याकडून जन्मला जात नाहीं तर त्याच्यानें देवाचे राज्यांत जावत नाहीं जें केवळ मनुष्याकडून जन्मलें जातें तें केवळ मनुष्यच आहे आणि जें पवित्र आत्म्याकडून जन्मलें जातें तें आत्माच आहे तुम्हाला पुन: जन्मावें लागतें ह्मणून म्यां तुला सांगीतलें याविषयीं तुला आश्चर्य वाटूं नये वारा जेथें इच्छितो तेथें वाहातो आणि तूं त्याचा शब्द ऐकतोस पण कोठून येतो आणि कोठें जातो हें तूं जाणत नाहींस तशीच जो कोणी आत्म्याकडून जन्मला जातो त्याची गोष्ट आहे

यानंतर आचार्यानें हा उपदेश सांगावा

प्रियानों या सुवार्त्तेंत आमचे तारणारे ख्रिस्ताचीं स्पष्ट वाक्यें तुह्मी ऐकतां कीं मनुष्य पाण्याकडून व आत्म्याकडून जर जन्मला जात नाहीं तर त्याच्यानें देवाचे राज्यांत जावत नाहीं यावरून या संस्काराची अगत्यता तुह्मी समजतां एतदनुसार (जसें मार्कस साधूचे सुवार्त्तेंतल्या शेवटल्या अध्यायांत आह्मी वाचितों) ख्रिस्ताने आकाशांत चढल्यापूर्वीं आपले शिष्यांस आज्ञा दिली कीं तुह्मी अवघे जगांत जाऊन प्रत्येका मनुष्याला सुवार्त्ता सांगा जो कोणी विश्वास धरील आणि बाप्तिस्मा घेईल तो तरेल पण जो कोणी विश्वास नधरील त्याला दंड केला जाईल हेंच आह्मास कळवितें केवढा मोठा उपकार यासंस्काराकडून आम्हास मिळतो यास्तव पेत्रस साधु जो प्रेषित त्यानें सुवार्त्ता पहिल्यानें सांगीतली असतां जेव्हां बहुत लोक अंत:करणांत खिन्न होऊन त्याला व दुसरे



प्रेषितांला बोलिले कीं भाव्वानों आह्मीं काय करावें तेव्हां त्यानें त्यांला उत्तर करितां सांगीतलें तुम्ही पश्चात्ताप करा आणि पापाची क्षमा व्हावी ह्मणून बाप्तिस्मा घ्या ह्मणजे तुह्मास पवित्र आत्म्याचा उपकार मिळेल कांकीं तुम्हास आणि तुमचे लेंकरांस व जे सर्व दूर आहेत जितक्यांसहि ईश्वर आमचा देव बलावील त्यां सर्वांस वचन दिलें आहे आणि बहुत दुसऱ्यां वाक्यानीं त्यानें त्यांजला उपदेश सांगीतला कीं ह्या वांकडे पिढीपासून तुम्ही आपणातें तारा कांकीं (जसा तोच प्रेषित आपले पत्रांत दाखवितो) बाप्तिस्माहि आतांच येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थानाकडून आह्मास तारितो (हा बाप्तिस्मा केवळ देहाचा मळ काढणें असा नव्हे पण सदंत:करणाचें जें उत्तर देवाकडे आहे तें) तर तुह्मी संशय धरूं नका पण मनांत विश्वास धरा कीं हे जे जन खरा पश्चात्ताप करून विश्वास धरून ख्रिस्ताकडे येतात यांस तो प्रसादें करून घेईल यांचे पापांची क्षमा करील आणि यांला पवित्र आत्मा देईल यांला सनातन जीवनाचा उपकारहि देईल आणि आपले सनातन राज्याचे विभागी करील

यास्तव यां जनांवरची आमचे दिव्य बापाची जी प्रीति त्याचे पुत्र येशू ख्रिस्तानें प्रकट केली तिजविषयीं आह्मी निश्चित असतां विश्वास व भक्ति यांकडून त्याची उपकार स्तुति करीत ह्मणूं

हे सर्वसमर्थ व सनातन देवा आकाशांतील बापा तुझे कृपेचे ज्ञानांत आणि तुजवरचे विश्वासांत त्वां प्रसादेंकरून

आह्माला बलावून आणिलें आहे ह्मणून आह्मी नम्रपणें तुझी उपकारस्तुति करितों आमचे मनांत सर्वदा हें ज्ञान वाढीव आणि हा विश्वास स्थिर कर यां जनांचें पुनर्जन्म व्हावें आणि हे सनातन तारणाचे विभागी व्हावे ह्मणून ह्यांला तूं आपला पवित्र आत्मा दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आतां व सर्वदा आहे आणि राज्य करितो आमेन

तव्हां ज्यांचा बाप्तिस्मा करायाचा आहे त्यांला आचार्यानें सांगावें

प्रियानों जे तुह्मी बाप्तिस्मा घ्यायास इच्छून इथें आलां आहां त्यां तुह्माविषयीं मंडळीनें कशी प्रार्थना केली आहे कीं आमचे प्रभु येशू ख्रिस्तानें तुह्माला घ्यावें आणि तुह्माला आशीर्वाद द्यावा तुह्मास पापापासून मुक्त करावें आणि तुह्माला आकाशाचें राज्य व सनातन जीवन द्यावें ही तुह्मीं ऐकिली आहे अणखीं तुह्मीं ऐकिलें आहे कीं जे सर्व अर्थ आह्मीं प्रार्थना करून मागीतले ते द्यावयास आमचे प्रभु येशू ख्रिस्तानें आपले पवित्र गोष्टींत वचन दिलें आहे हें वचन तो स्वतां निश्चयें पाळील आणि खरें करील

यास्तव ख्रिस्तानें हें वचन केलें असतां तुह्मीहि स्वतां यां तुमचे साक्ष्यांदेखतां व या मंडळीदेखतां विश्वासूपणें वचन द्या कीं सैतान आणि त्याचीं सर्व कामें आम्ही नाकारून टाकूं आणि देवाची गोष्ट सर्वदा विश्वासूं आणि त्याच्या आज्ञा मान्यतः पाळूं



तव्हां ज्यांचा बाप्तिस्मा करायाचा आहे त्यां एकेकाला आचार्यानें हे प्रश्न करावे

प्रश्न ॥ तूं सैतान आणि त्याचीं सर्व कामें संसाराची व्यर्थ शोभा व त्याचें वैभव व त्याच्या सर्व लोभिष्ठ इच्छा व देहाच्या कामी इच्छा अशा नाकारितोस कीं तूं त्यांस अनुसरणार नाहींस व त्यानीं जिंकला जाणार नाहींस किं काय

उत्तर ॥ मी त्यां सर्वांस नाकारून टाकितों

प्रश्न ॥ देव जो सर्वसमर्थ बाप आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा त्याविषयीं तूं विश्वास धरितोस किं काय

आणि त्याचा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो पवित्र आत्म्याचे योगेंकरून गर्भरूप झाला मारया जी कुमारी तिजकडून जन्मला पोंत्यस पिलातसाचे अधिका राखालीं ज्यानें दुःखसहन केलें जो क्रूसावर बसविला गेला मरण पावला व पुरला गेला जो मृत्युलोकांत गेला तिसरे दिवशीं पुन्हां जीवंत होऊन मेलेल्यांमधून उठला आकाशांत चढला आणि सर्वसमर्थ देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला तेथून जीवंत व मेलेले यांची न्यायाधीशी करायाला येणार आहे त्याचा विश्वास धरितोस काय

पवित्र आत्मा जी एकच पवित्र मंडळी पवित्र मनुष्यांचें सहायत्व पापांची क्षमा देहाचें पुनरुत्थान आणि सनातन जीवन यांचा तूं विश्वास धरितोस काय

उत्तर ॥ या सर्वांचा विश्वास मी धरितों

प्रश्न ॥ हा विश्वास धरून तूं बाप्तिस्मा घेशील काय

उत्तर ॥ तशीच माझी इच्छा आहे

प्रश्न ॥ तर तूं देवाची इच्छा मानिशील आणि त्याच्या आज्ञा मान्यतः पाळिशील आणि त्यांप्रमाणें तूं आपलें आयुष्याचे सर्व दिवसांत वर्त्तशील काय

उत्तर ॥ तसेंच देवाचे साहाय्यानें करायाला मी झटत जाईन

तेव्हां आचार्यानें बोलावें

हे दयाळो देवा या जनांतला जुना आदाम असा पुरिला जावा कीं यांजमध्यें नवें मनुष्यपण उत्पन्न करावें आमेन

यांतल्या सर्व कामीं इच्छा मरून जाव्या आणि यांजमध्यें आत्मिक सर्व उत्तम अर्थ रहावे आणि वाढावे आमेन

हे विजय पावावे आणि सैतानावर संसारावर व इंद्रियांवर यानीं जयोत्साह करावा ह्मणून कृपा करून यांला सामर्थ्य दे आमेन

हे जन आमचे कर्मानें व सेवेनें तुला प्रतिष्ठित केले असतां दिव्य सद्गुणानीं संपन्न करावे आणि तुझे दयेंकरून सनातनतः उपकारित व्हावे हे सुवंदित ईश्वरा देवा जो तूं सदा सर्वकाळ आहेस आणि विश्वाचें राज्य करितोस आमेन

हे सर्वसमर्थ आणि निरंतर जीवित्या देवा ज्या तुझे प्रिय पुत्र येशू ख्रिस्तानें मनुष्यांचे पापांची क्षमा व्हावी ह्मणून आपले कुक्षींतून पाणी व रक्त दोन्हीं पाडिलीं जाऊं दिलीं आणि आपले शिष्यांस आज्ञा दिली कीं



तुह्मी जाऊन सर्व लोकांला शिकवावें आणि बापाचे व पुत्राचे व पवित्र आत्म्याचे नामानें त्यांजला बाप्तिस्मा द्यावा आह्मी तुला विनवितों कीं त्वां आपले मंडळीच्या विनंत्या ऐकाव्या पापाचे राहस्यिक धुण्यासाठीं हें पाणी पवित्र करावें आणि याकडून ज्यां जनांचा बाप्तिस्मा आतां होणार आहे यांला तुझी पूर्ण कृपा प्राप्त व्हावी आणि तुझे विश्वासु व निवडलेले लेंकरांमध्यें हे सर्वदा रहावे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

तेव्हां आचार्यानें प्रत्येक जनाचा उजवा हात धरून उपपिते व उपमाता यांपासून नाम पुसून घ्यावें.

तेव्हां सावधपणें त्यांजवर पाणी ओतून अथवा शिंपून सांगावें.

बापाचे आणि पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नामानें मी तुझा बाप्तिस्मा करितों आमेन

तेव्हां आचार्यानें सांगावें.

आह्मी हा जन ख्रिस्ताचे मंडळींत घेतों (*) आणि क्रूसाचे चिन्हानें याला चिह्नांकित करितों यावरून असें समजावें कीं यापुढें क्रूसावर चढविलेल्या ख्रिस्ताचा विश्वास अंगीकारायास आणि त्याचे ध्वजाखालीं पराक्रमानें पाप प्रपंच आणि सैतान यांचे प्रतिकूल युद्ध करायास व याचें

(*) इथें आचार्यानें जनाचे कपाळावर क्रूसाचें चिन्ह करावें.

आयुष्य संपेपर्यंत ख्रिस्ताचा विश्वासु सैनिक व सेवक टिका यास हा लज्जित होणार नाहीं आमेन

तेव्हां आचार्यानें सांगावें.

प्रियानों यां जनांचें पुनर्जन्म झालें आहे हे ख्रिस्ताचे मंडळीशीं संप्रयुक्त झाले आहेत यास्तव आम्ही यां उपकारांमुळें सर्वसमर्थ देवाची उपकारस्तुति करावी आणि या प्रारंभाप्रमाणें यानीं आपलें सारें उरलें आयुष्य सरेपर्यंत वर्त्तावें म्हणून एकचित्तानें आह्मीं देवाची प्रार्थना करावी

तेव्हां सर्वांनीं गुडघे टेंकून बोलावें.

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छे प्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हास दे जशी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हाला क्षमा कर आणि आम्हाला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्मास तार आमेन

हे सर्वसमर्थ आणि सनातन देवा आकाशांतील बापा तुझे कृपेचे ज्ञानांत व तुजवरचे विश्वासांत त्वां प्रसादेंकरून आम्हाला बलावून आणिलें आहे ह्मणून आह्मी नम्रपणें तुझी उपकारस्तुति करितों आमचे मनांत सर्वदा हें ज्ञान वाढीव आणि हा विश्वास स्थिर कर यां जनाला तूं आपला पवित्र आत्मा दे अशासाठीं कीं हे आतां पुनर्जन्म पावले



असतां व आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून सनातन जीवनाचे विभागी झाले असतां तुझे सेवक रहावे आणि तुझीं वचनें पावावे तोच प्रभु येशू ख्रिस्त तुझा पुत्र त्याचे योगान जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान सनातनत: आहे आणि राज्य करितो आमेन

तेव्हां सर्व उभे राहून उपपिते आणि उपमाता यांस आचार्यानें हा उपदेश सांगावा

यां जनानीं तुमचे देखतां वचन दिलें आहे कीं सैतान आणि त्याचीं सर्व कामें हे नाकारून टाकितील देवावर भाव ठेवितील व त्याची सेवा करितील यास्तव तुह्मास स्मरावें लागतें कीं केवढा भारी नवस वचन आणि प्रश्न या मंडळीचे देखतां व विशेषेंकरून जे तुह्मी यांचे निवडलेले साक्षी आहां त्यां तुम्हांदेखतां यानीं आतां केलें आहे याविषयीं यांला संबोध करणें तुमचें अगत्य कामच आहे आणि देवाचे गोष्टीचें शुद्ध ज्ञान शिकायास यानीं प्रयत्न करावा ह्मणून तुम्हाला यांचें उत्तेजन केलें पाहिजे अशासाठीं कीं यानीं सत्गुणांत व आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे ज्ञानांत वाढावें आणि या विद्यमान संसारांत भक्तीनें न्यायानें आणि सावधपणें वर्त्तावें

मग ज्यां जनांचा बाप्तिस्मा नुक्ता झाला त्यांस आचार्यानें सांगावें.

ज्यां तुह्मीं बाप्तिस्मा घेतल्यानें ख्रिस्तास आतां अंगी

कारिलें आहे ते तुम्ही येशू ख्रिस्तावर विश्वास ठेविल्यानें देवाचीं व प्रकाशाचीं लेंकरें झालां असतां जसें तुमचे ख्रिस्ती बोलावण्यास आणि प्रकाशाचे लेंकरांस योग्य आहे तसेंच वर्त्तणें तुमचें अगत्य कार्य आहे आणि सर्वदा स्मरण करा कीं बाप्तिस्मा आमचे धर्माची उपमा देतो तो धर्म म्हणजे आमचे तारणारे ख्रिस्ताचे आचरणास अनुसरणें आणि त्या सारिखें होणें जसा तो आह्माकरितां मेला आणि पुन: जीवंत होऊन उठला तसे जे आह्मी बाप्तिस्मा पावलों ते आह्मी पापाविषयीं मरावें आणि न्यायाविषयीं उठावें सर्वदा आपल्या दुष्ट इच्छा मारून टाकितांना आणि सर्व सद्गुण व भक्तियुक्त आचरण यांत नित्य वाढतांना

समाप्त.



# प्रश्नोत्तरावलि.

म्हणजे

जो हितोपदेश प्रत्येका जनाला एपिस्कोपसाजवळ स्थिरीकरण घ्यायास आणित्यापूर्वी शिकलें पाहिजे

प्रश्न ॥ तुझें नाम काय आहे

उत्तर ॥ ——

प्रश्न ॥ तुझें नाम कोणी ठेविलें

उत्तर ॥ माझे उपपित्यानीं व उपमातानीं माझा बाप्तिस्मा करण्याचे वेळेस ज्या त्यांत मी ख्रिस्ताचे मंडळीचा देवाचें लेंकरूं आणि आकाशाचे राज्याचा विभागी झालों

प्रश्न ॥ तेव्हां तुझे उपपित्यानीं व उपमातानीं तुसाठीं काय केलें

उत्तर ॥ त्यानीं माझे नामानें तीन अर्थाचें वचन दिलें पहिलें कीं म्यां सैतान आणि त्याचीं सर्व कामें या दुष्ट संसाराची व्यर्थ शोभा व अभिमान आणि इंद्रियांच्या सर्व पापी इच्छा यां सर्वांस नाकारून टाकावें दुसरें कीं म्यां ख्रिस्ती मताचीं सर्व प्रकरणें विश्वासावीं आणि तिसरें कीं म्यां देवाची पवित्र इच्छा मानावी आणि त्याच्या आज्ञा पाळाव्या व त्यां प्रमाणें आपले आयुष्याचे सर्व दिवसांत वर्त्तावें

प्रश्न ॥ तर जसें त्यानीं तुसाठीं वचन दिलें तसें तुला विश्वासावें व करावें लागतें असें तूं समजतोस किं नाहीं

उत्तर ॥ होय खचीत आणि देवाचे साहाय्यानें तसेंच मी विश्वासत व करीत जाईन आणि आमचे दिव्य बापानें आमचे तारणाऱ्या येशू ख्रिस्ताकडून मला या तारणाचे स्थितींत बलाविलें आहे ह्मणून मी मनापासून त्याची उपकारस्तुति करितों व या स्थितींत म्यां आपलें आयुष्य सरे पर्यंत टिकावें म्हणून देवानें आपला सद्गुण मला द्यावा अशी त्याची मी प्रार्थना करितों

प्रश्नकर्त्ता ॥ तूं आपले धर्ममताचीं प्रकरणें सांग

उत्तर ॥ देव जो सर्वसमर्थ बाप आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा त्याविषयीं मी विश्वास धरितों

आणि त्याचा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याविषयीं मी विश्वास धरितों जो तो पवित्र आत्म्याचे योगें करून गर्भरूप झाला मारया जी कुमारी तिजकडून जन्मला पोंत्यस पिलातसाचे अधिकाराखालीं त्यानें दुःखसहन केलें तो क्रूसावर बसविला गेला मरण पावला व पुरला गेला तो मृत्युलोकांत गेला तिसरे दिवसीं पुनः जीवंत होऊन मेलेल्यांमधून उठला आकाशांत चढला आणि सर्वसमर्थ देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला तेथून जीवंत व मेलेले यांची न्यायाधीशी करायाला तो येणार आहे

पवित्र आत्मा जो एकच पवित्र मंडळी पवित्र मनुष्यांचें सहायत्व पापांची क्षमा देहाचें पुनरुत्थान आणि सनातन जीवन यांविषयीं मी विश्वास धरितों आमेन

प्रश्न ॥ तूं आपले धर्ममताचे यां प्रकरणांत विशेषेंकरून काय समजून घेतोस



उत्तर ॥ पहिलें देव जो बाप ज्यानें मला आणि सर्व जगाला उत्पन्न केलें त्याचा विश्वास धरावा

दुसरें देव जो पुत्र ज्यानें मला आणि सर्व मनुष्यांला खंडणी देऊन परत घेतलें त्याचा विश्वास धरावा

तिसरें देव जो पवित्र आत्मा मला व देवाचे सर्व निवडलेल्या लोकांला पवित्र करितो त्याचा विश्वास धरावा हें मी समजून घेतों

प्रश्न ॥ त्वां देवाच्या आज्ञा पाळाव्या ह्मणून तुझे उपपित्यानीं आणि उपमातानीं तुसाठीं वचन दिलें असें तूं सांगीतलेंस त्या आज्ञा किती आहेत मला सांग

उत्तर ॥ दहा आज्ञा आहेत

प्रश्न ॥ त्या कोणत्या आहेत

उत्तर ॥ ज्या आज्ञा देवानें प्रस्थानकथनाचे विसावे अध्यायांत सांगीतल्या त्याच कीं ज्यानें तुला मिसर देशांतून दास्याचे घरांतून आणिलें तो मी ईश्वर तुझा देव आहें

१ माझे समोर तुला इतर देव नसोत

२ तूं आपलेसाठीं कोरींव मूर्त्ति करूं नको आणि जें कांहीं वरतीं आकाशांत अथवा खालतीं पृथ्वींत अथवा भूमी खालतीं पाण्यांत आहे त्याची प्रतिमा करूं नको त्यांचे पायां पडूं नकों त्यांची सेवा करूं नको कांकीं मी ईश्वर तुझा देव स्वगौरवतत्पर देव आहें जे माझा द्वेष करितात त्यांचे तिसरे व चौथे पिढीपर्यंत बापांचे अन्यायाचें शासन मी लेंकरांस

करितों आणि जे मजवर प्रीति ठेवून माझ्या आज्ञा पाळितात त्यांचे हजारोंवर मी दया करितों

३ ईश्वर जो तुझा देव त्याचें नाम तूं उगीच घेऊं नको कांकीं जो निष्कारण त्याचें नाम घेतो त्याला ईश्वर निरपराध असें मानणार नाहीं

४ शाब्बाथ जो दिवस तो पवित्र राखायाचें स्मरण ठेव तूं सहा दिवस खपून सारा आपला धंदा कर पण सातवा जो दिवस तो ईश्वर जो तुझा देव त्याचा शाब्बाथ आहे त्यांत तूं कांहीं उद्योग करूं नको आणि तुझा पुत्र अथवा तुझी कन्या अथवा तुझा दास अथवा तुझी दासी अथवा तुझा पशु अथवा तुझे दारांतील तुझा विदेशी नकरो कारण कीं ईश्वरानें सहा दिवसांत आकाश व पृथ्वी व समुद्र आणि जें कांहीं त्यांत आहे तें उत्पन्न केलें आणि सातवे दिवशीं विसांवा घेतला यास्तव ईश्वरानें सातवे दिवसाला आशीर्वाद देऊन पवित्र ठरविलें

५ तूं आपले आईबापाचा सन्मान कर अशासाठीं कीं ईश्वर तुझा देव जी भूमि तुला देतो तिजवर तुझें आयुष्य दीर्घ व्हावें

६ तूं हिंसा करूं नको

७ तूं जारकर्म करूं नको

८ तूं चोरी करूं नको

९ तूं आपले सविधाविषयीं खोटी साक्ष देऊं नको

१० तूं आपले सविधाचे घरावर लोभ ठेवूं नको तुझे



सविधाची बायको अथवा त्याचा दास अथवा त्याची दासी अथवा त्याचा बैल अथवा त्याचा गाढव अथवा जें कांहीं तुझे सविधाचें असेल त्याजवर लोभ ठेवूं नको

प्रश्न ॥ या आज्ञांवरून विशेषेंकरून तूं काय समजून घेतोस

उत्तर ॥ देवाजवळ मला काय केलें पाहिजे आणि आपले शेजाऱ्याजवळ मला काय केलें पाहिजे असे दोन अर्थ मी समजून घेतों

प्रश्न ॥ देवाजवळ तुला काय केलें पाहिजे

उत्तर ॥ त्याचा विश्वास धरावा त्याचें भय राखावें म्यां आपले संपूर्ण मनानें संपूर्ण चित्तानें संपूर्ण जीवानें आणि संपूर्ण सामर्थ्यानें त्याजवर प्रीति ठेवावी त्याला भजावें त्याची उपकारस्तुति करावी म्यां आपला संपूर्ण भाव त्याजवर ठेवावा त्याची प्रार्थना करावी त्याचे पवित्र नामाचा आणि गोष्टीचा आदर राखावा आणि म्यां आपले आयुष्याचे सर्व दिवसांत त्याची सेवा खरेपणें करावी हें सर्व मला देवाजवळ केलें पाहिजे

प्रश्न ॥ तुला आपले शेजाऱ्याजवळ काय केलें पाहिजे

उत्तर ॥ मी जशी आपल्यावर प्रीति करितों तशी त्याजवर प्रीति करावी आणि जसें दुसऱ्यानीं मजशीं करावें म्हणून मी इच्छितों तसें सर्व मनुष्यांशीं म्यां करावें म्यां आपले आईबापांची प्रीति आदर आणि साहाय्य करावें राजा व त्याचे हाताखालीं जे सर्व अधिकारी आहेत त्यांचा आदर व

मान्यता करावी म्यां आपले शास्त्यांस अध्यापकांस आत्मिक पालकांला व धन्यांला वश रहावें आपल्यापेक्षां जे श्रेष्ठ आहेत त्यांजवळ म्यां नम्रतेनें व आदरानें वर्त्तावें शब्दानें अथवा कर्मेंकरून कोणाचेंहि अनिष्ट करूं नये मी आपले सर्व व्यवहारांत खरा व न्यायी असावा म्यां आपले हृदयांत कांहीं द्रोह अथवा द्वेष बाळगूं नये दृष्टि चुकवून घेणें व चोरणें यांपासून म्यां आपला हात राखावा आणि दुर्भाषण व चहाडी यांपासून म्यां आपली जीभ आवरावी भोग नियमन सावधपण आणि लालसा यांत म्यां आपलें शरीर राखावें दुसरे लोकांचे पदार्थांवर लोभ व इच्छा ठेवूं नये पण म्यां आपली उपजीविका सुप्रकारें मिळवायासाठीं धंदा शिकावा व करावा आणि ज्या व्यवहार स्थितींत देव मला बोलावील तींत जें जें योग्य तें तें करावें हें सर्व मला आपले शेजाऱ्याजवळ केलें पाहिजे

प्रश्नकर्त्ता ॥ माझे भल्या लेंकरा हें समजून घे कीं हीं कामें करायास आणि देवाचे आज्ञांप्रमाणें चालायास व त्याची सेवा साधायास त्याचे विशेष सत्वगुणावांचून तूं स्वतां समर्थ नाहींस यास्तव तो सत्वगुण नित्य मनापासून प्रार्थना करून मागायास तुला शिकावें लागतें तर प्रभूची प्रार्थना तुला पाठ येत्ये किं नाहीं हें मला ऐकिलें पाहिजे

उत्तर ॥ हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें



अन्न आह्मास दे जशी आम्ही आपले अपराध्यांला क्षमा करितों तशी तूं आह्मास क्षमा कर आणि आम्हाला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आम्हाला तार आमेन

प्रश्न ॥ या प्रार्थनेंत तूं देवापासून काय इच्छितोस

उत्तर ॥ माझा ईश्वर जो देव आमचा आकाशांतील बाप जो सर्व उत्तम अर्थांचा दाता आहे त्यानें मला आणि सर्व लोकांला आपला सत्वगुण पाठवावा अशासाठीं कीं जसें योग्य आहे तसें आह्मीं त्याचें भजन त्याची सेवा व त्याची मान्यता करावी असें मी इच्छितों आणि आमचे जीवात्म्यांला व शरीरांला जें जें पाहिजे तें तें त्यानें आह्माजवळ पाठवून द्यावें त्यानें आह्मावर दया करावी आणि आमचे पापांची क्षमा करावी आणि आत्मिक व दैहिक सर्व जोखमांपासून आम्हाला तारायास व राखायास त्याचा मनोदय असावा आणि सर्व पाप व दुष्टपण यांपासून व आमचा अदृश्यशत्रु व सनातन मरण यांपासून आम्हास रक्षावें असें मी देवाला प्रार्थितों व तो आपले दयाळूपणें करून येशू ख्रिस्त आमचा प्रभु याकडून हें करील असा मी विश्वास धरितों यास्तव मी आमेन म्हणजे विश्वस्त सांगतों

प्रश्न ॥ देवानें आपले मंडळींत किती संस्कार नेमिलेले आहेत

उत्तर ॥ जे तारणासाठीं पाहिजेत असे दोन संस्कार

मात्र नेमिलेले आहेत ह्मणजे बाप्तिस्मा आणि प्रभूचें रात्रिभोजन

प्रश्न ॥ संस्कार जो शब्द याचा अर्थ काय आहे

उत्तर ॥ याचा अर्थ ह्मणजे जो अंतःस्थित आणि आत्मिक सत्गुण आह्मास दिला जातो त्याचें जें बहिर्भव व दृश्यचिन्ह ख्रिस्तानें स्वतां आम्हाला सत्गुण मिळण्याचें साधन व आमचे निश्चयासाठीं प्रतिदेय व्हावयास नेमिलेले आहे तें

प्रश्न ॥ संस्कारांतलीं प्रकरणें किती आहेत

उत्तर ॥ दोन एक बहिर्भव आणि दृश्यचिन्ह दुसरें अंतःस्थित आत्मिक सत्गुण

प्रश्न ॥ बाप्तिस्म्यांतील बहिर्भव दृश्यचिन्ह अथवा आकार काय आहे

उत्तर ॥ ज्या पाण्यानें कोणेकाचा बाप्तिस्मा बापाचे व पुत्राचे व पवित्र आत्म्याचे नामानें केला जातो तेंच

प्रश्न ॥ अंतःस्थित व आत्मिक सत्गुण काय आहे

उत्तर ॥ पापाविषयीं जें मरण आणि न्यायाविषयीं जें नवें जन्म तेंच कांकीं जे आह्मी प्रकृतीनें पापांत जन्मलेले व देवाचे क्रोधाखालचे आहों ते आह्मी या सत्गुणानें कृपेचे होतों

प्रश्न ॥ ज्यांचा बाप्तिस्मा करायाचा आहे त्यांला काय पाहिजे

उत्तर ॥ ज्या पश्चात्तापानें ते पाप सोडून देतात तो



पाहिजे आणि ज्या विश्वासानें देवाचीं जीं वचनें त्यांला या संस्कारांत दिलेलीं आहेत त्यांजवर ते स्थिरपणें भाव ठेवितात तोहि पाहिजे

प्रश्न ॥ तर जेव्हां बालकें आपले लहानपणामुळें तीं कामें करायास समर्थ नाहींत तेव्हां त्यांचा बाप्तिस्मा कां केला जातो

उत्तर ॥ तीं कामें करायाचें वचन बाळकें आपले प्रतिभूंकडून देतात तीं वयानें वाढलीं ह्मणजे त्यांला तें वचन खरें करावें लागतें

प्रश्न ॥ प्रभूचें रात्रिभोजन जो संस्कार तो कां नेमिला होता

उत्तर ॥ ख्रिस्ताचें मरण जो बलि आणि त्याकडून जे उपकार आह्मास प्राप्त होतात त्यांचें निरंतर स्मरण करावें ह्मणून

पश्न ॥ प्रभूचे रात्रिभोजनांतलें बहिर्भव प्रकरण अथवा चिन्ह काय आहे

उत्तर ॥ जीं भाकर आणि द्राक्षारस घ्यावीं ह्मणून प्रभूनें आज्ञा दिली आहे तीं

प्रश्न ॥ जें अंतःस्थित प्रकरण अथवा पदार्थ या संस्कारांत संलक्षित आहे तें काय आहे

उत्तर ॥ ख्रिस्ताचें शरीर व रक्त जीं प्रभूचे रात्रिभोजनांत विश्वासू लोकानीं खरेपणें घेतलीं जातात तीं

प्रश्न ॥ त्यांकडून तुह्मास कोणते उपकार प्राप्त होतात

उत्तर ॥ जसें आमचे शरीरांला भाकर व द्राक्षारस यांकडून चैन पडतें आणि शक्ति येत्ये तसें ख्रिस्ताचें शरीर व रक्त यांकडून आमचे जीवात्म्यांला चैन पडतें आणि शक्ति येत्ये

प्रश्न ॥ जे प्रभूचे रात्रिभोजनास येतात त्यांला काय करावें लागतें

उत्तर ॥ ते नवें आचरण राखायाचा संकल्प करितांना आपण आपल्यां पूर्व पापांचा खरा पश्चात्ताप करितों किं नाहीं अशी त्यांला आपली परीक्षा करावी लागत्ये कृतज्ञतेनें त्याचे मरणाचें स्मरण करितांना ख्रिस्ताकडून देवाची जी कृपा आहे तिजवर जीवंत भाव ठेवावा लागतो आणि सर्व मनुष्यांशीं प्रीतीनें वर्त्तावें लागतें

पोरें योग्य वयास पोंहचतात आणि मतांगीकार प्रभूची प्रार्थना आणि दहा आज्ञा त्यांला पाठ येतात आणि प्रश्नोत्तरावलीचे प्रश्नांचीं उत्तरें जेव्हां त्यांला सांगतां येतात तेव्हां तीं एपिस्कोपसाजवळ आणावीं आणि प्रत्येकाला आपले स्थिरीकरणाचा साक्षी व्हावयास उपपिता अथवा उपमाता असो तीं योग्य आहेत असें जर एपिसकोपस समजेल तर त्यानें त्यांचें स्थिरीकरण पुढल्या प्रकारानें करावें



# स्थिरीकरणाची पद्धति.

## अथवा ज्यांला बाप्तिस्मा होऊन बुद्धि आली आहे त्यांजवर हात ठेविणें.

लावून दिलेल्या दिवसीं ज्यांचें स्थिरीकरण करायाचें आहे ते एपिसकोपसा जवळ अनुक्रमें उभे केलेले असतां त्यानें (किंवा त्यानें नेमिलेल्या कोणेका आचार्यानें) ही पुढली प्रस्तावना वाचावी.

जे स्थिरीकरण घेतील त्यांला तें जसें उपयोगी पडेल तसें द्यावें ह्मणून मंडळीनें असें नेमिलेलें आहे कीं ज्यांला मतांगीकार प्रभूची प्रार्थना आणि दहा आज्ञा पाठ येतात आणि प्रश्नोत्तरावलीचे प्रश्नांचीं उत्तरें करितां येतात त्यांवांचून कोणाचेंहि स्थिरीकरण करूं नये हा नेम पाळायास फार योग्य आहे अशासाठीं कीं लेंकरें बुद्धियुक्तवयांत आतां आलीं असतां आणि त्यांचे उपपित्यानीं व उपमातानीं जें वचन त्यांसाठीं बाप्तिस्म्यांत केलें तें त्यानीं समजून घेतलें असतां त्यानीं स्वतां आपले तोंडानें व मान्यतेनें मंडळीचे देखतां तें वचन ठरवावें नंतर अणखीं त्यानीं वचन द्यावें कीं ज्या ज्याविषयीं तीं आपले अंगीकारण्याकडून मान्य झालीं आहेत तें तें तीं स्वतां देवाचे कृपेनें विश्वासुपणें साधायास नित्य प्रयत्न करितील

तेव्हां एपिस्कोपसानें सांगावें.

जें भारी वचन तुमचे बाप्तिस्म्यांत तुमचे नामानें केलें

होतें तेच देवाचे व या मंडळीचे देखतां खतां ठरवितांना आणि जें जें तुमचे उपपित्यानीं व उपमातानीं तुह्मासाठीं पतकरिलें आहे तें तें तुम्हास विश्वासानें करावें लागतें असें मान्य असतांनां तुम्ही पुन: तें वचन देतां किं नाहीं

मग जसें ऐकिलें जाईल तसें प्रत्येकानें उत्तर द्यावें.

कीं तें वचन मी खतां पुन: देतों
एपिस्क॥ आमचें साहाय्य ईश्वरापासूनच होतें
उत्तर॥ त्यानें आकाश आणि पृथ्वी उत्पन्न केलीं
एपिस्क॥ ईश्वराचें नाम सुवंदित असो
उत्तर॥ यापुढें सदा सर्वकाळपर्यंत
एपिस्क॥ हे ईश्वरा आमच्या प्रार्थना ऐक
उत्तर॥ आणि आमची आह्वति तुजवळ येवो

एपिस्को॥ आपण प्रार्थना करूं.

हे सर्वसमर्थ व निरंतर जीवित्या देवा ज्या त्वां कृपा करून पाण्याकडून आणि पवित्र आत्म्याकडून यां आपले सेवकांचें पुनर्जन्म केलें आहे आणि यांला यांचे पापांची क्षमा दिली आहे त्या तुला हे ईश्वरा आह्मी विनवितों कीं पवित्र आत्मा जो संबोधक त्याकडून यांला समर्थ करावें यांत तुझे कृपेचे बहुविध सद्गुण विवेक व बुद्धि यांचा स्वभाव विचार व आत्मिक बल यांचा स्वभाव ज्ञान व सत्य भक्ति यांचा स्वभाव असे नित्य वाढावे आणि हे ईश्वरा तुझें भय धरण्याचे स्वभावानें आतां व सर्वदा यांस भरावें आमेन



तेव्हां सर्वांनीं एपिस्कोपसासमोर अनुक्रमें गुडघे टेंकावें नंतर त्यानें त्यांतले एकेकाचे डोईवर आपला हात ठेवून बोलावें.

हे ईश्वरा या तुझे लेंकरानें (अथवा या तुझे सेवकानें) तुजकडे सर्वदा रहावें म्हणून याला तूं आपले कृपेनें संरक्षित कर आणि तुझे सनातन राज्याला पोंहचेपर्यंत तुझे पवित्र आत्म्याकडून उत्तरोत्तर सत्वगुणांत वाढत जावें आमेन

मग एपिस्कोपसानें बोलावें.

तुम्हाजवळ ईश्वर असावा
उत्तर॥ तुझे आत्म्याजवळहि तो असावा

नंतर सर्वांनीं गुडघे टेंकून एपिस्कोपसानें बोलावें.

आपण प्रार्थना करूं

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छे प्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे जशी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आह्माला क्षमा कर आणि आम्हाला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्माला तार आमेन

आणि हा प्रार्थनासारांश बोलावा.

हे सर्वसमर्थ व निरंतर जीवित्या देवा जो तूं जें जें तुला उत्तम व मान्य आहे तें तें करायाला आह्मास इच्छा

व शक्ति देतोस त्यांजवर आम्हीं (तुझे पवित्र प्रेषितांचे उदाहरणाप्रमाणें) आपले हात अशासाठीं ठेविले कीं त्यांला त्यांजवरील तुझे कृपेविषयीं आणि प्रसादाविषयीं या खुणेनें निश्चित करावें यां तुझे सेवकांविषयीं आह्मी आपल्या नम्र विनंत्या तुजवळ करितों यांजवर तुझा दयालू हात सर्वदा असावा म्हणून तुला आम्ही विनवितों यां संगतीं तुझा पवित्र आत्मा सर्वदा असावा आणि तुझे गोष्टीचे ज्ञानांत व मान्यतेंत यांला असें वर्त्तवावें कीं शेवटीं यांला सनातन जीवन प्राप्त होईल येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

हे सर्वसमर्थ ईश्वरा व सनातन देवा आम्ही तुला विनवितों कीं त्वां आमचीं अंतःकरणें आणि शरीरें पवित्र करून तुझे नेमाचे मार्गांत व तुझे आज्ञांचे कर्मांत नीट वर्त्तवावीं अशासाठीं कीं तुझे परमपराक्रमी संरक्षणेंकरून आह्मी देहाविषयीं व आत्म्याविषयीं आतां व सर्वदा संरक्षित व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु आणि तारणारा याचे योगानें आमेन

नंतर एपिस्कोपसानें त्यांला हा आशीर्वाद करावा.

सर्वसमर्थ देव जो बाप आणि पुत्र आणि पवित्र आत्मा त्याची तुम्हावर कृपा असावी आणि सर्वदा तुम्हाशीं रहावी आमेन



# लग्नकर्माची पद्धति.

लग्नाची सूचना तीन आदित्यवारांत दुसरा अध्याय वाचिल्यावर सभामंदिरांत केली पाहिजे.

लग्नकर्म करण्याचे नेमिले दिवशीं ज्यांचें लग्नकर्म करायाचें आहे तीं आपले ज्ञातीं सहवर्त्तमान सभामंदिरांत यावीं आणि तिथें पुरुष उजवे कडेस व स्त्री डावे कडेस एकत्र उभीं राहतांना आचार्यानें सांगावें.

प्रियानों देवादेखतां आणि या मंडळीदेखतां हा पुरुष व ही स्त्री यांस पवित्र लग्नांत जोडायास आह्मी इथें एकवट आलों आहों लग्नस्थिति योग्यच आहे आणि मनुष्याचे निर्दोषपणाचे वेळेस देवानें नेमिलें होतें ख्रिस्ताशीं व त्याचे मंडळीशीं जो संबंध आहे तो हें कर्म आह्मास संलक्षित करितें गालीलांतील काना गांवांत ख्रिस्तानें लग्नकर्मांत विद्यमान होऊन तेथें आपला पहिला चमत्कार करून या पवित्र स्थितीस सन्मान्य केलें आणि सर्व मनुष्यांमध्यें लग्न सन्मान्य आहे अशी त्याची स्तुति पाऊलस साधूनें केली आहे यास्तव अविचारानें हलकेपणानें अथवा लालसेनें मनुष्यांचे काशी दुच्छांस अबुद्धि पशूंचेवाणीं तृप्त करायाला कोण्हा एकानें लग्न करूं नये पण देवाचें भय धरून आदरानें बुद्धीनें विचारानें आणि सावधपणें करावें व ज्यां निमित्तांसाठीं लग्न नेमिलेलें आहे तीं योग्यतः ध्यानांत आणावीं

पहिलें त्याचे योगानें लेंकरें उत्पन्न झालीं असतां देवाचे

गौरवासाठीं त्याचे भयांत व पालनांत वर्त्तवावीं ह्मणून लग्न नेमिलेलें आहे

दुसरें पापाप्रतिकूल उपाय व्हावा आणि व्यभिचार चुकवावा ह्मणून लग्न नेमिलेलें आहे अशासाठीं कीं ज्यांला इंद्रियनिग्रहाचा सद्गुण नाहीं त्यानीं लग्न करून आपणातें ख्रिस्ताचे देहाचे निर्मल अवयव राखावें

तिसरें संपत्तींत व आपत्तींत त्यानीं एकमेकाचें सहायत्व साहाय्य व समाधान करावें म्हणून लग्न नेमिलेलें आहे

या पवित्र स्थितींत जोडलीं जायास हीं दोघें आतां आलीं आहेत यास्तव हीं जोडलीं नजावीं असें जर कोणी योग्य कारण बोलून दाखविणारा असेल तर त्यानें आतांच बोलावें नाहीं तर या पुढें सर्वदा उगेंच रहावें

मग ज्यांचें लग्न करायाचें आहे त्यांलाहि आचार्यानें सांगावें.

न्यायाधीशीचे ज्यां दिवसीं सर्व अंतःकरणांचे गुप्त अर्थ उघडे केले जातील त्यां दिवसीं जसें तुह्मास प्रत्युत्तर द्यावें लागेल तसें तुह्मी ध्यानांत आणून ज्याचे कारणास्तव तुम्ही लग्नांत योग्यतः जोडिलीं जाणार नाहीं असा जर कोणेक विघ्न तुह्मांला कळला आहे तर त्याचा अंगीकार तुम्हीं आतांच करावा असें मी तुह्मा दोघांस खरावून सांगतों कारण तुमचा निश्चय आहे कीं जो प्रकार देवाचे गोष्टीनें नेमिलेला आहे त्याप्रकारें जीं एकत्र जोडिलीं नाहींत तीं देवानें जोडिलीं नाहींत आणि त्यांचें लग्न धर्माप्रमाणें नाहीं



जर कोणेक विघ्न दाखविला जात नाहीं तर आचार्यानें पुरुषाला पुसावें.

लग्नाचे पवित्र स्थितींत देवाचे विधिप्रमाणें एकत्र रहायाला हीं तुह्मी विवाहित स्त्री व्हावी ह्मणून इच्छितोस किं नाहीं रोगाचे व आरोग्याचे समयीं हिजवर प्रीति करीत जाशील आणि हिचें समाधान हिचा सन्मान व हिचें संरक्षण करीत जाशील किं नाहीं आणि सर्व इतर स्त्रियांस सोडून तुह्मी दोघें वांचाल तोंपर्यंत हिजपाशीं मात्र राहशील किं नाहीं

पुरुषानें उत्तर द्यावें कीं असें मी करीत जाईन

मग आचार्यानें स्त्रीला पुसावें.

लग्नाचे पवित्र स्थितींत देवाचे विधिप्रमाणें एकत्र रहायाला हा तुझा विवाहित पुरुष व्हावा म्हणून इच्छित्येस किं नाहीं रोगाचे व आरोग्याचे समयीं याची मान्यता सेवा आणि प्रीति याचा सन्मान व संरक्षण करीत जाशील किं नाहीं आणि सव इतर पुरुषांस सोडून तुम्ही दोघें वांचाल तोंपर्यंत यांजपाशीं मात्र राहशील किं नाहीं

स्त्रीनें उत्तर द्यावें कीं असें मी करीत जाईन

तेव्हां आचार्यानें पुसावें.

ही स्त्री या पुरुषाला कोण देतो

तेव्हा त्यानीं आपलें सत्यवचन परस्परांस याप्रमाणें द्यावें म्हणजे

आचार्यानें स्त्री तिचे ज्ञातीचे हातून घेऊन पुरुष आपले उजवे हातानं स्त्रीचाउजवा हात धरी आणि त्याचे मागें सांगें असें करावें.

मी —— तुला —— माझी विवाहित स्त्री व्हावयास घेतों आणि या दिवसापासून पुढें यापेक्षां उत्तम किंवा वाईट धनाचे अथवा दरिद्राचे दशेंत रोगाचे किंवा आरोग्याचे समयीं देवाचे विधिप्रमाणें मरण आमचा विप्रयोग करीपर्यंत तुला राखायास आणि तुजवर प्रीति ठेवीत जायास व तुझें पालन आणि पोषण करीत जायास तुला मी आपलें सत्य वचन देतों

तेव्हां त्यानीं एकमेकाचे हात सोडाचे आणि स्त्रीनें आपले उजवे हातानें पुरुषाचा उजवा हात धरून आचार्याचे मागें सांगावें.

मी —— तुला —— माझा विवाहित पुरुष व्हावयास घेत्यें आणि यादिवसापासून पुढें यापेक्षां उत्तम किंवा वाईट धनाचे किंवा दरिद्राचे दशेंत रोगाचे किंवा आरोग्याचे समयीं देवाचे विधिप्रमाणें मरण आमचा विप्रयोग करीपर्यंत तुजवर प्रीति ठेवीत आणि तुझें पालन व तुझी मान्यता करीत जायास तुला मी आपलें सत्यवचन देत्यें

तेव्हां पुनः त्यानीं आपले हात सोडावे आणि पुरुषानें स्त्रीला वळें देऊन पुस्तकावर ठवावें नंतर आचार्यानें तें घेऊन स्त्रीचे डावे हातचे करांगळी जवळचे बोटांत घालायासाठीं पुरुषाजवळ द्यावें आणि पुरुषानें तेथें वळें घालून धरून आचार्याचे मागें सांगावें.

या वळ्यानें मी तुशीं लग्न करितों मी आपले अंगानें तुझा सन्मान करितों आणि मी आपले सर्व धनाची संभागिनी



तुला करितों बापाचे आणि पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नामानें आमेन

तेव्हां पुरुषानें स्त्रीचे डावे हाताचे करांगळी जवळचे बोटांत वळें घात त्यावर दोघांनी गुडघे टेंकावे आणि आचार्यानें बोलावें.

आपण प्रार्थना करूं

हे सनातन देवा सर्व मनुष्यांचे उत्पन्नकरणाऱ्या व पाळणाऱ्या सर्व आत्मिक सत्गुणदायका सनातन जीवनाचे सागरा तुझे ज्यां सेवकांला आह्मी तुझे नामानें आशीर्वाद सांगतों असा या पुरुषाला व या स्त्रीला तूं आपला आशीर्वाद पाठवून दे अशासाठीं कीं जशीं इज्हाक व रिब्का विश्वासुपणें एकत्र वर्त्तलीं तसें या दोघानीं जो नवस व जी संधा एकमेकाशीं केलीं आहेत तीं यानीं निश्चयें पाळावीं आणि पूर्ण प्रीतीनें व स्वास्थ्यानें एकत्र राहून तुझे आज्ञांप्रमाणें चालावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

नंतर आचार्यानें त्यां दोघांचे हात जोडून सांगावें.

जीं देवानें जोडिलीं आहेत त्यांचा वियोग कोणी करूं नये

तेव्हां आचार्यानें लोकांला सांगावें.

—— आणि —— पवित्र लग्नांत परस्पर मान्य झालीं आहेत आणि याविषयीं देवासमोर आणि या मंडळी समोर त्यानीं साक्ष दिली आहे व याविषयीं त्यानीं एकमेकांला आपलें सत्यवचन दिलें आहे व परस्पर वळें देऊन व घेऊन हात

जोडून त्यानीं हें दाखविलें आहे यास्तव मी ठरवितों सांगतों कीं तीं दादला आणि बायको अशीं झालीं आहेत बापाचें आणि पुत्राचें आणि पवित्र आत्म्याचे नामानें आमेन

नंतर आचार्यानें हा आशीर्वाद सांगावा.

देव जो बाप देव जो पुत्र देव जो पवित्र आत्मा त्यानें तुमचें हित पालन आणि संरक्षण करावें ईश्वरानें प्रसादें करून तुह्मावर कृपादृष्टि करावी आणि तुह्माला त्यानें सर्व आत्मिक सत्गुणानें असें पूर्ण करावें कीं या आयुष्यांत तुह्मी एकत्र असें वर्त्ताल कीं परलोकीं तुह्माला सनातन जीवन प्राप्त होईल आमेन

नंतर आचार्यानें प्रभूचे मेजाजवळ जाऊन हें गीत सांगावें.

गीत १२८.

जो कोणी ईश्वराचें भय धरितो जो त्याचे मार्गांत चालतो तो धन्य आहे

कारण कीं तूं आपले हातांचें उद्योगफल खाशील तूं कल्याणयुक्त होशील आणि तुझें हित होईल

तुझे घराचे भिंतीशीं लाविलेल्या फलद द्राक्षेसारिखी तुझी स्त्री होईल जाईतांचे रोपांवाणीं तुझीं लेंकरें तुझे मेजा भोंवतीं होतील

पहा ईश्वराचें भय धरितो असा जो पुरुष तो तसाच सुखी होईल

जीयोनांतून ईश्वर तुला आशी देईल मग तूं आपले आयुष्याचे सर्वदिवसांत येरूशालेमाचें कुशल पाहात जा



तूं आपले लेंकरांचीं लेंकरेंहि पहात जा इस्राएलाचें समाधान असावें

अथवा हें गीत सांगावें.

गीत ६७.

देवानें आह्मावर दया व करावी आह्माला आशी द्यावी त्यानें आपलें मुखतेज आह्मावर पडूं द्यावें

अशासाठीं कीं सर्व पृथ्वींत तुझा मार्ग सर्व लोकांत तुझा उद्धार कळावा

हे देवा लोक तुझी स्तुति करीत सर्व लोक तुझी स्तुति करीत

लोक हर्षांत व उत्सव करीत कारण तूं लोकांचा न्याय यथार्थपणें करिशील व पृथ्वींतले लोकांची नीति करिशील

हे देवा लोक तुझी स्तुति करीत सर्व लोक तुझी स्तुति करीत

भूमि आपलें फल देईल व देव आमचा देव आह्माला आशी देईल देव आम्हास आशी देईल आणि पृथ्वीच्या सर्व सीमा त्याचें भय धरितील

गीत सांगितल्यावर पुरुष आणि स्त्री प्रभूचे मेजासमोर गुडघे टेंकीत असतां आचार्यानें मेजाजवळ उभें राहून त्यांजकडे वळून सांगावें.

हे ईश्वरा आम्हावर दया कर

उत्तर॥ हे ख्रिस्ता आम्हावर दया कर

आचार्य॥ हे ईश्वरा आह्मावर दया कर

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छे प्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे

जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास क्षमा कर आणि आह्माला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्माला तार आमेन

आचार्य॥ हे ईश्वरा तूं आपले सेवकाला आणि आपले सेवकीला तार

उत्तर॥ जीं तुजवर विश्वास ठेवितात त्यांला तार

आचार्य॥ हे ईश्वरा तूं आपले पवित्र स्थानापासून त्यांजवळ साहाय्य पाठवून दे

उत्तर॥ आणि त्यांचें संरक्षण सर्वदा कर

आचार्य॥ तूं त्यांसाठीं अगम्य दुर्ग हो

उत्तर॥ त्यांला त्यांचे वैऱ्यांपासून राखायला

आचार्य॥ हे ईश्वरा आमची प्रार्थना ऐक

उत्तर॥ आणि आमची आह्वति तुजवळ येवो

आचार्य.

हे आब्राहामाचे देवा इज्हाकाचे देवा याकोबाचे देवा तूं यां आपले सेवकांचें हित कर आणि यांचे मनांत सनातन जीवनाचें बीज पेर अशासाठीं कीं तुझे पवित्र गोष्टीचें जें कांहीं शिकतील तें यानीं आपले आचरणांत करावें हे ईश्वरा आकाशापासून यांजवर कृपादृष्टि करावी आणि यांचें हित करावें आणि जशी त्वां आपली आशी आब्राहाम व सारा यांजवर त्यांचे समाधानासाठीं पाठवून दिली तशी तूं यां आपले सेवकांवर कृपेनें आपली आशी पाठवून दे अशासाठीं कीं हीं तुझे इच्छेप्रमाणें वर्त्तत असतां



आणि तुझे आश्रयांत सर्वदा कुशलयुक्त असतां यांचें आयुष्य संपेपर्यंत तुझे प्रीतींत रहावीं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

स्त्रीचें गर्भधारणाचें आयुष्य संपलें असलें तर हो पुढली प्रार्थना बोलूं नये.

हे दयाळो ईश्वरा आकाशांतील बापा ज्या तुझे कृपेनें मनुष्यजाति वाढत्ये त्या तुला आह्मी विनवितों कीं तूं आपले आशीनें यां दोघांचें साहाय्य कर अशासाठीं कीं यांजकडून लेंकरें उत्पन्न व्हावीं आणि हीं सुप्रीतींत व सुनीतींत एवढा वेळ एकत्र वांचावीं कीं यानीं आपलीं लेंकरें ख्रिस्ती धर्मांत व सत्कर्मांत वर्त्तविलेलीं पहावीं तुझी स्तुति आणि तुझें गौरव व्हावें ह्मणून येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे देवा ज्या त्वां जेव्हां कांहीं नव्हतें तेव्हां आपले अनंत शक्तीनें सर्व पदार्थ उत्पन्न केले आणि (सृष्टीचीं दुसरीं प्रकरणें सिद्ध झालीं असतां) नेमिलें कीं पुरुषांतून (जो तुझे प्रतिमेप्रमाणें उत्पन्न केला होता) स्त्रीची उत्पत्ति पहिल्यानें व्हावी आणि त्यांस एकत्र जोडून दाखविलें कीं त्वां ज्यां दोघांस लग्नांत एक असें केलें आहे त्यांचा वियोग कधीं करूं नये हे देवा ज्या त्वां लग्नाची स्थिति एवढें उत्कृष्ट रहस्य व्हावयास प्रतिष्ठित केली आहे कीं तींत ख्रिस्त व त्याची मंडळी यांचें आत्मिक लग्न आणि एकत्व हीं उपलक्षित व निरूपित होतात तूं यां आपले सेवकांवर कृपा

दृष्टि कर अशासाठीं कीं तुझे वाक्याप्रमाणें या पुरुषानें आपले स्त्रीवर प्रीति करावी (जसी ख्रिस्तानें मंडळीवर प्रीति केली आणि आपले देहावाणीं तिची प्रीति व तिचें पोषण करितांना तिजसाठीं आपणातें दिलें) व ही स्त्री आपले पुरुषाला प्रिय आणि आवडती विश्वासु व मान्य असावी आणि हिनें शांति सावधपण आणि स्वास्थ्य यांकडून पवित्र व भक्तिवंत पतिव्रतांस अनुसरावें हे ईश्वरा तूं यां दोघांस आपली आशी दे आणि हीं तूं आपले सनातन राज्याचीं विभागी होऊं दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

नंतर आचार्यानें सांगावें.

ज्या सर्वसमर्थ देवानें पहिल्यानें आमचीं मूळचीं आई बापें जीं आदाम आणि हव्वा त्यांजला उत्पन्न केलें आणि त्यांस पवित्र लग्नांत एकत्र जोडिलें त्यानें तुह्मावर फार कृपा करून तुह्मास पवित्र करावें आणि तुह्माला आशी द्यावी अशासाठीं कीं तुम्ही देहानें व जीवात्म्यानें त्याला प्रिय असावें आणि तुमचें आयुष्य संपेपर्यंत पवित्र प्रीतींत एकत्र रहावें आमेन

नंतर दादला व बायको यांचे कार्याविषयीं कांहीं उपदेश जर नसला तर आचार्यानें ही पढली गोष्ट सांगावी.

ज्यां तुमचें लग्न झालें आहे अथवा जे तुम्ही लग्नाचे पवित्र स्थितींत व्हावयास संकल्पितां स्त्रियांकडे दादल्यांचें



कार्य आणि दादल्यांकडे स्त्रियांचें कार्य यांविषयीं जें पवित्र लेख ह्मणतो तें तुम्ही ऐका

पाऊलस साधु जें आपलें पत्र त्यानें एफेससकरांस लिहिलें आहे त्याचे पांचव्या अध्यायांत ज्यां पुरुषांचें लग्न झालें आहे त्यांस ही आज्ञा देतो कीं पुरुषानों तुह्मी आपले स्त्रियांवर प्रीति करा जशी ही ख्रिस्तानें आपले मंडळी वर प्रीति केली आणि तीजसाठीं आपणातें दिलें अशास कीं त्यानें तिला गोष्टीकडून पाण्याचे कुंडांत निर्मल करून पवित्र करावें अशासाठीं कीं तिला कलंक अथवा सुरकुती अशांतलें कांहीं नसतां पण ती पवित्र व निर्दोष असतां त्यानें आपल्यासाठीं तिला गौरवी मंडळी अशी पुढें ठेवावी तसेंच पुरुषांला जशी आपले अंगावर तशी आपले स्त्रियां वर प्रीति ठेवणें योग्य आहे जो आपले स्त्रीवर प्रीति करितो तो आपल्यावरच प्रीति करितो कांकीं कोणी आपले देहाचा द्वेष कधीं केला नाहीं पण यास पोषितो व पाळितो जसा प्रभुहि मंडळीला करितो कांकीं आह्मी त्याचे देहाचे व शरीराचे व त्याचे हाडांचे अवयव आहों यामुळें मनुष्य आपले आई बापांला सोडून आपले बायकोशीं चिकटला जाईल आणि तीं दोघें एकजण अशीं होतील हें मोठें रहस्य आहे पण ख्रिस्त व मंडळी यांविषयीं मी बोलतों तर तुह्मा सर्वांतला प्रत्येक जशी आपल्यावर प्रीति करितो तशी आपले बायकोवर प्रीति करो

याप्रमाणेंहि तोच पाऊलस साधु कोलोस्सेकरांस लिहि

तांना ज्यां सर्व पुरुषांचें लग्न झालें आहे त्यांस ह्मणतों पुरुषानीं तुम्ही आपले स्त्रियांवर प्रीति करा आणि त्यांशीं कडू होऊं नका

पेत्रस साधु जो ख्रिस्ताचा प्रेषित जो आपण विवाहित पुरुष होता तो ज्यांचें लग्न झालें आहे त्यांस जें ह्मणतो तेंहि तुह्मी ऐका कीं पुरुषानीं तुह्मी आपले स्त्रियांशीं ज्ञानानुसार राहतांना जसा अशक्त पात्राचा तसा स्त्रीचा सन्मान करा आणि तुमचे प्रार्थनांची अडचण नपडावी ह्मणून जशीं जीवन सुदानाचीं संविभागी तशीं एकच रहा

एथपर्यंत स्त्रीकडेस जें पुरुषाला केलें पाहिजे तें तुम्ही ऐकिलें आहे आतां स्त्रियानीं तुह्मासहि आपले दादल्यांकडेस जें करावें लागतें तें जसें पवित्रलेखांत सांगीतलें आहे तसें तुह्मी ऐकून घ्या

पाऊलस साधु एफेससकरांस लिहिलेले पत्रांत तुम्हास सांगतों कीं स्त्रियानीं तुह्मी जशा प्रभूला तशा आपले दादल्यांला वश्य असा कांकीं दादला बायकोचें शिर आहे जसा ख्रिस्तहि मंडळीचें शिर आहे तोहि शरीराचा तारक आहे तर जशी मंडळी ख्रिस्तास वश्य आहे तशा बायकाहि आपले दादल्यांस सर्वांविषयीं वश्य असाव्या अणखीं ह्मणतो कीं बायकोहि आपले दादल्याची भीड धरावी ह्मणून जपो

आणि पाऊलस साधु कोलोस्सैकरांस लिहिलेले पत्रांत हा धाकटा उपदेश तुह्माला करितो कीं स्त्रियानीं जसें प्रभूजवळ योग्य आहे तसें तुह्मी आपले दादल्यांस वश्य असा



पेत्रस साधुहि तुम्हाला उत्तम उपदेश करितो कीं स्त्रियानीं तुम्ही आपले दादल्यांला वश्य असा अशासाठीं अशासाठीं कीं जर गोष्टीला कोणी अमान्य आहेत तर गोष्टीवांचून स्त्रियांचे आचरणाकडून ते मिळविले जावे जेव्हां तुमचें भययुक्त पवित्र आचरण पाहतात तेव्हां ज्यां तुमची शोभा जी बाहेरील ह्मणजे केशांचें गुंफणें व भूषणांचें लेणें अथवा महामूल्य वस्त्रांचें धारण करणें ही नसो पण हृदयांतील गुप्त सुमनुष्य जे लीन आणि शांत मनाचे अक्षय्यसंभूषणांत असतां देवाचे देखतां महामूल्यच आहे ही असो कांकीं याप्रमाणें पुरातनकालीं ज्या पवित्र बायका देवावर भाव ठेवीत असत त्या आपले दादल्यांस वश्य असतांना आपणातें भूषीत असत जशी सारा आब्राहामास वश्य असतांना त्याला प्रभु ह्मणत असे ज्या तिच्या कन्या तुह्मी बरें करितांना व कांहीं विस्मयानें भयभीत नसतांना झाल्या आहां

समाप्त

## रोग्यांची संदर्शन पद्धति.

कोणी रोगांत पडला तर आचार्याला सूचना करावी मग त्यानें रोग्याचे घरांत येऊन बोलावें.

या घरांतील सर्व मनुष्यांचें कल्याण असो.

आचार्य जेव्हां रोग्याजवळ येतो तेव्हां गुडघे टेंकून बोलो.

हे ईश्वरा आमचे अन्याय अथवा आमचे वडलांचे अन्याय ध्यानांत धरूं नको हे उत्तम ईश्वरा आह्माला वांचू दे जे तुझे लोक त्यां आपलें रक्त त्यांसाठीं खंडणीस देऊन परत घेतले आहेत ते वांचू दे आणि आह्मावर तुझा क्रोध सर्व काळ नसावा

उत्तर॥ हे उत्तम ईश्वरा आम्हाला वांचूं दे

नंतर आचार्यानें बोलावें.

आपण प्रार्थना करूं.

हे ईश्वरा आह्मावर दया कर.

उत्तर॥ हे ख्रिस्ता आह्मावर दया कर

आचार्य॥ हे ईश्वरा आम्हावर दया कर

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छे प्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे जशी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आह्मास



क्षमा कर आणि आह्माला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्माला तार आमेन

आचार्य॥ हे ईश्वरा तूं आपले सेवकाला तार

उत्तर॥ जो आपला भाव तुजवर ठेवितो त्याला

आचार्य॥ तूं आपले पवित्र स्थानांतून त्याला साहाय्य पाठवून दे

उत्तर॥ आणि त्याचें रक्षण सर्वदा पराक्रमानें कर

आचार्य॥ वैऱ्याचें बळ त्याजवर चालूं देऊं नको

उत्तर॥ आणि त्याला उपद्रव करायास दुष्टाला जवळ येऊं देऊं नको

आचार्य॥ हे ईश्वरा तूं त्यासाठीं अगम्य दुर्ग हो

उत्तर॥ त्याला त्याचे वैऱ्यांपासून रक्षायाला असा हो

आचार्य॥ हे ईश्वरा आमच्या प्रार्थना ऐक

उत्तर॥ आणि आमची आव्हाति तुजवळ येवो

आचार्य.

हे ईश्वारा तूं आकाशांतून खालीं दृष्टि लावून या आपले सेवकाला पहा आणि याचे भेटीस येऊन याची शांति कर तूं आपले कृपादृष्टीनें याला पहा याचें समाधान कर आणि याला तुजवर स्थिर विश्वास ठेवूं दे वैऱ्याचे धोंक्या पासून याला तार आणि निरंतर सामर्थ्यांत व कुशलांत याला राख येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे सर्वसमर्थ आणि परम दयाळो देवा व तारणाऱ्या आमचें एक जो तुझा सेवक रोगानें पीडित आहे याजवर

तूं आपली स्वाभाविक कृपा कर तूं ही आपली दयालु शिक्षा याला पवित्र कारक घडीव अशासाठीं कीं हा आपलें अशक्तपण समजून याचा विश्वास अधिक स्थिर व्हावा आणि याचा पश्चात्ताप अधिक भारी व्हावा अशासाठीं कीं याजला बरें करायाची जर तुझी मर्जी असली तर यानें आपलें उरलें आयुष्य तुझे भक्तींत व तुझे गौरवासाठीं क्रमावें अथवा हें तुझें शासन असें सोसायास याला सत्वगुण दे कीं हें दुखःदायक आयुष्य संपल्यावर हा तुशीं सनातन जीवनांत रहावा असें आह्मी तुला विनवितों येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन.

नंतर आचार्यानें रोग्याला याप्रकारें संबोध करावा.

हे प्रिय तुला समजावें कीं जो सर्वसमर्थ देव तो जीवन व मरण आणि त्यांसंबंधीं जें कांहीं आहे ह्मणजे तरूणपण शक्ति आरोग्य जरा अशक्तपण व रोग यां सर्वांचा प्रभु आहे यास्तव कोणताहि जो तुझा रोग असेल तो त्वां निश्चयें समजावें कीं देवानें पाठविलेला आहे आणि ज्या कोणत्याहि कारणास्तव तुला हा रोग पाठविला असेल दुसऱ्याचे संबोधासाठीं तुझी सहनता पारखावी आणि प्रभूचे दिवसीं तुझें गौरव व अनंतसुख वाढायासाठीं तुझा विश्वास प्रशस्य सुयोग्य व सन्मान्य निघावा म्हणून जर असेल अथवा दिव्य बापाचे दृष्टीनें जें तुजमध्यें वाईट दिसतें तें दूर करायाला जर पाठविलेला असला तर त्वां निश्चयें जाणावें कीं तूं आपले पापांचा खरा पश्चात्ताप जर करिशील



आणि आपली पीडा जर सहनतेनें सोशिशील आणि देवाचे प्रिय पुत्र येशू ख्रिस्ताकडून जी देवाची कृपा होत्ये तिजवर भाव ठेवितांना आणि त्याचे दयायुक्त शासनासाठीं त्याची उपकारस्तुति करितांना त्याचे इच्छेस जर मान्य होशील तर येणेंकरून तुझें हित होईल आणि सनातन जीवनाचे नीट मार्गांत चालायास तुला अधिक शक्ति मिळेल

जर रोगी फार पीडित असेल तर आचार्यानें आपला उपदेश इथें संपवावा नाहीं तर याप्रमाणें पुढें सांगावा.

यास्तव ईश्वर जें शासन करितो तें तुला बरें वाटावें कांकीं (जसें पाऊलस साधु इब्रीयांस लिहिलेले पत्रांत म्हणतो) ज्याजवर ईश्वर प्रीति करितो त्याची शिक्षा करितो आणि ज्या प्रत्येक पुत्राला घेतो त्याला फटके मारितो जर तुह्मी शिक्षा सोशितां तर जसें पुत्राशीं तसें तुम्हाशीं देव करितो कां तर ज्याची शिक्षा बाप करीत नाहीं तो कोणता पुत्र आहे मग ज्या शिक्षेचे विभागी सर्व होतात त्या शिक्षेरहित जर तुम्ही आहां तर तुम्ही पुत्र नाहीं पण कुंड आहां अणखीं आमचे देहाचे बाप आमचे शिक्षा करणारे होते खरे व त्यांची भीड आम्ही धरीत असों तर आह्मी वांचावें म्हणून आत्म्याचे बापाला फार अधिक मान्य न होऊं काय कांकीं थोडे दिवस ते जसें त्यांला बने तशी आमची शिक्षा करीत असत खरें पण तो आमचे हितासाठीं शिक्षा करितो आह्मी त्याचे पवित्रतेचे विभागी व्हावें म्हणून अशी प्रिय आत्म्यानों हीं वाक्यें पवित्र लेखांत

आमचें समाधान आणि संबोध यांसाठीं लिहिलीं आहेत अशास कीं जेव्हां कधीं आम्हावर कोणत्याहि प्रकारची आपदा लावायास आमचे दिव्य बापाचे मनोदयास येईल तेव्हां त्यानें लाविलेली जी शिक्षा ती आम्ही सहनतेनें व कृतज्ञतेनें सोसावी आणि आपदा कष्ट व रोग यांस सहनतेनें सोशिल्यानें ख्रिस्तासारिखें होणें यापेक्षां दुसरें ख्रिस्ती जनांस कांहीं सुखकारक नसावें कांकीं तो स्वतां पीडा सहन केल्यावांचून वरतीं अनंदांत गेला नाहीं क्रूसाचें मरण पावल्यापूर्वीं तो आपले गौरवांत शिरला नाहीं तर निश्चयें सनातन आनंदाकडेस आमचा मार्ग इथें ख्रिस्तावाणीं दुःखसोसणेंच आहे व ज्या द्वारांतून आम्हास सनातन जीवनांत जावें लागतें तें ख्रिस्तावाणीं हर्षेकरून मरणेंच आहे अशासाठीं कीं मरणापासून आम्ही पुनः उठावें आणि त्याजपाशीं सनातन जीवनांत राहावें यास्तव जी तुझी पीडा तुला अशी हितकारक आहे ती तूं सोशीकपणें घेतांना मी देवाचे नामानें तुला संबोध करितों कीं त्वां आपले बाप्तिस्म्यांत देवाकडे जो अंगीकार केला त्याचें स्मरण करावें आणि ज्या सात्विकन्यायाधीशानें सर्वांची न्यायाधीशी अपक्षतः करायाची आहे त्याजकडे या आयुष्यानंतर हिसाब दिला पाहिजे यास्तव त्वां आपली परीक्षा करावी आणि देवाकडे व मनुष्यांकडे तुझी स्थिती कशी आहे हें तुला समजावें म्हणून मी इच्छितों अशासाठीं कीं त्वां आपले दोष व आपली दंड योग्यता अंगीकारून आमचे दिव्य



बापापासून ख्रिस्ताकरितां कृपा प्राप्त करून घ्यावी आणि त्या भयंकर न्यायाधीशींत तुजवर दोष ठेविला न जावा व दंड लाविला न जावा यास्तव ख्रिस्ती मनुष्यास जसा योग्य आहे तसा विश्वास तूं धरितोस कीं नाहीं हें तुला समजावें म्हणून मी तुला आमचे धर्ममताचीं प्रकरणें सांगतों

इथें आचार्यानें मताचीं प्रकरणें याप्रमाणें सांगून पुसावीं.

देव जो सर्वसमर्थ बाप आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा त्याविषयीं तूं विश्वास धरितोस किं काय

आणि त्याचा एकुलता पुत्र जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो पवित्र आत्म्याचे योगेंकरून गर्भरूप झाला मारया जी कुमारी तिजकडून जन्मला पोंत्यस पिलातसाचे अधिकाराखालीं ज्यानें दुःखसहन केलें जो क्रूसावर बसविला गेला मरण पावला व पुरला गेला जो मृत्युलोकांत गेला तिसरे दिवसीं पुन्हां जीवंत होऊन मेलेल्यांमधून उठला आकाशांत चढला आणि सर्वसमर्थ देव जो बाप त्याचे उजवे हाताकडे बसला तेथून जीवंत व मेलेले यांची न्यायाधीशी करायाला येणार आहे त्याचा विश्वास धरितोस काय

पवित्र आत्मा जो एकच पवित्र मंडळी पवित्रमनुष्यांचें सहायत्व पापांची क्षमा देहाचें पुनरुत्थान आणि सनातन जीवन यांचा तूं विश्वास धरितोस काय

रोग्यानें हें उत्तर द्यावें.

हें सर्व मी स्थिरपणें विश्वासतों

नंतर आचार्यनें ही प्रार्थना बोलावी

हे परम कृपाळो देवा जो तूं आपले अत्यंत दयेप्रमाणें जे खरेपणें अनुतापी आहेत त्यांचीं पापें दूर करून त्यांचें कांहीं पुढें स्मरण करीत नाहींस हा जो तुझा सेवक पापांची क्षमा मनापासून फार इच्छितो याजवर तूं कृपादृष्टि कर जें कांहीं सैतानाचे कपटानें व द्वेषेंकरून अथवा आपले पापी स्वभावानें व अशक्तपणेंकरून यांतलें बिघडलें गेलें आहे तें हे प्रीतिवंत बापा याच्यांत नवें उत्पन्न कर या रोगी जनास मंडळीचे संबंधांत राखून स्थिर कर त्वां याचा अनुताप ध्यानांत आणावा याचीं आंसवें अंगीकारावीं आणि याजविषयीं जसें तुला उत्तम वाटेल तशी याची पीडा शांतवावी आणि हा आपला पूर्ण भाव केवळ तुझे दयेवर ठेवितो म्हणून याजवर याचे पूर्व दोष ठेवूं नको परंतु तूं आपले सुवंदित आत्म्याकडून याला शक्ति दे आणि याला या लोकांतून घ्यायास जेव्हां तुझे मनोदयास येईल तेव्हां तूं आपले दयेचे कवेंत घे तुझा परम प्रिय पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याचे पुण्याकरितां आमेन

नंतर आचार्यानें हें गीत बोलावें.

गीत ७१

तुला ईश्वरा मी शरण आलों आहें मी कधीं लज्जित होऊं नये तूं आपले न्यायाप्रमाणें मला सोडीव आणि मला मुक्त कर तूं आपला कान मजकडे लावून मला तार



नित्य आंत जायासाठीं तूं मला आश्रयाचा खडक हो त्वां माझें तारण करायाची आज्ञा दिली आहे कां तर तूं माझा कडा व माझा किल्ला आहेस

हे माझे देवा दुष्टांचे हातापासून अन्यायाचे आणि निर्दयाचे मुष्टीपासून मला मुक्त कर

कांकीं तूं माझा आशाविषय आहेस हे प्रभो देवा माझे बाळपणापासून तूं माझा विश्वासविषय आहेस

गर्भस्थानापासून मी तुजवर टेंकत आलों आहें माझे आईचे उदरापासून तूं माझा उपकारी आहेस तुजविषयीं माझें स्तुतिकरण नित्य होईल

बहुतांस मी आश्चर्य झालों आहें पण तूं माझा सुदृढ आश्रय आहेस

सारा दिवस तुझे स्तुतीनें आणि प्रशंसेनें माझें तोंड भरेल

वृद्धपणाचे समयीं मला टाकूं नको माझी शक्ति थकेल तेव्हां मला नको सोडूं

कांकीं माझे वैऱ्यानीं मजविषयीं संभाषण केलें आणि जे माझे जीवाला टपतात त्यानीं संमंत्रण केलें आहे कीं देवानें त्याला सोडिलें आहे त्याचे पाठीस लागा आणि त्याला धरा कांकीं मुक्त करणारा कोणी नाहीं

देवा मजपासून दूर होऊं नको हे माझे देवा माझे साहाय्यास लौकर ये

जे माझे जीवाला बाधतात ते विमनस्क होऊन नाश पावतील जे माझे उपद्रवास झटतात ते निंदेनें व अनादरानें वेष्टिले जातील

पण मी नित्य आशा धरीत जाईन आणि तुझी स्तुति अणखी अधिक करीत जाईन

सारा दिवस माझें तोंड तुझे न्यायाचें व तुझे तारणाचें कथन करील कां तर त्यांची गणती मला कळत नाहीं

प्रभु जो देव त्याचे सामर्थ्यानें चालेन तुझे तुझेच न्यायाची मात्र मी प्रशंसा करीन

देवा माझे बाळपणापासून तूं मला शिकवीत आलास आणि आजपर्यंत मी तुझीं आश्चर्य कर्में वर्णीत आलों आहें

तर वृद्धपण व केशशुक्लत्व यांतहि हे देवा मला सोडूं नको या पिढीला तुझें सामर्थ्य आणि प्रत्येक भविष्य पिढीला तुझा पराक्रम मी वर्णीं पर्यंत

हे देवा तुझा न्याय परात्पर आहे ज्या त्वां मोठीं कार्यें केलीं आहेत त्यातुसारिखा हे देवा कोण आहे

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

तेंव्हां आचार्यानें बोलावें.

हे जगाचे तारणाऱ्या ज्या त्वां आपलें क्रूसाचें दुःख व अमूल्य रक्त यांकडून आमचा उद्धार केला आहे हे प्रभो तूं आह्माला तार आणि आमचें साहाय्य कर असें आह्मी तुला विनवितों

मग आचार्यानें बोलावें.

जो सर्वसमर्थ ईश्वर त्याजवर जे विश्वास ठेवितात त्यां



सर्वांचा तो सुदृढ दुर्ग आहे ज्याला आकाशांतील व पृथ्वीं तील व पृथ्वी खालील सर्व पदार्थ प्रणमन व मान्यता करितात तो आतां व सर्वदा तुझा संरक्षक असावा आणि ज्याकडून तुझें कुशल व तारण होईल त्या आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे नामाशिवाय पृथ्वींत मनुष्याला दुसरें नाम दिलें नाहीं हें त्यानें तुला समजावावें आमेन

नंतरहि त्यानें बोलावें.

देवाचे कृपेला व संरक्षणाला आह्मी तुला सोंपितों ईश्वरानें तुला आशी द्यावी आणि तुला रक्षावें ईश्वरानें आपलें मुख तेज तुजवर पाडावें आणि तुला प्रसन्न व्हावें ईश्वरानें तुज वर खुलावें आणि आतां व सर्वदा तुला समाधान द्यावें आमेन

रोगीबालाविषयींची प्रार्थना

हे सर्वसमर्थ देवा दयाळो बापा जीवनाचे आणि मरणाचे निर्वाह तुझे स्वाधीन आहेत त्वां आकाशपासून या रोगी बालका वर कृपादृष्टि करावी ह्मणून तुला आम्ही विनवितों हे ईश्वरा तूं याला प्रसन्न होऊन याचें तारण कर तूं आपले नेमि लेले उत्तम समयीं याला याचे देहांतल्या दुःखापासून मुक्त कर आणि तूं आपले कृपेमुळें याचे जीवात्म्याचा उद्धार कर अशासाठीं कीं या लोकीं याचें आयुष्य दीर्घ करावयास तुझा मनोदय असला तर यानें विश्वासुपणें तुझी सेवा करून व आपले पिढीचें हित करून तुजसाठीं जीवावें आणि तुझे

गौरवाचें साधन व्हावें नाहींतर ज्यां दिव्य वस्त्यांत जे प्रभु येशूसंबंधी निजले आहेत त्यांचें जीवात्मे निरंतर समाधान व सुख भोगितात त्यांत याला दया करून घे हे ईश्वरा तूं आपले कृपादयांमुळें हें कर त्याच आमचे प्रभु येशू ख्रीस्ताचे योगानें जो तो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आहे आणि राज्य करितो तिघे मिळून एकच देव सनातनतः असतां आमेन

ज्या रोग्याचे वांचण्याची आशा केवळ थोडी आहे त्या विषयींची प्रार्थना

हे दयाळो बापा सर्व समाधान दायका देवा संकटाचे समयीं आमचे एकाच साहाय्यकर्त्या जो तुझा सेवक इथें तुझे हाताखालीं देहाचे फार अशक्तपणांत पडला आहे त्याचे साहाय्यासाठीं आह्मी तुजला शरण येतों याजवर हे ईश्वरा कृपादृष्टि कर आणि याचे शरीराचा जितका अधिक क्षय होतो तितकी अधिक तूं आपले पवित्र आत्म्याकडून याचे मनाची शक्ति वाढीव असें आह्मी तुला विनवितों याचे मनांत आपले सर्व घडलेले पापांचा खरा पश्चात्ताप आणि तुझे पुत्र येशू वरचा सत्य विश्वास उत्पन्न कर अशासाठीं कीं हा या लोकांतून आमचे दृष्टीपासून गेल्यापूर्वीं तुझे कृपेनें याचीं पापें दूर करावीं आणि याचे पापांची क्षमा आका शांत ठरावी हे ईश्वरा आह्मीं जाणतों कीं तुला कांहीं असें भावित नाहीं आणि तुझे मनोदयास येईल तर आतांहि याला बरें करायास आणि आह्मामध्यें अधिक वेळ याला



राहूं द्यायास समर्थ आहेस तथापि याचें मरण जवळ आहे असें दिसतांना आह्मी तुला विनवितों कीं याजला मरण पावा यासाठीं असें सिद्ध करावें कीं हा शांतींत व तुझे कृपेंत मरून गेल्यावर याचा जीवात्मा तुझे सनातन राज्यांत घेतला जावा येशू ख्रिस्त तुझा एकुलता पुत्र आमचा प्रभु व तारणारा याचें पुण्य आणि मध्यस्थी यांकडून आमेन

जो मरायास टेंकला आहे त्या विषयींची प्रार्थना.

हे सर्वसमर्थ देवा ज्या तुशीं सिद्ध मनुष्यांचे जीवात्मे बंधनवे श्मरूप देहापासून मुक्त झाल्यावर वांचतात जसें विश्वस्त उत्पन्न करणाऱ्याला आणि परम दयालु तारणाऱ्यला तसें जो तुझा सेवक आमचा प्रिय भाऊ याचा जीवात्मा आह्मी तुला सोंपितों तो तुझे दृष्टीस सुप्रिय असावा जें निर्दोष कोंकरूं जगाचें पापहरण करायासाठीं जिवें मारिलें गेलें त्याचे रक्तांत त्याला धू असें आह्मी तुला प्रार्थितों अशासाठीं कीं ह्या कष्टी व पापी जगांत इंद्रियां कडून किंवा सैतानाचे युक्तीं कडून त्याला जे दोष लागले असतील ते दूर केले असतां तो तुजपुढें पवित्र व निष्कलंक पोंचावा आणि जे आम्ही याचव वयासारिखे दुसरे मरणाचे दृष्टांतांमध्यें वांचतों त्यां आह्मास आमची नश्वर व अस्थिर दशा समजीव आणि जिथ पर्यंत आह्मी या लोकीं राहतों तिथपर्यंत जी पवित्र आणि दिव्य बुद्धि शेवटीं आह्माला सनातनजीवनांत पोंचवील ती आह्मास प्राप्त व्हावी ह्मणून आम्हाला आपलें कालक्रमण

चौकशीनें करून सुटूं दे येशू ख्रिस्त तुझा एकुलता पुत्र आमचा प्रभु याचे पुण्या करितां आमेन

जे आपले मनांत अथवा अंतःकरणांत व्याकुल आहेत त्यां विषयींची प्रार्थना.

हे सुवंदित ईश्वरा दयालु बापा सर्व समाधान दायक देवा तूं ह्या आपले सेवकावर दया कळवळा करून अवलोकन कर असें आह्मी तुला विनवितों याविषयीं कडू अर्थ तूं लिहितोस आणि याचे पूर्वदोष याचे ध्यानांत आणितोस याजवर तुझा क्रोध भारी आहे व याचा जीव फार व्याकुल आहे पण हे दयाळो देवा आमचे संबोधासाठीं त्वां आपली पवित्र गोष्ट लिहिली आहे अशास कीं सहिष्णुता आणि तुझा पवित्रलेख यांकडून आह्माला आशा असावी याजला आपल्याविषयीं आणि तुझा धमक्या व तुझीं वचनें यां विषयीं शुद्धबोध दे अशासाठीं कीं यानें आपला भाव सोडूं नये आणि तुजशिवाय दुसऱ्या कोणावर ठेवूं नये याला आपले सर्व परीक्षांवर बळ दे आणि याचे सर्व विकार बरे कर ठेंचलेला बोरू मोडूं नको धुमसता ताग विझवूं नको क्रोधें करून तूं आपली दया व कळवळा बंद करूं नको पण जीं हाडें त्वां मोडिलीं आहेत तीं आनंदित व्हावीं ह्मणून याला हर्षाचा व उल्हासाचा शब्द ऐकूं दे वैऱ्यांचे भयापासून याला मुक्त कर आणि आपलें मुखतेज याजवर पाडून याला समाधान दे येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचें पुण्य आणि मध्यस्थी यांकडून आमेन



# प्रेतकार्याची पद्धति

इथे जाणावें कीं बाप्तिस्म्यारहित असतांना अथवा मंडळीबहिष्कृत असतांना किंवा स्वयंमारण करून जे मेले यांसाठीं ही पद्धति योजायाची नाहीं.

आचार्य व लेखक प्रतयनाचे प्रवेशाजवळ प्रताची भेट करून त्याजपुढें सभामंदिरांत अथवा कबरेस जातांना हें बोलोत.

प्रभु ह्मणतो मी पुनरुत्थान व जीवन आहें जो मजवर विश्वास ठेवितो जरीं मेला असला तरीं जीवेल आणि जो कोणी जीवतांना मजवर विश्वास ठेवितो तो कधीं मरणार नाहीं ॐ योहान्न ११. २५, २६.

मी जाणतों कीं माझा उद्धरणारा जीवंत आहे आणि अंतकाळीं तो भूमीवर उभा ठाकेल आणि माझी त्वचा नष्ट झाल्यानंतर जरीं किडे हें शरीर नाशितील तरीं मी आपले देहांतून देवाला पाहीन ज्या त्याला मी आपलेसाठीं स्वतां पाहीन आणि माझे स्थानीं दुसरा असें नाहीं पण माझेच डोळे अवलोकन करितील ॐ योब १९.२५,२६,२७.

या जगांत आह्मीं कांहीं आणिलें नाहीं आणि स्पष्ट आहे कीं आमच्याने कांहीं नेवत नाहीं ईश्वरानें दिलें आणि ईश्वरानेंच काढून घेतलें आहे ईश्वराचें नाम सुवंदित असावें ॐ १ तिम. ६. ७. योब. १. २१.

सभामंदिरांत आल्यावर या दोहों गीतांतलें एक वाचावें अथवा दोन्ही वाचावीं.

## गीत ३९.

मी म्हणालों म्यां आपले जिव्हेनें पाप न करावें म्हणून मी आपले आचरणास जपेन जेव्हां दुष्ट माझे पुढें आहे तेव्हां मी आपलें तोंड बंधनानें राखीन

मौन धरून मी मुका राहिलों उत्तमाविषयींहि उगा राहिलों आणि माझा खेद उत्तेजित झाला

मजमध्यें माझें हृदय संतप्त झालें माझे संतापानें अग्नि जळला तेव्हां मी आपले जिभेनें बोलिलों

हे ईश्वरा माझा अंतकाळ मला कळीव आणि माझे दिवसांचें परिमाण काय आहे हें मला समजीव मी केवढा नश्वर आहें हें मला समजावें

पहा त्वां माझे दिवस चतुरंगुल असे केले आहेत आणि तुजपुढें माझें आयुष्य कांहीं नाहीं प्रत्येक मनुष्य आपले उत्तम स्थितींतहि केवळ व्यर्थपणच आहे खरें

निश्चयें मनुष्य छायेवाणीं जातो खचीत लोक व्यर्थ खटपट करितात मनुष्य धन सांठवितो आणि तें कोण भोगील हें त्याला कळत नाहीं

तर आतां हे प्रभो मी कशाची वाट पाहूं माझी आशा तुजवरच आहे

माझे सर्व दोषांपासून मला मुक्त कर मूर्खास निंद्य मला करूं नको



मी मुका राहिलों म्यां आपलें तोंड उघडलें नाहीं कारण त्वां तें केलें होतें

तूं आपला प्रहार मजपासून दूर कर तुझे हाताचे नेटानें मी नाहींसा झालों आहें

अन्यायामुळें जेव्हां तूं दंडाकडून मनुष्य शिक्षितोस तेव्हां कसरीवाणीं तूं त्याचे सुंदरतेचा क्षय करितोस प्रत्येक मनुष्य व्यर्थपणच आहे खरें

हे ईश्वरा माझी प्रार्थना ऐक माझे आहुतीला कान लाव माझे रडण्यास उगा राहूं नको कांकीं मी आपले सर्व वडिलांसारिखा तुजवळ विदेशी व आगंतुक आहें

मी जाईन आणि अदृष्ट होईन त्यापूर्वीं म्यां टवटवीत असावें ह्मणून मला असूं दे

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

## गीत ९०

हे ईश्वरा सर्व पिढ्यांत तूं आमचा आश्रय आहेस

पर्वत उत्पन्न झाल्यापूर्वीं व त्वां पृथ्वी व भूमि रचिल्यापूर्वीं अनादिकालापासून अनंतकालपर्यंत तूं देवच आहेस

मनुष्य तूं मातींत मिळवितोस आणि ह्मणतोस अहो मनुष्यांनों तुह्मी पालटलीं जा

कांकीं सहस्र वर्षे तुझे देखतां क्रांत कालचे दिवसासारिखीं व रात्रींतील प्रहरासारिखीं आहेत

त्यांस तूं पुराप्रमाणें वाहून नेतोस तीं स्वप्नच आहेत सकाळीं जसी हिरवळ उगवते तसीं

सकाळीं फुटून उगवते सांजे कापली जाते आणि सुकी होते

तर तुझे क्रोधानें आह्मी नाहींसे होतों आणि तुझे कोपानें व्याकुल होतों

त्वां आपले पुढें आमचे अन्याय व आपले मुखप्रकाशीं आमचीं गुप्त पातकें ठेविलीं आहेत

कांकीं तुझे रोषांत आमचे सर्व दिवस जातात आह्मी आपलीं वर्षें कल्पनेवारीं घालवितों

आमचे आयुष्याचे दिवसांचीं सत्तर वर्षें असतात आणि शक्तीकडून जर ऐशीं वर्षें असतील तरीं त्यांचा विभव कष्ट व दुःखच आहे कां तर तो लौकर संपतो आणि आम्ही उडून जातों

तुझे क्रोधाचें बळ कोण जाणे व तुझे भयानुसारच तुझा रोष आहे

आह्मास आपले दिवस गणायाला असें शिकीव कीं आम्हीं सुज्ञानबुद्धि पावूं

हे ईश्वरा किती वेळापर्यंत उशीर होईल तुला आपले सेवकांविषयीं अनुताप व्हावा

तूं आपले कृपेनें आह्मास लौकर तृप्त कर मग आह्मी आपले सर्व दिवस हर्ष व आनंद करीत जाऊं



ज्या दिवसांत त्वां आम्हास पीडिलें ज्या वर्षांत आह्मी कष्ट अनुभविले त्यांप्रमाणें आम्हाला आनंदित कर

तुझे सेवकांला तुझें कर्म आणि त्यांचे लेंकरांला तुझें गौरव प्रकट व्हावें

आणि ईश्वर जो आमचा देव त्याचा प्रसाद आह्मावर असावा आणि आह्मासाठीं आमचे हातचें काम तूं स्थिर कर आमचे हातचें काम तूं स्थिर कर

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

तेव्हां कोरिंथकरांस लिहिलेले पहिले पत्राचे पंधरावे अध्यायांतून काढिलेला हा भाग वाचावा.

१ कोर. १५. २०.

आतां ख्रिस्त मेलेल्यांमधून उठला आहे आणि निजलेल्यांतील पहिला उपज झाला आहे तर मनुष्याकडून मरण आलें यास्तव मनुष्याकडून मेलेल्यांचें पुनरुत्थान झालें आहे कांकीं आदामाचे संबंधेंकरून जसे सर्व मरतात तसे ख्रिस्ताचे संबंधेंकरून सर्व जीवंत केले जातील पण प्रत्येक आपले अनुक्रमेंकरून ख्रिस्त जो पहिला उपज नंतर त्याचे आगमाचे वेळेस जे ख्रिस्ताचे आहेत ते मग अंत येईल तेव्हां तो देवाला ह्मणजे बापाला राज्य सोंपील जेव्हां सर्व आधिपत्य आणि सर्व अधिकार व सर्व प्रताप तो नाहींसे करील कांकीं सर्व शत्रु तो आपले पायांखालीं

ठेवीपर्यंत त्याला राज्य करावें लागतें मृत्यु जो अंत्य शत्रु तो नाहींसा केला जाईल कांकीं देवानें सर्व अर्थ त्याचे पायां खालीं वश्य केले आहेत पण जेव्हां ह्मणतो कीं सर्व अर्थ वश्य केले आहेत तेव्हां स्पष्ट आहे कीं ज्यानें सर्व अर्थ त्याला वश्य केले तो त्यां अर्थांहून निराळा आहे जेव्हां सर्व अर्थ त्याला वश्य केले जातील तेव्हां ज्यानें सर्व अर्थ त्याला वश्य केले त्याला पुत्र आपणच वश्य होईल अशा साठीं कीं देव सर्व सर्वांत असावा जर मेलेले कधीं उठत नाहींत तर जे मेलेल्यांचे स्थानीं बाप्तिस्मा पावले ते काय करितील व मेलेल्यांचे स्थानीं ते बाप्तिस्मा कां घेतात आणि प्रतिघटिकेस आम्ही कां धोक्यांत असतों जो तुम्हाविषयींचा हर्ष आमचे येशू ख्रिस्ताकडून मला आहे त्याजवरून मी साक्ष देतों कीं मी प्रतिदिवशीं मरण पावतों जरीं एफेससांत मी मनुष्यावाणीं श्वापदांशीं लढलों जर मेलेले उठत नाहींत तर मला काय प्राप्ति होईल आम्ही खावें प्यावें कांकीं उद्यां मरून जाऊं तुह्मी भ्रांत होऊं नका दुष्ट संभाषणें सद्‌गुणांस बिघडितात तुह्मी न्यायतः सावध असा आणि पाप करूं नका कांकीं कित्येकांला देवाविषयीं अज्ञान आहे तुम्हाला लाज वाटावी ह्मणून मी हें ह्मणतों पण कोणी ह्मणेल मेलेले कसे उठतील आणि कसला देह धरून येतील हे निर्बुद्धे जें तूं पेरितोस तें लय पावल्यावांचून जीवंत होत नाहीं आणि जें तूं पेरितोस तें जो अवयवी पदार्थ उत्पन्न होईल तो पेरीत नाहींस पण नुसें धान्य गव्हांचें अथवा



दुसरें कशा एकाचें असेल तें पेरितोस आणि देवानें जसें इच्छिलें आहे तसें त्याजला तो अंग देतो आणि बीजां तील प्रत्येकास आपलेंच अंग देतो सर्व देहसार समान प्रक तीचा नव्हे पण मनुष्यांचा देहसार एक प्रकारचा आहे खरें आणि दुसरा पशूंचा आणि दुसरा मत्स्यांचा आणि दुसरा पक्ष्यांचा आकाशांतील गोचर व पृथ्वींतील गोचर आहेत पण जे आकाशांतील त्यांचें वैभव निराळें आणि पृथ्वींतील जे त्यांचें वैभव निराळें आहे खरें एक वैभव सूर्याचें आणि दुसरें वैभव चंद्राचें आणि तिसरें वैभव ताऱ्यांचें आहे आणि एक तारा दुसऱ्ये ताऱ्यांपेक्षां वैभवानें निराळा आहे मेलेल्यांचें पुनरुत्थानहि तसेंच आहे शरीर क्षयी पेरिलें जातें तें अक्षय उठतें अनादरानें पेरिलें जातें वैभवानें उठतें अशक्त पेरिलें जातें समर्थ उठतें प्राकृत शरीर पेरिलें जातें आत्मिक शरीर उठतें प्राकृत शरीर तर आहे व आत्मिक शरीरहि आहे लिहिलेंहि आहे पहिला मनुष्य जो आदाम तो जीवंत प्राणी झाला अंत्य आदाम जीवदायक आत्मा झाला तर जें आत्मिक तें प्रथम नव्हतें पण जें प्राकृत तें होतें नंतर जें आत्मिक तें झालें पहिला मनुष्य पृथ्वींतील मातीचा होता दुसरा मनुष्य आकाशांतील प्रभूच आहे जसा तो मातीचा होता तसेच जे मातीचे ते आहेत आणि जसा तो आकाशांतील तसे जे आकाशां तील ते आहेत आणि जशी त्या मार्त्तिकाची प्रतिमा आम्ही धरिली तशी त्या दिव्याची प्रतिमा आह्मी धरूं

तर भाव्वांनों मी हें ह्मणतों कीं मांस आणि रक्त यांच्यानें देवाचे राज्याचा विभाग घेवत नाहीं आणि क्षयाच्यानें अक्षयतेचा विभाग घेवत नाहीं पहा मी तुह्मास रहस्य सांगतों आह्मी सर्व निजायाचे नाहीं पण आह्मी सर्व पालटले जाणार आहों क्षणीं नेत्रनिमिषीं अंत्य करणा वाजतां (कांकीं करणा वाजेल) आणि मेलेले अक्षय उठतील व आह्मी पालटले जाऊं कांकीं या क्षय्याला अक्षयता धरावी लागत्ये आणि या मर्त्याला अमर्त्यता धरावी लागत्ये आणि हें क्षयी अक्षयता धरील व हें मर्त्य अमर्त्यता धरील तेव्हां जें वचन लिहिलें आहे तें प्रत्ययास येईल कीं मृत्यु विजयांत बुडाला आहे अरे मृत्यु तुझा विषकंटक कोठें आहे अगे कबरे तुझा विजय कोठें आहे मृत्यूचा विषकंटक पापच आहे आणि पापाचें बलकारण नेमच आहे पण जो देव आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून आह्मास विजय देतो त्याची उपकारस्तुति करावी यास्तव माझे प्रिय भाव्वांनों तुह्मी स्थिर अचळ असा ईश्वराचे कामांत फार प्रयत्न करीत जा कां तर तुह्मी जाणतां कीं ईश्वरसंबंधी जो तुमचा उद्योग तो व्यर्थ पडणार नाहीं

लोक कबरेजवळ आले असतां प्रेत भूमींत ठेवायासाठीं सिद्ध करित्ये वेळेस आचार्यानें बोलावें.

स्त्रियेकडून जन्मलेलें मनुष्य अल्पायुष्य व कष्टार्त्त आहे फुला प्रमाणें निघतें व म्लान होतें पळतेंहि छायेवाणीं आणि टिकत नाहीं



आह्मी जीवनांत असतां मरणांतच आहों हे ईश्वरा जो तूं आमचे पापांमुळें न्यायतः रुष्ट आहेस तुजवांचून आम्हीं कोणापासून साहाय्य मागूं

तथापि हे परमपवित्र ईश्वरा देवा हे परमसमर्थ ईश्वरा हे पवित्र आणि परमदयालु तारणाऱ्या सनातन मरणाचे पोटांत आह्मास पडूं देऊं नको

हे ईश्वरा जें जें आमचे हृदयांत गुप्त आहे तें तें तूं जाणतोस कृपा करून तूं आपले कान आमचे प्रार्थनेपासून झांकूं नको पण हे परमदयालो ईश्वरा हे परमसमर्थ देवा हे पवित्र आणि दयालु तारणाऱ्या परमयोग्य सनातन न्यायाधीशा आमचे अंतकाळीं आम्हाला मरणाचे कंच्याहि दुःखांकडून तुजपासून भ्रष्ट होऊं देऊं नको

मग प्रेतावर माती टाकिते समयीं आचार्यानें बोलावें

सर्वसमर्थ देवानें आपले परमकृपेनें जो आमचा प्रिय भाऊ आतां मरून गेला आहे त्याचा जीवात्मा आपले जवळ घ्यायास इच्छिलें आहे ह्मणून आह्मी याचें प्रेत मातींत ठेवितों तें माती मातींत रक्षा रक्षेंत धूलि धूलींत असें आम्हीं ठेवितांना सनातन जीवनासाठीं जें पुनरुत्थान आमचे प्रभु येशू ख्रिस्ताकडून होईल त्याची सत्य निश्चित आशा धरितों तो आमचें नीच शरीर तें त्याचे गौरवी शरीरासारिखें व्हावें म्हणून ज्या परमशक्तीनें तो आपलेसाठीं सर्व वश करायास समर्थ आहे तिजकडून अन्यस्थित करील

नंतर हें बोलावें.

म्यां आकाशवाणी मशीं बोलतां ऐकिलें कीं तूं लिह आतांपासून जे मेलेले प्रभूचा संबंध धरून मरून गेले आहेत ते धन्य आहेत असेंच पवित्र आत्मा म्हणतो कारण कीं ते आपले श्रम झाल्यावर विसांवा घेत आहेत

मग आचार्यानें बोलावें

हे ईश्वरा आम्हावर दया कर

उत्तर। हे ख्रिस्ता आम्हावर दया कर.

हे ईश्वरा आम्हावर दया कर

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छे प्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आम्हाला दे जशी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आह्मास क्षमा कर आणि आह्माला परीक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आह्माला तार आमेन

हे सर्वसमर्थ देवा ज्या तुजपाशीं जे प्रभूचा संबंध धरून मरून जातात त्यांचे जीवात्मे वांचतात आणि विश्वस्तांचे जीवात्मे देहाचे भारापासून मुक्त झाल्यावर आनंद व सुख भोगितात हा आमचा भाऊ या पापी जगाचे कष्टांतून मुक्त करायास तुझे मनोदयास आलें आहे ह्मणून आह्मी मनापासून तुझी उपकारस्तुति करितों आणि तुला विनवितों कीं फार कृपा करून तुझे निवडलेल्यांची गणती पूर्ण करायास आणि तुझें राज्य लौकर स्थापायास तुझा मनोदय असावा अशासाठीं कीं आह्मास व जे सर्व तुझे पवित्र नामाचा सत्य विश्वास धरून मरून गेले आहेत त्यांस देहाची व आत्म्याची पूर्ण सिद्धि आणि सुख तुझे सनातन गौरवांत प्राप्त व्हावीं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे कृपालो देवा आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे बापा जो तो पुनरुत्थान व जीवनच आहे ज्या त्याजवर जो कोणी विश्वास ठेवील तो जरीं मेला असला तरीं वांचेल आणि जो कोणीं जीवंत असतांना त्याजवर विश्वास ठेवितो तो सनातनत: मरणार नाहीं ज्यानें आपल्या प्रेषित पाऊलसाकडूनहि आम्हास संबोध केला आहे कीं जे त्याचा संबंध धरून निजले आहेत त्यांविषयीं आह्मीं आशारहित मनुष्यांसारिखे शोकग्रस्त होऊं नये हे बापा आम्ही तुला विनवितों कीं आह्माला पापाचे मरणांतून पवित्रतेचे जीवनांत उठवावें अशासाठीं कीं जशी या आमचे भावला ख्रिस्तापाशीं शांति प्राप्त झाली आहे म्हणून आमची आशा आहे तशी आह्मी मरून जाऊं तेव्हां आह्मालाहि प्राप्त व्हावी आणि अशासाठीं कीं अंत्यदिवसांतील सामान्य पुनरुत्थानांत आह्मीं तुजला मान्य व्हांवे आणि जे तुजवर प्रीति ठेवितात व तुझें भय धरितात त्यां सर्वांस जो आशीर्वाद तुझा सुप्रिय पुत्र सांगेल कीं अहो माझे बापाचे आशीर्वादित तुह्मी या जें राज्य जगाचे उत्पत्तीपासून तुम्हासाठीं सिद्ध केलेलें तें घ्या तो

आह्मास प्राप्त व्हावा हे दयाळो बापा आम्ही तुला विनवितों कीं येशू ख्रिस्त आमचा मध्यस्थ व तारणारा याकडून हें आम्हाला द्यावें आमेन

आमचे प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा आणि देवाची प्रीति आणि पवित्र आत्म्याचें सहायत्व आह्मा सर्वपाशी सर्वदा असावें आमेन



# शापोच्चारण

ह्मणजे पापी लोकांवर जो देवाचा क्रोध व त्याचे जे दंड त्यांचें उच्चारण

सकाळचे प्रार्थनेनंतर विनंती झाल्यावर आचार्यानें सांगावें.

भाव्वानों पुरातन मंडळींत पवित्र शासन असे ह्मणजे उपोषणसमयाचे आरंभीं जे जन विशेष पापांचे दोषी ठरले होते ते लौकिक शिक्षेंत घातले गेले आणि या लोकीं दंड पावले अशासाठीं कीं प्रभूचे दिवसीं त्यांचे जीवात्मे तारिले जावें व दुसरे लोकानीं त्याचे उदाहरणावरून संबोध घेऊन पाप करण्याचें भय अधिक धरावें

त्या लौकिक शिक्षेचे स्थानीं बरें समजलें आहे कीं देवाचे शापांचीं जीं सामान्य वाक्यें निरनुतापी पाप्यांवर सांगीतलेलीं आहेत तीं वाचावीं तीं दुसरे नियमवादाचे सत्ता विसावे अध्यायांतून आणि लेखाचे दुसऱ्या ठिकाणांतून काढिलेली आहेत आणि नेमिलेलें आहे कीं तुह्मीं प्रत्येक वाक्याविषयीं आमेन म्हणून सांगावें अशासाठीं कीं पाप्यांवर जो देवाचा फार क्रोध आहे त्याविषयीं तुह्मीं संबोध घेऊन उत्सुक व खरा पश्चात्ताप करायास उत्कंठित व्हावें व ज्यां पातकांस तुह्मीं आपले तोंडानीं देवाचे शापास योग्य ह्मणतां तीं वर्जून यां जोखमी दिवसांत फार चौकशीनें वर्त्तावें

जो कोणी मनुष्य कोरींव अथवा ओतींव मूर्त्ति दुजला भजायासाठीं करितो तो शापग्रस्त आहे

उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जो आपले बापाला अथवा आईला शापितो तो शापग्रस्त आहे

उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जो आपले शेजाऱ्याचे भूमिसीमेची खूण सारितो तो शापग्रस्त आहे

उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जो आंधळ्याला त्याचे वाटेंतून बहकावितो तो शापग्रस्त आहे

उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जो विदेशीयाचा बापपोरक्याचा अथवा विधवेचा अनृत न्याय करितो तो शापग्रस्त आहे

उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जो आपले शेजाऱ्याला गुप्तरूपें हाणितो तो शापग्रस्त आहे

उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जो निर्दोष्याचा घात करायासाठीं लांच घेतो तो शापग्रस्त आहे

उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जो मनुष्यावर आपला भाव ठेवून मनुष्याचा आश्रय धरून आपले मनानें ईश्वरापासून फिरून जातो तो शापग्रस्त आहे



उत्तर ॥ आमेन

आचार्य ॥ जे निर्दय व्यभिचारी जारकर्मी लोभिष्ठ मूर्त्तिपुजक चहाड अतिमद्यपी आणि हरक ते शापग्रस्त आहेत

उत्तर ॥ आमेन

आचार्यानें सांगावें.

तर जे सर्व देवाचे आज्ञांपासून बहकतात [जसें दावीद ह्मणतो] शापग्रस्त आहेत यास्तव अह्मी [जो भयंकर दंड आमचे डोक्यांवर लोंबतो आणि सर्वदा आह्मावर पडायाला सिद्ध आहे तो आठवून] फार अनुताप व नम्रता धरून ईश्वर जो आमचा देव त्याजकडे फिरावें आह्मी आपले पापी आचरणाविषयीं शोक आणि खेद करावे आपले अपराध अंगीकारावे आणि पश्चात्तापाचीं योग्य फलें द्यायास झटावें कां तर आतां झाडांचे मुळांशीं कुऱ्हाड ठेविली आहे मग ज कोणिक झाड चांगलें फल देत नाहीं तें कापिलें जातें आणि अग्नींत टाकिलें जातें जीवंत देवाचे हातांत पडणें भयंकरच आहे पाश अग्नि गंधक जौळ आणि वादळ यांची वृष्टि तो पाप्यांवर पाडील हाच घ्यायासाठीं त्यांचा वांटा होईल तर पहा जे पृथ्वीवर वस्ती करितात त्यांचे दुष्टपणाचा दंड करायाला ईश्वर आपले स्थानांतून निघतो पण तो येईल तेव्हां कोण स्थिर राहील तो प्रकट होईल तेव्हां कोण धीर धरील त्याचें सूप त्याचे हातांत आहे आणि तो आपलें खळें निर्मळ

करून आपला गहूं गोळा करून कोठारांत सांठवील पण जो अग्नि विझायाचा नाहीं त्यांत भूंस जाळील जसा चोर रात्रीं येतो तसा प्रभूचा दिवस येईल आणि कुशल व सर्व सला मत आहे असें जेव्हां मनुष्यें ह्मणतील तेव्हां जशी प्रसूतीची वेदना स्त्रीला लागत्ये तसा त्यांचा आकस्मिक नाश होईल आणि ते निभावणार नाहींत त्या सूड उगविण्याचे दिवशीं देवाचा जो क्रोध हट्टी पाप्यानीं आपलेसाठीं भारी केला आहे तो प्रकट होईल जे ते देवानें त्यांजला पश्चात्ताप करायला नित्य संबोध दिला तेव्हां त्याची कृपा व सहिष्णुता तुच्छ मानीत असत त्यावेळेस [ ईश्वर म्हणतो ] ते मला आह्वति करितील पण मी ऐकणार नाहीं ते मनापासून मला शोधितील पण मजप्रत पावणार नाहींत कारण कीं ते ज्ञानाचा द्वेष करीत असत आणि ईश्वराचें भय धरीत नसत पण त्यांला माझे उपदेशाचा कंटाळा वाटत असे व ते माझा संबोध तुच्छ मानीत असत त्यासमयीं दार लाविलें असतां दार ठोकणें व्यर्थ होईल आणि न्यायाची वेळ आली असतां कृपेसाठीं जरीं आह्वति केली तरीं चालणार नाहीं अरे यथार्थ न्यायाधीशीची जी भयंकर वाणी त्यांजवर उच्चारिली जाईल तेव्हां त्यांला असें म्हटलें जाईल कीं अहो शापग्रस्त जो सनातन अग्नि सैतानासाठीं व त्याचे दूतांसाठीं सिद्ध केला आहे त्यांत तुम्ही जा यास्तव भाव्वानों तारणाचा समय असतांना आतांच तुह्मी सावध असा कां तर जिजमध्यें कोणाच्यानें काम करवत नाहीं ती रात्रि येत आहे आणि आह्मास उजेड असतांना उजेडांत



आम्ही विश्वास धरीत जाऊं आणि उजेडाचे लेंकरांसारिखे चालत जाऊं अशासाठीं कीं ज्या निबिड अंधारांत रडणें व दांत खाणें आहे त्यांत आह्मी टाकिले न जावे जो आह्मास आपलें आचरण शुद्ध करायाला संबोध देतो ज्यानेंहि आपले अनंत कृपेनें आम्हाला जर आह्मी सात्विक आणि खऱ्या मनेंकरून त्याजकडे फिरूं तर घडलेले पापांचे क्षमेचें वचन दिलें आहे त्याची कृपा आह्मी अवमानूं नये कां कीं आमचीं पापें लाक्षेप्रमाणें तांबडीं असलीं तरीं तीं बर्फावाणी पांढरीं होतील आणि कृमिजेसारिखीं लोहित असलीं तरीं लोंकरीसारिखीं श्वेत होतील ईश्वर म्हणतो तुह्मी आपले सर्व दुष्टपणापासून फिरा ह्मणजे पाप तुमचें नाश कारण होणार नाहीं जो अधर्म तुम्ही करीत आलां आहां तो सर्व तुह्मी टाकून द्या तुह्मी आपलेसाठीं नवें मन आणि नवा स्वभाव करून घ्या अहो इस्राएलाचे वंशहो ईश्वर जो देव तो ह्मणतो कीं जो मरतो त्याचे मरणेंकरून माझा संतोष होत नाहीं तर मग तुह्मी कां मरतां तुह्मी फिरा ह्मणजे वांचाल जरीं तुह्मीं पाप केलें तरीं तुह्मास बापाजवळ मध्यस्थ आहे येशू ख्रिस्त जो न्यायी आहे तो आणि तोच आमचे पापांचा प्रायश्चित्त करणारा आहे आमचे अपराधांमुळें तो क्षती झाला व आमचे दुष्टपणामुळें तो हाणिला होता यास्तव सर्व खरे अनुतापी लोक जो कृपा करून घेतो त्याजकडे आह्मीं फिरावें असें करितांना आम्हीं निश्चित असावें कीं जर आह्मी त्याजकडे विश्वस्त पश्चात्ताप करून येऊं जर आम्ही

त्याला वश्य होऊं आणि यापुढें त्याचे मार्गांत चालूं जर आम्ही आपल्यावर त्याचें सुहित जोखड व त्याचा सुसह भार घेऊं नम्रता सहिष्णुता प्रियता धरून जर आम्ही त्यास अनुसरूं आणि त्याचे गौरवासाठीं झटून व आपले स्थितींत त्याची सेवा आणि उपकारस्तुति करून त्याचे पवित्र आत्म्याचे नीतीनें जर वर्त्तविले जाऊं तर आम्हाला घ्यायास व क्षमा करायास त्याचा मनोदय व इच्छा आहे जर हें आम्ही करूं तर नेमाचे दंडापासून आणि जे त्याचे डावे हाताकडेस ठेविले जातील त्यांजवर जो अंत्य शाप पडेल त्यापासून ख्रिस्त आम्हास मुक्त करील आणि तो आपले उजवे हाताकडेस आम्हास ठेवील आणि त्याचे गौरवी राज्याचा विभाग घ्यावा असें सांगून तो आपले बापाचा कृपावंत आशीर्वाद आम्हास देईल त्यानें आपले परमकृपेंकरून आम्हास सर्वांस त्या राज्यांत आणावें आमेन

नंतर सर्वांनीं गुडघे टेंकावे आणि आचार्यानें व लोकांनीं गुडघे टेंकून हें गीत बोलावें.

### गीत ५१.

हे देवा तूं आपले प्रसादाप्रमाणें मजवर दया कर तूं आपले परमकरुणेप्रमाणें माझे दोष पुसून टाक

मला माझे अन्यायापासून स्वच्छ धू आणि माझे पापापासून मला निर्मल कर

कांकीं मी आपले अपराध अंगीकारितों आणि माझें पाप मजपुढें नित्य आहे



तुजकडे केवळ तुजकडे म्यां पाप केलें आहे आणि तुझेच दृष्टींत म्यां वाईट घडलें आहे म्हणून जेव्हां तूं बोलशील तेव्हां न्यायी ठरशील आणि न्यायाधीशी जेव्हां करिशील तेव्हां स्वच्छ निघशील

पहा अन्यायांत मी उत्पन्न झालों आणि पापांत माझे आईनें माझें गर्भधारण केलें

पहा अंतर्यामांत सत्य असावें म्हणून इच्छितोस तर हृदाशयांत मला ज्ञान कळिवशील

तूं एजोबानें मला निर्मल कर मग स्वच्छ होईन मला धू म्हणजे बर्फापेक्षां पांढरा होईन

मला हर्ष व आनंद ऐकूं दे जीं हाडें त्वां मोडिलीं आहेत तीं हर्ष पावोत

माझे पातकांपासून तूं आपलें मुख आवरून घे आणि माझे सर्व अन्याय पुसून टाक

हे देवा मजमध्यें स्वच्छ हृदय उत्पन्न कर आणि माझे अंगीं शुद्ध आत्मा नवा कर

तूं आपले समोरून मला टाकूं नको आणि आपला पवित्र आत्मा मजपासून काढूं नको

तूं आपले तारणाचा हर्ष मला परत दे आणि आपले उदार आत्म्याकडून मला संभाळ

मग मी अपराध्यांस तुझे विधि शिकवीन आणि पातकी तुजकडे अनुतापून परत येतील

हे देवा माझे तारणाचे देवा हिंसा दोषापासून मला मुक्त

कर ह्मणजे माझी जीभ उत्सवानें तुझे न्यायाचें कथन करील

हे प्रभो माझे ओंठ तूं उघड आणि माझें तोंड तुझी स्तुति प्रशस्त सांगेल

कांकीं तूं बलि इच्छीत नाहींस नाहीं तर मी देतों अग्निष्टोम तुजला आवडत नाहीं

देवाचे बलि ह्मणजे अनुतप्त आत्मा अनुतप्त व नम्र झालेलें हृदय हे देवा तूं तुच्छ मानणार नाहींस

तूं आपले प्रसादानें जीयोनाचें हित कर येरूशलेमाचे कोट बांधून यथास्थित कर

तेव्हां पुण्य बलि अग्निष्टोम आणि सकलाग्निष्टोम तूं मान्य करिशील तेव्हांच लोक तुझे वेदीवर वृष अर्पण करितील

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें

जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

हे ईश्वरा आह्मावर दया कर

हे ख्रिस्ता आह्मावर दया कर

हे ईश्वरा आह्मावर दया कर

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे जशी आम्ही आपले अपराध्यांस क्षमा करितों तशी तूं आम्हास क्षमा कर आणि आह्माला परीक्षेंत आणू नको पण जें वाईट त्यापासून आम्हाला तार आमेन



आचार्य॥ हे ईश्वरा तूं आपले सेवकाला तार

उत्तर॥ जे आपला भाव तुजवर ठेवितात त्यांला

आचार्य॥ वरून त्यांला साहाय्य पाठवून दे

उत्तर॥ आणि सर्वदा त्यांचें संरक्षण पराक्रमानें कर

आचार्य॥ हे देवा आमचे तारणाऱ्या आमचें साहाय्य कर

उत्तर॥ तूं आपले नामाचे गौरवासाठीं आह्मास मुक्त कर तूं आपले नामासाठीं आम्हा पाप्यांवर दया कर

आचार्य॥ हे ईश्वरा आमची प्रार्थना ऐक

उत्तर॥ आणि आमची आह्नति तुजवळ येवो

आचार्य.

हे ईश्वरा आमच्या प्रार्थना कृपेंकरून ऐकाव्या ह्मणून आह्मी तुला विनवितों आणि तुजवळ जे सर्व आपलीं पापें अंगीकारितात त्यांस वांचूं दे असासाठीं कीं ज्यांचीं अंतःकरणें पापाचे स्मरणेंकरून पीडिलीं आहेत त्यांस तुझे कृपावंत क्षमेंकरून मोकळें करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे परमसमर्थ देवा दयालु बापा जो तूं सर्व मनुष्यांवर करुणा करितोस आणि जें कांहीं त्वां उत्पन्न केलें आहे त्याचा द्वेष करीत नाहींस जो तूं पाप्यांचें मरण इच्छीत नाहींस पण याजपेक्षां त्यानें आपलें पाप सोडून तारिलें जावें म्हणून इच्छितोस जे आह्मी आपले पापांचे भाराखालीं खिन्न आणि श्रांत आहों त्यां आमचे अपराधांची क्षमा कर आणि आम्हास अंगीकारून समाधान कर सर्वदा कृपा

करणें तुझा स्वभावच आहे पापांची क्षमा करण्याचा अधिकार तुझाच आहे ह्मणून हे ईश्वरा आह्मास वांचूं दे जे तुझे लोक त्यां खंडणी देऊन परत घेतले त्यांस वांचूं दे जे तुझे सेवक नीच माती व दीन पापी आहेत त्यांशी न्यायाविषयीं विवाद करूं नको पण जे आम्ही आपली दुष्टता नम्रतेनें अंगीकारितों आणि आपले अपराधांचा अनुताप करितों त्यां आह्मापासून आपला क्रोध फिरीव आणि यां लोकीं तूर्त आमचें साहाय्य असें कर कीं परलोकीं तुजपाशीं आह्मी सर्वदा जीवूं येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

नंतर आचार्यामागें लोकानीं ही पुढली प्रार्थना बोलावी.

हे उत्तम ईश्वरा आह्माला तूं फिरीव तेव्हां फिरूं हे ईश्वरा जे तुझे लोक रोदन उपोषण व प्रार्थना करून तुजकडे फिरतात त्यांला तूं सुप्रसन्न हो कांकीं तूं कृपाळू देव आहेस तूं करुणा सहिष्णुता आणि फार दया यानीं पूर्ण आहेस जेव्हां आह्मी दंडास योग्य आहों तेव्हां तूं क्षमा करितोस आणि तुझा क्रोध संचारावा तेव्हां तूं दयेचें स्मरण करितोस हे ईश्वरा तूं आपले लोकांस वांचूं दे आणि आपले क्षेत्राला व्यवस्थेंत पडूं देऊं नको हे ईश्वरा तुझी कृपा फार आहे ह्मणून आमचें ऐक आणि आपले अत्यंत करुणेप्रमाणें आह्मावर कृपादृष्टि कर तुझा सुवंदित पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचें पुण्य आणि माध्यस्थी यांकडून आमेन



तेव्हां आचार्यानें बोलावें.

ईश्वरानें आह्मास आशी द्यावी आणि आमचें संरक्षण करावें ईश्वरानें आपलें मुखतेज आम्हावर पडूं द्यावें आणि आतां व सर्वदा आमचें समाधान करावें आमेन

# धर्ममताचीं प्रकरणें

१ परम पवित्र त्रिकाविषयीं.

एकच जीवंत व सत्य देव आहे सनातन निर्देह निरंश निर्भाव अनंत शक्तीचा अनंत ज्ञानाचा व अनंत उपकारिकत्वाचा सर्व दृश्य आणि अदृश्य पदार्थांचा उत्पादक व रक्षक आहे आणि या देवत्वाचे एकत्वांत तिघेजण आहेत जे समान सत्वाचे समान शक्तीचे व समान सनातनतेचे म्हणजे बाप व पुत्र आणि पवित्र आत्मा

२ शब्द म्हणजे देवाचा पुत्र जो वास्तविक मनुष्य झाला त्याजविषयीं.

पुत्र जो बापाचा शब्द आहे जो अनादिकालचा बापाकडून जनित जो वास्तविक व सनातन देव जो बापाचे समान सत्वाचा त्यानें आशीर्वादित कुमारीचे उदरीं तिचे सत्वांतली मनुष्यप्रकृति घेतली येणेंकडून दोन समस्त व संपूर्ण स्वभाव म्हणजे देवत्व आणि मनुष्यत्व एकाजणाचेठायीं अभेद्यत: एकच झाले त्यांकडून एक ख्रिस्त जो वास्तविक देव व वास्तविक मनुष्य आहे तो आपले बापाचा आणि आमचा समेट करायास आणि मनुष्यांचे स्वाभाविक दोषांविषयीं व घडलेल्यां पापांविषयीं प्रायश्चित्तबलि व्हावयास दुःख सोसून क्रूसावर बसविला गेला मेला आणि पुरिला गेला



३ ख्रिस्त मृत्युलोकांत जाण्याविषयीं.

जसा ख्रिस्त आह्माकरितां मेला आणि पुरिला गेला तसेंच विश्वासायाचें आहे कीं तो मृत्युलोकांत गेला

४ ख्रिस्ताचे पुनरुत्थानाविषयीं.

मांस हाडें आणि जें कांहीं पूर्ण मनुष्यप्रकृतीला लागतें यांसहित ख्रिस्त आपलें शरीर परत घेऊन मृत्तस्थितींतून सत्यत: उठला त्या शरीरासहित तो आकाशांत चढला आणि तेथें तो अंत्य दिवसीं सर्व मनुष्यांची न्यायाधीशी करायला परत येईपर्यंत बसला आहे

५ पवित्र आत्म्याविषयीं.

बाप व पुत्र यांसहवर्त्तमान पवित्र आत्मा समान सत्वाचा महत्वाचा आणि गौरवाचा वास्तविक व सनातन देव आहे

६ तारणासाठीं जें पवित्र लेखांचें पूर्णत्व त्याविषयीं.

तारण प्राप्त व्हायासाठीं जें कांहीं जाणावें लागतें तें सर्व पवित्र लेखांत आहे यास्तव जें कांहीं त्यांत वाचिलें जात नाहीं आणि त्याकडून प्रमाण पावत नाहीं तें कोणा एकानें धर्ममताचें प्रकरणसें विश्वासूं नये अथवा तारणास प्रयोगार्थ व अवश्यसें मानूं नये पुरातन विधि व नवा विधि यांतील प्रामाणिक पुस्तकांला आम्ही पवित्र लेख असें ह्मणत असतां त्यांचे प्रमाणाविषयीं मंडळींत कांहीं संशय कधीं नव्हता

प्रामाणिक पुस्तकांचीं नामें व संख्या.

- उत्पत्ति
- प्रस्थान
- लेवितिकस
- द्युतरोनोम्या
- यहोशूआह
- न्यायाधीश
- रूथ
- श्मूएलाचें पहिलें पुस्तक
- श्मूएलाचें दुसरें पुस्तक
- राजांचें पहिलें पुस्तक
- राजांचें दुसरें पुस्तक
- इतिहासाचें पहिलें पुस्तक
- इतिहासाचें दुसरें पुस्तक
- एस्तेरेचें पुस्तक
- योबाचें पुस्तक
- गीतें
- दृष्टांत
- एक्लेसिआसतेस अथवा उपदेशक
- श्लोमोचें स्तोत्र
- चार महत्तर भविष्यवादी
- बाराकनीयान भविष्यवादी

आणि इतर पुस्तकें (जसें हिएरोम म्हणतो) आचरणाचे उदाहरणासाठीं आणि वर्त्तनाचे संबोधासाठीं मंडळी वाचिते तथापि कोणतेंहि धर्ममत ठरवायासाठीं तीं पुस्तकें योजीत नाहीं तीं हींच आहेत

- एस्द्रासाचें पहिलें पुस्तक
- एस्द्रासाचें दुसरें पुस्तक
- एस्द्रासाचें तिसरें पुस्तक
- एस्द्रासाचें चौथें पुस्तक
- तोबीआसाचें पुस्तक
- युदीथीचें पुस्तक
- एस्तेरेचे पुस्तकाचा उरला भाग
- ज्ञानाचें पुस्तक
- येशू जो सिराखाचा पुत्र
- बारूक जो भविष्यवादी
- तिघां लेंकरांचें गीत
- सुसान्नेची कथा
- बेल आणि द्राकोन यांची कथा
- मेनाश्शेची प्रार्थना
- माक्काबायसांचें पहिलें पुस्तक
- माक्काबायसांचें दुसरें पुस्तक

नवे विधींचीं सर्व पुस्तकें जशीं सामान्यतः अंगीकारिलेलीं आहेत तशीं आह्मी अंगीकारितों आणि तीं प्रामाणिक अशीं मानितों

७ पुरातन विधीविषयीं.

पुरातन विधि नवे विधीचे विपरीत नाहीं कारण पुरा



तन विधि व नवा विधि या उभयतांत मनुष्याला ख्रिस्ताकडून जें सनातन जीवन तें पुढें केलेलें आहे तो देव व मनुष्य मिळून असतांना देवाचा व मनुष्यांचा एकलाच मध्यस्थ आहे यास्तव पुरातन पितरानीं केवळ नश्वर वचनार्थाची अपेक्षा केली असें जे म्हणतात त्यांचें ऐकूं नये जो धर्मविधि देवानें मोशेकडून दिला त्याचे संस्कार व त्याचीं अनुष्टानें जरीं ख्रिस्ती मनुष्यांला पाळावीं लागत नाहींत व त्याचे लौकिक विधि जरीं कोणत्याहि राज्याला अवश्य घ्यावे लागत नाहीं तरीं ज्या आज्ञा नैयायिक म्हटलेल्या त्यांचे पाळण्यापासून कोणत्याहि ख्रिस्ती मनुष्याला मोकळें होऊं दिलें नाहीं

८ तिन्हीं मतांगीकारांविषयीं.

तीन मतांगीकार म्हणजे नीकेचा मतांगीकार अथाना स्याचा मतांगीकार आणि जो सामान्यतः प्रेषितांचा मतांगीकार ह्मटलेला हे पुरतेपणें घ्यायाचे आणि विश्वासायाचे आहेत कारण पवित्र लेखाचे निश्चित प्रमाणांकडून त्यांची सत्यता दाखवितां येत्ये

९ स्वाभाविक पापाविषयीं.

आदामास अनुसरणें हेंच केवळ स्वाभाविक पाप आहे असें नव्हे पण आदामाचे संतानाकडून जें कोणी मनुष्य जन्मलेलें आहे त्याचे प्रकृतीचा दोष आणि विकार आहे तेणेंकडून मनुष्य मुळचे पवित्रतेपासून फार भ्रष्ट आहे आणि आपले प्रकृतीनें पापास आसक्त आहे येणेंकडून सर्वदा सदा

त्याप्रतिकूल दुष्ट स्वभाव इच्छितो यास्तव जो प्रत्येक जन या जगांत जन्मला जातो त्यांतला दोष देवाचे रागास व शापास योग्य आहे जे पुनर्जन्म पावले आहेत त्यांत देखील हा स्वाभाविक दोष राहतो तेणेंकडून इंद्रियेच्छा जी ग्रीक भाषेंत फ्रोनेमा सार्कोस ह्मटलेली ती देवाचे धर्मविधीस वश्य नाहीं जे विश्वासतात आणि बाप्तिस्मा घेतात त्यांजला जरीं दंड प्राप्त होणार नाहीं तरीं प्रेषित अंगीकारितो कीं इंद्रियेच्छा आणि काम पापच आहे

१० स्वतंत्र मनोरथशक्तीविषयीं.

आदाम भ्रष्ट झाल्यानंतर मनुष्याची अवस्था अशी आहे कीं त्याच्यानें आपले संपन्न शक्तीकडून किंवा शुभकर्मांकडून विश्वास धरायाला व देवाची प्रार्थना करायाला आपणातें वळवत आणि सिद्ध करवत नाहीं यास्तव आमचा मनोरथ उत्तम व्हावायास आह्माला आगोदर ख्रिस्ताकडून देवाचा सत्गुण प्राप्त झाल्यावांचून आणि आमचा मनोरथ उत्तम झाल्यानंतर तो सत्गुण आह्मासंगतीं कार्य करण्यावांचून देवाला मनोरम व मान्य आहेत अशीं जीं कर्मै तीं आह्माला करवत नाहीं

११ मनुष्याचे न्याय्यीकरणाविषयीं.

आह्मी आपले कर्मांकरितां किंवा योग्यतेकरितां देवाचे दृष्टींत पुण्यवान मानिले जातों असें नव्हे पण आमचा प्रभु आणि तारणारा येशू ख्रिस्त त्याचे पुण्याकरितां आह्मी विश्वास धरून पुण्यवान मानिले जातों यास्तव केवळ विश्वासें-



कडून आह्मी पुण्यवान मानिले जातों हें कुशलकारक व समाधानकारक मत आहे

१२ शुभकर्मांविषयीं.

शुभकर्मै जीं विश्वासाचीं फळें आहेत जीं न्याय्यीकरण झाल्यावर घडतात त्यांच्यानीं जरीं आमचें पापहरण करवत नाहीं व देवाचा तीक्ष्ण विवेक सोसवत नाहीं तरीं तीं ख्रिस्ताकडून देवाला प्रिय व मान्य आहेत आणि सत्य जीवंत विश्वासापासून तीं अवश्य उत्पन्न होतात ह्मणून जसें फळाकडून झाड जाणिलें जातें तसा कर्मांकडून जीवंत विश्वास स्पष्ट जाणिला जातो

१३ न्याय्यीकरणापूर्वींचे घडलेल्या कर्मांविषयीं.

ख्रिस्ताचा सत्गुण आणि त्याचा आत्मा प्राप्त झाल्यापूर्वीं घडलेलीं कर्मै देवाला प्रिय नाहींत कारण तीं येशू ख्रिस्तावरील विश्वासापासून उत्पन्न झालीं नाहींत आणि सत्गुण पावायास तीं मनुष्यांस सिद्ध करीत नाहींत आणि योग्यतेकरितां सत्गुण पावायास अर्थ नाहींत अणखीं देवानें जसें इच्छिलें व आज्ञापिलें आहे तशीं तीं घडलीं नाहींत यास्तव तीं पापाचीं आहेत याजविषयीं आह्मास संशय नाहीं

१४ आज्ञातिरिक्त कर्मांविषयीं.

देवाचे आज्ञांपेक्षां अधिक ज्यां स्वयंकृत कर्मांला कित्येक आज्ञातिरिक्तकर्मै ह्मणतात तीं धृष्टता व अभक्ति यांवांचून

शिकववत नाहींत कारण त्यांजकडून मनुष्यें वदतात कीं आह्मांला जितकें करावें लागतें तितकें केवळ आम्ही देवाला भरून देतों असें नव्हे पण जितकें आह्मास करायाला योग्य तितक्यापेक्षां अधिक आम्ही देवासाठीं करितों परंतु याप्र तिकूल ख्रिस्त स्पष्ट सांगतो कीं सर्व जें तुह्मास आज्ञापिलें आहे तें सर्व तुह्मी साधिलें असतांहि आह्मी निष्फल सेवक आहों असें म्हणा

१५ ख्रिस्त एकलाच निष्पाप याविषयीं.

ख्रिस्त आमची वास्तविक प्रकृति धरून सर्वतः आह्मासा रिखा झाला पाप मात्र वर्जून ज्या त्याजपासून तो आपल्या देहाविषयीं व आपले आत्म्याविषयीं अगदीं निष्कलंकच होता ज्या निर्दोष कोंकरानें आपण एकदांच प्रायश्चित्त बलि होऊन जगाचें पापहरण करायाचें होतें तें व्हावें ह्मणून तो आला आणि त्याचेठायीं कांहीं पाप नव्हतें असें योहान्न साधु ह्मणतो पण सर्व आम्ही वरकड जरीं बाप्तिस्मा पावलों व ख्रिस्ताकडून जरीं पुनर्जन्म पावलों तरीं बहुत अर्थांविषयीं आह्मी अपराधी पडतों आणि आम्हाला पाप नाहीं असें जर ह्मणतों तर आह्मी आपणास फसवितों आणि आमचेठायीं सत्य नाहीं

१६ बाप्तिस्म्यानंतर जें पाप घडतें त्याविषयीं.

सर्व जें नाशक पाप बाप्तिस्म्यानंतर घडतें तें पवित्र आत्म्याप्रतिकूल आणि अक्षाम्य असें नव्हे यास्तव जे बाप्तिस्मा



घेतल्यावर पापांत पडतात त्यांला पश्चात्ताप केवळ अप्राप्य ह्मणायाचा नाहीं जरीं आह्मांला पवित्र आत्मा प्राप्त झाल्यानं तर आह्मी सत्गुण सोडून पापांत पडलों तरीं देवाचे कृपेनें आह्मांला फिरून उठून आपलें आचरण शुद्ध करा यास येईल यास्तव बाप्तिस्मा घेतल्यावर आयुष्य संपेपर्यंत आमच्यानीं पाप करवत नाहीं अथवा खरा पश्चात्ताप करून क्षमा पाववत नाहीं असें जे म्हणतात त्या त्यांचें मत नाका रून टाकावें

१७ पूर्व संकल्प व इति यांविषयीं.

जीवन देण्याचा पूर्व संकल्प देवाचा सनातनच संकल्प आहे ज्या त्याकडून (जगाचा पाया घातल्यापूर्वीं) जे ख्रिस्त संबंधी त्यानें मनुष्यांतून निवडिलेले आहेत त्यांस शाप व शासन यांपासून तारायाला आणि आदरासाठीं घडलेल्यां पात्रांप्रमाणें ख्रिस्ताकडून सनातन जीवनांत आणायाला त्यानें आपल्या गूढ मतानें अनादिकाळापासून संकल्पिलें आहे यास्तव देवाचे एवढे उत्तम उपकारानें जे संपन्न आहेत ते देवाचे संकल्पाप्रमाणें त्याचे आत्म्याकडूनच सुसमयीं बोला विले जातात ते सत्गुण पावून बोलावण्यास मान्य होतात ते स्वयंदत्ततः न्यायी केले जातात ते आदत्तपुत्रत्वेंकडून देवाचें पुत्र होतात त्याचा एकुलता पुत्र येशू ख्रिस्त याचे प्रतिमे सारिखे ते होतात ते सत्कर्माकडून भक्तितः वर्त्ततात आणि शेवटीं देवाचे कृपेनें सनातन सुख पावतात

ख्रिस्ताचे आत्म्याची जी शक्ति इंद्रियचेष्टा व त्यांचीं इंद्रियें दान्त करित्ये त्यांचें चित्त दिव्य अर्थाकडे वरतीं ओढित्ये ख्रिस्ताकडून जें सनातन जीवन भोगायाचें आहे त्याविषयींचा विश्वास स्थिरावित्ये व त्यांची देवाकडची प्रीति चेतवित्ये तिचा अनुभव जे भक्तिवान जन आपल्यांत घेतात त्यांजला आमची ख्रिस्तसंबंधी वृत्ति ध्यानांत आणून प्रिय मनोरम अवर्णनीय समाधान होतें खरें पण जे कुविचारी व विषयी जन ख्रिस्ताचा आत्मा पावले नाहींत त्यांला देवाचा पूर्व संकल्प आपले ध्यानांत धरणें फारच जोखमी नाशकारण आहे ज्या त्याकडून सैतान त्यांला आशाहीनतेंत अथवा जें दुःखजनक अपवित्र आचरण अशाहीनते तुल्य जोखमी आहे त्यांत पाडितो

अणखीं देवाचीं वचनें जशीं पवित्र लेखांत आह्मा पुढें ठेविलीं आहेत तशींच तीं आम्हाला घेणें प्राप्त आहे आणि देवाचे वाक्यांत जो देवाचा मनोरथ आम्हास स्पष्ट सांगीतला आहे त्यास आह्माला आपले आचरणांत अनु सरावें लागतें

१८ केवळ ख्रिस्ताचे नामेंकडून सनातन तारण पावण्याविषयीं.

ज्या भलते एखादे धर्मास अथवा जटास कोणी मनुष्य अनुसरतो त्या धर्माप्रमाणें आणि सहजमनःप्रकाशाप्रमाणें जर झटून आपलें आचरण करील तर तरेल असें जे धैर्य्य धरून ह्मणतात ते शापग्रस्त मानावे कारण जेणेंकडून मनुष्यांस तरणें प्राप्त आहे तें येशू ख्रिस्ताचें नामच मात्र पवित्र लेख आम्हाला दाखवून देतो



१९ मंडळीविषयीं.

ख्रिस्ताची दृश्य मंडळी विश्वासू मनुष्यांचा समुदाय आहे ज्या त्यांत देवाची सत्य गोष्ट गाजवून सांगीतली जात्ये आणि संस्कार सर्व योग्य अर्थांसहित ख्रिस्ताचे विधि प्रमाणें शुद्ध अनुष्ठित केले जातात

जशी येरूशालेमाची आलेक्षांद्रीयेची व आंतीओखीयेची मंडळी भ्रांत झाली तशी रोमेची मंडळी केवळ आपले आचरणाविषयीं व अनुष्ठानप्रकाराविषयीं भ्रांत झाली आहे असें नव्हे पण मतार्थाविषयींहि

२० मंडळीचे अधिकाराविषयीं.

मंडळीस विधि व अनुष्ठानें नेमायाची सत्ता आणि मत विवाद ठरविण्याचा अधिकार आहे खरें तथापि देवाचे लिहिलेले गोष्टीप्रतिकूल कांहीं नेमायास अथवा लेखाचें एक प्रकरण दुसऱ्ये प्रकरणाप्रतिकूल व्हावें अशी त्याची व्याख्या करायास मंडळीला योग्य नाहीं यास्तव जरीं मंडळी पवित्र लेखाची साक्षी व रक्षिणारी आहे तरीं जसें तिला त्या प्रतिकूल कांहीं नेमायास उचित नाहीं तसें त्यापेक्षां तारणासाठीं अवश्य विश्वासावें असें कांहीं अधिक ठरवा यास तिला न्याय्य नाहीं

२१ सार्वभौमिक संमंत्रिसमुदायांचे अधिकाराविषयीं.

सार्वभौमिक संमंत्रिसमुदाय अधिपतींचे आज्ञेवांचून एकत्र मिळवायाचे नाहींत आणि ते एकत्र मिळविले अस

तांना (ज्यांतले सर्व देवाचे आत्म्याकडून व वचनेंकडून शिष्ट नाहींत असा मनुष्यसमुदाय ते आहेत म्हणून) देवाचे गोष्टीं विषयीं देखील कदाचित भ्रांतींत पडतील आणि कित्येक वेळां भ्रांतींत पडलेच आहेत यास्तव तारणास अवश्य पाहिजे असें जें कांहीं त्यानीं नेमिलेलें तें पवित्र लेखांतून काढून घेतलें असें जर प्रमाण नसलें तर सत्तेचें अथवा अधिकाराचें कांहीं नाहीं

२१ प्रेतजीवात्मपावनस्थानाविषयीं.

प्रेतजीवात्मपावनस्थान आचार्यकृत क्षमा ग्रंथें व मूर्त्ति यांचें भजन व वंदन आणि साधूंचीं नामें घेऊन प्रार्थना करणें यांविषयीं रोमी मंडळीचें जें मत तें दुष्कल्पित लेख प्रमाणहीन आणि देवाचे वाक्याप्रतिकूलच आहे

२२ सभेंत आचार्यत्व करणें याविषयीं

न्यायतः आमंत्रित होऊन त्या कर्मासाठीं दीक्षित झाल्या पूर्वीं देवाची गोष्ट लौकिकांत गाजवून सांगणें अथवा सभेंत पवित्र संस्कार अनुष्ठित करणें कोणालाहि न्याय्य नाहीं म्हणून ईश्वराचे द्राक्षीचे मळ्यांत सेवक पाठवायास ज्यांला मंडळींत लौकिक अधिकार दिला आहे त्यानीं याकर्मासाठीं जे निवडून बलाविलेले आहेत ते न्यायतः बलाविलेले व पाठिवलेले आहेत असें आम्हीं मानावें

२४ जी भाषा लोक समजत नाहींत ती सभेंत न बोलावी याविषयीं.

जी भाषा लोक समजत नाहींत ती बोलतांना मंडळींत



प्रार्थना करणें किंवा संस्कार अनुष्ठित करणें देवाचे वाक्या प्रतिकूल आणि प्रथम मंडळीचे रीतिप्रतिकूलच आहे

२५ पवित्र संस्कारांविषयीं.

जे पवित्र संस्कार ख्रिस्तानें नेमिनेले आहेत ते ख्रिस्ती मनुष्यांचे अंगीकाराचीं विशेषकें व चिह्नें मात्र आहेत असें नव्हे पण सत्गुण आणि देवाचा आम्हांकडील सुमनोरथ यांचे निश्चित साक्षी व हितकारक मुद्राच आहेत ज्यां त्यांकडून तो आमचे ठायीं अदृश्यतः कार्य करितो आणि आपल्यावरचा आमचा विश्वास जीवित बलवान व स्थिर करितो

ख्रिस्त जो आमचा प्रभु त्यानें सुवार्त्तेंत दोन पवित्र संस्कार नेमिलेले आहेत ह्मणजे बाप्तिस्मा आणि प्रभूचें रात्रिभोजन

जी पांच अनुष्ठानें सामान्यतः संस्कार नामांकित आहेत ह्मणजे स्थिरीकरण पश्चात्तापदंडन दीक्षाकरण लग्नकर्म आणि अंत्य अभ्यंग तीं सुवार्त्ताज्ञापित संस्कारशीं मानायाचीं नाहींत त्यांतलीं कित्येक प्रेषितांचे अशुद्ध अनुसरणापासून उत्पन्न झालीं कित्येक लेखप्रदत्त संसारस्थितिहि आहेत तथापि तीं कांहीं देवाज्ञापित चिह्नानें अथवा कर्मानें विशिष्ट नाहींत ह्मणून बाप्तिस्मा व प्रभूचें रात्रिभोजन एतत्तुल्य संस्काररूप नव्हत

केवळ दर्शनासाठीं अथवा परिवहनासाठीं ख्रिस्तानें संस्कार नेमिलेले होते असें नव्हे परंतु अशासाठीं कीं आम्हीं

त्यांचा उपयोग करावा आणि त्यांस जे योग्यतः घेतात त्यांला मात्र ते हितकारक आहेत पण जे त्यांस अयोग्यत घेतात ते आपण शासन पावतात असें पाऊलस साधु ह्मणतो

२६ आचार्यांची जी अयोग्यता संस्कारांचें फल विरोधीत नाहीं तिजविषयीं.

जरीं दृश्य मंडळींत पवित्र जनाशीं अपवित्र जन सर्वदा मिश्रित होत जातात आणि कदाचित उपदेश व संस्कार यांचे कर्मांत अपवित्र जनांस मुख्य सत्ता आहे तरीं ते आपल्या नामानें नव्हे पण ख्रिस्ताचे नामानें तें कर्म करितात आणि त्यांचे नियोगेंकडून व वर्शेकडून सेवा करितात यास्तव आह्मी देवाची गोष्ट ऐकतांना आणि संस्कार घेतांना त्यांचे सेवेचा उपयोग करावा त्यांचे दुष्टपणाकरितां ख्रिस्ताचे विधीचें फल हारपलें जात नाहीं आणि जे विश्वास धरून आपल्यास अनुष्ठित केलेले संस्कार उचितपणें घेतात त्यांचे ठायीं देवाचा सुदत्त सत्गुण उणा पडत नाहीं ते संस्कार जरीं अपवित्र मनुष्यांकडून अनुष्ठित केले जातात तरीं ख्रिस्ताचे विधानेंकडून व प्रतिज्ञेंकडून हितकारक होतात

तथापि मंडळीचे नीतीस योग्य आहे कीं अपवित्र आचार्यांविषयीं शोध करावा आणि त्यांचे अपराध जे जाणतात त्यानीं त्यांस दोष ठेवावे मग ते अपराधी ठरले असतांना सत्य न्यायेंकडून कर्मबहिष्कृत केले जावे

२७ बाप्तिस्म्याविषयीं.

ज्यांचा बाप्तिस्मा झाला नाहीं त्यांजपासून जेणेंकडून



ख्रिस्ती मनुष्यें विविक्त केलीं जातात तें विशेषक आणि अंगीकाराचें चिन्ह मात्र बाप्तिस्मा आहे असें नव्हे पण पुनर्जन्माची ह्मणजे नव्या जन्माची मुद्रा आहे ज्या तिजकडून साधनरूपानें जे बाप्तिस्मा शुद्ध घेतात ते मंडळीशीं संपृक्त होतात पवित्र आत्म्याकडून देवाचे पुत्र व्हावयासाठीं जें आमचें आदत्तपुत्रत्व व पापांची क्षमा यांविषयींच्या प्रतिज्ञा दृश्यतः चिन्हांकित व मुद्रांकित केल्या जातात विश्वास स्थिर केला जातो आणि देवाचीं प्रार्थना केल्यानें सत्गुण संवृद्ध होत जातो

बालकांचा बाप्तिस्मा मंडळींत सर्वथा धरायाचा आहे कांकीं तो ख्रिस्ताचे विधानानुकूलच आहे

२८ प्रभूचे रात्रिभोजनाविषयीं.

ख्रिस्ती लोकांस आपापल्यांत परस्पर जी प्रीति धरायास योग्य आहे तिचें चिन्ह मात्र प्रभूचें रात्रीभोजन आहे असें नव्हे पण ख्रिस्ताकडून जो आमचा उद्धार त्याजविषयींचा संस्कारच आहे यास्तव जे विश्वास धरून शुद्धतः योग्यतः तो संस्कार घेतात त्यांला जी भाकर आह्मी मोडितों ती ख्रिस्ताचे देहाची संभुक्ति आहे आणि आशीर्वादाचा प्याला ख्रिस्ताचे रक्ताची संभुक्ति आहे

अन्यसत्वीभाव (ह्मणजे भाकर आणि द्राक्षारस यांचे सत्वाचें पालटणें) प्रभूचे रात्रिभोजनांत घडण्याविषयीं पवित्र लेखाकडून कांहीं प्रमाण दाखववत नाहीं पण तो लेखाचे स्पष्ट शब्दांप्रतिकूल आहे संस्काराचे स्वभावाला नाहींसें

करितो आणि बहुत कुभीतिविकल्पांचें कारण झाला आहे

रात्रिभोजनांत ख्रिस्ताचा देह केवळ दिव्य व आत्मिक प्रकारानें दिला जातो घेतला जातो व खाल्ला जातो आणि ज्या साधनेंकडून ख्रिस्ताचा देह रात्रिभोजनांत घेतला जातो व खाल्ला जातो तें विश्वासच आहे

प्रभूचे रात्रिभोजनाचे संस्कारपदार्थ राखून ठेवावे मिरवून वाहावे उंचावावे अथवा भजावे असें ख्रिस्तानें नेमिलेलें नाहीं

२९ जे दुष्ट जन प्रभूचें रात्रिभोजन घेतांनां ख्रिस्ताचा देह खात नाहींत त्यांविषयीं.

दुष्टजन आणि सत्य विश्वासहीन जे आहेत ते जरीं ख्रिस्ताचे देहरक्ताचे संस्कारपदार्थ दैहिकतः व दृश्यतः आपले दांतानीं पेषितात तरीं ख्रिस्ताचे संभागी होत नाहींत पण आपलें शासन होई असें ते एवढे श्रेष्ठ अर्थाचें चिहून खातात आणि पितात

३० दोन्हीं प्रकारांविषयीं.

सामान्य लोकांस प्रभूचा प्याला नद्यावा असें नसावें कारण ख्रिस्ताचें विधान व त्याची आज्ञा यांप्रमाणें सर्व ख्रिस्ती मनुष्यांस कांहीं भेद न करितां प्रभूचे संस्काराचे दोन प्रकार अनुष्ठित करून द्यायास योग्य आहेत

३१ ख्रिस्ताचें एकाच अर्पण जें क्रूसावर समापन्न झालें याविषयीं.

ख्रिस्ताचें एकदांच केलेलें आत्मार्पण सर्व जगाचे सर्व स्वाभाविक व कार्मिक पापांचें समाधन्न प्रायश्चित्त सामवलि



व उद्धारच आहे आणि त्यावांचून दुसरें कोणतेंहि प्रायश्चित्त नाहीं यास्तव ज्यां कल्पित भजनांचे यज्ञांत जीवंत व मेलेले यांचें दुःखहरण अथवा पापहरण करायासाठीं आचार्य ख्रिस्ताचें अर्पण करितो ते यज्ञ पाषंडी कल्पना व नाशक युक्ति आहेत

३२ आचार्यांचे लग्नाविषयीं.

एपिस्कोपस प्रेस्बुतरस आणि द्याकोन याणी एकलत्वाचा नवस करावा अथवा लग्न करूं नये अशी आज्ञा देवाचे धर्मविधींत दिल्ही नाहीं यास्तव जसें सर्व दुसरे ख्रिस्ती मनुष्यांला तसें त्यांलाहि आपले विवेकाप्रमाणें लग्न करायास उचित आहे एकलत्वापेक्षां लग्नस्थिति भक्तिवृद्धीस अधिक अनुकूल आहे असें जर मानितील तर

३३ जे मंडली बहिष्कृत झाले ते कसे वर्जायावी आहेत याविषयीं.

जो मंडळीचे लौकिक आज्ञेकडून मंडळीचे सहायत्वापासून न्यायतः विच्छिन्न व बहिष्कृत झाला आहे तो पश्चात्ताप करून लौकिकांत साम पावे व योग्य अधिकारीं त्याला मंडळींत परत घेई तोंपर्यंत विश्वस्तांचे सर्व समुदायानें तो विधर्म व अधार्मिकसा मानावा

३४ ख्रिस्ती मनुष्याचे शपथेविषयीं.

आमचे प्रभु येशू ख्रिस्तानें आणि त्याचे प्रेषित याकोबानें ख्रिस्ती मनुष्यांला व्यर्थ व अविचारी शपथ वाहणें निषेधिलेलें आहे असें आह्मी अंगीकारितों तथापि विश्वा

सयुक्त व प्रीतियुक्त विवादाविषयीं जेव्हां देशाधिकारी शपथ मागेल तेव्हां जर भविष्यवाद्याचे उपदेशाप्रमाणे सयती त्य कपण न्याय व सत्य यांकडून वाहिली तर ख्रिस्ती धर्म मनुष्याला शपथ वाहणें निषेधीत नाहीं असें आमचें मत आहे

धर्ममतप्रकरणें समाप्त.



# द्याकोनांचें दीक्षाकरण

एपिस्कोपसानें नेमिलेला दिवस आला असतां सकाळची प्रार्थना समाप्त झाल्यावर द्यांकोनांचें कार्य व कर्म प्रव्यक्त करांयासाठीं प्रवचन अथवा उपदेश असावा व ख्रिस्ताचें मंडळींत तो वर्ग केवढा उपयोगी आहे आणि त्यांचे कर्मांत त्यांला लोकांनीं कसें मानावें हें उपदेश कानें सांगावें.

पहिल्यानें जे द्याकोनसे दीक्षित व्हावयास इच्छितात ते आर्खिद्याकोनानें अथवा त्याचे प्रतिनिधीनें एपिस्कोपसाजवळ (पवित्र मेजाजवळ आपल्या आसनावर बसतांना) पुढें करावे (त्यांतला प्रत्येक योग्य वस्त्र धारण करितांना) हे शब्द बोलतांना.

देवसंबंधी प्रतीक्ष्य बापा हे विद्यमान जन द्याकोन असे दीक्षित करावे ह्मणून मी तुजवळ पुढें करितों

एपिस्कोपसानें बोलावे.

जे जन तुम्ही आह्माजवळ पुढें करितां हे आपली विद्या व पवित्र आचरण यांकडून आपली सेवा देवाचें गौरव व त्योच मंडळीची बोधसमृद्धि व्हावी म्हणून साधायास समर्थ व योग्य आहेत याविषयीं तुह्मी सावध असा

आर्खिद्याकोनानें उत्तर द्यावें.

म्यां यांजविषयीं शोध केला आहे व यांची परीक्षा केली आहे आणि हे असेच आहेत असें मी मानितों

नंतर एपिस्कोपसानें लोकांस बोलावे.

भाव्वानों द्याकोनसे दीक्षित व्हावयासाठीं जे जन पुढें केलेले

आहेत यांतल्या कोणेकाचे ठायीं ज्याजकरितां त्याला त्या कर्मांत शिक्का देऊं नये असा जर कांहीं प्रतिबंध अथवा विशेष अपराध तुह्मांतले कोणेकास ठाऊक आहे तर देवाचें नामानें तो पुढें येऊन तो प्रतिबंध अथवा अपराध कोणता आहे ह्मणून दाखवी

मग जर कांहीं विशेष अपराध अथवा प्रतिबंध स्थापिला जाईल तर आक्षेपिलेला जन त्या अपराधापासून स्वच्छ आहे असें ठरें पर्यंत एपिस्कोपसानें त्याचे दीक्षाकरणाचा विलंब करावा.

नंतर एपिस्कोपसानें (जे दीक्षित व्हायास योग्य असे सांपडले आहेत त्यांसाठीं मंडळीनें प्रार्थना करावी असें सुचवितांना) विद्यमान आचार्य व लोक यांसहित पुढली विनंती व प्रार्थना बोलाव्या.

विनंती विशेषप्रकरणसहित.

हे देवा जो आकाशाचा बाप तो तूं आह्मा दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो आकाशाचा बाप तो तूं आह्मा दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पुत्र जगाचा तारणारा तो तूं आह्मा दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पुत्र जगाचा तारणारा तो तूं आम्हा दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पवित्र आत्मा जो बाप व पुत्र यांचा अखंडित सत्वाचा तो तूं आह्मा दीन पाप्यांवर दया कर

हे देवा जो पवित्र आत्मा जो बाप व पुत्र यांचा अखंडित सत्वाचा तो तूं आम्हा दीन पाप्यांवर दया कर



हे पवित्र सुवंदित आणि गौरवी त्रिका जें तिघे जण पण एकच देव तें तूं आह्मा दीन पाप्यांवर दया कर

हे पवित्र सुवंदित आणि गौरवी त्रिका जें तिघे जण पण एकच देव तें तूं आह्मा दीन पाप्यांवर दया कर

हे ईश्वरा आमचे अपराध अथवा आमचे वडिलांचे अपराध स्मरूं नको आमचे पापांचा सूड घेऊं नको हे उत्तम ईश्वरा आम्हास वांचू दे जे तुझे लोक त्यां आपलें अमोल रक्त खंडणीस देऊन परत घेतले आहेत त्यांस वांचूं दे आणि आह्मावर तुझा क्रोध सर्वकाळ नसावा

हे उत्तम ईश्वरा आम्हास वांचू दे.

सर्व अरिष्टें व उपद्रव पातक सैतानाच्या युक्ति व त्याचे घाले तुझा राग आणि सनातन नाश यांपासून

हे उत्तम ईश्वरा आम्हाला राख.

व्यभिचार व सर्वप्रकारचें नाशक पाप प्रपंच इंद्रियें व सैतान यांचे सर्व भूलविण्यांपासून

हे उत्तम ईश्वरा आम्हाला राख.

वीज वादळ उपद्रव मरी व दुकाळ लढाई घात व आकस्मिक मरण यांपासून

हे उत्तम ईश्वरा आम्हाला राख.

सर्व धुंदाई गुप्तबंड व फितूर सर्व असत्य मत पाखंड व भेद हृदयाचें कठिणपण आणि तुझी गोष्ट व आज्ञा अवमानणें यांपासून

हे उत्तम ईश्वरा आम्हाला राख.

तुझे पवित्र देहधारणाचें रहस्य तुझा पवित्र जन्म व सुंता तुझा बाप्तिस्मा उपोषण व परीक्षा यांकडून

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

निरनिराळे देशांतले लोकांस एकमेकांशीं एकल स्वास्थ्य व सम्मति राखुं द्यायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

आम्ही तुजवर प्रीति ठेवावी तुझी भीड धरावी आणि तुझे आज्ञांप्रमाणें झटून वर्त्तावें असा आह्मास सत्गुण द्यायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

तुझे सर्व लोकानीं तुझी गोष्ट नम्रतेनें ऐकावी ती गोष्ट पवित्र आवडीनें ध्यानांत आणावी आणि पवित्र आत्मोत्पन्न फळें द्यावीं असा त्यांचा सत्गुण वाढवायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

सर्व जे बहकलेले व फसलेले आहेत त्यांस सत्य मार्गांत आणायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

जे स्थिर आहेत त्यांचें बळ वाढवायास जे मनाचे अशक्त आहेत त्यांस समाधान व साहाय्य करायास जे पडलेले त्यांस उभारायास आणि सैतान आमचे पायांखालीं तुडवायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

जोखमांत संकटांत अथवा अरिष्टांत जे आहेत त्यां



सर्वांचें साहाय्य पुष्टीकरण आणि समाधान करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

जे पायवाटेनें अथवा जलमार्गानें जातात ते व ज्या बायका प्रसूतिवेदनेंत आहेत त्या व रोगी मनुष्यें व लाहान बाळकें हीं सर्व रक्षायास आणि जे बंदीवान शत्रूनीं हाकून नेले आहेत त्यां सर्वांवर दया करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

बापपोरकीं पोरें व विधवा व सर्व जे अनाथ व पीडिलेले यांचें रक्षण व पोषण करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

सर्व मनुष्यांवर दया करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

आमचे जे वैरी आहेत व जे आमचे पाठीस लागतात आणि जे आमची चाहाडी करितात त्यांस क्षमा करायास व त्यांचें मन प्रबुद्ध करायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

पृथ्वीचीं उपयोगी फळें आम्ही सुसमयीं भोगावीं ह्मणून तीं आम्हाला द्यावयास आणि आमचे उपयोगी राखायास त्वां मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

आमचे मनांत खरा पश्चात्ताप उत्पन्न करायास आमचे पातकी आणि अविचारयुक्त व अज्ञानयुक्त कर्मांची क्षमा करायास व आमचें आचरण तुझे पवित्र गोष्टीप्रमाणें शुद्ध व्हावें ह्मणून आह्माला तुझे पवित्र आत्मोत्पन्न सद्गुण द्यायास तों मान्य असावें

म्हणून हे उत्तम ईश्वरा आम्ही तुला विनवितों.

हे देवाचे पुत्रा आमचें ऐकावें म्हणून आह्मी तुला विनवितों

हे देवाचे पुत्रा आमचें ऐकावें म्हणून आह्मी तुला विनवितों

हे देवाचे बलि जो तूं जगाचें पापहरण करितोस तो

तुझी शांति आम्हास दे.

हे देवाचे बलि जो तूं जगाचें पापहरण करितोस तो

आम्हावर दया कर.

हे ख्रिस्ता आमचें ऐक
हे ख्रिस्ता आमचें ऐक
हे ईश्वरा आम्हावर दया कर
हे ईश्वरा आम्हावर दया कर
हे ख्रिस्ता आह्मावर दया कर
हे ख्रिस्ता आह्मावर दया कर
हे ईश्वरा आह्मावर दया कर
हे ईश्वरा आम्हावर दया कर



नंतर आचार्यानें व लोकानीं मिळून प्रभूची प्रार्थना बोलावी.

हे आमचे आकाशांतील बापा तुझें नाम पवित्र मानिलें जावें तुझें राज्य यावें जसें आकाशांत तसें पृथ्वींत तुझे इच्छेप्रमाणें केलें जावें आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे जसी आह्मी आपले अपराध्यांस क्षमा करितों तसी तूं आम्हास क्षमा कर आणि आह्माला परिक्षेंत आणूं नको पण जें वाईट त्यापासून आम्हाला तार आमेन

आचार्य॥ हे ईश्वरा आमचे पापांप्रमाणें आम्हास करूं नको

उत्तर॥ आमचे अन्यायांप्रमाणें आम्हास फल देऊं नको

आह्मी प्रार्थना करूं

हे देवा दयालु बापा जो तूं अनुतापी हृदयाचा उच्छ्वास व शोकार्त्तांची इच्छा अव्हेरीत नाहींस तो तूं जेव्हां आह्मी संकटांत अथवा विपत्तींत पडून तुझी प्रार्थना करितों तेव्हां आमचें साहाय्य कर आणि सैतानाचे अथवा दुष्ट मनुष्यांचे कपटानें जीं अरिष्टें आम्हासाठीं योजिलीं असतील तीं तुझे कृपाविशिष्ट शासनेंकडून नाहींशीं व्हावीं म्हणून कृपा करून आमचें ऐक अशासाठीं कीं आह्मास तुझे सेवकांस पाठलागाचा कांहीं उपद्रव न होऊन तुझे पवित्र मंडळींत आम्ही सर्वदा तुझी उपकारस्तुति करीत जावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे ईश्वरा तूं आपले नामाकरितां उठून आमचें साहाय्य व तारण कर.

हे देवा आम्ही आपले कानानीं ऐकिलें आणि जीं विख्यात कर्मे त्यांचे दिवसांत व त्यांचे पूर्वीचे काळांत त्वां केलीं तीं आमचे वडिलानीं आम्हाला सांगीतलीं

हे ईश्वरा तूं आपले प्रतिष्ठेकरितां उठून आमचें साहाय्य व तारण कर.

बाप व पुत्र व पवित्र आत्मा यांस गौरव असावें
जसें पहिल्यानें होतें आतां आहे आणि सनातनतः होईल आमेन

हे ख्रिस्ता आमचे वैऱ्यांपासून आम्हाला राख
तूं आमचे कष्ट कृपेनें पहा
आमचे मनांतील शोक दया करून पहा
तूं आपले लोकांचे पापांची दया करून क्षमा कर
आमच्या प्रार्थना प्रसादेंकरून व कृपेनें ऐक
हे दावीदाचे संताना आह्मावर दया कर
आतां व सर्वदा हे ख्रिस्ता आमचें ऐकायास मान्य ऐस
हे ख्रिस्ता कृपेनें आमचें ऐक हे प्रभो ख्रिस्ता कृपेनें आमचें ऐक

आचार्य॥ हे ईश्वरा तुझी दया आह्मावर प्रकट व्हावी
उत्तर॥ आह्मी तुजवर विश्वास ठेवितों ह्मणून

आह्मी प्रार्थना करूं

हे बापा आह्मी तुला विनवितों कीं त्वां कृपेंकरून



घेतल्यावर पापांत पडतात त्यांला पश्चात्ताप केवळ अप्राप्य आमचे दोषोत्पादक गुण पहावे आणि जीं अरिष्टें आह्मास फार योग्य आहेत त्यांचें निवारण तूं आपले नामाचे गौरवासाठीं कर आणि आह्मी आपले सर्व संकटांत तुझे कृपेवर विश्वास व भाव पूर्ण ठेवावे आणि पवित्र आचरणे करुन सर्वदा तुझी सेवा करावी ह्मणून आम्हास सत्वगुण दे तुझें गौरव व्हावें ह्मणून आमचा एकच मध्यस्थ व प्रतिनिधि जो येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगाने आमेन

नंतर सहायत्वपद्धति बोलावी आणि पुढला प्रार्थनासारांश पत्र व सुवार्त्ता हीं बोलावीं.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा ज्या त्वां आपले दिव्य विधानेंकडून आपले मंडळींत सेवकांची विविध पदें नेमलेलीं आहेत आणि प्रथम साक्षी जो स्तेफानस साधु त्यास दुसऱ्यांसहित द्याकोनांचे पदांत निवडून घ्यावें ह्मणून आपले प्रेषितांस सुचविलें तो तूं जे तुझे सेवक आतां त्याच कर्मांत व सेवेंत बोलाविलेले आहेत यांजवर कृपादृष्टि कर यांला तूं आपले ज्ञानांचे सत्यानें असें भरित कर आणि पवित्र आचारानें असें मंडित कर कीं वाक्य व सदुदाहरण यांकडून यानीं ह्या कर्मांत विश्वासुपणें तुझी सेवा करावी तुझे नामाचें गौरव व तुझे मंडळीची बोधसमृद्धि व्हावी ह्मणून येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आतां व सर्वदा आहे व राज्य करितो याचे पुण्याकरितां आमेन

पच १ तिम. ३. ८.

याकोनांसहि गुरुशील असावें लागतें ते द्विजिह्व बहुमद्यपानास आसक्त दुर्लाभपरायण नसोत त्यानीं पवित्र अंतःकरणांत विश्वासार्थाचें रहस्य धरावें तेहि पहिल्याने परीक्षित व्हावे नंतर त्यानी अनाक्षिप्य असतांना सेवा करावी त्यांचे स्त्रियांसहि गुरुशील असावें लागतें त्या चहाड नसोत शांत सर्वतः विश्वस्त असोत याकोन एकेक आपल्या एकल्याच स्त्रियेचे पुरुष असोत आपलीं लेंकरें व आपलीं घरें सुशिष्ट करितांना कारण ज्यानी याकोनांचें कर्म बरें साधिलें आहे ते आपल्यासाठीं उत्तम पद आणि ख्रिस्त येशूविषयींचे विश्वासांतहि बहुसुधैर्य पावतात

अथवा प्रेषितांचे वृत्तांतून काढिलेलें हें प्रकरण वाचावें.

प्रषि. वृत्त. ६. २.

तेव्हां ते बाराजण शिष्यांचा समुदाय जवळ बलावून ह्मणाले देवाची गोष्ट सोडून मेजांची सेवा करणें आम्हाला योग्य नाहीं यास्तव भाव्वानों ज्यांस आह्मी या उद्योगावर ठेवूं असे सात पुरुष सुप्रतिष्ठित पवित्र आत्मा व ज्ञान यानी भरित तुह्मी आपल्यांतून पाहून घ्या पण आह्मी प्रार्थनेस व गोष्टीचे सेवेस तत्पर असत जाऊं तर हें वचन सर्व समुदायास बरें वाटलें नंतर त्यानीं विश्वास व पवित्र आत्मा यानीं भरित पुरुष जो स्तेफानस त्यास आणि फिलिप्पस व प्रोखोरस व नीकानोर व तीमोन व पार्मेनास व एक आंतीयोखी



शरणागत जो नीकोलावस ह्यांस निवडिलें जे ते लोकानीं प्रेषितांसमोर ठेविले तेव्हां त्यानी प्रार्थना करून आपले हात त्यांजवर ठेविले मग देवाची गोष्ट वाढत गेली आणि येरूशालेमांत शिष्यांची गणती विपुल झाली आणि आचार्यांचा मोठा समुदाय विश्वासार्थास मान्य झाला

मग जे दीक्षित करायाचे आहेत त्यांतले प्रत्येकास एपिस्कोपसाने लोकांचे देखतां या पुढील लेखाप्रमाणें विचारावें.

देवाचें गौरव आणि त्याचे लोकांची बोधसमृद्धि व्हावी ह्मणून देवाची सेवा करायासाठीं हें कर्म व हा उपचार पत्करायास तुमचें अंतःकरण देवाचे पवित्र आत्म्याकडून उत्तेजित झालें आहे असें तुह्मी विश्वासतां किं काय

उत्तर॥ असें मी विश्वासतों

एपिस्कोपसानें विचारावें.

आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे मनोदयाप्रमाणें आणि राज्याचे योग्य नीतीप्रमाणें मंडळीचे सेवेंत तुह्मी सत्यतः बलाविले आहां असें तुह्मी मानितां कीं काय

उत्तर॥ असें मी मानितों

एपिस्कोपसानें विचारावें.

पुरातन विधि आणि नवा विधि यांचे सर्व प्रामाणिक लेखांचा सत्य विश्वास तुह्मी धरितां काय

उत्तर॥ त्यांचा विश्वास मी धरितों

एपिस्कोपसानें विचारावें.

ज्या मंडळींत सेवा करायास तुह्मी नेमिले जाल तींत

एकत्र मिळालेल्यां लोकांजवळ ते लेख तुम्ही यत्नतः वाचाल किं काय

उत्तर॥ असें मी करीत जाईन

एपिस्कोपसानें सांगून विचारावें.

ज्या मंडळींत सेवा करायास द्याकोन नेमिला जाईल तींत त्याचें कर्मासंबंधी उद्योग असा आहे कीं त्यानें पवित्र सेवेंत आचार्याचें साहाय्य करावें विशेषेंकरून जेव्हां आचार्य पवित्र सहायल अनुष्ठित करितो तेव्हां तें वांटायास त्याचें साहाय्य करावें आणि पवित्र लेख व नेमिलेले उपदेश मंडळींत वाचावे तरुणांस प्रश्नोत्तरावलि शिकवावी आचार्य जेव्हां विद्यमान नाहीं तेव्हां बालकांचा बाप्तिस्मा करावा आणि एपिस्कोपसाची आज्ञा प्राप्त झाली असतां ईश्वराची गोष्ट गाजवून सांगावी अणखीं जेथें असें नेमिलेलें आहे तेथें त्याचें कर्म असें आहे कीं प्रदेशांतले रोगी दरिद्री अशक्त लोकांचा शोध करावा आणि त्यांच्या अवस्था त्यांचीं नामें व निवासस्थानें आचार्याला सांगावीं अशासाठीं कीं त्यानें उपदेश केला असतां प्रदेशांतले लोकांचे अथवा दुसरे लोकांचे दानधर्मेंकरून त्यांचे कष्ट दूर करावे तर तुम्ही मनोरथानें व हर्षानें हें कर्म करीत जाल किं काय

उत्तर॥ देवाचे साहाय्यानें असें मी करीत जाईन

एपिस्कोपसानें विचारावें.

ख्रिस्ताचे संप्रदायाप्रमाणें तुम्ही आपलें आचरण व आपले कटुंबाचें आचरण निटावून पाळायास आणि जसें शक्य असेल तसें आपण व आपलीं कुटुंबें ख्रिस्ताचे मंडळीचीं हितकारक उदाहरणें अशीं प्रकट करायास मन लावून झटाल किं काय

उत्तर॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना असें मी करीत जाईन



एपिस्कोपसानें विचारावें.

तुमचा अधिकारी आणि मंडळीचे जे दुसरे मुख्य सेवक त्यांस आणि तुह्मावरील अधिकार व नीति हीं ज्यांला सोंपलीं आहेत त्यांस त्यांचा सन्मान राखून आणि संतुष्ट मन व मनोरथ यांकडून त्यांचे पवित्र संबोधांस अनुसरून तुम्ही वश्य असत जाल किं काय

उत्तर॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना मी स्वतां प्रयत्न करीत जाईन

नंतर जे दीक्षित व्हायाचे ते एपिस्कोपसासमोर नम्रतेनें गुढघे टेंकितांना त्यानें त्यांतले प्रत्येकाचे डोईवर अनुक्रमानें आपले हात ठेवून बोलावें.

देवाची जी मंडळी तुला सोंपली आहे तींत द्याकोनांचें कर्म करायास तूं अधिकार घे बापाचे आणि पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नामानें आमेन

तेव्हां एपिस्कोपसानें त्यांतले प्रत्येकास नवे विधीचें पुस्तक सोपून बोलावें.

देवाचे मंडळींत सुवार्त्ता वाचायास आणि एपिस्कोपसानें स्वतां तुला आज्ञा दिल्ही असतां ती गाजवून सांगायास तूं आधिकार घे

नंतर द्याकोनांतला एक जो एपिस्कोपसानें नेमिलेला त्यानें सुवार्त्ता वाचावी.

लूक, १२. ३५.

तुमची कटी वेष्टिली असावी आणि तुमचे दिवे पेटले असावे आणि लग्नापासून तो केव्हां परत येईल असें जीं मनुष्यें आपल्या प्रभूची वाट अशासाठीं पाहतात कीं तो येऊन दार ठोकील तेव्हां लागलेंच आपण त्यासाठीं उघडावें त्यां सारिखे तुम्ही असा त्यांचा प्रभु येईल तेव्हां ते त्याला जागृत सांपडतील असे जे सेवक ते धन्य मी तुम्हाला खचीत सांगतों कीं तो आपली कटी वेष्टून त्यांजला बसूं देईल आणि जवळ येऊन त्यांचा उपचार करील आणि तो दुसरे प्रहरांत आला असतां अथवा तिसरे प्रहरांत आला असतां त्याला ते असे सांपडतील तर ते सेवक धन्य आहेत

मग एपिस्कोपसानें सहायत्वाचे अनुष्ठानांत प्रवृत्त व्हावें आणि जे दीक्षित झाले त्यानीं राहून एपिस्कोपससंगतीं पवित्र सहायत्व घ्यावें

सहायत्व झाल्यावर शेवटले प्रार्थनासारांशानंतर आशीर्वादापूर्वींच हे पुढले प्रार्थनासारांश बोलावे.

हे सर्वसमर्थ देवा सर्व उत्तम अर्थांचा दाता जो तूं आपले परम उपकारिलानें तुझे मंडळींत हे तुझे सेवक द्याकोनांचे कर्मांत अंगीकारून घ्यायास मान्य झाला आहेस तो तूं हे ईश्वरा त्यानीं आपले सेवेंत विनीत नम्र स्थिर असावें आणि सुमनोरथानें सर्व आत्मिक नीतीस जपून पाळावें



म्हणून त्यांला बुद्धि दे असें आह्मी तुला विनवितों अशास कीं त्यांला सर्वदा सदंतःकरणाचा अनुभव असून आणि तुझा पुत्र जो ख्रिस्त त्यासंबंधी ते सदा स्थिर व समर्थ राहून या धाकट्ये कर्मांत असे उत्तमप्रकारें वर्त्तावे कीं तुझे मंडळींतले अधिक श्रेष्ट कर्मांत बलाविले जायास योग्य सांपडावे तोच तुझा पुत्र आमचा तारणारा येशू ख्रिस्त त्याजकडून ज्या त्याला गौरव व आदर सदा सर्वकाळ असावा आमेन

हे ईश्वरा आमचे सर्व कर्मांत तूं आपले परमकृपायुक्त प्रसादानें आमचे पुढें ये आणि आपले नित्य साहाय्यानें आह्मास प्रवृत्त कर अशासाठीं कीं आमचीं सर्व कर्मं तुजशीं प्रारब्ध प्रवृत्त आणि समाप्त असतां त्यांकडून आम्ही तुझे नामाचें गौरव करावें आणि शेवटीं आम्हास तुझे कृपेनें सनातन जीवन प्राप्त व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

देवाकडील जें समाधान सर्व बुद्धीहून वरचढ आहे त्यानें देवाचे व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याचे ज्ञानांत व प्रीतींत तुमचें हृदय व मन राखावें आणि सर्व समर्थ देवाचा ह्मणजे बापाचा पुत्राचा आणि पवित्र आत्म्याचा आशीर्वाद तुह्मावर असावा आणि सर्वदा तुह्माशीं रहावा आमेन

द्याकोनांचें दीक्षाकरण समाप्त.

# प्रेस्बुतरसांचें दीक्षाकरण.

एपिस्कोपसानें नेमिलेला दिवस आला असतां सकाळची प्रार्थना समाप्त झाल्यांवर प्रेस्बुतरसांचें कार्य व कार्म प्रव्यक्त करायासाठीं प्रवचन अथवा उपदेश असावा आणि ख्रिस्ताचे मंडळींत तो वर्ग केवढा उपयोगी आहे आणि त्यांचे कर्मांत त्यांला लोकानीं कसें मानावें हें उपदेशकानें सांगावें.

पहिल्यानें जे प्रेस्बुतरस से दीक्षित व्हावयास इच्छितात ते आर्खद्याकोनानें अथवा त्यांचे प्रतिनिधीनें एपिस्कोपसाजवळ (पवित्र मेजाजवळ आपले आसनावर बसतांना) पुढें करावे (त्यांतला प्रत्येक योग्य वस्त्र धारण करितांना) हे शब्द बोलतांना.

देवसंबंधी प्रतीक्ष्य बापा हे विद्यमान जन प्रेस्बुतरस असें दीक्षित करावे म्हणून मी तुजवळ पुढें करितों

एपिस्कोपसानें बोलावें.

जे जन तुम्ही आह्माजवळ पुढें करितां हे आपली विद्या व पवित्र आचरण यांकडून आपली सेवा देवाचें गौरव व त्याचे मंडळीची बोधसमृद्धि व्हावी ह्मणून साधायास समर्थ व योग्य आहेत याविषयीं तुह्मी सावध असा

आर्खद्याकोनानें उत्तर द्यावें.

म्यां यांजविषयीं शोध केला आहे व यांची परीक्षा केली आहे आणि हे असेच आहेत असें मी मानितों

नंतर एपिस्कोपसानें लोकांस बोलावें.

भले लोकानों देवाचा मनोरथ असला तर जे या दिवसीं



आचार्यत्वाचे कर्मांत घ्यायास आह्मी संकल्पितों ते हेच आहेत कारण यथायोग्य परीक्षा केल्यावर ते आपले कर्मांत व सेवेंत न्यायतः बलाविले आहेत आणि त्यांसाठीं योग्य आहेत याप्रतिकूल आम्हाला कांहीं सांपडत नाहीं तथापि ज्याकरितां तो या पवित्र सेवेंत घेतला जायास योग्य नाहीं असा जर कांहीं प्रतिबंध अथवा विशेष अपराध यांतले कोणेकाचे ठायीं तुह्मांतले कोणेकास जर कळला आहे तर त्यानें देवाचे नामानें पुढें येऊन तो अपराध अथवा प्रतिबंध काय आहे तो दाखवावा

मग जर कांहीं विशेष अपराध अथवा प्रतिबंध स्थापिला जाईल तर आक्षेपिलेला जन त्या अपराधापासून स्वच्छ आहे असें ठरेपर्यंत एपिस्कोपसानें त्याचे दीक्षाकरणाचाविलंब करावा.

नंतर एपिस्कोपसानें जे दीक्षित व्हायास योग्य असे सांपडले आहेत त्यांसाठीं मंडळीनें प्रार्थना करावी असें सुचवितांना) विद्यमान आचार्य व लोक यांसहित विनंती व प्रार्थना बोलाव्या जसें द्याकोनांचे दीक्षाकरणांत नमिलेलें अहे तसे परंतु जें विशेष प्रकरण विनंतीला लाविलें आहे त्यांत द्याकोन जो शब्द तो वर्जून त्याचे स्थानीं प्रस्बुतरस हा शब्द लावावा.

नंतर सहायलपद्धति बोलावी आणि पुढला प्रार्थनासारांश पत्र व सुवार्ता हीं बोलावीं.

प्रार्थनासारांश.

हे सर्वसमर्थ देवा सर्व उत्तम अर्थांचे दात्या ज्या तां आपले पवित्र आत्म्याकडून मंडळींत सेवकांचीं विविध पदें नेमिलेलीं आहेत तो तूं जे तुझे सेवक आतां आचार्यत्वाचे कर्मांत बलाविले आहेत यांजवर कृपादृष्टि कर यांला तूं आपले ज्ञानाचे सत्यानें असें भरित कर आणि पवित्र आचारानें असें

मंडित कर कीं वाक्य व सदुदाहरण यांकडून यांनी ह्या कर्मांत तुझी सेवा विश्वासुपणें करावी तुझे नामाचें गौरव व तुझे मंडळीची बोधसंवृद्धि व्हावी ह्मणून येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान आतां व सर्वदा आहे व राज्य करितो त्याचे पुण्याकरितां आमेन

पत्र एफेस. ४. ७.

आम्हांतले प्रत्येकास ख्रिस्ताची दानपरिमाणाप्रमाणें सत्व गुण दिला आहे याविषयीं भविष्यवादी ह्मणतो त्यानें वरतीं चढून गृहीत समुदाय धरून नेला आणि मनुष्यांस दानें दिलीं तर तो वरतीं चढला याचा अर्थ काय तो अगोदर पृथ्वीचे खालचे प्रदेशांत उतरला यावांचून आहे किं काय जो उतरला तोच आहे जो सर्व आकाशांहून फार वरतीं चढला अशासाठीं कीं त्यानें सर्व पूर्ण करावें तर कित्येक प्रेषित व कित्येक भविष्यवादी व कित्येक सौवार्तिक व कित्येक पालक आणि उपदेशक पवित्रांस संस्कृत करायासाठीं सेवेचे कामासाठीं ख्रिस्ताचे देहाचा संबोध करायासाठीं त्यानें दिले आहेत विश्वासाचे एकलास आणि देवाचे पुत्राचे पूर्ण वळखीसपुरते पुरुषास ख्रिस्ताचे पुरते उंचीचे परिमाणास आम्ही सर्व पोंहचूं पर्यंत

नंतर मात्थीसाधूचें सुवार्तेचे नववे अध्यायांतलें पुढलें प्रकरण वाचावें
मात्थी ९. ३६.

येशू समुदायांस पाहून त्यांजवर कळवळला कांकीं ते पालकहीन थकलेले व विखरून पडलेले मेंढरांसारिखे होते



तेव्हां तो आपले शिष्यांस बोलिला पीक फार आहे खरें पण कामकरणारे थोडे आहेत यास्तव त्यानें कामकरणारे पाठवून आपल्या कापणीस लावावें ह्मणून पिकाचे धन्याजवळ तुम्ही प्रार्थना करा

अथवा योहान्न साधूचे सुवार्तेचे दहावे अध्यायांतलें पुढलें प्रकरण वाचावें
योहान्न १०. १.

मी तुह्माला खचीत खचीत सांगतों जो कोणी मेंढरांचे कोंडवाड्यांत दारांतून जात नाहीं पण दुसरेकडून चढून आंत जातो तो चोर व लुटारू आहे परंतु जो दारांतून आंत जातो तो मेंढरांचा पालक आहे त्याला दारपाल दार उघडितो आणि त्याचा शब्द मेंढरें ऐकतात व तो आपलीं मेंढरें नामानें बलावितो आणि त्यांला बाहेर नेतो आणि तो आपल्ये मेंढरांस जेव्हां बाहेर जाऊं देतो तेव्हां त्यांजपुढें चालतो मेंढरेंहि त्यास अनुसरतात कारण तीं त्याचा शब्द जाणतात पण परक्यांस तीं अनुसरणार नाहींत तर त्यापासून पळतील कांकीं परक्यांचा शब्द तीं जाणत नाहींत हा दाखला येशूनें त्यांला सांगितला तथापि तो जे अर्थ त्यांजवळ बोलिला ते काय होते हें ते समजेनात यास्तव येशू फिरून त्यांस ह्मणाला मी तुह्माला खचीत खचीत सांगतों कीं मीच मेंढरांचें दार आहें सर्व जितके माझेपूर्वीं आले ते चोर व लुटारू आहेत पण मेंढरें त्यांचें ऐकेनात मीच मेंढरांचें दार आहें मज कडून जर कोणी आंत जाईल तर तरेल आणि आंत बाहेर जातांना चारा पावेल चोर चोरावें मारावें नाशावें यांवांचून

कांहीं करायास येत नाहीं त्यांस जीवन प्राप्त व्हावें आणि फारच प्राप्त व्हावें ह्मणून मी आलों आहें मीं उत्तम पालक आहें उत्तम पालक मेंढरांचे स्थानीं आपला जीव देतो जो पालक नसून केवळ मोलकरी आहे ज्याचीं तीं स्वकीय मेंढरें नाहींत तो लांडगा येतां पाहतो तेव्हां मेंढरें सोडून पळतो मग लांडगा त्यांस हरून तीं मेंढरें विखरितो मोलकरी पळतो कांकीं तो मोलकरीच आहे आणि मेंढरांविषयीं कांहीं चिंता धरीत नाहीं मी उत्तम पालक आहें आपलीं मेंढरें वळखतों आणि आपले मेंढरानीं ओळखला जातों जसें बाप मला जाणतो तसें मीहि बापाला जाणतों आणि मेंढरांचे स्थानीं मी आपला जीव देतों आणि दूसरीं मेंढरें मला आहेत जीं ह्या कोंडवाडींतलीं नाहींत तींहि मला आणावीं लागतात आणि तीं माझा शब्द ऐकतील तेव्हां एकच कळप आणि एकच पालक होईल

नंतर जे प्रेस्बुतरससे दीक्षित होणार आहेत त्याला एपिस्कोपसानें आपले आसनावर बसतांना बोलावें.

भाव्वानों ज्या कर्मांत तुम्ही बोलाविले आहां तें कसें योग्य आणि केवढें भारी आहे असें तुह्मी आपले परीक्षेंत व जो उपदेश नुक्ता तुह्माला केला होता त्यांत आणि सुवार्तेंतून व प्रेषितांचे लेखांतून जे पवित्र अध्याय काढिलेले त्यांत ऐकिलें आहे आणि आतां पुन: आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे नामानें आह्मी तुह्माला उपदेशितों कीं तुह्मी केवढे श्रेष्ट योग्यतेंत व केवढे भारी कर्मांत व अधिकारांत आपण बोलाविले आहों असें ध्यानांत धरावें म्हणजे ईश्व



राचे प्रेषित व पाहरेकरी व कारभारी व्हायास ईश्वराचे कुटुंबास शिकवायास प्रबोधन करायास आणि जपून पोसायास ख्रिस्ताचीं जीं मेंढरें इकडे तिकडे विखरलेलीं आहेत तीं व त्याचीं जीं लेंकरें या पापी जगांत आहेत तीं शोधायास अशासाठीं कीं त्यांला ख्रिस्ताकडून सनातन तारण प्राप्त व्हावें

यास्तव आपले सत्तेंत केवढा महानिधि सोंपला आहे असें तुमचे ध्यानांत सर्वदा ठसावें कारण जीं मेंढरें ख्रिस्तानें आपले मरणानें घेतलीं व ज्यांसाठीं त्यानें आपलें रक्त पाडिलें तींच तो निधि आहे ज्या मंडळीची व समाजाची सेवा तुह्माला करावी लागत्ये ती त्याची नवरी व त्याचा देहच आहे आणि तुमचे आलस्याकरितां जर ती मंडळी अथवा तींतली कोणेक व्यक्ति कांहीं दूषण किंवा प्रतिबंध घेईल तर त्या अपराधाचें विशालत्व व जें भयंकर शासन पुढें होईल तेंहि तुह्माला कळलें आहे यास्तव देवाचे लेंकरांविषयीं आणि ख्रिस्ताची नवरी व त्याचा देह यांविषयीं तुमचे सेवेचें तात्पर्य काय आहे हें तुह्मी आपले मनांत विचारून पहा आणि धर्माविषयींचे भ्रांतीला किंवा आचरणाचे दुष्टतेला तुह्मामध्यें कांहीं ठिकाण न रहावें म्हणून देवाविषयींचा विश्वास व ज्ञान यांचे एवढे संमतीस आणि ख्रिस्तसंबंधी आयुष्याचे एवढे पक्वतेस व पूर्णतेस जे तुमचे सत्तेंत सोंपलेले किंवा सोंपले जायाचे आहेत ते आणायास तुह्मी आपले अवश्य कार्याप्रमाणें जें सर्व तुम्हास शक्य आहे

तें करापर्यंत तुह्मी आपला श्रम आपली चिंता व आपला प्रयत्न सोडूं नये ह्मणून सावध असा तर तुमचें कर्म येवढें श्रेष्ट आणि एवढें दुस्साध्य असतांना ज्या ईश्वरानें तुह्माला एवढे श्रेष्ट योग्यतेंत ठेविलें आहे त्याकडेस आपल्यास कार्यशील व कृतज्ञ दाखवायासाठीं आणि तुह्मी स्वतां स्खलित होऊं नये आणि दुसऱ्यांस स्खलित व्हायाचें प्रयोजन होऊं नये ह्मणून सावध रहायासाठीं केवडे चिंतेनें व विचारानें तुह्मास प्रयत्न करावा लागतो असें तुह्मी पाहातां तथापि तुमच्यानें आपले नुस्ते शक्तीनें असें करायास मन लाववत नाहीं कारण असा मनोरथ व सामर्थ्य केवळ देवाकडून दिल्हें जातें यास्तव त्याचा पवित्र आत्मा तुम्हास प्राप्त व्हावा म्हणून तुह्माला मनापासून प्रार्थना करणें योग्य व अवश्य आहे आणि पवित्र लेखांतून काढलेलें ज्ञान व उपदेश आणि तदनुसार आचरण यांवांचून दुसरे साधनांकडून मनुष्यतारणसंबंधी एवढें भारी कर्म तुमच्यानें साधवत नाहीं यास्तव पवित्र लेख वाचतांना व शिकतांना आणि त्याच लेखांचे विधिप्रमाणें आपलें आचरण व आपले संबंधी जे आहेत त्यांचें आचरण निटावतांना तुह्माला केवढें झटावें लागतें हें ध्यानांत धरा आणि याच कारणास्तव सर्व सांसारिक चिंतनें व अभ्यास सोडायाला आणि (तुह्मास जितकें संभावित असेल तितकें) एकीकडे ठेवायाला तुह्मास योग्य आहे हेंहि ध्यानांत धरा

आह्मी सदाशा धरितों कीं यासमयाचे पूर्वीं फार वेळ



तुम्ही आपल्ये मनांत हे अर्थ पक्के विचारिले आहेत आणि ज्या कर्मांत तुह्माला बोलावायास देवाचे मनोरथास आलें आहे त्यास देवाचे कृपेनें सर्वतः आसक्त व्हावयास तुह्मी निश्चित संकल्प केला आहे ह्मणून जसें शक्य असेल तसें तुह्मी ह्याच एका कर्मास सर्वतः तत्पर असत जाल आणि आपलीं सर्व चिंतनें व अभ्यास याजकडे वळीत जाल आणि पवित्र आत्म्याचें दिव्य साहाय्य तुम्हास प्राप्त व्हावें ह्मणून आमचा एकलाच तारणारा येशू ख्रिस्त याचे मध्यस्थीकडून देव जो बाप याची प्रार्थना तुह्मी नित्य सर्वदा करीत जाल अशासाठीं कीं पवित्र लेख नित्य वाचतांना व विचारतांना तुह्मीं आपले सेवेंत उत्तरोत्तर पक्कें व समर्थ होत जावें आणि लोकानीं अनुसरायासाठीं तुह्मी हितकारक व भक्तियुक्त उदाहरणेंसे व्हावें ह्मणून ख्रीस्ताचें ज्ञान व विधि एतदनुसार आपलें व आपल्यांचें आचरण पवित्र व नीट करायास तुह्मीं स्वतां सर्वदा झटत जावें

आणि आतां जी ख्रिस्ताची मंडळी इथें मिळून विद्यमान आहे हिला यां अर्थांविषयीं तुमचें मत व मनोरथ समजावे आणि याच तुमचे वचनानें तुम्हाला आपलीं कार्यें साधायास अधिक उत्तेजित करावें ह्मणून ज्यां अर्थांविषयीं आम्ही देवाचे व त्याचे मंडळीचे नामानें तुम्हाला प्रश्न करितों त्यांविषयीं तुह्मी स्पष्टपणें उत्तर द्याल

आचार्यत्वाचे पदांत व कर्मांत आमचे प्रभु येशू ख्रिस्ताचे मनोरथाप्रमाणें आणि त्याचे मंडळीचे नीतीप्रमाणें तुह्मी

सत्यत: बोलाविले आहां असें आपल्या अंत:करणांत मानितां किं काय

उत्तर॥ असें मी मानितों

एपिस्कोपसानें विचारावें.

येशू ख्रिस्तावरील विश्वासाकडून सनातन तारण प्राप्त व्हायासाठीं जें ज्ञान अवश्य पाहिजे तें पवित्र लेखांत पुरतें आहे असा तुमचा निश्चय आहे काय आणि त्यांच पवित्र लेखांतून तुमचे सत्तेंत ठेविलेले लोकांला शिकवायास आणि ज्याचा सिद्धांत व प्रमाण त्यांच लेखांकडून ठरवितां येतें ह्मणून तुमचा निश्चय आहे त्यावांचून सनातन तारण प्राप्त व्हावयासाठीं पाहिजे असें कांहीं न शिकवायास तुह्मी निश्चित संकल्प करितां किं काय

उत्तर॥ तसाच माझा निश्चय आहे आणि देवाचे कृपेवर भाव ठेवून तसाच निश्चित संकल्प म्यां केला आहे

एपिस्कोपसानें विचारावें.

जसें ईश्वरानें नेमिलेलें आहे व जसें या मंडळीनें देवाचे आज्ञांप्रमाणें घेतलें आहे तसें ख्रिस्ताचें ज्ञान व संस्कार आणि शासन सर्वदा अनुष्ठित करायास विश्वासुपणें तुह्मी प्रयत्न करीत जाल किं काय आणि तुमचे पालनांत व सत्तेंत ठेविलेले लोकांस तें पूर्ण प्रयत्नेंकरून राखायास व पाळायास शिकवीत जाल किं काय

उत्तर॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना तसेंच मी करीत जाईन



एपिस्कोपसानें विचारावें.

देवाचे वाक्याप्रतिकूल जीं सर्व भ्रांत व अपूर्व मतें तीं दूर करायास आणि जसें पाहिजे व प्रयोजन लागेल तसें तुमचे पालन प्रदेशांतले रोगी व निरोगी लोकांस लौकिकांत व घरांत संबोध व उपदेश करायास विश्वासूपणें तुम्ही पूर्ण प्रयत्न करून सिद्ध असत जाल किं काय

उत्तर॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना तसेंच मी करीत जाईन

एपिस्कोपसानें विचारावें.

प्रपंच आणि इंद्रियें यांचें चिंतन सोडून प्रार्थना करितांना व पवित्र लेख वाचतांना व जे अभ्यास त्याचे ज्ञानास उपयोगी पडतात ते करितांना तुम्ही तत्पर असत जाल किं काय

उत्तर॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना तसेंच करायास मी खतां प्रयत्न करीत जाईन

एपिस्कोपसानें विचारावें.

ख्रिस्ताचे संप्रदायाप्रमाणें तुम्ही आपलें आचरण व आपल्ये कुटुंबाचें आचरण निटावून पाळायास आणि जसें शक्य असेल तसें आपण व आपलीं कुटुंबें ख्रिस्ताचे मंडळीचीं हितकारक उदाहरणें अशीं प्रकट करायास मन लावून झटाल किं काय

उत्तर॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना असें करायास मी खतां झटत जाईन

एपिस्कोपसानें विचारावें.

सर्व ख्रिस्ती लोकांमध्यें आणि विशेषेंकरून जे तुमचे सत्तेंत ठेविलेले किंवा ठेविले जातील त्यांजमध्यें जसें संभवित असेल तसें शांति स्वास्थ्य व प्रीति पाळायास आणि प्रवृत्त करायास तुह्मी झटत जाल किं काय

उत्तर ॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना तसेंच मी करीत जाईन

एपिस्कोपसानें विचारावें

तुमचा अधिकारी व मंडळीचे जे दुसरे मुख्य सेवक त्यांस व ज्यांला तुह्मावरील अधिकार आणि नीति हीं सोंपलीं आहेत त्यांस त्यांचा सन्मान राखून आणि संतुष्ट मन व मनोरथ यांकडून त्यांचे पवित्र संबोधास अनुसरून तुम्ही वश्य असत जाल किं काय

उत्तर ॥ ईश्वर माझा साहाय्यकर्त्ता असतांना तसेंच मी करीत जाईन

नंतर एपिस्कोपसानें उभें राहून बोलावें.

ज्या सर्वसमर्थ देवानें हे सर्व अर्थ करायास तुह्माला असा मनोदय दिला आहे त्यानें हेच सर्व साधायाला तुह्मास बल व शक्ति कृपा करून द्यावीं अशासाठीं कीं त्याचें जें कर्म त्यानें तुमचे ठायीं आरंभिलें आहे तें त्यानें समापन्न करावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

मग यां सर्व अर्थाविषयीं मनांत प्रार्थना करितांना देवाजवळ आपल्या मग्न विनंत्या कराव्या म्हणून मंडळीला सूचना करावी आणि त्यां प्रार्थनासाठीं कांहींसा वेळ मौन धरावें.



नंतर एपिस्कोपसानें (जे जन प्रेस्बुतरससे दीक्षित करायाचे आहेत ते सर्व गुढघे टेंकितांना) पुढलें गीत गावें अथवा बोलावें एपिस्कोपस आरंभ करितांना आणि प्रेस्बुतरस व दुसरे जे विद्यमान आसेत ते प्रत्युत्तरें करितांना.

पवित्र आत्म्या तूं येऊन आमचे जीव उत्तेजित कर  
आणि दिव्य सदग्नीकडून प्रकाशित कर  
तूं अभ्यंगकर्त्ता आत्मा आहेस  
जो आपले सप्तविध सद्गुण देतोस तो  
तुझा आशीर्युक्त दिव्य अभ्यंग  
समाधान जीवन व प्रीतीचा अग्निच आहे  
निरंतर प्रकाशेंकडून  
आमची मंद दृष्टि तीक्ष्ण कर  
तूं आपले सत्वगुणाचे पूर्णतेनें  
आमचें म्लानमुख अभ्यंगित व सतेज कर  
आमचे शत्रु दूर राखून घरीं कुशल दे  
तूं जिथें नायक आहेस तिथें कांहीं अरिष्ट येत नाहीं  
बाप व पुत्र आणि तूं तिघे एकच  
असें आह्माला जाणूं दे  
ह्मणजे निरंतर युगोयुग  
हें आमचें सनातन गायन होईल  
बापा पुत्रा पवित्र आत्म्या  
तुला योग्यस्तुति सनातनत: असो

नंतर एपिस्कोपसानें ही प्रार्थना बोलावी.

हे सर्वसमर्थ देवा दिव्य बापा ज्या त्वां आह्मावरील आपल्या अनंत दयेनें व उपकारितानें आमचा तारक आणि

सनातन जीवनाचा कारक व्हावयास आपला एकुलता व परमप्रिय पुत्र येशू ख्रिस्त आह्मांला दिला आहे ज्या त्यानें आपल्या मरणेंकडून आमचा उद्धार समापन्नकरून आणि आकाशांत चढून आपले प्रेषित भविष्यवादी सुवार्त्तिक अध्यापक आणि पालक पृथ्वीवर पाठविले ज्यां त्यांचा श्रम व सेवा यांकडून त्यानें पृथ्वीचे सर्व प्रदेशांत महा मंडली तुझे पवित्र नामाची सनातन प्रश्रसप्रस्तुत करायास मिळविली तुझे सनातन कृपेचे एवढे विपुल उपकारांकरितां व जे तुझे सेवक इथें विद्यमान आहेत यांस मनुष्यांचे तारणासाठीं नेमिलेल्या कर्मांत व सेवेंत त्वां कृपा करून बलाविलें आहे याजकरितांहि आह्मी तुला मनापासून कृतज्ञता निवेदितों आह्मी तुला स्तवितों व भजतों आणि जे सर्व इथें अथवा दुसरे कोठें तुझे नामास प्रार्थितात त्यानीं यांकरितां व तुझे सर्व दुसरे उपकारांकरितां कृतज्ञता दाखवावी आणि पवित्र आत्म्याकडून तुझें व तुझे पुत्राचें ज्ञान व विश्वास यांत नित्य वाढून पुढें जावें असें त्याच तुझे सुवंदित पुत्राकडून आह्मी तुला नम्रतेनें विनवितों अशासाठीं कीं यां तुझे सेवकानीं व ज्यांजवर हे तुझे सेवक असे नेमले जातील त्यानीं तुझें नाम निरतंर गौरवावें आणि तुझें आशीर्विशिष्ट राज्या वाढवावें तोच तुझा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु जो तुझे व पवित्र आत्म्याचे सहवर्त्तमान सनातनत: आहे आणि राज्य करितो त्याकडून आमेन

ही प्रार्थना बोलिल्यावर जे आचार्यत्वाचें पद घेणार आहेत त्यांतले प्रत्ये काचेडोईवर पृथक् पृथक् एपिस्कोपसानें विद्यमान प्रस्बुतरसांसहित



आपले हात ठेवावे घेणारे नम्रतेनें गुडघे टेंकितांना आणि एपिस्कोपस हें पुढलें वाक्य बोलतांना

आचार्यांचें जें कर्म व उद्योग आमचे हात ठेवण्यानें तुला आतां सोंपून दिला जातो तो देवाचे मंडळींत करायास तूं पवित्र आत्मा घे ज्याचे पापांची तूं क्षमा करिशील त्यांची क्षमा केली जाईल आणि ज्यांचीं पापें राखून ठेविशील तीं राखून ठेविलीं जातील आणि देवाची गोष्ट व त्याचे पवित्र संस्कार यांचा विश्वासु अनुष्ठापक तूं असतजा बापाचे आणि पुत्राचे आणि पवित्र आत्म्याचे नामानें

तेव्हां ते गुडघे टेंकितांना एपिस्कोपसानें त्यांतले प्रत्येकाचे हातांत पवित्र पुस्तक देऊन बोलावें.

ज्या मंडळींत तूं न्यायत: नेमिला जाशील तींत देवाची गोष्ट गाजवून सांगायास आणि पवित्र संस्कार अनुष्ठित करायास तूं अधिकार घे

हें झाल्यावर नीकेयी मतांगीकार बोलावा नंतर एपिस्कोपसानें सहायत्वाचे अनुष्ठानांत प्रवृत्त व्हावें आणि जे दीक्षित झाले आहेत त्यानी ज्या स्थानांत त्यांजवर हात ठेविले होते त्यांत राहून सहायत्व घ्यावें. सहायत्व झाल्यावर शेवटले प्रार्थनासारांशानंतर आशीर्वादाचे पुर्वींच हे प्रार्थनासारांश बोलावे.

हे परम दयाळो बापा यां तुझे सेवकांवर त्वां आपली दिव्य आशी पाठवावी ह्मणून आह्मी तुला विनवितों अशासाठीं कीं हे पुण्यवेष्टित असत जावे आणि तुझी जी गोष्ट यांचे मुखांकडून सांगीतली जाईल ती एवढी सफल व्हावी कीं ती कधीं व्यर्थ सांगीतली जाऊं नये आणि आमचे तारणाचें साधन व्हावयासाठीं तुझे परम पवित्र वाक्यांतून अथवा

तदनुसार जें हे सांगतील तें ऐकून घ्यायास आह्माला कृपा करून सत्गुण दे अशासाठीं कीं आह्मीं आपले सर्व शब्दांत व कर्मांत तुझें गौरव आणि तुझे राज्याची समृद्धि करायाला झटावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

हे ईश्वरा आमचे सर्व कर्मांत तूं आपले परम कृपायुक्त प्रसादानें आमचे पुढें ये आणि आपले नित्य साहाय्यानें आह्मास प्रवृत्त कर अशासाठीं कीं आमचीं सर्व कर्मे तुजशीं प्रारब्ध प्रवृत्त आणि समाप्त असतां त्यांकडून आह्मीं तुझे नामाचें गौरव करावें आणि शेवटीं आह्मास तुझे कृपेनें सन। तन जीवन प्राप्त व्हावें येशू ख्रिस्त आमचा प्रभु याचे योगानें आमेन

देवाकडील जें समाधान सर्व बुद्धीहून वरचढ आहे त्यानें देवाचे व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त आमचा प्रभु त्याचे ज्ञानांत व प्रीतींत तुमचें हृदय व मन राखावें आणि सर्वसमर्थ देवाचा ह्मणजे बापाचा पुत्राचा आणि पवित्र आत्म्याचा आशीर्वाद तुह्मावर असावा आणि सर्वदा तुह्माशीं रहावा आमेन

जर एकाच दिवसीं कित्येक द्याकोनसे दीक्षित केले जातात आणि कित्येक प्रेस्बुतरसस दीक्षित केले जातात तर पहिल्यानें द्याकोन पुढें केले जाव नंतर प्रेस्बुतरस पुढें केले जावे आणि उभयतांसाठीं विनंती एकदांच वाचली असली तरीं पुरे.

समाप्त.